# मराठ्यांचा इतिहास.

## भाग पहिला.

## प्रास्ताविक माहिती.

( हिंदुस्थानांतील प्राचीन हिंदू राज्यें. )

विजयानगरच्या राज्यापर्यंत.

इतर अनेक उपयुक्त व विविध माहिती सह.

लेखक

दत्तात्रय बाळकृष्ण करकरे.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य; अस्तनींतील निखारा;
पेशवाईचा मध्यकाल; वगैरे पुस्तकांचा कर्ता.

जळगांव; पूर्व खानदेश.

आवृत्ति पहिली.

इ. सन १९२१.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत दोन रुपये.

# मराठ्यांचा इतिहास.

## भाग पहिला.

## प्रास्ताविक माहिती.

( हिंदुस्थानांतील प्राचीन हिंदू राज्यें. )
विजयानगरच्या राज्यापर्यंत.

इतर अनेक उपयुक्त व विविध माहिती सह.

लेखक

**दत्तात्रय बाळकृष्ण करकरे.**

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य; अस्तनींतील निखारा;
पेशवाईचा मध्यकाल; वगैरे पुस्तकांचा कर्ता.

जळगांव; पूर्व खानदेश.

आवृत्ति पहिली.

इ. सन १९२१.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत दोन रुपये

Printed by V. V. Paranjape and Published by D. B. Karkare at the Udyan Electric Press, Girgaum, Bombay. No. 4

# आभार प्रदर्शन

या भागास मी ज्या ज्या ग्रंथांचे आधार घेतले आहेत, त्या त्या सर्व ग्रंथकारांचा, ज्या ज्या अनेक स्नेह्यांनीं, व लायब्ररयांनीं, मला आपल्या अमोल्य ग्रंथ-संग्रहालयाचा उपयोग करण्याची, व आवश्यक तीं पुस्तकें वापरण्यास जवळ ठेवण्याची परवानगी दिली त्यांचा, व ज्या इतर अनेक मित्र-मंडळींनीं मला निरनिराळ्या प्रकारें अतीशय उपयुक्त मदत केली. त्या त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

ग्रंथकार.



धैर्योदार्यचूडामणी, श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव
गंभीरराव देशमुख, देशपांडे, सरकानगो,
सावदें; जिल्हा पूर्व खानदेश.



धैर्यौदार्य चूडामणी, श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव
गंभीरराव देशमूख, देशपांडे, सरकानगो,
सावदें; जिल्हा पूर्वखानदेश.

डी ५१

# अर्पण पत्रिका.

श्रीमंत, धैर्योदार्यचूडामणी, सरदार,

## गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव

सरकानगो, देशमूख, देशपांडे;

सावदें; जिल्हा पूर्वखानदेश,

यांच्या सेवेसीं

हा ग्रंथ

श्रीमंतांच्या परवानगीनें अत्यंत आदरानें

अर्पण केला आहे.

द. बा. करकरे.

# श्रीमंतांचें अभिनंदन

श्रीमंत सरदार गंगाधरराव साहेब यांच्या संबंधीं या ठिकाणीं कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे. श्रीमंतांचा व माझा लहानपणा पासूनचा परिचय असल्यानें श्रीमंतांना, या ग्रंथास आश्रय देण्याबद्दल मी विनंती केली; व ती त्यांनीं मान्य करून, मराठ्यांच्या इतिहासाच्या ह्या पहिल्या, व याच्या पुढील सर्व भागास, आपला उदार आश्रय देऊन, मला आपलें ऋणी केलें आहे; इतकेंच नव्हें तर श्रीमंतांच्या कृपेंमुळेंच हा सर्व ग्रंथ पूर्ण होणार असल्यामुळें, त्याचें श्रेय श्रीमंत सरदार गंगाधरराव साहेब यांनांच देणें इष्ट आहे.

दत्तात्रय.

# सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमूख, देशपांडे, सरकानगो, सावदें जिल्हा पूर्व खानदेश.

श्रीमंत गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव, सरकानगो, देशमूख, देशपांडे, व सेकंडक्लास सरदार, सावदें, जिल्हा पूर्व खानदेश, आणि नेमाड, हे, जें घराणें सहारों पन्नास वर्षां पूर्वी, अर्जुन नाईक या नांवाच्या एका मनुष्याचा मुलगा नामें गुरूदास यानें स्थापन केलें, त्या घराण्याचे वंशज आहेत. गुरूदास हा बादशहा मुबारिक याच्या अतीशय मेहेरबानींतील असून बादशाहानें त्यास खानदेश आणि नेमाड प्रांतांतील आशिरगड, सावदें, मांजरोद, वरणगांव, आणि डांगरी परगण्यांची, देशमुखी आणि देशपांडेपणाचें वतन बहाल केलें होतें. त्याच्या मृत्यू नंतर त्याचा मुलगा गंगोजी हा त्या वतनाचा मालक झाला; त्यानें भिल आणि पेंढारी यांच्या मध्यें सलोख घडवून आणण्यांत प्रमुखत्वानें भाग घेतला, आणि बादशाही सैन्यास सामुग्री वगैरेंचा पुरवठा केला. या त्याच्या कामगिरी बद्दल बादशहा अल्लाउद्दीन यानें त्यास खानदेशांतील एकशें तेवीस गांवची जमेदारी, सरकानगोपणा, " गंभीरराव " हा किताब, व सरदारकीचे सर्व मानमरातब, हीं सर्व त्यास वंशपरंपरेनें बहाल केलीं. त्यानंतर हल्लींच्या सरदार साहेबाचे आजे केशवराव गंभीरराव यांनीं आपल्या प्रदेशाच्या हद्दींत " सर्व्हे-सेटलमेंट " म्हणजे जमीनीची मोजणी व धारावंदी-चा उपक्रम करण्यांत इंग्रज सरकाराला प्रत्येक प्रकारची मदत केली, आणि नवीन सुधारणा सुरू करण्याच्या, व पूर्वीच्या कांहीं बाबतीं दुरस्त करण्याच्या कामीं ही साह्य केलें; ह्या गोष्टी लक्षांत घेऊन या घराण्यांतील हल्लींचे मुख्य पुरुष श्रीमंत गंगाधरराव यांस हिंदुस्थान सरकारानें इ० सन १९०९ मध्यें सरदारकीचा मान अर्पण केला. हिंदुस्थान सरकारानें पूर्व खानदेश जिल्हयास "सरदार"ही पदवी अर्पण केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

सरदार गंगाधरराव देशमूख, हे, कांहीं काळ, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे मेंबर, व सावदे म्युनसिपालिटीचे प्रेसिडेंट असून सावदें गांवाची सर्व साधारण सुधारणा, आणि आरोग्य, या बाबतींत त्यांनीं मौल्यवान कामगिरी बजाविली आहे; व ती सरकारास ही मान्य झालेली आहे. त्याप्रमाणेंच त्यांनां दुसऱ्या वर्गाच्या मॅजिष्ट्रेटचे अधिकार देऊन सरकारानें त्यांचा बहुमान केलेला आहे. शिवाय सर्व सावदे परगण्याच्या धर्माधिकारीपणाचा अधिकारही त्यांच्याचकडे असून संकेश्वर आणि करवीर मठाच्या शंकराचार्यांनी त्यांनां नुकताच " धैर्योदार्य चूडामणी " हा किताब देऊन त्यांचा गौरव केलेला आहे.

# Sardar, G. R. GAMBHIR RAO,

## Deshmukh, Deshpande, Sirkango,

## of

## Savda, East Khandesh.

Shrimant Gangadhar Rao Raghunath Rao Gambhir Rao, Sirkango, Deshmukh, Deshpande, and Second Class Sardar, Savda, East Khandesh and Nimar, is the descendant of a family that was founded six hundred and fifty ( 650 ) years ago by Gurudas, Son of Arjun Naik. He was a prime favourite of the Emperor Mubarik, who conferred on him the Deshmukhi and Deshpandeship of Asirgarh, Savda, Manjrod, Varangaon, and Dangari Parganas, in Khandesh and Nimar. He was succeeded by his son Gangoji, who took a leading part in establishing peace between the Bhils and the Pindaris, and supplied provisions to the Imperial troops. For these services, the hereditary Jamedari and Sirkangoship of one hundred and twenty-three ( 123 ) villages in Khandesh, and the title of "Gambhir Rao", were conferred on him by the Emperor Allauddin, together with all the honours of Sardar. Keshav Rao Gambhir Rao, the grandfather of the present Sardar, gave every assistance in the introduction of Surveys and Settlements into his districts, and otherwise aided the Government in introducing Reforms and Improvements, and, in consideration of these services, the Government of India, in 1909, conferred the honour of a Sardarship on the present head of the family. This was the first time that the Indian Government had given the title of Sardar to the Khandesh District.

Sardar Gangadhar Rao Deshmukh, as a member of the District Local Board, and President of the Savda Muncipality, for some time, has rendered valuable services in the cause of sanitation and general improvements of the town of Savda, and these services have been recognized by Government. He has also been honoured by Government by conferring upon him the powers of a Magistrate of the second class. He also holds the powers of Dharmadhikari for the whole of Savda pargana and has been recently honoured by His Holiness the Shankaracharya of the Sankeshwar and Karvir Maths by conferring upon him the title of "Dhairyodarya Chudamani".

# आधार भूत ग्रंथांची यादी

## इंग्रजी


1 Vincent Smith's Early History of India.
2 Rapson's Ancient India.
3 Mrs. Mannings' Ancient and Mediæval India. Vol. 1,2.
4 Elphinston's India.
5 Elliot's History of India. Vol. 1, 2, 3.
6 Wheeler's History of India. Vol. 1, 2.
7 Murray's History ot India.
8 Mill's History of India. Vol. 1, 2.
9 Tratter's History of India.
10 Max Duncker's History of Antiquity. Vol. 1 to 4.
11 Meadows Tayler's Student's History of India.
12 Do do. Origin of the Aryans.
13 Frazer's Literary History cf India
14 Keen's History of Hindustan.
15 Buckle's History of Civilization.
16 Aiyangar's Ancient India.
17 Myer's History: Ancient and Modern.
18 Macdonell's Sanskrit Literature.
19 Weber's Indian Literature.
20 Schlegel's History of Literature.
21 Hunter's Gazetter. "India."
22 R. C. Datta's A History of Civilization of Ancien India. Vol .1, 2.
23 S. Mukerjee's History of Indian Shipping and Maritime activity From the earliest times.
24 Bhandarkar's Early History of the Deccan.
25 Wright's History of Nepal.
26 Heeren's Historical Reserches. Vol. 1,2.
27 Mc. Crindle's Ancient India as described by verious Greek Writers.
28 Heeren's Asiatic Nations. Vol. 1, 2.
29 Lyall's Asiatic Studies.
30 Historians History of the World. Vol. VIII.

31 Encyclopaedia Britannica. Vol. XI.
32 Wilson's Religious sects of the Hindus.
33 Brigg's Ferishta. Vol. 1 to 4.
34 Ward's Antiquity of Hinduism. Vol. 1 to 4.
35 Robert Sewell's A Forgotten Empire; History of Vijaynagar.
36 Lyall's British Dominion in India.
37 B. Surya Narain Rao's The never to be Forgotten Empire. History of Vijayanagar.
38 Max Muller's India, and What can it teach us?
39 Kelkar's The Case for Indian Home Rule.
40 Mrs. Besant's How India wrought for freedom. (Historical preface.)
41 Harbilas Sarda's Hiudu Superiority.
42 Vaidya's Epic India.
43 Ranade's The Rise of the Marhatta Power.

---

## मराठी

१ काथवटेकृत भरतखंडाचा प्राचीन इतिहास.
२ लोकहितवादी कृत गुजराथचा इतिहास.
३ मोडककृत दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास. भाग १-२-३.
४ बिर्जेकृत क्षत्रीय आणि त्यांचें अस्तित्व.
५ गोळेकृत ब्राह्मण आणि त्यांची विद्या.
६ सदर हिंदूधर्म आणि सुधारणा.
७ ऋग्वेदीकृत आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास.
८ सरदेसाई कृत मराठी रियासत. भाग १,२.
९ सदर मुसलमानी रियासत.

टीप:—याशिवाय कारण परत्वें उपयोगांत आणिलेल्या इंग्रजी मराठी पुस्तकांचा त्या त्या ठिकाणीं उल्लेख केला आहे.

# प्रस्तावना.

---:o:---

" मराठ्यांचा इतिहास " लिहितांना शिवाजीच्या पूर्वीच्या काळांतील मराठ्यांच्या राजकीय परिस्थितीची थोडक्यांत माहिती देऊन, छत्रपति शिवाजी महाराजाच्या काळापासून त्यास प्रारंभ करणें पुष्कळ दृष्टीनें अपूर्ण आहे; आणि प्राचीन कालांतील हिंदुस्थानांतील अनेक निरनिराळीं राजकीय स्थित्यंतरें कसकशीं घडून आलीं, व त्यांतच मराठ्यांनींही शिवाजीच्या काळापर्यंत आपलें राजकीय महत्व कसें वाढवीत नेलें, वगैरे पूर्व माहितीसह त्याचें विवेचन केलें तरच तो क्रमवार, व सुसंगत होऊन त्यांत अपूर्तता राहणार नाहीं, असें प्रस्तुतच्या लेखकाचें मत असल्यानें पूर्वकालीन माहिती थोडक्यांत या भागांत दिली आहे; व त्यावरून आपले पूर्वज किती कर्तृत्ववान होऊन गेले, आणि त्यांनीं जगाच्या संस्कृतींत कितीं महत्वाची भर घातली, याचें ज्ञान होऊन त्यांच्याविषयीं आपल्या मनांत अत्यंत पूज्यभाव, व अभिमान उत्पन्न होईल, अशी आशा आहे.

त्याप्रमाणेंच या भागांत, हिंदूधर्म, व त्याचें श्रेष्ठत्व, त्या धर्मांतील उदात्त तत्वें, मुसलमानांची कर्तबगारी, हिंदू संस्कृतीचा त्यांच्यावर झालेला परिणाम, हिंदूलोकांमधील निरनिराळे धार्मिक मतभेद, पंथभेद, हिंदुस्थान देशाची सुसंपन्नता, संस्कृति, व श्रेष्ठत्व, हिंदूलोकांचें शील, व स्वभाव, विजयानगरच्या राज्यापर्यंतचीं अनेक हिंदूराज्यें, त्यांचा उत्कर्ष व अपकर्ष, मुसलमानांच्या स्वाऱ्या, व त्यांच्या वर्चस्व स्थापनेस प्रारंभ, वगैरे बाबतींची थोडक्यात माहिती दिलेली आहे; व त्यावरून तत्कालीन राजकीय परिस्थितीसंबंधी योग्य माहिती मिळणारी आहे. थोडक्यांत म्हणजे—प्रोफेसर मॅक्समुल्लर यानें बन्सेनच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत म्हटल्या प्रमाणें—"मृत्यू पावलेल्या थोर इष्टमित्रांच्या गुणांचें वर्णन करावें, त्यांच्या नांवास बहुमान द्यावा, आणि त्यांच्याकरितां शोक करावा, हेंच आपलें मुख्य कर्तव्य आहे असें कोणी समजूं नये; तर त्यांच्या इच्छा काय होत्या, आणि कोणत्या चांगल्या गोष्टी करण्याविषयीं त्यांचा दृढाग्रह होता, हें पूर्णपणें समजून घेऊन त्याप्रमाणें चालणें, व व त्या गोष्टी करण्याविषयीं झटणें, हेंच आपलें पवित्र व उत्तम कर्तव्यकर्म आहे." अर्थात अशा दृष्टीनें या प्राचीन इतिहासाचें मनन केल्यास त्यापासून पुष्कळच उपयोग होईल, व ज्ञानांतही अधीक भर पडेल, अशी खात्री आहे.

मुंबई. गिरगांव. द. बा. करकरे.

ता. १५ जून इ. सन १९२१

# अनुक्रमणिका.

प्रास्ताविक माहिती; व ती प्रारंभीं ग्रथित करण्याची आवश्यकता; हिंदुस्थानतील पूर्वकालीन राज्यें, आर्यांची संस्कृति व राज्य व्यवस्था. पान १–२; हिंदुस्थान देशाच्या प्राचीनत्वासंबंधी माहिती; पान २; युरोपांतील प्राचीन कालमानाचे भाग; पान २–४; हिंदुस्थानांतील प्राचीन कालमानाचे भाग; पान ४; हिंदुस्थानचें प्राचीनत्व, व आर्य, अनार्य, द्राविडी, वगैरे लोकांसंबंधी माहिती; पान ४–५; आर्य लोक हिंदुस्थानांत स्थाईक होऊन वर्णव्यवस्था सुरू झाली; पान ६; ऋग्वेद ग्रंथ, व वेदकालापूर्वीची व नंतरची स्थिती; पान ६–८; द्राविडी लोकांची सुधारणा. पान ८; आर्यांच्या नव्या वसाहती, व युद्धकलह; महाभारताची रचना; व राज्यकर्त्यांच्या अधिकाराची नवी व्याप्ती; पान ८–९; हिंदुस्थान देशाचें मूळनांव, व पुराणांतील वंशावळी, याबद्दल विवेचन; पान ९; त्या काळांतील राजघराणीं; पान १०–११; वर्णव्यवस्थेचें रूपांतर, व ऋग्वेदाचे तीन भाग पाडण्यांत आले, त्या संबंधीं विवेचन. पान ११; ब्राह्मणकाळांतील आर्यांचा धार्मिक ग्रंथ विस्तार; पान १२–१३; हिंदुस्थान देशाची प्राचीन संस्कृति. पान १३–१४; ऋग्वेदाचें अमूल्यत्व व महत्व; पान १४; बौद्धलोकांचें महत्व; व त्या कालांत घडून आलेली धार्मिक व राजकीय क्रांति. पान १५–१६; हिंदुस्थानांतील तत्कालीन राज्यें; पान १६–१७; शिकंदर बादशहाची हिंदुस्थानावर स्वारी; पान १७–१८; मौर्य घराण्याची स्थापना; पान १८; चंद्रगुप्ताची नमुनेदार राज्य व्यवस्था, व त्या बद्दल मेगास्तनीसचा अभिप्राय; पान १९–२० साम्राट अशोक व त्याची राज्य व्यवस्था; पान २१–२२; अशोकाच्या काळांतील धर्मक्रांति; पान २२; बौद्ध व जैन धर्माची संस्थापना, व त्या संबंधीं माहिती; पान २३–२९; पाणिनी, व त्याचा अष्टाध्यायी हा ग्रंथ; पान २९; हिंदुस्थान देशाचा पूर्वकालीन व्यापार, व ब्राह्मी लिपी; पान २९–३०; चंद्रगुप्त, बिंदुसार, व अशोक, यांच्यासंबंधी माहिती; पान ३०–३१; सुंग घराण्याची स्थापना; त्याचा उत्कर्ष, व ऱ्हास; आणि हिंदुस्थानावर परकीयांच्या स्वाऱ्या होण्याची सुरवात; पान ३८–४०; त्या

प्रदेशाची सुसंपन्नता; पान ४०–४१; त्या संबंधीं मार्कोपोलोचें मत; पान ४१-४२; या प्रदेशांतील, व हिंदुस्थानांतील परदेशां बरोबरील, व रोमन साम्राज्या बरोबरील व्यापार; पान ४२–४३; आंध्र राज्याचे तुकडे पडतात; पान ४३–४४; या काळांत बौद्ध धर्माप्रमाणेंच वैद्यशास्त्राची व इतर शास्त्रांची, आणि कलांची प्रगति व भरभराट होते. पान ४४; गुप्त घराण्याचा उदय; चंद्रगुप्त, व समुद्रगुप्त यांची हकीकत; पान ४५–४६; गुप्त साम्राज्याची हकीकत व चिनी प्रवासी फॉ-एन याचें त्या संबंधीं मत; पान ४६–४८; गुप्त साम्राज्याच्या सत्तेचा अपकर्ष; पान ४८; लघुकुशान राज्याची स्थापना, व ऱ्हास; हूण लोकांचा उदय, व ऱ्हास; यशोवर्धन यानें हूण लोकांवर विजय मिळवून गुप्त घराण्याचा नाश केला; पान ४९–५०; पंजाब मधील ठाणेश्वर येथील राज्याची हकीकत; पान ५०, राजा हर्ष याची कारकीर्द; पान ५१–५४; मालव घराण्याचा ऱ्हास; आणि कनोज येथें राज्यवर्धन यानें आपल्या घराण्याची केलेली स्थापन; पान ५४--५५; त्या घराण्याचा ऱ्हास; पान ५५; गुजराथेंतील वल्लभी घराण्याचा उदय, व ऱ्हास; चावडा व चालुक्य, अथवा सोळंकी घराणें; पान ५६; सोळंकी घराण्याची, व माळवा प्रांतांतील परमार उर्फ पवार घराण्यांतील राजा भोज, याची हकीकत; पान५६–७१; परमार उर्फ पवार घराण्याचा ऱ्हास; पान ७१; अनहिलपट्टण येथील राजा भीमदेव याची कारकीर्द अजमीर येथील राजा विसलदेव याच्याशीं त्याचें शत्रुत्व; भीमदेवाचा पराभव; राजाकर्ण याची कारकीर्द; त्याचा मैलनदेवीशीं विवाह; पान ७२–७३; सिद्धराजाची कारकीर्द, ७३–७५; अजयपालाची कारकीर्द; पान ७५–७६; मूळराजाची कारकीर्द; त्याचा मृत्यू, व भीमदेव गादीवर येतो; पान ७६; भीमदेव, व पृथ्वीराज चव्हाण यांच्यामध्यें वैरभाव उत्पन्न होतो; भीमदेवाचा पराजय, व मृत्यू; सोळंकी वंशाचा शेवट; व वाघेल वंशाचा उदय; पान ७७; वाघेल वंशाची हकीकत; राजाकर्ण याची कारकीर्द, व त्या वंशाचा शेवट; पान ७७-७९; मलिककाफूरचा उदय; देवलदेवीची, व अल्लाउद्दीनच्या घराण्याची हकीकत; व तुघ्लक घराण्याचा उदय; पान ७९–८०; गुप्त घराण्याची स्थापना; पान ८१: त्या घराण्याचा ऱ्हास, व पाल घराण्याचा उत्कर्ष; पान ८२ पाल घराण्याचा ऱ्हास, व सेनघराण्याची स्थापना; बंगाल, बिहार व ओरीसा,

हे प्रांत मुसलमानी अमलाखालीं जातात; पान ८३; गुर्जर लोकांची, व परमार आणि चव्हाण लोकांची हकीकत; पान ८४-८५; तोमार, राठोड, व चव्हाण-घराण्याची हकीकत; पान ८५; स्थानेश्वरचें युद्ध; पृथ्विराजाचा पाडाव; पान ८६; जयचंदाचा पाडाव; महोबा येथील चंदेलघराण्याचा ऱ्हास; मुसलमानांचा नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत प्रवेश; पान ८७; काश्मीरच्या राज्याची पूर्व माहिती; पान ८८-८९; नेपाळच्या राज्याची पूर्व माहिती; पान ८९-९६; आसामच्या राज्याची पूर्व माहिती; पान ९६-९७; तिबेटच्या राज्याची पूर्व हकीकत; पान ९७-९९; कागद, होकायंत्र, व बंदुका-तोफांची दारू यांचा शोध लागून-उपयोग करण्यास सुरवात होऊन त्यामुळें जगांतील वाङ्मय, राजकारण, व युद्धविषयक परिस्थितींत महत्वाचा फेरबदल झाला, त्यासंबंधीं हकीकत, पान ९८-९९; सिंध प्रांतासंबंधीं पूर्व माहिती; पान ९९-१०२; चालुक्य वंशाचा उदय; व त्या घराण्यासंबंधी माहिती; पान १०२-१०५; प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएन्त्संग यानें महाराष्ट्र देशाच्या तत्कालीन स्थितीचें केलेलें मनोवेधक वर्णन; पान १०५-१०७; प्रसिद्ध राज्यकर्ता पुलिकेशी याची, व विक्रमादित्याची हकीकत; पान १०७-१०८; गुजराथेंत सोळंखी (उर्फ सोळंकी) व महाराष्ट्रांत राष्ट्रकूट घराण्याची स्थापना, व त्याची हकीकत; पान ११०-११३; राष्ट्रकूट घराण्याचा ऱ्हास, महाराष्ट्रां चालुक्य घराण्याची स्थापना; तैलप, व त्यानंतरच्या राज्यकर्त्यांची हकीकत; पान ११३-२४; उत्तर कालीन चालुक्य राज्याचा ऱ्हास; कलचुरी घराण्याची स्थापना, व ऱ्हास; पान १२४; लिंगाईत धर्माची वृद्धि; पान १२४-२५ जाधव उर्फ यादव राज्यकर्ता सिंघण यानें चालुक्य घराणें नामशेष करून आपल्या घराण्याचें राज्य स्थापन केलें, त्यासंबंधीं, व यादव घराण्याची दुसरी शाखा, होयसल यादव, यासंबंधी हकीकत; पान १२६-४१; दक्षिणेंतील यादव उर्फ जाधव राज्य दिल्लीपतिच्या नियंत्रणाखालीं गेलें; पान १४१-४२; शंकर देवाचा मेव्हणा हरपाळदेव यानें मुसलमानी सत्तेविरुद्ध बंड उभारिलें; शंकर देवाचा नाश झाला, व महाराष्ट्र देशावर मुसलमानी अंमल पूर्णपणें प्रस्थापित झाला; पान १४४; शिलाहार उर्फ शेलार घराण्याची-व त्या घराण्याच्या तीन शाखांची-हकीकत; पान १४४-४५; आनागोंदीच्या

राज्याची हकीकत; पान १४६–४७; त्या राज्याचा नाश व विजयानगरच्या राज्याची स्थापना; पान १४७–४८; हरीहर व बुक्क याची कारकीर्द; पान १४९-५०; बहामनी राज्य संस्थापक अल्लाउद्दीन शहा याची, व बहामनी राज्याच्या संस्थापनेची हकीकत; पान १५१–५२; अल्लाउद्दीनशहाचा मृत्यू; महंमदशहाचें राज्यारोहण; त्याचें विजयानगरकर बुक्क राजाशीं युद्ध; व बुक्कचा पराजय; पान १५३–५४; हरीहर दुसरा, बुक्क दुसरा, व त्याच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ देवराय याचें राज्यारोहण; बहामनी राज्यकर्ता फिरोजशहा यानें कपटानें रामरायाच्या मुलास ठार मारिलें, व देवरायाचा पराभव केला; पान १५४-५५; देवराय व फिरोजशहा या उभयतां राज्यकर्त्यांमधील स्त्री विषयक भानगड, व तिचे देवरायास भोगावे लागलेले अनिष्ट परिणाम; पान १५५–६०; देवरायाचा मृत्यू; वीरविजय व त्या नंतर दुसरा देवराय यांची कारकीर्द; पान १६०–६१; दुसऱ्या देवरायाचा मृत्यू; व तिसऱ्या देवरायाची कारकीर्द; पान १६१-६२; साल्व घराण्याची स्थापना; नरसिंहराय, वीर नरसिंहराय, व कृष्ण देवराय यांची कारकीर्द; पान १६२–६४; कृष्ण देवरायाचा मृत्यू; अच्युतराय गादीवर येतो; त्याची नालयकी, दुर्बलता, व दुष्ट आचरण; तिम्मराजाचा वडील मुलगा रामराय हा विजयानगरच्या राज्याचा कुल मुखत्यार होतो; पान १६४–६५; रामरायाची कारकीर्द; तो मुसलमान राज्यकर्त्यांना निरनिराळ्या प्रसंगीं व प्रकारची मदत करितो; त्यांचा व त्यांच्या वकिलांचा उपमर्द, आणि त्यांना चीड उत्पन्न होणारी कृत्यें करितो; पान १६५–६८; रामरायाच्या उद्दाम व आगळिकीच्या वागणुकीमुळें मुसलमान राज्यकर्त्यांची त्याच्या विरुद्ध जूट झाली; पान १६८–६९; तालीकोट जवळील भयंकर युद्ध; रामरायाचा पराजय होऊन त्याचा वध झाला; युद्धाचे अनिष्ट, व विध्वंसक परिणाम; व त्या संबंधीं विवेचन; पान १६९-१७३; विजयानगरच्या राज्याचा नाश; व त्या शहराची मुसलमानी सैन्यानें उडविलेली धूळधाणी; रामरायाप्रमाणेंच त्याचा भाऊ व्यंकटाद्रि याचा नाश झाला; पान १७३–७४; तीरूमल्ल यानें सदाशिवरायाचा खून करून पेनकोंडा येथें आपलें एक लहानसें राज्य स्थापन केलें; पान १७४–७५; त्याचा वंशज श्रीरंगरायलू याच्या पासून, इंग्रज ईस्ट इंडिया कंपनी तर्फे, फ्रान्सिस डे यानें, मद्रास शहराची जागा मिळविली; मद्रास शहराची स्थापना; पान १७५;

विजयानगरच्या यां राज घराण्याची पुढील हकीकत; पान १७६-७७; विजयानगर येथील पुढील काळांत गादीवर आलेल्या राज्यकर्त्यांच्या गुण-दोषांचें विवेचन; पान १७७-७८; आपसांतील वैमनस्यें; व युद्ध कलह; व अशा युद्धांत एतद्देशीय राजे रजवाड्यांनीं तिऱ्हाइतांची घेतलेली मदत, व तिजमुळें भावी काळांत घडून आलेले अपरिहार्य परिणाम; पान १७८-८०; हिंदुस्थान देशाच्या पूर्व इतिहासा संबंधीं विविध माहिती; आर्यांच्या मूळ वस्तिस्थाना संबंधीं विवेचन; पान १८०-८२; हिंदुस्थान देशाचें श्रेष्टत्व, ग्राम पंचायती, व हिंदू लोकांचें शील, या संबंधीं विवेचन; पान १८६-९३; प्रोफेसर मॅक्स मुल्लरचें हिंदुस्थान देशा संबंधीं अभिनंदनीय उद्गार; पान १९३; प्रसिद्ध इतिहासकार अबुल् फज्ल याचा हिंदुलोकां विषयीं अभिप्राय; पान १९३-९४; सर टामस मनरो, सर् जान माल्कम, प्रोफेसर मॅक्स मुल्लर, माऊंट स्टुअर्ट एलफीन्स्टन, डार्वीन वगैरे प्रसिद्ध व राजकारणी मंडळींच्या मतांचा गोषवारा; पान १९४-९७; मौर्य साम्राज्या संबंधीं मेगॅस्थनीसचा अभिप्राय; व उत्तर हिंदुस्थान त्या काळीं कितीं सुधारलेलें होतें, या संबंधीं विवेचन; पान १९७-२०२; चंद्रगुप्ताचा ब्राह्मण प्रधान चाणाक्य, याचा " राज-नीति" हा ग्रंथ, व त्यांतील कांहीं तत्वांचा गोषवारा; पान २०२-२०४; गुप्त साम्राज्या बद्दल व्हिन्सेंट स्मिथचें मत; पान २०५; हिंदुस्थानांतील राजसत्ताक, प्रजासत्ताक, वगैरे निरनिराळया राज्यपद्धतींचें विवेचन; पान २०५-२०७; चवथ्या शतकांतील उत्तर हिंदुस्थानांतील प्रदेशा विषयीं व्हिन्सेंट स्मिथचा अभिप्राय; पान २०७-२०८ हिंदुस्थानांतील नमुनेदार राज्यपद्धति; व हिंदू लोकांचें विविध व महत्वाच्या शास्त्रांतील प्राविण्य; पान २०८-२०९; प्राचीन हिंदू लोकांनीं तत्वज्ञान निर्माण करून त्याची जीं निरनिराळीं सहा अंगे सहा ऋषींनीं निर्माण केलीं तीं, व त्यांच्या संबंधीं माहिती; पान २०९-२११; प्राचीन हिंदू-वैद्यशास्त्रा बद्दल माहिती; पान २११-१२; प्राचीन हिंदू लोकांचें, गणीत व ज्योतीष या शास्त्रांतील प्राविण्य, व त्याबद्दल माहिती; पान २१२-१४, हिंदू लोकांचें, शास्त्रीय लष्करी ज्ञान; खड्ग-युद्ध-नैपुण्य; गायन कलेंतील प्राविण्य; व व्यापार आणि वसाहती विषयक बाबतींतील त्यांचें नैपुण्य; व त्याबद्दल माहिती; २१४-१८; हिंदू धर्मांतील निरनिराळे पंथ, सांप्रदाय, विधी, व आचार, वगैरे बाबतीं संबंधीं विवेचन; पान २१८-२२; ब्रम्हचर्य व्रत, व एक पत्निव्रत यांचें महत्व,

त्या संबंधीं प्राचीन अनुशासन कारांनीं ठरविलेले नियम, व इतर विवेचन: पान २२२-२५; प्राचीन रोमन लोकांप्रमाणेंच प्राचीन हिंदू लोकांनीं बदलत्या परिस्थितीशीं आपले विचार व वर्तन जुळवून घेतलें; व त्या मुळेंच हिंदू धर्म जिवंत व सतेज राहिला, मूर्ति-पूजे मुळें कित्येक कलांची वृद्धि झाली, वगैरे संबंधीं विवेचन, पान २२५-२६, हिंदू धर्मांतील व महाराष्ट्रां मधील धार्मिक चळवळींतील रहस्य, पान २२६--२८, लंडन येथील "सोसायटी ऑफ आर्टस" चे विद्यमानें चालणाऱ्या व्याख्यान मालेंत "हिंदू धर्म-रहस्य" या विषयांवर सर व्हॅलेंटाइन चिरोलचे लॉर्ड मेस्टनच्या अध्यक्षते खालीं झालेलें व्याख्यान, व त्या संबंधीं विवेचन; पान २२८--३१, बारा, तेरा व चौदा, या शतकांतील हिंदुस्थान देशांतील राजकीय स्थिती, व तत्कालीन युरोपियन राष्ट्रांची स्थिती, यांचें तुलनात्मक विवेचन; पान २३१-३४; जगांतील व हिंदुस्थानांतील मुसलमान लोकांची पूर्वकालीन संस्कृति: व त्यासंबंधीं त्रोटक विवेचन: पान २३४-४०; गोवळकोंडे येथील खाणी, व त्या संबंधीं माहिती: पान २४२-४३; विजयानगरकरांच्या, व सर्व साधारणत: हिंदुस्थान देशाच्या सांपत्तिक स्थितीचें विवेचन; गज्वी महंमुदाच्या स्वाऱ्या; नगरकोट व सोरटी सोमनाथ येथें त्यास मिळालेली अगणित संपत्ति; पान २४३-४५; जहांगीर बादशहाच्या वैभवाचें वर्णन; पान २४५-४९; शहाजहान बादशहाच्या वैभवाचें वर्णन; पान २४९-५१; ताजमहाल, मयूर सिंहासन, वगैरे बद्दल त्रोटक माहिती; पान २५१-५३; हिंदुस्थानची वैभव संपन्नता; त्यामुळें या देशावर झालेल्या अनेक स्वाऱ्या; व हिंदुस्थान देशांमुळें ब्रिटिश राष्ट्रास होत असलेला फायदा, या संबंधीं विवेचन; पान २५३; मुसलमान लोकांच्या कर्तबगारीचें सर्व साधारण विवेचन; हिंदूधर्म, व हिंदूप्रजा, यांच्यासंबंधीं मोंगल बादशहाचें धोरण; त्यांची वागण्याची पद्धति, त्यांची राज्यपद्धति व लोक प्रीयता; शहाजहानच्या मनावर हिंदूधर्माबद्दल झालेला परिणाम, व त्यासंबंधीं त्याचें झालेलें मत, या बाबतींत विवेचन; पान २५३-५५; हिंदू-मुसलमानांच्या निकट सहवासामुळें परस्परांवर घडून आलेले परिणाम; व त्या संबंधीं विवेचन; पान २५६-५८; मुसलमान, मराठे, व इंग्रज, यांनी त्या त्या काळास, व परिस्थितीस अनुसरून आपणास इष्ट असलेल्या राज्यपद्धतीचें धोरण स्वीकारिलें, त्याबद्दल विवेचन; पान २५८-५९;

मुसलमानांचें राजकीय वर्चस्व; त्याची परमावधी; व अपकर्ष; त्यांच्या हिंदुस्थानावरील अनेक स्वाऱ्या; त्यांच्यांतील अनेक नामांकित मंडळी, वगैरे संबंधी माहिती; पान २५९-६०; मुसलमान व मराठे यांच्या राजकीय उत्कर्षामधील वैशिष्य; खलीफांच्या हातीं राजसत्ता, व धर्मसत्ता, असल्यामुळें खलीफा व शंकराचार्य यांच्या अधिकारामधील फरकाचें विवेचन; व खलीफत संबंधीं त्रोटक माहिती; पान २६०-६२; मुसलमानी राज्यांतील हिंदूंचें महत्व; व त्या संबंधीं उदाहरणासह विवेचन; पान २६२-६५; मेकाले यानें "लार्ड क्लाईव्ह" या निबंधांत मोंगल बादशाहीच्या वैभवाचें केलेलें वर्णन, व त्याचा गोषवारा; पान २६५-६६; अल्लाउद्दीन खिलजी याच्या राज्य व सैन्य व्यवस्थेचें तुलनात्मक विवेचन; पान २६६-६७; हिंदुस्थान व इतर देशांची राजकीय तुलना; हिंदुलोकांचें कर्तृत्व, मराठ्यांच्या उत्कर्षाचा पूर्व रंग, शिवाजीचा जन्म, वगैरे बाबतींतील हकीकत; पान २६८-७०; शिवाजीनें केलेली मराठी राज्याची स्थापना; पुढील काळांत मराठा सरदार मंडळानी त्याचा केलेला अकल्पनातित उत्कर्ष; त्या साम्राज्यावर ओढवलेलीं अनेक संकटें, व त्यांतून निभावून मराठा साम्राज्याचा कांहीं काळ झालेला जयजयकार; पान २७०-७२.

# प्रास्ताविक माहिती.

## विषयोपन्यास.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY POONA. 1894

सदरहू ग्रंथ, हा 'मराठ्यांचा इतिहास' म्हणून असून, त्यांत हिंदुस्थानांतील मराठा साम्राज्याच्या उदयापूर्वींची स्थिति उदय व त्याचा क्रमाक्रमानें झालेला विस्तार, वगैरे सर्व हकीकत मराठशाहीच्या अखेरच्या काळापर्यंत ग्रंथित केलेली आहे. 'मराठे' हे हिंदुस्थानांतील पहिले राज्यकर्ते नाहींत, आणि मराठ्यांपूर्वींच्या मोंगली राज्याच्या काळापूर्वींही हिंदुस्थानांत मोठमोठीं साम्राज्यें, व प्रख्यात व प्रजाप्रिय राज्यकर्ते निर्माण होऊन गेलेले आहेत; म्हणून हिंदुस्थानांतील पूर्वकालीन राज्यांची माहिती, त्यांतील सुधारणा. प्राचीन आर्यांची संस्कृति, प्रजेच्या सुखसोयीसाठीं त्यांनीं ठरविलेले नियम व राज्यपद्धति त्यांचा राज्यविस्तार व राज्यकारभार, वगैरे अनेक उपयुक्त गोष्टींची माहिती--मुसलमानी काळांतील मराठ्यांच्या राजकीय स्थिति व महत्त्वासह, प्रास्ताविक माहिती ह्मणून पहिल्यानें त्रोटक रीतीनें या ठिकाणीं ग्रंथित केली आहे, आणि कोणत्याही विशेष इतिहास माहीत नसलेल्या वाचकांस मराठे व त्यांच्या आनुषंगिक आवश्यक म्हणून असलेली प्रत्येक माहिती एकाच ठिकाणीं वाचण्यास मिळावी, अशी या ग्रंथाची योजना केली आहे; त्यामुळें कित्येकदां द्विरुक्ति होण्याचा, अथवा कदाचित् आवश्यक असणारी, पण तसें न वाटणारी, अथवा न दिली तरी सुद्धां चालणारी, माहिती दिल्याचा, समज होण्याचा संभव आहे; परंतु हा इतिहास विस्तृत, साग्र, विविध, उपयुक्त, आवश्यक व आनुषंगिक, माहितीपूर्ण असाच लिहिण्याचा मूळपासून विचार असल्यानें तशी माहिती त्यांत ग्रंथित करणें आवश्यकच आहे; व ही दृष्टि एकदा कायम ठेवून त्या अनुरोधानें या ग्रंथाचें परिशीलन केलें, म्हणजे त्यांत विसंगत असें कांहींच नाहीं, तर उलट त्यांत दिलेली प्रत्येक माहिती आवश्यक, निदान आनुषंगिक अशीच आहे, ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

शिवाय, या पूर्वकालीन हकीकतीमध्यें, प्राचीन आर्य लोक रानटी होते का सुधारलेले होते, त्यांनीं स्थापन केलेलीं अनेक साम्राज्यें वैभवसंपन्न, सुव्य-

वस्थित व सुधारलेलीं होतीं का दरिद्री, अव्यवस्थित व रानटी स्थितींतील होतीं, त्यांची राज्यव्यवस्था नमुनेदार व प्रजाहितेच्छु होती, का अनियमबद्ध व प्रजा-पीडक, अशा सुलतानी स्वरूपाची होती, तीं संपत्तिमान् होतीं का निर्धन होतीं, वगैरे बाबतींचें—आणि हिंदुस्थानांतील धार्मिक वातावरण व त्याचा राजकीय घडामोडीवर निरनिराळ्या काळीं अवश्यमेव घडून येत गेलेला परिणाम या गोष्टीचें—योग्यठिकाणीं दिग्दर्शन केलेलें आहे. त्या प्रमाणेंच एकामागून एक अथवा एकाच वेळीं घडलेल्या अनेक गोष्टी, यांचेंही त्यांत दिग्दर्शन केलें आहे; थोडक्यांत म्हणजे कोणत्याही बाजूनें हा ग्रंथ अपूर्ण राहूं नये, तो वाचतांना इतर कोणताही ग्रंथ पाहण्याची फारशी आवश्यकता राहूं नये, व याच ग्रंथांत आवश्यक व आनुषंगिक ती सर्व माहिती एकत्र वाचण्यास मिळावी, अशा उत्कट इच्छेनें तशी विशेष खबरदारी घेऊन, व त्या क्रमाला अनुसरून हा इतिहास लिहिला आहे.

त्या प्रमाणेंच हा इतिहास लिहितांना, कित्येक ठिकाणीं परस्पर विरुद्ध अथवा निरनिराळी माहिती आढळून आली ती, साधक बाधक आधार पाहून, व शक्य तोंपर्यंत खऱ्या खोट्याचा व ग्राह्याग्राह्याचा निर्णय करून या ठिकाणीं ग्रथित केली आहे, व कित्येक ठिकाणीं त्याच संबंधींच्या निराळ्या माहितीचाही उल्लेख केलेला आहे. शिवाय हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास फारसा उपलब्ध नसून जो उपलब्ध आहे, त्यांतही परस्पर विरुद्ध अशी निरनिराळी माहिती विशेष असल्यानें ती देतांना शक्य तोंवर विशेष खबरदारी घेतली आहे. तसेंच आर्य लोकांच्या मूळ वसतिस्थानाबद्दल; मतभेद असून त्याबद्दल, व हूण लोकांबद्दल निरनिराळी माहिती उपलब्ध झाली आहे; त्यामुळें पूर्वीची माहिती, व नवीन माहिती ह्या उभयतांचाही त्यांत समावेश केलेला आहे; त्याप्रमाणेंच हिंदुस्थान देशाचें प्राचीनत्व, त्या देशाचा अति प्राचीन कालापासून इतर देशाशीं चालू असलेला व्यापार व त्याचें राजकीय दळणवळण, चीन, इराण, रोम वगैरे प्रदेशांबरोबरील हिंदुस्थानचा राजकीय संबंध वगैरे संबंधींही त्यांत त्रोटक माहिती दिली आहे.

युरोप खंडांतील पूर्वकालीन परिस्थितीवरून कालमानाचे 'तमोयुग' 'मध्ययुग' व 'नवयुग' असे तीन भाग पडतात. युरोपांतील पूर्वकालीन राजकीय परिस्थिति पाहतां, त्या काळांत रोमन साम्राज्य हें सर्व जगांत अत्यंत

बलाढ्य, विस्तृत व सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेलें असल्याचें दिसतें; परंतु टयूटन लोकांनीं खिस्ती शकापूर्वी ११३ वे वर्षांपासून त्या साम्राज्यावर सारखे हल्ले करून शेवटीं इ० सन ४७६ मध्यें त्याचा बहुतेक नाश केला. त्यानंतर पांचव्या शतकापासून त्या लोकांवर ×हूण लोकांच्या पूर्वेकडून स्वाऱ्या होऊं लागल्या; त्यामुळें त्यांच्या मुख्य चार जमावांपैकीं व्हँडाल लोक स्पेन व पोर्तुगाल देशांत गॉथ लोक आस्ट्रिया पोलंड, व स्वीडन या देशांत आणि अँगल्स व साक्सन लोक इंग्लंडांत जाऊन राहिले; तथापि फ्रॉंक व अलमनी हे लोक मात्र आपल्या पूर्वस्थानांतच राहून तेथें त्यांनीं आपलीं राज्यें स्थापन केलीं. रोमन साम्राज्य नष्ट झाल्यापासून तो शार्लमेन बादशहाच्या कारकीर्दीपर्यंतच्या

---

× हूण लोकः—या लोकांसंबंधीं डाक्टर जीवनजी मोदी यांच्या लेखावरून खालील माहिती उपलब्ध होते तीः—

हूण लोक हे प्रथमतः चीन देशाच्या उत्तरेस अमूर व इरलिश् या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत रहात होते. पुढें त्यांनीं तार्तरी प्रांत जिंकिला; तेथें खिस्ती शकापूर्वी २०० वर्षें त्यांनीं राज्य केलें. खिस्ती शकाचे कांहीं पूर्वी व नंतर त्यांचा जगांतील सर्व मोठमोठ्या साम्राज्यांशीं संबंध आला. रोमचें राज्य त्यांनीं नाहींसें केलें. चिनी लोकांनीं त्यांना प्रतिबंध करण्याकरितां प्रसिद्ध चिनी भिंत बांधिली. तेव्हां ते पश्चिमेकडे वळले. त्यांच्याच चेपीमुळें स्याक्सन लोक इंग्लंद देशांत गेले. त्यांचा इतिहास दोन हजार वर्षांचा आहे. तेवढ्या काळांत त्यांनीं इराणांत स्वाऱ्या केल्या, व हिंदुस्तानांतील गुप्त साम्राज्य नष्ट केलें; त्यांचा शेवटचा राजा मिहिरगुल या नांवाचा होता.

आपले मृत राजे पुरण्याची त्यांची विलक्षण रीत होती; ते कोठें पुरले आहेत हें लोकांस कळूं नये म्हणून कधीं कधीं ते मोठमोठ्या नद्यांचे प्रवाह फिरवीत, व त्या ठिकाणीं त्यांना पुरून पुन्हां त्यांवर नद्या सोडीत; आणि ज्या लोकांकडून हें काम ते करवून घेत, त्यांना ते ठार मारीत.

फ्रान्स, इताली, जर्मनी व युरोपांतील इतर उत्तरेकडील देश, त्यांनीं ओसाड केले, व खलिफांचें राज्य घेऊन खिस्तांची पवित्र भूमि, पालिस्टाईन हीही त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतली. याच लोकांना पुढें तुर्क हें नांव प्राप्त झालें.

काळास ' तमोयुग ' आणि त्या वेळेपासूनच्या काळास ' मध्ययुग ' असें मानण्याचा प्रघात आहे; तथापि वास्तविक रीत्या मॅक्सिमीलियन ( इ. सन १४९३ ते १५१८ ) हाच अर्वाचीन काल आणि मध्यकाल यांचे मधील बादशहा होय, असें ह्मणतां येईल. याच कालांत संस्थानिक राज्यपद्धति आणि सरदारी राज्यपद्धति सुरू झाली. सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं मध्ययुगाचा शेवट झाला; त्यामुळें तत्कालिन उपरिनिर्दिष्ट दोन्हीं पद्धति, धर्मयुद्धें, व धर्मगुरूंचें महत्त्व, यांनां आळा बसला; आणि संक्रमण स्थितीला सुरवात होऊन नवीन युगास प्रारंभ झाला, व या युगांतील जनतेमध्यें विद्या, कला, विचार-शक्ति आणि ज्ञान यांचें बीजारोपण झालें.

युरोप खंडाप्रमाणें आशिया खंडांतील हिंदुस्थान देशाचेही कालमानाप्रमाणें निरनिराळे भाग पडतात. ते म्हणजे, ' प्राचीनकाल, ' ' वेदकाल, ' ' ब्राह्मण-काल, ' ' बौद्धकाल, ' व ' हिंदूकाल, '—व त्यानंतर मुसलमानीकाल—हे होत. त्यांपैकीं अज्ञात कालापासून इ. सनापूर्वी १५०० पर्यंतच्या कालास 'प्राचीनकाल,' इ. सनापूर्वी १५०० पासून इ. सनापूर्वी १००० पर्यंतच्या कालास ' वेदकाल, ' त्या वेळेपासून इ. सनापूर्वी ५५० पर्यंतच्या कालास ' ब्राह्मण-काल' इ. सनापूर्वी ५५० पासून इ. सन ३०० पर्यंत ' बौद्धकाल,' व इ. सन ३०० पासून इ. सन १००० पर्यंतच्या कालास ' हिंदूकाल ' असें म्हणतात.

जगाच्या इतिहासांत, अति प्राचीन कालापासून चीन, मिसर व हिंदु-स्थान, हे देश सुधारणेविषयीं प्रसिद्ध आहेत; आणि अति प्राचीन कालापासूनच हिंदुस्थान देशाशीं युरोपखंडाचें व्यापारी दळण वळण चालू असून हिंदुस्थान देशाला ऐतिहासिक व सांपत्तिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे. शिवाय, या देशांत पूर्वी मोटमोठे योद्धे, राज्यकर्ते, धर्मसंस्थापक, विद्वान् व पंडित मंडळ, धर्मशास्त्र-विशारद, व साधुसंत मंडळ, निर्माण होऊन गेलेले आहेत. मानुजकोटिशास्त्र-वेत्त्यांच्या मतप्रमाणें मानवी प्राण्यांचे पांच वर्ग कल्पिले असून त्यांपैकीं संख्येनें सर्वांत मोठा वर्ग, ह्मणून आर्य लोकांची गणना केलेली आहे. आर्यांचें मूळ वसतिस्थान मध्य आशियांत असून भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरही त्यांच्या वसाहती होत्या. या मूळ वसतिस्थानांमधूनच आर्यलोक हे पुढें चोहों-कडे पसरले. यांपैकीं कांहींनीं इराणांत वसाहत केली; कांहीं युरोपखंडांत गेले; व कांहीं हिमालय पर्वताचे घाट ओलांडून हिंदुस्थानांत शिरले. या आर्य लोकां-

पैकीं पहिली जी टोळी युरोपखंडांमध्यें जाऊन स्थाईक झाली, तिला 'आर्यन्' अथवा 'इंडो–युरोपियन' वर्गापैकीं 'केल्टिक' शाखा असें म्हणतात. त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं अशाच रीतीनें आर्य लोकांच्या दुसऱ्या दोन टोळ्या दोन दिशांनीं पुन्हां युरोपखंडांत शिरल्या. त्यांपैकीं एक इराण व आशिया मायनर या देशांमधून गेलेले, इतालियन, ग्रीक, आणि ट्यूटन या लोकांचे पूर्वज असून दुसरी म्हणजे कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून युरोपांत शिरलेली स्लाव्होनिक ही शाखा होय. कोल्टिक लोकांनीं पश्चिम युरोपमधील मूळच्या अनार्य लोकांचा उच्छेद करून, व त्यांतील बहुतेक सर्व भागांत आपली वस्ती करून साम्राज्यें स्थापन केलीं, आणि त्याच्या मागून आलेल्या ग्रेको–रोमन लोकांनीं ग्रीस, इतालींतील कांहीं भाग, भूमध्य समुद्रांतील बेटें, व त्यांचे किनाऱ्यावरील प्रदेश, यांमध्यें वस्ती करून त्यांनींही त्या ठिकाणीं आपलीं साम्राज्यें स्थापन केलीं. या कालीं युरोपांतील तत्कालीन सुधारणांचें जनकत्व पहिल्यानें ग्रीस देशाकडे आलें, परंतु वाढत्या सत्तेच्या अभावीं तें लवकरच इताली देशाकडे गेलें. रोमन लोकांनीं प्रथम इतालींत व नंतर उत्तर जर्मनी व रशिया, हे देश खेरीज करून बाकीच्या युरोपखंडांत आणि आशिया–मायनरमध्यें, आपलें विस्तृत साम्राज्य स्थापन केलें; व उत्तर जर्मनींत ट्युटानिक लोकांनीं, व रशिया आणि तुर्कस्थानांतील बऱ्याच भागांत स्लाव्होनिक लोकांनीं वस्ती करून त्या त्या ठिकाणीं आपआपलीं साम्राज्यें स्थापन केलीं. त्याप्रमाणेंच कांहीं आर्य लोक हिमालय पर्वत ओलांडून हिंदुस्थानांत आले. यावेळीं हिंदुस्थानांतील मूळचे रहाणारे 'अनार्य' हे लोक होते; या अनार्य लोकांचा रंग काळा असून त्यांचीं नाकें चपटीं व बसकर होतीं. मध्य हिंदुस्थानांतील भिल्ल, कोंढ, संताळ, जवांग, वगैरे जातीचे लोक हे या अनार्य लोकांचे वंशज होत. या कालीं अनार्य लोकांच्या मानानें अधिक सुधारलेले असे 'द्राविडी' या नांवाचे लोक हिंदुस्थानांत होते. हे लोक आर्य लोकांच्या पूर्वी, व त्यांच्याच प्रमाणें वायव्य दिशेनें हिंदुस्थानांत शिरले असावे, असा अजमास आहे. हे द्राविडी लोकही आर्य लोकांप्रमाणेंच सुधारलेले होते; परंतु याच लोकांवर आर्यांनीं पुढें स्वारी करून त्यांना जिंकिलेलें आहे. या आर्य लोकांनीं खिस्ती शकापूर्वी १८००० पासून पुढें हिंदुस्थानावर स्वारी केली. पहिल्यानें ते हिंदूकुश पर्वताचे उत्तरेस वसाहती करून राहिले; परंतु इ० सना-

पूर्वी १५०० च्या सुमारास त्यांची संख्या अतीशय वाढली; त्यामुळें त्यांना पुन्हा देशांतर करणें भाग पडलें. तेव्हां त्यांच्यापैकीं 'इराणी' या नांवाच्या एका शाखेनें पश्चिम दिशेनें प्रयाण करीत इराण देशांत जाऊन तेथें आपली वस्ती केली; व दुसरी शाखा हिंदुस्थानांत शिरून तिनें पहिल्यानें सिंधुनदाच्या दोन्हीं तीरांवर वसाहत केली, व तेथून हळूहळू ते यमुना नदीच्या कांठापर्यंत वसाहत करीत आले. याच लोकांना 'इंडो-आर्यन' अशी संज्ञा आहे. या ठिकाणीं ते अजमासें पांचशें वर्षें ह्मणजे इ. सनापूर्वी १००० वर्षेंपर्यंत राहिले; परंतु या अवधींत त्यांना आपलें अस्तित्व कायम ठेवण्याकरितां तेथील मूळच्या अनार्य लोकांशीं मोठ्या चिकाटीनें सारखें युद्धकलह करीत रहावें लागलें; आणि अशा रीतीने झगडत राहून इ. सनापूर्वी १००० च्या सुमारास आर्य लोक हिंदुस्थानांत कायमचे स्थाईक झाले.

अशा रीतीनें आर्य लोकांना हिंदुस्थानांत स्थाईकत्व प्राप्त झाल्यामुळें त्या देशांतील आर्य लोकांत चार वर्णांची उत्पत्ति होऊन वर्णव्यवस्था सुरू झाली. निरनिराळया देवतांपासून आपणास सौख्य प्राप्त व्हावें, म्हणून आर्यांमधील अतीशय विद्वान् लोक ईश्वराचीं निरनिराळीं स्तुतिपर कवनें तयार करूं लागले, व यज्ञयागादि ईश्वर भक्तिपर निरनिराळया उपासना आचारूं लागले; म्हणून त्या वर्गाला 'ब्राह्मण' 'आर्यपंडित' किंवा 'ऋषी' असें नामाभिधान प्राप्त झालें. हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशांबरोबर झगडण्याचे वारंवार प्रसंग उद्भवत राहिल्यामुळें 'राजन्य' अथवा 'क्षत्रिय' वर्ग अस्तित्वांत आला, व आपल्या वसाहतीच्या आसपास वाढलेलें रान तोडून तेथें लागवड करण्याकरितां 'वैश्य' वर्ग निर्माण झाला. म्हणजे अशा रीतीनें आर्य लोकांत ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य, असे तीन वर्ण निर्माण झाले. या आर्यांनीं हिंदुस्थानांतील मूळच्या रहिवाशांसही आपणांमध्यें ओढून घेतलें; व त्यांनां 'शूद्र' अशी संज्ञा देऊन, चवथा वर्ण निर्माण केला. तथापि यावेळेच्या आर्य लोकांच्या वर्णव्यवस्थेस कायमचें व स्थाईक स्वरूप आलेलें नव्हतें. त्यामुळें शेवटचा म्हणजे जो शूद्र वर्ण त्या शिवायच्या बाकी तीन्हींही वर्णांनां एका वर्णांतून दुसऱ्या वर्णांत केव्हांही जातां येत होतें. याच आर्यलोकांतील ब्राह्मण वर्णानें अथवा विद्वान् आर्य पंडितानीं 'ऋग्वेद' या नांवाचा एक ईश्वरस्तुतिपर ग्रंथ निर्माण केला,

आणि त्यांतील लहान लहान सूक्तें अथवा कवनें ते यज्ञयाग वगैरे समारंभाच्या प्रसंगीं म्हणूं लागले; त्यावेळीं लेखनकला अवगत नसल्यामुळें, तीं सूक्तें अथवा कवनें गुरुमुखांतून ऐकून पाठ करण्याची वहिवाट होती; त्यावरून त्यांना 'श्रुति' हें नामाभिधान मिळालें; व पुढें हीं सर्व सूक्तें एकत्र करून त्यास 'संहिता' म्हणजे एकीकरण, हें नांव देण्यांत आलें. अशा रीतीनें आर्य पंडितांनीं ईश्वर स्तुतिपर असा जो एक प्रचंड ग्रंथ इसवी सनापूर्वी एक हजार वर्षांच्या सुमारास पूर्ण केला त्यास 'ऋग्वेद-संहिता' असें म्हणतात. या ग्रंथांत १०२८ लहान लहान ईश्वरस्तुतिपर सूक्तें अथवा कवनें असून त्यांच्या १०५८० ऋचा आहेत, व या वेदांतील वर्णनावरून तत्कालीन आर्यलोक सुधारलेले होते, असें दृष्टोत्पत्तीस येत आहे. या काळांत जातिभेद अस्तित्वांत नव्हता; प्रत्येक कुटुंबांतील वडील मनुष्य हा त्या घरांतील 'मुख्य' म्हणून गणला जात होता, व त्याच्या आज्ञेप्रमाणें कुटुंबांतील सर्व मंडळी वागत होती. वेदकाला पूर्वी युद्धांत पाडाव करून आणिलेल्या स्त्रीबरोबर लग्न करण्याची चाल होती, व अशा स्त्रियांचा सामाजिक दरजाही फारसा माननीय नव्हता; परंतु वेदकालापासून या विवाहपद्धतींत फरक पडला. दोन कुटुंबांमध्यें करार होऊन परस्परांत विवाहसंबंध घडून येऊं लागले, व स्त्रियांची योग्यता वाढून त्यांना समाजांत व कुटुंबांत विशेष मान मिळूं लागला. याच काळांत अरुंधतीसारख्या विद्वान् स्त्रिया निर्माण झाल्या आणि वेदांतील उत्तम व प्रगल्भ विचारांच्या ऋचांपैकीं कांहीं ऋचा स्त्रियांनीं रचिल्या. या काळांत सती जाण्याची चाल नव्हती; युद्धप्रसंगीं आर्यलोक घोड्याच्या रथांत बसून युद्धें करीत, व आपल्या बचावाकरितां अंगांत चिलखतें, व डोकीस शिरस्त्राणें चढवीत; त्यांचें लढाईचें मुख्य शस्त्र धनुष्य-बाण हें असून प्रसंगीं तरवार, भाला, व परशु, या शस्त्रांचाहि ते उपयोग करीत; त्याप्रमाणेंच शांततेच्या वेळीं, ते शर्यती लावणें, ढोलकीं वगैरे वाद्यें वाजवून नृत्य करणें, वगैरे साधनांनीं आपली करमणूक करून घेत; ते स्थायिक वस्ती करून व शेती नांगरून रहात, व आसपासच्या गांवीं व्यापारधंदाही करीत. या वेळीं आर्य लोकांची संपत्ति ह्मणजे, गुरें ढोरें हीं असून शेतीस लागणारे बैल, व शरीरजोपासनेस आवश्यक असलेलें दूध, तूप वगैरेंची पैदास गाईपासून असल्यामुळें गाई यांना विशेष मान व महत्त्व होतें; इतकेंच नाहीं तर संपत्ति मोज-

ण्याचें हें एक विशिष्ट साधन ठरलेलें होतें. या आर्यलोकाना कारागिरी अवगत असून त्यांच्यांत सुतार, लोहार, तांबट, विणकरी, वगैरे कामें करणारे लोक असत; आर्यलोक हे गहूं, सातू, व इतर निरनिराळीं धान्यें पिकवीत; व हीं धान्यें आणि दूध, तूप, यावर ते आपला उदरनिर्वाह चालवीत; शिवाय ते मांसाहारही करीत असून ' सोम ' या नांवाचें मादक पेयही सेवन करीत असत. अशा रीतीनें इ. सनापूर्वी १००० च्या सुमारास आर्य लोक हे पंजाबांत स्थाईक होऊन राहिले होते.

तथापि, आर्यलोक हिंदुस्थानांत शिरण्यापूर्वीच द्राविडी लोकांची सुधारणा बरीच उच्च दर्जास पोहोंचलेली होती, ही गोष्ट अजूनही त्यांच्यांतील कित्येक सामाजिक रीतिरिवाजांवरून निदर्शनास येते; या लोकांची मुख्य वस्ती हिंदुस्थानच्या मध्य व दक्षिण भागांत आहे, व पूर्वकाळीं उत्तर भागांतही त्यांची वस्ती होती. आर्यलोक पंजाबांत स्थाईक झाल्यानंतर हिंदुकुश पर्वताच्या उत्तरेस जे आर्यलोक रहात असत, त्यांपैकीं एक शाखा दक्षिण दिशेनें प्रयाण करीत चित्रळ व स्वात, या मार्गानें पंजाबांत आली; तेव्हां त्या प्रांतांत वसाहत करून राहिलेल्या जुन्या आर्यांचीं व या नवीन आलेल्या शाखेचीं मोठ्या जोराचीं भांडणें उपस्थित होऊन युद्धकलह सुरू झाले; त्यामुळें जुन्या आर्यांची पांगापांग होऊन ते पंजाबांतून पूर्व बाजूनें मार्ग क्रमीत गंगा व यमुना या नद्यांच्या काठीं असलेल्या प्रदेशांत येऊन दाखल झाले; तेथें त्यानीं प्रथम आपल्या वसाहती स्थापन केल्या, व त्यानंतर ते हळुहळू विंध्याद्रिपर्यंत ओलांडून नर्मदा नदीच्या काठच्या प्रदेशापर्यंत येऊन पोहोंचले; तथापि उपरिनिर्दिष्ट जुन्या व नव्या आर्यांमध्यें जे मोठ्या जोराचे झगडे माजले त्यामुळें जुने आर्य, नवे आर्य, व त्यांनीं ज्या मूळच्या रहिवाशांस आपणांमध्यें ओढून घेतलें होतें, ते लोक, या सर्वांचें एकीकरण होऊन ( इ. सनापूर्वी ५०० च्या सुमारास ) त्यामुळें एक निराळीच जात निर्माण झाली; या जुन्या व नव्या आर्यांमध्यें भरत या नांवाचें एक मोठें शूर व प्रमुख घराणें होतें; याच कुलांत प्रसिद्ध कौरव व पांडव यांचा जन्म झालेला असून या उभयतांमध्यें अठरा दिवस भयंकर युद्ध झालें; त्याचें वर्णन भारत अथवा महाभारत या ग्रंथांत असून हें युद्ध इ. सनापूर्वी १२०० च्या सुमारास झालें; व आर्यांच्या ह्या मोठ्या उदात्त व वीररसप्रधान काव्याची रचना इ. सनापूर्वी ५०० व इ. सन ५०० या कालांत

झाली. याच कालांत राज्यकर्त्यांच्या अधिकाराची मर्यादाही अधिक व्यापक झाली. वेदकालांत राज्यकर्त्यास युद्धप्रसंगीं स्वतः सेनानायक बनून युद्ध करणें, व जातींतील सार्वजनिक बाबतींचा योग्य निर्णय करणें, एवढाच अधिकार असे; परंतु ब्राह्मण कालांत राज्यकर्ते हे जमिनीचे मालक बनले; त्यांचीं प्रथम लहान लहान राज्यें निर्माण झालीं; व पुढें त्यांचींच मोठमोठालीं राज्यें बनून सार्वभौम राज्यें झालीं, व त्यांच्या राज्यकर्त्यांनां 'महाराज' ही संज्ञा प्राप्त झाली. पुढें आपलें सार्वभौमत्व अथवा सामंतचक्राधिपतित्व सर्वमान्य करण्याकरितां अश्वमेध यज्ञ करण्याची पद्धत सुरू झाली. ख्रिस्ती शकापूर्वी दुसऱ्या शतकांत पुष्यमित्रानें असा अश्वमेध यज्ञ केला होता; त्याप्रमाणेंच हजारों वर्षांपूर्वींच्या सगराच्या कथेवरून, इ. सनापूर्वी तीन हजार वर्षांच्या युधिष्ठिराच्या कथेवरून, ख्रिस्ती शकानंतर सातव्या शतकांतील आदित्यसेनाच्या कथेवरून, आणि रामायणांतील श्रीरामचंद्राच्या कथेवरून त्या त्या पुरुषांनीं आपलें सार्वभौमत्व सर्वमान्य होण्याकरितां असे अश्वमेध यज्ञ केले होते, असें आढळून येतें. त्या काळीं हिंदुस्थानांत नर्मदा नदीपर्यंत मोठीं राज्यें विद्यमान होतीं; या राज्यांच्या सरहद्दी मोठमोठालीं अरण्यें व ओसाड प्रदेश यांनीं विभक्त झालेल्या होत्या; व त्यांतील कांहीं राजसत्ताक, व कांहीं शिष्टजन व लोकजनसत्ताक अशीं होतीं; हिंदुस्थान देशाचें मूळ नांव जंबूद्वीप हें असून अशोकास 'जंबूद्वीपचा राजा' असें म्हणत. हा देश आर्यांचें राहण्याचें ठिकाण म्हणून त्याचें नांव 'आर्यावर्त' व भरतकुळावरून 'भारत वर्ष' असें नांव त्यास प्राप्त झालेलें आहे; म्हणजे हिंदुस्थान हें या देशाचें मुळचें नांव नसून तें परकीय स्वाऱ्या करणाऱ्यांनीं त्यास दिलेलें आहे; आर्य ऋषींनीं रचिलेल्या वेदांतील ऋचांतून व ईश्वरप्रार्थनेच्या स्तोत्रांतून दक्षिणेच्या अलीकडील मोठमोठ्या नद्यांचा निर्देश केलेला आहे; व पुढें आर्यलोक, हे जसजसे दक्षिण दिशेकडे पसरूं लागले, तसतसा दक्षिण दिशेकडील नद्यांचाहि त्यांत उल्लेख आलेला आहे. आर्यांच्या पुराणांतील या माहितीसंबंधानें प्रसिद्ध इतिहासकार मि. व्हिन्सेंट स्मिथ यानें आपला हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास ( पान १०, इ. सन १९०८ ) या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, " 'पुराणांतून दिलेल्या वंशावळी फारशा भरंवशा लायक नाहींत,' अशा मताकडे कित्येक आधुनिक लेखकांचा कल असल्याचें निदर्शनास येतें; परंतु तो न्याय नव्हे; कारण या पुराणांचें सूक्ष्मपणें अध्ययन

करणारास त्यांत पुष्कळच मौल्यवान् व विश्वास ठेवण्यायोग्य, अशी ऐतिहासिक माहिती मिळालेली आहे. उदाहरणार्थ विष्णुपुराणांत मौर्यवंशाच्या इतिहासाचें स्थूल वर्णन दिलेलें असून तें बहुतांशीं सत्य असल्याचें ठरलें आहे. त्याप्रमाणेंच रेडक्लिफच्या मत्स्यपुराणाच्या प्रतींत दिलेला आंध्रराज्यकर्त्यांचा इतिहासही विश्वसनीय आहे, आणि अलीकडे सांपडलेलीं नाणीं व शिलालेख वगैरे वरून मत्स्य पुराणांतील आंध्रराज्यकर्त्यांच्या वंशावळीच्या खरेपणाबद्दल तर मोठा विलक्षण असाच पुरावा उपलब्ध झालेला आहे." या कालांत आर्यावर्तांत निरनिराळीं घराणीं राज्य करीत होतीं; त्यांपैकीं पांचाल घराणें आग्रा व संयुक्त प्रांत या ठिकाणीं राज्य करीत असून, कान्यकुब्ज ऊर्फ कनोज, कौशांबी व मथुरा, हीं शहरें त्या राज्याचीं निरनिराळ्या काळीं राजधानीचीं ठिकाणें होतीं. मथुरा येथें राजा श्रीकृष्ण हा राज्य करीत असून, पुराणांतरीं जे बारा अवतार वर्णन केलेले आहेत, त्यांतील हा आठवा व श्रीविष्णूचा अवतार आहे, असें मानितात; या राज्याला लागून पूर्व बाजूस 'कोसल' या नांवाचें राज्य अयोध्या प्रांतांत होतें; त्याची राजधानी अयोध्या हें शहर असून राजा दशरथ व श्रीरामचंद्र हे तेथील राज्यकर्ते होते; श्रीरामचंद्र हा सातवा अवतार म्हणून मानिला गेलेला असून या राजकर्त्याच्या चरित्रावरूनच रामायणाची सुरस व चित्तवेधक कथा रचण्यांत आलेली आहे; व त्यांत श्रीरामचंद्रानें दक्षिण हिंदुस्थानांत दिग्विजय करीत जाऊन शेवटीं लंकेचा अनार्य राज्यकर्ता रावण यास ठार मारून तें बेट घेतल्याची हकीकत लिहिलेली आहे. कोशल देशाच्या पूर्वेस उत्तर बहार प्रांतामध्यें विदेह व दक्षिण बहार प्रांतामध्यें मगध अशीं दोन राज्यें होतीं; त्यांत विदेह देशांत जनक या नांवाचा एक प्रसिद्ध राजा राज्य करीत होता; त्यास सीता या नांवाची एक कन्या असून ती श्रीरामचंद्रास दिलेली होती; याच स्त्रीचें रावणानें हरण केलें असून रावणाचा वध करून श्रीरामचंद्रानें तिला परत सोडवून आणिलें; त्यामुळें 'रामायण' या कथेंतील मुख्य नायिका 'श्री सीतादेवी' ही मानण्यांत आली आहे. मगध देशांत 'शिशुनाग' या नांवाचें घराणें राज्य करीत होतें; हें घराणें पुढें विशेष प्रसिद्धीस आलें, व मगध देशाचें राज्यहि तसेंच बलाढ्य झालें. मगध देशाला लागूनच 'चेदी' या नांवाचें एक राज्य होतें, व त्या राज्यावर जरासंध या नांवाचा एक राजा राज्य करीत असून त्यासंबंधींची

सुरस कथा महाभारतांत व भागवतांत वर्णन केलेली आहे. चेदी देश म्हणजे जबलपूर व बिलासपूर यांच्या सभोंवतालचा प्रदेश, हा असून त्याच्या दक्षिणेस नर्मदा नदीच्या दोन्हीं बाजूंस एक राज्य होतें. त्यापैकीं निषध हें दक्षिण माळव्यांत असून तेथें नल या नांवाचा एक प्रसिद्ध राज्यकर्ता होता; व दुसरें विदर्भ म्हणजे वऱ्हाड देशाचें राज्य असून तेथें भीम या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यास दमयंती या नांवाची एक कन्या असून, निषध देशाचा राजा नल याचेबरोबर तिचा विवाह झाला होता; यासंबंधीचीही मोठी मनोरंजक कथा ' नलोपाख्यान ' नामक काव्यांत वर्णन केलेली आहे.

या ब्राह्मणकालांत राजसत्तेचें जसें रूपांतर झालें, त्याप्रमाणेंच तें वर्णव्यवस्थेंतही घडून आलें, व आर्यांचे चार वर्ण पृथक् बनले. त्यांपैकीं 'ब्राह्मण' हे इतर सर्व म्हणजे बाकीच्या तिन्हींही वर्णांच्या मानानें विद्येंत अधिक होते; व यज्ञयागादि धार्मिक कृत्यें करून ईश्वरभक्ति व आराधना करण्याचें काम त्यांच्याकडे होतें; त्यामुळें ते आपणांस इतर सर्व वर्णांहून श्रेष्ठ मानूं लागले, व इतर वर्णही त्यांना तसे मानूं लागले. क्षत्रिय वर्गानें इतर वर्णांचें संरक्षण व सांभाळ करण्याचें कर्तव्य स्वीकारलें होतें; त्यामुळें तो वर्गही अधिकारसंपन्न व श्रेष्ठ गणला गेला; आणि क्षत्रिय राज्यकर्त्यांच्या आश्रयास ब्राह्मणवर्ग ' कुलगुरु ' म्हणून राहूं लागल्यामुळें राज्यकर्त्यांकडून त्या वर्गाला विशेष मान मिळूं लागला, व ओघाओघानेंच बाकीच्या दोन्ही वर्गांतही त्यांचें महत्त्व प्रस्थापित होऊन तें वृद्धिंगत झालें. अशा रीतीनें वर्णभेद उत्पन्न झाल्याबरोर रोटी-बेटीव्यवहारासंबंधीं नियम निर्बंध निर्माण झाले, आणि चारीही वर्ण त्याप्रमाणें आपापले सामाजिक व्यवहार स्वतंत्र रीत्या आचरूं लागले. तथापि हे नियम निर्बंध ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं जितक्या कडक रीतीनें अमलांत आणले, तितक्या कडक रीतीनें ते खालील दोन वर्णांनीं अमलांत आणिले नाहींत; त्यामुळें हिंदु लोकांत अनेक जाती निर्माण झाल्या; त्याप्रमाणेंच, याच कालांत धार्मिक बाबती व विधि यांमध्येंही स्थित्यंतर घडून आलें. आर्यांचा मुळचा अति प्राचीन ग्रंथ म्हणजे फक्त ' ऋग्वेद संहिता ' हा होय; परंतु हा ग्रंथ अतीशय मोठा असल्यानें त्याचे यावेळीं तीन भाग अथवा खंड पाडण्यांत आले. त्यांत ' यजुर्वेद ' हा पहिला असून त्यांतील ऋचांचा उपयोग केवळ यज्ञकृत्यांच्या संबंधापुरताच करावयाचा असें ठरविण्यांत आलें; व त्यांत, यज्ञयागादिप्रसंगीं

उपयोगांत आणावयाचीं सूक्तें, व अशा प्रसंगीं निरनिराळ्या विद्वान् लोकांमध्यें वादविवाद होऊन जें विवेचन व निर्णय ठरले, त्यांचा भावार्थ, यांचा समावेश करण्यांत आला. दुसरा म्हणजे ' सामवेद ' हा गाण्याच्या सुरांत बसविलेला असून तो यज्ञयागादि प्रसंगीं म्हणण्यांत यावा असें ठरलें.

वर लिहिल्याप्रमाणें वेदाचे हे तीन भाग असून त्यांना ' त्रयीविद्या ' हें संक्षिप्त नांव दिलेलें आहे. याशिवाय ' अथर्व ' या नांवाचा एक चवथा वेद असून तो ऋग्वेदांतील शेवटचीं सूत्रें, व कालांतरानें त्यांत ग्रथित करण्यांत आलेलीं काव्यें, मिळून बनलेला आहे; या कालांत यज्ञयागादि कृत्यांना विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें; यज्ञादि प्रसंगीं विद्वान् मंडळी एकत्र जमून यज्ञ विषयक बाबतींवर, व इतर गहन अशा धार्मिक विषयावर वादविवाद करीत होते; यज्ञांतील सर्व धार्मिक कृत्यें सुरळीतपणें व ठरीव नियम–निर्बंध, यांनीं पूर्णतेस नेतां यावीं, म्हणून निरनिराळ्या कृत्यांवर स्वतंत्र निरनिराळे अधिकारी नेमण्यात येत होते; आणि यज्ञकृत्यांमधील बाबतींत मतभेद उत्पन्न झाल्यास त्याचा अखेरचा निर्णय देण्याकरितां ' ब्रह्मा ' या नांवाचा एक स्वतंत्र अधिकारी अथवा उपाध्याय निश्चित करण्यांत येत होता; परंतु असे यज्ञविधि व कृत्यें नेहमींच चालत राहिल्यामुळें असे वादविवादही हरहमेष होत राहिले. व त्यांचे निर्णयही पुष्कळच सांचून राहिले; तेव्हां हे वादविवाद व त्यांचे निर्णय एकत्र करणें आवश्यक झालें, व त्यांचा ' ब्राह्मण ' या नांवाचा एक ग्रंथ निर्माण करण्यांत आला. त्यानंतर, वेदांतील कांहीं भाग गहन असल्यामुळें त्यांचा वादविवाद करितांना एकांत ठेवणें आवश्यक वाटूं लागलें; म्हणून ' ब्राह्मण ' या ग्रन्थांतूनच ' आरण्यकें ' म्हणून निराळा भाग काढण्यांत आला. तथापि त्यांतही पुन्हा सृष्टीची रचना उत्पत्ती, स्थिती, व लय, हो सृष्टींतील घडामोड, व असेच दुसरे गहन ईश्वरनिर्मित सिद्धांत, याविषयीं खल व वादविवाद झाला; व त्यावरून वेदांचें सार म्हणून ' उपनिषदें ' तयार करण्यांत आलीं. म्हणजे ऋग्वेदसंहिता, त्यांतून निर्माण झालेले यजुर्वेद, सामवेद व अथर्व वेद, आणि वेदांतूनच निर्माण केलेले ' ब्राह्मण, आरण्यकें, व उपनिषदें,' या सर्वांना मिळून श्रुति किंवा वेद अशी संज्ञा प्राप्त झाली.

वरील विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, ब्राह्मणकालांत आर्यांचा धार्मिक ग्रंथविस्तार पुष्कळच मोठा, पाल्हाळिक व अवजड झाला, त्यामुळें

हा सर्व ग्रन्थसमूह पूर्णपणें लक्षात ठेवून त्याप्रमाणें आचरण करणें दुरापास्त होऊन गेलें; म्हणून त्रोटक पण पुष्कळ अर्थ समाविष्ट करणारी आणि लक्षात ठेवितां येण्यासारखी सुलभ वाक्यरचना करण्यांत आली, व त्यांनां ' सूत्रें ' असें नांव देण्यात आलें. तथापि हीं सूत्रेंही निरनिराळया धार्मिक व सामाजिक बंधनाचीं असल्यामुळें त्यांचे पुन्हां श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें, व धर्मसूत्रें, असे तीन भाग पाडण्यात आले; व त्यांतील श्रौतसूत्रांत यज्ञयागादि बाबतींतील नियम-निर्बंध, गृह्यसूत्रांत कौटुंबिक विधीच्या बाबतींतील नियम निर्बंध, व धर्मसूत्रांत सामाजिक बाबतींतील नियम-निर्बंध, ग्रंथित करण्यांत आले; परंतु हीं सूत्रेंही पुढें अपूर्ण भासूं लागलीं; म्हणून व्याकरण, न्याय, वेदांत, वगैरे सूत्रग्रंथ निर्माण करण्यांत आले. त्यानंतर, या सूत्रांतील नियम-निर्बंधांवरून अनेक ऋषींनीं या बाबतींवरील 'स्मृति' ग्रंथ तयार केले असून त्यांतील मनु, पाराशर, व याज्ञवल्क्य, वगैरे ऋषिवृंदांनीं केलेल्या स्मृति विशेष प्रगल्भ, माननीय, व महत्त्वाच्या म्हणून गणल्या गेल्या आहेत. पुढें वेदांतील इंद्र, वरुण, वायु, सूर्य, उषा वगैरे निरनिराळया देवतांच्या द्वारें सृष्टिक्रम चालला नसून मूळ आदिकारण शक्ति निराळी असावी असें मत उत्पन्न होऊन अनेकेश्वर मत मागें पडलें; एकेश्वरी मताची स्थापना होऊन उत्पत्ति, स्थिति, व लय, ही सृष्टिची घडामोड करणारा परमेश्वर एकच आहे, अशा मताचा प्रसार झाला; आणि वेदांतील अनेक देवतांऐवजीं ब्रह्मा, विष्णु, व महेश, ह्या एकाच ईश्वराच्या तीन निरनिराळया विभूति व रूपें आहेत, असें मानून आर्य लोक त्यांनां भजूं लागले. अशा रीतीनें आर्य लोकांच्या, निरनिराळ्या देवतांसंबंधींच्या वेदांतील पूर्वकल्पनांनां व अनेकैश्वरी सांप्रदायाला निराळें वळण मिळालें, व ईश्वर एकच आहे, हें तत्त्व या वेळेपासून प्रचारांत आलें.

प्राचीन असीरिया, इराण, व इजिप्त, या देशांप्रमाणेंच, हिंदुस्थान देशांतही हजारों वर्षांपासूनची संस्कृति आज तागायत विद्यमान असून तिचें मूळ 'ऋग्वेद' हा अमूल्य ग्रंथ आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांतील ही संस्कृति ऋग्वेदानंतरच्या महाभारत, रामायण, भागवत, वगैरे ग्रंथांवरून, व इतर काव्यें, नाटकें, व दंतकथा, यांवरून दृग्गोचर होत असून याच वाङ्मयावर व इतिहासावर त्या काळांत हिंदुस्थानचें राष्ट्र आर्य लोकांनीं उभारिलेलें आहे; हिंदुस्थानांतील ' ग्रामपंचायती'सारख्या अनेक उपयुक्त संस्था पौराणिक कालापासूनच उत्पन्न होऊन त्या परंपरागत आलेल्या आहेत, आणि हिंदुधर्माचें मुख्य लक्षण

म्हणजे वेदांचें प्रामाण्य, हें असून श्रुति, स्मृति, आणि पुराणें, यांमधून ज्या धर्माचें प्रतिपादन केलेलें आहे, तो हिंदुधर्म असें मानण्यांत आलेलें आहे. प्रथमतः आर्यलोकांच्या देवता पंचभूतात्मक होत्या; आणि ते आकाश (द्यौः), वरुण ( आकाश विशेषतः रात्र ), मित्र ( सूर्य, दिवस, ), इंद्र ( पर्जन्याचा राजा ) वायु, व अग्नि यांची आराधना करीत असत; म्हणजे ' ऋग्वेद ' हेंच हिंदुधर्माचें मूळ असून तो वरील देवतांची स्तुति व प्रार्थना वगैरेंच्या एकीकरणापासून निर्माण झालेला आहे.

ऋग्वेदांत एकंदर दहा ' मंडलें ' आहेत; त्यांपैकीं पहिलें व शेवटचें मंडल अनेक ऋषींनीं रचिलेलें असून दुसरें भृगु घराण्यांतील गृत्समद यानें रचिलेलें आहे; तिसरें विश्वामित्रानें, चवथें वामदेवानें, पांचवें अत्रीनें, सहावें भारद्वाजानें, सातवें वसिष्ठानें, आठवें कण्वानें, व नववें अंगिरसानें, रचिलेलें आहे. उपनिषदें हीं तत्कालीन आर्यांची पूर्ण संस्कृति, आणि त्यांची श्रेष्ठतम बुद्धिमत्ता यांचीं दर्शक असून पाश्चात्य देशांतील विद्वान् लोकांनींही आपापल्या ग्रंथांतून त्यांची अतीशय स्तुति केलेली आहे; आणि प्रोफेसर मॅक्स मुल्लर यानें तर आपल्या उपनिषदांवरील ग्रंथाच्या प्रस्तावनेंत "उपनिषदांवरून संस्कृत भाषेविषयींच्या माझ्या प्रेमास उत्तेजन मिळालें" अशी आपली स्पष्ट कबूली दिलेली आहे. उपनिषदें म्हणजे, वेदांत, वेदांतर्गत तत्त्वज्ञान, अथवा अज्ञानाचा नाश करणाऱ्या विचारांचा ग्रंथ होय; या ग्रंथांतील प्रमेयें व विचार अत्यंत उदात्त, प्रगल्भ व गहन आहेत. प्रसिद्ध मोंगल बादशहा शहाजहान याचा पहिला मुलगा दाराशेखो ( जन्म अजमीर येथें इ० सन १६१५, मृत्यु इ. सन १६५९ ) हा मोठा बुद्धिमान, परधर्मसहिष्णु, उदार आणि थोर मनाचा असून धर्मशास्त्र, व तत्त्वज्ञान, यांचाही त्यानें अभ्यास केला होता, आणि एक फ्रेंच धर्मोपदेशक व एक हिंदु साधु, असे त्याचे दोन गुरू होते. दाराशेखो हा इ० सन १६४० या वर्षी काश्मीर येथें असतां हिंदूंच्या या उपनिषदांची कीर्ति त्याच्या कानावर गेली; तेव्हां तिकडून दिल्ली येथें परत गेल्यावर त्यानें काशीहून विद्वान् शास्त्री व पंडित मंडळी आणवून त्यांच्या देखरेखी खालीं उपनिषदांची पर्शियन अथवा उर्दू भाषेंत भाषांतरें करण्यास प्रारंभ केला व तीं सर्व इ० सन १६५७ मध्यें पूर्ण झालीं. त्यानंतर पारशी लोकांच्या ' झेंदावेस्ता ' या नांवाच्या धर्मग्रंथाचा संशोधक प्रसिद्ध प्रवासी अँक्वेटील डयुपेरॉं यानें इ० सन १७७५ मध्यें हें पर्शि-

यन भाषेंतील उपनिषदांचें भाषांतर पाहिलें, व त्यावरून त्यानें त्याचा फ्रेंच व ल्याटीन भाषेंत तर्जुमा केला. त्यानंतर प्रसिद्ध तत्त्वज्ञानी शोपेन हेर यानें त्याचें मोठ्या बारकाईनें परिक्षण केलें, आणि उपनिषदांमध्यें अत्यंत उदात्त व गंभीर विचारांचा संग्रह केलेला आहे असें जाहीर केलें; इतकेंच नव्हे तर तत्त्वज्ञान या विषयावर त्यानें पुढें जे ग्रंथ लिहिले, त्यांतही उपनिषदांमधील उदात्त तत्त्वें ग्रथित केलीं. अशा रीतीनें हीं भाषांतरें परस्थ लोकांच्या वाचनांत आल्यानें, मूळ संस्कृत उपनिषदांत असलेलें स्वारस्य आपणास समजून यावें म्हणून आर्य-लोकांचीं मूळ भाषा जी संस्कृत तिचा कांहीं पाश्चात्य विद्वानांनीं अभ्यास केला, व त्यामुळें पृथ्वीवरील बहुतेक सर्व सुधारलेल्या व प्रमुख भाषांत त्यांचीं भाषांतरें झालीं. वरील विवेचनावरून, उपनिषदें हीं आर्यांच्या अलौकिक बुद्धि-वैभवाचीं द्योतक आहेत, त्यांचीं निरनिराळ्या भाषेंत भाषांतरें व रूपांतरें झाल्या वेळेपासूनच परकीय लोक, आर्य लोकांचें बुद्धिवैभव व ज्ञानसामर्थ्य, याबद्दल स्तुतिपर उद्गार काढूं लागले आहेत, व त्यामुळेंच हिंदुस्थानांतील या उदात्त प्राचीन वाङ्मयाकडे त्यांचें लक्ष वेधलें आहे, अशी कोणाचीही खात्री होईल.

ब्राह्मणकाळास धर्मक्रांति–काळ असेंही नांव देतां येईल. कारण ब्राह्मण ग्रंथाची रचना झाली त्या काळीं धार्मिक विधिव्यवहार, क्रिया-कर्मांतरें व यज्ञयाग हवनादि कृत्यें, हीं अनंत पटीनें वाढून व घोटाळ्याचीं होऊन साध्या वैदिक धर्मास विशेष कठिण स्वरूप प्राप्त झालें; आणि धर्मास जसजसें दुर्बोध स्वरूप व काठिण्य येत गेलें, तसतसा धार्मिक कृत्यें करणारांचा एक स्वतंत्र वर्गच निर्माण करणें आवश्यक होऊन ब्राह्मणवर्ग अस्तित्वांत आला. उपनिषद्काला पूर्वी क्षत्रिय व वैश्य हे दोन्हींही वर्ग आपापलीं धार्मिक कृत्यें थोड्या फार प्रमाणानें स्वतःच करीत असत; परंतु त्या नंतरच्या कालापासून त्यांनीं या स्वतंत्र वर्गा-कडेसच आपापलीं धार्मिक कृत्यें सोंपविलीं. हा ब्राह्मणकाल साधारणतः ६० सना पूर्वी ५०० या वर्षापर्यंत गणिलेला असून त्यानंतर 'बौद्ध काल' सुरू झाला आहे.

हिंदुस्थानच्या इतिहासांत, बौद्ध काल हा, धार्मिकच फक्त नव्हे तर राजकीय दृष्ट्याही अतीशय महत्त्वाचा म्हणून गणला गेलेला आहे; कारण याच कालांत धार्मिक व राजकीय क्रांति घडून आलेली असून ग्रीस देशांतील मासिडोनिया प्रांताचा राज्यकर्ता अलेक्झॉंडर धी ग्रेट

अथवा शिकंदर बादशाहा यानें हिंदुस्थानावर स्वारी केलेली आहे. शिकंदराची ही स्वारी इ० सनापूर्वी ३२६ या वर्षीची आहे; तथापि त्याच्याहि पुष्कळच पूर्वी, म्हणजे इ० सनापूर्वी २०३४ या वर्षी हिंदुस्थानावर परदेशीयांची स्वारी झालेली आहे. निनेवीच्या सेमिरामीस राणीनें उभारलेला एक जयस्तंभ अलीकडे उपलब्ध झाला आहे; त्यावरून असें दिसतें, कीं, तिनें इ० सना पूर्वी २०३४ या वर्षी हिंदुस्थानावर स्वारी केली होती, व ती सिंधुनद ओलांडून थेट काश्मीर जम्मूपर्यंत चाल करून गेली होती; परंतु डॉयोडोरस सिक्यूलस हा ज्याला स्ट्राब्रोबेट्स् असें नांव देतो त्या राज्यकर्त्यानें तिच्याशीं युद्ध करून तिचा पराभव केला, आणि तिला हिंदुस्थानांतून परत जाणें भाग पाडिलें. त्याप्रमाणेंच इ० सनापूर्वी ९८१ या वर्षी दुसऱ्या रामेसीसनें हिंदुस्थानावर स्वारी केली असल्याचा उल्लेख आढळतो. हिंदुस्थानचा तत्कालीन व्यापारविषयक इतिहासही अशाच प्रकारचा असून इ० सनापूर्वी ९८० या वर्षी टायरचा हिराम हा अरबी समुद्रांतून व आखातांतून हिंदुस्थान देशाशीं व्यापार करीत असे, अशाबद्दल भरभक्कम पुरावा मिळतो. म्हणजे शिकंदराच्या काळापासूनच हिंदुस्थानच्या इतिहासास प्रारंभ होतो, हें कांहीं पाश्चात्य इतिहासकारांनीं दिग्दर्शित केलेलें मत वस्तुस्थितीस सोडून आहे, असें उघड होतें.

मागें वर्णन केलेल्या राज्यांत, मगध या नांवाचें एक राज्य त्या काळीं अस्तित्वांत असल्याचें दिग्दर्शन केलेलें आहेच. हें राज्य वाढत वाढत पुढें इतकें बलिष्ठ बनलें, कीं, त्याची सार्वभौम राज्यांत गणना होऊं लागली. हें राज्य इ० सनापूर्वी ६०० च्या सुमारास शिशुनाग या नांवाच्या एका क्षत्रिय वंशाकडे होतें; शिवाय, सिंधाली दंतकथेप्रमाणें इ० सनापूर्वी ६२३ ते ५४३ या दरम्यान–बुद्धदेवाच्या काळीं– ( इ० सन ४८७ मध्यें बुद्धदेवाचें प्रयाण झालें, असें व्हिन्सेंट स्मिथ याचें मत आहे. ) हिंदुस्थानांत कोसल ( अयोध्या ) व मगध हे देश अतीशय भरभराटीस व प्रख्यातीस आलेले होते तथापि पहिल्यानें मगध देशाच्या मानानेंही कोसल देश अधिक महत्त्वास चढलेला होता; परंतु पुढें त्याचें तें महत्त्व लयास जाऊन त्याच्या जागीं मगध देशाचें महत्त्व वाढून गेलें; व मगध देशाचा विस्तार हिमालय पर्वतापासून तो थेट गंगानदीपर्यंत पसरला गेला. या शिशुनाग घराण्यांतील पांचवा पुरुष बिंबसार हा मोठा शहाणा राज्यकर्ता होऊन गेला; तो

इ० सनापूर्वीं ५४० या वर्षीं गादीवर आला व त्यानें आपल्या राज्याची राजधानी राजगृह येथें केली. याचा मुलगा अजातशत्रु हा मोठा शूर, पराक्रमी व धाडशी होता. हा, इराणचा राज्यकर्ता दारायस ( इ. सनापूर्वीं ५२१–४८५) चा जवळजवळ समकालीन असून त्यानें आपल्या बापास ठार मारून इ. सनापूर्वीं ४९१ या वर्षीं गादी मिळविली. हाच अजातशत्रु हा, हल्लीं पाटणा व बांकीपूर हीं शहरें ज्या स्थानीं आहेत त्या जागेवर असलेलें मगध देशाच्या राजधानीचें शहर पाटलीपुत्र, याचा संस्थापक होय. यानें कोसल व वेसाली हीं प्रजासत्ताक राज्य जिंकिलीं; या काळांत इराणचा प्रसिद्ध बादशहा दारायस हाही मोठा पराक्रमी व योद्धा म्हणून नांवाजलेला होता; व सिंध व पंजाब प्रांताचा कांहीं भाग त्याच्या ताब्यांत असून त्यावर त्यानें एका हिंदुसुभेदाराची नेमणूक केली होती हा सुभेदार दारायसकडे दरवर्षीं दीड कोट रुपये खंडणी रवाना करीत असे, आणि ती इतर कोणत्याही स्वरूपांत न जातां निव्वळ सुवर्णरूपानेंच रवाना होत असे. इ. सनांपूर्वीं ४५९ च्या सुमारास शिशुनागवंश नष्ट झाला, आणि मगधराज्य नंदघराण्याकडे गेलें; या घराण्यांतील शेवटचा पुरुष राज्य करीत असतां बादशाहा शिकंदर यानें इराणचें राज्य जिंकून हिंदुस्थानावर स्वारी केली, व इ० सनापूर्वीं ३२६ च्या मार्च महिन्यांत हिंदुकुश पर्वत ओलांडून, व अटकजवळ ओहिद येथें सिंधुनद उतरून, वाटेंतील राज्यकर्त्यांशीं झगडत झगडत तो हिंदुस्थानांत आला. शिकंदरानें सिंधु व झेलम या नद्यांमधील प्रदेश सहज हस्तगत करून झेलम नदी ओलांडिली; परंतु झेलम व चिनाब या नद्यांमधील प्रदेशांत पौरव घराण्यांतील राजा पोरस यानें त्यास अडथळा केला. तेव्हां उभयतांमध्यें युद्ध होऊन त्यांत पौरस राजाचा पराभव झाला. नंतर तो काश्मीर प्रांतांत शियालकोटच्या पलीकडे पर्यंत गेला; परंतु त्याचें सैन्य पुढें जाण्यास नाखुष असून त्या सैन्यांत बंडाळी माजली; त्यामुळें त्याला आपला पुढें जाण्याचा बेत मोठ्या नाइलाजानें सोडावा लागून, तो त्याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत आपल्या सैन्यासह परत फिरला; त्या वेळीं त्यानें सिंध व पंजाब हे प्रांत हस्तगत करून तेथें आपले ग्रीक अधिकारी व सैन्य ठेविलें; व इ० सनापूर्वीं ३२५ च्या सप्टेंबर महिन्याच्या सुमारास त्यानें सिंधुनदाच्या मार्गानें हिंदुस्थानची-सरहद्द ओलांडिली; व ३२४ च्या मे महिन्याच्य

सुमारास तो सुसाह येथें जाऊन पोहोंचला; आणि पुढें जात असतां आशिया मायनरमधील बाबीलोन या ठिकाणीं मृत्यु पावला. शिकंदर बादशहा हिंदुस्थानांतून परत गेला त्यावेळीं त्यानें पंजाबमध्यें फिलिप या नांवाचा आपला एक 'गव्हर्नर' अथवा सुभेदार नेमिला होता, व पराभूत केलेला राजा पौरस यास त्याच्या हाताखालीं मुलकी कारभारी नेमिलें होतें. फिलीपचें व पौरसाचें सख्य होतें; परंतु फिलिपच्या मागाहून आलेला गव्हर्नर युडेमॉस व पौरस यांचें परस्परांत अत्यंत वैमनस्य येऊन युडेमासनें पौरस याचा विश्वासघातानें खून केला. तेव्हां त्या प्रांतांतील लोकांनीं चंद्रमोरी उर्फ चंद्रगुप्त या नांवाच्या एका पराक्रमी व साहसी तरुणाच्या धुरीणत्वाखालीं बंड उभारिलें, आणि या चंद्रगुप्तानें त्या प्रांतांतील ग्रीकसत्तेचा शेवट करून तेथें आपलें राज्य स्थापन केलें.

हा चंद्रमोरी अथवा चंद्रगुप्त हा या काळांतील हिंदुस्थानचा पहिला सार्वभौम राज्यकर्ता आहे असें मानण्यांत येतें; आणि सूर्यवंशांतील राज्यकर्ता श्रीरामचंद्र अथवा त्याचे बंधु यांच्या पासून उत्पन्न झालेल्या छत्तीस शाखांपैकीं 'प्रमार' नांवाच्या एका शाखेंत त्याचा जन्म झाला होता, असें पुराणांतील वंशवर्णनावरून समजून येतें. चंद्रगुप्त हा मूळचा मगध देशांतील रहिवासी असून तेथें राज्य करीत असलेल्या नंदघराण्याशीं त्याचें दूरचें नातेंही होतें; परंतु, राज्यविषयक खटपटीवरून, त्या घराण्याशीं त्याचा बेबनाव झाल्यामुळें, तो मगधदेश सोडून आपला जीव बचावण्याकरितां ग्रीक लोकांच्या आश्रयास येऊन राहिला होता; पुढें ग्रीक लोकांची सत्ता नामशेष केल्यावर त्यानें नंदघराण्याचा सूड उगविण्याकरितां मगध देशावर स्वारी केली, आणि इ० सनापूर्वी ३२१ या वर्षी मगध देशाचें राज्य आपल्या हस्तगत करून घेऊन मौर्य घराण्याची स्थापना केली. नंतर त्यानें आपलें सैन्य वाढवून पुष्कळ प्रदेश हस्तगत करून घेतला, आणि उत्तरेस हिंदुकुश पर्वतापासून नर्मदा नदीपर्यंत, व पूर्वेस अरबी समुद्रापासून बंगाल्याच्या उपसागरापर्यंत आपल्या राज्याची सरहद्द नेऊन भिडविली, व या सर्व व्यापक प्रदेशांचा तो सामंतचक्राधिपति बनला. या वेळीं त्याच्या सैन्यांत रथ हत्ती, घोडेस्वार व पायदळ मिळून एकंदर ६ लक्ष ९० हजार सैन्य जय्यत होतें. मध्यंतरीं शिकंदर बादशहा मृत्यु पावल्यामुळें त्याचें आशिया खंडांतील सर्व राज्य त्याचा सेनापति सेल्यूकस निकेटर याच्या ताब्यांत आलें; तेव्हां

त्यानें हिंदुस्थानांतील पंजाब व सिंध हे दोन्हींही प्रांत चंद्रगुप्तापासून परत मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांत त्यास अपयश येऊन हे दोन्हींहि प्रांत चंद्रगुप्ताच्याच अमलाखालीं राहिले. चंद्रगुप्त हा अत्यंत कर्तृत्ववान् राज्यकर्ता असून तो युद्ध व राज्यव्यवस्था ह्या दोन्हींही कलेंत निष्णात होता. शिवाय तो विद्वानांचा मोठा भोक्ता असून मेगास्थनीस या नावांचा एक ग्रीक विद्वान् मनुष्य त्याच्या दरबारांत होता. त्यानें चंद्रगुप्ताच्या राज्यव्यवस्थेचें बारकाईनें निरीक्षण करून त्यासंबंधींची मोठी मनोवेधक व मननीय हकीकत लिहून ठेविली आहे; तिचा अभिप्राय सारांशरूपानें सरविल्यम हंटर यानें आपल्या ग्रंथांत नमूद केला आहे; तो असा कीं:-" हिंदुस्थानांतील गुलामगिरीचा अभाव, स्त्रियांचें पातिव्रत्य, आणि पुरुषांचा धीरोदात्त स्वभाव, यांचें मेगास्तनीस यानें मोठ्या कौतुकानें वर्णन केलेलें आहे. शिवाय मेगास्थनीस म्हणतो:—" आशिया खंडांतील इतर कोणत्याही लोकांपेक्षां हिंदी लोक शौर्यांत श्रेष्ठ आहेत; त्यांनां आपल्या घरांनां कुलुपें लावण्याची कधींही आवश्यकता वाटली नाहीं; इतकेंच नव्हे तर खोटें बोलणारा हिंदी मनुष्यही आपणाला कधींहि आढळून आला नाहीं. हिंदी लोक उद्योगी, आहारादिकांत फार नेमस्त, शेतींत वाकबगार व कलाकौशल्यांत तरबेज असे आहेत. न्यायमंदिराची पायरी चढण्याचा त्यांना क्वचित्च प्रसंग येत असतो, व आपल्या एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं ते सुखानें रहात असतात.," थोडक्यांत म्हणजे मनुस्मृतींत वर्णन केलेलीच राज्यव्यवस्था जवळ जवळ या चंद्रगुप्ताच्या राज्यांत चालू होती, असें मेगास्थनीसाच्या वर्णनावरून दिसतें. तो पुढें म्हणतो:- "या वेळीं हिंदुस्थानांत निरनिराळीं एकशें अठरा राज्यें आहेत. व त्यांपैकीं कांहीं तर चंद्रगुप्ताचे अमलाप्रमाणें आधिराज्याचे अधिकारही उपभोगीत आहेत." त्या प्रमाणेंच 'ग्रामसंस्था' या संबंधींही त्यानें केलेलें वर्णन मोठें सुरस आहे; व ग्रामसंस्थेंतील एक एक खेडेंही त्याला स्वतंत्र लोकसत्ताक राज्याप्रमाणें वाटत असून, लढाई व नोकरी या दोन्हींही पेशापासून हिंदुस्थानांतील तत्कालीन वैश्य वर्ग अजिबात मोकळा होता, ही गोष्ट ही त्यानें नमूद केलेली आहे. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांत उत्पन्न होणारे अनेक प्रकारचे रंग, तंतू, निरनिराळ्या प्रकारचें कापड व खनिज, प्राणिज व वनस्पतिज पदार्थ यांचीही माहिती त्यानें

आपल्या प्रवासवृत्तांत विशद रीतीनें ग्रंथित केली आहे. या चंद्रगुप्तानें ग्रामसंस्थेप्रमाणेंच एक स्वतंत्र युद्धसंस्था अथवा युद्धखातेंही निर्माण केलें होतें. या खात्यांत तीस सल्लागार अथवा मंत्री नेमिलेले असत; पंचायतीचें म्हणजे पांचजणाचें एक अशी या तीस मंत्र्यांची सहा मंडळें होतीं; त्यांपैकीं पहिल्या मंडळाकडे आरमारी खातें सोंपविलेलें असून या मंडळाचा आरमारावरील मुख्य अधिकाऱ्याशीं संबंध असे. दुसऱ्या मंडळाकडे सैन्य, सैन्यवाहन याची जबाबदारी सोंपविलेली असे; आणि पायदळ, घोडदळें, युद्धरथ व हत्ती या युद्धविषयक चार बाबतींची व्यवस्था बाकीच्या चार स्वतंत्र मंडळाकडे निरनिराळी सोंपविलेली असे. युद्धखात्याप्रमाणेंच त्यानें एक स्वतंत्र मुलकी खातें निर्माण करून त्याची स्वतंत्र व्यवस्था केलेली असे; शिवाय त्यानें एक स्वतंत्र शहर सुधारणाखातें निर्माण केलेलें असून त्या खात्यांतही युद्धखात्याप्रमाणेंच तीस सभासदांची नेमणूक केलेली असे व त्याचींही सहा निरनिराळीं मंडळें असून या मंडळावरच राज्यांत कलाकौशल्याची वाढ करण्याची जबाबदारी टाकिलेली असे; शिवाय कामकरी लोकांच्या मजूरीचे बाबतींतील, व व्यापार व इतर उद्योगधंदे यांच्या संबंधांतील उत्पन्न होणाऱ्या हरएक प्रश्नाचा त्यांनींच अखेरचा निवाडा द्यावा, असें ठरलेलें असे. म्हणजे इतक्या प्राचीनकाळींही हिंदुस्थानांतील चंद्रगुप्ताच्या राजसत्तेकडून प्रजेच्या हिताची, कल्याणाची, व प्रगतीची किती काळजी घेतली जात असे, याची स्पष्ट कल्पना वरील हकीकतीवरून सहज होण्यासारखी आहे; इतकेंच नाहीं तर निरीक्षक दृष्टीनें या मंडळांच्या अधिकारव्याप्तीचें व कार्यक्षेत्राचें मनन करणें योग्य असून त्यामुळें नवी माहितीही मिळण्यासारखी आहे. याच मंडळाकडे परदेशांच्या वकिलांचीही व्यवस्था सोंपविलेली होती, आणि व्हिन्सेंट स्मिथ यानें म्हटल्याप्रमाणें सदर मंडळाचें अस्तित्व, ही गोष्ट, या साम्राज्याचें परकीय राज्याशीं अव्याहत दळण वळण असे, याची निदर्शक होती. शिवाय या मंडळाकडे जन्ममृत्यूची नोंध करण्याचें काम सोंपविलेलें होतें, व ती विशेष काळजीनें व दक्षतेनें करण्यांत येत असून कर बसविण्याच्या अथवा कमी करण्याच्या प्रसंगीं तिचा अतीशय उपयोग होत होता; त्याप्रमाणेंच हें मंडळ व्यापाराकडे लक्ष्य पुरवीत असे; सरकारी शिक्क्याचीं नवीं वजनें व मापें निश्चित करून व त्यासंबंधीं नियम बांधून सर्व लोक त्यांचाच उपयोग करितील अशी खबरदारी घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच

असे; शिवाय सर्व कारखान्यांवर देखरेख ठेवणें, सर्व प्रकारच्या मालावर, त्याच्या विक्री नंतर कांहीं विवक्षित कर वसूल करणें, बाजार, बंदरें, देवळें, वगैरेंवर देखरेख ठेवणें वगैरे कामेंही याच सुधाराई मंडळाकडे सोंपविलेलीं असत. साम्राज्याचे प्रांतवार अनेक सुभे केलेले असून प्रत्येक प्रांतावर एक एक स्वतंत्र सुभेदाराची नेमणूक करण्यांत येत असे; व त्यांच्या वरील तपासणी करितां दुसऱ्या स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या योजना केलेल्या असून ते नेहमीं फिरते असत. सत्यप्रियता व प्रामाणिकपणा याबद्दल हिंदी लोकांचा त्या काळीं अतीशय लौकिक झाला होता. पाटबंधाऱ्याचें एक स्वतंत्र खातें ठेवण्यांत आलें होतें, व पाटपाण्याचा सर्वांस सारखा फायदा मिळावा म्हणून वेळच्या वेळीं तें सोडण्याच्या व बंद करण्याच्या कामीं तें खातें फार सावधगिरी बाळगीत होतें; सारांश, या अलौकिक राज्यकर्त्यांनीं आपल्या प्रजेच्या उन्नतीकरितां अनेक प्रकारें अश्रांत परिश्रम केले, व त्यामुळेंच हिंदुस्थानच्या इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याच चंद्रगुप्ताचा चाणक्य या नांवाचा एक अतीशय प्रसिद्ध व विद्वान् ब्राह्मण प्रधान होता. त्यानें ‘ चाणक्यनीति ’ या नांवाचा एक राजनीतिपर ग्रंथ लिहिला असून त्याचें इंग्रजींतही भाषांतर झलेलें आहे. चंद्रगुप्त हा इ. सनापूर्वी २९१ या वर्षी मृत्यु पावला, व त्याच्या मागून त्याचा मुलगा मित्रगुप्त उर्फ बिंदुसार हा गादीवर आला. याच्या कारकीर्दींत—कित्येकांच्या मतें चंद्रगुप्ताच्या कारकीर्दींत—या मौर्य साम्राज्याची दक्षिण सरहद्द हल्लींच्या मद्रास शहरापर्यंत जाऊन भिडली होती. बिंदुसार हाही मोठा हुषार व कर्तृत्ववान् असून त्यानें वीस वर्षें राज्य केलें; तो इ. सनापूर्वी २७२ या वर्षी मृत्यु पावला, व त्याचा महापराक्रमी व अत्यंत प्रसिद्ध मुलगा ‘ साम्राट् ’ अशोक हा सिंहासनारुढ झाला. हा राज्यकर्ता मोठा शूर असून त्यानें बंगालच्या उपसागरावरील कलिंग देशाचें राज्य—म्हणजे हल्लीं ज्यास ओढ्या व सरकार असें म्हणतात तें— हस्तगत करून आपल्या राज्यास जोडिलें. या काळांत बौद्ध धर्माचा नुकताच कोठें उदय होऊं लागला होता, व बुद्धभिक्षु चोहोंकडे त्या धर्माचा उपदेश करून त्याची वृद्धि करण्याच्या प्रयत्नास लागले होते. या भिक्षुलोकांच्या उपदेशाचा राजा अशोक याच्या मनावर अतीशय परिणाम झाला, व त्यानें बौद्धधर्माचा अंगीकार केला. या राज्यकर्त्यांनें

उत्तरेस हिंदुकुश पर्वतापासून दक्षिणेस मद्रासपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशावर चाळीस वर्षे ( इ० सनापूर्वी २७२ ते २३२ पर्यंत ) राज्य केलें. त्यानें आपल्या कारकीर्दीत गोदावरी व कृष्णा या नद्यांमधील आंध्र प्रदेशाच्या राज्यकर्त्याला आपलें सार्वभौमत्व मान्य करण्यास भाग पाडिलें होतें; तथापि दक्षिणेकडील पांड्य, चोल, केरलपुत्र व सत्यपुत्र हीं राज्यें स्वतंत्रपणें नांदत राहिलीं होतीं. अशोक हा आपल्या साम्राज्याच्या मध्यवर्ती प्रांताचा कारभार स्वतःच पहात असे. आणि पूर्व, पश्चिम, दक्षिण व वायव्य दिशांकडील प्रांतांचा कारभार पाहाण्याकरितां त्यानें चार सुभेदारांची नेमणूक केली असून ते राजाज्ञेप्रमाणें कारभार चालवीत असत. अशोकानें शिला व स्तंभ यांवर अनेक आज्ञापत्रें खोदवून तीं आपल्या साम्राज्यांत चोहोंकडे प्रसिद्ध केलीं, त्यांवरूनच त्याचें शहाणपण, व कर्तृत्व हीं निदर्शनास येतात. उदाहरणार्थ, अशोकाचा शिलालेख नंबर २ व स्तंभलेख नंबर ७ यांत असा मजकूर आहे कीं, " मनुष्यप्राणी व मुकीं जनावरें यांनां छायासौख्य मिळत रहावें म्हणून मी रस्त्यांच्या बाजूंस दुतर्फा वडांचीं झाडें लावण्याची व्यवस्था केली आहे; व त्याप्रमाणेंच आंबराया हीं लाविल्या आहेत; अर्धा अर्धा कोसावर नव्या विहिरी खोदवून अनेक धर्मशाळाही मीं बांधविल्या आहेत; व माणसें व जनावरें यांच्या उपयोगासाठीं मी ठिकठिकाणीं पाणपोया ही ठेविलेल्या आहेत." या शिवाय, गुरांकरितां दवाखाने, मनुष्यांकरितां फुकट औषधालयें, वनस्पति वांटण्याचीं आलयें, व शुश्रूषागृहें वगैरे लोकोपयुक्त संस्था अशोकानें निर्माण केल्या होत्या. या सर्व गोष्टींवरून, राजा अशोक यानें प्रजेच्या सुखसोयींसाठीं किती काळजी घेतली होती, तत्परता दाखविली होती, व तजविजी केल्या होत्या, हें सहज निदर्शनास येतें.

साम्राट् अशोक याच्या कारकीर्दीतील काळ हा एक प्रकारें धर्मक्रांतीचा काळ होय. असें म्हणतां येईल; या काळांत बौद्ध व जैन या दोन निरनिराळ्या धर्मांचा उदय झाला. तथापि अशोकानें बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळें त्याला राजाश्रय मिळून तो विशेष जोरांत आला, व त्याचा अतिशय प्रसार झाला. राजा अशोक यानेंहि या धर्माची वृद्धि करण्याकरितां विशेष परिश्रम घेतले; धर्मसंबंधींच्या राजाज्ञा खडक, खांब व शिला वगैरेंवर खोदवून त्या त्यानें

आपल्या साम्राज्यभर प्रसिद्ध केल्या, आणि त्या धर्माच्या अभिवृद्धीकरितां नेपाळ, काश्मीर, अफगणिस्थान, गुजराथ व सिंहल द्वीप उर्फ सिलोन इतक्या दूरवरच्या प्रदेशांपर्यंत त्यानें धर्मोपदेशक पाठविले; अशा रीतीनें राजाश्रय मिळून बौद्ध धर्म जोरांत आल्यामुळें तो हिंदुधर्माला एक अत्यंत बलिष्ठ प्रतिस्पर्धी निर्माण झाला, व हिंदुधर्माबरोबर त्याचे अनेक जोराचे व चिकाटीचे झगडे झाले. हिंदुधर्मप्रचारकांबरोबर झगडण्यांत ' सांख्यदर्शन ' या ग्रंथाचा कर्ता कपिलमुनि हा अग्रेसर होता. त्याच्यामागून प्रसिद्ध जैमिनी आणि व्यास या ऋषिद्वयांनीं अनुक्रमें ' पूर्वमीमांसा ' व ' उत्तर मीमांसा ' यांची रचना केली. गौतममुनीनें तर्क अथवा ' न्याय ' शास्त्रावर एक ग्रंथ निर्माण केला; कणाद यानें याच शास्त्राच्या एका अंगाची ' वैशेषिक ' या ग्रंथामध्यें रचना केली, आणि पातंजलीनें योगावर एक ग्रंथ निर्माण केला, व अशा रीतीनें त्यांनीं हिंदुधर्मांतील कांहीं मुख्य तत्त्वांचा अनादर केला. तथापि वेदांचें प्रामाण्य, म्हणजे वेद हे अपौरुषेय आहेत हें तत्त्व त्यांनीं मान्य केलें; परंतु त्यानंतर लवकरच ही परिस्थिति बदलली, व वेदांचें महत्त्व न मानणारे, इतकेंच नव्हे तर ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलही उघडपणें शंका घेणारे नास्तिक असे तत्त्वज्ञानी व उपदेशक एकामागून एक उत्पन्न झाले; आणि त्यांनीं आपलीं मतें लोकांपुढें मांडण्याचा व तीं योग्य रीतीनें प्रतिपादन करून जनसमूहास आपल्या मताचे करून घेण्याचा उपक्रम केला; या तत्त्वज्ञानामध्यें चार्वाक हा प्रमुख असून याच्या काळापासून ' कर्मपंथ ' व 'ज्ञानपंथ' असे दोन धार्मिक पंथ निर्माण झाले; व त्यानंतर बौद्ध, जैन, निग्रंथ, नास्तिक, वगैरे निरनिराळे चौदा पंथ अस्तित्वांत आले. त्यांपैकीं पहिले दोन म्हणजे बौद्ध व जैन हे धर्म विशेष वृद्धिंगत झाले असून ते निरनिराळ्या दोन महापुरुषांनीं स्थापन केले आहेत.

या दोन धर्मांपैकीं बौद्ध धर्माची स्थापना गौतमबुद्ध यानें केली असून जैन धर्माची स्थापना महावीर ऊर्फ वर्धमान स्वामी यानें केलेली आहे. या उभयतांचाही जन्म राजकुलांतच झालेला असून ते परस्पर समकालीन आहेत. पाटणा शहराच्या उत्तरेस अजमासें सत्तावीस मैलांवर " बेसर " या नांवाचें हल्लीं एक लहान गांव आहे, त्या ठिकाणीं त्या काळांत ' वैसाली ' या नांवाचें मोठें शहर वसलेलें होतें; व तेथील राज्यकर्ता सिद्धार्थ याचा महावीर हा मुलगा होता. ( कांहीं ठिकाणीं सिद्धार्थ हा कुंडगपूर येथील राज्यकर्ता होता; असें लिहिलेलें

आहे.) या घराण्याचा व मगध, विदेह, अंग, वगैरे राजघराण्यांचा निकटचा संबंध असून महावीरची आई त्रिशलाराणी ही विदेह देशाच्या राजाची कन्या होती; यावरून तिला वैदेही अथवा विदेहदत्ता असें म्हणत असत. या धर्मांचें मुख्य तत्त्व "अहिंसा परमो धर्मः" हें असून जैनधर्मी लोक आपल्या धर्मसिद्धांतांना वेदाचा जेवढा भाग अनुकूल वाटतो तेवढाच ग्राह्य मानितात. ते काळाचे तीन भाग मानितात. त्यांपैकीं पहिल्यांत मागें होऊन गेलेले चोवीस, दुसऱ्यांत चालू असलेले चोवीस व तिसऱ्यांत पुढें होणारे चोवीस मिळून एकंदर बहात्तर 'जिन' म्हणजे ज्ञानी पुरुष अथवा तीर्थंकर मानून त्यांची ते भक्ति करितात. जैनधर्मांत पूर्वी जे चोवीस तीर्थंकर होऊन गेले ते सर्व क्षत्रिय असून त्यांपैकीं पहिला ऋषभदेव यासह बावीस तीर्थंकर इक्ष्वाकू कुळांतील होते; आणि विसावा तीर्थंकर सुव्रत व बावीसावा तीर्थंकर नेमीनाथ हे यदुकुलांतील होते. या सर्व तीर्थंकरांत महावीर हा शेवटचा आहे, त्यानें तीस वर्षें संसार करून पुढें बारा वर्षें तपश्चर्या केली, व तपश्चर्येअंतीं त्यास कैवल्यावस्था प्राप्त होऊन त्यानें पुढें तीस वर्षेंपर्यंत लोकांस उपदेश केला. अशा रीतीनें आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत कालक्रमणा करून तो इ० सनापूर्वी ४९० मध्यें मृत्यु पावला. या सर्व सिद्ध पुरुषांचे पुतळे जैनधर्मियांच्या देवालयांत उभे केलेले असतात. अशा प्रकारची जैनधर्माची थोडक्यांत हकीकत आहे.

या काळांत दुसऱ्या ज्या धर्माचा उदय झाला तो म्हणजे बौद्धधर्म होय. इ० सनाच्या पूर्वी सहाव्या शतकांमध्यें या धर्माचा उदय होऊन त्याच्या प्रसारास सुरवात झाली. तथापि पहिल्या दोन शतकांत त्याचा फारसा प्रसार न होतां सम्राट् अशोक याच्या काळापासून त्या धर्माची अत्यंत भरभराट झाली. या धर्माचा संस्थापक गौतम हा शाक्य या नांवाच्या क्षत्रिय कुलांतील असून कपिलवस्तु येथील राजा शुद्धोदन याचा हा मुलगा होता. याच्या आईचें नांव मायादेवी हें होतें; हें कपिलवस्तूचें राज्य कोसल व दक्षिण मगध या दोन बलाढ्य राज्यांच्या मधील प्रदेशांत काशीच्या उत्तरेस अजमासें शंभर मैलांपासून पुढें थेट हिमालयाच्या पायथ्यापर्यंत पसरलेलें होतें. राजा शुद्धोदन हा मोठा शूर असून आपणाप्रमाणेंच आपला मुलगाही मोठा शूर, व कीर्तिमान् निपजावा, अशी त्याची उत्कट इच्छा होती; परंतु गौतम हा नेहमीं एकटाच बसून विचार मग्न स्थितींत असलेला त्याच्या दृष्टोत्पत्तीस येत असे; अशाच स्थितींत शुद्धोदनानें, यशोधरा

या नांवाच्या एका सुन्दर राजकन्येबरोबर त्याचें लग्न करून दिलें. लग्नानंतर सुमारें दहा वर्षांनीं त्यास एक मुलगा झाला; तथापि खालील कारण वरून, त्याच्या वडिलांच्या इच्छेप्रमाणें तो राज्यकर्ता न बनतां एक प्रसिद्ध धर्मसंस्थापक म्हणून कीर्ति पावला. गौतम ऊर्फ सिद्धार्थ गौतम हा नेहमीं रथांत बसून शहरांतून सहल करीत फिरत असे; तेव्हां मार्ग क्रमीत असतां रस्त्यानें म्हातारे, रोगी व मृत्यूचा भयंकर देखावा, वगैरे प्रकार त्याच्या नेहमीं पाहण्यांत येत असत. त्याप्रमाणें एके दिवशीं तो फिरत असतां असाच प्रकार त्याच्या दृष्टोत्पत्तीस आला; तेव्हां त्यासंबंधीं त्याचा व त्याच्या सारथ्याचा परस्परांशीं मोठा करुणास्पद संवाद झाला. या संवादांतील संस्कृत भाषा जुन्या गाथेंतील असल्यामुळें त्यांतील भाषा कोठेंकोठें अर्वाचीन संस्कृत भाषेशीं जुळणारी नाहीं; तरी तो मूळ संवाद विशेष मननीय असल्यामुळें टिपेंत मूळ संस्कृत देऊन, मराठी भाषेंतच त्याचा गोषवारा या ठिकाणीं ग्रथित केलेला आहे. गौतम बुद्ध हा एके दिवशीं रथांत बसून जात असतां एक वृद्ध व अशक्त मनुष्य त्याच्या दृष्टीस पडला, तेव्हां आपल्या सारथ्याकडे वळून त्यास तो म्हणाला:—

**गौतम**—हे सारथे, अशक्त व अस्थिपंजर झालेला असा हा कोण आहे ? त्याच्या अंगाचें मांस सुकून गेलें आहे; त्याचीं हाडें, आणि रक्तवाहिन्या हीं त्याच्या शरीरांतून स्पष्टपणें दिसत आहेत; त्याचे केंस पांढरे झालेले असून त्याचे दांत पडले आहेत, आणि काठीच्या आधारावांचून त्यास चालतां येत नाहीं; तस्मात् असा हा कोण आहे ?

**सारथि**—महाराज, हा एक वृद्ध मनुष्य आहे. याचें शरीर अशक्त झालें असून त्याचीं इंद्रियें कमकुवत झालीं आहेत; तो आतां काम करण्यास पूर्णपणें असमर्थ झालेला असून दुसऱ्याच्या साह्यावरच आतां त्याचें पुढील सर्व जीवित अवलंबून आहे, आणि ज्याप्रमाणें वाळून गेलेल्या वृक्षाचा पशुपक्षी त्याग करितात, त्याप्रमाणेंच त्याच्या आप्त इष्ट मित्रांनीं त्याचा त्याग केला आहे.

**गौतम**—हे सारथे, त्या मनुष्यास प्राप्त झालेली ही स्थिति व्यक्तिविषयक आहे, अथवा अशी स्थिति प्राप्त होणें, हा प्राणिधर्मच आहे, किंवा कसें,

तें मला सांग; याचें खरें कारण काय आहे तें तूं मला लवकर कथन कर; कारण त्यामुळें मला त्या विषयावर विचार करण्यास बरें पडेल.

**सारथि**—महाराज, हा सृष्टिनियम आहे. प्रत्येक पुरुष, स्त्री, आणि मुलें, या सर्वांना अखेरीस हीच स्थिति प्राप्त होते; तुमचे वडील, तुमचे नातलग आणि आपणसुद्धां, या सर्वांस अखेरीस हीच स्थिति प्राप्त व्हावयाची आहे. या सर्वांनां अखेरीस हीच स्थिति प्राप्त होते. *

सारथ्याचे हे शब्द ऐकून सिद्धार्थ गौतमाच्या मनास मोठा धक्का बसला; त्याच्या मनाची विलक्षण खळबळ उडाली, व 'धिक्कार असो या जन्माला' असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले; आणि त्यानें सारथ्यास राजवाड्याकडे रथ परत फिरविण्यास आज्ञा केली. पुढें पुन्हां दुसऱ्या एका वेळीं तो पूर्वी-प्रमाणेंच रथांत बसून बाहेर फिरण्यास निघाला; त्यावेळीं रस्त्याच्या बाजूस पडलेला एक निराश्रित दुखणेकरी त्याच्या पाहण्यांत आला; तेव्हां त्यानें आपल्या सारथ्यास प्रश्न केलाः—

**गौतमः**–हे सारथे, ज्याचे अस्थि-पंजर मात्र उरले आहेत, व जो स्वतःच्या मल-मूत्रांत लोळत पडलेला असून दुःखातिशयामुळें मोठमोठ्यानें कण्हत राहिला आहे, असा हा कोण आहे ?

**सारथिः**–महाराज, हा एक व्याधिग्रस्त मनुष्य असून सांप्रत त्याच्या दुःखाची परमावधि झाली आहे; त्याचा मृत्युकाळ नजदीक आला आहे; त्याची जगण्याची सर्व आशा आतां नष्ट झाली आहे; व त्यासंबंधीं कोणताही

---

* किं सारथे पुरुष दुर्बल अल्पस्थाम उच्छुष्कमांसरुधिरत्वचस्नायुनद्धः ॥
श्वेतशिरो विरलदन्त कृशाङ्गरूप आलंबदण्डव्रजरेह सुखं स्वलन्त ॥
एषो हि देव पुरुषो ज्वराभिभूतः, क्षीणेंद्रियः सुदुःखितो बलवीर्यहीनः ॥
बन्धुजनेन परिभूत अनाथकार्यः कार्य्यासमर्थ अपविद्धवनेव दारु ॥
कुलधर्म एष अयमस्य हितं भला हि अथवाऽपि सर्व्वजगतोऽस्य इत्थं ह्यवस्था॥
शीघ्रं भणाहि वचनं यथाभूतमेतच्छ्रुत्वा तमर्थमिह योनिसचिन्तयिष्ये ॥
नैतस्य देवकुलधर्म्म राष्ट्रधर्मः सर्व्वे जगस्य जरयौवनं धर्षयन्ति ॥
तुभ्यमपि मातृपितृबांधव ज्ञातिसङ्गो जरया अमुक्तं नहि अन्यगतिर्जनस्य ॥

इलाज बाकी राहिला नसून आतां अल्पावकाशांतच तो मृत्यूच्या आधीन होणार आहे.×

सारथ्याचें याप्रमाणें भाषण ऐकल्यावर त्या दिवशींही पूर्वीप्रमाणेंच सिद्धार्थ गौतम यानें त्यास राजवाड्याकडे आपला रथ परत नेण्याची आज्ञा केली. तथापि या प्रसंगीं त्याच्या मनाची पहिल्यापेक्षांही अधिक खळबळ उडून गेली; व तो विचारमग्न होऊन दुःखानें अतीशय व्याप्त झाला. त्यानंतर कांहीं काळानें तो पुन्हांही पूर्वीप्रमाणेंच फिरण्यास निघाला असतां एक प्रेत त्याच्या नजरेस पडलें; तेव्हां त्यानें सारथ्यास विचारिलें:—

**गौतमः**—हे सारथे, हें काय चाललें आहे ? हे लोक एका माणसास खाटल्यावर ( अथवा तिरडीवर ) ठेवून कां नेत आहेत ? त्याच्या पाटीमागून ज्यांचे केश अस्ताव्यस्त झाले आहेत असे हे लोक कां चालले आहेत ? आणि ते चालतांना छाती पिटून आक्रोश कां करीत आहेत ?

**सारथिः**—महाराज, हा मनुष्य मृत्यु पावला आहे; इतःपर तो आपल्या वडील मनुष्यांस स्त्री व मुलेंबाळें यांस व इष्ट मित्रांस पाहूं शकणार नाहीं; तो या जगांतून कायमचाच चालला आहे !

सारथ्याचें हें अत्यंत करुणास्पद व हृदयाला घरे पाडणारे मृत्यूसंबंधाचे शब्द ऐकून गौतमाचें कोमल अंतःकरण अत्यंत विव्हल झालें, आणि तो मोठ्या दुःखानें म्हणाला:—" ज्या तारुण्याचा शेवट वार्धक्यावस्थेंत होतो त्या तारुण्यास धिक्कार असो ! ज्या आरोग्यास असंख्य रोग जडतात त्या आरोग्यास धिक्कार असो !! आणि ह्या गोष्टी समजून जो ज्ञाता पुरुष विलासांत मग्न होऊन राहतो त्यालाही धिक्कार असो !!†

---

× किं सारथे पुरुषरूपविवर्णगात्रः सर्व्वेन्द्रियैर्हि विकलो गुरु प्रश्वसन्तः ॥
सर्वांगशुष्क उदारकुल प्राप्तकृच्छ्रा मूत्रे पुरीष स्वकि तिष्ठति कुत्सनीये ॥
एषो हि देव पुरुषः परमं गिलानो व्यधिभयमुपगतो मरणान्तप्राप्तः ॥
आरोग्यतेजरहितो बलविप्रहीनो ह्यत्राणविप्रशरणो ह्यपरायणश्च ॥

† किं सारथे पुरुष मञ्चोपरि गृहितो उद्धृत केशनखपांशु शिरे क्षिपन्ति ॥
परिचारयित्वा विहरस्तुव स्ताडयन्तो नानाविलापवचनानि उदीरयन्तः ॥
एषो हि देव पुरुषो मृत्यु जम्बुद्वीपे न हि भूयो मातृ पितृ द्रक्ष्यति पुत्र दारन्॥
अपहाय भोगगृह मातृ मित्र ज्ञातिसङ्घ परलोक प्राप्तु नहि द्रक्ष्यति भूय ज्ञातिम्॥
धिग् यौवनेन जरया मम भिद्रुतेन आरोग्य धिग्विविधव्या धिपराहतेन ॥
धिग् जीवितेन पुरुषो न चिवस्ति तेन। धिक् पंडितस्य पुरुषस्य रतिप्रसंगैः ॥

अशा रीतीनें सिद्धार्थ गौतम यास विरक्ति उत्पन्न होऊन संसार व सुखोपभोग यांवरून त्याचें मन उडून गेलें; आपल्या जन्माचें कसें सार्थक होईल, व आपल्या मनास अढळ शांतता केव्हां मिळेल, अशी त्याच्या मनास विवंचना लागून गेली; आणि यांशिवाय इतर कोणत्याही बाबतींत त्याचें मन रममाण होईनासें झालें. याच सुमारास त्याची प्रिय पत्नी यशोधरा हिजपासून त्यास एक पुत्ररत्न झालें. त्या वेळीं राजा शुद्धोदन यानें आपल्या नातवाच्या जन्मप्रीत्यर्थ मोठ्या आनंदानें उत्सव-समारंभ केले; परंतु त्यामुळें ही गौतमाच्या मनांत उत्पन्न झालेली विरक्ति ढळली नाहीं; अखेरीस आपल्या मनाचा पूर्ण निर्धार करून त्यानें वैराग्याश्रम घेण्याचें निश्चित केलें, व राजवाड्यांतून-आणि राजधानींतूनही-निघून जाण्यापूर्वीं आपल्या पत्नीची भेट घेण्याकरितां तो अंत:पुरांत गेला; तेव्हां, निद्रेंत असलेली आपली प्रिय व सौंदर्यसंपन्न स्त्री, व नुकताच जन्मास आलेला सुंदर पुत्र, हीं एकदम त्याच्या दृष्टीस पडलीं. त्याबरोबर प्रेमानें थरारून जाऊन त्यास पुन्हां मोह उत्पन्न झाला, व जागच्याजागींच तो घुटमळत राहिला; परंतु क्षणार्धांतच हें मोहपटल झुगारून देऊन तो आपल्या प्रिय पत्नीची भेटही न घेतां तसाच बाहेर आला, व एका सारथ्याच्या साह्यानें राजधानींतून बाहेर निघून गेला. बराच दूर गेल्यावर त्यानें आपल्या अंगावरील राजभूषणें व घोडा सारथ्याच्या स्वाधीन करून त्यास राजधानीस परत जाण्याची आज्ञा केली, व तो तसाच पुढें चालता झाला. मार्ग क्रमीत असतां त्यानें आपल्या अंगावरील मौल्यवान् कपडे एका भिकाऱ्यास देऊन त्याचे कपडे आपण घेतले, व आपल्या डोक्याचे लांब सडक केंस काढून एखाद्या भणंग भिकाऱ्याप्रमाणें तो पुढें गेला. अशा रीतीनें प्रवास करीत तो पहिल्यानें पाटणा प्रांतांत आला; तेथें दोन योगी पुरुषांजवळ त्यानें कांहीं काळ अध्ययन केलें, आणि 'देहाला कष्ट दिल्याशिवाय आत्म्याला कधींही शांतता प्राप्त व्हावयाची नाहीं' असा त्यांनीं उपदेश केल्यामुळें पाटणा-राजगृह येथून तो गया येथें गेला, व तेथील अरण्यांत सतत सहा वर्षें घोर तपश्चर्या करून त्यानें आपला देह क्षीण करून टाकिला; तथापि त्याच्या मनास शांतता प्राप्त झाली नाहीं; तेव्हां तो काशी येथें गेला, आणि त्या ठिकाणीं राहून व उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करून त्यानें बौद्धधर्म संस्थापनेचें कार्य हातीं घेतलें; व त्यानंतर तेथून जवळच असलेल्या प्रसिद्ध मृगारण्यांत जाहीर रीतीनें लोकांस

उपदेश करण्याचा क्रम त्यानें सुरू केला. या काळांत ब्राह्मणवर्ग हा फक्त उच्च वर्णांतील लोकांनांच असा सन्मार्गोपदेश करीत असे; परंतु बुद्धाच्या ह्या नवीन धर्मांत जातिभेदाचा गंध नसून तो सर्वांनां सारखे समजून उपदेश करीत असे; त्यामुळें या धर्माची बहुजन समाजावर छाप बसत चालली, व बौद्धधर्माचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत जाऊन त्याचा अतीशय जलद व जगाच्या अतीशय विस्तृत भागामध्यें प्रसार झाला. सिद्धार्थ गौतम यानें आपुल्या वयाच्या ३६ व्या वर्षापासून उपदेश करण्यास सुरवात केली, व याच वेळेपासून त्यास 'बुद्ध' म्हणजे ज्ञानी, ही संज्ञा प्राप्त झाली. गौतम बुद्ध यानें सतत चाळीस वर्षे आपल्या धर्माचा लोकांस उपदेश केला, व तो ८० वर्षांचा होऊन इ० सना-पूर्वी ४८३ ह्या वर्षी मृत्यु पावला. या धर्माचीं साधारणतः मुख्य चार तत्त्वें असून तीं अहिंसा, भूतदया, मनोनिग्रह व शुद्धाचरण, हीं आहेत; आणि इच्छेचा नाश करून पुनर्जन्म बंद करणें, व निर्वाण अथवा मोक्षपद मिळविणें, हें या धर्माचें साधारणतः आद्य ध्येय ठरलेलें आहे.

याच काळांत, इ० सनापूर्वी ३५० च्या सुमारास प्रसिद्ध वैय्याकरणज्ञ पाणिनी हा निर्माण झाला; व त्यानें 'अष्टाध्यायी' या नांवाचा एक प्रसिद्ध ग्रंथ निर्माण केला; याच काळांत महाभारत, रामायण, व सूत्र ग्रंथ वगैरेंची रचना करण्यांत आली आहे, व महाभारत, वगैरे वरील ग्रंथ अत्यंत अमौल्य, विचारपरिप्लुत व विद्वत्तादर्शक असून आज तागायत त्यांचा श्रेष्ठपणा कायम राहिला असल्याचें निदर्शनास येत आहे.

हिंदुस्थान देशाच्या या काळांतील परदेशीय व्यापारविषयक बाबतीं-संबंधानें म्हणावयाचें म्हणजे, या पूर्वीच्या अति प्राचीन काळापासून या देशाचा इतर देशाशीं चालू असलेला व्यापार या काळांतही तसाच चालू राहिला होता; व इ. सनापूर्वी ६०० च्या सुमारास तो खंबायतच्या आखां-तांतील भडोच वगैरे बंदरांमधून इराणी आखातांतून पुढें युफ्रेतीस नदीच्या मुखाकडे बाबिलोनिया देशाशीं व त्याच्या मार्फत पुढें चालू होता; त्या देशांत या वेळीं अरबी अथवा अरेबियन भाषा चालत होती, म्हणून हिंदुस्था-नांतून त्या देशाशीं व्यापारी दळणवळण ठेवणारे, व त्या देशांत व्यापारा-करितां जाणारे, लोक ती लिपी शिकून हिंदुस्थानांत आले; त्यानतर त्यांनीं तिच्यांत इष्ट ते फेरफार करून हिंदुस्थानांत एक नवीनच 'ब्राह्मी' या

नावाची लिपी तयार केली, व तिचा त्यांनीं प्रथम आपल्या व्यापारी व्यवहारांत उपयोग करण्यास सुरवात करून पुढें ती नेपाळपर्यंत सर्वमान्य झाली. गौतम बुद्ध मृत्यु पावल्यावर त्यास ज्या दगडी पेटींत पुरिलें त्या पेटीवर लिहिलेला लेख या ब्राह्मी भाषेंतील असून तो उपलब्ध लेखांपैकीं पहिला आहे; व अशोकाच्या आज्ञाही याच लिपींत खोदलेल्या व लिहिलेल्या आहेत. सारांश, अलीकडील शोधाप्रमाणें म्हणावयाचें म्हणजे 'ब्राह्मी' हीच हिंदुस्थानांतील पहिली लिपी असून त्यानंतर, अथवा तिच्यापासून इतर निरनिराळ्या लिपी उत्पन्न झाल्या आहेत.

मौर्य कुलोत्पन्न राजा अशोक यानें बौद्ध धर्माचा स्वीकार केला, म्हणजे बौद्ध धर्माप्रमाणें जातिभेद नाहीं या मताचा त्यानें स्वीकार केला. तथापि ह्यापूर्वींच या गोष्टींचा उपक्रम त्याचा अत्यंत प्रतापशाली पितामह चंद्रगुप्त यानें केलेला आहे; याच चंद्रगुप्तावर इसवी सनापूर्वी ३०५ या वर्षीं सीरिया देशाचा राजा सेल्यूकस निकेटर यानें स्वारी केली होती, परंतु तिजमध्यें त्याचा पूर्ण पराभव होऊन त्यास माघार घेणें भाग पडलें. इतकेंच नव्हे तर त्याला, आपल्या प्रांतांपैकीं पारोपसी नदी, आरिया, व आराचेशिया, हे प्रांत चंद्रगुप्त यास द्यावे लागले; ह्याशिवाय, त्यानें चंद्रगुप्ताबरोबर आपल्या मुलीचें लग्नही लावून दिलें. ( इ. सनापूर्वी ३८३ Ancient India as described by verious Greek Writers by Mc. Crindle ) ह्या प्रांताच्या, काबूल, हिरात व कंदाहार, ह्या अनुक्रमें राजधान्या होत्या. या चंद्रगुप्तासंबंधानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, हिंदुराजानें युरोपियन ( ग्रीक ) राजकन्येशीं विवाह केल्याचें हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण आहे.

चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार अथवा अमित्रघात हा इ० सनापूर्वी २७२ या वर्षीं मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा अशोकवर्धन ऊर्फ अशोक हा गादीवर आला; या राज्यकर्त्यानें सतत ४१ वर्षेंपर्यंत राज्य केलें. अशोक हा मोठा दयाळू, कोमल मनाचा व प्रजावत्सल राज्यकर्ता होता. इ० सनापूर्वी १६१ या वर्षीं कलिंग येथील राज्यकर्त्याबरोबर झालेल्या भयंकर युद्धांत अतीशय मानवी संहार झाल्यामुळें त्याच्या मनास विशेष दुःख झालें, आणि त्यानें पुढें आपल्या तेराव्या शिलालेखांत असें लिहून ठेविलें कीं, " दुसऱ्याशीं युद्ध करून

आपल्या राज्याचा विस्तार करावा, हें राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे, हा समज माझ्या वंशजांनीं आपल्या मनांतून समूळ काढून टाकावा; कारण राज्यकर्त्यांचा मुख्य विजय ह्मणजे धर्मानें आचरण करणें हा होय." अशोक हा स्वतः राज्यकारभार पहात असून त्याच्याइतकें काम करणारा राजा क्वचित्च आढळेल; तथापि तो इतका उद्योगनिष्ठ होता कीं, इतकें काम करूनही, त्याला आपण फारसें काम करीत नाहीं असें वाटत असे; आणि "माझ्या हातून व्हावें तितकें काम होत नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें; जगाच्या कल्याणाकरितां मला काम केलेंच पाहिजे;" असें तो नेहमीं ह्मणत असे; हा पुण्यश्लोक राजा इ० सनापूर्वी २३१ ह्या वर्षी मृत्यु पावला; या राज्यकर्त्यानें राज्यकारभाराची जी उत्तम शिस्त आंखून काढिली ती त्याचा नातू दशरथ ह्याच्या काळापर्यंत तशीच चालत आली; परंतु त्यानंतर सर्वत्र अव्यवस्था होण्यास प्रारंभ झाला, आणि शेवटीं त्याचा सहावा वंशज बृहद्रथ यास त्याचा सेनापति पुष्यमित्र यानें पदभ्रष्ट करून आपण मगध देशाची गादी बळकविली; ( इ० स० पूर्वी-१८४ ) त्यानंतर पदभ्रष्ट झालेला बृहद्रथ मगध प्रांतांतून निघून राजपुतान्या-पैकीं मेवाड प्रांतीं आला, व त्या प्रदेशांतील धार व चितोड हीं शहरें काबीज करून तेथें त्यानें आपल्या राज्याची स्थापना केली; ह्या ठिकाणीं त्याचे वंशज इ० सन ७३० पर्यंत राज्य करीत होते; अशा रीतीनें, वर लिहिल्याप्रमाणें मगध देशांतील मौर्य वंशाचा नाश होऊन, पुष्यमित्रानें ( इ० सनापूर्वी १८४ या वर्षी ) आपल्या सुंग अथवा शुंग घराण्याची स्थापना केली.

पुष्यमित्र हा गादीवर आल्यावर त्यानें आपला मुलगा अग्निमित्र यास नर्मदा नदीकडील प्रांताचा प्रतिनिधि नेमिलें; याची राजधानी विदिशा म्हणजे हल्लींचें भिलसा ( हें ठिकाण शिंद्याच्या राज्यांत आहे. ) हें शहर होतें. या ठिकाणीं व आसपास बौद्ध काळांतील बरीच कोरींवलेणी असून, तेथून जवळच असलेला सांची येथील स्तूप हल्लींही कायम आहे; या पुष्यमित्राच्या कारकीर्दीत ब्राह्मणधर्म जोरांत येऊन बौद्ध धर्माचें प्राबल्य कमी झालें; इतकेंच नाहीं तर तो बौद्ध धर्माचा द्वेष्टा असल्यामुळें त्या धर्मियांचा त्यानें छळ केला; त्यामुळें त्याच्या संबंधीं अतीशय अप्रीति उत्पन्न होऊन फक्त अयोध्या व बहार या प्रांतावरच काय ती त्याची सत्ता शिल्लक राहिली. या वेळीं हल्लींचा ओढ्या अथवा ओढिया प्रांत व उत्तर व दक्षिण सरकार हे प्रांत

मिळून ' कलिंग ' या नांवाचा एक देश असून तेथें खरवेल या नांवाचा एक जैन धर्माचा पुरस्कर्ता असलेला राजा राज्य करीत होता; आणि पुष्यमित्राचा मुलगा अग्निमित्र हा ज्या पश्चिम माळवा प्रांताचा कारभार पहात होता, त्याला लागूनच दक्षिण विदर्भ व आंध्र राज्य होतें; व तेथें याज्ञसेन शतकर्णी या नांवाचा एक राजा राज्य करीत होता; या राज्यकर्त्याची व अग्निमित्राची कांहीं कारणावरून लढाई जुंपली; त्या वेळीं कलिंगाधिपति खरवेल हा शतकर्णी याच्या मदतीस गेला; तथापि अग्निमित्रानें या उभयतांचाही पराभव करून त्यांना माघार घेणें भाग पाडिलें. कलिंग देश हा या वेळीं पुष्यमित्राच्या सार्वभौम सत्तेखालीं होता; त्यामुळें खरवेल यानें आपल्या मुलाविरुद्ध शतकर्णी यांस मदत केल्याबद्दल पुष्यमित्रास राग येऊन त्यानें खरवेल याजवर स्वारी केली; परंतु तींत त्याचा पूर्ण पराजय होऊन त्यास कलिंग देशाचें स्वातंत्र्य मान्य करावें लागलें, व पुष्यमित्राची तिकडील सार्वभौम सत्ताही नाहींशी होऊन त्याचें राज्य पुष्कळ प्रमाणांत दुबळें व कमजोर झालें. हिंदुस्थानांत वैभवसंपन्न, बलिष्ठ व जोरदार असें मौर्य साम्राज्य जोंपर्यंत जिवंत स्थितींत होतें, तोंपर्यंत मध्य आशियांतून या देशांवर होणाऱ्या स्वाऱ्यांना पूर्णपणें आळा बसला होता; परंतु तें साम्राज्य नष्ट झाल्यावर मध्य आशियांतून परकीय लोकांच्या टोळ्या, वसाहती अथवा लूटफाट करण्याकरितां, या देशांत वारंवार येण्यास सुरवात झाली. इ. सनापूर्वी तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास पार्थिया व बॅक्ट्रिया, या देशाचे ग्रीक वंशाचे राज्यकर्ते सेल्युकिडीचा अंमल झुगारून देऊन स्वतंत्र झाले, व ते नेहमीं हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर स्वाऱ्या करूं लागले. पुढें इ. सनापूर्वी १८० च्या सुमारास बॅक्ट्रिया येथील राज्यकर्ता डेमोट्रियस यानें अफगाणिस्थान देश आपल्या हस्तगत करून घेतला, व पंजाब प्रांतावर स्वारी करून हिंदुस्थानांतील हा भाग त्यानें आपल्या अमलाखालीं आणिला; परंतु त्याचा प्रतिस्पर्धी युक्रेटिडेस यानें त्याचा पराभव करून अफगाणिस्थान व पंजाब हे दोन्हींही प्रांत आपल्या स्वाधीन करून घेतले. याच काळाच्या सुमारास—म्हणजे इ. सनापूर्वी १५५ ते १५३ या सुमारास-काबूलचा राजा मिनँडर यानें हिंदुस्थानावर स्वारी केली, आणि सिंध प्रांताचा सुभेदार व अग्निमित्राचा मुलगा वसुमित्र याचा पराभव करून त्यानें तो प्रांत आपल्या हस्तगत करून घेतला; व क्रमाक्रमानें गुजराथ व माळवा हे प्रांत

आपल्या राज्यांत सामील करून त्यानें हिंदुस्थानांत 'ग्रीको-बॅक्ट्रियन' राज्य स्थापन केलें. त्यानंतर लवकरच, इ. स. पूर्वी १६० ह्या वर्षी तुर्की लोकांपैकीं 'शक' अथवा 'सीथियन' हे काराकोरामच्या डोंगरांतून सिंधुनदाच्या खोऱ्याच्या मार्गानें हिंदुस्थानांत शिरले; याच शक लोकांची एक टोळी अफगाणिस्थानाकडे वळली, व तिनें पश्चिम अफगाणिस्थान जिंकून तेथें 'शकस्थान' या नांवाचें आपलें एक स्वतंत्र राज्य स्थापन केलें; इकडे हिंदुस्थानांत आलेल्या दुसऱ्या टोळीनें सिंध, गुजराथ व माळवा, हे प्रांत मिॅनडरपासून हिसकावून घेऊन तेथें आपलें राज्य स्थापन केलें. मिॅनडरच्या पराभवानंतर कोणत्याही युरोपियन राष्ट्रानें हिंदुस्थानावर खुष्कीच्या मार्गानें स्वारी करण्याचा प्रयत्न केला नाहीं; इतकेंच नाहीं तर इ. सन १५०२ पर्यंत—म्हणजे वास्कोदिगामा कालिकत येथें येईपर्यंत युरोपियन लोकांपासून हिंदुस्थान देशाला कोणत्याही प्रकारें उपसर्ग पोहोंचला नाहीं.

तथापि राजा पुष्यमित्र हा शूर असून, त्याची सद्दी जोरांत असल्यावेळीं त्यानें अश्वमेध यज्ञ करण्याचें ठरविलें, व आपला मुलगा वसुमित्र याजबरोबर कसलेलें सैन्य देऊन अश्व सोडिला; परंतु मिनॅन्डरच्या यवन सैन्यानें सिंधुनदाच्या तीरावर तो अश्व अटकविला; तेव्हां वसुमित्रानें त्या सैन्याचा पराभव करून तो अश्व सोडवून यशस्वीपणें परत आणिला, व त्यानंतर पुष्यमित्रानें त्या यज्ञाची पूर्तता केली; नंतर लवकरच, म्हणजे इ. सनापूर्वी १४८ यावर्षी तो मृत्यु पावला; व पन्नास वर्षांच्या आंतच हें घराणें मोडकळीस येण्यास प्रारंभ होऊन त्याच्या राज्याचे बाकी राहिलेले निरनिराळे अवयवही स्वतंत्र होण्याच्या मार्गास लागले; पुढें इ. सनापूर्वी ११९ च्या सुमारास सुंग घराण्याचीं सर्व राज्य सूत्रें कण्व अथवा कण्वायन घराण्यांतील ब्राह्मण प्रधान वसुदेव याच्या हातीं गेलीं; पुष्यमित्रानंतर अग्निमित्र वगैरे एकंदर नऊ राजे गादीवर आले, आणि शेवटचा म्हणजे दहावा विषयासक्त राजा देवभूति याचा वसुदेवानें वध करून इ. सनापूर्वी ८२ या वर्षी ह्या सुंग घराण्याचा शेवट केला; व आपल्या कण्वायन उर्फ कण्व वंशाची स्थापना केली.

या कण्व वंशीय पुरुषांच्या हातीं अजमासें पंचावन वर्षें राजसत्ता कशीबशी तगून राहिली होती; वसुदेवानंतर गादीवर आलेले तीन्हीही राजे दुर्बल

होते; त्यांपैकीं शेवटच्यास, आंध्र राजकर्ता शिशुक ( यांस शिमुक, सिमुक किंवा शातवाहन अशींही नांवें आहेत. ) यानें इ. सनापूर्वीं २७ यावर्षीं ठार मारिलें, व आपल्या आंध्रवंशाचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें.

अफगाणिस्थान देशाच्या पश्चिम भागांत शक लोकांनीं आपलें राज्य स्थापन करून त्यास 'शकस्थान' हें नांव दिल्याचा वर उल्लेख आलेला आहेच; हे शक लोक जरी हिंदुस्थानांतील त्यांच्या दुसऱ्या शाखेपासून इतक्या दूरवर स्थाईक झाले होते, तरी त्यानीं हिंदुस्थानांतील शक लोकांशीं असलेला आपला पूर्वसंबंध कायम ठेविला होता. या शक लोकांच्या राज्यास लागूनच पार्थियन राज्य असून तेथें यावेळीं आर्सासेस थियॉस या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें इ. सनापूर्वीं ६० च्या सुमारास शकस्थानावर स्वारी केली, तेव्हां हिंदुस्थानांत माळवा प्रांतीं असलेली आपली फौज शक लोकांनीं तिकडे युद्धा-करितां पाठविली. यावेळीं माळवा प्रांतांत 'मालव' या नांवाचें एक बलिष्ठ क्षत्रिय घराणें अस्तित्वांत होतें; या घराण्यानें शक लोकांबरोबर युद्ध करण्याची तयारी केली, आणि पंजाब प्रांतांतील मुलतान शहरानजीक करार येथें त्यांच्याशीं मोठें निकराचें युद्ध करून त्यांचा पराभव केला; ( इ. स. पूर्वीं ५७ ह्या वर्षाच्या सुमारास ) व या गोष्टीच्या स्मरणार्थ त्यांनीं या वेळेपासून 'संवत्' या नांवाची वर्ष गणना सुरू केली.

इ० सनापूर्वीं १३० च्या सुमारास शक लोकांस, यु–एची उर्फ 'युच्ची' या नांवाच्या दुसऱ्या एका शाखेनें पूर्व तुर्कस्थानांतून हांकलून दिलें, तेव्हां ते पश्चिम तुर्कस्थानात येऊन आक्सस नदीच्या दोन्हीं तीरांवर वस्ती करून राहिले. या युच्ची लोकात पांच पोट जाती होत्या; त्यापैकीं 'कुशान' या पोट जातींतील–अथवा वंशांतील–पहिला व दुसरा कडफिसेस ( कदफिसीज ) हे दोन, प्रसिद्ध राज्यकर्ते होऊन गेले; त्यांपैकीं पहिला कडफिसेस हा राजा झाल्यावर ( इ. सन. १५ ) त्यानें अफगाणिस्थान व बुखारा हे प्रांत आपल्या ताब्यांत आणिले, व सिंधु नदीपर्यंतचा प्रदेशही आक्रमण केला; हा राज्यकर्ता शूर असून तो ८० वर्षांचा होऊन मृत्यु पावला. त्यानंतर त्याचा मुलगा दुसरा कडफिसेस हा–ई. सन ४५ या वर्षीं गादीवर आला. हा राज्यकर्ता विशेष धाडशी, महत्त्वाकांक्षी व शूर असून त्यानें आपल्या पांची पोट जातींचें ऐक्य घडवून आणिलें; इंडो-पार्थियन राज्यें साफ बुडवून टाकिलीं, व त्याऐवजीं

आपला कुशान वंश प्रस्थापित केला; या राज्यकर्त्याच्या वेळेपासून हिंदुस्थान व रोम ( इताली ) या देशांमधील व्यापारी दळणवळण वाढत गेलें; हिंदुस्थानांतून रेशीम, लवंगा, वेलदोडे, हिरे, माणकें व निरनिराळे रंग वगैरे जिन्नस मोठ्या प्रमाणांत तिकडे रवाना होऊं लागले, व त्याऐवजीं तिकडून हिंदुस्थानांत सोनें येऊं लागलें. या राजानें रोमन बादशहा ट्रेजन याच्या दरबारीं--आपल्या विजयाची व वंश स्थापनेची हकीकत कळविण्याकरितां--एक वकीलमंडळ पाठविलें होतें, आणि पूर्वेस काशी आणि अफगाणिस्थानापासून तो थेट हिंदुकुश पर्वतापर्यंत, व सिंध, पंजाब, वगैरे प्रांतासह थेट हिमालय पर्वतापर्यंतचा, सर्व प्रदेश त्यानें आपल्या अमलाखालीं आणून तो पुष्कळच बलाढ्य व वैभवसंपन्न बनून गेला होता; हा राज्यकर्ता इ. सन १२५ या वर्षीं मृत्यु पावला, व त्यानंतर त्याचा दूरचा नातलग आणि वजेष्य अथवा वजेष्क याचा मुलगा कनिष्क हा गादीवर आला. या राजानें उत्तर हिंदुस्थानांत थेट मथुरेपर्यंतच्या प्रदेशावर आपला अंमल बसविला, आणि काश्मीर प्रांत जिंकून कनिष्कपूर या नांवाचें एक शहर वसविलें; हा राज्यकर्ता मोठा शूर असून याच्या कारकीर्दींत कुशान राज्याचा अतीशय उत्कर्ष झाला. शिवाय त्यानें मौर्य राजघराण्यांतील राज्यकर्त्यांप्रमाणेंच बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्यास आश्रय दिला, त्यामुळें बौद्ध धर्म पुन्हां जोरांत आला; त्याच्या प्रारंभींच्या नाण्यांवर सूर्यचंद्राचीं चित्रें असून त्यावरील अक्षरें ग्रीक भाषेंत लिहिलेलीं होतीं; परंतु पुढें त्यानें बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर बुद्धाचें चित्र असलेलीं नाणीं पाडिलीं. तथापि तो हिंदु देवतांचीही पूजा करीत असे; कनिष्कानें आपल्या कारकीर्दीमध्यें एक महान् बौद्ध धर्म परिषद् भरवून अश्वघोष करविला. या परिषदेचा अध्यक्ष वसुमित्र हा असून, कनिष्कानें पाटलीपुत्र नगरावर चढाई करून त्या ठिकाणाहून परत फिरतांना आपणाबरोबर आणिलेला विद्वान् भिक्षु अश्वघोष हा तिचा उपाध्यक्ष होता. या ठिकाणीं अजमासें पांचशें बौद्ध धर्मानुयायी पंडित मंडळी एकत्र झाली होती, व प्राचीन कालापासूनच्या निरनिराळया बौद्ध ग्रंथासंबंधीं उहापोह व विवेचन करण्यांत आलें होतें; या राज्यकर्त्याच्या काळापासून चीन देशांत बौद्धधर्माची स्थापना झाली; व वरील परिषदेंतील वाटाघाटीनंतर जे मोठमोठाले टीका ग्रंथ लिहिण्यांत आले, त्यांतील 'महाविभाषा' या नांवाचा ग्रंथ आजतागायत चिनी भाषेंत उपलब्ध आहे; कनिष्कानें बौद्धधर्मानुयायी जनतेच्या शिक्षणाकरितां एक भव्य विहार

अथवा मठ बांधविला होता; त्याप्रमाणेंच त्यानें एक प्रचंड तेरा मजल्यांचा बुद्ध मनोरा उभारिला होता. त्याची उंची अजमासें चारशें फूट असून त्याच्या माथ्यावर एक लोखंडी मेघडंबरी होती, व त्याच्या शेजारीं एक मोठा विहार तयार केला होता. या कनिष्कानें यार्कंद, काशगर व खोतान या प्रांतांवरही आपला अंमल बसविला असून पुरुषपूर उर्फ पेशावर हें त्याच्या राजधानीचें ठिकाण होतें; कनिष्कानें सतत लढाया करून पुष्कळ प्रदेश हस्तगत केला; व तीन दिशांच्या प्रांतांवर आपला अंमल सुरू केला; तथापि तो विशेष महत्त्वाकांक्षी असल्यामुळें चवथ्या दिशेच्या प्रांतावर स्वारी करून त्या ठिकाणीं आपला अंमल स्थापित करण्याचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. परंतु त्याचें सैन्य बाह्य प्रदेशीं त्यानें चालू ठेविलेल्या युद्धसत्रांत पूर्णपणें गुरफटून गेल्यामुळें अगदीं थकून व त्रासून गेलें होतें, व आपण देशीं केव्हां परत जाऊं, अशाबद्दल फार आतूर झालेलें होतें; त्यामुळें त्याच्या बरोबरील मंडळींनीं एक विचार करून त्यास ठार मारण्याचा बेत केला, व एके दिवशीं तो आजारी असतां त्यांनीं त्याच्या अंगावर रजई टाकून त्याचा कोंडमारा केला, व त्याच स्थितींत एक मनुष्य त्याच्या तोंडावर बसवून त्याचा प्राण नाश करण्यांत आला !!

कनिष्काच्या मृत्यूनंतर ( इ. सना पूर्वीं १५२ च्या सुमारास ) त्याचे दोन मुलगे वशिष्क व हविष्क हे अनुक्रमें गादीवर आले; या उभयतांच्या अमलाखालीं काश्मीर काबूल व मथुरा हे प्रांत असून हविष्कानें काश्मीरमध्यें हुष्कपूर अथवा हल्लींचें हुष्कर हें शहर वसविलें; त्यानें आपल्या कारकीर्दींत नवें नाणें पाडिलें असून त्यावर ग्रीक, इराणी व हिंदु देवतांचीं चित्रें पाडिलीं होतीं; त्यानंतर वसुदेव हा गादीवर आला; परंतु तो पूर्ण हिंदुधर्माभिमानी असून त्यानें पाडिलेल्या नाण्यांवर शिव, नंदी, व त्रिशूल, यांचीं चित्रें काढिलेलीं होतीं; या वसुदेवानंतर कुशान वंशाचें राज्य लवकरच म्हणजे इ० सन २२५ मध्यें—नामशेष झालें.

वरील कुशान वंशातील दुसऱ्या कडफीसनें—इंडो—पार्थियन लोकांचीं राज्यें बुडविण्याचा उपक्रम केला, हो संधि साधून गुजराथ मधील पहिला क्षत्रप नाहपान हा स्वतंत्र झाला, व काठेवाड, गुजराथपासून नाशिकपर्यंतच्या प्रदेशावर त्यानें आपला अंमल बसविला. ( इ. सन ७८. ) नाहपानाच्या मृत्यूनंतर त्याचा जांवई उषवदात हा गादीवर आला; हा मोठा उदार व धर्मशील

असून दानधर्माबद्दल त्याची पुष्कळ ख्याति आहे; व त्यानें अबूच्या पहाडा जवळील वारनस नदीवर व कावेरी आणि तापी नदीवर अप्रतिम घाट बांधल्या-बद्दल तो प्रसिद्ध आहे; त्याप्रमाणेंच शक सत्रपाचें स्वातंत्र्य इ० सन ७८ पासून सुरू झालेलें असल्यामुळें या गोष्टीच्या स्मरणार्थ या वर्षापासूनच 'शक' या नांवाची वर्ष गणना चालू करण्यांत आलेली आहे; त्यानंतर चस्थान अथवा चष्टन हा गादीवर आला; तो बराच शूर असून त्यानें मालव लोकांस नामोहरम केलें; नंतर जयदामा व रुद्रदामा हे अनुक्रमें गादीवर आले; त्यांपैकीं रुद्र-दामा हा विशेष शूर असून त्यानें दक्षिणेकडील शातकर्णी राजाचा व यौधेय या नांवाच्या एका शूर जातीचा पराभव केला, व बऱ्याच प्रमाणांत आपल्या घराण्याचें वैभव वाढविलें; शिवाय हा बराच प्रजादक्ष असून त्यानें गिरनार जवळील 'सुदर्शन' या नांवाच्या तलावाची दुरस्ती केली. हें राज्य एकंदर सव्वीस पिढ्या चालत राहिलें, व सत्तावीसाव्या पुरुषाच्या कारकीर्दीत तें व क्षत्रप वंश नामशेष झाला. इ० सन ३०० च्या सुमारास क्षत्रप घराण्याची सत्ता कमजोर होऊन हैहय वंशज ईश्वरदत्त त्रैकूटक यानें स्वतंत्र राज्य निर्माण केलें; तथापि पांचव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास प्रसिद्ध गुप्त घराण्यानें हे दोन्हींही वंश नाहींसे करून सौराष्ट्र देश आपल्या राज्यांत सामील केला.

मागधीय साम्राज्य नष्ट झाल्यानंतर हिंदुस्थानांत अनेक लहान मोठीं निरनिराळीं राज्यें निर्माण झालीं, त्यांतच तेलगू भाषा बोलणारांचें जें आंध्र राज्य त्याची गणना आहे. हे लोक मूळचे द्राविडी असून मौर्य घराण्यांतील राज्यकर्त्यांच्या कारकीर्दींत—कृष्णा व नर्मदा या दोन महानद्यांमधील व्यापक प्रदेशाच्या पट्ट्यांत—रथीय, सथीय व आंध्र हीं तीन घराणीं राज्य करीत होतीं; त्यांपैकीं रथीय अथवा राष्ट्रीय घराणें पश्चिमेकडील प्रदेशांत म्हणजे महाराष्ट्रांत राज्य करीत होतें; त्यामुळें ह्या प्रदेशास "महाराष्ट्र" हें नांव मिळालें अशी महाराष्ट्र या शब्दाची एक व्युत्पत्ति करण्यांत येते. दुसरें म्हणजे सथीय अथवा सतीय हें घराणें उत्तरेकडील प्रदेशांत राज्य करीत होतें; परंतु तें पुढें महारथीयांत मिसळून जाऊन त्यांची एक भाषा झाली. तथापि आंध्र लोकांचें म्हणजे तेलगू भाषा बोलणारांचें तिसरें राज्य निराळें व स्वतंत्र राहिलें; या घराण्यांतील मूळ पुरुष शिशुक अथवा सिमुक हा असून चंद्रगुप्त मौर्याचे काळांत त्याचें राज्य भरभराटींत होतें; या आंध्र घराण्यानें अशोकाची सार्व-

भौम सत्ता मान्य केली होती. ( इ. स. पूर्वी २२६ ); परंतु त्याच्या मृत्यू-नंतर तें पुन्हां पूर्णपणें स्वतंत्र झाले, आणि त्यांचा दुसरा राजा कृष्ण याच्या कारकीर्दीत त्यांनीं मोठ्या झपाट्यानें आपल्या राज्याचा विस्तार करीत दक्षिण हिंदुस्थानांतील प्रदेश काबीज करून थेट नाशिक शहरापर्यंत आपला अम्मल बसविला; व काठेवाड; कच्छ व सिंध हे प्रांतही आपल्या हस्तगत करून घेतले; परंतु त्यांच्या पश्चिम सरहद्दीवरील शत्रूशीं त्यांना नेहमीं झगडत रहावें लागल्यामुळें काठेवाडासह तीन्हीं प्रांतांवरील त्यांचा अम्मल लवकरच नामशेष झाला. त्यांच्या राजधानीचें ठिकाण कृष्णानदीच्या मुखाशीं असलेलें धरणीकोट या नांवाचें एक शहर होतें;—त्यांची राजधानी कृष्णातीरीं ‘ श्रीकाकूलं ’ हें शहर होतें असाही उल्लेख आढळतो.—राष्ट्रीय घराण्यानें गोदावरी नदीपर्यंतचा प्रदेश हस्तगत केल्यानंतर त्यांच्या राजधानीचें शहर प्रतिष्ठान उर्फ पैठण बनलें; याच ठिकाणीं ‘ सप्तशती ’ या ग्रंथाचा कर्ता व प्रसिद्ध राज्यकर्ता हाल उर्फ शालीवाहन अथवा शातवाहन हा होऊन गेला; व त्यावरूनच या घराण्यांतील पुढील राज्यकर्त्यांना ‘शालीवाहन राजे’ अथवा ‘शातवाहन राजे’ असें म्हणण्याचा प्रघात पडला.

या काळांत कृष्णा नदीचे दक्षिणेकडील तामिली मुलुखांत, पांड्य, चोल, केरळपुत्र व सत्यपुत्र अशीं चार राज्यें होतीं; त्यापैकीं पांड्य राज्य दक्षिण दिशेस असून त्याचा विस्तार दक्षिणोत्तर पदुकोटाईपासून कन्याकुमारीपर्यंत, व पूर्व पश्चिम कारोमांडल किनाऱ्यापासून त्रावणकोर येथें जातांना मार्गांत असणाऱ्या आच्छ-न्कोविल घांटापर्यंत, होता. या राज्याची राजधानी अनुक्रमें कोकाई व मदुरा हीं शहरें होतीं; कोकई हें शहर पूर्वकाळीं एक अत्यंत भरभराटींत असलेलें बंदर होतें; परंतु तेथील खाडींत गाळ सांचल्यामुळें तें निरुपयोगीं होऊन तेथील व्यापार पहिल्यानें कायल व तेथून तुतिकोरीन या ठिकाणांहून होऊं लागला. पांड्य राज्य इ. सन ९९४ च्या सुमारास चोल राजा राजराज याचें मांडलीक बनलें; प्रोफेसर किलहार्न यानें, इ. सन ११०० पासून १५६७ पावेतों सत्रा पांड्य राजांच्या नांवाचा शोध लाविला असून त्यांतील ‘जटावर्म सुंदर’ या नांवाचा राजा ( इ. सन १२५१ ते १२७१ ) बराच शूर होता, असें त्याचें म्हणणें आहे; इ. सन १३१० या वर्षीं मलिक काफूरनें या प्रांतावर स्वारी केल्यानंतर, जरी हें घराणें पूर्णपणें नष्ट झालें नाहीं तरी, तें आपला जीव जग-वूनच कसें बसें पुढें कांहीं काळपर्यंत जिवंत राहिलें होतें.

दुसरें राज्य चोल, हें असून तें पांड्य राज्याच्या मानानें पुष्कळच मोठें होतें. इ. सनापूर्वी चवथ्या शतकांत रचिलेल्या कात्यायनाच्या व्याकरणावरील ग्रंथांत पांड्य व चोल या दोन्हींही राज्यांचा निर्देश केलेला आढळतो. हें राज्य पूर्व किनाऱ्यावर नेलूर या शहरांपासून पदुकोटाई शहरापर्यंत, व पश्चिमेस कूर्ग प्रांताचे सरहद्दीपर्यंत, पसरलेलें असून त्याची राजधानी उरयूर उर्फ त्रिचनापल्ली हें शहर होतें; या राज्यांत परांतक या नावांचा एक पराक्रमी राजा होऊन गेला; त्यानंतर गादीवर आलेला त्याचा मुलगा राजादित्य हा राष्ट्रकूट घराण्यांतील तिसरा कृष्णराजा याच्या बरोबरील युद्धांत मारला गेल्यावर पांच साधारण योग्यतेचे राजे गादीवर आले; परंतु त्यांच्या मागून राजराज देव, राजेंद्र चोलदेव, व राजाधिराज देव हे तीन पराक्रमी व कर्तृत्ववान् राजे गादीवर येऊन त्यांनीं चोल राज्याची अतीशय भरभराट केली. यांपैकीं राजराज देव यानें बहुतेक मद्रास प्रांत, सिलोन व म्हैसूरचा बराच भाग, वेंगीचें पूर्व चालुक्यांचें राज्य व मलबार किनाऱ्यांवरील क्विलोन, व कलिंगचें उत्तर राज्य, हीं आपल्या हस्तगत करून घेतलीं; इतकेंच नाहीं तर आपणांजवळील प्रबळ आरमाराच्या जोरावर त्यानें लखदीव बेटेंही आपल्या ताब्याखालीं आणिलीं; त्यानें तंजावर येथें एक भव्य शिवमंदीर बांधिलें; या मंदिराच्या भिंतींवर त्याच्या विजयाच्या इतिहासाचीं चित्रें खोदिलेलीं आहेत; हें मंदीर हल्लींही अस्तित्वांत असून उत्तम स्थितींत आहे; रामराजा हा स्वतः हिंदुधर्मी असून शिवभक्त होता; तथापि बौद्ध धर्मावर त्याचा कोणत्याही प्रकारें कटाक्ष नसून उलट नागापट्टम येथील बुद्धाच्या मंदिरास त्यानें मोठ्या उदारपणानें अनेक वेळां देणग्या दिल्या होत्या; रामराजा हा इ. सन १०१८ मध्यें मृत्यु पावला व त्याचा शूर व महत्त्वाकांक्षी मुलगा राजेंद्र चोलदेव हा गादीवर आला. त्यानें आपल्या कारकीर्दींत ओरिसा व बंगाल प्रांतापर्यंतचा प्रदेश ताब्यांत आणिला, व ब्रह्मदेशांतील कादारम बंदरांवरही आपलें आरमार पाठविलें; शिवाय लोकोपयोगाकरितां त्यानें सोळा मैल लांबीचा बंधारा बांधून एक प्रचंड तलाव खोदविला व ' गंगैकोंड चोलपूरम् ' या नांवाचें शहर वसवून तेथें आपली राजधानी स्थापन केली; राजेंद्र चोलदेव हा इ. स. १०३५ मध्यें मृत्यु पावला, व त्याचा मुलगा राजाधिराजदेव हा गादीवर आला; त्यानें सतरा वर्षें मोठ्या कर्तृत्वानें राज्यकारभार केला, परंतु इ. सन १०५२ मध्यें म्हैसूर प्रांतांत ' कौप्पम् ' येथें चालुक्य घराण्याशीं

झालेल्या युद्धांत तो मारला गेला; तेव्हां त्याचा भाऊ दुसरा राजेंद्र व नंतर वीर राजेंद्र हा गादीवर आला; हा राज्यकर्ता शूर असून त्यानें चालुक्यांशीं युद्ध करून त्यांचा पराजय केला. त्यानंतर अधि राजेंद्र वगैरे पुरुष गादीवर आले; त्यांपैकीं शेवटचा महत्त्वाचा व नांव घेण्यासारखा तिसरा कुलोत्तुंग हा राजा असून त्यानें इ. सन १२८७ पासून इ. सन १३२७ पर्यंत सतत चाळीस वर्षें राज्य केलें; त्यानंतर मलिक काफूरच्या स्वारीचा परिणाम याही राज्यास मोठ्या अनिष्ट रीतीनें भोगावा लागून तें राज्य निर्बल होत होत पुढें नामशेष होऊन गेलें; विजयानगर हें ठिकाण याच राज्यांत असून, इ० सन १३३५ मध्यें तेथील हिंदू राज्य उदयास येऊन त्या राज्याचा पुढें कांहीं काळपर्यंत अत्यंत उत्कर्ष झाला.

तिसरें, म्हणजे केरळ अथवा केरळपुत्र हें राज्य कोंकणच्या खालीं दक्षिणेस मलबार किनाऱ्यावर असून वंजी अथवा कोचीन जवळचें तिरूकरूर ह्या ठिकाणीं त्या राज्याची प्राचीन राजधानी होती; अशोकाच्या काळापूर्वी 'चेर' या नांवाचें एक राज्य होतें, तेंच हें केरळ राज्य असावें असा तर्क आहे; कारण या राज्याची भाषा, ही चोल व पांड्य या देशाची म्हणजे तामिल ही भाषा नसून, केरळ देशाप्रमाणेंच, मल्याळ, अथवा मल्याळम् ही होती. शिवाय अशोकाच्या लेखांत चेर या नांवाच्या राज्याचा उल्लेख केलेला नसून केरळ व सत्यपुत्र या दोन राज्यांचाच कायतो उल्लेख केलेला आहे;

चवथें म्हणजे सत्यपुत्र हें राज्य होय; केरळ देशाची इ० सन ११२५ पर्यंतची माहिती फारशी उपलब्ध नाहीं; पण या सत्यपुत्र राज्यासंबंधी तर, इतर कोणतीच विश्वसनीय हकीकत उपलब्ध नसून या राज्याचें नांव अशोकाच्या लेखांत मात्र दिलेलें आढळून येतें, व त्यांवरून 'सत्यपुत्र' हें राज्य त्यावेळीं अस्तित्वांत होतें, एवढीच गोष्ट निर्विवादपणें सिद्ध होते.

दक्षिण हिंदुस्थानांतील वर लिहिलेला हा सर्व प्रदेश मोठा सघन व सुधारलेला असून त्यांतील बहुतेक लोक परदेशाशीं व्यापार करीत असत; आणि मुख्यतः इताली व मिसर देशाशीं त्यांचा मोठ्या जोराचा व्यापार चालत असून हिंदुस्थानांतून विशेषतः मिरीं, मोतीं व माणकें—मुख्यतः बेरिल या नांवाचीं उत्तम रत्नें ते तिकडे पाठवीत असत; व त्यासंबंधीं कोईमतूरजवळ पडयूर, कितूरनजीक पुन्याव

व सालेम जिल्ह्यांत बानियंबादी, येथील खाणी अतीशय प्रसिद्ध असत; हे तीन 'म' कार—म्हणजे मिरीं मोतीं व माणकें हीं युरोपखंडांत कोठेंही पैदा होत नसल्यामुळें त्यांनां तिकडे अतीशय मागणी असे, व युरोपांत त्यांची किंमत फार येत असे, हा किफायतीचा व महत्त्वाचा व्यापार मे महिन्यापासून आगस्ट महिन्यापर्यंत, पावसाळयाच्या दिवसांशिवाय इतर आठ महिने, इराणचें आखात व तांबडा समुद्र या मार्गानें मोठ्या जोरानें व सारखा चालू असे; व या व्यापारामुळेंच हिंदुस्थानांतील या भागाचें व रोमचें विशेष दळण वळण जडून गेलेलें असे. इ. स. पूर्वी २० यावर्षी प्रसिद्ध बादशहा ऑगस्टस सीझर हा रोमच्या सिंहासनावर आरूढ झाला, त्यावेळीं तामिली प्रदेशांतून त्याचें अभिनंदन करण्याकरितां एक मंत्रिमंडळ रवाना झालें होतें, असा दाखला आढळतो. शिवाय या प्रदेशांबरोबरील बरील जिनसांच्या व्यापाराचें इतकें महत्त्व असे कीं, इ. स. ४०९ या वर्षी गॉथ लोकांचा सरदार अलॉरिक यानें रोम शहरापासून जी खंडणी मागितली त्यांत तीन हजार रत्तल मिरीं द्यावी, हें एक महत्त्वाचें कलम होतें; त्या प्रमाणेंच व्हेनिस येथील सरदार मॅरिनो सानीटा यानें चवदाव्या शतकांत तामिली प्रदेशांतून चालणाऱ्या या व्यापारासंबंधीं असें लिहिलें आहे, कीं 'मोतीं, जवाहीर व मसाले, यांसारखे लहान आकाराचे पण मोठ्या किंमतीचे व्यापारी जिन्नस इराणी आखातांतील बंदरांतून व तैग्रीस नदींतून वर थेट बसरा येथें रवाना होत असत, व तेथून ते पुढें बगदाद येथें जात असत." या काळांत तामिली मुलुखांत अतीशय सुंदर असें तलम कापड तयार होत असे, आणि रोम येथें. व विशेषतः तेथील दरबारी मंडळींत, त्याचा अतीशय खप होत असे. त्यामुळें या प्रदेशांतील व्यापार इतक्या भरभराटीस आला, कीं, पहिल्या व दुसऱ्या शतकांत कांहीं रोमन व्यापाऱ्यांनीं तामिली प्रदेशांत येऊन तेथें आपल्या वसाहती केल्या; व कांहीं तामिली राजांच्या नौकरींतही राहिले.

तत्कालिन प्रसिद्ध प्रवासी मार्कोपोलो यानें इ० सन १२९२ मध्यें केरळ म्हणजे हल्लींच्या मलबार प्रांतांत प्रवास केला, त्यावेळीं तेथील लोकस्थिति व राहणी यासंबंधीं त्यानें असें लिहिलें आहे कीं, " केरळ प्रांतांतील लोक आपल्या अंगावर एकच वस्त्र घेत असतात; त्यांच्यांत सती जाण्याची चाल असून ते गाईची पूजा करितात; ते घरांतील जमीनी गाईच्या शेणानें सारवितात, व जमीनीवरही बसतात; त्यांच्यांत सुपारी खाण्याची चाल आहे; तिनेवल्ली-

जिल्ह्यातील काईल उर्फ कन्याल हें मोठें सुंदर व विस्तृत बंदर असून पश्चिमे कडून येणारीं सर्व गलबतें या बंदरास येऊन लागतात. इकडील जमीनींत फक्त तांदूळच मुख्यतः उत्पन्न होतो, व हे लोकही इतर धान्य न पिकवितां हेंच धान्य पिकवितात." केरळ प्रांताप्रमाणेंच इतर ठिकाणच्या व्यापारविषयक बाबतींत त्यानें असें लिहिलें आहे कीं, "गुजराथ प्रांतांत सुंठ, मिरीं, नीळ व कापूस हे जिन्नस पैदा होतात, व त्या प्रदेशांत उत्तम हांतऱ्या अथवा सतरंज्याही तयार करण्यांत येतात. त्याप्रमाणेंच मुंबई नजीक ठाणें येथें सोनें, रुपें, तांबें, वगैरे धातू व इतर कांहीं जिन्नस बाहेरून येतात, व कातडीं, कापूस व किंतान वगैरे जिन्नस तेथून बाह्यप्रदेशीं रवाना होतात; आणि यांपैकीं उत्तम जातीचें किंतान तर बाह्यप्रदेशीं पुष्कळच रवाना होतें; प्रसिद्ध इतिहासकार लायल यानेंही हिंदुस्थान देशाचा परदेशाबरोबर चालणारा दांडगा व्यापार व त्याचें अतीशय महत्त्व, आपल्या ग्रन्थांत मान्य केलें असून इतर युरोपियन लेखकांनीं व प्रवाशांनींही, आपल्या लेखांत तशाच आशयाची कबूली दिली आहे; इतकेंच नाहीं तर प्लिनी यानेंही आपल्या "न्याचरल हिस्ट्री" या ग्रंथांत ( इ. सन ७७ च्या सुमारास ) असें लिहिलें आहे कीं; "रोमन साम्राज्यांतून दरसाल हिंदुस्थान व चीन देशांकडे जाणारा सुवर्णप्रवाह दहा कोटी सेस्टर-शियापेक्षां केव्हांही कमी नसे;" आणि हा आंकडा हिंदुस्थान वगैरे देशांत त्यांच्या मालाच्या बदली रोमन साम्राज्यांतून जो माल जात असे, त्याची किंमत सोडून दिलेला आहे. * * शिवाय या बाबतींत आणखी विशेष लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, आपल्या मालाच्या बदल्यांत रोमन साम्राज्यांतून जो माल हिंदुस्थान वगैरे देशांतील व्यापारी मिळवीत त्या मालाची किंमत त्यांस शंभर पटीनें अधिक येत असे. अशा रीतीनें रोमन साम्राज्यांतून सतत बाहेर जात असणाऱ्या सुवर्ण प्रवाहाला उद्देशून प्लिनी यानें असे उपहासदर्शक उद्गार काढिले आहेत कीं, "आमच्या स्त्रियांच्या चोंचल्यांची व आमच्या

---

* * पुस्तक ६ पान १०१; प्रसिद्ध ई. सन १९०६ मध्यें; लिप्झीग एडिशन; ( आवृत्ती ) मेहाफ; वरील आंकड्यांबद्दल एकमत नसून निरनिराळे उल्लेख आढळतात. कांहींच्या मताप्रमाणें ५००×१००००० = पांच कोटी, हा आंकडा असून "इंपीरियल गॅझेटियर" मध्यें साडेपांच कोटी हा आंकडा दिलेला आहे.

छानछोकीची आम्हांस इतकी जबरदस्त किंमत देणें भाग पडत आहे,"‡ शिवाय, या बाबतींत रोम येथील टायबीरियस बादशहानें आपल्या सीनेटला एक पत्र पाठविलें असून त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, "आपला मूळचा साधेपणा आपणांत कसा परत येईल ? आपल्या रोमन लोकांत कपड्यांलत्त्यां-संबंधानें जे नवेनवे चाळे निघाले आहेत ते बंद कशानें होतील ? आणि आपल्या बायकांमध्यें डामडौली चोजल्यांची व विशेषेंकरून हिरे माणिकें, मोतीं, वगैरेंची जी हांव उत्पन्न झाली आहे, तिला कशानें आळा घालितां येईल ? ह्या सर्व चौचालपणाच्या ढंगामुळें आपल्या देशांतील संपत्ति हिंदुस्थानांत जाऊन त्या ऐवजीं आपल्या देशांत नकली पदार्थ येत आहेत; आणि याचा परिणाम असा झाला आहे कीं, आपल्या रोमन चलनी नाण्याची किंमत कमी होऊन शेंवटीं तें कोणीही घेईनासें झालें आहे;"* वरील विवेचनावरून हा प्रदेश किती संपन्न होता, व येथील व्यापारास केवढें महत्व प्राप्त झालें होतें, ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

आंध्रांतील तिसरें राज्य शालिवाहन, हें असून त्या वंशांतील तेरावा पुरुष शतकर्णी गौतमपुत्र हा पराक्रमी असून त्यानें इ. सन १२६ च्या सुमारास गुजराथचा नहपान क्षत्रप याचा पराभव केला; त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पुलुयामी वशिष्टापुत्र हा गादीवर आला. तोही आपल्या बापाप्रमाणेंच मोठा शूर असून त्यानें आपल्या आंध्र राज्याची पुष्कळ भरभराट केली; परंतु त्याच्या मृत्यू-नंतर गादीवर आलेले राज्यकर्ते—यज्ञश्री, चतुरिपन व मधुरिपुत्र हे तीन राज्य-कर्ते—दुर्बळ निघाल्यामुळें इ० सन २५० च्या सुमारास हें घराणें नामशेष झालें, व आंध्र राज्याचे निरनिराळे तुकडे पडले; त्यांनां 'राष्ट्रकूट' असें म्हणत.

---

‡ "धी इंपीरियल गॅझेटियर" मध्यें दहा कोटी पौंडापैकीं हिंदुस्थानच्या वांटणीस साडे पांच कोटी सेस्टरशिया घातले आहेत, व त्याची किंमत ४५८००० (चार लक्ष अठ्ठावन हजार) पौंड धरिली आहे; तथापि एक सेस्टरसियमची किंमत २.१ पासून २.४ पेन्सपर्यंत धरिली जात असल्यामुळें वरील पौंडांची रकम अर्थातच पूर्णपणें बरोबर असावी, असें म्हणतां येत नाहीं.

* "मॉडर्न रिव्ह्यू' ह्या कलकत्ता येथें निघणाऱ्या इंग्रजी मासिक पुस्त-काचा इ. सन १९१३ च्या दिजंबर महिन्याचा अंक, पान ५६७ पहा.

या राष्ट्रकूटांपैकीं कलचुरी घराण्यानें चेदी उर्फ हल्लींचा वऱ्हाड व नागपूर प्रदेशाचा उत्तर भाग, या प्रदेशामध्यें आपलें राज्य स्थापन केलें; दक्षिणेकडील कांहीं भाग कदंब घराण्यानें आपल्या ताब्यांत मिळविला, व बाणवंशी हें आपल्या राजधानीचें ठिकाण करून ते तिकडे स्वतंत्रपणें राज्य करूं लागले; त्याप्रमाणेंच पल्लव या नांवाच्या तिसऱ्या एका शूर व प्रसिद्ध घराण्यानें गोदावरी व कावेरी या दोन नद्यांमधील व्यापक प्रदेश आपल्या हस्तगत करून घेऊन त्यांनीं तिकडे आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें, व मद्रास जवळील 'कांचीपूर' अथवा 'कांजीवरम्' हें शहर आपल्या राजधानीचें ठिकाण केलें. हें घराणें चवथ्या शतकापासून आठव्या शतकापर्यंत विशेष बलिष्ठ व भरभराटींत होतें; पुढें चालुक्य घराण्यांतील राजा आदित्यसेन यानें इ० सन ८८० ते इ० सन ९०७ पर्यंतच्या सत्तावीस वर्षांत पल्लवावर अनेक स्वाऱ्या केल्या, व त्यांच्या वाढत्या सत्तेवर भयंकर आघात करून त्यांचें राज्य नामशेष करून टाकिलें.

या काळांत बौद्धधर्माचीं तत्वें लोकांच्या मनावर अधिक परिणामकारक होऊन तो धर्म व्यापक प्रमाणानें वृद्धिंगत झाला. गौतम बुद्धास ईश्वर मानून त्याच्या साकार प्रतिमा तयार करण्यांत येऊं लागल्या, व त्याबरोबरच दुसऱ्या देवता व दानव यांच्या प्रतिमा निर्माण करण्यांत येऊं लागून बुद्ध देवाचीं मंदिरें चोहोंकडें बांधण्यांत येऊं लागलीं; व त्या मंदिरांतून मोठमोठे उत्सव सुरू होऊन हिंदुधर्माच्या मानानें त्या धर्माची विशेषच महती वाढून गेली.

बौद्धधर्माप्रमाणेंच, या काळांत वैद्यशास्त्राचीही अतीशय भरभराट झाली. प्रसिद्ध औषधी–शास्त्र–वेत्ते चरक व सुश्रुत यांनीं वैद्यशास्त्रावर विशेष उपयुक्त माहितीचे ग्रंथ निर्माण केले; व त्यापैकीं सुश्रुताच्या ग्रंथावर पुढें बौद्धधर्मानुयायी नागार्जुन यानें एक टीकात्मक ग्रंथ लिहिला. त्याप्रमाणेंच इतर कित्येक कला— चित्रकला व शिल्पकला वगैरे–ही या कालांत भरभराटीस आल्या; आणि कारेली ( कारलें ) कान्हेरी दारहट, आणि साची * वगैरे ठिकाणीं नामांकित

---

* सांची हें ठिकाण जी. आय् पी. रेलवेवर एक स्टेशनचें गांव आहे. हें ठिकाण शिंद्यांच्या राज्यांतील भिलसा ह्या शहरापासून दक्षिण दिशेस पांच मैलावर आहे; राजा अशोक यानें पुष्कळ स्तूप बांधिले, त्यापैकीं सांची येथील स्तूप हल्लींही कायम आहे. हें ठिकाण सांचीपासून अजमासें एक मैल-पंधरा मिनिटाच्या रस्त्यावर आहे. या स्तुपाभोंवतीं मोठा भर भक्कम दगडी कठडा

कोरींव लेणी तयार करण्यांत आलीं. इ० सन ३०० पासून हिंदुकालास सुरवात होऊन इ. स. ३२० यावर्षी मगध देशांतील गुप्त घराणें उदयास आलें.

इ. सन २८० च्या सुमारास गुप्त घराण्यानें, मगध देशाची राजसत्ता आपल्या हस्तगत करून घेतली, व पाटलीपुत्र अथवा पाटणा हें शहर आपल्या राजधानीचें ठिकाण केलें. या घराण्यांत चंद्रगुप्त या नांवाचा एक शूर राज्यकर्ता निर्माण झाला; त्यानें लिचावी अथवा लिच्छवी वंशांतील राजकन्या कुमारी देवी हिजबरोबर विवाह केला. बहार, अयोध्या, तिरहुट, व प्रयाग, वगैरे प्रदेशभर आपल्या राज्याचा विस्तार केला, व तो आपणास 'महाराजाधिराज' असें म्हणवून घेऊं लागला; त्यानें आपली राणी कुमारी देवी हिच्या व तिच्या लिचावी घराण्याच्या नांवाचीं नाणीं पाडिलीं, व इ० सन. ३२० या वर्षी ता. २६ फेब्रूवारी रोजीं—त्यानें गुप्त शकाची स्थापना केली.

चंद्रगुप्त हा इ. सन ३३६ या वर्षी मृत्यु पावला व त्याचा अत्यंत पराक्रमी मुलगा समुद्रगुप्त हा गादीवर आला; त्यानें हुगळी नदीच्या पश्चिमेकडील बंगालचा सर्व प्रदेश, गुजराथ प्रांत व थेट नर्मदा नदीपर्यंतचा प्रदेश, मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, पंजाबचा बराच भाग, वगैरे मुलूख आपल्या हस्तगत करून घेऊन हिंदुस्थानांत दुसरें साम्राज्य निर्माण केलें; तो अत्यंत बलाढ्य असा राज्यकर्ता असून त्यानें दक्षिणेंतील अकरा राजांचा व आपल्या राज्याच्या सरहद्दीवरील कित्येक राजेरजवाड्यांचा पराभव केला, ओरिसा या नांवाच्या

---

केलेला आहे, व त्यांतील शिलांवर निरनिराळे लेख कोरिलेले आहेत; येथून जवळच बिसनगर या नांवाचें एक प्रसिद्ध शहर असून तें पूर्ण काळीं अत्यंत भरभराटींत होतें; सांची येथें सांपडलेल्या अजमासें दोनशें शिलालेखांची भाषांतरें झालेलीं आहेत, हा प्रदेश बटवा व बेस या नद्यांच्या पाण्यानें भिजणारा व सुपीक असल्यामुळें बौद्ध धर्मानुयायी भिक्षु वगैरे मंडळी सांची व आसपास स्थाईक होऊन शेतकीचाही धंदा करीत असत. असें निदर्शनास येतें. सांची व त्याच्या आसपासच्या कित्येक मैलांपर्यंतचा प्रदेश, यांमध्यें या धर्माचे अवशेष अजूनही दृग्गोचर होत आहेत; व सांची येथें हल्लींही असलेल्या स्तूपाची योग्य काळजी व निगा ठेवण्यांत येत आहे. सांची व भिलसा हीं ठिकाणें भोपाळच्या पलीकडे व झांसी ग्वाल्हेरच्या अलीकडे असून तीं रेलवे स्टेशनचीं गांवें आहेत.

डोंगराळ प्रांतांतील व्याघ्र राज्यकर्ता व गोदावरी तीरावरील पिष्टपूर येथील राज्यकर्ता यांना आपल्या नियंत्रणाखालीं आणून गंजम प्रांतांतील महेंद्रगिरी आणि कोतर हे डोंगरी किल्ले त्यानें आपल्या स्वाधीन करून घेतले; त्या प्रमाणेंच कोलेर सरोवराच्या कांठावरील मंतराज राजाचा पराभव करून, कृष्णा व गोदावरी ह्या नद्यांच्या मधील प्रांत मिळवून घेऊन, कांची येथील पल्लव राजास आपल्या नियंत्रणाखालीं आणिलें; आणि पश्चिमेकडे स्वारी करून पालक येथील पल्लव वंशीय उग्रसेन राजाचा पराभव केला; त्यानंतर तिकडून परत येतांना तो देवराष्ट्र अथवा महाराष्ट्र देशांवर आला व खानदेशांतील एरंड पल्ल अथवा एरंडोल हा प्रांत त्यानें काबीज केला; त्याप्रमाणेंच राजपुतान्यांतील उत्तर भागांतील, व दक्षिण व वायव्य दिशेकडील, इतर राजेरजवाड्यांवरही त्यानें आपलें महत्त्व प्रस्थापित केलें; थोडक्यांत म्हणजे, साम्राट अशोक याच्याप्रमाणेंच समुद्रगुप्तानेंही आपलें विस्तृत साम्राज्य स्थापन केलें

समुद्रगुप्त यानें, इ० सन ३४० च्या सुमारास, आपलें चक्रवर्तित्व जाहिर करण्याकरितां अश्वमेध यज्ञ केला; असा यज्ञ हिंदुस्थानात पुष्पमित्रानंतर कोणीही केलेला नव्हता. या यज्ञसमारंभाप्रीत्यर्थ समुद्रगुप्तानें नाणीं पाडविलीं होतीं; व त्यांवर होमकुंड, व त्यासमोर अश्व असें चित्र काढिलें होतें; साम्राट अशोक यानें अजमासें सहाशें या वर्षी उभारलेल्या एका स्तंभावर, समुद्रगुप्तानें आपल्या पराक्रमाचें वर्णन खोदून काढविलें असून तो स्तंभ हल्लीं अलाहाबाद उर्फ प्रयाग येथील किल्ल्यांत जतन करून ठेविला आहे. शिवाय हरिषेण कवीनें या साम्राटाच्या कारकीर्दीचें वर्णन केलेलें असून हा साम्राट कवी व गायन-वादन-शास्त्र-विशारद असल्याचाही त्यांत उल्लेख केलेला आहे. हा पराक्रमी साम्राट इ० सन ३७५ या वर्षी मृत्यु पावला, व त्याचा, दत्तदेवी राणीपासून झालेला मुलगा दुसरा चंद्रगुप्त अथवा चंद्रगुप्त विक्रमादित्य-हा सिंहासनारूढ झाला.

दुसरा चंद्रगुप्त हाही आपल्या वडिलांप्रमाणेंच शूर असून त्यानें बंगाल प्रांतावर स्वारी केली, व सौराष्ट्रांतील शक वंशाचा नाश करून तो प्रदेश व माळवा प्रांत आपल्या राज्यांत सामील केला. फॉ—एन, या नांवाचा एक चिनी बौद्ध धर्मानुयायी प्रवासी हिंदुस्थानांत आल्यानंतर त्यानें या गुप्त साम्राज्यांत सहा वर्षे वास्तव्य केलें, आणि त्यांतील तीन वर्षे तर तो खुद्द गुप्त साम्रा-

ज्याच्या पाटलीपुत्र या राजधानींतच राहिला होता; व तेथें असतांना त्यानें तेथील बुद्ध मठांत संस्कृत भाषेचें उत्तम अध्ययन केलें होतें; त्यावेळीं, महायान व हीनयान या दोन बौद्धधर्मीय प्रचाराचे मठ या राजधानींत असून त्या दोन्हींत मिळून अजमासें सातशें भिक्षू वास्तव्य करीत होते; दरवर्षी वैशाख शुद्ध अष्टमीस बुद्धमूर्तीचा एक मोठा समारंभ करण्यांत येत असे, व त्यावेळीं वीस मोठमोठ्या रथांवर बुद्धमूर्ति बसवून निरनिराळीं वाद्यें वाजवीत त्यांची मोठ्या थाटानें नगरांत मिरवणूक काढण्यांत येत असे; फॉ-एन यानें या गुप्त साम्राज्याच्या तत्कालिन स्थितीचें जें मोठें मनोवेधक वर्णन केलें आहे, त्यांत तो म्हणतो:–" समुद्रगुप्ताच्या या साम्राज्यांतील प्रजेची स्थिति भरभराटीची असून, त्यांतील प्रजाजन सुखी, संपत्तिमान् व सद्गुणी आहेत. व राज्यकारभारावरही त्यांचें बरेंच नियंत्रण आहे; ज्याची मर्जी असेल त्यानें साम्राज्यांत रहावें, नसेल त्यांनीं खुशाल इच्छेस वाटेल त्या ठिकाणीं राहण्यास जावें, अशी सर्वांस सरसकट मोकळीक आहे. या साम्राज्यांत बहुतेक अपराधांना दंडाची शिक्षा असून देहांत शिक्षेची व गुन्हेगारास कायद्यानें हाल हाल करून ठार मारण्याची साम्राज्यभर चोहोंकडे सक्त मनाई आहे; तथापि निरढावलेल्या, व वारंवार कायद्याचें उल्लंघन करण्यास संवकलेल्या, गुन्हेगारांना मात्र, त्यांचा उजवा हात तोडण्याची शिक्षा देण्याची वहिवाट आहे; पण असा प्रसंगही क्वचित्च येत असल्याचें निदर्शनास आलें आहे; आणि साम्राज्यांतील प्रवासाचे मार्ग पूर्णपणें निर्भय व सुरक्षित आहेत. " फॉ–एन् यानें या साम्राज्यांतील अंतर्भागांत पुष्कळ प्रवास केला; परंतु त्यास एक वेळांही चोरट्या लोकांकडून उपद्रव पोहोंचला नाहीं; शिवाय या गुप्त साम्राज्यांत कसाईखाने नव्हते, दारू गाळण्याच्या भट्ट्या नव्हत्या, व कोंबडीं. गाई, व डुकरें यांचा प्राणनाशही, मांसाच्या लोभानें कोणीही करीत नव्हते; त्याप्रमाणेंच या साम्राज्यांत कोणीही दारू पीत नाहीं, प्राणिहत्या करीत नाहीं; इतकेंच नाहीं, तर कांदा लसूणही फारसा कोणी खात नाहीं, असें त्यास आढळून आलें होतें; फॉ-एन् हा आणखी असें म्हणतो कीं " या साम्राज्यांत पुष्कळ धर्मसंस्था असून पुष्कळ धर्मशाळाही बांधिलेल्या आहेत, आणि खुद्द राजधानींच्या शहरांत श्रीमंत नागरिकांच्या देणग्यांवर एक धर्मार्थ औषधालयही चालू ठेवण्यांत आलें आहे. "—हिंदुस्थानांतील हें रुग्णालय स्थापन झाल्या नंतर पुढें दोनशें वर्षांनीं सातव्या

शतकांत युरोपांत फ्रान्स देशांतील पारीस येथें अशा प्रकारचें पहिलें ' मॉसोंधू ' यानांवाचें औषधालय स्थापन करण्यांत आलें आहे. म्हणजे अशी धार्मिक संस्था सुरू करण्याचा आद्य मान हिंदुस्थान देशास आहे. ही गोष्ट विशेष महत्त्वाची व लक्षांत ठेवण्यासारखी आहे.-" ह्या रुग्णालयांत निरनिराळ्या प्रकारचे रोग-ग्रस्त व गरीब रोगी व आजारी लोक औषधोपचार करण्याकरितां येतात, व तेथील वैद्यांच्या देखरेखीखालीं त्यांची त्या ठिकाणीं उत्तम सुश्रूषा ठेवण्यांत येते. अशा लोकांपैकीं ज्याला औषध हवें असेल त्याला औषध, व अन्न हवें असेल त्याला अन्न, देण्याची तेथें उत्तम तजवीज ठेविलेली असते; व रोग-ग्रस्तांनां हरएक प्रकारचें स्वास्थ्य लाभावें, म्हणून विशेष काळजी व खबरदारी घेण्यांत येत असते. व कोणत्याही रोगमुक्त झालेल्या मनुष्यास पाहिजे त्यावेळीं रुग्णालय सोडून जाण्याची मोकळीक असते;" शिवाय, फॉ-एनच्या वर्णनावरून असेंही कळून येतें कीं या गुप्त साम्राज्यांतील प्रजा फार सुखी असून तिला आपल्या साम्राज्य सरकाराकडून कोणत्याही प्रकारें त्रास होत नसे, व तें सरकार प्रजेच्या कारभारांत होतां होईल तितका कमी हात घालीत असे; प्रजेनें आपापल्या परीनें उद्योग करून संपन्न व्हावें, अशी राज्यव्यवस्था असे; परगांवीं जातांना परवाना घ्यावा लागत नसे, किंवा आपल्या घराची अथवा घरांतील माणसांची नोंध करावी लागत नसे. सरकारचें उत्पन्न बहुतेक जमीनी-पासून असून सरकारी नोकरांना सरकारांतून पगार मिळत असे; त्यामुळें त्यांच्याकडून रयतेला उपद्रव पोंचत नसे;--यावरून हा राज्यकर्ता किती श्रेष्ठ प्रतीचा होता, व पौर्वात्य दृष्टीनें म्हणा का पाश्चिमात्य दृष्टीनें म्हणा त्याची राज्य-व्यवस्था किती सुधारलेली, व सुव्यवस्थित होती, हें सहज निदर्शनास येतें.

दुसरा चंद्रगुप्त ऊर्फ विक्रमादित्य हा इ० सन ४१३ मध्यें मृत्यू पावला, व त्याचा मुलगा कुमारगुप्त हा गादीवर आला; याची कारकीर्द विशेष मह-त्त्वाची नसून, या वेळेपासून गुप्त-साम्राज्यसत्तेस ओहोटी लागण्यास सुरवात झाली. इ० सन २२६ नंतर—म्हणजे कुशान राज्याच्या नाशानंतर—कुशान लोकांनीं पुन्हां दोनशें वर्षांनीं इ० सन ४३०च्या सुमारास पूर्व अफगाणिस्था-नांमध्यें आपलें राज्य स्थापन केलें, व हळुहळू हिंदुस्थानांतील काश्मीर व पंजाब हे प्रांत आपल्या हस्तगत करून घेऊन आपला राज्यविस्तार, हिंदुस्थानांतील गुप्त साम्राज्याच्या सरहद्दोशीं आणून भिडविला, व त्यावर सारखे हल्ले करून तें

कमजोर करून टाकिलें. या राज्यास ' लघु कुशन ' राज्य असें म्हणतात; या राज्यास लवकरच ' हूण ' या नांवाचे मोंगल जातीचे शत्रू उत्पन्न झाले, व त्यांनीं लघुकुशन लोकांची सत्ता नामशेष केली; यावेळीं त्यांचा पुढारी तोरणमल या नांवाचा एक पराक्रमी पुरुष असून तो आपल्या सैन्यासह थेट माळवा प्रांतात शिरला होता; परंतु त्या ठिकाणीं कुमारगुप्ताचा मुलगा स्कंधगुप्त यानें त्याचा पूर्णपणें पराभव करून त्यास सिंधूनदाच्या पलीकडे हांकलून दिलं. हूण लोकांवर मिळविलेल्या या जयाबद्दल त्यानें एक मोठा स्तंभ उभारिला; व त्याच्या माथ्यांवर विष्णूची मूर्ति बसवून, त्याखालीं ईश्वरकृपेनें या रानटी लोकांच्या तडाक्यांतून आपल्या देशाची कशी सुटका झाली, याबद्दलची हकीकत लिहिली. हा स्तंभ गाझीपूर जिल्ह्यांत काशीच्या पूर्वेस भीतरी या गांवीं त्याच्या माथ्यावरील विष्णुमूर्तिशिवाय अद्यापि तो अस्तित्वांत आहे.

स्कंधगुप्तानंतर त्याचा सावत्र भाऊ पूरगुप्त व त्यानंतर त्याचा मुलगा नरसिंहगुप्त हा गादीवर आला. याच्या कारकीर्दींत तोरणमलचा मुलगा मिहिरगुल यानें आपल्या हूण सैन्यासह पुन्हां हिंदुस्थानावर स्वारी केली, व माळवा प्रांत आपल्या अंमलाखालीं आणिला; परंतु तो मोठा क्रूर, अनियंत्रित, व जुलमी असल्यामुळें लवकरच अप्रिय होऊन त्याचें मध्य हिंदुस्थानचा राजा यशोधर्म अथवा यशोवर्धन याच्याशीं वैर उत्पन्न झालें; आणि मध्य हिंदुस्थानांतील इतर राजेरजवाडे व मगध देशाचा राजा बालादित्य वगैरेंच्या मदतीनें त्यानें मिहिरगुल याचा पश्चिम माळव्यांतील मंदोसर येथें पूर्णपणें पराभव करून त्यास पाडाव केलें, व बालादित्याच्या मध्यस्थीनें त्याचे प्राण वाचून त्याची त्याच्या देशाकडे परत रवानगी करण्यांत आली.

हूण लोकांवरील या महत्त्वाच्या विजयप्राप्तीचें द्योतक म्हणून यशोवर्धन यानें मंदोसर येथें एक स्तूप उभारिला, व त्यावर " मी मिहिरगुल याच्या हाताखालील हूण सैन्याचा पूर्णपणें पराजय केला, इतकेंच नाहीं तर गुप्त साम्राज्याच्या अमलाखालीं जेवढा प्रदेश होता, त्याहून अधिक व्यापक प्रदेशावर मी हल्लीं सार्वभौम सत्ता उपभोगीत आहें " असा लेख लिहून काढविला; या वेळेपासून त्यास "विक्रमादित्य" असें नामाभिधान प्राप्त झालें, व विक्रम संवत् सुरू झाला; ( इ. सन ५३३ ) त्यानंतर त्यानें हळुहळू आपलें वर्चस्व पूर्णपणें

प्रस्थापित केलें, व गुप्तघराणें नामशेष करून त्यांच्या सार्वभौम सत्तेचीं सर्व सूत्रें आपल्या हस्तगत करून घेतलीं.

वरील काळानंतर लवकरच, म्हणजे इ. सन ६०० च्या सुमारास पंजाब मधील ठाणेश्वर येथील राजा प्रभाकरवर्धन हा आपल्या कर्तृत्वानें व पराक्रमानें बराच प्रसिद्धीस आला. त्यास राज्यवर्धन व हर्ष असे दोन मुलगे होते; त्यांपैकीं वडील हर्षवर्धन यास त्यानें मोठी फौज देऊन आपल्या राज्याच्या वायव्य सरहद्दीवरील हूण लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां पाठविलें होतें, व त्यानंतर धाकटा मुलगा हर्ष याचीही तिकडे रवानगी केली होती; मध्यंतरीं हीं मुलें परत येण्याच्या पूर्वींच प्रभाकरवर्धन आजारी होऊन मृत्यु पावला; त्यामुळें राज्यवर्धन परत आल्यावर गादीवर बसला; त्यास राजश्री या नांवाची एक बहीण असून ती कनोजाधिपति ग्रहवर्मा यास दिलेली होती; या ग्रहवर्म्याचें व माळव्याच्या राजाचें वांकडें येऊन त्यानें ग्रहवर्म्यास ठार मारिलें, व राजश्री हीस प्रतिबंधांत ठेविलें; राज्यवर्धन परत आल्यावर त्यास ही हकीकत कळली; तेव्हां आपणाबरोबर दहा हजार घोडेस्वार घेऊन तो आपल्या बहिणीची सुटका करण्याकरितां तिकडे गेला, आणि त्यानें मालवाधिपतीचा पराभवही केला; परंतु त्याचा स्नेही मध्य बंगाल प्रांताचा राजा शशांक यानें विश्वासघातानें त्याला ठार मारिलें; तथापि राजश्री ही प्रतिबंधांतून सुटून विंध्यपर्वतांत गेली, अशी हर्षास बातमी मिळाली; राज्यवर्धन यास पुत्र संतती नव्हती; त्यामुळें, त्याच्या मृत्युनंतर त्याचा धाकटा भाऊ हर्ष हा इ. सन ६०६ यावर्षीं गादीवर आला; त्यानंतर लागलीच त्यानें विंध्य पर्वतांत आपली बहीण राजश्री हिचा पत्ता लावून तिला आपणाबरोबर आपल्या घरीं परत आणिलें. ही स्त्री मोठी विद्वान् असून बौद्ध धर्माच्या संमितत सांप्रदायांत फार निपुण होती; त्याप्रमाणेंच राजकारण-विषयक बाबतींचेंही तिला पुष्कळ ज्ञान होतें; हर्ष राजाची ही विधवा बहीण त्याचेबरोबर प्रसिद्ध चिनी धर्मगुरूंची व्याख्यानें ऐकावयास बसत असे; धार्मिक वादविवादांत भाग घेत असे, इतकेंच नाहीं. तर राज्यकारभाराच्या बाबतींतही ती आपल्या भावास नेहमीं सल्ला मसलत देत असून राजा हर्ष हाही आपल्या बहिणीची या बाबतींत नेहमीं मदत घेत असे; या काळापर्यंत हिंदु स्त्रियांनां मुसलमानाप्रमाणें पडदा नसून, त्यांनां मोकळेपणानें हिंडण्या-फिरण्याचें किती स्वातंत्र्य असे, व या काळांतही विद्वान व राजकारणकुशल

क्रिया निर्माण होऊन त्या गहन अशा धार्मिक बाबतींत व मोठ्या राज्याच्या कारभारांत कसा व किती प्रमुखत्वानें भाग घेत असत, याचें उदाहरण म्हणून ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी असून पूर्व दाखला म्हणून तिचा कारणपरत्वें नामनिर्देश करण्यांत येत असतो.

प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा इ. सन ६३० व इ. सन ६६४ मध्यें हिंदुस्थानांत आला होता; त्याच्या प्रवासवर्णनावरून असें दिसतें कीं, हर्षाच्या कारकीर्दीचा पूर्वकाल युद्धांत गेला व पुढील शांततेचा उत्तर काल धर्मप्रसारांत गेला. त्यानें आपल्या पूर्ववयांत उत्तर हिंदुस्थान व बंगाल प्रांताचा कांहीं भाग आपल्या हस्तगत करून घेतला; परंतु दक्षिणेकडे, चालुक्यवंशीय दुसऱ्या पुलिकेशीच्या कडक बंदोबस्तामुळें तिकडील मोहीमे वरून त्यास माघार घेऊन परत येणें भाग पडलें; ( इ. सव ६२० ) त्यानंतर आनंदपूर, कच्छ, व दक्षिण काठेवाड, या प्रांतांच्या राज्यकर्त्यांनां त्यानें आपल्या नियंत्रणाखालीं आणिलें; इ. सन ६४३ मध्यें त्यानें गंजम प्रांतावर आपली शेवटची स्वारी केली, आणि हिमालय पर्वतापासून नर्मदानदीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला.

राजा हर्ष याचा अजमासें सदतीस वर्षांचा पूर्वकाळ युद्धांत गेला; परंतु त्यानंतरच्या काळापासून धर्माकडे व परलोक साधनांकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति वळली. बौद्ध धर्मांत हीनयान व महायान असे दोन संप्रदाय आहेत; त्यांपैकीं हीनयान हा जुना पंथ असून महायान हा त्यानंतर उत्पन्न झाला आहे; या संबंधींची विस्तृत माहिती डाक्टर केर्न यानें आपल्या " Manual of Indian Budhism " या ग्रंथांत दिलेली असून त्यावरून असें दिसते कीं, गौतमबुद्धाला आत्म्याचें अस्तित्व मान्य नसून मोक्ष म्हणजे निर्वाण होय असें त्याचें मत होतें; आणि मनुष्यानें सर्व संसार सोडून अरण्यांत जाऊन राहणें व पूर्ण कर्म संन्यास करणें, हें या धर्माचें ध्येय आहे असें त्याचें म्हणणें होतें. तथापि गौतम बुद्धाच्या मृत्यूनंतर त्याच्या अनुयायांमधील कांहींना हें तत्त्व पसंत न पडून त्यांनीं भक्तिधर्माचा—म्हणजे भक्तिमार्गाचा, अनुवाद करण्यास सुरवात केली, आणि वैदिक धर्माप्रमाणें विभूती पूजा करण्याचा ते उपदेश करूं लागले; मनुष्यानें कर्मसंन्यास न करितां कर्में करीत रहावें, लोकांवर उपकार करावे, व त्यांच्या उपयोगीं पडत रहावें, या मताचा प्रसार करण्यास त्यांनीं सुरवात केली;

या नव्या पंथाचा उत्पादक 'नागसेन' हा असावा अशी समजूत असून त्यास महायान व मूळच्यास हीनयान पंथ, अशी संज्ञा प्राप्त झाली. राजा हर्ष हा पहिल्यानें हीनयान सांप्रदायाचा होता; परंतु पुढें तो महायान सांप्रदायी बनला; व प्राणिहिंसा बंद करण्याकरितां व लोककल्याण साधण्याकरितां त्यानें निरनिराळया प्रकारानें अश्रांत परिश्रम घेतले. प्राणिहिंसेचे गुन्ह्यास देहांत शिक्षा करण्याचा त्यानें निर्बंध घातला, व सम्राट अशोकाप्रमाणें आपल्या सर्व राज्यांत प्रवाशांकरितां धर्मशाळा, व गरीब लोकांकरितां आश्रयस्थानें बांधून रोगी व अजारी लोकांकरितां शहरोंशहरीं व खेडोखेडीं औषधालयें स्थापन केलीं; व तेथें वैद्यांची व औषधपाण्याची मोठया उदारपणानें उत्तम व्यवस्था ठेविली; त्याप्रमाणेंच ठिकठिकाणीं हिंदू व बौद्ध लोकांच्या पुष्कळ व निरनिराळ्या धार्मिक संस्था निर्माण करून त्यांनाही त्यानें मोठ्या सढळ हातानें उत्तेजन दिलें; या काळांत परस्पर तीव्र द्वेष अथवा मत्सर फारसा आढळून येत नसे; तथापि क्वचित्प्रसंगीं धर्मद्वेषमूलक गोष्टी घडत असून त्यासंबंधींची एक गोष्ट ह्यूएनत्संग यानें आपल्या प्रवासवृत्तांत लिहिली आहे ती अशी कीं, "मध्य बंगाल प्रांताचा राजा शशांक हा बौद्धधर्मद्वेषी असून त्यानें बुद्धगया येथील बोधिवृक्ष खणून जाळून टाकिला; ( तथापि पुढें कांहीं दिवसांनीं मगध देशाचा राजा पूर्णवर्मा यानें नवा बोधिवृक्ष पुन्हा लाविला असा उल्लेख आढळतो. ) पाटलीपुत्र शहरांतील बुद्धाच्या पाषाणाच्या पादुका फोडून टाकिल्या, आणि तेथील मठांचा नाश करून यतींना हांकलून दिलें; परंतु राजा हर्ष हा हिंदु, बौद्ध, व जैनधर्मियांना समसमान वागवीत असे, व त्या सर्वांच्या धर्मसंस्थांचा सारख्या रीतीनें उदारपणानें प्रतिपाळ करीत असे इतकेंच नाहीं तर खुद्द त्याच्या कुटुंबांतही कांहीं माणसें बौद्धधर्मी, कांहीं सूर्योपासक, व कांहीं शिवभक्त, होतीं; आणि कोणत्याही प्रकारचा धार्मिक मतभेद लक्षांत न घेता तो सर्वांना मोठ्या प्रेमानें व समान दृष्टीनें वागवीत होता; तथापि त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं बौद्धधर्मीय लोकांनां व संस्थानांच त्याच्याकडून विशेष उत्तेजन मिळत असे, असें निदर्शनास येतें.

या प्रसिद्ध राज्यकर्त्यानें गंगा व यमुना या नद्यांच्या संगमावरील अलाहाबाद उर्फ 'प्रयाग' या क्षेत्रांत इ० सन ६४४ मध्यें एक धार्मिक महोत्सव केला; त्यावेळीं ह्यूएनत्संग हा तेथें हजर असून त्यानें वर्णन केलेल्या हकीगतीवरून तत्कालीन सुबत्तेची व सांपत्तिक सुस्थितीची योग्य कल्पना करितां येते. राजा

हर्ष हा आपल्या पूर्वजांच्या सांप्रदायाप्रमाणें अशा प्रकारचे महोत्सव सतत तीस वर्षे करीत आला होता; ते दर पांच वर्षांनीं एक वेळां होत असत, आणि त्यावेळीं दर गेल्या पांच वर्षांत सरकारी खजिन्यांत जमा झालेली सर्व संपत्ति गोरगरीब, याचक, व यति, भिक्षूक व संन्यासीवर्ग, यांच्यामध्यें वांटण्यांत येत असे. या उत्सावाच्या प्रसंगीं त्याच्या राज्यातील निरनिराळया भागांतून पुष्कळ जनसमूह त्या ठिकाणीं एकत्र होत असे, व त्याची संख्या पांच लाखपर्यंतही जात असे. हा महोत्सव ६४–६५ दिवस चालत असे; त्यांत पहिल्या दिवशीं बुद्ध, दुसऱ्या दिवशीं सूर्य, व तिसऱ्या दिवशीं शिव यांच्या नांवानें देणग्या वांटण्यांत येत असत; चवथ्या दिवशीं दहा हजार बुद्ध भिक्षूंस प्रत्येकीं सोन्याच्या शंभर मोहोरा, एक मोतीं व एक वस्त्र याप्रमाणें देणगी देण्यांत येत असे; पांचव्या दिवसापासून पुढें सतत वीस दिवसपर्यंत ब्राह्मणांस व पुढें दहा दिवसपर्यंत विधर्मियांस देणग्या देण्यांत येत असत. त्यानंतर सतत एक महिना गरीब, निराश्रित व पोरकीं मुलें वगैरेंना निरनिराळया प्रकारच्या देणग्या देण्यांत येत असत; व यावेळीं युद्धविषयक सैन्य सामुग्री व हत्ती घोडे, याशिवाय इतर असें स्वतःचें जडजवाहीरसुद्धां तो या महोत्सवांत देणगीरूपानें वांटीत असे; या राजाच्या धर्मशीलत्वाविषयीं अशी एक गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, अशा एका धर्मोत्सवांतील देणग्या व धर्मादाय यांमुळें त्याच्या खजिन्यांतील सर्व संपत्ति संपून गेली, इतकेंच नव्हे तर, त्याचें स्वत.चें जडजवाहीर व अलंकार भूषणें हीं नाहींशीं होऊन गेलीं; तेव्हां अखेर त्यानें आपली बहीण राजश्री हिच्याकडून एक जुना पोषाख मागून घेतला, व तो अंगावर चढवून त्यानें बुद्धाची पूजा केली; आणि अशा रीतीनें आपली संपत्ति खर्च झाल्याबद्दल त्यास अतीशय आनंद व समाधान वाटलें; तथापि अशा या महोत्सवाच्या दिवसांत एके वेळीं राजा हर्ष हा स्तूपावरून खालीं उतरत असतां एक मनुष्य त्याचा प्राणनाश करण्याकरितां हातांत जंबिया घेऊन त्याच्यावर चाल करून आला; परंतु त्याचा तो प्रयत्न यशस्वी होण्यापूर्वींच सुदैवानें त्यास भोंवतालच्या लोकांनीं पकडलें; तेव्हां त्यास विचारितां त्यानें " जैन व ब्राह्मण लोकांनीं हें कृत्य करण्यास मला उद्युक्त केलें " असें सांगितलें; त्यावरून पुष्कळांना पकडून त्यांतील मुख्य मुख्य पुढाऱ्यांचा शिरच्छेद करण्यांत आला, व पांचशें सामीलगारांना हद्दपार करण्यांत आलें.

राजा हर्ष हा स्वतः विद्वान्, वैयाकरण, व काव्यकर्ता असून नागानंद, रत्नावली, व प्रियदर्शिका, हीं नाटकें त्यानें रचिलेलीं आहेत; शिवाय तो विद्वानांचा मोठा भोक्ता असून प्रसिद्ध बाण कवि हा त्याच्या दरबारांत होता; या बाण कवीनें ' हर्ष चरित् ' हें सुंदर काव्य रचिलेलें असून तें सुप्रसिद्ध आहे. सारांश, हा राज्यकर्ता मोठा दानशूर, उदार, प्रजावत्सल, व धीरोदात्त असून त्याच्या अंगीं वसत असलेल्या अनेक थोर व अलौकिक सद्गुणामुळें त्यानें इतिहासांत आपली कीर्ति अजरामर करून ठेविली आहे. तो इ० सन ६४८ मध्यें मृत्यू पावला.

त्यानंतर गुप्त घराण्यात आदित्यसेन या नांवाचा एक बराच पराक्रमी राजा निर्माण झाला; व त्यानें अश्वमेघ यज्ञ करून गुप्त घराण्याचा पूर्व लौकिक बऱ्याच प्रमाणांत सजीव केला. तथापि त्याच्या मृत्यूनंतर पुढें लवकरच गुप्त घराणें नामशेष झालें, व त्या घराण्यांतील सार्वभौम सत्ता मालव घराण्याच्या हातीं गेली.

या मालव घराण्यांतील प्रसिद्ध राज्यकर्ता यशोवर्धन, अथवा विक्रमादित्य, हा मोठा शूर व राजकारणपटु असून त्यानें आपल्या राज्याची पुष्कळ भरभराट केली, व थेट काश्मीर पर्यंतचा प्रदेश आपल्या सत्तखालीं आणिला; आणि सतत पन्नास वर्षे राज्य करून इ. सन ५८३ च्या सुमारास तो मृत्यू पावला; व त्याचा मुलगा शिलादित्य हा गादीवर आला; परंतु, त्यानें अजमासें दहा वर्षें राज्यसूत्रें चालविल्यावर इ. सन ५९३ मध्यें पंजाबांतील ठाणेश्वर येथील राजा प्रभाकरवर्धन यानें, त्यास पदभ्रष्ट केलें; तेव्हां शिलादित्यानें काश्मीरचा राजा प्रवरसेन याची मदत मिळविली, आणि प्रभाकरवर्धनाशीं युद्ध करून त्यानें आपली गादी परत मिळवली; परंतु प्रभाकरवर्धनचा मुलगा राज्यवर्धन यानें इ. सन ६०६ मध्यें त्याचा पराजय केला; व मालव घराणें नामशेष करून कनोज घराण्याची स्थापना केली; तथापि, त्यासही राजपद फार दिवस न लाभतां तो कनोज येथें मारला गेला; व त्याच्यामागें त्याचा दुसरा भाऊ हर्षवर्धन हा "दुसरा शिलादित्य" असा किताब धारण करून राज्यावर आला. यावेळीं दक्षिणेंत चालुक्य घराणें राज्य करीत असून या घराण्यांतील प्रसिद्ध राजा पुलिकेशी हा माळवा प्रांतावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु त्याचा दुसऱ्या शिलादित्यानें प्रतिकार केला;

त्यामुळें त्यास माळवा प्रांतावर आपली सत्ता प्रस्थापित करितां आली नाहीं. शिवाय या गोष्टीमुळें पुलिकेशी व शिलादित्य यांचें वांकडें आलें; आणि पुलिकेशी यानेंही शिलादित्यास, तो आपली सत्ता नर्मदानदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असतां, भयंकर प्रतिरोध करून इ. सन ६१० मध्यें त्याचा पूर्ण पराजय केला. त्यामुळें पूर्वकाळच्या गुप्त साम्राज्याचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग पडून त्या उभयतांस विभागणारी रेषा म्हणजे नर्मदानदी, ही निश्चित झाली. दुसरा शिलादित्य हा मोठा पराक्रमी व थोर राज्यकर्ता असून त्यानें सर्व उत्तर हिंदुस्थान व गुजराथ प्रांत आपल्या अमलाखालीं आणिला; तो मोठा धार्मिक असून त्यानें इ. सन ६४० मध्यें प्रयाग येथें एक मोठी थाटाची धर्मपरिषद भरविली होती; व त्याकरितां निरनिराळे मांडलीक राजे रजवाडे, व ठिकठिकाणचे मोठमोठे विद्वान्, व पंडित मंडळी, यांनांही आमंत्रणें करून त्या सभेस आणविलें होतें. या सभेसही उपरीनिर्दिष्ट चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा हजर असून त्यानें या परिषदेसंबंधीं अभिनंदनपर उद्गार काढिलेले आढळतात.

त्या नंतर सहा वर्षांनींच इ. सन ६४६ मध्यें शिलादित्य मृत्यू पावला, आणि त्याचा ब्राह्मण प्रधान अर्जुन यानें तें राज्य बळकाविलें; तथापि तो फार क्रूर व नालायक असल्यामुळें त्यास फार दिवस राज्यसुख लाभलें नाहीं. शिलादित्य हा अत्यंत कर्तबगार व प्रसिद्ध राजा होता;त्यामुळें त्याच्या दरबारीं परदेशीय राज्यकर्त्यांचे वकीलही येण्याचा परिपाट होता; त्याप्रमाणें वांग ह्यूएन्त्संग या नांवाचा एक वकील चीनच्या बादशहाकडून त्याच्या दरबारांत येण्याकरितां चीनमधून निघाला, व तिबेट नेपाळ मार्गानें तो हिंदुस्थानांत येऊन दाखल झाला. तेव्हां शिलादित्य मृत्यू पावल्याचें व त्याचें राज्य त्याच्या ब्राह्मण प्रधानानें हिरावून घेतल्याचें वर्तमान त्यास समजलें. इकडे या ब्राह्मण प्रधानास-प्रधान अर्जुन यास-या चिनी वकीलाच्या आगमनाची खबर मिळाली; त्याबरोबर त्यानें त्या वकिलास, व त्याबरोबरील परिवारास पकडिलें; व त्यास एकट्यास जिवंत ठेवून बाकीच्यांस ठार मारिलें; व त्याचा छळ करण्यास प्रारंभ केला. तथापि ह्यूएन्संग हा कसा बसा आपला जीव घेऊन नेपाळच्या हद्दींत निसटला, व नेपाळी व तिबेटी लोकांची मदत घेऊन त्यानें अर्जुनावर स्वारी केली; तिरहुत शहर हस्तगत करून घेतलें; त्याचा पूर्ण पराजय करून त्यास व त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांस पाडाव केलें;

व त्यांना घेऊन तो चीनमध्यें परत गेला; अशा रीतीनें इ० स० ६४६ मध्यें दुसरा शिलादित्य मृत्यू पावल्यानंतर लवकरच त्याच्या सर्व राज्यभर अंदाधुंदी माजली. राज्यांतील निरनिराळे प्रांत स्वतंत्र होण्याच्या मार्गास लागले, आणि गुजराथ प्रांतावरील त्याचा अंमल नष्ट होऊन तेथील मांडलिक राजा धारसेन हा स्वतंत्रपणें त्या प्रांतावर राज्य करूं लागला. ( ई० सन ६४६ ).

हें वल्लभी घराणें इ० सन ४५० च्या सुमारास काठेवाड प्रांताच्या पूर्व-भागांत वल्लभी येथें स्थापन झालें असून धारसेन हा त्या घराण्यांतील बारावा पुरुष होता. प्रसिद्ध प्रवासी ह्यूएनसंग हा वल्लभी येथें गेल्यावेळीं त्याला तें शहर सुस्थितींत असल्याचें आढळून आलें होतें. धारसेनच्या मृत्यूनंतर वल्लभी घराण्यांतील एकंदर सात पुरुष गादीवर आले; त्यापैकीं शिलादित्य सहावा. हा शेवटचा राजा असून, त्याच्या कारकीर्दींत अरब लोकांनीं सिंध प्रांतावर स्वारी-करून तें राज्य नामशेष करून टाकिलें; त्यानंर गुजराथेंत ' चावडा' या नांवाचें एक घराणें उदयास येऊन इ० सन ९४१ पर्यंत त्या घराण्याकडे गुजराथची सत्ता कायम राहिली. त्यांच्या राजधानीचें शहर अनहिलवाडा, अथवा अनहि-लपट्टण हें होतें; इ० सन ९४१ नंतर गुजराथची राजसत्ता चालुक्य अथवा सोळंकी घराण्याकडे आली.

चावडा वंशांतील शेवटच्या राजाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलीचा मुलगा मूळराज हा गादीवर आला. त्याचा जन्म ' मूळ' नक्षत्रावर झाला, म्हणून त्याचें नांव मूळराज असें ठेविलें; त्याच्या आईचें नांव लीलादेवी हें असून तो उदरांत असतांनाच ती मृत्यू पावली, व त्यानंतर त्यास तीच्या उदरांतून काढून घेतलें. मूळराज हा मोठा शूर असून त्यानें काठेवाड, कच्छ, व लाट, हे प्रदेश जिंकून घेतले, व अजमीर येथील राजा विग्रह याचा पराभव करून त्याच्यावर आपलें वर्चस्व स्थापन केलें; त्याप्रमाणेंच त्यानें महाराष्ट्र देशावर स्वारी करून कल्याणचें राज्य आपल्या अमलाखालीं आणिलें. हा राजा दानधर्मशील असून त्यानें सिद्धपुर येथें 'रुद्रमहालय' हें देवालय बांधविलें. मूळराज हा इ. सन ९९७ या वर्षी मृत्यू पावला, व त्याचा मुलगा चामुंड हा गादीवर आला; हा राज्यकर्ताही मोठा हुषार व नीतिमान् असून त्यानें आपल्या घराण्याच्या लौकिकांत बरीच भर घातली; त्यानें अजमासें २९

वर्षे राज्य केलें; याच्या कारकीर्दीत इ. सन १०२४ मध्यें गज्नवी महंमद यानें सोमनाथावर स्वारी केली. त्या वेळीं त्याच्याबरोबर युद्ध करण्याची चामुंड याची तयारी नव्हती; त्यामुळें त्यास आपली राजधानी सोडून पळून जाणें भाग पडलें; तथापि त्याचा वडील मुलगा वल्लभसेन व नातू भीमसेन या उभयतांनीं महंमदाचा मोठ्या निकरानें प्रतिकार केला, व त्याचें अजमासें तीन हजार सैन्य कापून काढिलें; तरीसुद्धां अखेरीस मुसलमानी सैन्यापुढें त्यांचा टिकाव न लागतां त्यांना माघार घेणें भाग पडलें; व सोमनाथाच्या मंदिरांतून महंमदानें भर भक्कम लूट मिळविली; त्यानंतर त्यानें चामुंड राजावर स्वारी केली, व त्याच्या राजधानीचें शहर, अनहिलापट्टण, हस्तगत करून घेऊन त्याचें सर्व राज्य आपल्या ताब्यांत घेतलें; राजा चामुंड यास पदभ्रष्ट केलें, आणि त्याच्या राज्यावर आपल्यातर्फे त्याचा दुसरा मुलगा व वल्लभ सेनाचा भाऊ दुर्लभसेन याची स्थापना करून तो परत गेला. * हिंदुस्थानच्या पूर्व इतिहासांत ही गोष्ट विशेष महत्त्वाची म्हणून गणली गेलेली आहे; कारण त्या काळानंतर पुढें गुजराथ प्रांत मुसलमान लोकांच्या ताब्यांत गेलेला आहे.

गज्नवी महमुदानें गादीवर बसविलेला राजा दुर्लभ हाही विशेष कर्तृत्वाचा असून तो नेहमीं साधुवृत्तीनें रहात असे; अनहिलवाडा येथील दुर्लभ सरोवर त्यानेंच बांधिलेलें आहे; तथापि त्याची कारकीर्द फक्त दोन वर्षांची असून इ० सन १०२६ मध्यें त्याचा पुतण्या व वल्लभाचा मुलगा भीमदेव हा गादीवर आला; हा मोठा शूर व प्रसिद्ध असून तो विख्यात असा धारा नगरीचा राजा भोज, ‡ याचा समकालीन होता. हा भोज राजा मोठा शूर असून त्यानें

---

* या बाबतींत हिंदु इतिहासकार व मुसलमानी तवारिखकार यांच्या लिहिण्यांत महत्त्वाचा फरक आढळून येतो; तो असा कीं गज्नवी महमुदाच्या वरील स्वारीच्या वेळीं अनहिलवाडा येथें चामुंड नव्हे पण भीमदेव हा राज्य करीत होता, असें हिंदी इतिहासकारांचें मत आहे; उलट पक्षीं, या वेळीं त्या ठिकाणीं भीमदेव नव्हे पण चामुंड हा राज्य करीत होता, असें मुसलमानी तवारीखकारांचें मत आहे.

‡ राजा भोज हा माळवा प्रांतांतील परमार ऊर्फ पवार या राजकुलांतील महान् प्रसिद्ध असा पुरुष होऊन गेला; त्याचें जन्मचरित्र मोठें मनोरंजक

चालुक्य, चेदी व गुजराथ देशाच्या राजांशीं युद्धप्रसंग केले होते, आणि

---

व बोधप्रद आहे; हा वंश अग्निकुळ रजपुतांपैकीं असून हें घराणें पूर्वी अबूच्या पहाडाजवळील अचलगड व चंद्रावती नगर येथें राज्य करीत होतें; या घराण्याचा मूळ पुरुष उपेंद्र उर्फ कृष्णराज ( कारकीर्द इ० सन ८०० ते ८२५ पर्यंत ) हा असून त्यानंतर वैरसिंह, सियक, वाक्पति, वैरसिंह (दुसरा) व सीयक दुसरा हे अनुक्रमें गादीवर आले; सीयकास श्री हर्ष, राजाहर्ष, श्रीहर्षदेव व सिंहभट अशीं नांवें आहेत. हा मोठा पराक्रमी असून त्यानें हूण लोकांचा व मान्यखेट अथावा मालखेड येथील राजाचा पराभव केला होता; ( कारकीर्द इ० सन ९४१ ते ९७३ ) हर्षाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा दुसरा सियक हा गादीवर आला; त्यास वाक्पति, उत्पलराज, अमोघवर्ष, पृथ्वीवल्लभ, श्रीवल्लभ, नरेंद्र व मुंज वगैरे नांवें असून त्यास शेवटच्या नांवानेंच संबोधण्यांत येतें; त्यास 'मुंज' हें नांव पडण्याचें कारण असें आहे, कीं, राजा हर्ष हा एक दिवस नदीकांठीं सहल करीत फिरत असतांना नदीच्या आसपासच्या ' मुंज' या नांवाच्या गवतांत त्यास एक नुकताच जन्मलेला, नाल-वार सहितचा—म्हणजे प्राणी जन्मल्यावर त्याचा नाळच्छेद करितात तोही केलेला नव्हता अशा स्थितीचा-एक मुलगा त्याच्या दृष्टीस पडला; तेव्हां त्यानें त्यास घरीं आणून, त्याचा नालच्छेद केला, व त्याचें नांव मुंज असें ठेवून, त्यास मुलगा समजून त्याचा प्रतिपाळ केला; त्यानतर कांहीं काळानें हर्ष राजास मुलगा झाला; तो मुलगा एक दिवस अचानक नाहींसा झाला, व तपास करितां करितां शेंवटीं तो एका कुंजांत सांपडला; त्यावरून त्याचें नांव कुंज असें ठेविलें. हा मुंज राजा मोठा पराक्रमी असून तो स्वतःहि विद्वान् व कवि होता. त्यानें कर्नाट, लाट, केरल व चोल राजांचा, व त्रिपुरीचा चेदिराजा युवराज यांचा पराभव केला; आणि चालुक्य राजा दुसरा तैलप याच्यावर सतत सोळा स्वाऱ्या केल्या, आणि अशा एका मोहिमेंत एकदांतर त्यानें तैलपाचा पूर्ण पराजय करून त्यास कैदही केलें; परंतु मोठ्या उदारपणानें त्यानें तैलपास बंधमुक्त करून स्वदेशीं जाण्यास परवानगी दिली; (इ. सन ९७५ ) त्यानंतर, हा डाव मनांत ठेवून तैलपानें, वीस वर्षांनीं, इ. सन ९९५ मध्यें माळवा प्रांतीं मुंजराजावर पुन्हा स्वारी केली; त्यावेळीं मुंजाचा प्रधान रुद्रादित्य यानें त्यास तैलपाबरोबरील युद्धप्रसंग टाळण्याबद्दल मोठ्या

चालुक्यवंशीय प्रसिद्ध विक्रमादित्य यास युद्धांत पाडाव करून ठार मारिलें होतें.

---

आग्रहानें विनंती केली; परंतु तिचा अनादर करून मुंजानें त्याच्याशीं युद्ध केलें, व तो थेट तैलपाच्या प्रदेशावरही चाल करून गेला; त्याठिकाणीं उभयतांमध्यें पुन्हां घोर संग्राम झाला, व त्यांत मुंजराजाचा पूर्ण पराभव होऊन तैलपानें त्यास कैद केलें; प्रारंभीं तैलपानें मुंजराजाची उत्तम बरदास्त ठेविली होती; अशा स्थितींत तैलपाची बहीण कुसुमावती उर्फ मृणालिनी हिचें त्याच्यावर प्रेम बसलें, व त्यानें तिच्यामार्फत तेथून आपली सुटका करून घेण्याचा यत्न केला; परंतु ही गोष्ट मृणालिनीनें तैलपास कळविली; तेव्हां त्यानें मुंजराजाचा शिरच्छेद करविला; राजा मुंज हा शिवभक्त होता; त्याचा पुष्कळ काळ स्वाऱ्या व युद्धें करण्यांत खर्च झाला, तथापि त्यानें पुष्कळ इमारती व तलाव बांधिले; धार शहराजवळील मुंजसागर तलाव व मांडू उर्फ मंडपदुर्ग येथील मुंज तलाव व मांधाता, महेश्वर व कुब्जासंगम येथील घांट त्यानें बांधिले असून धार व उज्जयनी येथेंही त्यानें अनेक सुंदर इमारती बांधिल्या; त्याच्या दरबारांत, 'नवसाहसांक चरित्र' या काव्याचा कर्ता पद्मगुप्त, हलायुध, जैनकवि धनपाल, 'दशरूप' नाटकाचा कर्ता धनंजय, व त्याचा भाऊ आणि त्या नाटकावरील 'दशरूपावलोक' या टीकेचा कर्ता धनिक हीं विद्वद्रत्नें होतीं; राजा मुंज यास पुत्र संतति नसल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ कुंज, उर्फ सिंधुराज (यांस नवसाहसांक, कुमार व नारायण, अशींही नांवें होतीं.) हा गादीवर आला. परंतु कुंज हा लहानपणीं स्वभावानें अतीशय अनियंत्रित होता; त्यामुळें मुंज हा त्यास विशेष कडक रीतीनें वागवीत असे; त्यावरून तो रागानें गुजराथेंत निघून गेला व कांहीं काळ तिकडे राहिल्यावर पुन्हां स्वदेशीं परत आला; तेव्हां मुंजराजानें त्यास प्रतिबंधांत ठेविलें; व तेथें असतांनाच त्याचा मुलगा प्रसिद्ध भोजराजा याचा जन्म झाला; राजा मुंज यास पुत्रसंतति नसल्यामुळें भोजाच्या जन्मामुळें त्यास फार आनंद झाला; पुढें एका ज्योतिषानें त्यास 'या मुलाच्या हातून तुझा नाश होईल' असें भविष्य सांगितल्यामुळें त्यानें भोजाचा छळ करण्यास सुरवात केली, इतकेंच नव्हेतर त्यास ठार मारण्याची आज्ञा केली; परंतु वररुचीनें राजास सांगितलें कीं "पंचाशत्पंच वर्षाणि सप्तमासं दिनत्रयं, । भोजराजेन भोक्तव्यः सगौडो दक्षिणा पथः ॥" (भोजराजानें गौड देशापर्यंत दक्षिण देशाचें पंचावन वर्षे सात महिने तीन दिवस राज्य करावें अथवा कराव-

या भोज राजाबरोबर अनहिलवाडा येथील भीमदेवाचें युद्ध झालें, त्यांत भोज-

---

याचें आहे. ) त्यावरून मुंज राजानें तो बेत रहित केला; तथापि पुढें कांहीं काळानें पुन्हां त्यास भोजाविषयीं मत्सर उत्पन्न झाला, तेव्हां भोजानें त्यास पुढील कविता लिहून पाठविली:—

" मान्धाता स महीपतिः कृतयुगालंकार भूतो गतः ।
सेतु र्येन महोदधौ विरचितःक्वासौ दशास्यान्तकः ॥
अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते ।
नैकेनापि समागता वसुमती मन्ये त्वया यास्यति ॥"

( कृतयुगाला अलंकारभूत झालेला मांधाता राजा कालवश झाला, त्रेता युगांतील दहा तोंडाच्या रावणाला मारणारा व महासागरावर पूल बांधणार- श्री रामचंद्र नाहींसा झाला; त्याप्रमाणेंच ( द्वापार युगांतील ) युधिष्ठिरादिकरून इतर राजेसुद्धां स्वर्गवासी झाले; परंतु ही वसुंधरा ह्यांपैकीं एकाबरोबर सुद्धां गेली नाहीं; पण मला वाटतें ती तुझ्याबरोबर येईल. ) मुंजराजाही मोठा विद्वान् व धूर्त होता; त्यामुळें आपल्या अंगीं उत्पन्न झालेल्या मत्सर व महत्त्वाकांक्षा; या संबंधाची आपल्या पुतण्याची ही व्याजोक्ती त्याच्या ताबडतोब लक्षांत आली, व त्या दिवसापासून त्याचा छळ करणें मुंजराजानें सोडून दिलें;

राजा कुंज उर्फ सिंधुराजा हा मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा भोज हा गादीवर आला; राजा कुंज व मुंज या नांवावरून, बांधलेले कुंजसागर व मुंजा सागर असे दोन तलाव हल्लीं धार शहराजवळ अस्तित्वांत आहेत. राजा भोज गादीवर आला त्यावेळीं त्याचें वय अवघें पंधरा वर्षांचें होतें; या राजाची कार- कीर्द इ० सन १०१० ते १०५५ पर्यंत असून याच्याच कारकीर्दींत, राज्या- रोहणानंतर लवकरच त्यानें अवंती उर्फ उज्जयनी या शहराऐवजीं धार हें शहर आपल्या राजधानीचें ठिकाण केलें.

या बाबतींत थोडीशी निराळी हकीकत उपलब्ध झाली आहे ती अशी:—

उज्जयनी येथें सिंहल, या नांवाचा एक राजा राज्य करीत होता; या राजाची बरीच वृद्धावस्था झाली, तरी त्यास पुत्र संतती झाली नाहीं; तथापि ईश्वर कृपेनें पुढें त्यास एक मुलगा झाला त्याचें नांव त्यानें भोज असें ठेविलें. सिंधुतलराजाच्या पूर्वी श्रीहर्ष या नांवाचा राजा तेथें राज्य करीत

राजाचा पराभव होऊन त्यास भीमदेवानें कैद केलें, परंतु भीमदेवानें त्यास

---

होता; परंतु त्यास पुत्र संतती नव्हती; व त्यामुळें तो बराच उदास होता अशा स्थितींत एके वेळीं तो शिकार करण्यास गेला असतां मुंज या नांवाच्या गवतांत त्याला एक नुकताच जन्मास आलेला मुलगा मिळाला; त्या मुलास पाहून त्याला फार आनंद झाला, व ईश्वरानेंच आपणास हा पुत्र दिला असें समजून त्यास तो आपल्याबरोबर घेऊन राजमंदिरांत परत आला; व हाच पुत्रजन्म असें समजून त्यानें नगरांत मोठमोठे उत्सव केले; हा मुलगा मुंज गवतांतून मिळाला म्हणून त्याचें नांव मुंज असें ठेविलें; आणि आपली राणी-श्रृंगारसुंदरी इच्या हवालीं त्यास केलें; राणीनें त्याचें मुलाप्रमाणें सात वर्षें पालन पोषण केल्यावर त्यास आठव्या वर्षी गुरुगृहीं ठेवण्यांत आलें; इकडे श्रीहर्षाची दुसरी राणी या वेळीं प्रसूत होऊन तिला मुलगा झाला; व त्याचें नांव सिंधुल असें ठेवण्यांत आलें. हर्षास पूर्वी मुलगा नसल्यामुळें मुंजास मुलगा समजून त्यासच पुढें राज्य देण्याचा त्यानें बेत केला होता; परंतु आतां त्यास औरस पुत्र झाल्यानें, त्यानें आपला पूर्वीचा बेत फिरवून सिंधुल यास राज्याधिकारी करावें, असें ठरविलें; परंतु राणी श्रृंगारसुंदरी हिनें मुंजाचा याच्या जन्मा नंतरच्या प्रथम काळा पासून प्रतिपाळ केला असल्यानें तिचें मुंजावर अत्यंत प्रेम होतें; त्यामुळें तिनें मुंज यांसच राज्यपद द्यावें. असा आग्रह धरिला; तेव्हां तिच्या म्हणण्यास कबूल होऊन त्यानें मुंजास गादीवर बसविलें, व पुढें लवकरच तो मृत्यू पावला.

मुंज राजा गादीवर आल्यावर कांहीं काळपर्यंत तो आणि सिंधुल हे उभयतां सख्या भावाप्रमाणें रहात होते परंतु मुंज हा अतीशय लोभी व स्वार्थी असून त्यानें अनीतीनें व क्रूरपणानें राज्यकारभार चालविण्यास त्यानें सुरवात केली; त्यामुळें सिंधुलाशीं त्याचें पटेनासें झालें; शिवाय मुंजानें जुना व इमानी प्रधान बुद्धिसागर वगैरे मंडळीसही कामावरून दूर केलें, आणि पूर्ण अनियंत्रितपणें तो राज्य कारभार चालवूं लागला; त्या मुळें प्रजेनें त्यास गादीवरून दूर करून सिंधुल यास पूर्वीचे सर्व अधिकारी कामावर घेऊन प्रधान बुद्धिसागर वगैरेंच्या मदतीनें त्यानें गादीवर बसविलें; व बराच काळपर्यंत मोठ्या नीतीनें व शहाणपणानें राज्यकारभार चालविला; भोज हा पांच वर्षांचा झाला त्यावेळीं त्याचा

सोडून दिलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं भोज राजाचा जैन सेनापती कुलचंद्र

बाप सिंधुल यास वृद्धावस्था प्राप्त झाली होती; त्यामुळें आपल्यामागें आपण कोणास राज्य सोंपवावें, या बद्दल त्यास विचार उत्पन्न झाला; तेव्हां त्यानें प्रधान बुद्धिसागर वगैरे दरबारी मंडळीस एकत्र जमवून विचारिलें कीं. " माझ्या मागें मी कोणास राज्यधिकारी करूं ?" वास्तवीक खरा हक्कदार भोज हा आहे; पण तो अझून अज्ञान आहे; ह्मणून जर मी मुंजाला राज्याधिकारी करणार नाहीं तर लोक माझी अपकीर्ती करितील; भोजास राज्य दिलें तर तो त्याला सुखानें राज्य करूं देतो, का ठार मारितो, का आणखी कांहीं करितो, कोणास ठाऊक * ? शिवाय भोजास राज्य दिल्यामुळेंच जर त्याचा मृत्यू झाला तर तो माझ्या कुळाचाच क्षय झाला. आणि तो करण्यास ही मीच कारणीभूत झालों, असें होईल; कारण मुंज हा लोभी असल्यानें तो लोभापायीं काय करील, याचाही नियम नाहीं, या बाबतींत शास्त्रें सांगतात कीं :—

लोभात् क्रोधो भवति, क्रोधा द्रोहः प्रवर्तते ।
द्रोहेण नरकं याति शास्त्रज्ञोऽपि विचक्षणः
मातरं पितरं पुत्रं भार्यां वा सुहृन्मणिं
लोभाविष्टनरो हंति स्वामिनं वा सहोदरं

( लोभापासून क्रोध उत्पन्न होतो; क्रोधापासून द्रोह उत्पन्न होतो; द्रोहापासून शास्त्रज्ञ, व विचक्षक ही नरकास जातो; आणि लोभी अथवा लोभानें घेरलेला मनुष्य स्वतःची आई, बाप, मुलगा, बायको, उत्तम स्नेही, स्वामी, व सहोदर, यांचाही वध करितो. )

तेव्हां अशा लोभी मनुष्याचा विश्वास धरून काय उपयोग ! असें म्हणून प्रधान मंडळीच्या अनुमतानें, त्यानें मुंजास राज्य देऊन भोजास त्याच्या मांडिवर दिलें, व त्याचें मुलाप्रमाणें पालन कर, अशी त्यास विनंती केली; त्यानंतर सृष्टिक्रमानुसार तो लवकरच कालवश झाला.

सिंधुलच्या मृत्यूनंतर मुंजराजा राज्य करीत असतां एकेवेळीं दरबारांत एक निष्णात ज्योतिषी आला; आणि त्यानें मी ज्योतिषी असून, भूत, वर्तमान व भविष्य या तिन्हींही काळांतील गोष्टी जन्मपत्रिका पाहून सांगूं शकतो." असें मुंज राजास निवेदन केलें; त्यावरून मुंजराजानें त्यास " मी आजपर्यंत ज्या

त्यानें भीमदेवावर स्वारी करून त्याचा पराभव केला व भीम देवाचा वकील

---

ज्या बऱ्या वाईट गोष्टी केल्या असतील त्या सर्व मला सांग" असें त्यास सांगितलें; त्यावरून त्या ज्योतिषानें त्याची पत्रिका पाहून भूतकाळीं त्यानें केलेल्या सर्व बऱ्या वाईट गोष्टी त्यास निवेदन केल्या; त्या ऐकून मुंजास फार आनंद झाला, व त्यानें त्या ज्योतिषास पुष्कळ द्रव्य देऊन संतुष्ट केलें.

त्यावेळीं तेथें प्रधान बुद्धिसागर हा बसला होता. त्यानें मुंजराजास विनंती केली कीं आतां भोजाची पत्रिका ज्योतिषास दाखवावी; त्यावेळीं ज्योतिषानें सांगितलें कीं भोजास माझ्या समोर बोलवा; त्याप्रमाणें त्यास पाठशाळेंतून बोलावून आणिलें; भोज येऊन मुंजराजास नमस्कार करून मोठ्या नम्रतेनें उभा राहिला; तेव्हां भोजाची मुखाकृती व पत्रिका पाहून ज्योतिषानें सांगितलें कीं, मुंजराजा! या भोजाच्या मुखाकृतीवरील रेषा व जन्मपत्रिका यांचें वर्णन मी काय करूं? याच्या भाग्याचें वर्णन करण्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेवही असमर्थ आहे. तर मी मानव प्राणी तो काय सांगणार? तथापि आपण मला आज्ञा केली आहे तरी माझ्या अल्प मतीप्रमाणें कसें तरी सांगतों; असें म्हणून भोजास तेथून रवाना करून त्यानें त्याच्यासंबंधीं भविष्य कथन करण्यास सुरवात केली, व मुंजराजाही मोठ्या आतुरतेनें तो काय सांगतो तें लक्षपूर्वक ऐकत बसला; ज्योतिषी म्हणाला:—

मुंजराजा! "पंचाशतपंच वर्षाणि सप्तमासं दिनत्रयं ॥
भोजराजेन भोक्तव्यःस गौडो दक्षिणापथः" ।

(" पंचावन वर्षें, सात महिने, व तीन दिवस, हा भोजराजा गौड देशापर्यंत दक्षिण देशाचें राज्य करील. ")

ज्योतिषाचे हे शब्द मुंजराजास अग्नीसारखे दाहक झाले; त्याचें तोंड फिकें पडलें, व त्यास चिंता उत्पन्न झाली;—कारण त्यास भोजाच्या वयाचाच एक मुलगा असून आपल्यामागें त्यास राज्य मिळावें, अशी त्याची इच्छा होती—तथापि बाहेरून, कसें तरी समाधान झालेंसें दाखवून त्यानें ती वेळ निभावून नेली; परंतु त्यास त्या रात्रीं शांत झोंपही न लागतां तो विचारमग्न झाला, व भोजाचा हरएक प्रकारें नाश करावा असें त्यानें ठरविलें;

त्यानंतर त्यानें आपला आश्रित बंगालचा राजा वत्सराज यांस तावडतोब बोलावून घेतलें, आणि " आजरात्रीं पहिल्या प्रहरीं भुवनेश्वरीच्या देवालयांत भोजास घेऊन जाऊन तेथें त्यास ठार मार, व त्याचें शीर मला आणून दाखीव" अशी त्यास वत्सराजास आज्ञा केली; मुंजाचें हें भाषण ऐकून वत्सराजाची स्थिती चमत्कारिक झाली, व तो मोठ्या नम्रपणानें मुंजास म्हणाला; मुंजराजा ! तुम्हांस माहीतच आहे कीं, भोजाजवळ द्रव्य नाहीं, त्याप्रमाणेंच बलवान माणसें ही नाहींत; शिवाय भोज हा तुम्हांस पुत्रा समान आहे, व एखाद्या सेवकाप्रमाणें तुमची आज्ञा पाळून पराधीनपणानें तो पोट भरीत आहे; अशा भोजाला, ठार मारण्याचें कारण काय ? वत्सराजाचें हें भाषण ऐकून मुंज राजानें, ज्योतिषानें भोजाविषयीं वर्तविलेलें भविष्य, त्यास सांगितलें, तें ऐकून वत्सराजा त्यास म्हणालाः—

त्रैलोक्य नाथो रामोऽस्ति वशिष्टो ब्रम्हपुत्रकः ।
तेन राज्याभिषेके तु मुहूर्तःकथितो भवत् ॥
तन् मुहूर्ते रामोऽपि वनं नीतोऽवनीं विना ।
सिताया हरोऽप्य भवद्वैरिंची वचनं वृथा. ॥

( "श्री रामचंद्र, त्रैलोक्याधीश होता; व वशिष्ट मुनी, ब्रह्मदेवाचा मुलगा होता, आणि त्यानेंच श्री रामचंद्राच्या राज्याभिषेकाकरितां मुहूर्त काढून दिला होता; पण त्याच मुहुर्तानें श्री रामचंद्रास राज्य न मिळतां उलट वनवासाला जावें लागलें; वनवासांत सीताहरण झालें; व अशा रीतीनें प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचें वचनही निष्फळ झालें." ) तर राजेंद्र ! या भिकार ब्राह्मणाचा त्या पुढें काय पाड ? म्हणून अशा ब्राह्मणाच्या सांगण्यावर विश्वास ठेवून, राजकुमार भोज याला ठार मारून टाकण्याची इच्छा करणें आपणासारख्यास योग्य नाहीं; शिवाय भोजास मारून टाकिल्यास त्यामुळें प्रजेंत असंतोष उत्पन्न होईल; निरनिराळ्या भानगडी उत्पन्न होतील, बंडें उपस्थित होतील, आणि त्यामुळें कदाचित् आपणासही पदभ्रष्ट व्हावें लागेल; तरी या सर्व गोष्टींचा आपण पुन्हां एकदां शांतपणानें विचार करावा; वत्सराजाच्या ह्या म्हणण्याचा मुंजाच्या मनावर कोणताही सुपरिणाम झाला नाहीं; उलट त्यास अतिशय

फार काळ टिकलें नाहीं. कारण चेदी प्रांताचा राजा प्रसिद्ध कर्ण व भोजराजा

---

राग आला; व तो वत्स राजास म्हणाला, तूं माझा धनी नाहीं, नौकर आहेस; असें असून तूं माझा हुकूम अमान्य करूं इच्छितोस काय ? वत्सराजानें विचार केला कीं, आतां प्रसंग ओळखून त्याप्रमाणें वागलें पाहिजे; कारण सत्तेपुढें शहाणपण निरुपयोगी आहे; म्हणून त्यानें मुंजराजास सांगितलें कीं, महाराज मला आपली आज्ञा शिरसा वंद्य आहे; मी आपल्या आज्ञेप्रमाणें आज रात्रीं भोजाचा वध करितों; असें म्हणून तो भोजाकडे गेला, व त्यास आपणाबरोबर रथांत बसवून देवीच्या मंदीराच्या मार्गास लागला; ही हकीकत शहरांत कळल्यावर जिकडे तिकडे मोठी खळबळ उडाली, आणि भोजाची आई सावित्री हिनें तर रडून भयंकर आकांत केला, पण त्याचाही राजाच्या मनावर यत्किंचितसुद्धां सुपरिणाम झाला नाहीं.

इकडे वत्सराजा भोजासह भुवनेश्वरीच्या मंदीराजवळ आल्यावर त्यानें रथ उभा केला, व तो भोजास म्हणाला:-हे भोज, मुंजराजाला कोणी ज्योतिष्यानें असें भविष्य सांगितलें आहे कीं, तूं पुढें उज्जनी येथें राज्य करिशील; त्यावरून तुझा काका मुंज यानें तुला ठार मारण्याची मला आज्ञा केली आहे; आणि मी त्याचा ताबेदार असल्यानें ती मान्य करणें, हा माझा धर्म आहे, व त्याकरितां मी तुला या स्थळीं घेऊन आलों आहे; वत्सराजानें हें भाषण ऐकून भोज म्हणाला; वत्सराज, काळ बलवान् आहे. काळ करील तें दुसऱ्या कोणाच्यानेंही करवणार नाहीं; रामास वनवास प्राप्त झाला, बळीराजा बंधनांत पडला, पांडवांना तेरा वर्षें अज्ञातवासासह वनवास घडला, यादवांनीं आपसांत युद्ध करून कुलक्षय करून घेतला, रावणाला सहस्त्रार्जुनाच्या बंदींत रहावें लागलें, आणि शेवटीं श्री रामचंद्राकडून त्याचा वध झाला, नळ राजाला कलीनें आपला प्रभाव दाखविला,—या सर्व गोष्टी काळानें घडवून आणिल्या आहेत. काळाच्या कर्तव्याकर्तव्यांतून कोणी वांचलें नाहीं, व कोणी कोणाला वांचवूंही शकलें नाहीं; मी तर जो सर्व शक्तीमान् आहे त्या प्रभूसच-त्या दयाघन परमेश्वरालाच अनन्य भावानें प्रणाम करितों. जलाचें स्थळ, व स्थळाचें जळ, तृणाचा मेरु, आणि मेरूचें तृण, अग्नींत शीतळता, व शीतळतेंत अग्नी, हें सर्व कर्तृत्व त्या दीन दयाळु परमेश्वराचेंच आहे; ईश्वर मनांत

या उभयतांमध्यें वैमनस्य उत्पन्न झालें; तेव्हां कर्णानें भीमदेवाची मदत घेऊन

---

आणील तेंच खरें आहे. मी,–माझें कर्तृत्व, हा अहंकार खोटा आहे. हे ईश्वरा! तुझेंच कर्तृत्व, सत्य-त्रिवार सत्य आहे! असें म्हणून भोजानें स्वतःची उजवी मांडी चिरून तिच्यांतून रक्त काढिलें; आणि काडीची लेखणी करून वडाच्या पानावर एक पत्र लिहून तें त्यानें वत्सराजास दिलें; आणि हें पत्र माझ्या काकास द्या, अशी विनंती करून तो त्यास म्हणाला:–"वत्सराजा! धर्म हा सर्वांत श्रेष्ठ ( मुख्य ) आहे. शरीर नाशिवंत आहे; मृत्यूनंतर कोणी कोणाच्या उपयोगीं पडत नाहीं; पण त्यावेळीं धर्मच साह्यकारी होतो; परंतु असें असून सुद्धां दुष्ट मनुष्यें धर्माला दूर करून अधर्माचा अंगिकार करितात! पण अत्यंत बलाढ्य असून सुद्धां जो "धर्म" मानीत नाहीं, तो निर्बल आहे; व निष्णात शास्त्रवेत्ता असूनही जो पंडित धर्म जाणणार नाहीं, तो मूर्ख आहे. जो मनुष्य स्वतः जिवंत असतांनाही धर्म गुंडाळून ठेवून, अनीति व दुष्ट कृत्यें रूपी महारोग नाहींसा करण्याचें कार्य करीत नाहीं, तो मनुष्य दुसऱ्या औषधा शिवायच्या भूमींत काय करील? तुह्मी तुमच्या सारख्याच दुसऱ्या मनुष्याला मरतांना पाहतां–नव्हे, तुह्मा स्वतःच त्याला ठार करूं इच्छितां–पण असें असूनही तुह्मास त्याबद्दल दुःख वाटत नाहीं, यावरून तुमचें हृदय वज्राप्रमाणें कठीण असावें, असें वाटतें. जो मनुष्य, मग तो पूर्ण ऐश्वर्यांत असो, किंवा अगदीं दरिद्री स्थितींत असो, चिंता, भय, व व्याधी, वगैरे सृष्टिक्रमाचा फेरा भविष्यकाळीं आपणावर येईल, असें जाणून, त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवितो, तोच खरा पंडित अथवा सूज्ञ ह्मणून गणला जातो."

भोजाच्या ह्या विस्तारपूर्वक अशा बोधपर भाषणाचें मनन केल्यावर वत्सराजास ईश्वराची भीति उत्पन्न होऊन त्याच्या अंतःकरणास द्रव आला; आणि भोजाचा वध न करितां तो त्यास नगरांत परत घेऊन आला; एका तळघरांत लपवून ठेविलें, व भोजाच्या मस्तकासारिखेंच एक कृत्रिम कुंडल युक्त मस्तक तयार करवून तें घेऊन तो प्रहर रात्रीनंतर मुंजराजाकडे गेला; व तें त्यानें त्याच्यासमोर ठेविलें; त्यावेळीं मुंजानें त्यास विचारिलें, "वत्सराजा, तुझ्या तरवारीच्या धारेच्या घावानें मृत्यू पावण्यापूर्वी भोज काय ह्मणाला?" वत्सराजानें कांहींही उत्तर न देतां भोजाचें पत्र त्याच्या पुढें टाकिलें; मुंजानें तें वाचलें तें:–

धारेवर स्वारी केली, आणि भोजराजाचा पराभव करून त्यास तेथून हांकलून

"मान्धाता स महीपतिः कृतयुगालंकारभूतो गतः ।
सेतुर्येन महोदधो विरचितः क्वासौ दशास्यान्तकः ॥
अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते ।
नैकेनापि समागता वसुमती, मन्ये त्वया यास्यति ॥ १ ॥"

( हे राजा ! सर्व पृथ्वीचा राजा, जो सत्य युगांतील अलंकारासारखा होता तो, मांधाता पण मृत्यू पावला आहे. श्रीरामचंद्र कीं ज्यानें महासागरावर सेतू बांधिला, व दशमुखी रावणाचा वध केला, तो पण आतां कोठें आहे ? त्या प्रमाणेंच युधिष्टिरादि राजे पण स्वर्गाला गेले आहेत;—या सर्वांपैकीं कोणाबरोबर ही पृथ्वी गेली नाहीं; पण मला वाटतें, ती तुझ्याबरोबर येईल खरी ! )

भोजाचें हें पत्र वाचल्याबरोबर मुंजराजास एकदम पूर्ण उपरती झाली; आपल्या पापी कृत्याचा त्याला अत्यंत पश्चात्ताप झाला; आणि मी पुत्रवध केला, आतां माझ्या पापाचें क्षालन कशानें होईल ? असा त्यानें आपल्या राजगुरूस प्रश्न केला; त्यावर राजगुरूनें स्पष्ट सांगितलें कीं, "राजा ! ही पुत्रहत्या आहे; हें महा—महा भयंकर पाप आहे; " जिवंत अग्नीप्रवेश " एवढाच कायतो फक्त एक मार्ग या पापाचें क्षालन होण्यास शिल्लक आहे; आणि आपण अग्नींत जिवंत प्रवेश केलांत, तरच आपल्या या महा पापाचें क्षालन होईल; " !

मुंजराजास खरोखरच आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाला होता; त्यामुळें तो स्वतःला अग्नींत जाळून घेण्यास तयार झाला, व त्याप्रमाणें तयारी करण्यास त्यानें आज्ञा दिली; त्यावेळीं वत्सराजानें तें कृत्रीम शीर दृष्टी आड करून व प्रधान बुद्धिसागर यास हळूच भेटून घडलेली सर्व हकीकत त्यास कळविली व मी भोजास ठार न मारितां गुप्तपणें एका विविक्षित स्थळीं जिवंत ठेविलें असून तुमची आज्ञा असेल तर त्यास आणितों, असें सांगितलें; तें ऐकून बुद्धिसागरास आनंद झाला; त्यानें, भोजास युक्तीनें जाहीर करावें असा विचार केला, व वत्सराजाशीं मसलत करून, एका मनुष्यास योग्याच्या वेषांत मुंजराजाकडे पाठवावें, व त्यानें भोजास जिवंत केल्याचें गीप करून त्यास मुंजराजास भेटवावें, असें ठरविलें; त्याप्रमाणें एक मनुष्य योगी बनून मुंजराजास भेटला, व मी स्मशानभूमींत यज्ञ करून भोजास जिवंत करितों असें त्यानें सांगितलें;

लाविलें. ( इ. सन १०५५ ) त्यानंतर भोजराजा लवकरच मृत्यू पावला.

---

त्यामुळें मुंजास अतिशय आनंद झाला; त्यानें तावडतोब स्मशानांत यज्ञाची तयारी करून दिली, व तेथें त्या योग्यानें जाऊन यज्ञास प्रारंभ केला; त्यावेळीं पूर्वी ठरल्याप्रमाणें भोजास त्या ठिकाणीं गुप्तपणें नेण्यांत आलें, आणि "योगी-महाराजांनीं भोजास जिवंत केलें" असें जाहीर करण्यांत आलें.

ही बातमी ऐकून सर्व नगरभर जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला; मुंजानें आनंदातिशयानें लागलींच स्मशान भूमींत हत्ती पाठविला, व त्यावर वसून डंकानिशाणासह भोज राजमंदिरांत परत आला; त्यावेळीं पश्चात्तापानें शुद्ध झालेला मुंज त्यास वंदन करण्याच्या तयारींत होता; इतक्यांत भोजानें हत्ती-वरून उतरल्याबरोबर मुंजास साष्टांग वंदन केलें; मुंजराजास गहिंवर आला, आणि त्यानें भोजास कडकडून आलिंगन दिलें; या वेळेपासून त्याचा स्वार्थ व लोभ नाहींसा झाला; राज्य-आसक्ती, व राज्य-कारभार यावरून त्याचें लक्ष पूर्ण-पणें उडून गेलें; भोजाविषयीं स्वतःच्या मुलाहूनही त्याला अधिक प्रेम वाटूं लागलें; त्याला भोजाच्या अंगीं अलौकिक कर्तृत्वशक्ती दिसू लागली; आपल्या मुलास राज्य न देतां भोजासच द्यावें, असा त्यानें बेत ठरविला, आणि लवक-रच सुमुहूर्त पाहून त्यानें स्वहस्तानें भोजराजास गादीवर बसवून त्यास राज्याभि-षेक केला; व आपल्या मुलास त्याच्या हवालीं करून, तो स्वस्त्रीसह, आपलें पुढील आयुष्य ईश्वरसेवेंत घालविण्याकरितां, वनांत निघून गेला.

हा भोजराजा मोठा न्यायी, धर्मशील व विद्याविलासी; असून एक लाख रुपायां-हून कमी, अशी देणगी त्यानें कधीच कोणालाही दिली नाहीं, असा त्याचा लौकिक होता; व त्याच्या दरबारीं कालीदासादि नवपंडितरत्नांची एक सभा होती; कालिदास हा काली देवीचा मोठा निःसीम भक्त असून त्या देवीच्या साक्षात्काराची एक मोटी मनोरंजक गोष्ट उपलब्ध आहे ती अशी कीं :—भोजराजाच्या दरबा-रांत कालीदासामुळें कोणाचेंही तेज पडत नसे; त्यामुळें द्वेषानें प्रेरित होऊन काली-दासाचा मानभंग करण्याची एक ब्राह्मण कवी वाट पहात होता. कालीदासाचा रोज क्षिप्रा नदीवर स्नानास जाण्याचा नियम असे; त्याप्रमाणें एके दिवशीं तो नदीवर स्नानास गेला असतां हा ब्राह्मण हळूच त्याच्या पाठोपाठ गेला, आणि कालीदास तेथें काय करीत आहे, तें लक्षपूर्वक अवलोकन करूं लागला;

राजाभोज हा मोठा विद्वान, व विद्वानांचा भोक्ता असून तो स्वतः कवी

तों कालीदास हा स्नान, आन्हिक कर्म, वगैरे आटोपल्यावर घरीं परत येण्यास निघण्यापूर्वी नदींतील मासे पकडून आपल्याजवळील उपवस्त्रात टाकीत आहे, असें त्यानें पाहिलें; तेव्हां त्यास अतीशय आश्चर्य वाटलें, व, पुढें कालीदास आणखी काय करितो, हें पहात तो, तेथेंच उभा राहिला. इकडे कालीदासानें, पकडलेल्या माशांसह त्या उपवस्त्राचा गुंडाळा करून तें खाकोटीस मारिलें, व तो थेट आपल्या घरीं गेला. तेव्हां ब्राह्मणही मागोमाग परतून आपल्या ठिकाणावर गेला; त्यानंतर, आपली पूर्ण खात्री करून घेण्याकरितां, हा ब्राह्मण पुन्हां लागोपाठ तीन चार दिवस नदीवर गेला, व कालीदासाचा तोच नित्यक्रम त्याच्या पाहण्यांत आला; तेव्हां कालीदासाचें महत्व नष्ट करण्यास आतां योग्य संधी आली, असा आपल्या मनाशीं विचार करून, त्यानें भोजराजास असें सांगितलें कीं, “ कालीदास हा रोज क्षिप्रा नदीवर स्नानास जातो, आणि परत येतेवेळीं आपल्या गणिकेकरितां नदींतून मासे पकडून घरीं आणितों; व तिला देतो; कालीदास हा ब्राह्मण असून असें नीच कर्म करितों, तरी आपणास या संबंधीची खात्री करून घ्यावयाची असल्यास, आपण नदीवर जावें, म्हणजे सर्व प्रकार आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल; वाटल्यास मीही आपणाबरोबर येतों. ब्राह्मणाचें हें भाषण ऐकून, भोजराजानें दुसऱ्याच दिवशीं सकाळीं नदीवर जाण्याचें ठरवून त्याप्रमाणें तो त्या ब्राह्मणासह नदीवर गेला; तोंच कालीदास नित्याप्रमाणें, नदींतील मासे पकडून, व उपवस्त्रांत गुंडाळून, तें खाकोटीस मारून घरीं परत फिरतांना त्यास दिसला; त्याबरोबर भोजराजानें एकदम पुढें होउन त्यास विचारिलें:–

भोजः—कक्षायां किं ? ( काखेंत काय आहे ? )

काली:—मम पुस्तकं. ( माझें पुस्तक आहे )

भोजः—किमुदकं ? ( त्यांतून पाणी कां गळत आहे ? )

काली:—काव्येषु सारोदकं ( तें कवितेच्या सारांतील पाणी आहे. )

भोजः—किं गंधं ? ( दुर्गंधी कां येते ? )

काली.—प्रतनु रावण वध संग्राम मृत प्राणि गंधं. ( हल्लीं रामाचें रावण वधाचें युद्ध चालू असून त्यांत मरण पावलेल्या प्राण्यांची ही दुर्गंधी आहे.

होता, आणि त्यास धर्मशास्त्र, वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, व व्याकरण, अव-

---

भोजः—पुच्छं किं ? ( त्यास शेंपूट कां आहे ?

कालिः—खलु ताडपत्रं लिखितं. ( ताडपत्रावर लिहिलें आहे म्हणून तें शेंपटीं सारखें दिसतें.

भोजः—जीवः किं ? ( जिवंत कां ? )

कालिः—मम मोहक मंत्र लिखितं संजीवनं पुस्तकं. ( हें पुस्तक माझ्या मोहक मंत्रानें लिहिलें आहे, म्हणून सजीव आहे. )

आता भोजराजास धीर निघेनासा झाला; त्यानें कालिदासाच्या काखेंतील वस्त्र ओढून घेऊन स्वतः उघडून पाहिलें, तों त्यांत मासे नसून पुस्तक निघालें !

या भोजराजाच्या कारकीर्दींत न्याय, धर्म, दया, विद्या व लक्ष्मी पूर्णपणें वास करीत राहिल्यामुळें त्याची प्रजा अतीशय सुखी, संतोषी व नीतिमान होती, असा लौकिक आहे.

वरील गोष्टीवरून. इतिहासाची नेहमींच पुनरावृत्ती होत असते, अथवा इतिहासाचा नेहमींच पुनरावृत्ती होण्याकडे कल असतो, या म्हणण्याची आठवण होते; असेंच तंतोतंत उदाहरण पुढें पुष्कळ शतकानंतर पेशवाईच्या काळांत घडलें आहे; असें कीं बाळाजी बाजीराव पेशव्याचा धाकटा भाऊ राघोबा उर्फ रघुनाथराव दादा यानें पेशवाईपदाचा अभिलाष धरून, पुढें तें पद मिळविण्याच्या त्याच्या धडपडींचें पर्यवसान नारायणरावाच्या खुनांत झालें. त्यानंतर या पापाला प्रायश्चित्त काय ? असें रघुनाथरावानें पेशवाईंतील प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांस विचारिलें, त्यावेळीं, त्यानेंही या पापाच्या क्षालनास दुसरें कोणतेंही प्रायश्चित्त नसून "देहांत प्रायश्चित्त" एवढें एकटेंच प्रायश्चित्त आहे, असें सांगितलें; वरील दोन्हीं उदाहरणांत फरक इतकाच कीं, भोजराजाचा वध झाला नव्हता, पण नारायणरावाच्या वधाची क्रिया पूर्ण झाली होती; त्याप्रमाणेंच मुंजराजास झालेला पश्चात्ताप पूर्ण निर्धाराचा असून तो खरोखरीच स्वखुषीनें अग्निप्रवेश करून स्वदेह नष्ट करण्यास तयार झाला होता; उलट पक्षीं राघोबास पश्चात्ताप झाला असला तरी तो निर्धाराचा नसून, त्यास कांहीं प्रमाणांत वेगडी व दांभिकपणाचें स्वरूप आलेलें होतें, आणि त्यानंतरही त्यानें पेशवाईचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवण्याकरितां व तीं गेल्यावर पुन्हां मिळविण्याकरितां अतीशय धडपड केली होती. थोडक्यांत म्हणजे मुंजराजा करारी पुरुष होता, व रघुनाथराव हा कचा व कलीपुरुष होता.

गत असून या विषयांवर त्यानें ग्रंथही लिहिले आहेत. भोजराजाचें " चंपू-रामायण " व " सरस्वतिकंठाभरण " हे ग्रंथ प्रसिद्ध झालेले असून विज्ञानेश्वराच्या मिताक्षरांतही भोजराजाच्या ग्रंथांचा उल्लेख केलेला आहे; तो स्वत: शैव पंथाचा होता, तथपि जैन धर्मासही त्यानें आश्रय दिला असून प्रभाचंद्र या नांवाचा एक जैनधर्मीय साधू त्याचा गुरू होता. भोजराजाचा अंमल दक्षिणेंत गोदावरी नदीपर्यंत असून बुंदेलखंड व वाघेलखंड याशिवायचा इतर सर्व मध्यहिंदु-स्थानांतील प्रदेश त्याच्या अमलाखालीं होता; त्याच्या पदरीं धनपाल, उवात, कालीदास ( हा शाकुंतल नाटकाचा कर्ता नव्हे हें लक्षांत ठेवावें ) वगैरे विद्वान मंडळी असून त्यानें अनेक लोकोपयोगी कृत्यें केलीं आहेत, व मंदिरें बांधिलीं आहेत. अवंती येथील क्षिप्रा नदीवरील घांट, भोपाळ संस्थानांतील भोजपूरचा तलाव, व काश्मीर प्रांतांतील पापसूदन तलाव हे त्यानें बांधिले असून मांडू उर्फ मंडपदुर्ग येथें एक पाठशाळाही त्यानें बांधली होती. भोजराजानंतर या घराण्यांत उदयादित्य, नरवर्मदेव वगैरे एकंदर अकरा राजे झाले. चवदाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत हें घराणें माळव्यांत स्वतंत्रपणें राज्य करीत होतें; पुढें हें राज्य अल्लाउद्दीन खिलजी यानें जिंकून मुसलमानी राज्यात सामील करून टाकिलें; व अशा रीतीनें माळव्यांतील या प्रसिद्ध पवार उर्फ परमार घराण्याचा शेवट झाला.

अनहिलपट्टण येथील राजा भीमदेव याची कारकीर्द ऐतिहासिक-दृष्टया विशेष महत्त्वाची आहे; कारण हिंदुस्तानांतील राज्यकर्त्यांच्या आपसां-तील वैमनस्यामुळें या देशांत मुसलमानी सत्ता स्थापन होण्यांत भीमदेवाची अप्र-त्यक्षपणें मदत झाली आहे. राजा भीमदेव हा मोठा पराक्रमी व धार्मिक प्रवृ-त्तीचा होता; त्यानें अनेक जैन मंदिरें बांधिलीं असून त्यांतील अबूच्या पहाडां-तील शत्रुंजय टेंकडीवरील पालीठाणा, व चंद्रावती वगैरे ठिकाणचीं मंदिरें विशेष प्रसिद्ध आहेत. तथापि तो दूरदर्शी नव्हता; त्यामुळें त्याच्या अदूरदर्शित्वाचे परि-णाम हिंदुस्थानांतील राजेरजवाडयांस भोगणें प्राप्त झालें. या काळांत अजमीर येथें विसलदेव या नांवाचा चव्हाण वंशांतील एक राजा राज्य करीत होता; व त्याच्या सरहद्दीस लागून पंजाबमध्यें महंमद गजनवी यानें आपला अंमल बस-विला होता; ही गोष्ट विसलदेव यास केव्हांही विशेष भीतीदायक होती; व महंमदाची त्या प्रांतावरील सत्ता नाहींशी करण्याचा तो प्रयत्न करीत होता;

म्हणून महंमदाचा पंजाब प्रांतावरील ताबा नष्ट करण्याकरितां त्यानें भीमदेवाची मदत मागितली; परंतु या दोन्ही राजघराण्यांमध्यें पुष्कळ काळापासून वैरभाव चालू असल्यानें भीमदेवानें त्यास मदत दिली नाहीं; तेव्हां विसल देवास राग येऊन त्यानें भीमदेवावर स्वारी केली, व त्याचा पूर्ण पराजय करून व त्याजपासून खंडणी घेऊन तो अजमीर येथें परत गेला; म्हणजे, महंमदाच्या सत्तेला यत्किंचितही दाब न बसतां, आपसांत एकमेकांनीं परस्परांशीं युद्ध करून स्वतःलाच कांहीं प्रमाणांत त्यांनीं कुमकुवत करून घेतलें, व त्यामुळें महंमदालाच उलट त्यांनीं अप्रत्यक्षरित्या कांहीं प्रमाणांत बलवान केलें; तथापि एकंदरींत पाहतां भीमदेवाची कारकीर्द बरीच सुखदायक झाली असून त्यानें अजमासें ४६ वर्षें राज्याचा उपभोग घेतला; व इ. सन १०७२ मध्यें उदयामती राणीच्या पोटीं झालेला मुलगा कर्ण याची गादीवर स्थापना करून त्यानें वानप्रस्थ आश्रम धारण केला, व आपले शेवटचे दिवस ईश्वरसेवेंत घालविण्याकरितां तो स्वस्त्रीसह मुंडकेश्वरक्षेत्रीं जाऊन राहिला; त्यानंतर राजा कर्ण यांनें बावीस वर्षें राज्य केलें, व राज्यावर असतानाच तो इ. सन १०९४ मध्यें मृत्यू पावला. राजा कर्ण हा मोठा प्रजावत्सल असून त्यानें अनेक लोकोपयोगी कृत्यें केलीं; त्यानें "कर्णमेरू" या नांवाचें एक देवालय, व कर्णसागर या नांवाचा एक अति विस्तृत असा तलाव बांधिला, व कर्णावती या नांवाचें एक शहर वसवून तेथें 'कर्णेश्वर' या नांवाचें एक महादेवाचें मंदिर बांधिलें; हेंच ठिकाण म्हणजे सांप्रतचें 'अहमदाबाद' हें शहर होय; या कर्णराजानें मध्य प्रांतांतील चंद्रपूर उर्फ चांदा येथील कदंब राजा जयकेशी याची मुलगी नामें मैलनदेवी हिच्याशीं विवाह केला असून या लग्नाची हकीकत फार चमत्कारिक आहे; ती अशी कीं, एकेवेळीं एक फिरस्ता चित्रकार फिरत फिरत कर्णराजाच्या दरबारीं आला, आणि त्यानें राजाची भेट घेऊन त्यास असें सांगितलें कीं, दक्षिणेंतील कदंबराजा जयकेशी याची उपवर झालेली मुलगी मैलनदेवी, हिनें आपली कीर्ति ऐकून आपणास वरण्याचा निश्चय केला आहे, व आपणास भेटीदाखल एक हत्ती पाठविला आहे; चित्रकारानें राजास असें सांगितल्यावर तो, हत्ती पाहण्याकरितां बाहेर आला; तों त्यास नुसता हत्तीच न दिसतां राज्यकन्या मैलनदेवीही त्याच्यावर बसलेली आढळून आली; परंतु कर्णाला ती मुलगी पसंत पडली नाहीं, त्यामुळें त्यानें तिच्याशीं लग्न करण्याचें नाकारिलें; राजक-

न्येस ही हकीकत कळल्यावर तिनें आपल्या आठ दासीसह प्राणत्याग करण्याचा निश्चय केला; इतक्यांत ही हकीकत कर्णाची आई उदयामती हिच्या कानावर गेली. तेव्हां तिनें "या राजकन्येशीं तूं लग्न केलें पाहिजे" असा आग्रह धरिला, व आपल्या मातेच्या इच्छे व आज्ञेप्रमाणें कर्णानें तिच्याशीं विवाह लाविला; तथापि कर्ण हा पुढें व्यसनाधीन होऊन एका वेश्येच्या नादीं लागला; त्यामुळें माता उदयामती, राणी मैलनदेवी व प्रधानमंडळीस चिंता प्राप्त झाली; तेव्हां प्रधानमंडळींनीं राजमातेच्या अनुमतीनें मैलनदेवीस अशी युक्ती सुचविली कीं, "आपण त्या वेश्येचें सोंग घेऊन तिच्या ठिकाणीं जाऊन बसावें." ही युक्ती राणीस मान्य होऊन तिनें त्याप्रमाणें वर्तन केलें, व राजा तिच्या मोहपाशांत गुरफटला गेला; तेव्हां तिनें त्याच्याकडून त्याची खूण म्हणून एक मुद्रिका मागून घेतली; पुढें दिवस राहून योग्य कालानंतर मैलनदेवीस मुलगा झाला, तोच प्रसिद्ध सिद्धराज हा होय;

सिद्धराज हा तीन वर्षांचा असता एके दिवशीं सहज खेळत खेळत आपल्या पित्याच्या सिंहासनावर जाऊन बसला; ही गोष्ट राजा कर्ण यास अपशकुनाची वाटली, व ती आपल्या अंतकालाचें द्योतक आहे कीं काय, याबद्दल त्यास चिंता प्राप्त होऊन त्यानें या बाबतींत आपल्या प्रधानाचा व ज्योतिषाचा सल्ला घेतला व त्यास युवराज केलें; पुढें सिद्धराज हा अज्ञान असतांनाच इ० सन १०९४ मध्यें राजा कर्ण हा मृत्यू पावला, व सिद्धराज उर्फ सिद्धराज जयसिंग हा गादीवर आला; परंतु तो अज्ञान असल्यानें राज्याचा कारभार त्याची आई मैलनदेवी ही प्रधान अथवा सेनापती जगदेव याच्या मदतीनें पहात असे. पुढें सिद्धराज वयांत आल्यावर तो स्वतः राज्य कारभार चालवूं लागला; हा राजा मोठा मातृभक्त * असून विशेष धार्मिक, प्रजावत्सल, उदार, व पराक्रमी होता. व त्यास

---

* राजमाता मैलनदेवी ही मोठी हुषार, धार्मिक, व दयाळू स्वभावाची स्त्री होती. ती एकदां सोमनाथाच्या यात्रेस जात असतां तिला मार्गांत पुष्कळ यात्रेकरू दुःखीकष्टी असल्याचें आढळून आलें; त्यावरून तिनें या बाबतींत तपास केला; तेव्हां तिला असें समजून आलें कीं, यात्रेकरूंना जबर कर द्यावा लागतो, त्यामुळें ते दुःखीकष्टी असून, पुष्कळ यात्रेकरू इच्छा असूनही निव्वळ ऐपत नसल्यामुळेंच सोमनाथाचें दर्शन घेतल्याशिवाय परत जातात; ही हकीगत ऐकून राजमातेच्या कोमल मनावर अतीशय परिणाम झाला; तिला फार वाईट

"राजाधिराज" महाभट्टारक, जयसिंहदेव, व त्रिजगतगति वगैरे नांवें होतीं; शिवाय त्यास "गुजराथ देशाचें भूषण," व "चालुक्य वंशाचा कुलदीप" अशींही नामाभिधानें होतीं; त्यानें गिरनार प्रांताचा राजा खेंगार याचा पराभव करून सोरठ प्रांत आपल्या अमलाखालीं आणिला, आणि त्या प्रांताचा तीन वर्षांचा वसूल खर्ची घालून त्यानें नेमीनाथाचें एक मोठें मंदीर बांधिलें; त्याप्रमाणेंच मालवाधिपतीशीं सतत बारा वर्षें युद्ध करून त्यानें तेथील राजा यशोवर्मा याचा

---

वाटलें, व सोमनाथाचें दर्शन घेतल्याशिवाय ती तशीच परतून राजधानींत माघारी आली; राजा सिद्धराज मातेस भेटण्यास गेला, आणि यात्रा केल्याशिवाय परत येण्यास काय कारण घडलें याबद्दल त्यानें तपास केला; तेव्हां यात्रेकरू-वरील करासंबंधीची हकीकत सांगून "हा कर माफ झाला नाही तर मी अन्न-पाणी घेणार नाहीं" असें तिनें आपल्या मुलास सांगितलें; मातेचे हे निर्वाणीचे शब्द ऐकून मातृभक्त सिद्धराजाची स्थिती फार अडचणीची झाली; कारण वरील कराचें उत्पन्न अजमासें ७२ लाख रुपयांचें होतें; त्यामुळें एवढी मोठी वसुलीच्या बाबींतील रक्कम सोडून दिल्यास सांपत्तिकदृष्ट्या राज्याचें भयंकर नुकसान होणार ही गोष्ट उघड होती; उलट पक्षीं आईची आज्ञा उल्लंघन केल्याचा दोष, व तिनें अन्न पाणी न घेतल्यानें त्यामुळें ती मृत्यु पावल्यास अप्रत्यक्षपणें मातृहत्येचें भयंकर पाप, आपल्या माथीं बसणार हीही गोष्ट तितकीच उघड होती; तथापि शेवटीं सांपत्तिक नुकसानीचें कोणतेंही महत्व-हा कर माफ केल्यास राज्याच्या वसूलीचें अत्यंत नुकसान होईल असें त्याच्या मंत्रिजनानी त्यास आग्रहानें बजा-विलें असताही-लक्षांत न घेतां त्यानें तो कर माफ करून आपल्या मातोश्रीच्या हातानें मंदिरांत तसें उदक सोडविलें, तेव्हां सोमनाथास पुष्कळ मौल्यवान् देणग्या देऊन राजमाता मैलनदेवी हिनें आपली यात्रा पूर्ण केली.

"If the whole world were put into one Scale and my mother into the other, world would kick the beam. Lord Langdale." (तराजूच्या एका पारड्यांत सर्व जग बसविलें, आणि दुसऱ्यांत जर माझ्या आईस बसविलें, तर माझ्या आईचें वजनच जगाच्या पारड्याच्या वजनाहून अधिक भरेल.) यावरून मातेचें केवढें महत्त्व मानलेलें आहे, हें कोणासही सहज समजून येईल; त्याप्रमाणेंच "मातेप्रमाणें अन्य दैवत नाहीं" ही व्यवहा-रांतील म्हणही प्रसिद्ध आहेच.

पाडाव केला; व बुंदेल खंडातील महोबा येथील चंडेल राजा मदनवर्मा याजवर स्वारी करून त्याजकडून खंडणी मिळविली. सिद्धपूर ( येथें मातृ-गया करितात ) हें नांव या सिद्धराजावरून पडलेलें असून तेथें त्यानें " रुद्रमहालय " या नांवाचें एक मोठें मंदिर बांधिलें; त्याप्रमाणेंच अनहिलपट्टण येथेंही " सहस्त्र-लिंग " या नांवाचा एक मोठा विस्तृत तलाव बांधिला. सिद्धराज हा विद्वा-नांचा भोक्ता असून " हैमीनाममाला, अनेकार्थमाला, द्व्याश्रयकाव्य, व अध्यात्मोप-निषद् वगैरे ग्रंथांचा कर्ता हेमाचार्य उर्फ हेमचंद्र या नांवाचा एक प्रसिद्ध व विद्वान जैन साधू त्याच्या आश्रयास होता.

सिद्धराजा हा इ. सन ११४३ मध्यें मृत्यू पावला; त्यास पुत्रसंतान नव्हतें; त्यामुळें त्याचा दूरचा नातलग व क्षेमराजाचा नातू ( भीमदेवाचा पणतू व त्रिभुवनपाळाचा मुलगा ) कुमारपाल, हा प्रधान कान्हादेव याच्या मदतीनें गादीवर आला. सिद्धराज जिवंत असतां, आपल्यामागें कुमारपाल गादीवर यावा ही गोष्ट त्यास पसंत नव्हती; त्यामुळें आपल्या हयातींतच त्यानें कुमारपाळास ठार मारण्याचे अनेक प्रयत्न केले होते, तथापि ते सर्व निष्फळ होऊन सिद्धराजाच्या मृत्यूनंतर तो गादीवर आला. कुमारपाल हाही सिद्धराजा-प्रमाणेंच पराक्रमी असून त्यानें अनेक विद्वानांस आपल्या पदरीं आश्रय दिला होता; त्याचा मुख्य गुरू हेमचंद्र हा असून रामचंद्र व उदयचंद्र हे विद्वान पंडित-ही त्याच्या संग्रहीं होते; हेमचंद्र पंडिताच्या सहवासानें जैन मताचा त्याच्यावर पुढें पुढें तर इतका पगडा बसला कीं, त्यानें स्वतः मद्यमांससेवन व शिकार करणें सोडून दिलें, आणि आपल्या राज्यांत हिंसा बंद करून शिकारीचे पर-वाने काढून घेतले. कुमारपाळ हा गादीवर आल्यावर त्यानें सांबराचा राजा अर्णराज, माळव्याचा राजा बल्लाळ व कोंकणचा राजा मल्लिकार्जुन यांचा परा-भव केला, आणि उत्तरेस हूण लोकांच्या राज्यापर्यंत, दक्षिणेस विंध्यपर्वता-पर्यंत व पूर्वेस गंगानदीपासून पश्चिमेस सिंधुनदापर्यंत, आपल्या राज्याचा विस्तार केला. कुमारपाळानें अजमासें ३१ वर्षे पुष्कळच कुशलतेनें राज्यकारभार केला, परंतु इ० सन ११७४ मध्यें त्याचा पुतण्या व महिपालाचा मुलगा अज-यपाल यानें त्यास विषप्रयोग करून ठार मारिलें, व तो स्वतः राज्यारूढ झाला.

अजयपाल हा शैवपंथी असून मोठा क्रूर व जैन धर्माचा कट्टा शत्रू होता; त्यामुळें त्यानें जैनधर्मीयावर नानाप्रकारचे अनन्वित जुलूम केले, अनेक जैन

मंदिरांचा विध्वंस केला; जैन पंडित रामचंद्र यास तांब्याच्या तापविलेल्या पत्र्यावर बसवून त्याचा प्राणनाश केला, इतकेंच नव्हे तर आपला ब्राम्हण प्रधान कपर्दी यासही त्यानें तापलेल्या तेलाच्या कढईंत टाकून ठार मारिलें; अशा अनेक क्रूर कृत्यांमुळें त्याच्याविषयीं अतीशय अप्रीति व द्वेष उत्पन्न झाला, आणि शेवटीं त्याच्याच एका पहारेकऱ्यानें त्यास ठार मारिलें. ( इ० सन ११७९ ) कुमारपाळाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मूळराज हा गादीवर आला, आणि तो अज्ञान असल्यानें त्याची आई नैकीदेवी ही आपला भाऊ भीमदेव याच्या मदतीनें राज्यकारभार पाहूं लागली. परंतु दोन वर्षांतच इ. सन ११८१ मध्यें दुसरा मूळराज मृत्यू पावला, व भीमदेव हा गादीवर आला.

भीमदेव हा मोठा शूर असून दिल्लीपती प्रसिद्ध पृथ्वीराज चव्हाण याचा तो समकालीन होता; त्यास भोळा भीमदेव असेंही म्हणत असत; या भीमदेवाच्या पदरीं अमरसिंह या नांवाचा एक प्रसिद्ध व विद्वान जैनधर्मी पंडित असून त्यानेंच "अमरकोश" या नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ केला आहे. या भीमदेवाचें व पृथ्वीराजाचें स्त्री विषयक बाबतीवरून हाड वैर माजलें, आणि त्याचा परिणाम अतिशय अनिष्ट होऊन आपसांतील या फाटाफुटीचा परदेशीय मुसलमानांनां अत्यंत मौल्यवान फायदा मिळाला व त्यांना हिंदुस्थानच्या उन्नत भूमींत आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करितां आलें. या काळांत अबूगड येथें जैत परमार या नांवाचा एक राजा राज्य करीत असून त्यास इच्छिनी कुमारी या नांवाची एक अतीशय लावण्यवती कन्या होती; या राजकन्येशीं आपण विवाह करावा, अशी भीमदेवास इच्छा उत्पन्न झाली, व त्याप्रमाणें त्यानें तिच्याबद्दल तिच्या बापाकडे मागणी केली; भीमदेवाच्या या मागणीस जैत परमार यानें कदाचित अनुमोदनही दिलें असतें; परंतु त्याचा मुलगा सलख याचा ओढा पृथ्वीराजाकडे असून त्याच्याबरोबर आपल्या बहिणीचा विवाह व्हावा, अशी त्याची इच्छा होती; त्यामुळें त्यानें ही सर्व हकीकत पृथ्वीराजास कळवून त्यास, आपल्या बहिणीबरोबर विवाह लावण्यास उद्युक्त केलें; व पृथ्वीराजानेंही या राजकन्येबरोबर विवाह करण्याचा निश्चय करून तो भीमदेवाबरोबर युद्ध करण्यास तयार झाला; भीमदेवास ही हकीकत कळल्यावर तोही पृथ्वीराजाबरोबर युद्ध करण्यास पुढें आला, आणि उभयतांमध्यें मोठें युद्ध होऊन त्यांत भीमदेवाचा पूर्ण पराजय झाला; परंतु याच युद्धामुळें ते उभयतांही कम-

जोर होऊन शहाबुद्दीन घोरी प्रबळ झाला; त्यानें दिल्ली व कनोज येथील राज्यांचा पाडाव केला, आणि त्याचा प्रसिद्ध सरदार कुत्बुद्दीन यानें आपल्या मोठ्या सैन्यासह गुजराथ प्रांतावर स्वारी करून अनहिलपट्टणला शह दिला, व भीमदेवाचा पूर्ण पराजय करून त्यास आपला जीव बचावण्याकरितां पळून जाणें भाग पाडिलें; भीमदेव हा इ. सन १२९५ मध्यें मृत्यू पावला, व त्याच्या बरोबरच गुजराथेंतील सोळंखी वंशाचा शेवट होऊन वाघेल वंश उदयास आला.

या वाघेल उर्फ वाघेला वंशाचा सोळंखी वंशाशीं अगदीं निकटचा असा पूर्वसंबंध होता. व तो कुमारपालापासून ( कारकीर्द इ० सन ११४३ ते ११७४ पर्यंत ) जडलेला होता. तो असा कीं, या कुमारपाळास अनाकराज उर्फ अरुणराज या नांवाचा एक मावसभाऊ असून त्यास कुमारपालानें आपल्या कारकीर्दींत व्याघ्रपल्ली उर्फ वाघेल वगैरे गांवें जहागिरीदाखल देऊन आपल्या दरबारीं ठेविलें होतें; त्यास लवणप्रसाद या नांवाचा एक मुलगा होता; तो मोठा पराक्रमी असून या वाघेला घराण्यांतील पहिला राजा होता. भोळ्या भीमदेवाच्या कारकीर्दींत तो स्वतःच्या कर्तृत्वानें प्रधानपदा पर्यंत योग्यतेस चढलेला होता, लवणप्रसाद यानें स्वपराक्रमानें धोलका प्रांत मिळविला; त्यामुळें वाघेल व धोलका, या दोन्हीं परगण्यांचें व्यापक क्षेत्र त्याच्या अधिकारकक्षेखालीं आलें. त्यास वीरधवल या नांवाचा एक मुलगा असून तो गुजराथच्या इतिहासांत पराक्रमी, दयाळू, नीतिमान व कर्तबगार म्हणून विशेष प्रसिद्ध आहे; वस्तुपाल व तेजपाल हे दोन कर्तृत्ववान जैनधर्मी बंधू त्याच्या दरबारीं प्रधान व सेनापती म्हणून होते, व त्यांच्या साह्यानें तो मोठ्या कुशलतेनें राज्यकारभार चालवीत होता; तथापि लवणप्रसाद व वीरधवल या उभयतांनींही,-जरी तेच वस्तुतः राज्य चालवीत होते तरी,-राजा हें पद धारण केलें नव्हतें; प्रसिद्ध "कीर्तिकौमुदी" व "वस्तुपालचरित्र" या ग्रंथाचा कर्ता पंडित सोमेश्वर हा लवणप्रसादाचा गुरू असून तो व त्याचा मुलगा वीरधवल यांनीं अबू, गिरनार व शत्रुंजय टेंकडीवर प्रसिद्ध जैन मंदिरें बांधिलीं आहेत, आणि त्यांतल्या त्यांत अबूच्या पहाडावरील मंदिरें शुद्ध संगमरवरी दगडांची असून त्यांतील नक्षी वगैरेचें काम अप्रतिम व आग्रा येथील प्रसिद्ध "ताजमहाल" या इमारतीच्या खालोखाल आहे, अशी त्याची कीर्ती आहे;

लवणदेव गादीवर असतांना, देवगिरी उर्फ दौलताबाद येथील यादव ( उर्फ जाधव ) राजा सिंघण यानें, त्याच्या राज्यावर स्वारी केली; परंतु लवण-प्रसाद व वीरधवल या उभयतांनीं मिळून तिचा प्रतिकार केला; त्यामुळें सिंघण यास परत जाणें भाग पडलें; लवणप्रसाद यानें इ० सन १२३२ च्या सुमारास राज्यपद सोडून त्यावर आपला मुलगा वीरधवल याची स्थापना केली;

या वीरधवलाची कारकीर्द फार लहान म्हणजे फक्त पांच वर्षांचीच असून तो इ० सन १२३८ मध्यें मृत्यू पावला. त्यानें कच्छ देशाचा राजा भद्रेश्वर याचा पराभव केला. इतकेंच नव्हें तर महमद घोरीबरोबरील युद्धांत त्यानें बादशाही सैन्याचाही पूर्णपणें पराभव करून त्यास माघार घेणें भाग पाडिलें; वीरधवल हा इतका लोकप्रिय होता कीं तो मृत्यू पावल्यावर त्याच्याजवळील १८० सेवकांनीं त्याच्या चितेंत आपणास स्वखुषीनें जाळून घेतलें, इतकेंच नाहीं तर आणखीही कित्येक लोक त्या मार्गाचें अवलंबन करण्यास तयार होते; परंतु प्रधान तेजपाळ यानें त्यांना मनाई करून त्या कृत्यापासून परावृत्त केलें.

वीरधवल याच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा विसलदेव व त्यानंतर अर्जुनदेव, लवणदेव, सारंगदेव व कर्णदेव हे अनुक्रमें गादीवर आले; कर्णदेव यास कर्ण वाघेला अथवा घेलो ( म्हणजे भोळा अथवा मूर्ख ) अशी संज्ञा आहे. हा राजा मोठा विषयी व दुर्वर्तनी असून त्यामुळें त्यानें स्वतःवर व गुजराथ देशावर आपत्ती ओढून आणिली. राजा कर्ण याचा माधव या नांवाचा एक नागर प्रधान असून त्याची पत्नी विशेष रूपवती होती. कर्ण हा नीतिभ्रष्ट व विवेकशून्य असल्यामुळें या स्त्रीविषयीं त्याच्या मनांत पापवासना उत्पन्न झाली; आणि ती पूर्ण करण्याच्या दुष्ट हेतूनें, माधव हा घरीं नाहीं, अशी संधी साधून त्यानें तीस, बलात्कार करून राजवाड्यांत नेलें; यावेळीं माधव जरी हजर नव्हता, तरी त्याचा भाऊ केशव हा त्या ठिकाणीं हजर असून त्यानें आपल्या भ्रातृजायेस कर्ण राजाच्या तावडींतून सोडविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यास अपयश येऊन तो स्वतःच प्राणास मुकला. माधव परत आल्यावर त्यास ही हकीकत समजली; परंतु राजा कर्ण याच्यापासून आपली बायको सोडवून आण-ण्यास, अथवा त्याच्या ह्या दुष्ट कृत्याचा सूड उगविण्यास, तो असमर्थ अस-ल्यानें त्यानें निराळ्याच मार्गानें या गोष्टीचा वचपा काढून घेण्याचा निश्चय

केला; आणि कसेंही करून कर्णाचा नाश करावा या विचारानें तो दिल्ली येथें जाऊन अल्लाउद्दीन यास भेटला; व त्यास घडलेली सर्व हकीकत निवेदन करून गुजराथेवर स्वारी करण्यास त्याचें मन प्रवृत्त केलें; अल्लाउद्दीन हा मोठा महत्त्वाकांक्षी असून हिंदुस्थानांत आपला दिग्विजय वाढवीत नेण्याची त्यास विशेष उत्सुकता होती; त्यामुळें घर बसल्या अशी चालून आलेली संधी तो व्यर्थ दवडील ही गोष्ट शक्य नव्हती; म्हणून त्यानें ताबडतोब आपले सरदार आलफ्खान व नुसरतखान यांच्याबरोबर सैन्य देऊन त्यांची गुजराथ प्रांतावर रवानगी केली. राजा कर्ण हा नुसता दुर्व्यसनीच नव्हता; तर तो अतीशय भित्रा व नेभळा पुरूष होता; अल्लाउद्दीनचें सैन्य अनहिलपट्टणवर चाल करून येत आहे, असें त्यास कळतांच तो भीतीनें आपला जीव घेऊन पळाला; व मुसलमानांनीं त्याची राजधानी, इतकेंच नव्हें तर त्याचें सर्व राज्य व बायकोसुद्धां हस्तगत करून घेतली. राजा कर्ण यांस कमलादेवी या नांवाची एक रूपवती स्त्री असून तिच्या पोटीं झालेली देवलदेवी या नांवाची एक कन्या होती. राजा कर्ण हा या मुलीसह बागलाणाकडे पळून गेला; परंतु कमलादेवी मुसलमानांच्या हातांत सांपडली. तेव्हां त्यांनीं तिला अल्लाउद्दीन बादशहाकडे दिल्लीस पाठविली, व तिच्या सुंदर स्वरूपावर लुब्ध होऊन अल्लाउद्दीन यानें तिच्याशीं लग्न लावून तिला आपल्या जनानखान्यांत ठेविल. त्यानंतर आलफखान व नुसरतखान या उभयतां सरदारांनीं खंबायत व सोरटी सोमनाथ येथें लूट केली; पुढें इ० सन १३०४ मध्यें अल्लाउद्दीन यानें आलफ्खानास गुजराथचा सुभेदार नेमिलें; व अशा रीतीनें गुजराथ प्रांत मुसलमानी अमलाखालीं गेला.

याचवेळीं मलिक काफूर या नांवाचा एक हीन स्थितींतील मनुष्य उदयास आला. हा मनुष्य खंबायत येथें एका सावकाराजवळ गुलाम होता. यावेळीं खंबायत हें शहर विशेष भरभराटींत असून तेथील व्यापार फार जोरांत होता, व त्यामुळें तें शहर श्रीमान बनलेलें होतें; व अल्लाउद्दीनच्या उभयतां सरदारास त्या शहराची लूट करण्यासही, तेथील श्रीमंती हेंच कारण झालेलें होतें; व तेथील लुटींत या सरदारांनीं मलिक काफूर यासहस्तगत करून घेऊन व त्याची दिल्लीस अल्लाउद्दीन बादशहाकडे रवानगी केली होती. मलिक काफूर हा खरोखरीच कर्तृत्ववान होता, आणि या वेळीं त्यास त्याच्या नशिबानेंही भरभक्कम हातभार लाविला होता; त्यामुळें तो दिल्ली येथें गेल्यानंतर लवकरच

अल्लाउद्दीनची त्याच्यावर विशेष मर्जी बसली, आणि अकल्पनातीतरित्या तो पुढें अतिशय वैभवास चढला. इ. सन १३०३ मध्यें बादशहानें त्याजकडे वारंगूळचें राज्य हस्तगत करण्याची कामगिरी सोंपविली होती, व त्यानंतर इ. सन १३०६ मध्यें, त्यास दक्षिण प्रांत सर करण्यास पाठवून राजा कर्ण याची मुलगी देवलदेवी हिचाही तपास करण्यास बजाविलें होतें.

देवल देवीची आई व राजा कर्ण याची बायको कमलादेवी, ही बादशाहाच्या जनानखान्यांत राहिल्यानंतर तिला विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें, आणि विशेष आश्चर्याची ही गोष्ट आहे कीं, अल्लाउद्दीन यानें तिच्याच आग्रहावरून देवल देवीचा शोध लावून तिला दिल्लीस पाठविण्याविषयीं गुजराथचा सुभेदार अल्लाउद्दीन खिलजीचा भाऊ आलफ्खान यास, व मलीककाफुर यांस, मुद्दाम हुकूम दिले होते; मालिककाफुर हा दक्षिणेंत आल्यावर त्याच्या मदतीस आलफ्खान हा गुजराथेंतून निघाला, व आपला मार्ग क्रमीत देवगडपासून एक मजलेवर वेरूळच्या लेण्याजवळ तो येऊन पोहोंचला; त्या ठिकाणीं त्याचा मुक्काम असतां देवलदेवी ही अकस्मात त्याच्या हातांत सांपडली; तेव्हां बादशहाच्या हुकुमाप्रमाणें तो तिला घेऊन दिल्ली येथें गेला; तेथें गेल्यावर अल्लाउद्दीन यानें आपला वडील मुलगा शहाजादा खिजरखान याच्याशीं तिचें लग्न लावून दिलें; परंतु पुढें अल्लाउद्दीन मृत्यू पावल्यानंतर ( इ. सन १३१६ ) त्याचा दुसरा मुलगा मुबारिक यानें खिजरखानाचे डोळे काढून देवलदेवीस आपल्या जनानखान्यांत घेतलें; मुबारिक हा अत्यंत क्रूर व दुर्व्यसनी असून तो फक्त चारच वर्षे गादीवर राहिला. मलिक खुशरू या नांवाचा एक जाती भ्रष्ट गुजराथी त्याच्या विशेष विश्वासांतील असून तो यावेळीं मुख्य वजीर होता; त्यानें मुबारिक याची व खिलजी राजघराण्यांतील इतर सर्व मंडळींची कत्तल करून आपण राज्य बळकाविलें; त्यावेळीं दुर्दैवी देवलदेवीस त्यानें आपल्या जनानखान्यांत ओढिलें; परंतु मलिकखुश्रू हा अतीशय क्रूरकर्मी असल्यामुळें त्याचा अंमल सर्व प्रजेस अतिशय दुःसह झाला; ही संधी साधून पंजाबचा सुभेदार गाझीबेग यानें दिल्लीवर चाल करून येऊन तें शहर हस्तगत केलें; खुश्रूस ठार मारिलें, आणि ग्यासुद्दीन हें नांव धारण करून तो दिल्लीच्या तख्तावर आरूढ झाला. ( इ० सन १३२० ) हाच तुघ्लग, अथवा तुघ्लक घराण्यांतील पहिला

त्यानें या हतभागी देवलदेवीचा उत्तम बंदोबस्त करून दिला, आणि तिच्या आयुष्यांतील धिंडवडे वांचवून या दु:खदायक व हीन स्थितींतून तिची बऱ्याच प्रमाणांत सुटका करण्याचें श्रेय घेतलें.

गुजराथचा माजी राजा व देवलदेवीचा पिता कर्ण हाही इकडे अतिशय दु:खांत, हालअपेष्टेंत आणि अज्ञात स्थितींत लवकरच मृत्यू पावला आणि अशा रीतीनें गुजराथ प्रांत हिंदू राजांच्या अंमलाखालून निघून मुसलमानांच्या ताब्यांत गेला.

या काळांत गुजराथशिवाय रजपूत व इतर हिंदू घराण्यांचीं बरींच राज्यें उत्तर हिंदुस्थानांत अस्तित्वांत होतीं; तथापि त्यांच्यामध्यें आपसांत एकोपा अथवा जूट नसून उलट कित्येकांत तर परस्पर वैमनस्यें वसत होतीं. त्यामुळें मुसलमान लोकांनीं जेव्हां हिंदुस्थानावर दिग्विजय मिळविण्याकरितां एकसारखे हल्ले सुरू केले, तेव्हां त्या राज्यकर्त्यांनां एकजुटीनें त्यांचा प्रतिकार करितां आला नाहीं; आणि उलट त्यांपैकीं कित्येकांनीं मुसलमान लोकांसच प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत करण्यांत भाग घेतला असल्यानें तशा प्रतिकाराचा प्रयत्न करणाऱ्या कित्येक राज्यकर्त्यांनां त्यांत यश आलें नाहीं, व तसा प्रतिकार करूं इच्छिणाऱ्यांनां प्रमुखत्वानें पुढें येतां आलें नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं मुसलमान लोकांनीं त्यांना जिंकून आपल्या श्रेष्ठ सत्तेच्या आधीन करून घेतलें, आणि हिंदुस्थानांत त्यांचा अंमल चालू झाला.

हिंदुस्थानच्या उत्तर दिशेकडील संघटित राजसत्ता विस्कळित झाल्यावर गुजराथ, सिंध, व पंजाब, हे प्रांत मुसलमानांच्या अमलाखालीं गेले, व बंगाल आणि नर्मदा नदीच्या उत्तरेकडील कांहीं भाग, एवढाच प्रदेश कायतो एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या खास अंमलाखालीं राहिला. प्रसिद्ध राज्यकर्ता शिलादित्य उर्फ हर्षवर्धन याच्या मृत्यूनंतर चोहोंकडे बेबंदशाही माजली; तिचा फायदा घेऊन गुप्त घराण्यांतील एका पुरुषानें आपलें राज्य स्थापन केलें; या घराण्यांत जयगुप्त, हरिगुप्त व जीवितगुप्त वगैरे प्रसिद्ध राजे होऊन गेले; त्यांत जीवितगुप्त हा चक्रवर्ती राजा इ० सन ७४० च्या सुमारास राज्य करीत होता, असा दाखला आढळतो. पुढें या राज्यास उतरती कळा लागली, व इ०सन ८४० च्या सुमारास तर फक्त बंगाल व बहार या दोन प्रांतांवरच कायतो या गुप्त

घराण्याचा अंमल चालू राहिला; यापैकीं बहारप्रांत गुप्त घराण्याच्या सत्तेखालीं होता तरी त्या ठिकाणीं "पाल" या नांवाचें एक घराणें मांडलिक या नात्यानें राज्य करीत होतें; या घराण्यांतील गोपाल या नांवाच्या एका शूर पुरुषानें गुप्त राज्यास उतरती कळा लागल्याचें पाहून आपलें पाल घराण्याचें राज्य स्थापन केलें; (इ० स० ७३० ते ७४९ च्या सुमारास.) गोपाल हा बौद्धधर्मी असून त्यानें उदंडपूर येथें एक मोठा मठ स्थापन केला; त्याच्या राणीचें नांव देड्डा देवी हें असून हिच्या पोटीं त्यास धर्मपाल या नांवाचा एक मुलगा झाला; तो मोठा शूर व पराक्रमी असून त्यानें गुप्त घराणें नामशेष केलें, आणि बंगाल व बहार या प्रांतांवर आपल्या पाल घराण्याचा अंमल सुरू केला. तिबेटचा इतिहासकार तारानाथ याच्या म्हणण्याप्रमाणें या धर्मपालाचें राज्य बंगालच्या उपसागरापासून तों दिल्ली व जालंदरपर्यंत व दक्षिणेस विंध्याद्रीपर्यंत पसरलेलें होतें; त्यानें कनोजचा राजा इंद्रायुध यास पदभ्रष्ट करून व त्याचा मुलगा चक्रायुध यांस गादीवर बसवून त्या प्रांतावर आपलें वर्चस्व स्थापन केल. (इ० सन ८०० च्या सुमारास) त्यानें प्रसिद्ध विक्रमशीला या नांवाचा एक मोठा विस्तृत मठ स्थापन केला; या मठांत १०७ मंदिरें व सहा पाठशाला होत्या; धर्मपालानंतर देवपाल हा गादीवर आला; त्यानें अजमासें अठ्ठेचाळीस वर्षे राज्य करून कलिंग व आसाम, हे प्रांत आपल्या वर्चस्व कक्षेखालीं आणिले; त्यानंतर वाक्पाल व महिपाल हे राजे अनुक्रमें गादीवर आले; त्यापैकीं महिपाल हा विशेष लोकप्रिय असून अद्यापि त्याची कीर्ती ऐकूं येत आहे. तो इ०सन १०३० च्या सुमारास मृत्यू पावला. त्यानंतर जयपाल, विग्रहपाल, अथवा दुसरा महिपाल हे गादीवर आले; हा महिपाल फार अनीतिमान् होता; त्यामुळें राज्यभर त्याच्याविरुद्ध बंडें उद्भवलीं; त्यानें आपला भाऊ रामपाल यासही प्रतिबंधांत ठेविलें, आणि अनियंत्रीतपणें राज्यकारभार करूं लागला; तेव्हां कैवर्त वंशांतील दिव्य अथवा दिव्योक या नांवाच्या एका शूर पुरुषानें त्यास पदभ्रष्ट करून ठार मारिलें, व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. दिव्योकानंतर त्याचा पुतण्या भीम हा कारभार पाहूं लागला; याच्या कारकीर्दींत रामपाल यानें प्रतिबंधांतून आपली मुक्तता करून घेतली; राष्ट्रकूट घराण्याच्या साह्यानें भीमावर चढाई करून येऊन त्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें, आणि पालवंशाची गादी पुन्हा आपल्या ताब्यांत मिळविली. रामपालानंतर मदनपाल,

नारायणपाल वगैरे या घराण्यांतील राजे गादीवर आले, या राजघराण्याचे अमलांत बंगाल प्रांताची राज्यव्यवस्था सेन या नांवाच्या ब्राह्मण घराण्याकडे सोंपविण्यात आली होती; धर्मपालानंतर पाल घराण्याची राजसत्ता हळु हळु कमकुवत होत चालली होती; पुढें इ. सन. १०९५ च्या सुमारास सेन घराण्यांतील विजयसेन या नांवाच्या एका शूर पुरुषानें पाल घराण्याची बंगाल प्रांतावरील सत्ता नामशेष करून तो प्रांत स्वत: बळकाविला व तेथें आपल्या सेन घराण्याची स्थापना केली;

कलिंग राजाचा सरदार सामंतदेव ( अथवा सामंतसेन यानें दक्षिणेंतून येऊन बंगाल प्रांतांतील मयूरभंज संस्थानांतील काशीपुरी अथवा सांप्रतचें काशियारी ( काशिआरी ) येथें एक लहानसें राज्य स्थापन केलें होतें; या सामंतसेनाचा विजयसेन हा नातू होता; त्यानें पाल घराण्याच्या कारकीर्दींतील पाटणा हें राजधानीचें शहर बदलून नडिया उर्फ नदिया हें आपल्या राजधानीचें ठिकाण केलें; विजयसेनानंतर त्याचा मुलगा बल्लाळसेन हा अधिकारारूढ झाला; तो जातिविषयक व धर्मविषयक भेदाभेद व मतमतांतरें समसमान दृष्टीनें पाहणारा असून त्यानें ब्राह्मण व कायस्थ वगैरे जातींत कुलीन संप्रदाय सुरू केला, आणि मगध, भूतान, चितगांग, आराकान, ओरिसा व नेपाळ वगैरे प्रांतांत ब्राह्मण उपदेशक पाठविले. सेन घराण्यानें बंगाल प्रांताची सत्ता आपल्या हातांत घेतल्या वेळेपासूनच पाल घराण्याच्या सत्तेस पूर्ण ओहोटी लागत चालली होती. आणि पंचवीस वर्षांच्या आंतच, म्हणजे इ० सन १११९ मध्यें विजयसेनाचा नातू लक्ष्मणदेव याने तिरहुत किंवा सर्व उत्तर बहार प्रांत पाल राज्यकर्त्यापासून आपल्या ताब्यांत घेतला, त्यामुळें तें घराणें आतां नामशेष होऊन गेलें होतें; या सेन घराण्याकडे बंगाल व उत्तर बहार प्रांताची सत्ता अजमासें ऐंशी वर्षे टिकली; त्यानंतर इ० सन ११९९ मध्यें महमद घोरी याचा प्रसिद्ध सरदार बख्त्यार खिलजी यानें बंगाल व बिहार या दोन्हींही प्रांतांवर स्वारी करून व ते हस्तगत करून मुसलमानी सत्तेखालीं आणिले, व अशा रीतीनें पाल व सेन हीं दोन्हीं राजघराणीं नामशेष झालीं †

† या बाबातींत थोडीशी निराळी हकीकतही इतरत्र आढळून येते, ती अशी कीं, इ० सन ११९३ च्या सुमारास कुतबुद्दीनचा सेनापती महमंद यानें बिहार

दुसऱ्या गुप्त घराण्याचा लोप झाल्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत दोन प्रबळ राज्यें अस्तित्वांत होतीं; ( इ० सन ७८३ ) त्यांपैकीं एकाची राजधानी कनोज व दुसऱ्याची उज्जयनी हीं शहरें होतीं; उजयनी येथें गुर्जवंरशीय वत्सराजा राज्य करीत होता. हे गुर्जर लोक हूण लोकांबरोबरच हिंदुस्थानांत आले असावे, असा तर्क आहे; याच गुर्जर वंशांतील ज्या पुरुषांनीं कनोज येथें राज्य केलें, त्यांनां तोमार घराण्यांतील राज्यकर्ते अशी संज्ञा आहे. हें राज्य इ० सन ८४३ च्या सुमारास वत्सराजाचा नातू भोजराज पहिला यानें जिंकून आपल्या

---

प्रांत घेतला, व त्याच्याच पुढील वर्षी नडिया हें शहरही त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें; यावेळीं बिहार प्रांताच्या गादीवर इंद्रद्युम्न या नांवाचा राजा असून महंमदानें बिहारचा किल्ला हस्तगत केल्यानंतर तेथें पुष्कळ लूट मिळविली, तेथील मुंडण केलेल्या सर्व संन्याशांची कत्तल उडविली, आणि अशाच प्रकारचे इतरही अनेक अत्याचार केले, बिहार प्रांत काबीज केल्यानंतर पुढील वर्षी त्यानें बंगाल प्रांतावर स्वारी केली; त्यावेळीं आपलें सर्व सैन्य मागें ठेवून तो फक्त अठरा घोडेस्वारांनिशीं नुदिया उर्फ नडिया या राजधानीच्या शहरांत आला; महमुदाबरोबर सैन्य सरंजाम नसल्यामुळें तो कोणी सौदागर ( घोड्याचा व्यापारी ) असावा, असें समजून, तो थेट राजवाड्याच्या दरवाजाशीं येऊन दाखल झाला तरी, त्याचा कोणी तपास केला नाहीं; त्यानंतर दरवाज्यांतून आंत प्रवेश केल्याबरोबर त्यानें आपल्या लोकांसह तरवारी बाहेर काढिल्या, आणि वाड्यांतील लोकांवर ते सर्व मोठ्या आवेशानें तुटून पडले; त्यावेळीं राजा लक्ष्मणसेन उर्फ लक्ष्मणिया ( अथवा लक्ष्मण ) हा जेवत बसला होता; त्याला मुसलमानांच्या या हल्ल्याची बातमी कळतांच तो तसाच जेवण टाकून वाड्याच्या मागील दरवाजानें अनवाणीच पळाला. त्यामुळें राजवाडा आयताच महंमदाच्या हस्तगत झाला, व त्याच्या राण्या, दासदासी, इतर स्त्रिया, नौकर चाकर, खजिना व भरभक्कम जडजवाहीर मुसलमानांच्या हातीं सांपडलें; व अशा रीतीनें त्यांचा ह्या प्रांतावर अंमल सुरू झाला.

लक्ष्मणसेन हा मोठा न्यायी, व उदार असून गीतगोविंद ग्रंथाचा कर्ता जयदेव कवी याच्या राज्यांत व कारकीर्दीत होऊन गेला; लक्ष्मणसेनाचे अखेरचे दिवस मोठ्या आपत्तींत व अज्ञातवासांत गेले; महमदाच्या हल्ल्याच्या वेळीं तो पळून जगन्नाथपुरी येथें जाऊन राहिला, आणि तेथेंच तो अखेरीस मृत्यू पावला!

हस्तगत करून घेतलें. पुढें त्याचा नातू दुसरा भोजराज याच्या कारकीर्दीत बुंदेलखंडचा राजा यशोवर्धन हा स्वतंत्र झाला, व त्या राज्याचा मोठा झपाट्यानें ऱ्हास होण्यास सुरवात झाली. दुसऱ्या भोजराजाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा महिपाल हा गादीवर आला. त्यावेळीं नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशात राष्ट्रकूट घराणें राज्य करीत होतें. या घराण्यांतील राजा ध्रुव यानें तोमार घराण्याची सत्ता नामशेष करण्याकरितां महिपालबरोबर एक मोठें निकराचें युद्ध केलें; व त्यांत त्याचा पूर्ण पराजय करून त्याची सत्ता नामशेष होण्याच्या पंथास आणिली; ( इ० सन ९१७ च्या सुमारास ) त्यावेळीं या संधीचा फायदा घेऊन "परमार" या नांवाच्या एका घराण्यानें माळवा प्रांतांत आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें, व राजपुतान्यांत "चव्हाण" या नांवाचा दुसरा एक रजपूत वंश स्वतंत्र राज्याधिकारी बनला.

अशा रीतीनें गुर्जरवंशीय तोमार घराण्याच्या अंमलाखालीं फक्त कनोजचें राज्य कायम राहिलें, व त्या ठिकाणीं त्या घराण्यानें कसाबसा जीव जगवून इ० सन १०४० पर्यंत राज्य केलें. पुढें गहरवाड किंवा राठोड या नांवाच्या रजपूत घराण्यांतील चंद्रदेव या नांवाच्या एका पराक्रमी पुरुषानें बहुतेक तोमार राज्य हस्तगत करून घेऊन कनोज ही आपल्या राज्याची राजधानी केली, आणि अशा रीतीनें दिल्ली व त्याच्या आसपासचा थोडासा प्रदेश एवढाच कायतो तोमार घराण्याच्या ताब्यांत राहून त्यांचें वर्चस्व पूर्णपणें कमकुवत झालें. या वंशांत अनंगपाल या नांवाचा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. या अनंगपालानेंच प्रथम दिल्ली येथें किल्ला बांधिला असून त्यास लालकोट अशी संज्ञा आहे. त्यास पुत्र संतती नसून फक्त दोन कन्या होत्या; त्यापैकीं एकीचा, प्रसिद्ध पृथ्वीराज चव्हाण हा मुलगा होता; अनंगपाळास मुलगा नसल्यामुळें त्याचें राज्य अजमीर येथील चव्हाण वंशाकडे आलें.

हा चव्हाण वंश इ. सन ७८० पासून अजमीर येथें राज्य करीत होता. या घराण्यांतील चोवीसावा राजा सोमेश्वर यानें अनंगपाळ याच्या एका मुलीशीं लग्न केलें असून या दांपत्यापासून झालेला प्रसिद्ध पुरुष पृथ्वीराज चव्हाण हा होय; यास आपल्या वडिलांचें अजमीर येथील व अनंगपाल याचें दिल्ली येथील अशीं दोन राज्यें मिळालीं होतीं. या पृथ्वीराजाचें व कनोज येथील

राठोड राजा जयचंद याचें पुढें अतीशय वांकडे आलें; व पृथ्वीराजाचा पाडाव करण्याकरितां जयचंदानें महमद घोरी यास प्रोत्साहन दिलें; व शेंवटी इ. सन ११९३ मध्यें महमदघोरी व पृथ्वीराज यांच्यामध्यें स्थानेश्वर येथें भयंकर संग्राम होऊन त्यांत पृथ्वीराजाचा पराभव झाला, व तो महंमद घोरीच्या हातीं जिवंत सांपडला; त्यास घोरीनें ठार मारिलें व अशा रीतीनें हें चव्हाण घराणें नष्ट झालें.

स्थानेश्वरचें हें युद्ध ऐतिहासिकदृष्ट्या अतीशय महत्वाचें आहे; कारण या युद्धांत रजपूत सैनिकांचा जेवढा जमाव एकत्र झाला होता, तेवढा त्यापूर्वी कधींही एकत्र झालेला नव्हता; शिवाय हिंदुस्थानावर आलेली मुसलमानी सत्तेची जंगी व जोराची लाट थोपवून परतविण्याचा हिंदु राजे राजवाड्यांचा हा शेवटचा व मोठ्या निकराचा प्रयत्न असून तो निष्फळ झाल्यावर—म्हणजे मुसलमान लोक या युद्धांत विजयी झाल्यामुळें—हिंदुस्थान देशाचे ते राज्यकर्ते होणार ही गोष्ट बहुतेक ठरून चुकल्या सारखीच झाली होती; आणि आपसांतील मतभेद, फाटाफुट, व मत्सरभाव यामुळें स्वाभिमानी व वर्चस्वकक्षेबाहेर राहूं इच्छिणाऱ्या राज्यकर्त्यांस एक एकटे गांठून त्यांना नामशेष करण्यांत, आपल्या वर्चस्वाच्या आधीन झालेल्यांच्या मदतीनें इतरांनां नामोहरम करण्यांत, आणि अखेरीस त्यांच्यावर साध्या अथवा सक्तीच्या मार्गानें, व सरळ अथवा सायासाच्या रीतीनें आपलें पूर्ण व निर्विवाद वर्चस्व स्थापन करून कायम ठेवण्यांत ते यशस्वी होणार या गोष्टीची शंका घेण्यास फारसें कारण नसून ती गोष्टही वरील प्रमाणेंच निश्चित झाल्यासारखी होती.

कनोजाधिपती व राणी संयोगिता हिचा पिता जयचंद यानें दिल्लीपती पृथ्वीराज याचा पाडाव करण्याकरितां शिहाबुद्दीनघोरी याजकडेस आपलें वकीलमंडळ पाठवून त्यास निमंत्रण केलें, व पानपतच्या युद्धभूमीवर पराभूत झाल्यामुळें अपमानानें चिडलेल्या शिहाबुद्दीन घोरीनें पृथ्वीराजाचा सूड घेण्याकरितां आलेल्या संधीचा योग्य फायदा घेण्याच्या इच्छेनें त्याच्यावर स्वारी केली; आणि त्यास पूर्णपणें नामशेष करून टाकिलें. आपला "दुष्मनाचा कांटा" पृथ्वीराज हा आपण अशा रीतीनें पार उखडून टाकिला याबद्दल जयचंदास धन्यता वाटली असेल, आणि आनंदही झाला असेल; पण ती सैतानी

धन्यता, व तो असुरी आनंद, लवकरच खुद्द त्याचाच नाश करण्यास कारणीभूत झाला ! काळ नष्ट आल्यामुळें असला स्वार्थी कुलदीपक जन्मास आला; आणि शेवटीं स्वतःबरोबरच देशाचाही त्यानें आपण होऊन सर्वस्वीं घात करून घेतला ! !

जयचंदाच्या या अधोगतीस नेणाऱ्या वर्तनाचा काय परिणाम झाला ?— त्याचा परिणाम हा झाला कीं, जयचंदानें पृथ्वीराजास नामशेष करण्याकरितां बोलावून आणिलेल्या शिहाबुद्दीननें हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व स्थापन केलें, आणि देशद्रोही व स्वकीयांचा सूड उगविण्याकरितां तिऱ्हाइतास आपल्या घरांत आणणाऱ्या त्याच जयचंदाचा त्याच शिहाबुद्दीननें पुढील वर्षी पराभव करून ( इ० सन ११९४ ) त्यास नामशेष केलें, व अजमीरप्रमाणेंच कनोज शहराची त्यानें धूळधांण करून टाकिली. तेव्हां तेथील रजपूत राठोडवंश मारवाडांत गेला, व त्यानें जोधपूर येथें राज्यस्थापना केली.

इ. सन ११९३ मध्येंच अजमीर व दिल्ली येथील पृथ्वीराज चव्हाणाच्या राज्याप्रमाणें महोबा येथील चंदेल उर्फ चंडेल घराणें महमद घोरी यानें आपला सरदार कुतुबुद्दीन ऐबक याच्यामार्फत जिंकून तें आपल्या राज्यास जोडिलें; त्याप्रमाणेंच माळव्याच्या पवार उर्फ परमार घराण्याचीही मुसलमानांच्या हातूनच वाताहात झाली; हें घराणें कृष्णराय या नांवाच्या परमार वंशांतील एका पुरुषानें स्थापन केलें होतें; या घराण्यांतील तिसरा राजा हर्षदेव हा मोठा पराक्रमी पुरुष असून त्यानें राष्ट्रकूट राज्याची राजधानी मान्यखेट अथवा मालखेड हें शहर लुटिलें होतें. या घराण्याचे राजधानीचें ठिकाण क्षिप्रातीरीं असलेलें अवंती उर्फ उज्जनी हें शहर असून विद्वान लोकांचा संग्रहकर्ता प्रसिद्ध राजा भोज हा याच घराण्यांत निर्माण झाला होता. ( इ०सन— १०१० ) हें राज्य अल्लाउद्दीन खिलजी ( कारकीर्द इ०सन१२९६ ते इ०सन— १३१६ ) यानें जिंकून मुसलमानी राज्यांत सामील केलें, आणि याच्याच कारकीर्दीत मलिककाफूर याच्या प्रमुखत्वाखालील मुसलमानी सैन्याचा] नर्मदानदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत प्रथम प्रवेश झाला.

हिंदुस्थानच्या उत्तरेकडील भागांत, व सरहद्दीलगत काश्मीर, नेपाळ, आसाम, व तिबेट वगैरे राज्यें होतीं; त्यांपैकीं काश्मीर प्रांत अशोकाच्या वेळेस

मौर्य सामाम्राज्यांत मोडत होता; पुढें दुर्लभवर्धन या नावाच्या एका पुरुषानें आपला कर्कोट वंश ( हा कर्कोट वंश नसून नागवंश होता असा उल्लेख आढळतो. ) स्थापन केला; त्यानंतर चंद्रापीड व मुक्तापीड उर्फ ललितादित्य हे गादीवर आले. हा ललितादित्य मोठा शूर असून त्यानें कनोजचा राजा यशोवर्मा व आपल्या सरहद्दीलगतच्या तिबेट, भूतान व सिंध येथील हूण लोक, यांचा पराभव करून आपल्या राज्याचा बराच विस्तार केला; त्यानें सूर्याचें "मार्तंड" या नांवाचें मंदीर बांधिलें असून तें हल्लींही अस्तित्वांत आहे; काश्मीर देशांत कल्हण या नांवाचा एक पंडित रहात होता; त्यानें इ० सन ११४८ मध्यें "राजतरंगिणी" या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे; त्यावरून असें दिसतें कीं ललितादित्यानंतर गादीवर आलेला राजा जयपीड उर्फ विजयादित्य हा विशेष क्रूर व लोभी होता; व तो अनीतीच्या मार्गाचें अवलंबन करीत होता; यावंशानें इ० सन ६२७ पासून इ० सन ८५५ पर्यंत राज्य केलें; त्यानंतर उत्पल वंश अधिकारारूढ झाला; त्याचा मूळ पुरुष अवंतीवर्मा हा असून त्यानें इ० सन ८५५ पासून इ० सन ८८३ पर्यंत राज्य केलें. हा मोठा पराक्रमी व विद्वानांचा भोक्ता असून त्यानें काश्मीरांतील अवंतीपूर हें शहर वसविलें; त्याचा प्रधान सुय्य हाही मोठा प्रजादक्ष असून त्याच्या देखरेखीखालीं अवंतीवर्म्यानें लोकोपयोगाकरितां कित्येक तलाव व कालवे बांधिले; अवंतीवर्म्याच्या मृत्यूनंतर शंकरवर्मा गादीवर आला, परंतु तो जुलमी असल्याचा व त्यानें अनेक देवालयांची उत्पन्नें जप्त केल्याचा उल्लेख आढळतो; पुढें इ. सन ९१७ यावर्षी पार्थ या नांवाचा पुरुष गादीवर आला; तो मोठा क्रूर असून प्रत्यक्ष आपला बाप पंगू याचाही त्यानें खून केला; शिवाय हा नीतिभ्रष्ट असून त्यानें अनेक पशुतुल्य कृती केल्या; परंतु त्यास भयंकर व्याधी जडून इ. सन ९०९ यावर्षी तो मृत्यू पावला; त्यामुळें त्याच्या पुढील आयुष्यांतील लीला बंद पडल्या; त्याचा मुलगा उन्मत्तावंती हाही आपल्या बापाप्रमाणेंच दुष्ट असून बाप लोकांना चाबुकानें मारी तर मुलगा त्यांना विंचवाकडून दंश करवी; या उभयतां पिता पुत्रानंतर पुढें दिद्दा या नांवाची एक स्त्री गादीवर आली; तीही मोठी जुलमी होती व तिनें सतत पन्नास वर्षें अतीशय वाईट रीतीनें राज्यकारभार चालविला; तिच्यानंतर अकराव्या शतकांत कलश व हर्ष हे राजे गादीवर आले; त्यातील हर्ष हा

जुलमी होता असा उल्लेख आढळतो; त्यानंतर पुढें सेनदेव या नांवाचा राजा काश्मीर प्रांतांत श्रीनगर येथें राज्य करीत होता; त्यानें शहामीर या नांवाच्या एका तुर्की मुसलमानास आपल्या नौकरींत ठेविलें होतें; हा शहामीर कर्तृत्व-वान असून सेनदेवाचा मुलगा रणचंद्र याच्या कारकीर्दीत तो राज्याचा मुख्य प्रधान झाला होता; रणचंद्राच्या मृत्यूनंतर काशघरचा राजा आनंददेव यानें काश्मीरची राजसत्ता आपल्या हस्तगत करून घेतली, आणि शहामीर वगैरे सर्व मुसलमान लोकांस त्यानें नौकरींतून काढून टाकिलें; त्यामुळें अस्व-स्थता उत्पन्न होऊन त्या लोकांनीं शहामीरच्या धुरिणत्वाखालीं बंड केलें; तेव्हां मोठी चकमक उडून आनंददेव तींत मारला गेला; तथापि त्याची राणी कवला-देवी हिनें शहामीरच्या सैन्याबरोबर कांहीं काळ मोठ्या धैर्यानें व नेटानें तोंड दिलें; परंतु अखेरीस शहामीरनें तिचा पराजय करून काश्मीरचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें; आणि शमसुद्दीन हें नांव धारण करून इ० सन १३२६ मध्यें त्यानें काश्मिरांत आपला मुसलमानी अंमल चालू केला; राणी कवलदेवी ही अजमासें आठ वर्षांनंतर शमसुद्दीनबरोबर लग्न लावण्यास कबूल झाली, आणि इ० सन १३३४ मध्यें हें लग्न होऊन, काश्मीरमधील हिंदू राज्य नामशेष झालें.

दुसरें राज्य नेपाळ, हें असून मौर्यकुलोत्पन्न राजा अशोक याच्या प्रत्यक्ष अंमलाखालीं हा प्रदेश होता. समुद्रगुप्ताच्या वेळीं तें एक मांडलीक राज्य असून हर्ष राजानें त्या प्रांतावर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें होतें; त्यानंतर "ठाकूर" या नांवाच्या वंशांतील अंशुवर्मा या नांवाच्या मनुष्यानें नेपाळमध्यें आपल्या नव्या राज्याची स्थापना केली. मध्यंतरीं कांहीं काळ हा देश तिबेटच्या सत्ते-खालीं होता, परंतु पुढें तो स्वतंत्र होऊन इ० सन ८७९ या वर्षी नेपाळांत स्वतंत्र शक सुरू झाला; गुरखे लोकांनीं हा प्रांत जिंकून घेण्यापूर्वीं अयोध्येहून आलेले हरदेवसिंह यांचे वंशज, व नंतर मल्ल घराण्याचे वंशज हे नेपाळांत अनुक्रमें राज्य करीत होते; नेपाळ प्रांत आजतागायत कधींही मुसलमानांच्या ताब्यांत गेला नाहीं.

नेपाळच्या इतिहासावरून (History of Nepal by Munshi Shiv Shankar Sing and Pandit Shri Gunanand Edited by D.

Wright M. A. M. D. 1877 ) असें दिसतें कीं गोरखे, गुरखे, गोरखाली, अथवा गुरखाली हें नांव, गोरख अथवा गोरखा या नांवाचें नेपाळचें जें एक, काटमांडूपासून पश्चिमेस सुमारें चाळीस मैलावर जुन्या राजधानीचें शहर होतें त्यावरून तेथील राज्यकर्त्यांनां पडलें आहे. सर आलफ्रेड लॅायन यानें आपल्या ग्रंथांत ( British Dominion in India Page 294 पहा. ) गुरखे लोकांची उत्पत्ती सपाट प्रदेशांतील हिंदू व डोंगराळ प्रदेशांतील जाती यांच्या मिश्रणानें झालेली आहे, असें लिहिलें आहे; तथापि गुरखे लोकांची उत्पत्ती रजपुतापासून झाली आहे, आणि हल्लींचें तेथील राजघराणें हें उदेपूर येथील राजघराण्याची शाखा आहे, असें नेपाळच्या व राजस्थानच्या इतिहासावरून कळतें त्याप्रमाणेंच मुसलमान लोकांनीं राजपुतान्यावर स्वारी करून तेथील पुष्कळ लोकास राजपुताना सोडून पळून जाण्यास भाग पाडिलें त्यावेळीं गुरखे लोकांचे पूर्वज नेपाळांत जाऊन राहिले, असा उल्लेख आढळतो.

असें सांगतात कीं अती प्राचीन काळापासून सूर्य व चंद्रवंशांतील राजेलोक मुसलमानांच्या त्यांच्यावर स्वाऱ्या होईपर्यंत शांततेनें आपला राज्यकारभार करीत होते; परंतु मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यावर अशा पुष्कळ राज्यकर्त्यांची सत्ता नष्ट झाली. तथापि याच काळाच्या सुमारास सूर्यवंशामध्यें श्रीविक्रमादित्य आणि शालीवाहन हे अत्यंत पराक्रमी राजे निर्माण झाले, व त्यांनीं सूर्य व चंद्र घराण्यांतील पदभ्रष्ट झालेल्या राजांचा तपास काढून अजमासें आठशें राज पुरुषांनां पुन्हां पूर्वींप्रमाणें अधिकारारूढ केलें; त्यांमध्यें ऋषिराज राणाजी या नांवाचा एक चंद्रवंशीय राजा होता. त्यास भट्टारक हा किताब असून चितोरगड येथील राज्यावर त्याची स्थापना करण्यांत आली होती, या राणाजीच्या तेरा पिढ्यांपर्यंत हें राज्य स्वतंत्र होतें; या घराण्यांतील तेरावा राजा देशवर्मा भट्टारक यांस अयुतबन राणाजी या नांवाचा एक मुलगा होता. याच्या कारकीर्दींत मुसलमानांनीं चितोरगड काबीज करून अयुतबन यास आपला मांडलीक बनविलें; त्यानंतर बराबुवन, कनकबन व येशोबन असे तीन मांडलीक राजे चितोरगडच्या गादीवर आले; त्यानंतर अयुदुंबर हा पराक्रमी राजा गादीवर आला, त्यास " राव " हा किताब मोंगल बादशहाकडून मिळाला होता. अयुदुंबर हा या घराण्यांतील अठरावा पुरुष असून, भूपती उर्फ संगराणा या पुरुषापर्यंत एकंदर तेहतीस पुरुष या गादीवर विराजमान झाले;

भूपती उर्फ संगराणा यांस उदयबन उर्फ उदेसिंग, फत्तेसिंह व मन्मथ राणाजीराव असे तीन पुत्र होते; यापैकीं फत्तेसिंह यास एक अत्यंत लावण्यवती कन्या होती. तिच्या सौंदर्याची कीर्ती बादशहाच्या कानावर गेली, तेव्हां त्यानें या कन्येबद्दल राण्याशीं बोलणें लाविलें. परंतु राण्यानें बादशहाचें हें म्हणणें अमान्य केलें. तेव्हां बादशहानें चितोडगडावर स्वारी केली; व उभयतांमध्यें भयंकर रणसंग्राम होऊन त्यांत भूपतीराव, फत्तेसिंहराव आणि दुसरे हजारों रजपूत प्राणास मुकले; त्याप्रमाणेंच तेराशें रजपूत स्त्रियांनीं ह्या प्रसंगीं चिता पेटवून तींत आपले प्राण दिले, आणि ज्या फत्तेसिंहाच्या सुंदर कन्येमुळें हा घोर प्रसंग उद्भवला त्या कन्येनेंही तापलेल्या तेलाच्या कढईत उडी टाकून स्वतःचा प्राण नाश केला !

या प्रसंगांतून जे मागें राहिले त्यांपैकीं उदयबन राणाजीराव यानें उदेपूर शहराची स्थापना करून तो तेथें राज्य करूं लागला. या राण्यास ब्रम्हनीक आणि भूपाल असे दोन मुलगे होते. त्यांचें आपसांत कांहीं घरगुती कारणामुळें वैमनस्य आलें, तेव्हां भूपाल हा उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांत निघून गेला. ( इ. सन १४९५ ) व भीरकोट प्रांतांतील खिलुन या गांवीं जाऊन राहिला; तेथें त्यानें बरीच पडित जमीन लागवडीस आणून तो आपला उदर निर्वाह करूं लागला. या ठिकाणीं त्यास कांचा व मिचा असे दोन मुलगे झाले; त्यांपैकीं कांचा हा मोठा शूर होता; तो खिलुन येथून धोर येथें गेला, आणि मंग्राट प्रदेश जिंकून त्यानें गरहोन, सतुन, भीरकोट, व धोर या प्रदेशावर आपली राजसत्ता स्थापन केली; त्याप्रमाणेंच धाकटा मुलगा मिचा यानेंही नवाकोट येथें जाऊन तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. या घराण्यांत मीचा, जयन, सूर्य, मीचा ( दुसरा ) विचित्र व जगदेव हे सहा राज्यकर्ते अनुक्रमें गादीवर आले. यांपैकीं शेवटचा जगदेव याचा मुलगा कुलमंडण यानें कास्कीचें राज्य मिळविलें. यास मोंगल बादशहाकडून "शहा" हा किताब मिळाला होता; त्यास एकंदर सात मुलगे होते; त्यांपैकीं पहिला नवाकोट येथील गादीवर बसला, व दुसरा मुलगा काळू हा ल्यामगंज प्रांतांतील सेंख लोकांच्या दुरादांडा येथील गादीवर बसला; परंतु तो लवकरच मारला गेला, त्यामुळें यशोदन हा तेथील गादीवर आला; त्यास नरहरीशहा व द्रव्यशहा असे दोन मुलगे होते; त्यांपैकीं नरहरीशहा ल्यामगंजचा राजा झाला, व द्रव्यशहा हा गोरखा येथें जाऊन तेथील खास या नावाच्या जातीपैकीं खडका

या नांवाच्या लोकांचा पराभव करून त्यानें तेथील गादी मिळविली; ही गोष्ट इ० सन १५५९ मध्यें म्हणजे शके १४८१ भाद्रपद वद्य ८ रोहिणी नक्षत्रावर घडली.

गोरखा येथें या कुलांत द्रव्यशहानंतर पुरंदर, छत्र, रामदंबर, कृष्ण, रुद्र, पृथ्वीपती व नरभूपाल, पृथ्वी नारायण, प्रतापसिंह व रणबहादुरशहा हे अनुक्रमें गादीवर आले. पृथ्वीनारायण यानें नेपाळच्या सभोंवतालचा बहुतेक प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडिला. याच वेळेच्या सुमारास बंगालमधील मूर्शिदाबादचा नबाब—अथवा बंगालचा नबाब—कासीम अल्लीखान उर्फ मिरकासीम याचा इंग्रज लोकांनीं पराभव केला; तेव्हां तो नेपाळमध्यें पळून जाऊन नेपाळांत आश्रयास राहिला; व या उपकाराचें उतराई होण्याकरितां पृथ्वीनारायण यानें नेपाळी लोकांवर स्वारी केली त्या प्रसंगीं मकवानपूरच्या मार्गानें त्यानें सहा हजार फौज नेपाळकरांच्या मदतीस पाठविली; परंतु पृथ्वीनारायणाच्या सैन्यानें त्या फौजेचा नाश केला. त्यानंतर पांच हजार नाग लोकांची फौज नेपाळकरांच्या मदतीस येण्यास निघाली असतां पनावती येथें पृथ्वीनारायण यानें तिचाही पराभव केला; त्याप्रमाणेंच इंग्लिश क्याप्टन किनलॉक याच्या दिमतीखालची फौज सिंधूलीगरी येथें असतां तिचाही त्यानें पराभव केला; व नेपाळच्या आजूबाजूचा सर्व प्रदेश जिंकून त्यानें आपल्या राज्याची पूर्व सरहद्द थेट सुकीमपर्यंत वाढविली, व तो त्या प्रदेशांत एक बलिष्ठ सत्ताधारी बनून गेला; त्यानंतर रण बहादूरशहा, विक्रमशहा, राजेंद्र विक्रमशहा, सुरेंद्र विक्रमशहा, व पृथ्वीवीर विक्रमशहा ( इ० सन १८८१ मध्यें गादीवर आला. ) हे अनुक्रमें गादीवर आले; हेंच घराणें हल्लींही नेपाळ येथील राजघराणें म्हणून असून तेथील प्रधान पद सरजंगबहादूर याच्या घराण्याकडेस चालत आहे; व त्या घराण्याचा आणि तेथील राजघराण्याचा फार निकटचा शरीरसंबंध आहे. नेपाळ राज्यांत काटमांडू येथें इंग्रज सरकारतर्फे एक रेसिडेंट असतो; परंतु हें राज्य स्वतंत्र म्हणून गणलें गेलेलें असून त्यास तेथील राज्यकारभारांत हात घालितां येत नाहीं.

या बाबतींत आणखी असाही उल्लेख आढळतो कीं, ( British Dominion in India हें पुस्तक पान २९४-२९७ पहा. ) इ० सन १७६८ च्या सुमारास गुरखाली अथवा गुरखे लोकांच्या एका सरदारानें

बंगालच्या उत्तर बाजूस असलेल्या हिमालयाच्या दक्षिणेकडील उरतणीवरील बाजूचे सर्व पठार आणि दऱ्याखोऱ्या आपल्या हस्तगत केल्या; आणि त्याच्या पाठीमागून गादीवर आलेल्या राज्यकर्त्यांनीं औंध, रोहिलखंड, आणि पंजाबच्या सरहद्दीस भिडलेला गंगा व यमुना या नद्यांनीं सुपीक झालेला प्रदेश यांच्या उत्तरेकडील उंचवट्याच्या बाजूस असलेल्या मुलुखांतही आपली तरवार गाजविली; मोंगल राज्यकर्त्यांनीं ह्या दुर्गम डोंगराळ आणि रानटी प्रदेशांत आपला शिरकाव व्हावा म्हणून केव्हांही आस्था दाखविली नाहीं; हा प्रदेश पूर्वी लहान लहान हिंदु राजकर्त्यांच्या ताब्यांत होता; आणि ते खालील सपाट प्रदेशांतील लूट फाटीवरच बहुतांशीं आपला निर्वाह करीत असत परंतु गुरख्यांच्या प्रमुख सरदारानें बंगालच्या परिस्थितीवरून धडा घेऊन एक शिस्तीचें सैन्य तयार केलें आणि त्या सैन्याच्या मदतीनें त्यानें तेथील राज्यकर्त्यांना सहज पालथें घातलें. या सरदाराचे वंशज बराच काळपर्यंत राज्यशकट हांकीत होते; प्रत्येक राज्यकर्त्याच्या राज्यारोहणाच्या प्रसंगीं नेहमींप्रमाणें बेबंदशाही माजत असे, आणि शेवटीं इ०सन १८०५ मध्यें कटवाल्यांनीं त्याच्या नातवाचा खून केला. त्यानंतर एकाच राज्यकर्त्याच्या ताब्यांत तें राज्य पुष्कळ काळपर्यंत असें कधींच राहिलें नाहीं. आणी प्रमुख जातींपैकीं कांहीं उच्च दर्जाच्या लष्करी अधिकाऱ्याच्या हातात तो प्रदेश गेला. हे अधिकारी वंशपरंपरेच्या राज्यकर्त्यांना आपल्या नियंत्रणाखालीं ठेवितात, व त्याच्याच नांवानें राज्यकारभारही चालवीत असतात. ज्याअर्थी त्यांचें सैन्य युरोपियन पद्धतीनें तयार केलेलें व सज्ज ठेविलेलें होतें. कारण लष्करी बाबतींत इंग्लिश नमुन्याचें नेहमीं हुषारीनें अनुकरण करणारी गुरखा ही जात आहे–त्याअर्थी त्यांनीं पश्चिमेकडे लहान लहान डोंगराळ संस्थानापर्यंतच्या सर्व प्रांतावर आपली विजय पताका फडकवीत नेली होती, आणि इंग्लिशांच्या हद्दींतील हिमालयाच्या खालच्या प्रदेशांमधील भागांतहि अतिक्रमण करण्यास त्यांनीं सुरवात केली होती. हिमालय पर्वताच्या सरहद्दीवरील लहान लहान राज्यकर्त्यांमध्यें आणि बंगाल प्रांतांतील मोठमोठ्या धनाढ्य जमीनदारांमध्यें फार प्राचीन काळापासून हाडवैर चालत आलेलें होतें; कारण नेपाळच्या सरहद्दीवरील सर्व सरदारांनीं त्यांच्याजवळील खालच्या मैदानांतील जमिनीचा बराच भाग काबीज केला होता; परंतु ह्यावेळीं गुरख्यांनीं वरील सर्व पहाडी मुलूख आपल्या ताब्यांत घेतला असून खालील तळप्रदेश इंग्लिशांनीं आपल्या

सत्तेखालीं आणिला होता. ह्याचा परिणाम असा झाला कीं, तत्स्याला कारणीभूत असलेल्या ह्या सरहद्दीवरील सततच्या भांडणामुळें लवकरच ह्या दोन्हींही सरकारांमध्यें आपसांत बेबनाव उत्पन्न झाला. सरहद्दीवर असणाऱ्या नेपाळी अधिकाऱ्यांनीं ब्रिटिश प्रजेच्या ताब्यांतील जमीनीवर बेधडक आक्रमण केलें; बंगालच्या ताब्याखालील प्रदेशाची पट्टी आपल्या ताब्यांत घेतली, आणि मागें परत फिरण्याचें नाकारिलें; सरते शेवटीं इ. सन १८१४ मध्यें जेव्हां त्यांनीं इंग्लिशांचे दोन लहान प्रांत बळकाविले, तेव्हां लॉर्ड हेस्टिंग्स (गव्हर्नर जनरल) यानें नेपाळ सरकाराकडे अशी स्पष्ट मागणी केली कीं, त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांना परत बोलावून घ्यावें, आणि ब्रिटिश सरकारचा प्रदेश मोकळा करून द्यावा. परंतु त्या सरकाराकडून उडवा उडवीचें उत्तर आलें; त्यामुळें इंग्लिशांनीं आपल्या सैन्याच्या एका तुकडीकडून ते प्रांत पुन्हां परत आपल्या ताब्यांत घेतले, आणि गुरखा सरदारांनींही त्या सैन्यासमोरून त्या वेळीं शांतपणानें माघार घेतली. परंतु ब्रिटिश सैन्य तेथून परत फिरतें न फिरतें तोंच, गुरख्यांनीं इंग्लिशांच्या एका बंदोबस्ताच्या ठाण्यावर हल्ला केला, आणि सुमारें वीस इसमांची कत्तल उडविली. त्यानंतर नेपाळ सरकारनें रीतीप्रमाणें आपल्या सल्लागार मंडळांत खलबत केलें; आणि इंग्लिशांशीं युद्ध करण्याचा निश्चय केला. कारण ब्रिटिश सरकारला नेपाळच्या पहाडी प्रदेशांत कधींही आपला शिरकाव करून घेतां येणार नाहीं, असा तेथील सरकारचा समज करून देण्यांत आला होता.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार हे यानंतर नेहमीं त्या देशाच्या सभोंवतीं असलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या अंतः प्रदेशांत मोहिमी करण्यात मधून मधून आजपर्यंत गुंतलेलें असून "नेपाळ वरील मोहीम" ही त्यापैकीं पहिलीच होय. रणक्षेत्र होणारी सरहद्द जवळ जवळ सहाशें मैलपर्यंत पसरलेली होती; आणि थेट पहाडी मुलुखांत शिरण्याचे सर्व मार्ग शत्रूच्या ताब्यांत होते. इंग्लिशांनीं तीन निरनिराळया बाजूंनीं नेपाळच्या प्रदेशावर हल्ला केला; त्यापैकीं एकांत जनरल गिलेस्पी हा एका किल्ल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असतां त्याला मागें हटावें लागून तो ठार मारला गेला. नेपाळी सैन्यानें मोठया शौर्यानें व चिकाटीनें प्रतिरोध केला, तथापि ब्रिटिश सरकारानें त्या पहाडी प्रदेशांत अखेरीस आपलें वर्चस्व स्थापन केलें; आणि पश्चिमेकडील गुरख्यांच्या ताब्यांतील सर्व प्रदेशांतून त्यांची हकालपट्टी झाली. नेपाळ सरकारानें त्यानंतर नाइलाजानें

ब्रिटिश सरकाराशीं तह केला, आणि त्या तहाअन्वयें नेपाळ संस्थानच्या हद्दीच्या पश्चिम सरहद्दीपासून तों तहत सतलज नदीपर्यंत पसरणाऱ्या आसपासच्या अरण्यमय प्रदेशांसुद्धां वायव्येकडील सर्व लांबलचक पट्टी इंग्लिशांच्या ताब्यांत आली; म्हणजे रोहिलखंड व वायव्येकडील प्रांत यांचे वरील बाजूस थेट यमुना नदीपर्यंत पसरलेला सर्व डोंगराळ प्रदेश हिंदुस्थानच्या अगदीं लगत असलेल्या हिमालय पर्वताच्या रांगाच्या पायथ्याशीं लागून असलेला निम्न देशीय व मौल्यवान अरण्यभाग—ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत आला. हिमालय पर्वतांतील हे प्रदेश इंग्लिशांच्या ताब्यांत आल्यामुळें हिंदुस्थान सरकारच्या राष्ट्रप्रदेशाची सीमा हिंदुस्थान आणि तिबेट, अथवा क्याथे, हीं एकमेकांपासून अलग करणाऱ्या अत्युच्च पर्वताच्या—म्हणजे हिमालयपर्वताच्या—जलोत्सर्ग पठरापर्यंत, आणि त्याच्याही पलीकडे जाऊन धडकली. चीनचें सरकार हें फार पूर्वीपासून ब्रिटिश सरकारच्या हालचालींचें अत्यंत बारकाईनें आणि कळकळीनें निरीक्षण करीत होतें; आणि ह्या वेळेपासूनच ब्रिटिश राष्ट्राची सरहद्द चीनच्या राष्ट्राच्या सरहद्दीशीं जाऊन भिडलेली आहे. अशा रीतीनें नेपाळचे गुरखे सरदार ब्रिटिश सरकारच्या अत्यंत मौल्यवान प्रदेशाच्या वरच्या बाजूस असलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या अरुंद पट्टीमध्येंच जरी या वेळेपासून खिळले गेले, आणि जरी त्या देशांत कित्येक अंतर्गत क्रांत्याही घडून आल्या तरीही त्यांनीं लष्करी वर्चस्वाची आपली पद्धत आजपर्यंत तशीच कायम ठेविली आहे; व शिस्त ठेवून आणि बाहेरून शस्त्रास्त्रांचा पुरवठा करून घेऊन युरोपियन पद्धतीवर आपलीं सैन्यें तयार करण्याचें धोरणही त्यांनीं आतांपर्यंत त्याचप्रमाणें नेटानें चालू ठेविलेलें आहे. तथापि इ० सन १८१६ पासून, ह्मणजे इंग्रजांबरोबरील त्यांचें युद्ध समाप्त झालें त्यावेळेपासून, त्यांनीं ब्रिटिश सरकाराला कधींही त्रास दिला नाहीं, व इंग्लिशांनींही त्यांच्या संबंधांत आजपर्यंत केव्हांही ढवळाढवळ केली नाहीं. नेपाळचें लहानसें राज्य, हें हिंदुस्थान आणि चीन या दोन मोठ्याल्या राष्ट्रांमध्यें एखाद्या चिपेसारखें असून ( लायल साहेबाच्या म्हणण्या प्रमाणें ) उभयतांपैकीं कोणालाही आडकाठी मोडून टाकण्याची कोणत्याही प्रकारें बिलकूल इच्छा नाहीं.

गुरखे लोक हे बांध्यानें सडपातळ, ठेंगणे परंतु शरिरानें कसलेले व मजबूत असतात; नेपाळची राजधानी काटमांडू हें शहर असून या ठिकाणीं गुरखे लोकांची विशेष वस्ती आहे. हे बहुतेक लष्करी पेशाचे असून इंग्रज सैन्यांत

ही त्यांच्या पलटणी आहेत इंग्लिश पलटणीमध्यें नौकरींत असलेल्या गुरखे लोकांनां नेपाळांत "गुरुंग" असें म्हणतात; गुरखे लोकांच्या भाषेंत संस्कृत, हिंदी व मराठी शब्दांचा बराच भरणा आहे; त्यांच्या भाषेचें नांव "प्रभातिया" हें आहे; त्यांचें मुख्य दैवत तुळजा भवानी हें आहे. शिवाय शितळादेवी इत्यादि नांवेंही त्यांच्या मध्यें आढळतात.

तिसरें राज्य आसाम, यास कामरूप असेंही नांव आहे. या राज्याच्या पूर्व माहितीसंबंधीं समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभावरून असें दिसतें कीं हा देश गुप्त साम्राज्याच्या सरहद्दीवर असून तो गुप्त साम्राज्यास खंडणी देत होता. प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-एनत्संग याच्या प्रवासवृत्तावरून असें दिसतें कीं तो इ० सन ६४३ या वर्षी आसाममधील नालंद मठांत राहात असल्यावेळीं त्यास कामरूपच्या भास्करवर्मा उर्फ कुमार या राजानें आपल्या भेटीस येणें भाग पाडिलें होतें; व पुढें कनोजचा राजा हर्ष याच्या मागणीप्रमाणें भास्करवर्मा यास, त्याला कनोज येथें पाठवावें लागलें होतें; पाल घराणें उदयास आल्यानंतर हा प्रदेश त्यांच्या अमलाखालीं आला, व बाराव्या शतकांत कुमार पाल राजानें वैद्यदेव या नांवाचा आपला प्रतिनिधी त्या प्रांताचा कारभार पाहण्यास ठेविला होता. पुढें शान लोकांपैकीं आहोम टोळीनें इ० सन १२२८ पासून कामरूप उर्फ आसाम देशांवर सारखे हल्ले करण्याचा सपाटा चालविला, व अखेर तो प्रदेश हस्तगत करून घेऊन ते तेथील राज्यकर्ते बनले. हा प्रदेशही नेपाळ प्रांताप्रमाणेंच केव्हांही मुसलमानांच्या ताब्यांत गेला नाहीं; इतकेंच नव्हे तर जेव्हां मुसलमानांनीं तो हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला त्यावेळीं आसामी लोकांनीं तो निष्फळ केल्याशिवायही सोडिला नाहीं. इ० सन १२०४ मध्यें बखत्यार खिलजी यानें हा प्रांत सर करण्याकरितां दहा हजार सैन्यानिशीं त्यावर स्वारी केली, आणि पश्चिम सरहद्दीवरील ब्रह्मपुत्रा नदीच्या थडींतील करतोरिया नदीच्या कांठानें एके ठिकाणीं ब्रह्मपुत्रा नदीवरील वीस कमानीचा पूल ओलांडून दार्जिलिंगच्या उत्तर बाजूच्या पहाडा लगतच्या बाजूनें पंधरा दिवसांची मजल चालून आला; या ठिकाणीं आसामी सैन्यानें मुसलमानी सैन्यावर मोठ्या निकरानें आपले लांब भाले व धनुष्य बाण, यांनीं हल्ला केला, व त्यांत बखत्यारचें बरेंच सैन्य कापून काढिलें; इतक्यांतच, आपणावर दुसरी मोठी शिलकी फौज चाल करून येत आहे, असें त्यांस कळलें, त्यामुळें तो मागें परतला; परंतु आसामी लोकांनीं त्यास धड-

दाणा वैरगही मिळू दिलें नाहीं; त्यामुळें त्याच्या सैन्याचे फार हाल झाले; व तें सैन्य उपरिनिर्दिष्ट पुलावरून पलीकडे जात असतां त्याच्या दोन कमानी ऐन वेळीं आसामी लोकांनीं पाडून टाकिल्या व सर्व होडयांचाही नाश करून टाकिला; त्यामुळें त्याचें पुष्कळ सैन्य नदींत बुडून मरण पावलें, व तो स्वत: शंभर स्वारानिशीं पोहून अलीकडे आला म्हणूनच वांचला; आणि याच अपयशा-मुळ उद्विग्न होऊन बख्त्यार खिलजी पुढें लवकरच मृत्यु पावला; हा संस्मरणीय पूल गोहत्तीपासून अजमासें वीस मैलावर अद्यापि अस्तित्वांत आहे. परंतु हल्लीं ब्रह्मपुत्रानदाचा प्रवाह तेथून वीस मैल दूर गेला आहे; ब्रम्हपुत्रानदावर इतका जुना पूल दुसरा नाहीं; वरील स्वारी नंतरही हा प्रदेश हस्तगत करून घेण्याकरितां मुसलमानांनीं कित्येक स्वाऱ्या केल्या, परंतु त्याही आसामी लोकांनीं निष्फळ केल्या. इ० सन १८१६ मध्यें ब्रम्ही लोकांनीं आसाम प्रांत जिंकून आपल्या सत्तेखालीं आणिला; त्यानंतर इ० सन १८२५ मध्यें इंग्रजांचें ब्रम्ही लोकांबरोबर युद्ध झालें; त्यांत इंग्रजांनीं ब्रम्ही लोकांचा पराभव करून हा प्रांत आपल्या साम्राज्य सत्तेखालीं आणिला.

चवथें राज्य तिबेट हें असून त्याचा हिंदुस्थानाच्या पूर्व इतिहासाशीं विशेषच निकटचा संबंध आहे; हा प्रदेश इ. स. ५५० पर्यंत चीनच्या अमला-खालीं होता, परंतु त्यानंतर हूण ( यांना एफ्थॉलिटीज अथवा गोरहूण अशीही संज्ञा आहे. ) लोकांनीं हा प्रदेश आपल्या ताब्यांत मिळविला; यावेळीं या राज्यांत गांधार आणि काश्मीर या प्रांताचा समावेश होत असे तिबेटच्या राज्यावर हूण लोकांची सत्ता अल्प काळपर्यंतच टिकली, व इ० सन ५६५ मध्यें इराणी व तुर्क लोकांनीं त्या प्रदेशावर आपला अंमल बसविला, व पुढें तुर्क हे एकटेच त्या प्रांताचे राज्यकर्ते बनले; त्यानंतर इ० सन ६३० पासून इ० सन ६४८ पर्यंतच्या काळांत चीननें तिबेटवर पुन्हा आपलें वर्चस्व बसविलें; या काळांत स्त्रंगत्संग गंपो या नांवाचा राजा तिबेटमध्यें राज्य करीत असून त्यानें इ० सन ६३९ मध्यें ल्हासा शहराची स्थापना केली. हा राजा बराच कर्तृत्ववान असून त्यानें नेपाळची राजकन्या भृकुटी उर्फ हरिततारा व चीनची राजकन्या वेनशंग उर्फ धवलतारा या उभयतांशीं विवाह केले होते; इ० सन ७१३ नंतर हा प्रांत चीनच्या ताब्यांत गेला, आणि चिनी बादशहानें तुर्क,

अरब, व तिबेटी लोकांवर आपलें वर्चस्व स्थापून थेट काश्मीरच्या सरहद्दीपर्यंत आपला अंमल बसविला; परंतु इ. सन ७५१ मध्यें अरब लोकांनीं कलंक लोकांच्या मदतीनें चीनचा पूर्ण पराजय केला. * तथापि पुढें चीननें तिबेटवर आपलें वर्चस्व पुन्हां कायम केलें; कुशान वंशांतील पराक्रमी राजा

---

* अरब लोकांनीं चिनी लोकांचा पराभव केल्यानंतर युद्धांत पाडाव केलेले कित्येक चिनी कैदी त्यांनीं आपणाबरोबर समरकंद येथें आणून ठेविले; या चीनी लोकांना कागद कसा तयार करावा, ही माहिती होती; त्यामुळें त्यांनीं तेथें कागद तयार करण्याचा उद्योग सुरू केला, व तेथून ही कला पुढें युरोपांत गेली; त्यापूर्वी युरोपांत कागद कसा तयार करावा हें माहीत नव्हतें; अरब लोकांनींच, होकायंत्र, व बंदुकीची दारू पहिल्यानें शोधून काढून तिचा उपयोग केला; कित्येकांच्या मताप्रमाणें चिनी लोकांस कागद तयार करण्याची कृती व बंदुका तोफांची दारू व ती बनविण्याची कृती अगदीं पहिल्यानें माहिती होती; तथापि अरब लोकांमुळें कागद बनविण्याची कृती युरोपांत माहीत झाली, आणि तोफांचा पहिल्यानें उपयोग अरब लोकांनीं केला; व त्यानंतर फ्रान्सनें त्यांचें अनुकरण करून नंतर पुढें इतरांनीं त्यांचा उपयोग केलेला आहे; म्हणजे कदाचित इतर देशाला अथवा चीनला कागद व दारू वगैरेचीं माहिती असली व त्या गोष्टींचा त्यांनीं शोध लाविला असें गृहित धरिलें तरी कागद, होकायंत्र, व बंदुकीची दारू, यांचा योग्य उपयोग करण्याचें श्रेय अरब लोकांनाच दिलें पाहिजे; ('The Arabs invented at least made proper use of Paper, Compass, and Gunpowerd.) अरब लोकांनीं हे जे शोध लाविले त्यामुळें मध्य युगांत एकप्रकारें सुधारणेची लाट उसळून तिचे अनेक महत्वाचे व मननीय परिणाम घडून आले; इतकेंच नाहीं तर अरब लोकांनीं शोधून काढिलेल्या व योग्य तऱ्हेनें उपयोगांत आणिलेल्या —कागद, होकायंत्र व बंदुका—तोफांची दारू—या तीन गोष्टींमुळें जगातील वाङ्मय, राजकारण व युद्ध विषयक स्थिति, यांत पूर्णपणें बदल होऊन गेला; या बाबतींत वरील उताऱ्या शिवाय आणखी खालील प्रमाणें उल्लेख आढळतो:-

"We have set forth the causes and principal effects of the great wave of civilisation poured forth in the Middle Ages by the Arabs which rolled from the columns of Hercules to the confines of Asia."

कनिष्क ( कारकीर्द इ० सन १२५ पासून ) याच्या कारकीर्दीत चीन देशांत बौद्ध धर्माची स्थापना झाली; त्यानंतर अजमासें ६०० वर्षानंतर–इ० सन ७४३ ते ७८९ पर्यंतच्या पंचेचाळीस वर्षांत तिबेटांत बौद्ध धर्माचा मोठ्या झपाट्यानें प्रसार झाला; शांतरक्षित व पद्मसंभव या नांवाचे दोन साधू चीनच्या बादशहानें हिंदुस्थानांतून तिकडे नेले; आणि त्यांच्या मदतीनें विवक्षित प्रकारची धर्म-व्यवस्था सुरू केली; व तीच व्यवस्था लामा पद्धतीनें तिबेटांत सुरू होऊन आज-तागायत अस्तित्वांत आहे; इ०सन १७५१ मध्यें तिबेट प्रांत पूर्णपणें चीनच्या साम्राज्य सत्तेखालीं गेला, आणि इ० सन ७५१ नंतर चीन व हिंदुस्थान यांचे मधील राजकीय दळणवळण जे बंद पडलें तें इ० सन १८८५ मध्यें इंग्रजांनीं उत्तर-ब्रम्हदेश काबीज केल्यावर पुन्हां सुरू झालें; त्यामुळें या मधील काळांतील राजकीय संगतवार व निश्चित माहिती फारशी उपलब्ध नाहीं

वरील विवेचनांत सिंध प्रांतासंबंधी प्रसंगानुसार माहिती दिलेली आहेच. या प्रदेशाचाही पूर्व राजकीय इतिहास फारसा उपलब्ध नाहीं. बादशाहा शिकंदर याच्या ताब्यांत सिंधप्रांत आल्यानंतर तेथील बंदोबस्ताकरितां त्यानें पिथोन या नांवाच्या सरदाराची नेमणूक केली होती; परंतु शिकंदराच्या मृत्यूनंतर सिंधूनदाच्या पूर्वेकडील सिंधप्रांतासहच्या सर्व प्रदेशावरील ग्रीक सत्ता नष्ट झाली; ( इ०सनापूर्वी ३२२ या वर्षी ) पुढें इ०सनापूर्वी २०९ नंतर–म्हणजे सीरियाचा राजा ॲंटिओकस याच्या स्वारीनंतर, बॅक्ट्रियाचा राजा युथिडेमस यानें पश्चिम पंजाब, काबूल, व सिंधप्रांत, आपल्या हस्तगत करून घेतला. परंतु इ०सना पूर्वी १०० च्या सुमारास त्याचें हिंदुस्थानांतील राज्य नष्ट होऊन सिंधप्रांत त्याच्या अंमलाखालून गेला; मध्यंतरीं सिंध, व पंजाब, हे प्रांत चंद्रगुप्ताच्या अमलाखालीं होते; शिकंदराच्या मृत्यूनंतर त्याचें आशिया खंडांतील राज्य त्याचा सेनापती सेल्यूकस निकेटर याच्या ताब्यांत आलें; तेव्हां त्यानें चंद्रगुप्तापासून हे प्रांत परत

---

It remains to complete this vast picture, only to say a few words on certain Arabian discoveries which altered the literary, political, and military coditions of the entire world. These were:– Paper, Compass, and Gunpowder"

Historians History of the world vol III, page 274.

मिळविण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो निष्फळ करून त्यास चंद्रगुप्तानें माघार घेण्यास भाग पाडिलें होतें. ( इ. सनापूर्वी ३११ ) पुढें ठाणेश्वरचा राजा प्रभाकरवर्धन याचा धाकटा मुलगा व प्रसिद्ध राज्यकर्ता हर्ष याच्या कारकीर्दीत सिंध प्रांतांत सिंहरसराई या नांवाचा एक शूद्र राजा राज्य करीत होता; परंतु तो आळशी, अनीतिमान व व्यसनी होता; याच्या कारकीर्दीत इ. स. ६४६ मध्यें अरब लोकांनीं सिंध प्रांतावर स्वारी केली, व सिंहरसराई याचा पराभव करून त्यास व त्याचा मुलगा नामें साहसी यास ठार मारिलें; त्यानंतर सिंधचें राज्य त्याचा ब्राम्हण प्रधान चच याजकडे गेलें; त्यानें अजमासें चाळीस वर्षें राज्य करून तो इ. सन ६८६ या वर्षी मृत्यू पावला, व त्याचा मुलगा दाहीर हा गादीवर आला. याच्या राजधानीचें शहर आरोड हें असून तें बकर उर्फ भक्करच्या किल्ल्याच्या पायथ्याशीं होतें. यावेळीं बगदाद येथील अरबी खिलापती वर वलीद या नांवाचा एक खलीफा होता. या काळांत सिंध देशांतील देवल बंदरीं एक हजार मुसलमान तद्देशियांनीं पकडून ठेविले; तेव्हां ते लोक सोडून द्यावे, अशी खलीफा वलीद यानें दाहीर जवळ मागणी केली; परंतु हें बंदर त्याच्या ताब्याखालील नसल्यामुळें त्यास ती मान्य करितां आली नाहीं. तथापि त्याचें म्हणणें न ऐकतां खलीफानें महंमद कासीम या नांवाच्या एका शूर व तरुण सरदाराच्या हातांखालीं सैन्य देऊन त्यास आपल्या लोकांना सोडवून आणण्यास, व दाहीर राजाचें परिपत्य करण्यास, हिंदुस्थानांत पाठविलें; त्याप्रमाणें तो हिंदुस्थानांत आल्यावर पहिल्यानें देवल येथें गेला, देवल बंदर काबीज करून आपल्या लोकांची सुटका केली; तेथील देवालय हस्तगत करून घेऊन सर्व ब्राम्हणास कैदी केलें, व त्यांनीं मुसलमान होण्याचें नाकबूल केल्यावरून सतरा वर्षांवरील सर्व ब्राम्हणांची कत्तल करून, व बाकीच्यांना गुलाम करून, स्वदेशीं पाठविलें. त्यानंतर कासीमने दाहीर राजावर स्वारी करून त्याचा पराभव केला; या युद्धांत दाहीर मारला गेला, व त्याचा मुलगा जीवाच्या भीतीनें पळून गेला; तथापि त्याच्या राणीनें कांहीं काळ मोठ्या शौर्यानें त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; परंतु अखेरीस तिचा नाइलाज होऊन तिला माघार घेणें भाग पडलें, व सिंध प्रांत कासीमच्या ताब्यांत गेला; तेव्हां त्यानें दाहीरच्या प्रधानास खलिफा तर्फे तेथील प्रतिनिधी नेमिलें; व आपण स्वदेशास परत गेला. ( इ. सन ७११-७१२ )

महंमद कासीम यानें सिंध प्रांतांत, खंडणी उकळणे, हिंदूच्या देवालयांच्या बाबतीत अतिक्रमण करणें, निरापराधी लोकांची कत्तल उडविणें, लोकांस सक्तीनें धर्मांतर करण्यास भाग पाडणें, पुरातन बांधकामांचा विध्वंस उडविणें, व त्यांचे सामान व तयार साहित्य आपल्या नवीन इमारतींत उपयोगांत आणणें, वगैरे जे अनेक अनन्वित प्रकार केले, त्याचे परिणाम त्यास व त्याच्या ज्ञातिबांधवास लवकरच भोगावें लागले; कासीमच्या या कृत्यांचा प्रतिकार त्यावेळीं दाहीर राजास, त्याच्या मुलास, राणीस, अथवा प्रजेस, करितां आला नाहीं; पण त्या नंतर त्याच्या वडील मुलीनें आपलें पातिवृत्य जतन करून मोठ्या युक्तीनें त्याचा नाश केला. दाहीर राजास दोन मुली होत्या. व कासीम यानें त्यांनां बंदीवान करून खलीफा वलीद यांजकडे बगदाद येथें पाठविलें होतें. तेथें गेल्या-वर लवकरच खलीफाची त्याच्या वडील मुलीवर मर्जी बसली; परंतु आपण पवित्र राहून प्रसंगीं देह त्यागही करावा अशी तिची इच्छा होती; म्हणून तिनें कासीम याचा ही सूड उगविला जावा, व आपली ही इहलोकांतील भावी कष्टप्रद होऊं पाहणारी जीवन यात्रा पूर्ण व्हावी, अशी युक्ती योजिली, व तिनें "मजवर कासीमनें बलात्कार केल्यामुळें मी भ्रष्ट झालें आहे" असें खोटेंच खलिफास सांगितलें; त्यावरून त्यास कासीमचा अत्यंत राग येऊन कोणत्याही प्रकारें तपास न करितां अविचारानें त्यानें कासीम यांस ठार मारण्याचा हुकूम केला, व त्याचा वध करवून त्याचें प्रेत आपणा समोर आणवून दाहीर राजाच्या वडील मुलीस दाखविलें; तेव्हां तिला मोठा आनंद झाला, आणि ती खलिफा वलीद यांजकडे वळून त्यास म्हणाली, " माझ्या बापाचा व सर्वस्वाचा घात करणाऱ्या या दुष्ट कासीमाचा पूर्ण सूड घ्यावा एवढ्याच इच्छेनें मी त्याच्यावर असा खोटा दोषारोप केला होता; परंतु वास्तवीकरित्या मला त्यानें भ्रष्ट केलेलें नसून मी अगदीं पवित्र आहे." या मुलीचें हें भाषण ऐकून तिच्या ह्या वर्तना-बद्दल खलीफास अतीशय राग आला, आणि त्यानें तात्काळ तिचाही वध केला! महंमद कसीमच्या या स्वारी नंतर मुसलमान लोकांच्या असह्य धार्मिक जुलमा मुळें, तीस वर्षांच्या आंतच सिंध प्रांताच्या दक्षिण भागावरील मुसलमनी अंमल नष्ट झाला; व सुमेर या नांवाच्या रजपूत घराण्यानें त्या ठिकाणीं आपलें राज्य-स्थापन केलें; तथापि सिंधचा उत्तर भाग महमद घोरी यानें जिंकून तो सुलतान कुत्बुद्दीन याचा जांवई नासिरउद्दीन कुबा याच्या ताब्यांत दिला होता; पुढें

इ० सन १२२४ मध्यें सुलतान अल्तमश यानें नासिरउद्दीनवर सैन्य पाठवून त्याचा पराभव केला;व नासिरउद्दीन सिंधूनदांत बुडून मृत्यु पावला. त्यानंतर अजमासें दहा वर्षे या प्रदेशांवर मुलतानाचा ताबा राहिला; आणि इ० सन १३३६ मध्यें सुमेर वंशांतील अफ्रा या नांवाच्या शूर पुरुषानें दिल्लीपतीचा त्या प्रांतावरील अंमल झुगारून देऊन आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; या हिंदु घराण्यानें इ०सन १३८० पर्यंत राज्य केलें; त्यांतील शेंवटचा हिंदूराजा तिमाजी हा असून त्याच्या मृत्यूनंतर गादीवर आलेल्या पुढील रजपूत राजानें मुसलमानी धर्म स्वीकारिला;या राजांना "जाम"हीं संज्ञा असे;व ते पुढें मुसलमान झाल्यावर ही तीच संज्ञा त्यांच्या नांवामागें चालू असे; तिमाजीच्या मागून गादीवर आ-आलेल्या—व मुसलमानी धर्म स्वीकारिलेल्या या राजाचें नांव सलातीन हें होतें; त्याच्या मृत्यूनंतर (इ. सन १३९१ पासून इ० सन १५२० पर्यंत) अनेक राजे गादीवर आले; त्यांतील शेंवटला राजा फिरोज हा असून मुलतानचा राज्यकर्ता शहाबेग अर्घून यानें त्याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला, व सिंधप्रांत आपल्या राज्यांत सामील केला. अशा रीतीनें इ०सन१५२० मध्यें सुमेर मुसल-मान घराणें नष्ट होऊन मुलतानच्या राज्याच्या ताब्यांत गेलें; पुढें इ.सन१५९२ मध्यें अकबराच्या सैन्यानें मिर्झा जानीबेग याचा पराभव करून सिंधप्रांत मोंगली राज्यास जोडिला.

प्राचीन काळीं नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत जीं अनेक राज-घराणीं होऊन गेलीं, त्यामध्यें चालुक्य उर्फ साळुंके, राष्ट्रकूट उर्फ राष्ट्रकुंड, पल्लव उर्फ पालव, कदंब उर्फ कदम व शिलाहार उर्फ शेलार हींच प्रामुख्यानें आहेत. महाराष्ट्रांत, म्हणजे नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशांत, चालुक्य घराण्याचा अंमल प्रस्थापित होण्यापूर्वी तेथें पालव वंशीय राज्यकर्त्यांचा अंमल चालू होता; या पालव वंशांतील राजा त्रिलोचन याच्या कारकीर्दीत चालुक्य वंशांतील राज्य-कर्ता जयसिंह उर्फ विक्रमादित्य यानें आपल्या मोठ्या सैन्यासह दक्षिण देशावर स्वारी केली, व राष्ट्रकूट वंशांतील राजा कृष्ण याचा पराभव करून इ०सन ५५० च्या सुमारास दक्षिणेंत आपल्या चालुक्य घराण्याची गादी स्थापन केली; हें घराणें मूळ आयोध्येस राज्य करीत असून त्याचे हारित व मानव्य असे दोन योद्धे होते, व त्याच्या पासून या घराण्याची उत्पत्ती झाली होती; त्यांचें कुल-

दैवत कार्तिकेय हें असून त्यांच्या निशाणावर वराहाचें चिन्ह असे; ते आपणास सूर्यवंशीं रजपूत म्हणवीत असत; याच घराण्याची एक शाखा जयसिंहाच्या धुरिणत्वा खालीं दक्षिणेंत येऊन तिनें आपलें राज्य स्थापन केलें, व आजूबाजूचा प्रदेश हस्तगत करून घेऊन त्याचा विस्तार केला.

जयसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राजसिंह हा गादीवर आला; त्यास रणराग व विष्णुवर्धन अशीं दुसरीं दोन नांवें होतीं. हा मोठा पराक्रमी असून त्यानें कदंब, गंग, वगैरे राजांचा पराभव करून आपली सत्ता नर्मदा नदीपासून थेट रामेश्वरापर्यंत स्थापन केली होती; व पालववंशीय राजकन्येबरोबर विवाह करून त्यांना आपल्या पक्षाचे करून घेतलें होतें, असा उल्लेख आढळतो.

तथापि दक्षिण प्रांतांत माहीत असलेला चालुक्य वंशांतील अत्यंत पराक्रमी व प्रसिद्ध असा राज्यकर्ता म्हणजे जयसिंहाचा मुलगा पुलीकेशी—पहिला पुलिकेशी—हा होय. या पुलिकेशीनेंही पूर्व कालांतील भारतीय राज्यकर्त्यांप्रमाणें अश्वमेध यज्ञ केला; व विजापूर जिल्ह्यांतील वातापिपूर उर्फ बदामी ही नगरीं आपली राजधानी केली. याचें पूर्ण नांव "सत्याश्रय श्री पुलिकेशीं वल्लभ महाराज" हें आहे. यानें दक्षिणेंतील कलचुरी व राष्ट्रकूट या घराण्यांची सत्ता नाहींशी करून तेथें आपला अंमल बसविला; व कदंब घराण्याचें राज्य जिंकून पल्लवांच्या राज्याचाही बराच प्रदेश त्यानें आपल्या हस्तगत करून घेतला. पुलिकेशी नंतर ( इ० सन ५६७-५९१ ) त्याचा मुलगा किर्तिवर्मा हा गादीवर आला; तोही आपल्या पित्याप्रमाणेंच पराक्रमी असून त्यानें नळ व उत्तर कानडा प्रांतांतील वनवासी येथील कदंब राज्यकर्त्यांनां जिंकिलें, व उत्तर कोंकण प्रदेशावरील मौर्य राजास आपल्या सत्तेखालीं आणिलें. कीर्तिवर्मा याला दुसरा पुलिकेशी, या सर्वांत वडील मुलासह एकंदर तीन मुलगे होते; परंतु तो मृत्यु पावला त्यावेळीं ते अज्ञान स्थितींत होते; म्हणून कीर्तिवर्म्याचा धाकटा भाऊ मंगलीशहा हा गादीवर आला; (कारकीर्द इ० सन ५९१ ते इ० सन-६१० पर्यंत) हाही राज्यकर्ता कर्तृत्ववान असून त्यानें जबलपूर नजीकच्या चेदी देशाच्या कलचुरी राजाचा पराभव केला; त्यांच्या राजधानीचें शहर जबलपूरा जवळ त्रिपूर उर्फ तेवूर हें होतें; त्याप्रमाणेंच पूर्व व पश्चिम किनाऱ्यापर्यंतचा सर्व प्रदेश व वेंगुर्ल्याजवळील रेडी उर्फ रेवतीद्वीप या नांवाचें

ठिकाण त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें होतें; तसेंच तो मोठा धार्मिक प्रवृत्तीचा असून त्यानें बदामी येथें श्री विष्णूचें मंदिर दगडांत कोरून त्या मंदिराची पूजाअर्चा व नैवेद्य वगैरेच्या व्यवस्थे करितां स्वतंत्र गांवें नेमून दिलीं होतीं; सारांश "राज्यकर्ता" या दृष्टीनें मंगलीश हा पुष्कळच कर्तृत्ववान होता; व त्याची अजमासें एकूणीस वर्षांची कारकीर्दही बरीच वाखाणण्या सारखी होती; परंतु तो अतीशय स्वार्थी व आपमतलबी होता; त्यामुळें अनायासें हातीं आलेलें राज्य कीर्तिवर्मा याच्या वडील मुलांस—म्हणजे कायदेशीर हक्कदारास—न देतां, व न मिळूं देतां, आपल्या मागें आपल्या मुलाकडे व त्याच्या घराण्याकडे तें चालावें अशी त्याची इच्छा होती व त्या प्रमाणें, त्यानें बरीच धडपड केली होती; परंतु कीर्तिवर्म्याचा वडील मुलगा दुसरा पुलिकेशी यानें त्याचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडिला, व या भानगडींत मंगलीश मारला जाऊन पुलिकेशी हा राज्यपदारूढ झाला. (कारकीर्द इ० सन ६११ पासून इ. सन ६४२ पर्यंत) हा मोठा शूर व बुद्धिमान राजा असून त्यानें "सत्याश्रय श्री पृथ्विवल्लभ महाराज" असा किताब धारण केला होता; त्यानें राष्ट्रकूट राजा गोविंद याचा पराभव केला, आणि मौर्य, लाट, पाल, व गुर्जर, राज्यकर्त्यांवर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें, व कदंब राज्यकर्त्यांस जिंकून त्यांच्या राजधानीचें शहर बनवासी हें आपल्या ताब्यांत घेतलें. त्याप्रमाणेंच पश्चिम समुद्रावरील पुरी या नांवाच्या शहरावर आपल्या शेंकडों जहाजांच्या आरमारास सह हल्ला करून तें शहर ही त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें; या वेळीं कनोज येथें, प्रसिद्ध बाणकवीचा आश्रयदाता, हर्षवर्धन शिलादित्य हा राज्य करीत असून (इ० सन ६०६ ते इ० सन ६४८) तो उत्तरेकडील सर्व प्रदेशाचा सार्वभौम राजा झालेला होता; या हर्षवर्धनच्या मनांत नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रांतांत आपली सत्ता स्थापन करावी, अशी इच्छा उत्पन्न होऊन त्यानें दक्षिणेवर स्वारी केली; परंतु पुलिकेशीनें त्याचा पराभव करून त्यास मागें परतवून लाविलें, व पुढें अशाच प्रकारें अतिक्रमण होऊ नये म्हणून त्यानें आपल्या राज्याच्या उत्तर सरहद्दीच्या बंदोबस्ताकरितां नर्मदा नदीवर एक मोठें जोरदार सैन्य ठेवून दिलें; आणि या विजयाबद्दल "परमेश्वर" हें नामाभिधान धारण केलें; हा मोठा पराक्रमी व विजयी योद्धा असून, उत्तरेस विंध्य पर्वतापासून दक्षिणेस कन्याकुमारी पर्यंत, व पूर्व पश्चिम समुद्रापर्यंत, त्यानें आपल्या राज्याचा

विस्तार केला होता. तथापि उत्तरेस माळवा, व चेदी, म्हणजे वऱ्हाड व मध्य प्रांत, या प्रदेशांतील राज्यकर्ते व दक्षिणेकडील पल्लव, पांड्य व चोल देशीय राज्यकर्ते यांच्याबरोबर पुलिकेशी यांस सतत युद्धकलह करावे लागत असत; त्यामुळें त्यांच्यावर दडपण ठेवण्याकरितां त्यानें आपल्या राज्याचे दोन भाग करून पश्चिमेकडील भागाचा कारभार आपणाकडेस ठेविला, व पूर्वेकडील भागाची सर्व राज्यसत्ता व व्यवस्था त्यानें आपला कनिष्ट बंधु विष्णुवर्धन यांजकडे सोंपविली; या काळांत म्हैसूरच्या आसपासच्या " चेर " या नांवाच्या प्रदेशावर गंग या नांवाचें घराणें राज्य करीत होते; या उभयतां व कोसल आणि कलिंग येथील राज्यकर्त्यांनीं पुलिकेशीचें वर्चस्व मान्य केलें होतें; त्याप्रमाणेंच त्यानें उत्तर कोंकणांतील शिलाहार राज्यकर्त्यांच्या राजधानीचें शहर पुरी हें ( वर लिहिल्याप्रमाणें ) युद्ध करून आपल्या हस्तगत करून घेतलें होतें; त्यानें कांचीपूर, उर्फ कांजवेरम ( कांजी वरम् ) येथील राज्यकर्त्यास शह दिला, व त्यानंतर कावेरीनदी पलीकडील चोल, पांड्य, व केरळ येथील राजांवर स्वाऱ्या करून त्यांनां आपल्या श्रेष्ट सत्तेखालीं आणिलें;

प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएन्त्संग हा इ. सन ६३९ या वर्षी महाराष्ट्रांत आला होता; त्यावेळीं त्यानें त्या देशाची परिस्थिती पाहून व तेथील राज्यकर्ता पुलिकेशी यांची भेट घेऊन त्यासंबंधीं आपल्या प्रवास वृत्तांमध्यें जें वर्णन केलें आहे, तें मोठें मनोरंजक, व मनन करण्यासारखें आहे; महाराष्ट्र देशाला त्यानें आपल्या ग्रंथांत " मोहोलाक्स देश" असें नांव दिलें आहे; या देशांतील तत्कालीन स्थिती संबंधानें लिहितांना तो म्हणतो:--

"या देशाचा राज्यकर्ता रसतली म्हणजे क्षत्रीय जाती पैकीं असून त्याचें नांव पुलीकिशे हें आहे. त्याचे विचार प्रगल्भ व गंभीर आहेत; त्यास इतरांच्या सुखदुःखाविषयीं विशेष कळकळ वाटत असून तो अतीशय परोपकारी आहे; त्याचे प्रजानन पूर्ण स्वार्पण-पुरःसर भक्तीनें त्याची आज्ञा पाळितात. हल्लीं कनोज येथील राजा दुसरा शिलादित्य महाराज यानें पूर्व दिशेपासून पश्चिम दिशेपर्यंतचीं राज्यें जिंकून आपल्या हस्तगत करून घेतलीं आहेत, आणि दूरदूरच्या राज्यांवर त्यानें आपला शह बसविला आहे; परंतु एकटें महाराष्ट्र देशांतील लोकच कायते आज तागायत त्याच्या सत्तेच्या आधीन झाले नाहींत; या लोकांनां शासन करावें, व त्यांनां आपल्या सत्तेखालीं आणावें, म्हणून त्यानें

आपल्या राज्याच्या सर्व भागांतून सैन्य एकत्र गोळा केलें; आपल्या राज्यांतील सर्व लढावय्या सेनानायकांनां एकत्र जमवून आणिलें, व त्यांनां आपल्या बरोबर घेऊन त्यानें महाराष्ट्र देशावर स्वारी केली; परंतु त्याला अजूनही महाराष्ट्र देश जिंकून आपल्या स्वाधीन करून घेतां आला नाहीं;'' तो पुढें म्हणतोः- "महाराष्ट्राचा परिधी ६००० लीग—म्हणजे अजमासें बाराशें मैल—असून त्याच्या एकल्या राजधानीच्या शहराचाच परिधि तीस लीग-म्हणजे अजमासें सहा मैल—आहे, व त्याच्या पश्चिम बाजूस एक मोठी नदी वहात आहे. या प्रदेशांतील जमीनी सुपीक व उत्तम असून तिच्यांतून मुबलक धान्य उत्पन्न होतें; या देशाची हवा ऊष्ण आहे. येथील लोकांचे रीतिरिवाज साधे असून हे लोक प्रामाणीक आहेत; ते बांध्यानें उंच असून स्वभावानें पाणं दार व अभिमानी आहेत; जो कोणी प्रसंगी त्यांच्या उपयोगीं पडतो, किंवा साह्य करितो, त्याच्या बद्दल ते निःसंशय कृतज्ञभाव ठेवितात; परंतु जो कोणी त्यांनां चीड येण्यासारखें कृत्य करितो, त्याचा ते सूड उगविल्या शिवाय कधीं ही स्वस्थ रहात नाहींत; आणि जर कोणी त्यांचा उपमर्द केला, तर त्या अपमानचा डाग घालविण्याकरितां ते आपले प्राणही धोक्यांत घालण्यास भीत नाहींत. संकटांत सांपडलेल्या कोणत्याही मनुष्यानें त्यांची मदत मागितली तर ते त्याला लागलीच मोठया तत्परतेनें मदत करितात; इतकेंच नाहीं तर अशा प्रसंगीं आपल्या जिवाचें काय होईल या गोष्टीचाही ते विचार करीत नाहींत; आपल्या एखाद्या शत्रूनें केलेल्या अपकारा बद्दल त्याचा सूड घ्यावयाचा असला तर तो बेसावध असतां न घेतां त्यास पूर्वसुचना करून नंतरच घेतात. त्यावेळीं प्रत्येकजण आपल्या अंगांत चिलखत चढवितो, आणि आपल्या हातीं भाला घेऊन अपकाराचा सूड घेतो. युद्ध भूमीवरून शत्रू पराभुत होऊन पळाल्यास ते त्याचा पाठलाग करितात; पण जे त्यांना शरण येतात, त्या लोकांना ठार न मारितां ते अभय देतात. युद्धांत सेनानायकाच्या चुकीमुळें, अथवा निष्काळजीपणामुळं पराभव झाला तर ते त्या सेनानायकास शरीरदंडाची शिक्षा न देतां बायकांची वस्त्रें नेसवितात, व त्या अपमानामुळेंच त्यास जीव देणें भाग पडतें. राज्यकर्त्याच्या पदरीं आपल्या जिवाची यत्किंचित ही भीती वाटत नसलेल्या योध्यांचा मोठा संग्रह असून हे सेना धुरंधर जेव्हा युद्धाकरितां सज्ज होतात तेव्हां प्रत्येक प्रसंगीं, निशा यावी म्हणून मद्य प्राशन करितात; मग अमलानें धुंद झालेल्या ह्या

योद्धयांपैकीं प्रत्येक जण आपल्या हातीं भाला घेतो, आणि शत्रूकडील दहा हजार लोकांनाही तृणवत मानून तो त्यांच्याशीं, "लढाईला या" असें आव्हान करून युद्धास प्रवृत्त होतो. अशा स्थितींत त्या लढवय्या लोकांनीं मार्गांत भेटलेल्या कोणत्याही मनुष्यास ठार मारिलें तर त्याबद्दल त्यांना कायद्यांत शासन सांगितलेलें नाहीं; सरकारचें सैन्य कोणत्याही मोहिमेवर निघालें म्हणजे हे लढवय्ये नौबती वगैरे वाद्यांच्या तालावर डुलत डुलत मोठ्या तोल्यानें चालतात; शिवाय स्वभावानें क्रूर अशा शेंकडों हत्तीसही ते अंमल चारून मस्त करितात. शत्रूशीं मुकाबला होऊन हातघाईची वेळ आली असें दिसताच ते फार मादक मद्य घेतात; मस्त केलेल्या हत्तीसह आपली एक फळी करून ते शत्रूवर धांवत जाऊन तुटून पडतात, जें जें समोर येईल त्या सर्वांचा फन्ना उडवीत ते पुढें जातात, व त्यांच्या पुढें कोणत्याही शत्रूचा टिकाव न लागतां ते त्यास माघार घेण्यास लावितात; अशा प्रकारचे हे शूर लढवय्ये, व हत्ती, आपल्या पदरीं आहेत, म्हणून तेथील राज्यकर्त्याला मोठा अभिमान वाटतो; व त्यांच्या बळावर तो आसपासच्या राज्यांना कसपटाप्रमाणें मानून त्यांची अवहेलना करितो."

वरील विवेचनावरून महाराष्ट्रांतील तत्कालीन परिस्थिती संबंधीं पुष्कळच बोध होतो यांत संशय नाहीं; या राज्यकर्त्याची हिंदुस्थानाबाहेर ही कीर्ति पसरलेली असून त्यानें आपले वकील इराणचा राजा दुसरा खोश्रोझ उर्फ खुश्रू यांजकडे इ० सन ६२५–२६मध्यें पाठविले होतें; व परत भेटी दाखल त्याचे वकीलही पुलिकेशीच्या दरबारीं आले असून त्यांचा त्यानें मोठा मानसन्मान केला होता; त्यावेळच्या दरबाराचा देखावा, † अजिंठा येथील लेण्यांत नंबर

† अजिंठा हें गांव, व त्या गांवाच्या हद्दींतील हीं लेणीं निझाम सरकारच्या राज्यांत आहेत; तथापि तीं पूर्व खानदेशाच्या सरहद्दीस लागून आहेत; हीं लेणीं पूर्व खानदेश जिल्ह्याचें मुख्य ठिकाण जळगांव येथून अजमासें अडतीस मैलांवर असून जळगांवहून थेट अजिंठ्या पर्यंत नेरी, पहूर मार्गानें पक्की व उत्तम सडक आहे. या सडकेच्या मार्गावर वाकद हें खानदेशाच्या सरहद्दीचें शेंवटलें जामनेर तालूक्यांतील गांव असून त्यास मोंगलाईतील अजिंठा गांवची सरहद्द लागलेली आहे; त्यांस "फरदापूरचीं लेणीं" असें ही म्हणतात; कारण अजिंठ्या प्रमाणेंच फरदापुर हें मोंगली हद्दींतील गांव या लेण्यापासून अजमासें पांच मैलावर आहे;

एकऱ्या गुहेंतील चित्रांत मोठ्या उत्कृष्ट रीतीनें दाखविलेला आहे; आणि ऐतिहासिक दृष्टया हें चित्र अत्यंत माननीय असून शिवाय निरनिराळया अनेक गोष्टींचा निर्णय करण्यासही तें अत्यंत उपयुक्त व महत्वाचें आहे.

पुलिकेशी यानें आपला धाकटा भाऊ विष्णुवर्धन यांस आपल्या राज्याच्या पूर्वेकडील भागाचा कारभार सोंपविला होता; तथापि त्यापूर्वी त्यास व त्याहून धाकटा बंधु जयसिंह यांस, व विक्रमादित्याचे दोन बंधु, चंद्रादित्य व आदिवर्मा यांस, त्यानें अनुक्रमे सातारा, पढंरपूर, नाशिक, सावंतवाडी, व कृष्णा व तुंगभद्रा, ह्यां नद्यामधील प्रांत, या विभागांवर राज्यकारभार पाहण्याकरितां आपल्या तर्फें प्रतिनिधी म्हणून नेमिलें होतें. पुलीकेशीच्या मृत्यूनंतर त्याचा दुसरा मुलगा विक्रमादित्य हा गादीवर बसला; याच्या कारकीर्दींत कांची, चोल, केरल, पांडय, येथील राज्यकर्त्यांनीं चालुक्य सत्तेपासून स्वतंत्र होण्या करितां बंड उभारिलें; परंतु विक्रमादित्यानें तें दाबून टाकून त्यांनां पुन्हां आपल्या सत्तेच्या अंकित राहणें भाग पाडिलें; याच विक्रमादित्याच्या कारकीर्दींत प्राचीन काळच्या लाट या देशांत, म्हणजे दक्षिण गुजराथ मध्यें चालुक्य वंशाच्या एका शाखेनें आपलें राज्य स्थापन केलें; या वंशास

---

जळगांवा शिवाय दुसऱ्याही मार्गानें आतां या लेण्यास जाण्याची सोय झाली आहे; जी. आ. पी. रेलवेच्या पाचोरा स्टेशन पासून नुकतीच " पाचोरा-जामनेर रेलवे, " सुरू झाली आहे; त्या रस्तावर पहूर या नांवाचें एक रेल्वे स्टेशन असुन, तेथून हीं लेणी सडकेनें अजमासें तेरा मैलावर आहेत; तेथें जाण्यास जळगांव व पहूर येथून तांगा, अथवा बैलगाडी भाड्यानें मिळते, या लेण्यांतील चित्रें मोठी प्रेक्षणीय असून, आसपासचा देखावाही विशेष मनोहर आहे; मेजर जिल यानें मद्रास सरकाच्या हुकुमानें व खर्चानें या लेण्यांतील ह्या प्रेक्षणीय चित्रांच्या नकला केल्या, व नंतर त्या लंडन येथें " क्रिस्टल " राजवाड्यांत ठेवण्यांत आल्या होत्या; परंतु त्या राजवाड्याच्या दक्षिण भागास आग लागून तींत त्या जळून गेल्या, त्यानंतर मुंबई येथील " स्कूल ऑफ आर्ट " ( कला शिक्षणशाळा ] मधील मंडळीच्या मदतीनें मि० जान ग्रिफिथ्स यानें त्या पुन्हा तयार केल्या असून त्या हल्लीं लंडन येथील साऊथ–केनसिंग्टन मधील इंडियन म्यूझिम हिंद-वस्तु संग्रहालय-मध्यें ठेविलेल्या आहेत.

गुजराथेंत " सोळंखी वंश" असें म्हणत; याच कुळांत मूळराज सोळंखी या नांवाचा एक अतीशय पराक्रमी राज्यकर्ता निर्माण झाला; त्याची गादी अनहिलपट्टण उर्फ पाटण येथें होती. विक्रमादित्य मृत्यू पावल्यावर ( इ. सन ६८० ) त्याचा मुलगा विनयादित्य हा दक्षिण देशाच्या गादीवर आला; ( इ. सन ६८० ते इ. सन ६९६ ) हाही आपल्या वडिलाप्रमाणेंच शूर व कर्तृत्ववान असून त्यानें केरल, पांडय, चोल, कळंभ्र, हैहय, मालव, वगैरे राजांना आपल्या योग्य नियंत्रणाखालीं ठेवून आपल्या पक्षाकडे पूर्णपणें ओढून घेतलें होतें. त्याप्रमाणेंच कावेर, सिंहल वगैरे ठिकाणच्या राज्यकर्त्यांना त्यानें आपले खंडणी देणारे मांडलीक करून ठेविले होते; विनयादित्याच्या मागून त्याचा मुलगा विजयादित्य ( इ. सन ६९७ ते इ. सन ७३३ ) व त्यानंतर त्याचा मुलगा दुसरा विक्रमादित्य ( इ. सन ७३३ ते इ. सन ७४७ ) हे अनुक्रमें गादीवर आले; दुसऱ्या विक्रमादित्याच्या कारकीर्दीत पल्लव घराण्यानें त्याच्या सत्तेविरुद्ध पुन्हां उचल घेतली; त्यामुळें पल्लव राज्यकर्ता दंति पोतवर्मा याजबरोबर तुडाक प्रांतांत त्यास मोठें निकराचें युद्ध करावें लागलें; या युद्धांत दंतिपोतवर्मा याचा पूर्णपणें पराजय होऊन त्यास जिवाच्या भयानें समरभूमी सोडून पळून जाणें भाग पडलें; व विक्रमादित्यास त्यामुळें पुष्कळच निरनिराळी मौल्यवान लूट मिळाली; त्या नंतर त्यास कांची येथील राजा बरोबर ही युद्ध करावें लागलें; त्या युद्धांतही विक्रमादित्यानें त्याचा पुर्णपण पराजय करून त्यास हतवीर्य केलें; दुसऱ्या विक्रमादित्या नंतर त्याचा मुलगा कीर्तिवर्य अथवा कीर्तिवर्मा हा इ० सन ७४७ मध्यें गादीवर आला; हाही मोठा शूर असून त्यासही पल्लव राज्यकर्ता नंदिपोतवर्मा याच्या बरोबर, त्याच्यावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरीतां, पुष्कळ दिवस मोठया चिकटीनें झगडत रहावें लागलें, आणि किर्तीवर्म्यानें अखेरीस त्याचा पूर्ण पराजय करून त्याचें राज्यही आपल्या हस्तगत करून घेतलें; परंतु या युद्धांमुळें त्याचें स्वतःचें राज्यही अतीशय बळहीन झालें; त्यामुळें दंतिदूर्ग या नांवाच्या राष्ट्रकूट वंशांतीय एका मांडलीक राजानें कीर्तिवर्म्याशीं झगडून त्याचें राज्य हिरावून घेतलें, व महाराष्ट्रांत आपल्या राष्ट्रकूट घराण्याची गादी स्थापन केली. ( इ० सन ७५३. )

महाराष्ट्रांत आपली सत्ता स्थापन करितांना चालुक्य घराण्यास राष्ट्रकूट

घराण्याशीं युद्ध प्रसंग करावे लागले होते, व त्या घराण्यास पराभुत करूनच चालुक्य घराण्यानें त्या देशांत आपली गादी स्थापन केली होती; तथापि योग्य संधी मिळतांच राष्ट्रकूट घराण्यानें चालुक्य घराण्यास नामशेष करून त्या ठिकाणीं पुन्हा आपली गादी स्थापन केली होती. दंतीदुर्ग याच्या बापाचें नांव इंद्रराज असें असून त्याची आई चालुक्य कुळांतील होती; दंतिदुर्ग हा मोठा शूर असून चालुक्य घराण्याच्या राजसत्तेवर घाव घालण्यापूर्वी त्यानें अनेक पराक्रम करून आपलें सामर्थ्य वाढवीत नेलें होतें; चालुक्य घराण्याच्या कारकीर्दींत केरल, पाड्य, चोल, कांची वगैरे ठिकाणचे राज्यकर्ते चालुक्याच्या सत्तेस नेहमीं निर-निराळ्या प्रकारें त्रास देत असत; त्या मुळें त्यांचा प्रतिकार करण्याकरितां, व त्याच्यावर दडपण ठेवण्याकरितां कर्नाटक प्रांताच्या सरहद्दीवर चालुक्यांची मोठी फौज ठेविलेली असे, आणि हीच राज्याची मुख्य फौज ह्मणून ही असे; इतकेंच नव्हे तर या सैन्याच्या अस्तित्वावरच चालुक्यांची तिकडील सत्ता, व त्यांच्या राज्याचें सामर्थ्य हीं बहुतेक टिकलेली होती; या गोष्टीचा दंतिदुर्गानें मोठ्या धूर्तपणानें बरोबर अंदाज बांधून त्या सैन्यावर मोठ्या निकरानें हल्ला केला, व तें पूर्णपणें पराभुत करून टांकिलें; त्यामुळें स्वाभाविकरित्याच चालुक्य सत्ता हतबल झाली; तिच्या मुळांवर घांव घालून ती पार नामशेष करण्यास त्यास एकप्रकारें उत्तेजन व साधन मिळाल्या सारखेंच होऊन गेलें; व थोड्याशा सायासांतच यशःप्राप्ती मिळवून तो इ. सन ७५३ च्या सुमारास महाराष्ट्र देशाचा आधिपती बनला.

या राष्ट्रकूट राज्यकर्त्यांच्या राजधानीचें शहर मान्यखेट म्हणजे निझामाच्या राज्यांतील मालखेड उर्फ मलखेड हें असून प्रसिद्ध व विद्वान राज्यकर्त्यांची परंपरा ह्या दृष्टीनें तें शहर नावाजलेलें होतें. कारण "विजय धवल" या ग्रंथाचा कर्ता वीर सेनाचार्य "उत्तर पुराण" ग्रंथाचा कर्ता गुण भद्राचार्य व "महा पुराण" चा कर्ता जिन सेनाचार्य वगैरे प्रसिद्ध राजे याच ठिकाणीं निर्माण होऊन गेले होते. दंतिदुर्ग हा अतिशय पराक्रमी असून विशेष महत्वाकांक्षी ही होता; त्यामुळें चालुक्य घराण्याची राजसत्ता आपल्या हातीं मिळवूनच तो स्वस्थ बसला नाहीं, व तेवढ्यावरच त्याचें समाधान झालें नाहीं; त्यानें दिवसें दिवस आपलें सामर्थ्य व सत्ता वाढवीत नेण्याचा मोठ्या जोरानें प्रयत्न

आरंभिला. चालुक्य घराण्यास संपुष्टांत आणिल्यावर त्यानें कांची, कलिंग, कोसल, श्रीशैल, माल, लाट म्हणजे दक्षिण गुजराथ, व टंक येथील राज्यावर स्वाऱ्या करून तेथील राज्यकर्त्यांनां पूर्णपणें पराभुत केलें, व त्यांनां आपल्या श्रेष्ट सत्तेच्या आधीन होणें भाग पाडिलें. दंतीदुर्ग यांस पुत्रसंतान नव्हतें; त्यामुळें त्याचा चुलता व इंद्रराजाचा धाकटा भाऊ कृष्णराज उर्फ शुभतुंग हा त्याच्या मागून गादीवर आला. तो वास्तवीकरित्या दंतिदुर्गा इतका कर्तबगार नव्हता; तथापि हो अगदींच नालायक नसून बराच कर्तबगार व पराक्रमी होता. याच्या कारकीर्दींत पल्लव घराण्यानें आपलें पूर्व महत्व पुन्हां मिळविण्याचा प्रयत्न केला होता; परंतु कृष्णराज यानें त्यांची सर्व चळवळ चिरडून टाकून त्यांनां पूर्णपणें निःसत्व करून टाकिलें. मोंगलाईंत वेरूळ गांवाजवळ कांहीं प्रसिद्ध व प्रेक्षणीय कोरीव लेणी असून त्यांत कैलास या नांवाचें एक तर विशेष प्रसिद्ध व प्रेक्षणीय आहे; तें या कृष्णराजानेंच दगडांत कोरविलेलें असून सर्व जगांत या "कैलास" मंदिराचें काम अतीशय प्रचंड, प्रसिद्ध, व प्रेक्षणीय, म्हणून गणलें व नांवाजलें गेलेलें आहे. कृष्णराजा नंतर त्याचा मुलगा गोविंद उर्फ गोविंदराज हा गादीवर आला; परंतु तो कर्तृत्वहीन असल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ प्रभूतवर्ण उर्फ ध्रुव यानें त्यास पदभ्रष्ट केलें, व आपण राज्य पदारूढ झाला. प्रभातपूर्णाच्या मानानें हा पुष्कळच कर्तृत्ववान, शहाणा, व पराक्रमी, होता; त्यानें पालव वंशीय राजास जिंकून त्याजपासून खंडणी मिळविली, चेर देशाच्या राज्यकर्त्यांस जिंकून त्यास बंदीवान करून आणिलें, आणि प्रयाग जवळील कौशांबी येथील राजा वत्स यांस जिंकून त्याची राजछत्रेंही त्यानें हिरावून आणिलीं. प्रभात पूर्णाच्या मृत्यू नंतर त्याचा मुलगा गोविंद हा गादीवर आला; हा तिसरा गोविंद या नांवानें प्रसिद्ध असून राष्ट्रकूट घराण्यांतील हा सर्वांत अधिक पराक्रमी राजा अशी त्याची ख्याती आहे. युवराज असल्या वेळेपासूनच हा पुढें अत्यंत पराक्रमी राज्यकर्ता होईल, असें त्याच्या शौर्य, साहसादि गुणांवरून पूर्णपणें निदर्शनास आलें होतें; तो गादीवर आला न आला तोंच त्याच्या आसपासच्या बारा राजांनीं त्याच्या विरुद्ध एक भयंकर जूट निर्माण केली होती; परंतु त्यानें त्या सर्वांचा पूर्णपणें पराजय करून ती जूट पार धुळीस मिळविली. त्याच्या राजधानीचें शहर नाशिक जिल्ह्यांतील मयूरखंडी हें असून ते मोरखंड या नावाचा जो एक डोंगरी किल्ला आहे त्याच्या आसपास असावें असा अंदाज आहे. त्यानें गुजराथ व माळवा

या प्रांतावर स्वारी करून तेथील राजांना शरण येणें भाग पाडिलें, विंध्य प्रांतांतील राजा आपण होऊनच त्याच्या सत्तेच्या आधीन झाला; त्यामूळें त्यानें दक्षिण दिशेकडे आपला मोर्चा फिरविला, व पल्लव आणि वेंगी येथील राजांना त्यानें आपलें प्रभुत्व मान्य करण्यास भाग पाडिलें; अशा रीतीनें नर्मदा आणि तुंगभद्रा, या दोन नद्यांमधील खुद्द त्याच्या स्वतःच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशा शिवाय, उत्तरेस माळवा प्रांतापासून तो दक्षिणेस कांची वगैरे पर्यंतचा सर्व प्रदेश, त्याच्या सार्वभौम सत्तेखालीं आला; त्यापैकीं लाट प्रांतावर म्हणजे गुजराथ प्रांताच्या दक्षिण भागावर त्यानें आपला धाकटा भाऊ इंद्रराज यांस राजा बनविलें होतें; गोविंदाच्या मागून त्याचा मुलगा अमोघवर्ष हा गादीवर आला; ( इ०सन८१४ ते इ०८७७ ) हा मोठा शूर व पराक्रमी असून त्यास " राजराज " व " वीर नारायण " असे दोन किताब होते. त्यानें म्हैसूरचें गंग घराणें व कांची अथवा कांचीपूरचें पल्लव घराणें, त्या प्रमाणेंच अगदीं दक्षिणेकडील चोल, व पांड्य, हीं घराणीं, आपल्या अंकित केलीं होतीं; शिवाय उत्तर कोंकण प्रांतातील शिलाहार राजे पुलिकेशी व त्याचा मुलगा कपर्दी, यांनींही त्याची श्रेष्ठ सत्ता मान्य केली होती. कान्हेरी येथील कोरिव लेण्यात अमोघवर्षाचें नांव दिलेलें आहे; त्यावरून तीं त्याच्या कारकीर्दींत खोदविलीं गेलीं असावी, असा अंदाज आहे; अमोघवर्षाची जैनधर्माच्या दिगंबर पंथावर भक्ति होती; प्रसिद्ध "आदिपुराण" या ग्रंथाचा कर्ता जीनसेन हा त्याचा गुरू होता; त्यास गुणभद्र या नांवाचा एक मुलगा होता; त्यानें या ग्रंथाचा उत्तर भाग लिहिला असून तो " उत्तर पुराण " या नांवानें प्रसिद्ध आहे. अमोघ वर्षाची कारकीर्द फार मोठी म्हणजे बासष्ट त्रेसष्ट वर्षांची असून त्यानें इ० सन ८१४ ते इ०सन ८७७ पर्यंत राज्य केलें, अमोघवर्षानंतर त्याचा मुलगा अकालवर्ष हा गादीवर आला; त्यानें हैहय कुळांतील चेरी देशाच्या राज्यकर्त्याच्या मुलीशीं विवाह केला होता, या स्त्री पासून त्यास जगत्तुंग या नांवाचा एक मुलगा झालेला होता. परंतु अकाल वर्षाच्या मागें तो गादीवर न येतां त्याचा मुलगा इंद्रराज हा गादीवर आला. (इ० सन ९१२ ते इ. स. ९१६) या इंद्रराजानें ही हैहय वंशांतील विजया अथवा विजयांबा या नांवाच्या राजकन्येशीं विवाह केला होता; तिच्या पासून त्याला अमोघवर्ष, व गोविंद, असे दोन मुलगे झाले होते, इंद्रराजाच्या मागून अमोघ वर्ष हा गादीवर आला, ( इ० सन ९१६ ) परंतु त्याचा धाकटा भाऊ

गोविंद [ चवथा ] यानें त्याला पदभ्रष्ट करून स्वतः राजगादी बळकाविली; [इ०सन ९१७] हा ही राज्यकर्ता बराच उदार व शूर होता, अशी त्याची ख्याती आहे. त्यास प्रभूत वर्ष, व सुवर्ण वर्ष, अशीं दुसरींही दोन नांवें होतीं; हा मोठा शंकर भक्त असून त्यानें अनेक शिवालयें बांधिलीं, व वेंगी येथील चालुक्य राज्यकर्त्यांशींही त्यानें अनेक युद्ध प्रसंग केले; चवथ्या गोविंदाच्या पाठी मागून त्याचा चुलता, म्हणजे चगत्तुंगाचा दुसरा मुलगा वद्दिग हा, [ इ० सन ९३९ ते इ. सन ९४० ) त्यानंतर त्याचे दोन मुलगे कृष्णराज, व खोटिक, व त्यानतर कक्कल—हे अनुक्रमें गादीवर आले; तथापि अमोघ वर्षाच्या मृत्यूनंतरच्या काळापासूनच या राज्यास उतरती कळा लागण्यास प्रारंभ झाला होता; व हें घराणें खोटिक याच्या कारकीर्दीच्या अखेर पर्यंत ( इ. सन ९६५ ते इ. सन ९७१ ) कसें तरी जीव धरून जिवंत राहिलें होतें; परंतु कक्कलच्या कारकीर्दीत इ. सन ९७३ मध्यें उत्तरकालीन चालुक्य वंशातील राजा दुसरा तैलप यानें देवगिरी येथील यादव उर्फ जाधव राज्यकर्त्यांच्या मदतीनें, याच्यावर स्वारी करून, त्यास पदभ्रष्ट केलें; व राष्ट्रकूट घराण्याचा शेवट करून त्या ठिकाणीं आपल्या चालुक्य घराण्याची पुन्हां स्थापना केली. या राष्ट्रकूट घराण्यानें इ. सन ७५३ पासून इ. सन ९७३ पर्यंत, म्हणजे २२० वर्षें महाराष्ट्रावर राज्य केलें; त्यानंतर या घराण्याचा लोप होऊन "चालुक्य" हें घराणें महाराष्ट्र देशाचें आधिपती बनलें.

राष्ट्रकूट घराण्याला नामशेष करून ज्या काळांत तैलप यानें महाराष्ट्रांत आपल्या चालुक्य घराण्याची सत्ता स्थापन केली, त्याच काळाच्या सुमारास गुजराथेंतील अनहिल पट्टण उर्फ पाटण येथील चावडा कुळांतील शेवटचा भोजराजा याच्या कन्येशीं साळुंखे उर्फ चालुक्य घराण्यातील राज्यकर्ता मूळराज यान विवाह करून तेथें आपल्या घराण्याची गादी स्थापन केली हा मूळराज कल्याण येथील जयसिंह चालुक्याचा मुलगा होता; तैलप हा महाराष्ट्राचा राजा झाल्यावर त्यानें चोळ व चेदी वगैरे राज्यकर्त्यांबरोबर युद्ध प्रसंग करून त्यांना पूर्णपणें जेरीस आणिलें होतें; पुढें त्यानें आपल्या बारप या नांवाच्या एका सेनानायकास मूळराजावर स्वारी करण्यास पाठविलें होतें; परंतु तींत त्याच्या सैन्याचा पराभव होऊन त्यास माघार घेणें भाग पडलें होतें; त्यानंतर

त्यानें माळवा प्रांतावर स्वारी केली, व तेथील राजा मुंज ( प्रसिद्ध भोजराजाचा चुलता ) याचा पराभव केला; या युद्धांत तैलपानें मुंजराजास बंदीवान केलें, व पुढें त्याचा शिरच्छेद केला; त्यानंतर लाट अथवा दक्षिण गुजराथ प्रांतही कांहीं काळानें त्याच्या स्वामित्वा खालीं आला. या तैलपानें राष्ट्रकूट घराणें नामशेष केलें होतें; तरी त्यानें त्याच घराण्यांतील शेवटचा राजा कक्कल याची कन्या नामें जाकब्बा हिचे बरोबर विवाह केला होता; या स्त्री पासून त्यास सत्याश्रय, व दशवर्म, असे दोन मुलगे झाले; त्या पैकीं तैलपाच्या मृत्यूनंतर ( इ. सन ९९७ ) त्याचा वडील मुलगा सत्याश्रय हा गादीवर आला; परंतु तो पुत्रसंतान विरहित वारल्या मुळें ( इ सन १००९ ते इ. १०१६ ) त्याच्या मागून त्याचा धाकटा भाऊ जयसिंह उर्फ जगदेकमल्ल, हा गादीवर आला; हा जयसिंह बराच पराक्रमी असून त्यानें माळवा प्रांतांत आपल्या विरुद्ध झालेला एक बलिष्ट कट मोठ्या हिंमतीनें चिरडून टाकिला, व चेर व चोल येथील राज्यकर्त्यांवर स्वारी करून त्यांना ही त्यानें आपलें अंकित केलें; मालवाधिपती परमारवंशी राजा मुंज याचा तैलपानें शिरच्छेद केल्या वेळेपासून या घराण्याचें चालुक्य घराण्याशीं मोठें वैमनस्य उत्पन्न होऊन तें वृद्धिंगत होत गेलें होतें; व जेव्हां जेव्हां संधी मिळेल, त्यात्या वेळीं चालुक्य सत्ते विरुद्ध माळवा प्रांतात निरनिराळीं कारस्थानें, कट व फंद फितूरी उत्पन्न होत होती; त्यामुळें जयसिंहाने जरी माळवा प्रांतांत त्याच्या विरुद्ध झालेला उपरी निर्दिष्ट एक प्रबळ कट नामशेष करून टाकिला होता, तरी चालुक्य सत्ते विरुद्धची तेथील चळवळ व खटपट यत्किंचित्ही शिथिल झाली नव्हती; व आपल्या विरुद्धच्या ह्या चळवळी खटपटी मोडून काढण्या करिता गादीवर आलेल्या प्रत्येक चालुक्य राज्यकर्त्याला माळवा प्रांतावर स्वारी करावी लागली होती. अशा स्थितींत माळव्याच्या गादीवर या वेळीं असलेला प्रसिद्ध राजा भोज यानें राजरोसपणें मुंज राजाच्या वधाचा चालुक्य घराण्यावर सूड घेण्याचा निश्चय केला: मध्यंतरीं जयसिंह हा ( इ. सन १०४० मध्यें ) मृत्यू पावला, व त्याचा मुलगा सोमेश्वर हा गादीवर आला; तो जयसिंहाच्या मानानें विशेष शूर व कर्तृत्ववान होता; त्यानें गादीवर आल्यावर गुजराथचा राजा भीमदेव याची मदत घेऊन माळवा प्रांतावर स्वारी केली; भोज राजाचा पराभव करून त्याची राजधानी जें धार शहर तें ही आपल्या हस्तगत करून घेतलें; व माळवा प्रांतांतील आपल्या विरु-

द्च्या सर्व भानगडी मिटवून टाकिल्या; शिवाय त्यानें चोलराजावर दोन तीन स्वाऱ्या करून त्या नंतर चेंदी देशावर ही स्वारी केली; त्या वेळीं त्या ठिकाणीं कर्ण या नांवाचा राजा राज्य करीत असून त्रिपुर उर्फ तेवूर हें त्याच्या राजधानीचें शहर होतें; या स्वारींत त्यानें कर्णाचा पराभव केला, व समुद्र कांठच्या प्रदेशावर स्वारी करून तो प्रदेश हीं त्यानें आपल्या हस्तगत करून घेतला; त्या नंतर तो दक्षिणेकडे परत येत असतां त्यास चोल राज्यकर्त्यानें मध्यंतरीं अडविले; परंतु सोमेश्वरानें त्याचा पराभव करून त्याच्या राजधानीचें शहर जें कांची तें हस्तगत करून घेतलें, व त्यास शरण येणें भाग पाडिलें; त्यानंतर त्यानें कनोज येथील राजावर स्वारी केली, व त्याचा पराभव करून त्यास ही आपल्या नियंत्रणांखालीं आणिलें; आहव मल्ल सोमेश्वर यांस सोमेश्वर ( थाकटा ) विक्रमादित्य ( धाकटा ) व जयसिंह असे तीन मुलगे होते; त्यापैकीं मधला मुलगा विक्रमादित्य हा विशेष पराक्रमी, व कर्तृत्ववान असल्यानें आपल्या मागें त्यानें गादीवर यावे, अशी ( पहिल्या ) सोमेश्वराची इच्छा होती, परंतु विक्रमादित्यानें युवराज पद स्वीकारण्याचें नाकारल्यानें तें वडील मुलगा सोमेश्वर यांस अखेरीस त्याच्या पित्यानें दिलें. तथापि कोणतीही महत्वाची, जबाबदारीची व पराक्रमाची, कामगिरी सोमेश्वर हा युवराजाकडे न देतां विक्रमादित्याकडेसच सोंपवीत असे; चोल आणि चालुक्य, या घराण्यात अपसात वैरभाव नांदत असून त्यांमध्यें नेहमीं युद्ध वगैरे भानगडी उपस्थित होत असत; त्याप्रमाणेंच या वेळींही ह्या परस्परामध्यें युद्ध सुरू झालें होतें; त्यामुळें सोमेश्वरानें या कामगिरीवर विक्रमादित्यास पाठविले, व त्यानें चोल राजाचा पराभव करून ही कामगिरी यशश्वीपणें बजाविली. याच काळांत मालवाधिपतीस एक तिसराच जबरदस्त प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला, व त्यानें त्यास पदभ्रष्ट करून देशोधडीस लाविलें; तेव्हां त्यानें आपणास पुन्हां माळवा देशाच्या गादीवर बसविण्याबद्दल विक्रमादित्याची मदत मागितली, व ती मिळवून त्याच्या मदतीनें त्यानें आपलें गमविलेलें राज्य परत मिळविलें. या शिवाय या विक्रमादित्यानें गौड उर्फ बंगाल, व कामरूप म्हणजे आसाम प्रांतावर, व त्या शिवाय केरळ, सिंहल, वेंगी, चक्रकोट वगैरे प्रदेशावरही स्वाऱ्या केल्या होत्या, असा उल्लेख आढळतो.

मध्यंतरीं राजा सोमेश्वर उर्फ आहव मल्ल हा तापानें आजारी झाला, व यांतून आतां आपण जगत नाहीं, असें पाहून शंकराचें स्मरण करीत त्यानें तुंगभद्रा नदींत जलसमाधी घेतली. ( इ. स. १०६९ ) या वेळीं विक्रमादित्य हा वेंगी येथील स्वारीवर असून तिकडून तो यशस्वी होऊन परत येत होता. त्यास रस्त्यांतच आपल्या वडिलाच्या मृत्यूचें वर्तमान समजलें; तेव्हां तो मोठ्या लगबगीनें राजधानींत येऊन दाखल झाला; तथापि तो तेथें येऊन दाखल होण्या-पूर्वींच त्याचा वडील भाऊ व युवराज सोमेश्वर हा "भुवनैकमल" असा किताब धारण करून गादीवर बसला होता. विक्रमादित्य राजधानींत येऊन दाखल झाल्यावर सोमेश्वरानें त्याचें योग्य आदरातिथ्य केलें, व थोडे दिवस तो त्याच्या सल्ल्यानें वागून राज्यकारभार चालवित राहिला; परंतु त्याच्यांत कर्तृत्वशक्तीचा पुष्कळच आभाव असून आपल्या प्रजेच्या सुख-समृद्धीची भावनाही त्याच्या ठायीं वसत नव्हती; म्हणून गादीवर बसल्या नंतर थोडक्याच दिवसांत त्यानें प्रजेवर निरनिराळ्या प्रकारें जुलूम करण्यास सुरवात केली; त्यामुळें सर्व प्रजा हवालदिल झाली, व त्या संबंधी सारख्या कागाळ्याही विक्रमादित्याकडे येऊं लागल्या; तेव्हां त्याला "आता काय करावें," असा विचार उत्पन्न झाला; या बाबतींत सोमेश्वरास दोन उपदेशाच्या विनंतिचे शब्द सांगून त्यास सन्मार्ग गामी करण्याची त्याची इच्छा होती; परंतु तो आपलें ऐकणार नाही, उलट आपला अपमान करील, अशी त्यास खात्री होती. म्हणून त्यानें सोमेश्वरास व तेथील प्रजेस त्यांच्या नशिबाच्या हवाल्यावर सोडून देशत्याग करण्याचा निश्चय केला, व आपला धाकटा भाऊ जयसिंह यास बरोबर घेऊन आपल्या जवळील बऱ्याच मोठ्या सैन्यासह तो राजधानी सोडून बाहेर पडला; परंतु ही बातमी सोमेश्वर यांस कळल्यावर त्यास अतीशय राग आला, व त्याचा पाठलाग करून त्यास व जयसिंह यांस पकडून आणण्या करितां त्यानें आपलें सैन्य त्याच्या वर रवाना केलें; वास्तविक पाहातां विक्रमादित्यानें सोमेश्वरास कोणत्याही प्रकारें तिळमात्रही दुखविलें नव्हतें; व त्याच्याशीं मतभेद होण्याचा कोणताही प्रसंग येऊं नये, या इच्छेनें त्यानें सोमेश्वराचें राज्यही सोडून तो पर ठिकाणीं जात होता; तथापि सोमेश्वर हा स्वभावानें इतका अनियंत्रित व सारासार विचार-शून्य होता, कीं ही साधी व सरळ गोष्ट ही त्यास आवडली नाहीं; इतकेंच नाहीं तर विक्रमादित्यानें स्वीकारिलेला मार्ग त्यास उद्दामपणाचा वाटला; हा आपला

अपमान आहे, असें नसतेच कांहींतरी त्याच्या मनानें घेतलें, आणि त्यानें आपण होऊनच आगळीक करून, विक्रमादित्या सारख्या निरुपद्रवी बलिष्टाशीं वैर आरंभिलें; ज्या विक्रमादित्यानें स्वतःत पूर्णपणें धमक असून—स्वतः पराक्रमी शूर, व कर्तबगार, असून आपण होऊन युवराज पद नाकारिलें, व भावी राज्य-पदाचा त्याग केला, आणि अशा रीतीनें आपल्या नालायक वडील भावास तें आपण होऊन अप्रत्यक्षपणें मिळवून दिलें, आपल्या कर्तृत्वाच्या आधाराचा त्यास टेका दिला, आणि त्याच्या अयोग्य वर्तनास आळा घालणें आपल्या अटोक्या-बाहेर गेलेलें आहे, अशी त्याची खात्री झाल्यावर त्याच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारें न वागतां, अथवा त्यास पदभ्रष्ट करणें ही गोष्ट, त्याच्या हातची, सहज करितां येण्यासारखी, व प्रजेच्या सुखाची व तिजकडून अनुमोदन, आणि पुष्टी मिळण्याच्या खात्रीची, असून सुद्धां त्याप्रमाणें कोणताही सक्तीचा मार्ग न स्वीकारितां, जो आपण होऊन राज्य सोडून, आपल्या हिंमतीवर व कर्तृत्व शक्तीच्या खात्रीवर, बाहेर पडला त्यास,—या आपल्या भावाच्या सैन्याबरोबर युद्ध करणें किती तरी जिवावर आलें असेल ? पण तो प्रसंग असा होता कीं, एक तर सोमेश्वराच्या सैन्याबरोबर युद्ध करून त्यास हतवीर्य करावें, नाहीं तर स्वतः आपण होऊन त्याचे कैदी होऊन पुढील विटंबना भोगण्याकरितां तयार व्हावें; कोणीही कर्तबगार व शूर सेनानायक पहिलाच मार्ग केव्हांही निःसंशय स्वीकारील; आणि विक्रमादित्यानें ही तोच मार्ग स्वीकारिला; येऊ नये तो प्रसंग आला, आणि त्यास सादर होणें ही आतां नाइलाजानें प्राप्त झालें, असें पाहि-ल्यावर त्यानें सोमेश्वराच्या सैन्याबरोबर मोठ्या आवेशानें, चिकाटीनें व निक-रानें युद्ध केलें, आणि त्यांत त्याच्या सैन्याचा पूर्णपणें पराजय करून त्यांतील पुष्कळसें सैन्य गारद करून टाकलें; तथापि सोमेश्वरानें एवढी आग-ळीक केली असूनही तो, त्याची खोड मोडण्याकरितां परत फिरला नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे; त्या नंतर तो मार्ग क्रमीत उत्तर कानडा प्रांतांतील कदंब वंशाची राजधानी जें वनवासी शहर, तेथें थोडे दिवस राहिला, व तेथून पुढें मलय देशाकडे वळला. तेव्हां त्याला गोपकपट्टण अथवा गोवें येथील कदंबवंशीय राज्यकर्ता जयकेशी हा शरण येऊन त्यानें त्याच्याशीं सख्य केलें; त्यानंतर कांहीं काळानें विक्रमादित्यानें आपल्या मल्लाळ महादेवी या

मुलीचें जयकेशीच्या नातवा बरोबर लग्न करून दिलें, त्यामुळें तर ते परस्पर निकटचे संबंधीही झाले.

अशा रितीनें विक्रमादित्याच्या पराक्रमाची या प्रांतांत ख्याती झाल्यामुळें मलबार किनाऱ्यावरील अलूप येथील राज्यकर्त्यानें त्याचें सख्य संपादन केलें, व चोल राज्यकर्त्यानें आपली कन्या विक्रमादित्यास देऊन त्याच्याशी आपलें नातें जोडून घेतलें; तथापि या विवाहा नंतर चोल राजा लवकरच मृत्यू पावला; व त्या राजसत्ते विरुद्ध एक मोठें बंड उद्भवलें. त्यावेळीं विक्रमादित्यानें तें मोडून टाकून त्याच्या मुलास म्हणजे आपल्या मेहुण्यास तेथील गादीवर स्थापन केलें; व तो तुंगभद्रा नदीकडे परत फिरला; ही संधी साधून त्याच्या मेहुण्याच्या व त्याच्याही वैरी झालेल्या सरदार मंडळींनीं, त्या उभयतांच्या विरुद्ध पुन्हां कारस्थानें सुरू केलीं, आणि या संधीचा फायदा घेऊन वेंगी देशाचा राज्यकर्ता नामें राजिग यानें चोल देशावर स्वारी करून तो देश पादाक्रांत केला, व तेथील राजास पुन्हा पदभ्रष्ट करून टाकिलें. तथापि आपल्या या आगळिकी मुळें विक्रमादित्य आपणावर चालून येईल, व त्याच्या बरोबर आपणास टिकाव धरवणार नाहीं, अशी राजिग याची खात्री होती; परंतु त्या बरोबरच विक्रमादित्याचें, त्याचा वडील भाऊ जो सोमेश्वर, याच्याशीं वांकडें आहे, ही गोष्ट ही त्यास माहित होती; म्हणून त्यानें गुप्त रीतीनें अगाऊच सोमेश्वराशीं बोलणें करून, "प्रसंग पडल्यास मी तुला विक्रमादित्या विरुद्ध मदत करीन," असें त्याच्या कडून अभिवचन मिळविलें होतें. राजीग याच्या अंदाजा प्रमाणें, विक्रमादित्यास, त्याच्या मेहुण्याला राजिग यानें पदभ्रष्ट केल्याची बातमी समजल्या बरोबर, त्यानें राजिग यांजवर स्वारी केली; तेव्हां राजिग यानें अगाऊ ठरल्या प्रमाणें सोमेश्वरा कडून मदत आणवून त्याच्याशीं युद्ध सुरू केलें. आपला वडील भाऊ सोमेश्वर हा आपल्या शत्रूस मिळून अशा रीतीनें आपणावर चालून येईल, अशी विक्रमादित्यास नुसती कल्पना सुद्धां नव्हती; त्यामुळें अकल्पितरित्या त्यास राजिग व सोमेश्वर या उभयतांच्या सैन्याच्या जोडगोळी बरोबर टक्कर देणें भाग पडलें होतें. तथापि तो मोठा धाडशी, हिंमती, व पराक्रमी असल्यानें त्यानें या जोड सैन्या बरोबर टक्कर देण्याचें ठरविलें; त्या एकत्र झालेल्या सैन्यावर मोठ्या धडाडीनें हल्ला करून त्या सैन्यांची

पूर्णपणें वाताहत करून टाकिली; आणि सोमेश्वराचा पाडाव करून त्यास आपला कैदी केलें.

विक्रमादित्य यांस स्वतः राज्यपदाचा स्वीकार करावा, अशी बिलकुल इच्छा नव्हती; तथापि या वेळीं तो अडचणीच्या परिस्थितीमध्यें गुरफटला गेला; कारण त्याचा वडील भाऊ सोमेश्वर याचा स्वभाव अनुभवानें त्यास पूर्णपणें कळून चुकला होता, व त्याच्यावर पुन्हां मागील सर्व गोष्टी विसरून उपकार केले,–आणि त्यास पुन्हां राज्य पदारूढ केलें-तरी तो त्याच्या मनांतील द्वेषभाव केव्हांही सोडणार नाहीं, अशी त्याची खात्री होती; त्यामुळें त्यास पुन्हां गादीवर बसविणें, म्हणजे आपल्या शत्रूस आपणच होऊन बलवान करून स्वतःच्या जीवित्वास–व प्रसंगीं अस्तित्वासही, नेहमीं धोक्याच्या व भीतीदायक स्थितींत ठेवणें होय, असें त्यास स्वाभाविकरित्याच वाटत होतें; उलटपक्षीं आपला धाकटा भाऊ जयसिंह यांस गादीवर स्थापन करावें, तर तो अननुभवी, कांहींसा अकर्तृत्ववान, अदूरदर्शी, हलक्या कानाचा, व अनिश्चित मनाचा आहे, ही ही गोष्ट त्यास माहीत होती. त्यामुळें त्याच्या हातून दक्षिणेचें राज्य सांभाळण्याची मोठी व महत्वाची जबाबदारी यशस्वींपणें पार पाडविली जाणार नाहीं, व निरनिराळीं संकटें व अडचणी उपस्थित होऊन त्या निस्तारणे ही पुन्हां आपणालाच भाग पडेल असें त्याचें मत होतें; त्यामुळें दक्षिण देशाची गादी त्यानें स्वत. स्वीकारिली, व आपणास राज्याभिषेक करून घेतला; ( इ० स. १०७६ ) आणि याच वेळीं आपला धाकटा भाऊ जयसिंह यास पूर्व कदंब वंशाच्या ठिकाणीं बनवासीं येथें राज्यपदावर नेमिलें; त्या नंतर त्यानें करहाटक उर्फ कऱ्हाड येथील शिलाहार घराण्यांतील राजाची विशेष लावण्यसंपन्न मुलगी नामें चंद्रलेखा हिच्या बरोबर विवाह केला, व मोठ्या कुशलतेनें दक्षिण देशाचा राज्यकारभार चालविण्यास सुरवात केली; तथापि राज्यकारभार चालविण्यास आवश्यक असलेल्या शांततेचा काळ त्यास फार दिवस लाभला नाहीं; कारण विक्रमादित्यानें बनवासी येथें राज्यपदारूढ केलेला त्याचा धाकटा भाऊ जयसिंह हा अविचारी व हलक्या कानाचा आहे, ही गोष्ट त्याच्या राज्याच्या आसपास असणाऱ्या विक्रमादित्याच्या शत्रूच्या कानावर आल्यानें त्यांनीं विक्रमादित्या विरुद्ध त्याच्या बरोबर कारस्थानें सुरू करून त्याच्या विषयीं जयसिंहाचें मन पूर्णपणें कलुषीत करून टाकिलें, व त्यास आपल्या कटांत ओढून घेऊन विक्रमादित्या-

विरुद्ध युद्ध करण्यास प्रवृत्त केलें; तेव्हां जयसिंहानें आपल्या शत्रूच्या नादीं लागून आपल्या भावा विरुद्ध लढण्याची जंगी तयारी केली, व आपल्या कटांतील सर्व राजेरजवाडयांच्या व आपल्या सैन्यासह तो मोठ्या झपाटयानें राजधानी सोडून कृष्णा नदीच्या तीरीं येऊन तळ देऊन राहिला. विक्रमादित्यास ही सर्व हकीकत कळल्यावर आपल्या धाकट्या भावाच्या या विश्वासघातकी कृत्या बद्दल त्यांस फार आश्चर्य वाटलें; तथापि ती आश्चर्य अथवा विचार करीत बसण्याची वेळ नव्हती त्यामुळें तो मोटया झपाट्यानें या सैन्याशीं तोंड देण्यास आपल्या जोरदार सैन्यासह त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला. पुढें उभयतांच्या सैन्यामध्यें मोठ्या निकराचें युद्ध होऊन त्यांत जयसिंह आणि त्याचे साह्यकारी दोस्त यांचा पूर्णपणें पराजय झाला, व जयसिंह हा तर आपला जीव जगविण्याकरितां समरभूमी सोडून पळून गेला. या निर्णयात्मक जयामुळें विक्रमादित्याच्या कीर्तींत विशेष भर पडली, व त्यास अतीशय लूट मिळून सांपत्तिक दृष्टयाही त्याचा पुष्कळ महत्त्वाचा फायदा झाला.

तथापि त्या नंतरही विक्रमादित्यास शांततेचा काळ लाभला नाहीं, व आपल्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसांतही त्यास आपल्या शत्रू बरोबर युद्ध संग्राम करीत राहण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. विक्रमादित्याच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास विष्णुवर्धन या नांवाचा एक यादव कुलांतील राज्यकर्ता, द्वार समुद्र म्हणजे म्हैसूर प्रांतावर राज्य करीत असून तो विक्रमादित्याचा शत्रू होता. तो यावेळीं त्याच्या विरुद्ध पुढें आला, आणि त्यानें पांड्य, गोंवें येथील कदंब, व कोकणांतील शिलाहार, राज्यकर्त्यांची मदत घेऊन विक्रमादित्यावर स्वारी केली; विष्णुवर्धन यानें विक्रमादित्याच्या शक्तीचा अगाऊच योग्य अंदाज बांधून, विशेष जय्यत तयारी करून—आणि इतर तीन राजांची मदत घेऊन—ही स्वारी केली होती; त्यामुळें या सर्वांच्या एकत्र झालेल्या सैन्यापुढ एकट्या विक्रमादित्याचा खात्रीनें यशस्वीपणानें निभाव लागेलच, असा संभव नव्हता; तथापि त्याच्या नेहमींच्या तेजस्वी, व धाडशी स्वभावास अनुसरून त्यानें मोठ्या हिंमतीनें या आपल्या शत्रू बरोबर मोठ्या धडाडीनें टक्कर दिली; पण शत्रूचें सैन्य संख्येनें व बलानें अधिक—म्हणजे त्याचें सैन्य प्रतितोलाहून दोन्हीं ही बाबतींत कमी—असल्यामुळें या युद्धांत विक्रमादित्याचा पूर्णपणें पराजय होऊन त्यास नामशेष होण्याची वेळ आली होती;

परंतु अशा या अत्यंत आपत्तीच्या व आणीबाणीच्या वेळीं त्याच्या विशेष शूर व एकनिष्ट अशा आंचगी या नांवाच्या एका सेना नायकानें आपल्या जिवावर उदार होऊन शत्रू पक्षाशीं मोठ्या निर्वाणीचें युद्ध केलें; त्यामुळें विष्णुवर्धन व त्याचे इतर मदतगार राज्यकर्ते यांचा पूर्णपणें पराजय होऊन विक्रमादित्य विजयी झाला, व त्यानें कोंकण व गोंवें हें प्रांत आपल्या प्रभुत्वाखालीं आणिले. विक्रमादित्याचा हा आंचगी सरदार मोठा लढवय्या व पराक्रमी असून ह्या काळापर्यंत त्यानें अनेक लढायांत आपलें युद्ध कौशल्य पूर्णपणें प्रगट केलें होतें, व याच सरदारास पूर्वी विक्रमादित्यानें कलिंग, वंग, मरु, गुर्जर, मालव, चेर, चोल व द्वार समुद्राचे बल्लाळ, वगैरे राज्यकर्त्यांवर मोहिमेस पाठवून त्याच्याच कर्तृत्वांमुळें त्यांना विक्रमादित्याचें अंकितत्व मान्य करणें भाग पडलें होतें.

विक्रमादित्य हा जसा अतीशय शूर व पराक्रमी होता, तसाच तो विद्वानांचा संग्रहकर्ताही होता; प्रसिद्ध "मिताक्षरा" या नांवाच्या धर्मनीति व व्यवहारनीति युक्त ग्रंथाचा कर्ता, व प्रख्यात पंडित, विज्ञानेश्वर, आणि काश्मीर येथील विद्वान व बहुश्रुत, "विक्रमांकदेव चरित्" या प्रसिद्ध काव्याचा कर्ता बिल्हण कवी, हे त्याच्या आश्रयास होते; त्याच्या राजधानीचें शहर कल्याण हें असून, त्याचें राज्य त्याकाळांत अतीशय भरभराटींत होतें; विक्रमादित्य हा मोठा उदार, दानशूर व गरिबांचा कैवारी असून त्याच्या कारकीर्दींत त्याच्या भरवशावर प्रजाजन इतके निर्धास्थ असत कीं, "ते रात्रीं आपल्या घरांचीं दारें सुद्धां बंद करण्याची काळजी ठेवीत नसत," असें त्याच्याविषयीं बिल्हण कवीनें वर्णन केलें आहे. वरील एकंदर विवेचना वरून उत्तर काळांतील चालुक्य घराण्यामध्यें विक्रमादित्य हा किती पराक्रमी, शूर, कर्तृत्ववान, विद्वद्रत्नसंग्रही व महान श्रेष्ठ राज्यकर्ता होऊन गेला, याची सहज कल्पना करितां येते.

विक्रमादित्य हा इ. सन ११२६ मध्यें मृत्यू पावला, व त्याचा मुलगा सोमेश्वर (तिसरा) अथवा भूलोक मल्ल हा गादीवर आला; तोही आपल्या वडिलाप्रमाणें शूर व कर्तृत्ववान असून स्वतःही विद्वान व राजनीतिज्ञ होता; त्यानें आपल्या कारकीर्दींत आंध्र, द्रविड, मगध, व नेपाळ, येथील राज्यकर्त्यांवरोबर युद्ध करून, त्यांचा पराभव केला, व त्यांना आपल्या नियंत्रणाखालीं आणून

ठेविलें; शिवाय तो मोठा पंडित असून त्यानें लिहिलेला " मानसोल्लास " अथवा " अभिलषितार्थ चिंतामणी " हा ग्रंथ सर्वमान्य व त्याच्या विद्वत्तेचें द्योतक म्हणून प्रसिद्ध आहे; व त्यावरून त्यास "सर्वभूप" अशी पदवी प्राप्त झाली आहे. या ग्रंथांत अनेक निरनिराळया विषयांची पुष्कळ माहिती दिली असून त्याचे पांच भाग केले आहेत; त्यापैकीं पहिल्या भागांत, राज्य संपादन करण्याला जे गुण कारणीभूत होतात ते सांगितलेले आहेत. दुसऱ्यांत, कोणी पुरुषानें राज्य मिळविल्यानंतर तें, तें रक्षण करण्याला ज्या कारणीभूत साधनांनीं समर्थ होतो, तीं साधनें सांगितलेलीं आहेत. तिसऱ्यांत, कोणीही राजानें आपली सत्ता सुदृढ केल्यावर त्याला उपभोगाचे अथवा सुखाचे जेजे प्रकार लभ्य असतात ते सांगितले आहेत; चवथ्यांत, मानसिक आनंद ज्यापासून होतो, त्या व्यवसायाचे अथवा करमणुकीचे प्रकार सांगितलेले आहेत; ह्या प्रत्येक भागांतील विषयांचे वीस वीस उपभेद अथवा उपभाग केलेले आहेत. पहिल्या भागांत अनृताचा त्याग, दुसऱ्यात दु:ख किंवा पीडा देण्यांच्या प्रवृत्तीचें सर्वदा वर्जन, इंद्रीय निग्रह, महात्मता, सौजन्य, देवावर श्रद्धा, दरिद्री व पंगू, मित्र व स्वपक्षीय, यांस अन्नदान व आश्रय देणें, इत्यादी सद्गुणांचा समावेश केला आहे. दुसऱ्या भागांत ज्या कशाला सात अंगें असें म्हणतात, तीं वर्णिलेलीं आहेत; म्हणजे सर्वोत्कृष्ट राजा, त्याचे प्रधान, पुरोहित, व ज्योतिषी, जामदारखाना, व तो रिकामा झाला असतां पुन्हां भरण्याचा मार्ग, सैन्य, इत्यादिकांचा समावेश केला आहे. तिसऱ्या भागांत उपभोगाचे प्रकार, म्हणजे सुंदर राजमंदीरें, जलक्रीडा, अभ्यंजन, बहुमोल वस्त्रें, अलंकार भूषणें, इत्यादिकांचें वर्णन आहे. चवथ्या भागांत फावल्या वेळींच्या व्यवसायाचें, म्हणजे करमणुकीचे प्रकार— शिपाईगिरीच्या कसरती, घोड्यावर बसणें, हत्तीस शिकविणें, कुस्ती करणें, कोंबड्यांच्या झुंजी लावणें, कुत्र्यास शिकविणें, कविता करणें, गाणें, संगित गान— नृत्य इत्यादि प्रकार—गृंथित केलेले आहेत; आणि शेवटच्या म्हणजे पांचव्या भागांत क्रीडांचे प्रकार—उद्यानक्रीडा, वनक्रीडा, पर्वतक्रीडा, पुलिनक्रीडा, नाना प्रकारचे खेळ, व स्त्रीसमागमोपभोग वगैरे प्रकार दिग्दर्शित केले आहेत. सारांश, वरील सर्व विषयासंबंधीं संस्कृत भाषेंत असलेल्या विद्या व कला यांच्या पैकीं बहुतेक सर्वांचीं मूलतत्वें या ग्रंथांत वर्णिलेलीं आहेत; आणि राजनीती, ज्योतिष, फलज्योतिष, अलंकार शास्त्र, छंदशास्त्र, गांधर्वविद्या, चित्रकला, शिल्प-

शास्त्र, वैद्यकशास्त्र, अश्वशिक्षा, श्वानशिक्षा, गजशिक्षा, वगैरे शास्त्रें व कला, या संबंधीं, त्यांत विषद रीतीनें विवेचन केलें आहे; शिवाय त्यांत पंचाग तयार करण्याकरितां प्रत्येक ग्रह व तारा, यांची स्थानें गणितानें निश्चित करण्यासाठीं घेतलेल्या आद्य दिवसासंबंधीं जें वर्णन केलें आहे, त्यांत "चालुक्य (कुळ) भूषण सकल शास्त्राच्या अर्थ सर्वस्वाब्धीला आटविणारा जणु दुसरा अगस्त्य मुनीच, व सर्व शत्रूंचा संहार कर्ता असा जो राजा सोम (सोमेश्वर) समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करीत असतां शकनृप कालाची वर्षे दहाशें एकावन्न अतित होऊन सौम्य नाम संवत्सरीं, चैत्र शुद्ध प्रतीपदा शुक्रवार," असा उल्लेख आहे; व यावरून सोमेश्वर गादीवर आल्यावर चवथ्या वर्षी त्यानें हा ग्रंथ रचिला, असें उघड होत आहे; या पराक्रमी व पंडित राज्यकर्त्यानें, थोडीं वर्षे पण उत्तम रीतीनें राज्य केलें; इ० सन ११३८ मध्यें तो मृत्यू पावला; व त्याचा मुलगा जगदेव मल्ल हा गादीवर आला; त्यानंतर, त्यानें बारा वर्षे राज्याचा उपभोग घेतल्यावर, त्याचा भाऊ त्रैलोक्य मल्ल उर्फ तिसरा तैलप हा गादीवर आला; (इ. सन ११५०) व त्यानें पंधरा वर्षे, म्हणजे इ. सन ११६५ पर्यंत राज्य केलें; तथापि सोमेश्वराच्या मृत्यूनंतर लागलीच त्या घराण्यास उतरती कळा लागण्यास सुरवात झाली. ही संधी साधून, त्या राज्याचे तुकडे करण्याच्या इरायानें, त्याच्या नियंत्रणा खालील संस्थनिक मंडळी पैकीं कित्येकांनीं प्रयत्न आरंभिले; तिसऱ्या तैलपाच्या कारकीर्दींत कलचुरी घराण्यांतील विज्जल अथवा विज्जण या नांवाचा एक संस्थानिक स्वतःच तैलपाचा मुख्य सेनापती अथवा दंडनायक होता; त्यानें तैलपास पदभ्रष्ट करून स्वतः राज्य बळकाविण्याचा गुप्त कट केला, व त्यांत आसपासचे संस्थानिक व कोल्हापूर येथील शिलाहार वंशांतील राज्यकर्ता महामंडलेश्वर विजयार्क याची मदत घेऊन तैलपास आपल्या नियंत्रणाखालीं आणून ठेविलें; परंतु अशा परतंत्र व दुखःदायक स्थितीमध्यें राहणें त्यास न आवडून तो एक दिवस संधी साधून आपल्या राजधानीचें शहर जें कल्याण, (हें ठिकाण सोलांपूर व बेदर यांच्या दरम्यान बेदरच्या पश्चिमेस सुमारें चाळीस मैलावर आहे.) तें सोडून धारवाड जिल्ह्यांतील अण्णेगिरी या नांवाच्या गांवीं गेला, व तेथें त्यानें आपलें एक निराळेंच राज्य स्थापन केलें;

अशा रीतीनें तैलप हा आपल्या राज्यांतून निघून गेल्याची हकीकत विज्जल यांस कळली, तेव्हां त्याला एकप्रकारें विशेष आनंद झाला; कारण स्वतः राज्यकर्ता होण्याच्या मार्गांत त्यास तैलप हा एकटाच कायतो अडथळा शिलक होता; परंतु तो अशा प्रकारें दूर झाल्यामुळें, कोणत्याही कष्टसायासा शिवाय अथवा कटकटी भानगडी शिवाय, स्वतःला पूर्ण राज्यधिकारी बनण्याची, आणि म्हणवून घेण्याची त्यास योग्य संधी प्राप्त झाली; व त्यानें त्या प्रमाणें इ. स. ११६५ मध्यें राज्यपद धारण केलें; त्यामुळें अर्थातच उत्तर कालीन चालुक्य राज्य नष्ट होऊन कलचुरी उर्फ हैहय घराणें अधिकारारूढ झालें. ( इ. सन ११८९ )

तथापि विज्जल यानें कौटिल्यानें मिळविलेलें हें राज्य त्याच्या घराण्याकडे उणेपुरे पंचवीस वर्षेंच कायतें टिकलें, आणि त्या नंतर तें धर्मक्रांतीच्या भोंवऱ्यांत सांपडून लवकरच त्याचा अंत झाला.

या काळांत लिंगाईत धर्म जोरांत येऊन बसव अथवा बसवाप्पा या नांवाच्या एका शूर व कर्तृत्ववान मनुष्यानें या धर्मक्रांतीचें प्रमुखत्व आपणांकडे घेतलें. हा जातीचा ब्राम्हण असून तो कर्नाटक प्रांतांतील बागेवाडी येथील मूळ राहणारा होता; आणि वशिला व योगायोग यामुळें तो वैभवास चढला होता. त्याचा मामा बलदेव हा विज्जल राजाचा प्रधान असून त्यानें आपल्या या भाचास आपली मुलगी दिली होती; त्यामुळें, मामा, व सासरा, असें बसवाप्पाचें बलदेवाशीं जोडनातें होतें. बलदेवाच्या मृत्यू नंतर विज्जल यानें बसवाप्पा याची आपल्या मुख्य प्रधानाच्या जागेवर नेमणूक केली; या बसवाप्पास पद्मावती या नांवाची एक बहीण असून ती अत्यंत रूपवती होती. त्यामुळें विज्जल तिच्यावर मोहित झाला, व बसवाप्पाच्या अनुमतीनें त्यानें तिच्याशीं विवाह लाविला. उलटपक्षीं विज्जलानें आपली बहिण नीललोचना, ही, बसवाप्पास विवाहांत दिली होती, अशा आशयाचें बसव पुराणांत वर्णन केलेलें आहे. बसवाप्पा हा लिंगाईत धर्माचा विशेष अभिमानी असून त्या धर्माचा होईल तितका विस्तार करावा, असा त्याचा प्रयत्न होता; म्हणून त्यानें आपला भाचा, म्हणजे आपली दुसरी बहिण नामे नागलांबिका हिचा मुलगा चनबसवाप्पा, उर्फ चनबसवय्या याच्या मार्फत या धर्माची

तत्वें चोहोंकडे प्रतिपादन करण्यास सुरवात केली; आणि या नवीन धर्माचा अंगिकार करणाऱ्या जंगम लोकांच्या सुख सोयी साठीं सरकारी खजिन्यांतून पाहिजे तसा पैसा खर्च करण्याचा सपाटा चालविला. परंतु आपल्या जामदार खान्यांतील संपत्तीचा अशा रीतीनें एक सारखा व्यय होणें बिज्जल राजास आवडलें नाहीं; शिवाय मंचण्णा या नांवाचा विज्जलाचा दुसरा एक प्रधान होता; त्यासही ही गोष्ट नापसंत होती; त्यामुळें त्यानेंही विज्जलाचें मन बसवाप्पा विरुद्ध कलुषित करण्यांत बाकी ठेविली नाहीं; तेव्हां अर्थातच त्या उभयतांमध्यें वैमनस्य उत्पन्न झाले, व विज्जलानें बसवाप्पास कैद करण्याचा घाट घातला; परतु ही बातमी त्यास अगाऊच लागल्यानें तो विज्जलाच्या हांतून निसटून पळाला.तेव्हां त्यास पकडण्याकरितां विज्जलानें त्याच्यावर आपलीं माणसें पाठविलीं. व शेंवटीं त्यानेंही स्वतः त्याचा पाठलाग केला. परंतु या मोहिमेंत विज्जल यांस अपयश येऊन पूर्णपणें माघार घेणें भाग पडलें. त्यानंतर लवकरच बसवाप्पानें विज्जल यांस पकडून त्याचा वध केला; परंतु त्यामुळें एक मोठें बंड उद्भवून सर्व कल्याण शहरभर प्रेताचे ढीग पडले, व बसवाप्पानेंही मलप्रभा नदींत जलसमाधी घेतली; तथापि त्याचा भाऊ चिनबसवाप्पा यानें लिंगाईत धर्माचा प्रसार चालू ठेवून तो पंथ वृद्धिंगत केला.

बसवाप्पा याच्या मृत्यू नंतर त्याचा मुलगा सोवीदेव हा गादीवर आला. याच्या कारकीर्दींत दुसऱ्या तैलपाचा मुलगा सोमेश्वर चवथा यानें कलचुरी वंशिया पासून आपल्या पूर्वींच्या राज्यांपैकीं बराच भाग जिंकून आपल्या हस्तगत करून घेतला; ( इ. सन ११८२ ) बाकी राहिलेला उत्तरे कडील भाग यादवांनीं जिंकून आपल्या राज्यांत सामील केला; आणि अशारीतीनें कलचुरी वंशांचें राज्य अल्पकाळांतच नष्ट झालें. थोडक्यांत म्हणजे उत्तर कालीन चालुक्य घराण्यानें इ० सन ९७३ पासून १०९० पर्यंत, आणि कलचुरी घराण्यानें इ० सन ११६५ ते इ० सन ११८२ पर्यंत, दक्षिणेंचें राज्य केलें, व त्या नंतर हीं दोन्हींही घराणी नामशेष झाली.

या बाबतींत दुसरा असाही उल्लेख आढळतो, कीं, इ० सन ९७३ च्या सुमारास चालुक्य घराण्यांतील राजा दुसरा तैलप यानें देवगिरी येथील यादव उर्फ जाधव राज्यकर्त्यांच्या मदतीनें राष्ट्रकूट घराण्यांतील राजसत्ता आपल्या घराण्यांत

हिरावून घेतल्या नंतर ती सत्ता त्या घराण्याकडे इ० सन ११७२-७३ पर्यंत म्हणजे अजमासें दोनशें वर्षे निर्वेधपणें टिकली. परंतु या वेळीं म्हैसूरच्या गंग या नांवाच्या घराण्यांतील राजा बल्लाळ दुसरा, आणि चालुक्य राजा याच्या मध्यें वैमनस्य उत्पन्न होऊन जोराचे युद्ध प्रसंग घडून आले; त्यावेळीं चालुक्यांनीं देवगिरी येथील यादव राज्यकर्ता सिंघण याची मदत घेतली; व बल्लाळाशीं पुष्कळ काळ पर्यंत युद्ध चालू ठेविलें, आणि त्याच्याच मदतीने अखेरीस बल्लाळांचा पूर्ण पराभव केला. परंतु या युद्धामुळें आधींच कमकुवत होत चाललेल्या चालुक्याची सत्ता परमावधीची कमकुवत झाली, व त्याचा परिणाम अखेरीस असा झाला कीं यादव उर्फ जाधव राज्यकर्ता सिंघण यानें चालुक्य घराणें नामशेष करून सर्व सत्ता आपल्या हस्तगत करून घेतली. हें यादव घराणें मूळचें रजपूत असून तें मथुरेचे राज्यकर्ते होते; व श्रीकृष्णाच्या काळा पासून ते द्वारावतीचे म्हणजे द्वारकेचे राज्यकर्ते असून पुढें सुबाहूचा मुलगा दृढप्रहार याच्या वेळेपासून ते दक्षिण प्रांताचे राज्यकर्ते झाले, असा प्रवाद आहे. ( अजमासें इ० सन ७९५ ) तथापि या घराण्याची थोडीशी माहिती सुबाहू या नांवाच्या राज्यकर्त्याच्या वेळेपासूनच कायती उपलब्ध होत आहे. या सुबाहूस चार मुलगे असून त्यानें आपलें सर्व राज्य त्यांना वाटून दिलें होतें. त्यात त्याचा दुसरा मुलगा दृढप्रहार यांस दक्षिणेकडील प्रदेश मिळाला होता. त्याच्या राजधानीचें शहर चंद्रादित्यपूर या नांवाचें असून तेंच हल्लींचें नाशिक जिल्ह्यांतील ( लासलगांव रेल्वे स्टेशनपासून सडकेनें चौदा मैलावर असलेलें तालुक्याचे ठिकाण ) चांदवड हें असावें, असा तर्क आहे. दृढप्रहारानंतर त्याचा मुलगा सेऊणचंद्र हा गादीवर बसला; या राजाच्या नांवा वरून नाशीक पासून देवगिरी उर्फ दौलताबाद पर्यंतच्या प्रदेशाचें नांव "सेऊण देश" असें पडलें, व खानदेश मुसलमानी अमलाखालीं जाण्यापूर्वीं त्यास ही "सेऊण देश" हें नामाभिधान मिळालें—म्हणजे मुसलमानी अमदानी पूर्वीचें "सेऊण देश" हेंच खानदेशचें नांव होय,—सेऊणचंद्रानंतर धाडियाप्पा, भिल्लम, श्रीराम, अथवा राजगी, बद्दिग, अथवा वादुगी, धाडियस, व भिल्लम दुसरा, हे अनुक्रमे गादीवर आले. त्यांतील भिल्लम हा विशेष पराक्रमी असून याच्याच काळांत त्याच्या घराण्याशीं शिलाहार राजघराण्याचा शरीर संबंध जडला. त्यानें झंझशिलाहार याची कन्या नामें लस्थियव्वा हिच्याशीं विवाह केला. शिवाय तो राजकन्या मातेच्या पक्षाकडून राष्ट्रकूट

घराण्यांतील होती; त्यामुळें त्या घराण्याशीं ही त्याचा परंपरेनें संबंध जडला होता. भिल्लमानंतर दमुगी, अर्जुन, व भिल्लम तिसरा, हे राज्यकर्ते झाले. त्यापैकीं भिल्लमानें चालुक्यवंशीय जयसिंह याच्या मुलीशीं लग्न केलें होतें. भिल्लमानंतर वादुगी, वेसुगी, भिल्लम दुसरा, व सेऊणचंद्र चवथा, याप्रमाणें राजे गादीवर आले. त्यांत दुसरा सेऊणचंद्र हा विशेष पराक्रमी असून तो चालुक्य घराण्यांतील प्रसिद्ध राजा दुसरा विक्रमादित्य याचा समकालीन व स्नेही होता; इतकेंच नव्हे तर विक्रमादित्यास जेव्हां त्याच्या शत्रूंनीं चोहोंकडून पूर्णपणें घेरून टाकिलें, त्यावेळीं या सेऊणचंद्रानेंच त्यास अमोल्य मदत देऊन या संकटांतून मुक्त केलें, व त्याची पुन्हां गादीवर स्थापना केला, असें व्रत खंडांत वर्णन केलेलें आहे. त्याच्या मागून त्याचा मुलगा परमदेव, व त्यानंतर त्याचा मुलगा सिंहराज हा पुत्रसंतान विरहीत वारल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ, व त्यानंतर त्याचा मुलगा मल्लगी, हा गादीवर आला; त्यांपैकीं मल्लगी हा बराच पराक्रमी असून त्यानें पर्णखेट या नावाचें शहर आपल्या शत्रूपासून जिंकून घेतलें, आणि तिकडे असताना उत्कल ह्मणजे ओरीसा देशाच्या राजाच्या संग्रहीं असलेला हत्तींचा एक मोठा नामांकित कळप ही त्यानें त्याच्याशीं युद्ध करून हिरावून आणिला; त्यानंतर त्याचा मुलगा अमरगंगेय, व नंतर गोविंदराज, मल्लगीचा मुलगा अमर मल्लगी, बल्लाळ अथवा कालीय बल्लाळ, ( कारकीर्द इ. सन ११८७ ते ११९१) या नावाचे राजे अनुक्रमें गादीवर आले. पुढें यादवांचें राज्य इ. सन ११९१ मध्यें होयसल यादव कुलांतील वीरबल्लाळचा चुलता भिल्लम पांचवा यांजकडे आल्यावर त्यानें चालुक्याचें राज्य जिंकून घेतलें. भिल्लमच्या कारकीर्दी पर्यंत यादव घराणें चालुक्याचे मांडलीक राज्यकर्ते म्हणून होते; परंतु यादव वंशातील भिल्लम हा अत्यंत सामर्थ्यवान व पराक्रमी पुरुष निपजून त्यानें चालुक्य वंशाचा शेवट केला, व आपल्या कर्तृत्वानें यादव घराण्याकडे श्रेष्ठ सत्तेची सर्व सूत्रें आणिलीं.

या यादव घराण्यास इ. सन ७९५ च्या सुमारा पासून सुरवात होते, त्या वेळेपासून पांचव्या वल्लभापर्यंत एकंदर बावीस राजे इ. सन ११९१ पर्यंत गादीवर आले; व या घराण्यानें एकंदर अजमासें ३९५ वर्षें राज्य केलें. यादवांच्या पूर्वी राष्ट्रकूट व उत्तरकालीन चालुक्य घराणें दक्षिणेंत सार्वभौमत्वाचा श्रेष्ठ अधिकार उपभोगीत असून त्या काळांत यादव हे निव्वळ मांडलीक

संस्थानिक असल्यामुळें त्यांचें तत्कालिन इतिहासांत व राजकीय घडामोडींत फारसें महत्व नव्हतें; तथापि यादवांची एक शाखा द्वारसमुद्र म्हणजे म्हैसूर प्रांतांतील हळेबीड येथें राज्य करीत होती. या शाखेस होयसल यादव असें म्हणतात. या घराण्यांतील मूळ पुरुष व पहिला राजा बित्तिदेव बित्तिग हा असून त्यानें हळेबीड येथ आपलें राज्य स्थापन केलें होतें; याची कारकीर्द इ. सन १११९ पासून ११४१ पर्यंतची म्हणजे तीस वर्षांची होती. तो पहिल्यानें जैन धर्मानुयायी होता, व त्यानें आपला प्रधान गंगराज यांजकडून अनेक जैन मंदिरें ही बांधविलीं होतीं. नवव्या शतकाच्या प्रारंभीं शंकराचार्यानें वेदांत मार्गाचें प्रतिपादन करण्यास निरनिराळ्या पंथ सांप्रदायांत धर्मैक्य घडवून आणण्यास, व अद्वैत मताचा प्रसार करण्यास सुरवात केली; तथापि त्या मुळें हे निरनिराळे पंथ व सांप्रदाय कमी न होतां उलट ते वाढतच गेले; शंकराचार्याच्या काळा पूर्वी पांचव्या शतकांत माळवा प्रांतांतील अवंती उर्फ उज्जयनी नगरींत चंद्रगुप्त, कुमारगुप्त, स्कंदगुप्त, वगैरे पराक्रमी व भागवत धर्माचे पुरस्कर्ते राजे निर्माण होऊन गेले, व ते भागवत धर्माचे रक्षक व प्रसारक असल्यानें त्यांनां "परम भागवत" अशी संज्ञा प्राप्त झाली. त्या प्रमाणेंच शंकराचार्याच्या काळा नंतर ही रामानुज, विष्णूस्वामी, निंबार्क, आणि मध्व, हे भागवत धर्माचे पुरस्कर्ते निर्माण झाले. त्यापैकीं रामनुज ( इ. सन १११६ ते इ. सन ११३७ ) हा बित्तिग ( इ. सन ११११ ते इ. सन ११४१ पर्यंत ) चा बराचसा समकालीन भागवतधर्म प्रचारक होता. त्याच्या उपदेशानें बित्तिग यानें जैनधर्माचा त्याग केला, व तो भक्तिमार्गी व वैष्णव धर्माचा उपासक बनला; त्या नंतर त्यानें आपल्या राजधानीच्या ठिकाणीं व राज्यांत ठिकठिकाणीं श्री विष्णूची मंदिरें बांधविलीं; इतकेंच नव्हे तर आपलें पूर्वीचें नांव बित्तिदेव उर्फ बित्तिग हें बदलून त्यानें विष्णुवर्धन हें नवें नांव धारण केलें. तो मोठा पराक्रमी असून त्यानें आपल्या घराण्याची सत्ता पुष्कळच वाढविली; त्याच्या मनांत दक्षिणेचें राज्य संपादन करण्याचे विचार घोळत होते, व त्या उद्देशानें दुसऱ्या विक्रमादित्याच्या कारकीर्दींत त्यानें चालुक्यांच्या ताब्यातील प्रदेशावर स्वारी ही केली होती; परंतु विक्रमादित्य हाही विशेष पराक्रमी व बलाढ्य असून त्यानें विष्णु वर्धन याचा पूर्ण पराभव करून त्यास माघार घेणें भाग पाडिलें होतें; इतकेंच नव्हे तर विक्रमादित्याच्या

कारकीर्दीच्या अखेरी पर्यंत चालुक्य घराण्यांतील सत्तेवर वर्मी घाव घालण्यास अनुकूळ अशी एक ही संधी त्यानें यादवांनां मिळूं दिली नव्हती; परंतु विक्रमादित्याच्या मृत्यूनंतर नालायकाची परंपरा गादीवर आली, आणि कलचुरी वंशांतील दंडनायक विज्जल यानें तैलपास पदभ्रष्ट करून चालुक्य घराणें नामशेष केल्यानंतर, धर्मक्रांती होऊन, त्यामुळें उत्पन्न झालेल्या बेबंदशाहीचा, यादवांनीं पूर्णपणें फायदा करून घेतला. यावेळीं चालुक्य घराण्यातील अगदीं शेवटचा कमकुवत राजा चवथा सोमेश्वर हा गादीवर असून इकडे यादव घराण्यातील विष्णुवर्धनचा नातू वीरबल्लाळ हा पराक्रमी पुरुष गादीवर होता. त्यानें चवथ्या सोमेश्वराचा सेनापती बोम्मा उर्फ ब्रह्मा याचा पूर्णपणें मोड करून सोमेश्वराचें बहुतेक राज्य जिंकून घेतलें; तथापि सेऊणदेशाच्या यादव कुलांमध्यें सर्वांत अत्यंत पराक्रमी पुरुष म्हटला म्हणजे वीर बल्लाळचा चुलता भिल्लम हा होय. त्यानें मंगलवेष्टक (मंगळ वेढें; हा गांव हल्लीं सांगली संस्थानाच्या अमलाखालीं आहे.) येथील विल्लण राजास नामशेष करून, आणि वीर बल्लाळ यादव, सोमेश्वर चालुक्य, या दोघांचाही पाडाव करून, आपल्या वंशाचें नवीन राज्य स्थापन केलें, व देवगिरी उर्फ दौलताबाद ही आपल्या राज्याची राजधानी करून त्या ठिकाणीं इ. सन ११८७ मध्यें आपणास राज्याभिषेक करवून घेतला. हें घराणें पुढें महाराष्ट्रांत अत्यंत प्रतापशाली म्हणून प्रसिद्धीस आलें. या यादव घराण्याची दुसरी, म्हणजे होयसल यादव या नांवाची शाखा, कर्नाटक प्रांतामध्यें राज्य करीत होती, व कृष्णानदीच्या दक्षिणेकडील प्रदेशावर तिचा अंमल चालत होता. पुढें अल्लाउद्दीन खिलजी याच्या कारकीर्दींत त्यानें आपला प्रसिद्ध सेनापति मलिक काफूर यास कर्नाटकच्या मोहिमेवर पाठविलें; त्याप्रमाणें तो दक्षिणेंतून देवगड, व पैठण या मार्गानें तिकडे गेला; त्यावेळीं या होयसल यादव घराण्यातील बल्लाळ या नांवाचा राजा तेथें राज्य करीत होता; काफूर यानें-कर्नाटकच्या मध्यभागीं श्रीरंगपट्टणच्या वायव्य दिशेस सुमारें शंभर कोसावर असलेल्या त्याच्या द्वीपसमुद्र अथवा हळेबीड या नांवाच्या राजधानीवर हल्ला करून तें शहर काबीज केलें, व हें घराणें नामशेष करून तें सर्व राज्य मुसलमानी राज्यांत सामील केलें

वरील विवेचनावरून, यादव वंशाच्या दोन शाखांनीं दोन ठिकाणीं आप आपलीं स्वतंत्र राज्य स्थापन केली होतीं, हें लक्षांत येईल. या

काळांत या वंशांत भिल्लम व वीरबल्लाळ हे दोन राज्यकर्ते असून त्या पैकीं प्रत्येकाची इच्छा, सार्वभौम सत्ता आपल्या हातीं असावी, अशी होती. त्यामुळें या उभयतांमध्यें मोटी निकराची स्पर्धा लागून अनेक युद्ध प्रसंग झालें, व शेवटीं धारवाड जिल्ह्यांतील लकुंडी अथवा लोक्किगुंडी येथें एक निर्वाणीची लढाई झाली. तींत भिल्लमाचा पराजय होऊन त्याचा सेनापती चैत्रसिंह यांस पूर्णपणें माघार घ्यावी लागली. भिल्लमानंतर ( इ० सन ११८७ ते ११९१ ) त्याचा मुलगा चैत्रपाल उर्फ जेतुगी हा गादीवर आला; तो कर्तृत्ववान व पराक्रमी असून त्यानें "समस्तभुवनाश्रय" असा किताब धारण केला होता. त्यानें आंध्र उर्फ तेलंगण प्रांताचा क्रूर राजा रुद्रदेव यांस ठार मारून त्या प्रदेशावर आपलें वर्चस्व स्थापन केलें होतें. शंकर या नांवाचा एक प्रसिद्ध योद्धा त्याचा सेनापती व दंडनायक असून महाप्रख्यात गणितशास्त्रज्ञ, व ज्योतिषी भास्कराचार्यांचा मुलगा लक्ष्मीधर हा त्याच्या पदरीं होता. शिवाय चैत्रपाल हा स्वतःच मोठा विद्वान असून त्यास वेद, तर्क शास्त्र व मिमांसा, यांचेंही उत्तम ज्ञान होतें; त्या मुळें लक्ष्मीधर पंडिताची दांडगी विद्वत्ता त्याच्या पूर्णपणें लक्षांत येऊन त्यानें त्यास आपल्या दरबारीं सर्व पंडित जनांमध्यें अग्रस्थान दिलें होतें. त्या प्रमाणेंच प्रसिद्ध आद्य मराठी कवी मुकुंदराज हा ही त्याच्या पदरीं होता, ही गोष्ट मुकुंदराजकृत "विवेकसिंधू" या ग्रंथाच्या शेवटीं त्यानें दिलेल्या "नृसिंहाचा बल्लाळ, त्याचा कुमार चैत्रपाळ, तेणें करविला हा खेळ, ग्रंथरचनेचा" या मजकुरावरून उघड होते. वैनगंगा उर्फ पयोष्णी नदीच्या तीरीं मोंगलाईंत जोगाईचें अंबे, या नांवाचें एक गांव आहे, व येथील जोगाई देवी महाप्रसिद्ध आहे; हें ठिकाण या मुकुंदराज कवीचें मूळ गांव असून तेथून निघून तो पुढें चैत्रपाळाच्या पदरीं येऊन राहिला. विवेकसिंधू शिवाय "परमामृत" या नांवाचा मुकुंदराजाचा दुसरा एक महत्वाचा ग्रंथही विशेष प्रसिद्ध आहे.

चैत्रपाळा या मृत्यूनंतर त्याचा मुलगा सिंघण हा गादीवर आला. ( इ० सन ११९१ ते इ० सन १२१० पर्यंत कारकीर्द ) हा राज्यकर्ता मोठा पराक्रमी असून याच्या कारकीर्दींत यादवांच्या ऐश्वर्याची व सत्तेची अतोनात वृद्धी झाली. यानें माळव्याचा राजा अर्जुन यास नामशेष करून भोजराजाचा अंकित होगे भाग पाडिले. नंतर त्यानें चेदी प्रांतांतील छत्तिसगड येथील राजा जज्जल

याचा पराभव करून व त्रिपूर उर्फ तेवूर येथील कक्कल अथवा कोकल वंशाचें राज्य नष्ट करून आपल्या ताब्यांत घेतलें. त्या प्रमाणेंच रंभागिरी येथील सिंह राज्यकर्ता लक्ष्मीधर यांस आपला मांडलीक करून मथुरा व काशी येथील राजा-सही त्यानें नामोहरम केलें. या शिवाय होयसल वंशीय बल्लाळ राजास जिंकून त्याच्या ताब्यांतील दक्षिणे कडील प्रांत त्यानें आपल्या हस्तगत करून घेतला, व पद्मनाल उर्फ पन्हाळा येथील शिलाहार उर्फ शेलार घराण्यांतील भोजराजास जिंकून पन्हाळा कोल्हापूरचें राज्य आपल्या नियंत्रणा खालीं आणिलें. ( इ. सन १२१५ ) हें कोल्हापूर पन्हाळयाचें राज्य हस्तगत करण्यास तो आपल्या सैन्यासह दक्षिण महाराष्ट्रांत आल्यावर पहिल्यानें साताऱ्याच्या आसपास त्यानें आपला तळ दिला होता. त्यावेळीं खटाव तालुक्यांतील मायणी या नांवाच्या गांवा लगत दोन ओढ्यांच्या संगमावर "संगमेश्वर" या नांवाचें एक देवालय त्यानें बांधिलें, तें हल्लीं ही अस्तित्वांत असून प्रसिद्ध आहे. त्या प्रमाणेंच माण तालुक्यांत आपल्या नांवावरून सिंघणपूर या नांवाचें एक गांव त्यानें वसविलं; व या ठिकाणीं त्यानें एक शंकराचें मंदिर बांधिलें; हें स्थान "सिंघणापूरचा महादेव" या नांवानें हल्लीं प्रसिद्ध असून तें पुष्कळ मराठा मंडळांचें कूलदैवत आहे; कोल्हापूरच्या शिलाहार घराण्याचा नाश केल्या नंतर त्यानें उत्तर कोंक-णांतील शिलाहार घराणें ही नामशेष केलें, असा उल्लेख आढळतो. या सिंघणानें गुजराथ प्रांतावर अनेक स्वाऱ्या केल्या; या स्वाऱ्यां मध्यें खोलेश्वर व त्याचा मुलगा राम या नांवाचे मुद्गल गोत्री ब्राह्मण त्याचे सेनापती होते. या वेळीं गुजरा-थेंत चालुक्य अथवा सोळंखी घराण्याशीं संबंध असलेलें वाघेल या नांवाचे घराणें राज्य करीत असून तेथील राज्यकर्ता लवण प्रसाद, व त्याचा मुलगा वीर धवल हे आपणास स्वतंत्र राज्यकर्ते म्हणवूं लागले होते. या उभयतांवर सिंघणानें स्वारी केली, व त्यांचा पराभव करून त्यांना आपणा बरोबर तह करणें भाग पाडिलें; या वेळेपर्यंत लवणप्रसाद हा वास्तविक रित्या अनहिल पट्टण येथील राजा दुसरा भीम याचा मांडलिक होता; परंतु सिंघण यानें, दुसऱ्यानें गुजराथेवर स्वारी केली त्यावेळीं वीर धवलचा मुलगा विसल देव हा राज्यावर असून त्यानें सिंघणच्या सैन्याचा मोठया निकरानें प्रतिकार केला, व या युद्धांत त्याचा सेना-पती खोलेश्वराचा मुलगा राम हा मारला गेला. खोलेश्वरास या राम नांवाच्या मुला शिवाय बिचणगा या नांवाचाही एक मुलगा होता, व तो ही आपल्या पित्या,

व बंधू प्रमाणें पराक्रमी होता. त्यास सिंघणनें दक्षिणेकडील मुलुखाचा प्रतिनिधी नेमिलें होतें; व त्या वेळीं त्यानें सर्व दक्षिण प्रदेशभर उत्तम बंदोबस्त ठेवून, व रट्ट या नांवाच्या संस्थानिक मंडळीवर योग्य नियंत्रण ठेवून, सिंघणा विरुद्ध कोणासही वर डोकें काढण्यास त्यानें अवसर मिळूं दिला नव्हता. शिवाय त्यानें गोंवें प्रांतातील कदंब वंशीय राजास, पूर्वकालीन गुप्त राजवंशीयांस, पांड्यास, आणि होयसल घराण्यास, पूर्णपणें सिंघणाच्या अमलाखालीं आणून टाकिलें होतें. सिंघण हा राजा महा प्रतापि व यशस्वी असल्यामुळें त्यास "पृथ्विवल्लभ" "सकल पृथ्वी आश्रय" "राजा धिराज" "विष्णु वंशोद्भव," "द्वारावती पुरवराधीश्वर" वगैरे अनेक किताब असून त्याच्या राज्य-ध्वजावर सुवर्ण गरुडाचें चिन्ह होतें. शिवाय तो विद्वानांचा मोठा भोक्ता असून भास्कराचार्य पंडिताच्या घराण्यास त्यानें आश्रय दिला होता. हें घराणें विद्वान म्हणून प्रसिद्ध असून भास्कराचार्यांचा नातू व लक्ष्मीधराचा मुलगा चांगदेव, व भास्कराचार्यांच्या श्रीपती या नांवाच्या भावाचा नातू व गणपतीचा मुलगा अनंतदेव, हे विद्वान पंडित त्याच्या दरबारीं होते. हे उभयतां ही विशेष नामांकित ज्योतिषी असून त्यापैकीं चांगदेव यानें पूर्व खानदेशांतील चाळिसगांव तालुक्यांतील पाटणें या गांवीं भास्कराचार्यांचा " सिद्धांत शिरोमणी " हा ग्रंथ शिकविण्या करितां एक मोठी पाठशाळा स्थापन केली होती, व अनंत देवानें तेथेंच शेजारीं भवानी देवीचें एक देवालय बांधिलें होतें. ( इ. सन १२२२ ) शिवाय त्याचा प्रसिद्ध प्रधान हेमाद्री, याच्या पूर्वी त्या जागीं असलेला श्रीकरणाधीप अथवा मुख्य प्रधान सोधल याचा विद्वान मुलगा, व "संगित रत्नाकर" या ग्रंथाचा कर्ता शारंगधर हाही सिंघणाच्या आश्रयास होता; याच राज्यकर्त्याच्या कारकीर्दीत महाराष्ट्रांतील प्रसिद्ध भगवद्भक्त व साधु पुरुष पुंडलीक हा निर्माण झाला; हा पुरुष महाराष्ट्रांतील भक्तिमार्गाचा आद्य प्रवर्तक असून त्यानेंच इ. सन १२२८ मध्यें पंढरपूर येथें श्रीविठोबाची स्थापना केली.

सिंघण राजास, जैतुगी उर्फ जयपाल या नांवाचा एक मुलगा असून तोही सिंघणाप्रमाणेंच पराक्रमी व विद्वान होता; परंतु तो त्याच्या हयातींतच मृत्यू पावला होता; त्यामुळें सिंघणाच्या मृत्यूनंतर ( इ. सन १२४७ ) जैतपाळाचा मुलगा कृष्णदेव हा गादीवर बसला. त्यानें अजमासें तेरा वर्षें राज्य केलें; व तोही पराक्रमी व कर्तृत्ववान असाच निपजला. त्यानें माळवा, गुजराथ, व

कोंकण, या प्रांतावर स्वाऱ्या करून तेथील राजांना आपल्या योग्य तांबांत आणिलें; त्याप्रमाणेंच त्यानें तैलप राजास त्याच्या गादीवर स्थापन केलें, व चोल राज्य आपल्या हस्तगत करून घेऊन गुजराथचा राज्यकर्ता विसल यांसही पूर्ण पराभुत करून टाकिलें; शिवाय तो धर्मिक प्रवृत्तीचा असून त्यानें पुष्कळ यज्ञयाग करून त्या योगानें वैदिक कर्ममार्गासंबंधी जनतेची श्रद्धा दृढ केली होती. या कृष्णदेवानें कित्येक देशस्थ, व कोंकणस्थ ब्राह्मणांस इनामें करून दिल्याचा--व त्यांत पाटक, घैसास, पटवर्धन वगैरे उपनांवांचा--उल्लेख आढळतो. लक्ष्मीदेव या नांवाचा एक राजनीति कुशल पुरुष त्याचा मुख्य प्रधान असून त्यानंतर " सुक्ति मुक्तावली" या नांवाच्या सुभाषित ग्रंथाचा कर्ता जल्हण हा त्याचा मुख्य प्रधान झाला. शिवाय वेदांत सूत्रावरील टिकाकार अमला नंद हा ही या कृष्णराजाच्या दरबारीं होता; कृष्णराज हा इ. सन १२६० या वर्षी मृत्यू पावला, व त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ महादेव हा गादीवर आला. हा ही कृष्णदेवाप्रमाणेंच शूर असून त्यानें ही गुजराथ, कर्नाटक, व कोंकण, वगैरे प्रांतावर स्वारी करून तेथील राजांचा पराभव केला होता. सिंघ णच्या कारकीर्दीत त्यानें कोंकणातील शिलाहार घराण्याचा पुष्कळ नाश केला होता, तथापि यावेळीं त्या वंशाचा पूर्ण नीमोड झाला नव्हता; व कोंकणचे शिलाहार राजे कसेंबसे जीव जगवीत ठाणें येथें राज्य करीत होते; यावेळीं सोमेश्वर या नांवाचा शिलाहार राजा गादीवर असून त्याच्यावर महादेवानें स्वारी केली, व त्यास ठार मारून तें राज्य त्यानें आपल्या राज्यास जोडून टाकिलें. त्यानंतरच्या काळापासून कोंकणप्रांताचा राज्यकारभार चालविण्यास यादवातर्फे दंडनायक अथवा प्रतिनिधीची नेमणूक होण्यास सुरवात झाली, व पुढें कृष्ण या नांवाच्या भार्गव गोत्री ब्राह्मणाकडे तिकडील कारभार सोंपविण्यांत आला. महादेव हा मोठा धर्मनिष्ट व पापभीरू असून केशव या नांवाच्या काश्यप गोत्री ब्राह्मणाकडून त्यानें " आप्तोर्याम यज्ञ " करविला होता; शिवाय स्त्री, बालक, आणि शरणागत, यांना कोणत्याही प्रकारचा यत्किंचितही उपसर्ग द्यावयाचा नाहीं, असा त्याचा नियम असून या बाबतींत त्याची कीर्ती होती. त्यामुळें आंध्र देशांतील लोकांनीं, राजघराण्यांतील एका स्त्रीस तेथील गादीवर बसविलें होतें, व माळवा प्रांतांतील राजानें आपल्या बाल युवराजास गादीवर

स्थापन केलें होतें. महादेवाच्या मृत्यू नंतर, त्याचा पुतण्या व कृष्णराजाचा मुलगा रामचंद्र हा गादीवर आला. ( इ० सन १२७१ ) हा राजा ही मोठा धार्मिक व कीर्तिमान म्हणून प्रसिद्धीस पावला. महादेवराजा प्रमाणेंच हा ही धर्मशील व सन्मार्गगामी असून त्यानें इ. सन १२७१ मध्यें सत्तावन ब्राह्मणास तीन गांव इनाम दिले होते; त्यावेळीं, त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं त्या गांवतच राहून त्या इनामाचा उपभोग घेतला पाहिजे, तीं गांवें गहाण टाकूं नयेत, त्या ठिकाणीं वेशांना राहूं देऊं नये, जुगार खेळू नये, हत्यारें वापरू नये, व त्यांनीं आपला काळ अहर्निश ईश्वर चिंतनांत, व सत्कर्मांत खर्च करीत रहावा, वगैरे शर्तींनें त्यांना या रामचंद्र राजानें बांधून घेतलें होतें. प्रसिद्ध हेमाद्री उर्फ हेमाडपंत या नांवाचा एक वत्स गोत्री यजुर्वेदी ब्राह्मण त्याचा मुख्य प्रधान होता. त्यानें धर्मशास्त्रावर एका ग्रंथ लिहिला असून "व्रतखंड" या नांवच्या ग्रंथांत यादव वंशाची सर्व हकीकत दिलेली आहे. "चतुवर्ग चिंतामणी" या नांवाच्या ग्रंथाचे चार भाग असून व्रतखंड हा त्याचा पहिला भाग आहे; आणि दानखंड, तीर्थखंड व मोक्षखंड हे त्याचे दुसरे तीन भाग आहेत; शिवाय परिशेष खंड म्हणून एक पांचवा भाग त्यास जोडिला आहे. प्रसिद्ध व विद्वान ग्रंथकार, व "मुक्ताफल" "हरिलाल," "मुग्ध-बोध" या नांवाचें संस्कृतांत लिहिलें प्राकृत भाषेचें व्याकरण, वगैरेंचा कर्ता बोपदेव हा त्याचा जोडीदार होता. हेमाद्री हा स्वत: मोठा हुषार व शीघ्र लेखक असून मोडी लिपी लिहिण्याची कला त्यानेंच प्रथम निर्माण करून उप-योगांत आणण्यास सुरवात केली. शिवाय तो राजनीतिकुशल व व्यवहारज्ञ असून त्यानें राज्यकारभारांतील निरनिराळया बाबतींची व्यवस्था, व्यवहारांतील शिरस्ते-मायने, व हिशोब जमाखर्च, वगैरेची पद्धती, ठरवून दिली होती; सारांश हेमाद्री सारखा अलौकिक श्रीकरणाधीप अथवा मुख्य प्रधान महादेव व रामदेव या यादव राज्यकर्त्यांनां लाभल्यामुळें त्यांच्या राज्याची अत्यंत भरभराट झाली.

याच काळांत, म्हणजे रामदेव उर्फ रामचंद्र यादव या राज्यकर्त्याच्या कारकीर्दींत, महाराष्ट्रांतील प्रसिद्ध साधू ज्ञानेश्वर उर्फ ज्ञानदेव हा निर्माण झाला. ज्ञानदेवाचा जन्म शके ११९७ श्रावण वद्य ८ स आळंदी येथें झाला. त्याच्या आईचें नांव रखमाबाई असें असून बापाचें नांव विठ्ठलपंत हें होतें. विठ्ठलपंत

हा पैठण जवळील आपेगांव येथील गोविंदपंत या नांवाच्या कुळकर्याचा मुलगा असून विठ्ठलपंताची स्त्री रखमाबाई ही आळंदी येथील सिद्धोपंत कुळकर्णी या नांवाच्या एका ग्रहस्थाची मुलगी होती. विठ्ठलपंतानें काशी क्षेत्रांतील रामानंद या नांवाच्या एका सिद्ध पुरुषाचा उपदेश घेऊन त्या स्वामी कडूनच सन्यास दिक्षा घेतली होती; परंतु पुढें रखमाबाईच्या विनवणी वरून त्याच स्वामीनी विठ्ठलपतास पुन्हां ग्रहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली होती; व त्याप्रमाणें त्याच्याकडून पुन्हां ग्रहस्थाश्रम घेवविला होता. विठ्ठलपंत हा आळंदी येथें येऊन ग्रहस्थाश्रमी बनल्यावर तो आपल्या सासुरवाडीस रहात होता. तेथें त्यास निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, व मुक्ताबाई, अशीं चार मुलें झालीं. यापैकीं निवृत्तिनाथाचा जन्म शके ११९५ माघवद्य १, ज्ञानदेवाचा शके ११९७ श्रावण वद्य ८, सोपानदेवाचा शके ११९९ कार्तिक शुद्ध १५, व मुक्ताबाईचा शके १२०१ अश्वीन शुद्ध १, रोजीं झाला असून हीं सर्व मुलें अत्यंत नीतिमान, सदाचरणीं व ईश्वर भक्तिपरायण अशीं निपजलीं; व त्यांतल्या त्यांत ज्ञानेश्वर हा तर विशेषच अलौकिक पुरुष निर्माण झाला. तथापि ज्ञानदेव, सोपानदेव, व मुक्ताबाई, या तीघांनांही निवृत्तीनाथानेंच पहिल्यानें अध्यात्म विद्याज्ञानाची माहिती करून दिली; व त्यानंतर ज्ञानेश्वरानें स्वतःचें बुद्धिवैभव व अगाधज्ञान याच्या योगानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें. हीं चारी मुलें बालपणा पासून ज्ञानी, विरक्त, व ईश्वर-स्वरूप-मग्न होतीं; तरी तीं सन्याशाची संतती, म्हणून ब्राम्हणांनीं निवृत्तिनाथादि तीघां मुलांच्या मुंजी न करितां त्यांनां जातीबाहेर ठेविलें होतें. पुढें ज्ञानेश्वरानें पैठण येथें कांहीं दैवी चमत्कार दाखविल्यामुळें तेथील ब्राम्हण मंडळींनीं हीं मुलें सामान्य नसून देवांश आहेत असें समजून त्यांनां शुद्धीपत्र दिलें, व त्यांची क्षमा मागून या चारीही भावंडांनां त्यांनीं पुन्हां जातींत घेतलें. हीं चारी भावंडें पहिल्यानें नगर जिल्ह्यांतील नेवाशें येथें, व नंतर पैठण येथें, येऊन राहिलीं होतीं. नेवाशें येथें असताना ज्ञानेश्वरानें भगवद्गीतेवरील "भावार्थदीपिका" या नांवाची टिका लिहिली. याच ग्रंथास "ज्ञानेश्वरी" हें नांव असून तो ग्रंथ आज तागाईत विशेष मननीय, मोल्यवान, व महत्वाचा, म्हणून गणला गेलेला आहे. या शिवाय योगवाशिष्ट, अमृतानुभव, स्वात्मानुभव, पंचीकरण, व पासष्टी, वगैरे इतर ग्रंथही ज्ञानेश्वरानें केलेले असून तेही बरेच महत्वाचे व प्रसिद्ध आहेत. शिवाय

तो मोठा विद्वान असल्यानें संस्कृत भाषेतील वेदांत विषयावरील कित्येक महत्वाच्या ग्रंथांचें त्यानें प्राकृत भाषेंत रूपांतर केलें असून त्यांत त्यानें स्वतःच्या ज्ञानाची ही भर घातलेली आहे. ज्ञानेश्वर हा अशा प्रकारचा अलौकिक पुरुष असूनही त्याचे ग्रंथ तीन शतकें अप्रसिद्ध स्थितींत राहिले, ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. हे ग्रंथ पुढें तीनशें वर्षांनीं एकनाथानें स्वमताप्रमाणें दुरुस्त करून प्रसिद्धीस आणिले. ज्ञानेश्वराच्या "भावार्थ दीपिका" या ग्रंथांत भगवद्गीतेवर टिका केलेली असून शिवाय त्यात अध्यात्म विषयाचेंही मोठ्या मार्मिकपणानें विवेचन केलें आहे. त्यामुळें त्या विषयाचा अभ्यास करणारास तो ग्रंथ फारच उपयुक्त म्हणून मानिला गेलेला असून त्यास वारकरी पंथाच्या लोकांत तर विशेषच मान मिळत आहे. शिवाय "मराठी भाषेचा इतिहास" या दृष्टीनें ही हा ग्रंथ विशेष महत्वाचा आहे. कारण प्राकृतांतील मूळरूपें, व कांहीं अपभ्रंश झालेली रूपें, यांचा त्यांत समावेश झालेला आहे. एकनाथानें हा ग्रंथ शुद्ध केला, म्हणजे त्याची निरनिराळीं पाठांतरें पाहून, ज्ञानेश्वराचें हृद्गत कोणतें तें स्वमता प्रमाणें ठरवून त्या अनुरोधानें त्यानें या ग्रंथांत दुरुस्ती केली. हा ग्रंथ ज्ञानेश्वरानें शके १२१२ या वर्षी लिहून पूर्ण केला, असें त्या ग्रंथाच्या शेंवटील " शके बाराशतें बारोत्तरें ॥ तैं टिका केली ज्ञानश्वरें ॥ सच्चिदानंद आदरें ॥ लेखकू जाहला ॥ १ ॥ या ओवी वरून दिग्दर्शित होतें. ज्ञानेश्वरानंतर तीन शतकांनीं एकनाथानें या संबंधीं खालील प्रमाणें खुलासा केला आहे तो'—॥ श्री शके पधराशें सहोत्तरीं ॥ तारणनाम संवत्सरीं ॥ एक जनार्दन अत्यादरीं ॥ गीता ज्ञानेश्वरी प्रति शुद्ध केली ॥ १ ॥ ग्रंथ पूर्वीच अति शुद्ध ॥ परीं पाठांतरीं शुद्धअबद्ध ॥ तो शोधूनियां एवं विध ॥ प्रति शुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥ २ ॥ या वरून एकनाथानें मूळ ग्रंथांत कशा प्रकारची दुरुस्ती केली याची कल्पना करितां येते. ज्ञानेश्वराचे ग्रंथ, व अभंग, विशेष भक्त, वैराग्य, व ज्ञानपर, असून ते निरनिराळ्या विहंगम उपमा, रुपकें, व अलंकार, यांनीं परिप्लुत आहेत. ज्ञानेश्वर हा आळंदी येथें शके १२१८ कार्तिक वद्य ८ स समाधिस्त झाला. त्या ठिकाणीं दर वर्षी कार्तिक वद्य एकादशीस मोठी यात्रा भरत असते. ज्ञानेश्वराचा वडील भाऊ निवृत्तीनाथ हा शके १२२० पौष वद्य ११ रोजीं नाशिक जिल्ह्यांतील त्रिंबकेश्वर या ठिकाणीं समाधिस्त झाला. सोपान देव हा शके १२१९ वैशाख शुद्ध ११ रोजीं पुणें जिल्ह्यां-

तील सासवड येथें समाधिस्त झाला; या तीघांची बहीण नामें मुक्ताबाई ही ही महा धर्मनिष्ट व साध्वी स्त्री म्हणून प्रसिद्ध असून तिनें कित्येक अभंग व कविता केलेल्या प्रसिद्ध आहेत. तिंन खानदेशांतील भुसावळ तालुक्यांतील एदलाबाद या नांवाच्या पेट्याच्या ठिकाणा नजीक शके १२२० वैशाख वद्य ११ रोजी जलसमाधी घेतली. प्रसिद्ध चांगदेव हा या मुक्ताबाईचा शिष्य असून त्यानें मुक्ताबाईचा उपदेश घेतला होता; इ. सन १६०० च्या सुमारास मोंगलाई अमलांत एदलाबाद हें एक प्रसिद्ध ठाणें म्हणून होतें. या ठिकाणीं मुक्ताबाईचें देवालय असून तें प्रसिद्ध आहे.† तेथें वैशाख महिन्यांत शिवरात्रीस मोठी यात्रा भरत असते. त्या प्रमाणेंच एदलाबादेहून अजमासें सहा मैलावर चांगदेव या नांवाचें एक गांव असून त्या ठिकाणीं तापी व पूर्णा या नद्यांचा संगम झालेला आहे. तेथें चांगदेव उर्फ चागदेव वटेश्वर या सिद्ध पुरुषाची समाधी असून दर महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरत असते. नेवासें हा गांव, श्रीज्ञानेश्वरानें त्या ठिकाणीं भगवद्गीतेवरील टिका लिहिली, त्यामुळें विशेष प्रसिद्धीस आला. तथापि त्या ठिकाणीं त्या पूर्वीं ही एक प्रसिद्ध पुरुष निर्माण होऊन गेला होता; तो म्हणजे इ. सन १०४० च्या सुमारास होऊन गेलेला प्रसिद्ध ग्रंथकार श्रीपती हा होय. त्यानें वैद्य शास्त्रावर कित्येक महत्वाचे ग्रंथ लिहिले आहेत; आणि ज्योतिर्गणितावर ही त्यानें प्राकृत भाषेंत लिहिलेला एक ग्रंथ अलीकडे उपलब्ध झाला आहे. मुकुंद राजानें आपल्या "विवेक सिंधू" या ग्रंथाच्या शेंवटी ज्या प्रमाणें चैत्रपाळ

---

† हल्लीं पंढरपूर येथें मुख्य खालील आठ पालख्या दरसाल जात असतात, त्या:-१ आळंदीहून ज्ञानेश्वराची, २ देहूहून तुकारामाची ३ पैठणहून एकनाथाची, ४ त्रिंबकहून निवृत्तीनाथाची ५ एदलाबादेहून मुक्ताबाईची ६ मच्छेंद्रगडाहून मच्छेंद्रनाथाची, ७ सासवडहून सोपानदेवाची, व ८ आरणगांवाहून सांवतामाळयाची. या पालख्यांचे निघण्याचे दिवस व मुक्काम ठरलेले आहेत; व त्याचें सर्व काम वारकरी पंथाच्या मंडळीकडूनच बिनचुक व व्यवस्थेशीर होत असते; या पालख्या पंढरपुरास जात असतां मार्गांत ठिकठिकाणाहून वारकरी लोक त्या मिरवणुकींत येऊन दाखल होत जातात, व या सर्व पालख्या दशमीच्या रात्रीं, आषाढी अथवा महाएकादशी करितां, पंढरपूर येथें जाऊन पोहोंचतात.

राजाचा नामनिर्देश व गौरव केला आहे, त्या प्रमाणेंच महान साधू ज्ञानेश्वर यानें ही आपल्या "ज्ञानेश्वरी" या ग्रंथांत रामदेव उर्फ रामचंद्र यादव राजाचा मोठया गौरवानें नामनिर्देश केला आहे; आणि "कलियुगांत गोदावरी नदीच्या दक्षिण तीरी पांच कोस परिधाचें एक पुण्य क्षेत्र असून तें अखिल त्रिभुवनांत पवित्रतम असें आहे, व त्यांत महालया असून तें जीवन सूत्र आहे; त्या पवित्र क्षेत्रांत यदुकुलांकुर राजा रामचंद्र हा सकल कलाचें निवास स्थान म्हणून असून तो न्यायाचें पोषण करितो, अथवा अन्याय होऊनये म्हणून काळजी घेतो; तेथें महेशाच्या वंशीं उत्पन्न झालेला, व निवृत्तीनाथाचा पुत्र ज्ञानदेव ह्यानें भगवद्गीतेला हा देशी पेहराव चढविला," असें त्या ग्रंथाच्या शेंवटीं दिग्दर्शन केलें आहे.*

---

* ऐसे युगीं परि कळीं । आणि महाराष्ट्र मंडळीं ॥
श्री गोदावरीच्या कूळीं । दक्षिणलीं ॥ १ ॥
त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ॥
जेथ जगाचें जीवनसूत्र । श्री महालया असे ॥ २ ॥
तेथ यदुवंश विलास । जो सकळ कळा निवास ॥
न्यायातें पोषी क्षितीश । श्री रामचंद्र ॥ ३ ॥
तेथ महेशान्वय संभूतें । श्री निवृत्तिनाथ सुतें ॥
केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणें ॥ ४ ॥

ज्ञानदेवाच्या वडिलाचें नांव विठ्ठलपंत असें असून वरील ओव्यांतील चवथींत ज्ञानेश्वरानें, आपणाला "श्री निवृत्तिनाथ सुत" असें म्हणवून घेतलें आहे; याचें कारण, ज्ञानदेवास त्याचा वडील भाऊ निवृत्तिनाथ यानेंच प्रथम अध्यात्मज्ञान करून दिलें; व त्यामुळें तो निवृत्तिनाथास—आपल्या वडील बंधूस—पितृस्थानीं व गुरुस्थानीं मानीत होता, हें आहे; व म्हणूनच त्यानें ज्ञानेश्वरीच्या शेंवटीं तसा उल्लेख केला आहे; या ज्ञानेश्वरीची मूळप्रत अलीकडे उपलब्ध झाली असून तिच्या वरून तत्कालीन मराठी भाषेचें स्वरूप लक्षांत येतें. ज्ञानेश्वरानंतर दोनशें वर्षांत एकही मराठी कवी निर्माण झाला नाहीं, असा आजपर्यंत समज होता; परंतु अलीकडील उपलब्ध माहिती प्रमाणें त्याच्या नंतर थोडक्याच कालांत, चोंभा या नांवाचा एक ब्राह्मण कवी होऊन गेल्याचें कळतें; त्यानें

तथापि रामचंद्र अथवा रामदेव हाच दक्षिणेंतील वैभव संपन्न व स्वतंत्र असा शेंवटचा राज्यकर्ता होय. कारण याच राज्यकर्त्याच्या कारकीर्दींत मुसलमान लोकांनीं दक्षिणेंत प्रवेश केला, व त्या काळांत अत्यंत भरभराटींत असलेलें यादवांचें राज्य नामशेष करून टाकिलें. दिल्ली येथील खिलजी घराण्यांतील प्रसिद्ध बादशहा जलालुद्दीन फिरोज ( कारकीर्द इ. सन १२८९ ते इ. सन १२९५ ) यानें राज्याधिकारूढ झाल्यावर आपला भाऊ शहाबुद्दीन याचे दोन मुलगे नामें अल्लाउद्दीन व अल्मसबेग हे आपणा जवळ बाळगिले होते; त्यांतील अल्लाउद्दीन हा विशेष पराक्रमी असून त्यानें मोंगल लोकांना माघार घेणें भाग पाडिलें होतें; त्यामुळें खुष होऊन बादशाहानें त्यास गंगा व यमुना या नद्यां मधील अंतर्वेदी प्रांतांतील कुरा या नांवाच्या प्रदेशावर सुभेदार नेमिलें होतें. पुढें इ. सन १२९३ मध्यें त्यानें माळवा प्रांतावरील स्वारींत मोठा पराक्रम गाजविला; त्यामुळें जलालुद्दीन यानें आयोध्या प्रांताची सुभेदारी ही त्याच्या कडे सोपविली. अल्लाउद्दीन हा मोठा धाडशी व महत्वाकांक्षी असून तो माळवा प्रांतीं भिलसा येथें असतां दक्षिणेंतील देवगड, देवगिरी, अथवा दौलताबाद, या धनाढ्य शहराची, व तेथील वैभवसंपन्न यादव राज्याची, त्यास बातमी मिळाली; व त्याच वेळे पासून त्या प्रदेशावर स्वारी करण्याचे विचार त्याच्या मनांत घोळू लागले. अल्लाउद्दीन हा विशेष धोरणी असून हिंदू लोकांच्या सात्विक स्वभावाची त्यास पूर्णपणें माहिती होती. आणि त्यांच्या प्रत्येक व्यवहारांत धर्माधर्माचें विशेष प्राबल्य असतें, व त्यामुळें धर्मयुद्धचे नियम ते बरोबर रीतीनें पाळितात, शत्रूस सावध केल्या शिवाय ते युद्ध करीत नाहींत, वगैरे हिंदू स्वभावाची प्रवृत्ती तो पूर्णपणें जाणून होता; म्हणून दक्षिण प्रांतावर स्वारी करून, आपणास तिकडे सहज दिग्विजय मिळविता येईल अशी त्याची खात्री होती. त्या प्रमाणें त्यानें आपला काका बादशहा जलालुद्दीन यांजकडून तिकडील प्रदेशावर स्वारी करण्याची परवानगी मिळविली; इ. सन १२९३ मध्यें आपणा बरोबर आठ हजार सैन्य घेऊन तो कुरा येथून या मोहिमेवर निघाला, व

---

भागवत व हरिवंश वांचून "उषाहरण" या नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ लिहिला असून त्याचा कांहीं भाग हल्लीं उपलब्ध झाला आहे. या ग्रंथाची भाषा जुनी असून हल्लीच्या भाषा पद्धतीच्या मानानें दुर्बोध आहे.

बुंदेलखंडावरून प्रथमतः वऱ्हाडांतील एलीचपूर या शहरापर्यंत येऊन तो पश्चिमेकडे वळला, व झपाट्यानें कूच करीत देवगिरीच्या तटाखालीं एकदम येऊन प्रगट झाला. रामदेवरावास अल्लाउद्दीन याच्या या स्वारीची यत्किंचितही बातमी मिळालेली नव्हती; त्यामुळें तो असावध असून अल्लाउद्दीन बरोबर युद्धास उभे राहण्याची त्याची कोणत्याही प्रकारें तिळमात्र सुद्धां तयारी नव्हती; शिवाय त्याची मुख्य फौज ही राजधानींतून दुसरीकडे गेली होती; तथापि त्यानें हिंमत-धरून अजमासें चार हजार सैन्य मोठ्या लगबगीनें गोळा केलें, व अल्लाउद्दीन बरोबर युद्धास सुरवात केली; रामदेवरावाचें मुख्य व कसलेलें सैन्य, जें बाह्य प्रदेशीं गेलें होतें तें, जर राजधानींत हजर असतें तर, अल्लाउद्दीन यास त्या सैन्याबरोबर टक्कर देऊन विजय मिळविणें जवळ जवळ अशक्य झालें असतें. परंतु नौकर चाकर व इतर बिन अनुभवी भरती मिळून बनविलेल्या या चार हजार कच्च्या सैन्याचा, संख्येच्या व शौर्याच्या दृष्टीनें, अल्लाउद्दीनच्या सैन्यापुढें निभाव लागणें पूर्णपणें अशक्य होतें. त्यामुळें रामदेवाचा पराभव होऊन त्यास माघार घेणें, व किल्ल्यांत आश्रयास जाणें, भाग पडलें. रामदेवरावानें किल्याचा आश्रय केल्यानंतर अल्लाउद्दीन यांस आयतेंच फावलें, व त्यानें किल्याबाहेरील सर्व शहर लुटून किल्ल्यास ही वेढा दिला. तथापि रामदेवरावाचें बाहेर गेलेलें सैन्य परत आल्यास आपणास खात्रीनें धोका होईल, ही गोष्ट तो पूर्णपणें ओळखून होता; म्हणून " मी फक्त थोडेसें सैन्यच कायतें पुढें घेऊन आलेलों असून बादशाही मुख्य व मोठी फौज मागाहून येत आहे " अशी त्यानें कंडी पिकविली, व तिचा परिणाम त्याच्या अंदाजाप्रमाणें त्यास इष्ट असाच घडून आला. कारण ही हकीकत रामदेवरावास कळल्यावर त्यास ती खरी वाटून अत्यंत भीती उत्पन्न झाली, व तो अल्लाउद्दीन बरोबर तह करण्यास कबूल होऊन त्याप्रमाणें उभयतांमध्यें तह झाला. इतक्यांत रामदेवरावाचा मुलगा शंकरदेव हा बाहेरून बरेंच मोठें सैन्य जमवून अल्लाउद्दीन बरोबर युद्ध कर-ण्याकरितां आला; ही गोष्ट रामदेवराव यांस समजल्यावर त्यानें शंकरदेवास " अल्लाउद्दीन बरोबर तह झाला आहे, सबब युद्ध करूं नये; " असा निरोप पाठविला; परंतु शंकरदेवानें तें मनावर न घेतां अल्लाउद्दीन बरोबर युद्ध सुरूं केलें. त्या वेळीं आपल्या सैन्यांतील एक हजार निवडक सैन्य मागें ठेवून अल्लाउद्दीन हा स्वतः युद्धास आला, व उभ-

यतांमध्यें बऱ्याच वेळपर्यंत मोठ्या निकरानें युद्ध झालें. शंकरदेवा बरोबरील सैन्य कसलेलें असून अल्लाउद्दीनच्या सैन्याच्या मानानेंही तें पुष्कळच मोठें होतें; शिवाय स्वतः शंकरदेवानेंही जिवावर उदार होऊन मोठ्या निकरानें अल्लाउद्दीनशीं संग्राम सुरू केला होता. त्यामुळें अल्लाउद्दीन याचा पूर्ण पराजय होऊन त्याचा सर्वस्वीं नाश होण्याची वेळ आली होती; इतक्यांत त्यानें मागें ठेविलेलें एक हजार शिलकी सैन्य त्याच्या मदतीस धांवून आलें; त्या वेळीं शंकरदेवास व त्याच्या सैन्यास, अल्लाउद्दीन यानें, जी मोठी बादशाही फौज आपल्या मदतीस येत आहे, म्हणून बातमी पसरविली होती ती हीच आहे, असें वाटून अतीशय भीति उत्पन्न झाली; या जंगी फौजेपुढें आपला आता निभाव लागणार नाहीं असें वाटून त्यानें व त्याच्या सैन्यानें माघार घेतली; व सैन्याची फळी फुटून ते जिवाच्या भीतीनें सैरावैरा पळूं लागले. ही संधी साधून अल्लाउद्दीन यानें लगट केली, व या सैन्यावर पूर्ण विजय मिळवून तो जेता बनला. इकडे किल्ल्यातील धान्य सामुग्रीही संपत आली होती, व धान्या ऐवजीं मिठाची पोतीं भरून ठेवली असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें होतें. तेव्हां रामदेव रावास तह करण्याशिवाय दुसरें गत्यंतरच राहिलें नव्हतें. त्यामुळें अखेरीस त्यानें नाइलाजानें अल्लाउद्दीनशीं तह केला; त्या अन्वयें त्यानें बादशहाच्या तर्फे अल्लाउद्दीन यास "सहाशें मण मोतीं, दोन हजार मण रत्नें, एक हजार मण रुपें, चार हजार रेशमी कापडाची ठाणीं आणि इतर अनेक मौल्यवान् वस्तु" द्याव्या, दरसाल विवक्षित रकमेची खंडणी दिल्लीस पोहोंचती करावी, आणि एलीचपूर व त्याच्या आसपासचा प्रदेश बादशहास निरंतरचा तोडून द्यावा, असें ठरलें; व त्याप्रमाणें ऐवज पटल्यावर अल्लाउद्दीन यानें देवगिरी वरील आपला शह उठवून तो दिल्ली येथें परत गेला.

अशा रितीनें, दक्षिणेंतील यादवाचें स्वतंत्र राज्य, दिल्लीपतिच्या नियंत्रणा खालील मांडलीक राज्य बनलें. हें राज्य पुढें कांहीं काळ पर्यंत अस्तित्वांत राहिलें; परंतु अल्लाउद्दीन बरोबरील तहा अन्वयें त्याची स्वतंत्रता नष्ट झाल्या बरोबरच त्या राज्याचें वैभव, व विजयोत्पादक शक्ती हीं पूर्णपणें नष्ट होऊन गेली. अल्लाउद्दीन हा उत्तर हिंदुस्तानांत गेल्यानंतर लवकरच (इ.सन १२९६) त्यानें आपला काका व बादशहा जलालुद्दीन यास विश्वासघातानें ठार मारून तो राज्याधि-

कारी बनला. पूर्वी रामदेवरावानें, अल्लाउद्दीन बरोबर तह केल्या वेळीं, बादशाहास नेहमीं विवक्षित खंडणी पाठवीत जाण्याचें कबूल केलें होतें; परंतु ती कबूली म्हणजे निव्वळ सक्तीची खुषी असल्यानें त्यानें ती खंडणी पाठविणें पुढें बंद केलें; तेव्हां, अल्लाउद्दी हा गादीवर आल्यावर त्यानें रामदेवाचें परिपत्य करण्याकरितां आपला विश्वासू व प्रेमी सरदार मलिक काफूर यांस दक्षिणेंत पाठविलें; त्या प्रमाणें तो थेट देवगिरीवर चालून आला, आणि उभयतां मध्यें एक मोठें निकराचें युद्ध होऊन (इ सन १३०७)त्यांत रामदेवरावाचा पूर्ण पराजय झाला, व तो पाडाव होऊन मलिक काफूरच्या हातीं सांपडला. मलिक काफूर यानें त्यास दिल्लीस बादशाकडे पाठविले, व त्या ठिकाणीं त्यास अजमासें सहा महिने प्रतिबंधांत रहावें लागलें. त्या नंतर त्यानें "आपण बादशाही सत्तेच्या पूर्णपणें आधीन राहूं, व करारा प्रमाणें नियमीत खंडणी पाठवित जाऊं" असा बादशाहाशीं ठराव केला. तेव्हां अल्लाउद्दीन यानें त्याची सुटका केली, व त्याचा सन्मान करून, व त्यास एक छत्र, राजाधिराज हा किताब, व एक लाख रुपये बक्षीस देऊन, त्याची दक्षिणेंत रवानगी केली; या वेळे पासून आपल्या मृत्यू पर्यंत रामदेवरावानें दिल्लीपतीशीं केव्हां ही वैर संपादन केलें नाहीं, आणि ठरावा प्रमाणें तो दिल्ली येथें नियमीतपणें खंडणी पाठवीत राहिला.

रामदेवराव हा इ. सन १३०९ मध्यें मृत्यू पावला. व त्याचा मुलगा शंकरदेव हा गादीवर आला. रामदेवरावाच्या एकंदर आयुष्य क्रमावरून पाहता तो शांतता प्रीय, दयाळू, पापभीरू, व धर्मनिष्ट, असा राज्यकर्ता होता, असें दिसतें. त्यास युद्धाची फारशी गोडी नव्हती, आणि त्याचा मुलगा शंकरदेव याच्या मानानें तो पुष्कळच कमी शूर व धाडशी होता, असें निदर्शनास येतें. कारण तो अशा प्रवृत्तीचा नसता, तर थोड्याशा प्रतिकारा नंतर लागलीच तो अल्लाउद्दीनशीं तह करण्यास प्रवृत्त झाला नसता; उलट पक्षीं शंकरदेव हा शूर व धाडशी नसता तर रामदेवरावानें, अल्लाउद्दीन बरोबर तह केल्या नंतर, तो त्या तहास कोणत्याही प्रकारें विरोध दाखविल्या शिवाय तावडतोब मान्य झाला असता; परंतु स्वतःतील शौर्य, धमक, व धाडस, या गुणांमुळें आपण अल्लाउद्दीन यास पराभुत करूं, अशी त्यास आशा, व खात्री होती; व त्याप्रमाणें तो विजयी ही झाला असता; परंतु अकल्पित योगायोगा मुळेंच अल्लाउद्दीन यांस विजय प्राप्त

होऊन शंकरदेवास माघार घेणें भाग पडलें. युद्धभूमीवर विजय प्राप्ती होण्याचा पूर्ण रंग आला असूनही एखाद्या अगदीं क्षुल्लक अथवा साधारण दिसणाऱ्या गोष्टी मुळें कसें चमत्कारिक स्थित्यंतर घडून येतें, याचें, "शंकरदेव व अल्लाउद्दीन यांच्या मधील युद्ध," हें एक विशेष महत्वाचें असें उदाहरण आहे. या युद्धामुळें मुसलमानी सत्तेचा दक्षिण देशांत शिरकाव झाला; व याच युद्धांतील विजयामुळें दक्षिण देशावर मुसलमान राज्यकर्त्यांच्या लागोपाठ स्वाऱ्या होऊ लागून अखेरीस दक्षिणदेश मुसलमानी अमला खालीं गेला. बादशहा जलालुद्दीन याच्या कारकीर्दींतील अल्लाउद्दीन याची दक्षिणेवरील पहिली स्वारी, ही, ह्या दृष्टीनें अतीशय महत्वाची आहे; हीच स्वारी महाराष्ट्रांतील वैभवसंपन्न यादव राजघराण्यास दिल्लीपतीचे अंकित करण्यास कारणीभूत झाली आहे, आणि त्या नंतरच्या अशाच स्वाऱ्यांमुळें दक्षिणेंतील यादव राज्य नामशेष होऊन-व पुढें विजयानगरच्या सत्तीमान, व समृद्ध राज्याचीही तीच स्थिती होऊन-महाराष्ट, कर्नाटक, वगैरे सर्व प्रदेश मुसलमानी अमला खालीं गेलेला आहे.

रामदेवरावाच्या मृत्यूनंतर शंकरदेव हा इ० सन. १३०९ मध्यें गादीवर आल्यावर त्यानें दिल्लीपतीस ठरलेली खंडणी पाठविण्याचें बंद केलें; तेव्हां अल्लाउद्दीन यांस त्याबद्दल राग येऊन त्यानें मलिक काफूर यांस इ० सन १३१२ मध्यें पुन्हा देवगिरीवर पाठविलें; तेव्हा त्यानें शंकरदेवाचा पूर्ण पराजय करून त्यास ठार मारिलें; त्याचें राज्य उध्वस्थ करून देवगिरी शहर आपल्या ताब्यात घेतलें, व शेंवटीं हें राज्य मुसलमानी राज्यांत सामील करून—व महाराष्ट्र देशावर मुसलमानी सत्तेचा पुर्ण अंमल बसवून, तों दिल्ली येथें परत गेला.

बादशहा अल्लाउद्दीन यांस आपल्या आयुष्याचे अखेरचे दिवस विशेष दुःखांत व मानसिक विवचनेंत घालवावें लागले. त्याच्या सरदारांनीं त्याच्या विरुद्ध कारस्थानें व फंदफितुरी करण्यास सुरवात केली; गुजराथेंत त्याच्या सत्ते विरुद्ध मोठें बंड उभारलें गेलें; चितोडगड सारखें महत्वाचें ठाणें त्याच्या अमला खालून नाहींसें झालें, आणि इकडे दक्षिणेंत ही संधी साधून शंकर देवाचा मेव्हणा हरपाळ देव यानें मुसलमानी सत्ते विरुद्ध एक मोठें बंड उभारिलें, व देवगिरी येथील मुसलमान किल्लेदारास तेथून हांकलून देऊन तो तेथें स्वतंत्रपणें राज्य करू लागला. या सर्व गोष्टींचा अल्लाउद्दीनच्या मनावर भयंकर परिणाम होऊन

त्याचें दुखणें बळावलें, व तो पुढें लवकरच मृत्य पावला. ( इ. सन १३१६ ) परंतु त्याच्या मृत्यू मुळें हरपाळचा कोणत्याही प्रकारें फायदा झाला नाहीं; अथवा दक्षिण देशास हा स्वातंत्र्य लाभ ही फार दिवस उपभोगावयास मिळाला नाहीं. कारण अल्लाउद्दीन नंतर त्याचा तिसरा मुलगा मुबारिक खिलजी ( इ. सन १३१६ ते इ. सन १३२० ) हा गादीवर आला; तेव्हां त्यानें स्वतःच दक्षिण प्रांतावर स्वारी केली, व हरपाळ यास कैद करून जिवंतपणीं त्याच्या सर्वांगाची कातडीं सोलवून, त्याचे भयंकर हालहाल करून, त्यास ठार मारिलें. त्या नंतर यादव वंशींय घराणें पार नामशेष झालें, आणि महाराष्ट्र देशावर मुसलमानी अंमल पूर्णपणें प्रस्थापित होऊन बसला.

महाराष्ट्र देशावर ज्या प्रमाणं देवगिरी येथील यादव अथवा जाधव घराण्याचा इ. सन १३१८ पर्यंत अंमल होता, त्या प्रमाणेंच शिलाहार उर्फ शेलार घराण्याचा इ. सन ९४९ पासून इ.सन १२०५ पर्यंत कोल्हापूर-पन्हाळा प्रांतावर अंमल चालू होता. या घराण्याच्या तीन शाखा असून त्या तीन्हीं ही आपली उत्पत्ति विद्याधर गंधर्वांच्या गणाचा राजा जो जिमूतकेतू त्याचा मुलगा जिमूतवाहन याच्यापासून झालेली आहे असें मानितात. या शिलाहार घराण्याचा एक वंश तगर येथें राज्य करीत असून त्यास "तगर पूरवराधीश्वर" असा किताब होता. निझामशाहींतील धारूर हेंच पूर्वीचें प्रख्यात असलेलें तगर हें शहर होय, असें मानितात; व कित्येक पुणें जिल्ह्यातील हल्लींचें जुन्नर-हें तालुक्याचें ठाणें-हेंच त्या काळचें तगर हें शहर होय, असें म्हणतात. या तीन घराण्यांतील एक घराणें उत्तर कोंकण प्रांतावर राज्य करीत असून त्या राज्याच्या हद्दींत १४०० गांवें होतीं, व त्याच्या राजधानीचें शहर पुरी हें होतें. या वंशाचें दुसरें घराणें शाणफुल्ल या नांवाच्या पुरुषानें स्थापन केलें होतें; व दक्षिण कोंकणचा प्रदेश त्याच्या ताब्यांत असून त्याची राजधानी खारेपाटणच्या आसपास होती. तिसरें घराणें करवीर उर्फ कोल्हापूर, मिरज, व कऱ्हाड, या तीन प्रांतावर, व पुढें दक्षिण कोंकणवर ही, राज्य करीत होते. या घराण्यातील मूळ पुरुष अथवा पहिला राज्यकर्ता जटिग हा असून त्याच्या मृत्यू नंतर त्याचा मुलगा नायिवर्म उर्फ नायिम्म, त्या नंतर त्याचा मुलगा चंद्रराज, व त्यानंतर त्याचा मुलगा दुसरा जटिग, हे अनुक्रमें गादीवर आले. यांच्या राजधानीचें शहर पन्हाळा हें असून त्यास पद्मनाल, पद्मदुर्ग, पन्नालदुर्ग

अद्रिदुर्ग वगैरे नांवें होतीं; व दुसऱ्या जटिगानें या दुर्गावरूनच आपणास अद्रि-दुर्ग केसरी–अथवा "अद्रिदुर्गाचा सिंह"–असा किताब धारण केला होता. या जटिगाच्या मागून त्याचा मुलगा गोकल्ल–गोम्मक उर्फ गोम्क–हा गादीवर आला. हा बराच पराक्रमी असून त्याचा कऱ्हाड, मिरज, कुंडल, वगैरे प्रदेशावर अंमल होता; व त्यानें दक्षिण कोंकण प्रांतावर ही स्वारी केली होती. गोकल्ल नंतर त्याचा भाऊ गूवल, त्यानंतर गोकल्लचा मुलगा मारसिंह, त्यानंतर त्याचा मुलगा दुसरा गुवल, नंतर त्याचा भाऊ भोज, त्यानंतर त्याचा भाऊ बल्लाळ, व नंतर गंडरादित्य, हे अनुक्रमें गादीवर आले. यापैकीं गंडरादित्य हा विशेष शूर, उदार, व मोठा न्यायी असा राज्यकर्ता होऊन गेला. त्यानें दक्षिण कोंकण प्रांतावर स्वारी करून तिकडील शिलाहार शाखा नामशेष केली, व तो प्रदेश आपल्या अमलाखालीं आणिला. त्यानंतर विजयार्क, व नंतर त्याचा दुसरा मुलगा भोज ( दुसरा ) हे गादीवर आले. या भोज राजाच्या कारकीर्दीत यादव वंशीय सिंघण यानें हें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडिलें, व अशा रीतीनें या घराण्याचा शेंवट झाला.

शिलाहार हे शिवोपासक असून श्री महालक्ष्मी ही त्यांची कुलदेवी होती; त्यामुळें " श्री महालक्ष्मी लब्धवर प्रसाद" अशी पदवी हे राज्यकर्ते आपल्या नांवास जोडीत होते. या शिलाहार घराण्याची राजधानी प्रथम वळि-वडें, नंतर कोल्हापूर, व शेंवटीं पन्हाळा, या ठिकाणीं होती. हे राज्यकर्ते वैदिक धर्म पाळीत असत; तथापि जैन धर्मास ही त्यांनीं आश्रय दिला होता; कोल्हापूर प्रांतातील आजरें या नावाच्या पेट्याच्या ठिकाणीं त्यांनीं एक बस्ती बांधविली होती; व राजा गंडरादित्य यानें तर तीन देवालयें बांधवून त्यांत शंकर, बुद्ध, व अर्हत, ( जैन ) यांच्या मूर्तींची स्थापना केली होती. या शिलाहार राज्यकर्त्यांच्या देणग्यांत कऱ्हाडे ब्राम्हणांचें नांव असून कोंकणांतील कशेळी हा गांव "भागवत" या उपनांवाच्या कऱ्हाडे ब्राम्हणास त्यांनीं "अग्रहार" म्हणून बक्षीस दिला होता, असा उल्लेख आढळतो. शेलार या उपनांवाची मराठयांची पुष्कळ घराणीं आजही अस्तित्वांत आहेत, व खंडाळे व पुणें यांच्या दरम्यान हल्लीं रेल्वे स्टेशन असलेलें शेलार वाडी हें ठिकाण मूळचें शिलाहारांचें असावें, असा तर्क आहे.

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध यादव उर्फ जाधव घराणें इ. सन १३१८ मध्यें नष्ट झाल्यावर फक्त अठराच वर्षांत, म्हणजे इ. सन १३३६ या वर्षी, हिंदुस्थानच्या दक्षिण द्वीपकल्पांत दुसरें एक अत्यंत प्रबळ, व वैभव संपन्न असें विजयानगरचें हिंदू राज्य निर्माण झालें; विजयानगर हें ठिकाण मद्रास इलाख्यांतील बल्लारी जिल्ह्यांत असून त्यास हंपी असें ही नांव आहे. इ. सन १२९३ पासून मुसलमानांनीं नर्मदानदी ओलांडून दक्षिणेवर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली, व इ. सन १३१८ मध्यें त्यांनीं देवगिरी येथील राज्य नष्ट केल्यावर इ. सन १३२३ मध्यें वारंगळ काबीज करून घेतलें; विजयानगर हें गांव तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर असून तिच्या उत्तर तीरावर अनागोंदी या नांवाचें एक तटबंदी केलेलें शहर होतें. व तें एका लहानशा राज्याची राजधानी म्हणून होतें. हें राज्य इ. सन ६५० च्या सुमारास स्थापन झालें असून तें पुष्कळ काळपर्यंत द्वार समुद्र येथील होयसल बल्लाळांचे मांडलीक होते. इ. सन १३१० मध्यें अल्लाउद्दीन याचा सरदार मलिक काफूर यानें म्हैसूर मधील या होयसल बल्लाळाची राजधानी द्वार समुद्र ही नामशेष केली, आणि इ. सन १३२६ मध्यें वारंगळचाही कायमचा पाडाव झाला. तेव्हां तेथील राजाच्या पदरीं असलेले हरीहर व बुक्क हे दोन कर्तृत्ववान बंधू अनागोंदी येथील राज्यकर्त्याच्या आश्रयास आले, व त्यानेंही त्यांची योग्यता लक्षांत घेऊन त्यांना अनुक्रमे दिवाणगिरी व खजिनदारी या जबाबदारीच्या अधिकारावर स्थानापन्न केलें. मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यामुळें, या काळांत आसपासचीं बरींच हिंदू राज्यें हादरून गेलीं होतीं, व कांहीं तर त्यांनीं नामशेषही करून टाकिलीं होतीं; तरी त्यामुळें या अनागोंदीच्या छोट्या संस्थानावर इ. सन १३३४ पर्यंत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रित्याही कोणता मुद्दां घातुक परिणाम घडला नव्हता; परंतु त्यानंतर अकल्पित रित्या एक निराळेंच कारण उपस्थित झालें; व त्याचा परिणाम अखेरीस त्या राज्यास अत्यंत हानिकारक रीतीनं भोगावा लागला!

इ. सन १३४३ मध्यें दिल्ली येथील बादशहा महमद तुघलख याचा पुतण्या बहुद्दीन यानें बादशहा विरुद्ध बंड उभारिलें, व तो दक्षिणेंत निघून येऊन त्यानें अनागोंदी येथील राजाचा आश्रय मागितला; व त्यानेंही कोणताही विचार न करितां बहुद्दीन यांस आश्रय दिला. वास्तवीक म्हटलें म्हणजे अशा

प्रकारच्या दोन बलिष्टांच्या भांडणांत प्रत्यक्ष तर राहोंच, पण अप्रत्यक्ष रित्याही भाग घेणें, अथवा मदत करणें, मोठ्या धोक्याचें असतें; इतकेंच नाहीं तर, अशा बड्या लोकांच्या, अथवा बलिष्टांच्या, लढाजंगीच्या महत्व स्थापने संबंधीच्या भांडणांत, व चिकाटीच्या स्पर्धेत, दु. र्शीपणानें वागण्यांत यत्किंचितही हयगय झाली, तर त्यामुळें स्वतःचा नाश आपण होऊनच आपणावर ओढून आणण्यासारखें होतें, ही गोष्ट त्या राज्यकर्त्यानें लक्षांत घ्यावयास पाहिजे होती; शिवाय शरण आलेल्यास अभय देणें, ही धर्मनीति पाळितांना स्वतःचें बलाबल, व साधन सामुग्री याचा ही योग्य विचार त्यानें करावयास पाहिजे होता; परंतु कोणत्याही दृष्टीनें त्यानें विचार पूर्वक आचरण न केल्यामुळें त्याचे परिणाम त्यास व त्याच्या राज्यास पूर्णपणें अनिष्ट असे भोगणें प्राप्त झाले. अनागोंदी येथील राजानें बहुद्दीन यांस आश्रय दिल्याचें सुलतान महंमद यांस कळल्यावर त्यास अनागोंदीच्या राजाचा अतीशय राग आला, व त्यानें त्याच्यावर मोठ्या तडफीनें स्वारी केली. अनागोंदीचें राज्य लहान, आणि सुलतानासारख्या बड्या सत्ताधीशाच्या जोरदार स्वारीचा प्रतिकार करण्यास तर अगदींच कमकुवत, होतें; तरी सुद्धां अनागोंदीकरानें महमंदाच्या सैन्याचा कांहीं काळपर्यंत मोठ्या शौर्यानें व निकरानें प्रतिकार केला; व अखेर किल्ला पाडाव होऊन आपण शत्रूच्या हातीं जिवंत सांपडणार, अशी त्याची खात्री झाल्यावर त्यानें आपल्या सरदार वगैरे मुख्य मुख्य मंडळींच्या स्त्रिया व मुलें एकत्र करून त्या सर्वांची अग्नींत आहुती दिली; व आपल्या शूर सरदारासह मोठ्या आवेशानें शत्रू सैन्यावर तुटून पडून अखेरीस सर्वांसह तो युद्धांत मारला गेला. सुलतान महमंद यानें अनागोंदीचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें, व तेथें मलिक या नांवाच्या आपल्या एका सरदाराची नेमणूक करून तो दिल्ली येथें परत गेला; अशा रीतिनें अनागोंदीचा पाडाव झाल्या नंतर हरीहर व बुक्क यांनीं आपला गुरू माधवाचार्य अथवा विद्यारण्य स्वामी‡ यांच्या

‡ माधवाचार्य, उर्फ विद्यारण्य स्वामी, हा मोठा मुत्सद्दि व राजकारणी साधु पुरुष असून, शिवाजीच्या समर्थ रामदास स्वामी, या गुरू प्रमाणें, त्याची अलौकिक योग्यता होती. हा मोठा कर्तबगार असून त्यानें समर्था प्रमाणेंच राज्य व धर्म या दोहोंचा मिलाफ करून विजयानगरचें राज्य भरभराटीस आणिलें, हाच

आहेत. अनागोंदीच्या समोर, तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर, विजयानगर या नांवाच्या एका शहराची स्थापना करून, त्या ठिकाणीं एक बलाढ्य गादी निर्माण केली.

---

शृंगेरी येथील श्री शंकराचार्यांच्या गादीवर बसलेला पहिला पुरुष असून, त्या वेळे पासून त्यास विद्यारण्य स्वामी हें नांव प्राप्त झालें; या स्वामीनें धर्म, नीति, तत्वज्ञान, न्याय व व्याकरण इत्यादि अनेक विषयांवर संस्कृत ग्रंथ व टिका लिहिलेल्या आहेत. या माधवाचार्यास सायणाचार्य या नांवाचा एक धाकटा भाऊ होता; तोही मोठा विद्वान असून त्यानें वेद व उपनिषेध यांजवर उत्कृष्ट व प्रचंड असें भाष्य लिहिलेलें असून त्यावरूनच हल्लींच्या काळीं सुद्धां वेदांचा अर्थ निश्चित करण्यांत येतो. त्याप्रमाणेंच तो मुत्सद्दि ही असून दुसऱ्या हरीहराच्या कारकीर्दीत तो मुख्य प्रधानाचें काम पाहात होता. माधवाचार्य हा पहिल्यानें राजा संगम याच्यापदरीं असून पुढें त्याचा मुलगा हरीहर याच्या आश्रयास तो राहिला; या स्वामीच्याच प्रोत्साहनानें. व सांपत्तिक मदतीनें, हरीहरानें विजयानगरच्या भावी बलाढ्य साम्राज्याची उभारणी केली. शिवाय विजयानगर ही राजधानी वसवितांना तिचें स्थळ निश्चित करण्यांत ही त्यानें आपलें अलौकिक बुद्धिसामर्थ्य व्यक्त केलें. निकोलो कोंटे या नावांचा एक व्हेनीस येथील रहिवासी इ. सन १४२० मध्यें तेथून प्रवासास निघाला, व खंबायतेवरून दक्षिण किनाऱ्याखालीं येऊन तेथून पायरस्त्यानें तीनशें मैलांचा प्रवास करून तो विजयानगर येथें गेला; व तेथें कांहीं वर्षे तो मुक्काम करून राहिला. या अवधींत त्यानें तेथील एकंदर परिस्थिति प्रत्यक्ष पाहून जें वर्णन केलें, तें मोठें महत्वाचें व मननीय आहे; तो म्हणतो " विजयानगर हें शहर एका उंच डोंगराच्या पायथ्याशीं असून त्याचा घेर साठ मैलांचा आहे शहराच्या सभोंवतीं तट बांधिला असून त्याच्या भिंती पर्वत प्राय उंच व दऱ्याखोऱ्यांनीं वेष्टून गेलेल्या आहेत; या राज्यांत पाहिजे तेव्हां तयार असे, शाहाण्णव हजार सैनिक लढाईस सिद्ध आहेत. येथील श्रीमंत लोकांची राहाण्याचीं घरें व वाडे दगडी असून शहरभर पाण्याचे कालवे फिरविलेले आहेत. शहरांत मोटमोठे बाग बगीचे असून आसपास ऊंस व तांदूळ यांचें पुष्कळ पीक उत्पन्न होतें. या राजधानींत ठिकठिकाणीं भव्य व मनोहर देवालयें असून ब्राम्हणांच्या पाठशाळा ही पुष्कळ आहेत; व मोटमोठे वाडे, मंदिरें व गोपुरं वगैरे मुळें या शहरास अवर्णनीय शोभा

विजयानगर येथील हें घराणें यादव वंशातील होतें अशाबद्दल आधार उपलब्ध झाला असून दुसऱ्या हरीहराच्या कोरीव लेखांत "प्रसिद्ध सीम महिमा वंशे यादव भूभृतं अखंडित गुणोदार: श्रीमान्बुक्क महिपति:" ( यादवराजांच्या घराण्यामध्यें बुक्क या नांवाचा एक अत्यंत पराक्रमी राजा निर्माण होऊन गेला ) असें वर्णन केलेलें आहे.

---

प्राप्त झालेली आहे;" अशा प्रकारचें या विजयानगरचें वैभव असून तें मिळवून देण्यांत व त्याची वृद्धी करण्यांत या माधवाचार्यांनें अतीशय प्रयत्न केले, व त्या मुळेंच तें राज्य अत्यंत वैभव संपन्न व बलाढ्य बनलें, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

निकोलो कोंटे शिवाय इतर ही कांहीं प्रवासी विजयानगर येथें निरनिराळ्या काळीं येऊन गेले असून त्यांनीं ही त्या राज्या संबंधी निरनिराळी हकीकत आपल्या प्रवास वृत्तांत ग्रंथित केली आहे; इ. सन १४७४ या वर्षी निकेटिन या नांवाचा एक रशियन प्रवासी हिंदुस्थानांत येऊन विजयनगर येथें ही गेला होता; त्या वेळीं तेथील अपूर्व वैभव व त्या शहराची अभेद्य रचना पाहून त्यानेंही असेच मोठे प्रसंशनीय उद्गार काढिले आहेत. तो म्हणतो:–

"विजयानगर येथील हिंदू कदम वंशीय राजा, हा महा बलाढ्य आहे; त्याच्या जवळ असंख्य सैन्य आहे; तो विजयानगर येथें पर्वतावर राहतो. हें विस्तृत शहर तीन किल्ल्यांनीं वेष्टित असून त्याचे नदी मुळें दोन विभाग झालेले आहेत. त्या शहराच्या एका बाजूस भयंकर अरण्य पसरलेलें असून दुसऱ्या बाजूस दरी आहे; व ती चमत्कृतीजन्य असून कोणत्याही कार्यास सोयस्कर, व एका बाजूनें तिच्यांत बिलकुल शिरकाव करितां येणार नाही अशी आहे. या शहराच्या बरोबर मध्य भागांतून एक रस्ता जातो, व खालीं खोल दरी असलेला पर्वत उंच उंच होत जातो; व त्या मुळें हें शहर दुर्भेद्य बनून गेलेलें आहे.")

(The Hindu Sultan Kadam is a very powerful prince. He possesses a numerous army and resides on a mountain at Bichenegher. This vast city is surrounded by three forts and intersected by a river bordering on one side on a dreadful jungle and on the other on a dale a wonderful place and to any purpose convenient. On one side it is quite inaccessible; a road goes right through the town and as the mountain rises high with a ravine below, the town is impregnable."
—Athanasins Nikitin, See A Forgotten Empire.

अनागोंदी येथील राज्याचा नाश झाल्यानंतर या आपत्तींतून वांचलेले सरदार व प्रजाजन यांनीं या नवीन वसविलेल्या विजयानगर शहरांत येऊन वास्तव्य केलें, व लवकरच तें शहर अत्यंत भरभराटीप्रत येऊन पोहोंचलें; पुढें, सुलतान महमद यानें अनागोंदी येथील बंदोबस्त ठेवण्याकरितां नेमिलेला सरदार मलिक याच्या हांतून तेथील बंदोबस्त योग्य प्रकारें राहीना, म्हणून त्यानें हरीहर यांजकडे ते राज्य सोपविलें, व त्याचा भाऊ बुक्क याची त्या राज्याचा मुख्य प्रधान म्हणून नेमणूक केली. हे उभयतांही बंधू मोठे पराक्रमी असून त्यांनीं आपल्या राज्याच्या दक्षिणोत्तर दिशेकडील बराच मुलूख जिंकून आपल्या राज्याचा विस्तार केला. व इ० स. १३४० मध्ये बदामी येथें एक किल्ला बांधिला; हरीहर हा आपणास सुलतान महमद याचा मांडलीक समजून राज्य करीत असे; व सुलतानाच्या सत्ते पासून आपण स्वतंत्र व्हावे, अशी त्याने केव्हांही खटपट केली नव्हती. तो इ० सन १३४४ मध्ये मृत्यू पावला, व त्याचा भाऊ बुक्क हा गादीवर आला. हा मोठा पराक्रमी व कर्तृत्ववान असून त्यानें छत्तीस वर्षें राज्य केलें. याच्या कारकीर्दींत विजयानगरच्या राज्याची झपाट्यानें भरभराट होण्यास प्रारंभ झाला; त्यानें विजयानगर पासून विंध्याद्रि पर्वता पर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या अमलाखालीं आणिला; तथापि त्याची कारकीर्द इतर दृष्टीनेंही महत्वाची आहे; कारण मुसलमानी स्वाऱ्यामुळें एकामागून एक हिंदू राज्यें नष्ट होण्यास प्रारंभ झाला, त्यावेळीं हिंदू राजेरजवाडयांनीं परस्परांमधील मतभेद विसरून एकत्र व्हावें, व सर्वांनीं मिळून मुसलमानांच्या वाढत्या सत्तेचा कायमचा नाश करावा, अशा इच्छेने त्याने त्यांच्या विरुद्ध एक प्रबळ कट तयार केला; व त्यांत द्वार समुद्र येथील होयसल राजा बल्लाळ, वारंगूळचा माजी राजा रुद्रदेव; अथवा प्रतापरुद्र, याचा पराक्रमी मुलगा कृष्णदेव, उर्फ कृष्ण नाईक, व दक्षिणेंतील इतर हिंदू राजेरजवाडे, यांनां सामील करून घेऊन मुसलमानांचा प्रतिकार करण्याची सिद्धता केली; तेव्हां हसन गंगू या नांवाच्या एका सरदारास महंमद तुघ्लख यानें त्यांच्यावर दक्षिणेंत पाठविलें; परंतु या वेळीं या हिंदू राजांनीं त्याचा इतक्या जोरानें प्रतिकार केला कीं, मुसलमानांच्या ताब्यांतील तिकडील सर्व प्रदेश नाहींसा होऊन दौलताबाद शिवाय दुसरें एकही स्थळ कांहीं काळपर्यंत त्यांच्या ताब्यांत राहिलें नाहीं.

भावी प्रसिद्ध राज्यकर्ता, व बहामनी राज्याचा मूळ पुरुष, अल्लाउद्दीनशहा ( इ. सन १३४७ ते १३५८ ) हा मूळचा गरीब स्थितींतील मनुष्य असून तो दिल्ली येथें गंगू या नांवाच्या एका ब्राह्मणाच्या आश्रयास राहिलेला होता. परंतु त्याचें इमानी वर्तन अनुभवास आल्यावरून तो हसन यास प्रेमानें वागवूं लागला. गंगू यानें हसन यांस शेती करण्याचें काम सांगविलें होतें; त्याप्रमाणें तो एक दिवस शेतांत जाऊन जमीन नांगरींत असतां त्यास त्या ठिकाणीं एक मोहोरांचा हंडा सांपडला; तो, हसन यानें, त्यासंबंधीं कोणताही अभिलाष न बाळगितां, तसाच आपल्या धन्यास नेऊन दिला; त्यामुळें गंगु ब्राह्मणास त्याच्याबद्दल आदर बुद्धि उत्पन्न होऊन त्याचें कल्याण करण्याची तो संधी पाहूं लागला. या गंगु ब्राह्मणावर दिल्लीपति महमद तुघलख याची विशेष मेहेर नजर होती त्यामुळें गंगू यानें सुलताना जवळ एक दिवस संधी साधून हसन याच्या इमानीपणाबद्दल तारीफ केली, व त्यास बादशहानें कृपाळू होऊन योग्यतेस चढवावें, म्हणून विनंती केली; त्याप्रमाणें बादशहानें हसन यांस आपल्या पदरीं ठेवून घेतलें, व त्यास दहा हजार स्वारांची सरदारी दिली; अशा रीतीनें हसनचा भाग्योदय होण्यास प्रारंभ झाला तेव्हां गंगू ब्राह्मणानें त्याची पत्रिका पाहून "तुला राज्य प्राप्ति होईल;" असें भविष्य केलें; व तसें झाल्यास, "तूं आपल्या नांवास गंगू हें उपपद जोडावेस, व मलां फडणिशी अथवा खजिनदारी पदावर स्थापन करावेस," अशा बद्दल त्याचें वचन घेतलें. यावेळीं इस्मायलखान या नांवाचा बादशाही सुभेदार दक्षिणेंतील कारभार पहात होता; त्याच्या मदतीस बादशहानें हसन याची दिल्लीहून दक्षिणेंत रवानगी केली; परंतु, त्यानंतर, इस्मायलखानानें गुजराथेंतील कित्येक बंडखोर सरदारांना आश्रय दिल्याची हकीकत बादशहास कळली; तेव्हां त्याचें पारिपत्य करण्या करितां तो दक्षिणेंत आला; त्यावेळीं सर्व सरदारांनीं मिळून इस्मायलखानास दक्षिण प्रांताचा स्वतंत्र सुलतान बनविलें, व त्यास नासिरउद्दीन असा किताब दिला; त्या प्रमाणेंच हसन यांसही जाफरखान असा किताब देऊन, त्यास नासिरउद्दीनचा दुय्यम नेमिलें; इतक्यातच बादशहा ही या सरदार मंडळीवर चाल करून आला; परंतु तो इकडे आला न आला तोंच, त्यास, दिल्ली येथें आपणा विरुद्ध मोठें बंड झाल्याची बातमी मिळाली; त्यामुळें या सरदार मंडळीचें पारिपत्य करण्यास आपलें कांहीं सैन्य मागें ठेवून, तो मोठ्या लगबगीनें दिल्ली येथें परत गेला; तेव्हां हसन उर्फ जाफर-

खानानें मागें राहिलेल्या मोंगली सैन्यावर मोठ्या जोराचा हल्ला करून त्याचा नाश केला, व बेदर आणि कंधारी हे किल्ले हस्तगत करून दक्षिणेची राजधानी दौलताबाद या शहरावर तो चाल करून गेला. तेव्हां तेथील नुकताच सुलतान झालेला नासिरउद्दीन यानें दक्षिण प्रांताचा कारभार स्व खुषीनें सोडून तो जाफरखानाच्या हवालीं केला; आणि त्यानें अल्लाउद्दीन-हसन-गंगु असें नांव धारण करून तो ता. १२ आगष्ट इ० सन १३४७ रोजीं राज्यपदारूढ झाला.

अल्लाउद्दीनशहा हा गादीवर आल्यावर त्यानें आपल्या राजधानीचें शहर दौलताबाद हें बदलून कलबुर्गा उर्फ गुलबर्गा ‡ हें केलें. या राज्यास "बहामनी राज्य अशी संज्ञा असून त्याचा समावेश महाराष्ट्राच्या इतिहासांत होतो. हसन हा दक्षिण प्रांताचा राजा झाल्यावर त्यानें गंगू ब्राह्मणास दिलेलें वचन बरोबर पाळिलें. त्या वेळे पासून तो आपल्या नांवा पुढें " गंगू बहामनी " हें उपपद जोडूं लागला, व त्यानें गगू ब्राह्मणास मोठ्या सन्मानानें दिल्ली येथून गुलबर्गा येथें आणवून त्यास फडणिशी कामावर स्थापन केलें, व त्याचा योग्य इतमाम सुरू करून तो अखेर पर्यंत चालू ठेविला. हा सुलतान न्यायी व सदाचरणी असून तो हिंदु धर्म द्वेष्टा नव्हता; अथवा मुसलमानी धर्माचाही कट्टा अभिमानी नव्हता. त्या मुळें त्यानें आपल्या राज्यांतील हिंदू प्रजेचा धार्मिक बाबतींत कोणत्याही प्रकारें छळ केला नाहीं. हें बहामनी राज्य, व विजयानगरचें राज्य हीं दोन्हीं

---

‡ हें शहर जी. आय. पी. रेलवेवर, पुणें–रायचूर मार्गावर, रायचूर पासून ९० मैलांवर निझामाच्या राज्यांत एक जिल्ह्याचें ठिकाण म्हणून आहे. हें शहर विजयानगरच्या माजीं राज्याच्या उत्तर दिशेस, व बारंगूळच्या पश्चिम दिशेस, अजमासें दीडशें मैलांवर असून दक्षिण प्रांताची पूर्व कालीन राजधानी, म्हणून तें आजतागायत प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध मुसलमानी साधू खाजा बंदा नवाझ अवलिया याच्या सन्मानार्थ या ठिकाणीं दर नोव्हेंबर महिन्यांत मोठी यात्रा भरत असते. येथें फिरोजशहानें ( इ० सन १३९७ ते १४२२ ) स्पेन देशाच्या धर्तीवर एक मशीद बांधिली असून ती हल्लीं अस्तित्वांत आहे; त्याप्रमाणें जुना मोडकळीस आलेला किल्ला, व इतर इमारती, वगैरे पूर्व वैभवाची कांहीं अवशिष्ट चिन्हें आजही दृग्गोचर होत आहेत.

ही राज्यें एकाच काळांत अनुक्रमें गुलबर्गा, व विजयानगर, येथें स्थापन होऊन पुढें या उभयतांत, परस्परांना नामशेष करण्या करितां, व स्वतःचें वर्चस्व निर्वेध करण्या करितां, मोठ्या निकराच्या युद्ध प्रसंगाचें सत्र चालू झालें.

मध्यंतरीं, अल्लाउद्दीन हा मृत्यू पावला, व त्याचा मुलगा महंमदशहा हा गादीवर आला. (इ. सन १३५८) याच्या कारकीर्दींत बुक्क यानें तैलंगणच्या राजाची मदत घेऊन, बहामनी राज्याच्या ताब्यात गेलेले आपले केलास वगैरे प्रांत परत मिळविण्या करितां महंमदशहाशीं युद्ध सुरूं केलें; त्यांत तैलंगणचा राजपुत्र विनायकदेव हा बुक्क याचा सेनापती होता. महंमदशहाच्या कारकीर्दींत केलास प्रांतावर बहादूरखान या नांवाचा एक शूर सरदार सुभेदार म्हणून कारभार चालवित होता; त्यानें बुक्क याच्या हिंदू सैन्या बरोबर निकराचें युद्ध करून त्याचा पूर्ण पराजय केला तथापि त्या नतर हें युद्ध बंद न पडतां तसेंच पुढें ही चालू राहिलें; तेव्हां महंमदशहा हा स्वतः या सैन्यावर चाल करून आला, आणि त्यानें त्याच्याशीं पुन्हां युद्ध करून बेलमकोंडा उर्फ वेलमपट्टण येथें विनायक देवाचा पाडाव करून त्याचा वध केला. तेव्हां बुक्क यानें दिल्ली येथील बादशहा फिरोजशहा याची मदत मागितली; परंतु तो राज्य विस्ताराच्या विरुद्ध मताचा असल्यामुळें त्यानें बुक्कास महंमदशहा विरुद्ध कोणत्याही प्रकारें मदत केली नाहीं; ही गोष्ट महंमदशहास, विशेष फायदेशीर, व एक प्रकारें बुक्क विरुद्ध उत्तेजन देणारी, अशीच घडून आली; आणि त्यानें तैलंगण प्रांतावर स्वारी करून तेथील राज्यकर्त्या कडून ३३ लक्ष रुपये खंडणी, व गोवळकोंड्याचा किल्ला, मिळविला, व विजयानगर येथील बुक्क राजा विरुद्ध मोहीम सुरू केली; तथापि बुक्क यानें कोणत्या ही प्रकारें न डगमगतां शहाच्या सैन्या बरोबर मोठ्या निकरानें टक्कर दिली, व मुद्गलचा किल्ला हस्तगत करून घेतला. त्या नंतर अध्वनी या नांवाच्या गांवाजवळ पुन्हां बुक्कचा सेनापती भोजमल्ल यानें शहा बरोबर लढाई दिली; परंतु तींत त्याचा पराभव होऊन तो जखमी झाला, व त्यास मुसलमानी सैन्या समोरून माघार घेणें भाग पडलें. (इ० सन १३६६) आणि पुढेंही या उभयतां राज्यकर्त्यां मध्यें कांहीं काळ पर्यंत युद्ध सुरू राहून, नंतर उभयतां मध्यें तह झाला. महंमदशहा, हा इ० सन १३७५ मध्यें मृत्यू पावला, आणि त्याचा मुलगा मुजाहिदशहा हा गादीवर आला; हा राज्यकर्ता मोठा शूर व धाडशी असून

त्यानें ही विजयानगरकर बुक्क राजा बरोबर सारखे युद्ध प्रसंग सुरू ठेविले; थेट विजयानगर शहरावर ही चाल करून येऊन त्यानें बुक्क यांस आपणा बरोबर तह करण्यास भाग पाडिलें; आणि त्याच्या कडून पुष्कळ संपत्ती व प्रदेश मिळवून तो गुलबर्गा येथें परत गेला; ( इ० सन १३७८. ) त्या नंतर पुढील वर्षी ( इ० सन १३७९ मध्यें ) विजयानगरकर बुक्क हा मृत्यू पावला, व त्याची स्त्री गौरी हिच्या पोटीं झालेला मुलगा हरीहर ( दुसरा ) हा गादीवर बसला. त्यानें आपणास " महाराजाधिराज " ही पदवी धारण केली असून, प्रसिद्ध माधवाचार्यांचा मुत्सद्दी व विद्वान बंधू सायणाचार्य, हा त्याचा मुख्य प्रधान होता. हरीहर हा शंकर भक्त असून त्यानें आपल्या कारकीर्दीत अनेक शिवालयें बांधिलीं, व त्यांचा इतमाम, पूजा अर्चा, वगैरेच्या खर्चाच्या बाबतींचाही योग्य बंदोबस्त करून दिला. हरीहर हा इ० सन १३९९ मध्यें, वीस वर्षे राज्य करून, मृत्यू पावला, व त्याचा मुलगा दुसरा बुक्का हा गादीवर आला. याची कारकीर्द फक्त सात वर्षांचीच असून ती ही विशेष महत्वाची नाहीं; दुसऱ्या बुक्क नंतर त्याचा भाऊ देवराय हा गादीवर आला. त्यावेळीं फिरोजशहा या नांवाचा राज्यकर्ता बहामनी गादीवर होता. त्या काळांतील या उभयतां ही राज्यकर्त्यां संबंधीं विशेष लक्षांत ठेवण्या सारखी गोष्ट ही आहे कीं, ते उभयतां ही नैतिक आचरणापासून परावृत्त झालेले, व विषयी होते; फिरोजशहा हा स्वतः मद्यप्राशन करीत होता; त्याचा जनानखाना अतीशय मोठा असून त्यांत निरनिराळया देशांतील स्त्रिया संग्रहित केलेल्या होत्या, व भीमा नदीच्या तीरीं फिरोजाबाद या नांवाचें एक शहर वसवून त्या ठिकाणीं त्यानें आपल्या या जनानखान्याकरितां—हल्लीं अस्तित्वांत असलेला-एक तटबंदी व विस्तीर्ण वाडा ही बांधिला होता. विजयानगरकर देवराव हाही तसाच विषयी व विलासी होता; परंतु अशा अनीतिच्या समान शीलाच्या राज्यकर्त्यां मध्यें पूर्वापार चालत आलेल्या प्रतिस्पर्धेत, स्त्री विषयक बाबतीची भर पडल्यास, तिचा मोठ्या जोरानें स्फोट झाल्या शिवाय, आणि त्यांतील दुर्बलावर त्याचा भयंकर आघात झाल्या शिवाय, राहणार नाहीं, ही गोष्ट उघडच ठरल्या सारखी होती; आणि त्या प्रमाणेंच त्याचे अखेरीस परिणाम घडून आले; फिरोजशाहाच्या कारकीर्दीत देवरायानें शहाच्या ताब्यांतील रायचूर दुआब प्रांत आपल्या हस्तगत करून घेण्याकरितां तिकडे स्वारी केली;

तेव्हां फिरोजशहाही त्याच्याशीं युद्ध करण्याकरिता तिकडे चाल करून गेला; व या उभयतांच्या सैन्याची कृष्णा नदीवर गांठ पडली; परंतु या वेळीं नदीस उतार नसल्यामुळें हीं उभयतांही सैन्यें एकमेकांसमोर दोन कांठावर तळ देऊन राहिलीं; त्यावेळीं फिरोजशहानें देवरायाच्या सैन्यात कपटानें प्रवेश करून त्याचा नाश करण्याची मसलत केली, आणि देवराय व त्याचा मुलगा हे विषयी, व विलासी, असल्याचें त्यास माहित असल्यामुळें, आणि काळ, वेळ, व प्रसंग, न ओळखतां, ते त्यांत मग्न होतील, अशी त्याची साधारणतः खात्री असल्यामुळें त्यांनां विलासांतच मग्न करून नामशेष करावें, असें त्यानें कारस्थान उभारिलें. फिरोज हा स्वतः त्याच मालिकेंतील असल्यामुळें त्याच्या बरोबर करमणुकीची निरनिराळीं साधनें जय्यत असणें स्वाभाविकच होतें; व तीं, तशीं होतीं ही; त्या पैकीं शिराज या नांवाच्या एका कसबी मनुष्यास त्यानें एका कलावंतिणी बरोबर स्त्री वेष देऊन गुप्त रीतीनें कृष्णानदी पलीकडील देवरायाच्या छावणींत रवाना केलें, व तीं उभयतां तेथें सुरक्षित पोहोंचल्यावर त्यांनीं अगाऊ तजवीज करून राजपुत्रा समोर आपलें गान-नृत्यादि कसब दाखविण्याची परवानगी मिळविली; नंतर रात्रीं सुरे जंबिये वगैरे प्राण घातक हत्यारें आपणा बरोबर लपवून घेऊन शिराज हा, त्या कलावंतिणीसह, स्त्री वेषांत राजपुत्राच्या डेऱ्यांत गेला, व तेथें त्यानें तिच्यासह राजपुत्राच्या समोर नृत्य–गान करण्यास सुरवात केली. राजपुत्रास आपणावरील प्राणहारक भावी दग्याची कोणत्याही प्रकारें नुसतीं शंका येण्यास सुद्धां कारण नव्हतें; त्यामुळें तो या नृत्य गायनांत अगदीं तल्लिन होऊन गेला होता; ही संधी साधून सिराज हा एकदम त्याच्यावर मोठ्या जोरानें तुटून पडला, आणि त्यास भयंकर वार करून त्यानें जागच्या जागींच ठार केलें; त्या बरोबर विजयानगरकरांच्या सैन्यांत रात्रींतच भयंकर गोंधळ उडून तें सैन्य भीतिग्रस्त व नाउमेद झालें; अशा संधींत, दुसऱ्या दिवशीं सकाळीं फिरोजशहानें या सैन्यावर हल्ला केला, व त्याचा पूर्ण पराभव करून, विजयानगरपर्यंत पाठलाग करीत तो चाल करून गेला; तेव्हां अखेरीस देवरायानें फिरोजशहाशीं नाइलाजानें तह केला, आणि मुबलक खंडणी भरून त्यानें शहास कसें बसें एकदाचें परत वाटेस लाविलें.

तथापि या उभयतां राज्यकर्त्यांमधील स्त्री विषयक भानगड, व त्यामुळें देवरायानें आपण होऊन जन्मास आणिलेली भवितव्यता,—जिनें स्वतः जन्मास

आल्यानंतर या आपल्या जन्मदात्या रामरायाला नामशेष केलें ती भवितव्यता,—या गोष्टींच्या काळास आतांच कोठे नुकतीच सुरवात झाली होती; देवरायास तेजोहीन, व पौरुषहीन करून मोडणाऱ्या राजकीय रंगभूमीवरील भवितव्यतेचा पडदा आतांच कोठें नुकताच उघडत जाण्यास सुरवात झाली होती; बलिष्टांच्या प्रतिस्पर्धेतील कमताकद ठरणाऱ्या राज्यकर्त्यांच्या मानसिक अधोगतीच्या परमावधीचें प्रत्यंतर आणणारी राजकीय ढगांतील अनीतिमूलक विद्युल्लता—जी पुढें मोठ्या जोरानें कडाडून रामरायाच्या डोक्यावर येऊन आदळली ती विद्युल्लता—आतांच कोठें नुकताच चमकण्यास सुरवात झाली होती; आणि, अनीतिच्या पापांचा पूर्ण घडा भरून, खवळलेल्या भरसमुद्रांतील फुटून तुकडे होऊं पाहणाऱ्या निराश्रित जहाजाप्रमाणें, रामरायाचें नशिबाचें तारू दुर्वर्तनाच्या प्रखर खडकावर अपटून त्याचे तुकडे होण्याच्या काळास आतांच कोठें नुकताच प्रारंभ झाला होता ! विजयानगरचें राज्य संपत्तिमान व बलाढ्य होतें; परंतु त्यास लवमात्रही नैतिक पाठबळ नव्हतें; त्यामुळें, वरून तें कितीही भव्य व बळकट असें दिसत असलें तरी, त्याचा पाया मूळांतच अनीति मुळें डळमळीत झाला होता; त्यांतील पुढील बहुतेक सर्व राज्यकर्ते अनीतिमान, विषयी, व स्त्री लंपट, असून त्यांना न्यायनीतिची, अथवा जनलज्जेची ही चाड राहिली नव्हती. नैतिक अधःपातास कारणीभूत होणारे दुर्गुण, व पापी वासनांची जोपासना, यामुळें या राज्यास आंतून कीड लागलेली असून, हा पोकळ डोलारा केव्हां धडाडून खालीं येईल याचा नेम नव्हता. "राज्यकर्ता," या नात्यानें आपणावर केवढी जबाबदारी आहे,—आपले आचार, विचार, व कृती, ह्यावर आपल्या प्रजेचें किती सुखदुःख अवलंबून आहे, आणि आपल्या करणीचा परिणाम आपणास, आपल्या प्रजेस, व एकंदर राज्यास, अखेरीस केवढा घातक होणार आहे, याची फारशी जाणीव ही या घराण्यातील राज्यकर्त्यांपैकीं बहुतेकास नव्हती. संपत्ती, हेंच सुखाचें साधन, ही भावना, संपत्ती, हाच कोणतेंही दुःख, संकट, व आपत्ति, यांचें निरसन करणारा तरतुदीचा तोडगा, ही समजूत, न्यायान्यायाची, अथवा नीति-अनितिची कोणत्याही प्रकारें चाड न बाळगितां, संपत्तिच्या जोरावर साध्य करणें व पचनीं पाडणें शक्य असलेले प्रत्येक प्रकारचे विषयोपभोग, व विलास—ऐषाराम यातच नेहमीं दंग राहणें, हेंच आपल्या जन्माचें इति कर्तव्य, अशी भ्रष्ट व आकुंचित बुद्धी, यामुळें, या राज घराण्यातील पुरुषार्थाचें तेज गंजून नष्ट

प्राय झालें होतें; अनीतिच्या आचरणाच्या संवईनें निरढावून गेल्यामुळें त्याचा स्वाभिमान लोपून गेला होता; आणि ही स्त्री विषयक आसक्ती पुढें पुढें तर इतक्या परमावधीच्या मर्यादेपर्यंत जाऊन पोहोंचली होती कीं, कोठेंही विशेष सौंदर्य संपन्न व तरुण मुलगी आढळल्यास तिला तिच्या आई बापाच्या अथवा पालकाच्या, संमतीनें राज्यकर्त्याकडे पाठवावी, असे स्थानिक अधिकाऱ्यांना त्यांच्याकडून हुकूम मिळत होते. अशा अनीतिपूर्ण कृत्यांचा परिणाम हा केव्हांही निःसंशय अत्यंत अनिष्ट असाच घडून आला पाहिजे, हें उघडच आहे; आणि अशा आचरणामुळें प्रजेचें मन राज्यकर्त्याविषयीं, कलुषित होणें, व अत्यंत उद्वेगानें, " असलें हिंदू राज्य नष्ट झालें तरीं पतकरलें, " असें प्रजाजनांना वाटणें, स्वाभाविक आहे. शिवाय अशा स्त्री विषयक बाबतीमुळेंच राज्यांत अनेक प्रकारच्या भानगडी उत्पन्न होऊन युद्ध प्रसंगही ओढवले होते; ही गोष्ट लक्षांत आणून, कोणत्याही साधारण अकलेच्या राज्यकर्त्यासही आपण अशा कृत्यापासून कायमचें परावृत्त व्हावें, असा धडा घेतां येण्याजोगा होता; परंतु देवराया सारख्यानेंही या पैकीं कोणतीही गोष्ट विचारांत घेतां, आपला अनीतिचा क्रम तसाच पुढें चालू ठेविला; इतकेंच नव्हें तर परराज्यांतील मुलीवरही पापवासना धरून, तिला जबरदस्तीनें आपल्या जनानखान्यांत ओढण्याची त्यानें खटपट केली; परंतु तींत शेंवटीं त्याचीच फजगत होऊन त्याच्यावर अत्यंत अनिष्ट व अकल्पनातित असा घोर प्रसंग ओढवला !

विजयानगरच्या सरहद्दीवर मुद्गल या नांवाचा एक गांव व किल्ला आहे. हें ठिकाण महंमदशहाच्या कारकीर्दींत पहिला बुक्क यानें हस्तगत करून घेऊन, कांहीं काळपर्यंत आपल्या ताब्यांत ठेविलें होतें; परंतु पुढें बहामनी राज्यकर्त्यांनीं तें पुन्हां आपल्या ताब्यांत मिळवून घेतलें होतें; म्हणजे आतां हें ठिकाण विजयानगरच्या राज्याच्या अमलाखालीं नसून बहामनी राज्याच्या अमलाखालीं होतें; या गांवीं, निहाल या नांवाची एक अत्यंत लावण्यवति अशी सोनाराची मुलगी असल्याचें देवरायास कळलें; त्यावेळीं त्यानें त्या मुलीच्या बापाकडे तिच्याविषयीं मागणी केली; परंतु त्या मुलीची इच्छा नसल्यामुळें तिच्या बापानें देवरायाची मागणी अमान्य केली. तेव्हां देवरायानें कोणत्याही प्रकारें विचार न करितां त्या मुलीस पकडण्याकरितां तिकडें आपलें सैन्य रवाना केलें; परंतु ती तेथून पळून गेल्यामुळें त्याच्या हातीं सांपडली नाहीं. उलट

आपल्या राज्यांतील देवरायाच्या या आगळिकीमुळें फिरोजशहास राग येऊन तो मात्र चिडीस गेला. वास्तवीक पाहतां स्त्री विषयक निंद्य अनिति हीच मुळीं घातक, आणि त्यातही पुन्हां परराज्यांत व आपला हाड वैरी, व ज्याच्या पुढे आपणास अनेक वेळां नम्र व्हावें लागले, त्या फिरोज शहाच्या राज्यांत—असा प्रकार करणें तर अत्यंतच अत्यंत घातक; परंतु कामातुर मनुष्याला ज्या प्रमाणें भय अथवा लज्जा नसते, त्या प्रमाणेंच सारासार विचार बुद्धी, व आपल्या कृतीचे भावी परिणाम यांची ही ओळख व अटकळही नसते; अणि खरोखर तशीच या नीतीभ्रष्ट, विवेक शून्य, व विकारवश झालेल्या देवरायाची ह्या वेळीं स्थिती झाली. देवरायाचा हा खरखरमुंडा दिवसा ढवळ्या आपल्या राज्यांत चाल- लेल नंगा नाच उघड्या डोळ्यांनीं पाहून स्वस्थ बसण्या इतका थंड्या मिजासाचा, आळणी स्वभावाचा, अथवा कर्तृत्वहीन आचरणाचा फिरोजशहा हा खास नव्हताच नव्हता; बहामनी राज्याचें, विजयानगरचें राज्य स्थापन झाल्या पासून, त्या राज्याशीं सतत सारखें वैर चालत आलेलें होतें; आणि आपल्या या विजया- नगरच्या कट्टया दुष्मानाचा कोणताही डाव—आणि तोही आपल्या राज्यांत—या बहामनी राज घराण्यांतील कोणताही राज्यकर्ता केव्हांही साधूं देणार नाहीं, इत- केंच नव्हें, तर अशा प्रकारच्या प्रत्येक अगळिकी बद्दल पूर्णपणें सूड घेतल्या शिवाय ही राहणार नाहीं, हें निःसंशय ठरून चुकल्या सारखेंच होतें; भ्रष्टवासना, पापी शरीर, अनीतिच्या संवई मुळें भ्रष्ट झालेलें मन, भग्न झालेली सारासार विवेक बुद्धी, व विचारशक्ती, अविवेकी व अन्यायी कृती, यांचा मूर्तिमंत पुतळा असलेला हा देवराय—विजयानगरच्या डळमळीत राजमुगुटाचा हा धनी पुढें अत्यंत अधोगतीस गेला! नेहमीं नेहमीं भ्रष्ट विचार, व पापी कृति यांतच त्याचें मग रममाण होत गेल्या मुळें त्याचें काळीज कच्चें होऊन भित्रें व लोभी बनलें; मन तकलादी झालें; रणक्षेत्रांत कटून मरण्यापेक्षा अपमानानें विलासांत मग्न राहण्याची त्यास गोडी लागली; विलासात मग्न राहण्याकरितां जगावें, अशी त्याची स्वाभिमानशून्य प्रवृत्ति बनली; व संवईच्या कोडगेपणामुळें मान हानीचें दुःख विसरून उलट कधीं काळीं तें बाहेर येईल, म्हणून त्याच्या भोंवतीं विषयो- पभोगाचे जाड जाड थर तो देत राहिला—आणि आपली मुलगी मुसलमानांच्या गोषांत गेली तरी चालेल, पण आपण जगावें, आणि तेंही विलासांत मग्न राहण्या- करितां जगावें, इतका हीन, दीन व दुर्बळ प्रवृत्तीचा तो अखेरीस बनून गेला!!

अशा रीतीनें, वर लिहिल्या प्रमाणें, देवरायानें आपल्या राज्यांतील मुद्गल या गांवावर हल्ला करून आगळीक केल्यामुळें फिरोजशहास अतिशय राग आला, आणि देवरायास या कृत्याबद्दल योग्य शासन करण्याकरितां तो विजयानगरावर चाल करून आला; परंतु रामरायांत आपण स्वतः एकटेच त्याचा पराभव करूं, अशी हिंमत नव्हती; शक्ती नव्हती; व साधनेंही नव्हतीं. आजपर्यंतच्या शाहाबरोबरील प्रत्येक युद्धांत लागोपाठ अपजय आला असून शहा सांगेल त्या अटींवर अपमानास्पद रीतीनें त्यास तह करावा लागला होता; आणि आतांही तसाच प्रसंग ओढवणार, अशी त्यास खात्री असल्यानें, त्यानें गुजराथ, माळवा, व खानदेश, येथील मुसलमान राज्यकर्त्यांनां आपल्या मदतीस येण्याविषयी पाचारण केलें होतें; आणि त्यांतल्या त्यांत गुजराथ व माळवा प्रांताचे राज्यकर्ते, आपणास मदत करितील, अशी त्यास विशेष आशा होती. कारण तैमूरलंग यानें दिल्लीवर स्वारी केली त्यावेळीं फिरोजशहा यानें आपला वकील दिल्ली येथें त्याच्याकडें पाठवून त्याचें सार्वभौमत्व मान्य केलें होतें; व उलट तैमूरलंगानेही प्रसन्न होऊन फिरोजशहाकडे त्याच्या वकीला बरोबर परत नजराणे पाठवून त्याचा सन्मान केला होता; त्यामुळें फिरोजशहा विषयीं गुजराथ व माळवा प्रांताच्या राज्यकर्त्यांच्या मनांत वैषम्य उत्पन्न होऊन त्यांनीं फिरोजशहा विरुद्ध देवरायाशीं सख्य करून एक कारस्थान उभारिलें होतें, व त्यानंतर ही मुद्गलची भानगड उत्पन्न झाली होती. तेव्हां अशा स्थितींत फिरोजशहा विरुद्ध आपले दोस्त बनलेले हे दोन्हीं राज्यकर्ते आपणास मदत करतील, अशी त्यास खात्री वाटत होती. व म्हणूनच त्यानें त्या उभयतांनां आपल्या मदतीस येण्याविषयीं विनंती केली होती; परंतु या पैकीं कोणीही त्याच्या मदतीस आला नाहीं; व एकट्या देवरायासच फिरोजशहाच्या भारी सैन्याबरोबर युद्ध करणें भाग पडलें; या युद्धांत कांहीं काळपर्यंत त्यानें टिकाव धरिला, परंतु अखेरीस फिरोजशहानें त्याचा इतका पिच्छा पुरविला कीं विजयानगरच्या राज्यालाच मुकण्याचा त्याच्यावर प्रसंग येऊन गुदरला; आणि आतां फिरोजशहा बरोबर तो सांगेल त्या कोणत्याही अपमानास्पद अटींवर तह करण्यास कबूल होण्याशिवाय आपणास जीव जगविण्यास दुसरें कोणतेंही गत्यंतर राहिलें नाहीं, अशी त्याची खात्री झाली; तेव्हां त्यानें आपली मुलगी शहास देऊन त्याच्याशीं तह केला! देवरायाच्या ह्या मुलीचें फिरोजशाहा बरोबर मोठ्या थाटानें विजयानगर येथेंच लग्न झालें!! ज्या

परक्याच्या निहाल या मुलीच्या अभिलाषानें त्यास स्वतःची मुलगी ही मुसलमानांच्या घरांत घालावी लागली, त्या मुलीचें ही लग्न फिरोजशाहाचा मुलगा हसनखान यांजबरोबर झालें; आणि आपल्या मुली शिवाय बंकापूरचा किल्ला व पुष्कळशी संपत्ती शहास देऊन या मानहानीच्या मरण प्राय सौद्यावर देवरायास फिरोजशहा जवळून आपला जीव विकत घ्यावा लागला ! ( १४०७ )

त्यानंतर पांचच वर्षांनीं इ. सन १४१२ मध्यें–देवराय हा मृत्यू पावला, व त्याचा मुलगा वीर विजय हा गादीवर आला. त्याची सात वर्षांची कारकीर्द बरीच शांततेची असून त्या अवधींत बहामनी राज्याबरोबरील युद्ध कलह तात्पुरते बंद पडले होते. वीर विजय हा इ. सन १४१९ मध्यें मृत्यू पावला, व त्याचा वडील मुलगा देवराव दुसरा हा गादीवर आला; देवराय गादीवर आल्यावर तीनच वर्षांनंतर, म्हणजे इ. सन १४२२ मध्यें, फिरोजशहा मृत्यू पावला; आणि आपल्या मृत्यू पूर्वीं दहा दिवस त्यानें आपण स्वतः गादीवर बसविलेला त्याचा धाकटा मुलगा खानखानान हा अहंमदशहा हें नांव धारण करून राज्य करू लागला. याच्या कारकीर्दींत दुसऱ्या देवरायानें केरळ प्रांताच्या राज्यकर्त्यांची मदत घेऊन त्याच्याबरोबर युद्ध आरंभिलें; परंतु तें चालू असतां मुसलमानांनीं केलेल्या एका हल्ल्यांत देवराय हा स्वतःच अहंमदशहाच्या हातीं सांपडला होता; परंतु तो कसबसा त्याच्या तावडींतून निसटून पळाला. तथापि याच वेळीं या युद्धाचा परिणाम कळून आला. अहंमदशहानें विजयानगरच्या राज्यांत शिरून त्या राज्याची अतीशय धूळधाण उडविली, आणि त्याचा प्रतिकार करण्याचे देवरायानें केलेले प्रत्येक प्रयत्न त्यानें पूर्णपणें हाणून पाडिलें; त्या मुळें देवरायाचा नाइलाज होऊन त्यानें अहंमदशहाशीं तह केला, व पूर्वीं प्रमाणें त्यास मुबलक खंडणी देऊन त्यानें वाटेस लाविलें; त्या नंतर देवराय हा पुढें शहास नियमितपणें खंडणी पाठवीत राहिला, त्या मुळें उभयतां मध्यें अहंमदशहा जिवंत होता तों पर्यंत सख्य राहिलें होतें.

दुसरा देवराय हा बराच शूर, कर्तृत्ववान व मानी असून त्याच्या कारकीर्दींत विजयनगरच्या राज्याची अतीशय भरभराट झाली. त्यानें आपला प्रधान नागण्णा उर्फ धननायक याच्या मदतीनें पुष्कळच चांगल्या रीतीनें राज्यकारभार चालविला. त्यास मानापमानाची विशेष चाड होती, आणि

बहामनी राज्याचा पाडाव करण्याकरितां त्यानें नेहमीं प्रयत्न चालू ठेविले होते; इतकेंच नाहीं तर, पूर्वी प्रमाणें, बहामनी राज्यास खंडणी पाठविण्याचें ही त्यानें बंद केलें होतें. मध्यंतरीं इ० सन १४३५ मध्यें अहंमदशहा मृत्यू पावला, व त्याचा मुलगा अल्लाउद्दीन हा गादीवर आला. तेव्हां त्यानें देवरायावर खंडणी मिळविण्या करितां स्वारी केली, व ती त्याच्याकडून वसूल करून तो परत गेला. देवरायानें अल्लाउद्दीनशहास यावेळीं मुबलक खंडणी दिली खरी, परंतु अशा रीतीनें शहाचे ताबेदार होऊन राहणें देवरायास पसंत नव्हतें; म्हणून त्यानें बहामनी राज्याचा पाडाव करण्या करितां सैन्य भरती करण्यास सुरवात केली; मुसलमान लोकांसही तो आपल्या नौकरींत दाखल करूं लागला, व थोडक्याच काळांत त्यानें बरेंच मोठें मुसलमानी सैन्य आपल्या नौकरींत दाखल करून घेतलें. त्यांनां संतुष्ट ठेवण्या करितां त्यानें विजया नगर येथें भर वस्तींत एक मशीद बांधिली, व हिंदू राजास मुजरा करणे अशास्त्र वाटून त्यामुळें या मुसलमानी सैन्याचें मनें दुखावलीं जाऊं नये म्हणून आपल्या सिंहासना समोर एका उंच आसनावर तो कुराणाचें पुस्तक ठेवूं लागला; त्यामुळें देवरायाचा ही मान राहून मुसलमानी सैन्य कुराणासच मुजरा करीत असते, असा प्रकार बाह्यात्कारीं दिसून येऊं लागला. अशा रीतीनें आपल्या सैन्याची योग्य सिद्धता केल्यावर तो या सैन्यासह मोठ्या झपाट्यानें निघून त्यानें तुंगभद्रानदी ओलांडिली, व बहामनी राज्याच्या सरहद्दीवरील मुद्गलच्या किल्ल्यास वेढा देऊन आसपासचा प्रदेश उध्वस्त करण्यास प्रारंभ केला. अल्लाउद्दीनशहास ही बातमी कळल्यावर तोही आपल्या सैन्यासह मोठ्या झपाट्यानें मुद्गल येथ त्याच्यावर चाल करून आला, व उभयतांमध्यें तीन निकराच्या लढाया होऊन त्या सर्वांत ही शहाच विजयी झाल्यामुळें देवरायास, त्याला पुष्कळ खंडणी द्यावी लागून पूर्णपणें माघार घ्यावी लागली. (इ. सन १४४३) त्यानंतर पुढील वर्षी दुसरा देवराय मृत्यू पावला, व तिसरा देवराय हा गादीवर आला. या पहिल्या वंशानें इ. सन १४९० पर्यंत राज्य केलें. परंतु दुसऱ्या देवराया नंतरची फारशी माहिती उपलब्ध नाहीं.

तिसरा देवराय गादीवर आल्यानंतर त्यानें फक्त पांच वर्षें-इ. सन १४४४ ते इ. सन १४४९ पर्यंत-राज्य केलें. त्या नंतर त्याचे मुलगे मल्लिकार्जुन

व विरूपाक्ष व नंतर मल्लिकार्जुनाचे मुलगे राजशेखर व विरूपाक्ष दुसरा हे अनुक्रमे, गादीवर आले. मध्यंतरीं महंमदशहा दुसरा याच्या कारकीर्दींत (इ. स. १४६३ ते इ. स. १४८२ पर्यंत ) विजयानगरच्या ताब्यांतील गोंवें हें महत्वाचें बंदर त्याचा प्रसिद्ध वजीर व सेनापति महंमद गवान यानें इ.सन१४७१ मध्यें हस्तगत करून घेतलें. तथापि तें ठिकाण कोंकण पट्टींतील एक महत्वाचें नाकें म्हणून असल्यानें तें परत मिळविण्याचा, विजयानगरकरांचा स्नेही, बेळगांवचा राजा वीर कर्णराय यानें प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यास अपयश येऊन राज्यभ्रष्ट होण्या पर्यंत त्याजवर प्रसंग ओढवला, व तें शहर अखेरीस बहामनी राज्याकडेसच राहिलें इ. सन १४४४ नंतर विजयानगरच्या राज्यास उतरती कळा लागली, व कोंकण पट्टींतील चोल व दाभोळ हेही प्रांत बहामनी राज्यानें आपल्या हस्तगत करून घेतले. दुसरा विरूपाक्षराय हा दुर्बल व दुर्वर्तनी असून याच्या कारकीर्दींत दरबारांत तंटेबखेडे उत्पन्न झाले, आणि त्यांत विरूपाक्षराय व त्याचा मुलगा हे उभयतांही मारले जाऊन नरसिंहराय सालव-हा सालव अथवा शाल्ववंशी असल्यामुळे त्यास सालव हें जोडनांव मिळालें-या नांवाच्या दुसऱ्या एका कुटुंबांतील सरदारानें, इतर दरबारी मंडळींच्या मदतीनें, हें राज्यपद बळकाविलें; (इ. सन१४९०) हा नरसिंहराय मोठा कर्तृत्वान व पराक्रमी असून तो गादीवर देण्यापूर्वी विजयानगरच्या राज्याचा महामंडलेश्वर अथवा मुख्य सेनापति होता, व त्यास "महाराय" असा किताब होता; त्या वेळेपासूनच वास्तवीक रित्या तो या राज्याचा मुखत्यारीनें कारभार पहात होता,व विजयानगर येथील दुर्बल राज्य कर्त्यांस त्यानें आपल्या हातांतील निव्वळ बाहुलें करून ठेविलें होतें; इ. सन १५२६ मध्यें बहामनी राज्याचा शेवटचा शहा अल्लीमउल्ला हा अहंमदनगर येथील बुऱ्हाण निजामशहाकडे येऊन राहिल्यावर बहामनी राज्य नष्ट झालें; तरी वास्तवीक रित्या विजयनगरच्या राजघराण्याचा पहिला वंश नष्ट झाला, त्याच सुमारास—इ. सन १४९० च्या सुमारास-बहामनी राज्याचे तुकडे पडण्यास व अपसांत युद्ध कलह सुरू होण्यास प्रारंभ झाला, आणि बहामनी राज्या एवजीं विजापूरचें आदिलशाही राज्य विजयानगरच्या राज्यास, दुसरा जबरदस्त शत्रू म्हणून उत्पन्न झालें.

नरसिंहराय हा गादीवर आल्यावर त्यानें विजयानगरच्या राज्यावर मुसल-

मानांच्या एकसारख्या होणाऱ्या स्वाऱ्यांनां बराच आळा घातिला, आणि बेदरकर कासीम बेरीद यांस विजापूरकर यूसुफ् आदिलशाहाच्या विरुद्ध मदत करून कृष्णा व तुंगभद्र या नद्यांच्या दुआबांत असलेलीं रायचूर व मुद्गल हीं शहरें आपल्या हस्तगत करून घेतलीं. (इ. सन १४९३ ) नरसिंहरायाच्या मागून वीर नरसिंहराय व त्या नंतर कृष्णदेवराय हा गादीवर आला; (इ. सन १५०९) हा मोठा कर्तृत्ववान, उदार, व शूर, असून त्यानें आपल्या कारकीर्दींत सर्व दक्षिण हिंदुस्थान आपल्या अमलाखालीं आणिलें होतें, आणि साधारणत: दक्षिणेस तुंगभद्रा नदीपासून तो कन्याकुमारी पर्यंत, आणि पूर्व पश्चिम समुद्रा पासून कारोमांडल किनाऱ्या पर्यंतच्या प्रदेशांवर तो राज्य करीत होता, व याच राज्यांमध्यें तैलगण, पांडय, व चोल, वगैरे उपराज्यांचा समावेश होत असून ते राजे त्यास करभार देत होते; त्याच्या पदरीं रंग राय तिम्मा उर्फ तिम्मराज या नांवाचा एक हुषार प्रधान व सेनानायक असून त्यानें विजापूरकराबरोबर युद्ध प्रसंग करण्यांत कृष्ण देवास नेहमीं अमोलिक मदत केली होती; व स्वत:ही अदिलशहाशी पुष्कळ लढाया मारून विजयानगरच्या राज्याचा विस्तार व त्याची भरभराट करण्यांत त्यानें कृष्ण देवराय प्रमाणेंच प्रमुखत्वानें भाग घेतला होता; शिवाय त्याचें व कृष्ण देवरायाचें अगदीं जवळचें नातेंही होतें. या तिम्मरायास रामराय, तिरूमल्ल व व्यंकटाद्रि असे तीन मुलगे होते. त्यापैकीं वडील रामराय यांस कृष्णदेवाची वडील मुलगी तिरूमलम्मा ही दिली होती; व दुसरा मुलगा तिरूमल्ल यांस त्याची दुसरी मुलगी दिली होती; त्यामुळें या राज्याच्या उत्कर्षाकरिता तिम्म राजानें विशेष परिश्रम घेतले होते. कृष्णदेवराय हा मोटा धार्मिक व प्रजावत्सल राजा असून त्यानें हंपी येथें इ. सन १५१३ मध्यें कृष्णस्वामीचें मंदीर बांधिलें, व त्या मंदिराजवळ पुढें इ. सन १५२८ मध्यें श्री नृसिंहाचा एक प्रचंड दगडी पुतळा उभारिला. हा पुतळा एकाच सबंद दगडाचा कोरिलेला असून तो अजमासें २५ फूट उंच व १७ फूट रुंद आहे. हा पुतळा हल्लींही अस्तित्वांत आहे, परंतु त्याचे हात वगैरे कांहीं अवयवांचा पुढें तालीकोटच्या युद्धानंतर भंग झालेला आहे. याची राणी नागलादेवी हिच्या स्मरणार्थ त्यानें विजयानगर शहरांतच नागापूर या नांवाचा एक नवीन भाग वसविला. विजयानगर येथें एक विस्तृत तलाव बांधिला, आणि ठिकठिकाणीं मोठाले कालवे बांधून त्यानें आपल्या राज्यांतील शेतीस उर्जितावस्था आणिली.

त्याप्रमाणेंच हंपी येथील देवालयासमोर त्यानें दोन भव्य मनोरे उभारिले, ते हल्लींही अस्तित्वांत आहेत. शिवाय तो विद्वानांचाही मोठा भोक्ता असून प्रसिद्ध विद्वान अप्पय्या दिक्षीत हा त्याच्या पदरीं होता. बहामनी राज्य नष्ट झाल्यावर कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दुआबांत असलेले रायचूर व मुद्गल हे परगणे विजापुरकराकडे आले; आणि विजापुर व विजयानगर या उभयतां राज्यांचें शत्रुत्व असल्यामुळें व या प्रदेशाबद्दल या वेळेपर्यंत हिंदु व मुसलमान राज्यकर्त्यांमध्यें नेहमीं वाद उपस्थित होत असल्यामुळें, त्यानें इ. सन १५२० च्या मे महिन्यांत तुंगभद्रा नदी उतरून रायचूरवर स्वारी केली; अदिलशहाशीं मोठ्या निकरानें युद्ध करून त्याचा पूर्ण पराजय केला; व हा प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला; परंतु त्या नंतरचें त्याचें वर्तन अयोग्य घडलें. या विजयामुळें त्यास अहंकार उत्पन्न झाला. स्वतःच्या कर्तृत्वास फाजील महत्व देऊन त्यानें मुसलमानांची मनें दुखावतील असें वर्तन केलें; अदिलशहाचा अतीशय अपमान केला; स्वतःच्या सामर्थ्याबद्दल खोटा अभिमान त्यास उत्पन्न होऊन तो मुसलमानांनां तुच्छ लेखून, वर आणखी, निर्धास्त राहूं लागला; परंतु कृष्ण देवाच्या उद्दाम वर्तनामुळें सर्व मुसलमानी सत्ताधारी त्याचा व विजयानगरच्या राज्याचा पाडाव करण्याकरितां आपसांत एकी करण्याचा प्रयत्न करू लागले; आणि उन्माद व गर्व यांच्या अतिरेकानें अंध झालेल्या कृष्णदेवास भावी भयंकर अरिष्टाचें भान न राहून अखेरीस विजयानगरचें राज्य नष्ट होण्याचा खडतर प्रसंग ओढवला !

विजयानगरच्या घराण्यांतील हा यशस्वी राजा कृष्णदेव इ० सन १५३० मध्यें मृत्यू पावला, आणि त्याचा भाऊ अच्युतराय हा गादीवर आला. याच्या कारकीर्दीपासून या राज्यास पुन्हा उतरती कळा लागली; कारण तो नालायक व भित्रा असून स्वभावानेंही अतीशय दुष्ट होता; त्यामुळें त्याच्या राज्यांतच त्यास अनेक शत्रू उत्पन्न झाले. तो राज्यावर आल्यावर लवकरच अदिलशहानें,-कृष्ण देवानें इ० सन १५२० मध्यें मोठ्या कष्टानें मिळविलेले-रायचूर व मुद्गल हे महत्वाचे परगणे त्याच्या ताब्यांतून हिसकावून घेतले, आणि त्याबद्दल त्याचा प्रतिकार करणें तर बाजूसच राहिलें, परंतु स्वतःच्या दुष्ट आचरणामुळें उत्पन्न झालेल्या राज्यांतील शत्रूंचा नाश करण्या करितां त्यास उलट त्याच आदिलशहाची मदत घ्यावी लागली. असा हा दुर्बल राज्यकर्ता गादीवर आल्यामुळें

कृष्णदेवरायाचा शूर व कर्तृत्ववान प्रधान आणि सेनापति तिम्मराज हा सर्व सत्ताधीश बनला, व अच्युतराय हा निव्वळ नांवाचा राजा म्हणूनच कायतो गादीवर राहिला. तथापि अच्युतराय गादीवर आल्या नंतर लवकरच तिम्मराज हा मृत्यू पावला, व त्याचा वडील मुलगा रामराय हा आपले दोन बंधू तिरू-मल्ल व व्यंकटाद्रि यांच्या मदतीनें राज्यकारभार पाहूं लागला; त्यावेळीं अच्युत रायानें रामराया विरुद्ध इब्राहीम अदिलशहा याची मदत मागितली; त्याप्रमाणें शहा विजयानगर येथें गेला; परंतु रामरायानें त्यास पुष्कळ संपत्ति देऊन संतुष्ट करून हें संकट टाळिलें. ( इ० सन १५३६ ) तथापि विजयानगरचें राज्य बुड-विण्याविषयीं विजापूरकराची प्रबळ इच्छा अजूनही कायम होती; कृष्ण देवानें अदिलशहाचा केलेला भयंकर अपमान तो विसरला नव्हता, आणि तो व त्याचा वजीर आसदखान हे उभयतां विजयानगरचें राज्य बुडविण्याची मोठ्या जारीनें खटपट करीत होते; अशाच स्थितींत इ० सन १५४२ मध्यें अच्युतराय मृत्यू पावला, तेव्हां त्याचा पुतण्या सदाशिवराय यांस रामरायानें, आपल्या उभयतां बंधूंच्या अनुमतीनें गादीवर स्थापन करून, स्वतः राज्यकारभार चालविण्यास सुरवात केली.

तथापि या वेळीं रामराय हाच वास्तविक रित्या विजयानगरच्या राज्याचा कुल मुखत्यार असून सदाशिवराय हा जवळ जवळ बंदिवाना च्याच स्थितींत ठेवण्यांत आला होता. औपचारिक रित्या राज्यकारभार सदाशिवरायाच्या नांवानें चालविला जात असे; आणि दर वर्षांतून एक दिवस रामराय हा आपल्या उभयतां बंधूसह त्याच्याकडे जाऊन त्यास सन्मान दर्शक मुजरा करीत असे. रामराय हा शूर व कर्तृत्ववान असून तो राज्यकारभार पाहूं लागल्या वेळेपासून त्यानें या राज्याची पुष्कळच भरभराट केली; आसपासच्या प्रदेशावर स्वाऱ्या करून आपल्या राज्याचा विस्तार केला, आणि बहामनी राज्या पासून उत्पन्न झालेल्या राज्यांत आपसांत चालू असलेल्या वैमनस्या मुळें त्यास आपला फायदा करून घेण्याची योग्य संधी ही मिळाली; शिवाय त्यानें आपलें सैन्य वाढवून राज्यास बळकटीही आणिली; व खुद्द अदिलशहासही दोन वेळां त्याची मदत घ्यावी लागली; त्याचें कारण असें घडून आलें कीं, कल्याणी व सोलापूर हे दोन किल्ले विजापूरकर अदिलशहाच्या अमला

खालील असूल ते अहंमदनगरकर हुसेन निजामशहा यानें आगळीक करून आपल्या ताब्यांत घेतले. त्यावेळीं अदिलशहानें विजयानगरच्या रामरायाची मदत घेऊन निजामशाही प्रदेशावर स्वारी केली, ( इ० सन १५५८ ) आणि त्याचा सर्व प्रदेश उध्वस्त करून टाकिला. तेव्हां निजाम शहानें हे दोन्हीं किल्ले त्यास परत देऊन त्याच्याशीं तह केला. परंतु या स्वारींत रामरायाच्या सैन्यानें अतीशय अनीतिचें व क्रूरपणाचें आचरण केलें; अनेक घरें जाळिलीं; व मोठ मोठ्या इमारती आणि मशीदीही फोडून त्यांचा विध्वंस उडविला. त्या प्रमाणेंच पुढील वर्षींही त्यानें पुन्हां अदिलशहा-यांस निजामशहा विरुद्ध मदत केली, व गोवळकोंडेकर, विजापूरकर व विजया नगरकर हे तीघेही थेट अहंमदनगरवर चाल करून जाऊन त्यांनीं निजामशहा यांस तह करणें भाग पाडिलें. पण यावेळीं तर रामरायाच्या सैन्यानें पहिल्याहून ही अधिक अनर्थ व अनन्वित प्रकार केले; त्यामुळें मदतीच्या मेहेरबानी बद्दल मिळणारा फायदा नाहींसा होऊन उलट मुसलमानांना चीड उत्पन्न झाली, व पुढें तालीकोटचा भयंकर प्रसंग उद्भवला. शिवाय तो गर्विष्ट असून त्यानें यावेळीं मुसलमान लोकांस अतीशय वाईट रीतीनें वागविलें; आपल्या दरबारीं असलेल्या मुसलमान राजेरजवाड्यांच्या वकिलांनांही तो अतीशय उपमर्दकारक रीतीनें वागवूं लागला, आणि मुसलमान सत्ताधाऱ्यांनां तुच्छ समजून विजयानगरच्या सरहद्दीवर असलेल्या अदिलशाही व कुत्बूशाही राज्यास तो अतीशय उपद्रव देऊं लागला. आधींच कृष्णदेव यानें अदिल शहाचा अपमान केल्यामुळें तो मनांत त्याच्याविषयीं अतीशय जळत होता; त्याच्या मदतीस रामराय आल्यावेळीं त्याचें उद्दाम, गर्विष्ट, व अपमान-कारक वर्तन एकंदर मुसलमान सैन्यास दुःसह होऊन त्यामुळें त्यांची कृष्णदेव-रायाविरुद्ध अपमानाचा सूड घेण्याची ईच्छा प्रदिप्त झाली होती; मुसलमान राज्यकर्त्यांच्या वकिलांनीं आपल्या भयंकर अपमानाबद्दल रामराया विरुद्ध आप-आपल्या दरबारीं सारख्या तक्रारी नेल्यामुळें या सुडाच्या इच्छेंत जीवनशक्ति उत्पन्न झाली होती, आणि विजापूर व गोवळकोंडें, या उभयतांही राज्याविरुद्ध त्यानें सारखें अतिक्रमण केल्यामुळें, उत्पन्न झालेल्या जीवनशक्तित, नंतर जुटीच्या बळाचा जन्म होऊन—विजापूरकर अदिलशहा, गोवळकोंडेकर कुत्ब-

शहा, अहंमदनगरकर हुसेन निजामशहा, व बेदरकर अली बेरीदशहा, हे चार मुसलमान राज्यकर्ते एक होऊन-त्यांनीं रामरायास व त्याबरोबरच विजयानगरच्या राज्यास अखेरीस नामशेष करून टाकण्याचा निश्चय करण्यापर्यंत प्रसंग येऊन धडकला होता.

रामराया हा ज्या प्रमाणें विजापूरकर अदिलशहाच्या उपयोगीं पडला होता, त्या प्रमाणेंच गोवळकोंडेकर इब्राहीम कुत्बशहा याच्याही तो अतीशय उपयोगी पडला असून रामरायाच्या आधारावरच कित्येक काळपर्यंत तो गादीवर टिकून होता. त्यामुळें कुत्बशहावरही त्याचे उपकार झालेले होते. त्याप्रमाणेंच नगरकर बुऱ्हाण निजामशहा यांसही त्यानें विजापूरकरा विरुद्ध अनेक वेळां मदत केली होती, व बेदरकर अली बेरीदशहा याच्यावरही त्यानें अप्रत्यक्ष रित्या इतके उपकार केले होते कीं, त्याच्या मध्यस्ती मुळेंच तें राज्य एक वेळां नामशेष होण्या पासून बचावलें होतें. इब्राहीम कुत्बशहा यास रामरायाचा विशेष आधार होता, त्यावेळीं त्यानें निजामशहाशीं सख्य करून बेदरचें राज्य—म्हणजे बेदरशाही—बुडविण्याचा घाट घातला होता; परंतु ही हकीकत रामरायास कळल्यावर त्यानें इब्राहीम कुत्बशहा यांस एक पत्र पाठवून त्यास असें कळविलें कीं, "विजापूर, व नगर, येथील राज्यकर्ते आपसांत एक-मेकांशीं लढत असून ते उभयतांसही परस्परांना इतके तुल्य बल असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, अशा रीतीनें युद्ध चालू असतां त्या पासून आज-पर्यंत एकाचाही फायदा झालेला नाहीं. तथापि मी आतां असें ऐकतों कीं तुमचे वडील तटस्थ रहात असतां, तुम्ही मात्र विजापूरकराविरुद्ध निजामशहास मदत करण्यास तयार आहांत; परंतु इब्राहीम अदिलशहाचें व माझें सख्य असून त्यानें तुमची कोणत्याही प्रकारें आगळीक केलेली नाहीं; शिवाय तुमचें व माझें ही पुष्कळ दिवसां पासूनचें सख्य आहे; म्हणून मी आपणास अशी विनंती करितों कीं, अशा रीतीनें परराज्यापहरण करण्यासाठीं आपण जें हें कारस्थान उभारिलें आहे, तें बंद करावें, आणि आपलें सैन्य परत बोलावून घेऊन उभय पक्षाशीं ही सारखाच सलोखा ठेवावा; म्हणजे त्याच्यामध्यें ही आपसांत सख्य होऊन या फार दिवस चाललेल्या युद्धाची समाप्ती होईल." रामरायाचें अशा आश-याचें इब्राहीम कुत्बशहा यांस पत्र मिळाल्यावर त्यानें विजयानगर येथें जाऊन रामरायाची भेट घेतली, व त्याच्याच मध्यस्थीनें या अपसांत युद्ध करीत अस-

झेल्या राज्यांमध्यें परस्पर सलोखा झाला. त्या नंतर रामरायाच्या तिरुमल्ल व व्यंकटाद्रि या उभयतां बंधूनीं रामराया विरुद्ध बंड उभारिलें, त्यावेळीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं इब्राहीम कुत्बशहानेंही तें मोडून काढण्यास रामरायास मदत केली होती. थोडक्यांत म्हणजे, रामराया विरुद्ध पुढें एकत्र झालेल्या चारी मुसलमान राज्यकर्त्यांच्या रामराय हा अनेक वेळीं अतीशय उपयोगीं पडला होता; आणीबाणीच्या वेळीं त्यांच्या मदतीस धांवून गेला होता, व उलट पक्षीं त्यास ही त्यांच्या कडून अशीच निरनिराळ्या प्रसंगीं अमोल्य मदत मिळालेली होती. अशा स्थितींत रामरायाशीं त्यांचें शत्रुत्व उत्पन्न झालें तरी त्याच्या बद्दल भयंकर द्वेष उत्पन्न होणें, व त्याचा व त्याबरोबरच विजयानगरच्या राज्याचा समूळ नाश करण्या पर्यंत त्यांचा निर्धार होणें यांस "शत्रुत्व" हेंच एकटें सर्व साधारण कारण लागूं पडत नाहीं;—तर रामरायानें मुसलमान लोकांचा सतत केलेला अपमान, त्यांनां चीड उत्पन्न होऊन त्याबद्दल त्यांच्या मनांत पूर्णपणें पीळ पडण्यासारखीं त्यानें केलेलीं कृत्यें, आणि त्यांच्याशीं चालू ठेविलेली तुच्छतादर्शक वागणूक हेंच प्रधान कारण त्यास लागूं पडते, असें म्हणणें प्रात होतें.

रामरायाचें वर्तन दिवसें दिवस अनियंत्रित, उद्दाम, व आगळिकीचें होत चाललें, असें पाहून विजापूरकर अदिलशहा यानें त्यास व विजयानगरच्या राज्यास नामशेष करण्याकरितां मुसलमान राजेरजवाड्यांची आपसांत जूट घडवून आणण्याचें—आपला वजीर किशरखान याच्या अनुमतीनें—ठरविलें; व भर दरबारांत आपल्या सर्व सरदर मंडळीस उद्देशून त्यानें असें भाषण केलें कीं, " अलीकडे विजयानगरकर हिंदू राज्यकर्ता उन्मत्त होऊन आपला हरघडी अपमान करीत आहे, तरी सर्वांनीं मिळून त्याचा नाश करणें आवश्यक आहे. या कामीं यश आल्यास आपला एक जबरदस्त शत्रू कायमचा नष्ट होईल, आणि यश न येता धर्म संरक्षणा करितां मृत्यू आला तरी तें ही पुण्यप्रदच होईल." त्यावर त्याचा वजीर किशवरखान यानें शहास असें स्पष्ट सांगितलें कीं, " विजयानगरच्या राज्याचा अंमल तुंगभद्रा नदी पासून तो थेट रामेश्वरापर्यंत अबाधित असून हा सर्व प्रदेश सुसंपन्न आहे. तेथील राज्यकर्त्यांच्या ताब्यांत समुद्रकिनाऱ्या वरील अनेक बंदरें असून तेथें व्यापारची मोठ्या जारीनें सारखी घडामोड होत असते; व या राज्याचा वसूल वीस कोटी येत असतो.

तेव्हां अशा बलाढ्य व संपत्तिमान राज्याचा पाडाव करणें, ही गोष्ट कोणत्याही एकट्याच मुसलमान राजास शक्य नसून सर्व मुसलमान राज्यकर्त्यांनीं मिळून एक चित्तानें संगनमत केलें तरच कायती, शक्य व साध्य आहे." त्यानंतर अदिल शहाच्या आज्ञेनें किशवरखानानें अशी आपसांत जूट घडवून आणण्याचा उद्योग आरंभिला. गोवळकोंडेकरास रामराया कडून नेहमीं उपद्रव होत असल्या मुळें तो या कटांत सामील होण्यास लागलाच तयार झाला, व त्यानें नगरकर हुसेन निजामशहासही आपल्या पक्षांत सामील करून घेण्याची कामगिरी पत्करून त्यांत यश मिळविलें; व बेदरकर अली बेरीदशहा याचेंही मन वळवून त्यास त्यांनीं आपल्या कटांत ओढून घेतलें. तथापि बहामनी राज्या मधून उत्पन्न झालेल्या या शाखांतील कांहीं मध्यें आपसांत नेहमीं वैरभाव चालत आला होता; त्या मुळें ही जूट उद्दिष्टकार्य सिद्धीस जाईपर्यंत टिकेल कीं नाहीं, याबद्दल परस्परांच्या मनोमयीं शंका होती; पण त्या बरोबरच विजयानगरचें राज्य नामशेष करणें, ही गोष्टही सर्वांसच इष्ट होती; त्यामुळें पूर्व वैर विसरून सर्वांची मनें शुद्ध रहावी, म्हणून त्यांनीं आपसांत संबंध जुळवून आणिला. हुसेन निजामशहा यानें आपली मुलगी प्रसिद्ध चांदबिबी ही अदिलशहास दिली, व त्याबरोबर तिला सोलापूरचा किल्ला आंदण दिला. उलट अदिलशहानें आपली बहीण हुसेन निजामशहाचा मुलगा मूर्तुजा यांस दिली; व अशा रीतीनें दोस्तीची जूट रुधिर रज्जूंनीं घट्ट केल्यावर या चौघांनीं मिळून-विजयानगरचें राज्य नष्ट करण्याच्या पूर्व तयारी करितां-इ० सन १५६४ च्या अखेरीस विजापूर येथें आपआपल्या सैन्यासह तळ दिला. त्या नंतर रामराया विरुद्ध युद्ध सुरू करण्यास कांहीं तरी कारण पाहिजे, म्हणून अली अदिलशहा विजापूरकर यानें आपले वकील रामरायाकडे पाठवून, आपल्या पूर्वीं ताब्यांत असलेला तुंगभद्रा व कृष्णा या नद्यांच्या दुआबांतील मुद्गल व रायचूरचा प्रदेश, व बागलकोटचा प्रदेश, हे आपणास परत देण्याविषयीं,-जरी रामराय हा ते परत देणार नाहीं अशी त्याची खात्री होती तरी-मागणी केली, आणि ती त्यानें पूर्णपणें फेटाळून देऊन त्या वकिलांना परत पाठविल्या नंतर या चौघांचें एकत्र झालेलें सैन्य एकदम विजयानगरवर चाल करून निघालें. रामरायास त्यांच्या या हालचालीची पूर्णपणें माहिती होती, आणि या सैन्याशीं टक्कर देण्याची त्यानें कडेकोट तयारी ही केली होती; त्या नंतर हें सैन्य विजयानगरच्या मुलखांत शिरण्यापूर्वीं त्यास

कृष्णा नदीच्या उतारावर अडविण्याकरितां त्यानें आपला भाऊ तिरुमल्ल–तिरुमल्ल व व्यंकटाद्री यांनीं रामराया विरुद्ध केलेलें बंड त्यानें दाबून टाकिल्या नंतर ते उभयतां पुन्हां रामराया जवळ पूर्वीप्रमाणें अधिकार संपन्न स्थितींत होते; त्या उभयतां बंधू मधील तिरूमल्ल–यांस एका मोठ्या सैन्यासह तेथें ठेविलें; परंतु मुसलमानांनीं त्यास फसवून ही उताराची जागा आपल्या ताब्यांत घेतली, व त्या मार्गानें त्यांनीं पुढें विजयानगरच्या राज्यांत प्रवेश केला. तेव्हां त्यांच्याशीं तोंड देण्याकरितां रामराय हाही आपल्या उभयतां बंधूसह आपणाबरोबर एक मोठें एक मोटें सैन्य घेऊन विजयानगरहून निघाला, व ता २३ जानेवारी इ. सन १५६५ रोजीं तालीकोटच्या नैऋत्येस अजमासें तीस मैलांवर या उभयतां सैन्याचा समोरासमोर मुकाबला झाला. त्यावेळीं उभयतांचीही सैन्यें शिस्तीनें व सुव्यवस्थेनें उभीं केलेलीं होतीं. मुसलमानी सैन्यांत उजव्या बाजूस अली अदिलशहा, डाव्या बाजूस अली बेरीदशहा, व इब्राहीम-कुत्बशहा, आणि मध्यभागीं हुसेन निजामशहा या प्रमाणें सैन्याची मांडणी केलेली असून सर्व मुसलमानी सैन्यापुढें त्याच्यापैकीं निझामशहाचा तोफखाना सांखळींत बांधून उभा केलेला होता; या तोफखान्यांत अजमासें सहाशें तोफा असून, युरोपखंडांत तोफखान्यांसंबंधीं काम शिकून त्यांत निष्णात झालेला जलीबी रुमीखा या नांवाचा आशियामायनर मधील एक मुसलमान मनुष्य त्यावरील मुख्य अंमलदार होता. रामरायाच्या सैन्यांतही तोफखाना असून हिंदूच्या फौजेंत उजव्या बाजूस व्यंकटाद्रि, डाव्या बाजूस तिरूमल्ल, व मध्यभागीं स्वतः रामराय, असे उभे होते; युद्ध सुरू झाल्यावर रामराय पालखींत बसून आपल्या सैन्यास मोठ्या उत्साहानें उत्तेजन देत होता; आणि पहिल्यानें हिंदूंची सरशी होऊन मुसलमानांची पुष्कळच धांदल उडाली होती; परंतु तितक्यांतच रामराय हा पालखींतून उतरून युद्धभूमींतच एका रत्नजडित आसनावर बसला, व विजयी होऊन येणाऱ्या आपल्या सैन्यास चांदी सोन्याचे तोडे व रत्नें माणकें वगैरे बक्षीसें देण्या करितां त्यांचा आपणा समोर ढीग रचून युद्ध कौतुक पहात राहिला; हिंदू सैन्याची सरशी होऊन आपल्या सैन्याची धांदल उडाली, असें पाहतांच, हुसेन निजामशहानें न डगमगतां मोठ्या तडफीनें हिंदू सैन्याची मध्यफळी फोडिली, व तो थेट रामरायावर चाल करून आला. तेव्हां जिवाच्या भीतीनें रामराय तसाच लगबगीनें पालखींत बसला, व

निजामशहाच्या तावडींतून निसटण्याचा प्रयत्न करूं लागला; त्यावेळीं निजामशहानें आपला एक मस्त हत्ती पालखीवर सोडिला; तेव्हां घाबरून भोई लोक रामरायाची पालखी तेथेंच टाकून पळून गेले; तथापि न डगमगतां तो एका घोड्यावर बसून पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला; इतक्यांत निझामशहाच्या सैन्यानें त्यास पकडून जलीबी रूमीखान याच्या हवालीं केलें; त्यानंतर त्यानें रामरायाची निजामशहाकडे रवानगी केली, व त्यानें लागलीच याचें शीर कापून तें उंच भाल्यास टोंचून रणभूमीवर फिरविलें; तेव्हां आपल्या धन्याची ही भयंकर स्थिति पाहून हिंदू सैन्याचा धीर खचला; तें दुःखानें, निराशेनें व भयानें समर भूमी सोडून पळून गेलें, आणि त्यामुळें मुसलमानास निर्विवादपणें हिंदूवर जय मिळाला.

विजयानगरच्या विध्वंसाची पुढील हकीगत देण्यापूर्वी युद्धातील या अनिष्ट परिणामा विषयीं या ठिकाणीं थोडासा विचार करणें आवश्यक आहे. विजयानगरचें राज्य महाबलाढ्य असून मुसलमानांच्या वर्चस्वाला तें प्रतिबंधक व अपायकारक होतें; त्यामुळें त्यांनीं या राज्याविरुद्ध जूट करून तें नामशेष करण्याचा प्रयत्न करणें, केव्हांही त्यांच्या फायद्याच्या दृष्टीनें त्यांना इष्ट व आवश्यक असेंच होतें; शिवाय रामराया सारख्या शूर व दूरदर्शी पुरुषास मुसलमानांची मनें उगाच न दुखविण्याचेंही धोरण रहावयास पाहिजे होतें. मुसलमानांच्या मदतीस जाऊन उलट त्यांच्याच मशीदींचा विध्वंस करणें, आणि त्यांचा उपमर्द करणें, ही गोष्ट केव्हांही गैर व जाचक अशीच होती. या गोष्टी त्यानें टाळिल्या असत्या तर आपसांत परस्पर शत्रू असलेल्या या चार मुसलमान राज्यकर्त्यांची इतक्या लवकर एकी झाली नसती; आणि कदाचित झाली असती तरी हिंदू विरुद्ध मुसलमान इतक्या अखेरीच्या परमावधी पर्यंत चिडीस गेले नसते; त्या प्रमाणेंच ही मुसलमानांची जंगी स्वारी आपणावर लवकरच येऊन कोसळणार, हें त्यास माहित असून ही त्यानें आपल्या सामर्थ्याचा व शत्रूंच्या एकवटलेल्या शक्तीचा योग्य अंदाज बांधिला नाहीं. फाजील घमेंड, गर्व, अहंकार, व ताठा, या पासूने परावृत्त झाला नाहीं; अथवा या अरिष्टाचा प्रतिकार करण्याचे मूळपासूनच कसोशीचे प्रयत्न–मुसलमानांची आपसांतील जूट फोडण्याकरितां आवश्यक असलेल्या प्रयत्नापासूनचे पुढील प्रत्येक प्रयत्न–कर-

त्याची त्यानें फारशी क्षिति बाळगिली नाहीं, आणि युद्धकाल नजदीक ओढून आणण्यांत त्यानें जी चूक केली, तशीच चूक तो नजदीक आल्यावरही केली; आणि त्यानंतर युद्ध सुरू झाल्यावर पालखींतून उतरून युद्धभूमींत जमीनीवर राहण्यांत तर त्यानें पहिल्या दोहोंहूनही अधिक भयंकर अशी थोडचूक केली. युद्धांत सेनापतीनें आपल्या सर्व सैन्यास आपण दिसूं शकूं, अशाच स्थितींत नेहमीं राहिलें पाहिजे; युद्धांतील जय–अपजय हा, बहुतांशीं सेनानायकाच्या कर्तृत्वावर व युद्धकलाविशारदतेवर अवलंबून असतो; सैन्य कितीही कसलेलें असलें तरी नालायक सेनानायकाच्या धुरिणत्वाखालीं तें परिणामावह कामगिरी बजावूं शकत नाहीं; उलटपक्षीं फारसें तरबेज नसलेलें अथवा कच्चें असलेलें सैन्य कसलेल्या सेनानायकाच्या प्रमुखत्वाखालीं असेल तर स्वतःच्या करामतीवर तो अशा सैन्याकडूनही पुष्कळच महत्वाची कामगिरी बजावून घेतो; नेपोलियन जवळ नेहमींच प्रत्येक युद्धांत उत्तम कसलेल सैन्य होतें, असें नाहीं; पण तो स्वतःच अलौकिक सेनापती असल्यामुळें आपल्या अगाध बुद्धिसामर्थ्याच्या व युद्धपटुत्वाच्या युक्त्याप्रयुक्त्यांच्या जोरावर साधारण सैन्याकडूनही मोठी चमत्कारीक व मननीय कामगिरी बजावून घेऊन कित्येक प्रसंगीं तर युद्धाची सर्व परिस्थितिही साफ बदलून टाकीत असे. नेपोलियन इतका रामराय हा अलौकिक बुद्धिचा नव्हता, ही गोष्ट खरी आहे; पण सारासार विचार करण्या इतपत तो शहाणा व अनुभवी होता, हेंही निःसंशय तितकेंच खरें आहे. स्वतः पाय उतार न होतां, पालखींत बसूनच आपल्या सैन्यास त्याला उत्तेजन देतां आलें असतें; पाय उतार झालेंच पाहिजे, अशा प्रकारची कोणतीही आवश्यक परिस्थिति त्यावेळीं उत्पन्न झाली नव्हती, आणि तो पायउतार होण्या बरोबर जी एक विशिष्ट धोक्याची स्थिति उत्पन्न झाली, तीही खात्रीनेंच उत्पन्न झाली नसती. शिवाय पायउतार झाल्यानंतर शत्रूनें लगट केल्यावर पालखींत व नंतर घोड्यावर बसण्यांत जी विशेष धांदल उत्पन्न होऊन तो पकडला गेला, तितक्या सहज रित्या व लवकर तो पहिल्यानेंच पालखींत असता तर, पकडला जाण्याचा संभव पुष्कळच कमी होता. परंतु पहिल्या पासून सारख्या चुका होत गेल्यामुळें विजयानगरच्या सैन्याचा पराभव होऊन रामरायास प्राणास मुकावें लागलें. तथापि चुकीची ही परंपरा येथेंही थांबली नाहीं. रामरायाचे उभयतांही बंधू शूर

व अनुभवी होते; त्यांनीं या काळापर्यंत अनेक युद्ध प्रसंग पाहिलेले होते; रामरायाचें सैन्यही चांगल्या प्रकारचें असून त्या सैन्यानें मुसलमानी सैन्यास मदत केली होती, त्यांचा पराभव केला होता, व त्यामुळें त्या सैन्यास मुसलमानी सैन्यासंबंधीं माहिति व अनुभव होता. त्या प्रमाणेंच या हिंदू सैन्यांत रामराय व त्याचे दोन बंधू एवढेंच फक्त तीन सेनानायक नसून इतर ही अनेक सेनानायक होते; पण रामरायाचा वध झाल्या बरोबर सर्व हिंदू सैन्याची एकदम धांदल उडाली; आणि या सैन्याची स्थीरस्थावर करून व त्यास धीर देऊन पुन्हा युद्धभूमीवर मुसलमानाशीं दोन हात करण्याचें कार्य एकानेंही पुढारीपणा घेऊन केलें नाहीं; तर जो तो आपला जीव जगविण्याकरितां समरभूमी सोडून पळाला. त्यामुळें विजयानगरच्या राज्याला, व त्या शहरांतील प्रजेला भयंकर परिणाम भोगावें लागले, व तें राज्य कायमचें नष्ट होऊन गेलें. तथापि इतर कोणत्याही कारणापेक्षां विजयानगरच्या राजांनीं,—मुख्यतः कृष्णदेवराय व त्याहून ही अधिक प्रमाणानें रामदेवराय यांनीं,—मुसलमानांच्या मनास दुःख होईल असें वर्तन केलें; याच कारणामुळें मुसलमान लोक चिडीस गेले; गोवळकोंड येथील शत्रु राज्यच फक्त नव्हें तर स्नेही असलेलें विजापूरचें राज्यही विजयानगरकराचे शत्रू बनले; व याच कारणामुळें अखेरीस या राज्याचा ऱ्हास व नाश झाला. *

रामरायाच्या वधा नंतर मुसलमानांचा प्रतिकार करण्यास कोणी ही तयार न होतां जो तो स्वतःचा जीव जगविण्याकरितां वाट सांपडेल तिकडे घाबरून पळाल्यावर मुसलमानांना मोकळें रान मिळालें. या भयंकर अपजयाची बातमी शहरांत येउन धडकल्या बरोबर इतर प्रजाजनां प्रमाणेंच राजकुटुंबांतील मंडळी ही आपणा बरोबर जडजवाहिरानें भरलेले गाडेपांचशें हत्ती घेऊन दक्षिणेंत पळाली; तिरूमल्ल, सदाशिवरायास बरोबर घेऊन पेनकोंडा येथें पळून गेला;

---

* The Raja of Vijayanagar sent back a reply so indecent in expression as to be unfit to relate, says Firishtah. This behaviour on the part of the Hindus so incensed the followers if Islam, not only the hostile subjects of Goa konda, but even the allied troops and inhabitants of the Bijapur territories, that it laid the foundation of the final downfall and distruction of Vijayanagar.

A Forgatter Empere.
( By Robert Sewell. )

व्यंकटाद्रि ही त्याप्रमाणेंच शहरांतून पळून जाऊन त्यानें युद्ध व भावी अनर्थ थांबविण्याविषयीं या मुसलमान राज्यकर्त्यांना विनंति केली; परंतु त्याचा कांहीही उपयोग न होतां उलट त्यासही मुसलमानांनीं पकडून ठार मारिलें; अशा रीतीनें या तीन्हीं ही बंधूंची वासलात लागली, आणि सर्व शहर सर्वस्वीं मुसलमानांच्या आधीन होऊन तेथील प्रजाजनांची "नाथनी नात्राता" अशी भणग स्थिति होऊन गेली!

त्या नंतर मुसलमानांच्या ह्या विजयी सैन्यानें एक दिवस विश्रांती घेतल्या वर विजयानगर शहरांत प्रवेश केला, व तेथें अनेक अनन्वित प्रकार केले. सतत पांच महिने पर्यंत त्यांनीं या दुर्दैवी शहराची सारखी लूट केली; अनेक कत्तली केल्या; मोठ मोठया इमारती, व देवळें यांचा विध्वंस उडविला, आणि जें विजयानगर शहर अत्यंत संपत्तिमान, वैभवसंपन्न, व गजबजलेलें, म्हणून गणलें गेलें होतें, तेंच आतां निर्धन, गतवैभवी, व भयाण होऊन गेलें! या युद्धांत मुसलमानांनीं अगणित लूट मिळविली; सर्व देशाची धूळधाणी उडविली; नाना प्रकारचे जुलूम व अत्याचार केले; आणि दिल्ली येथील तमूरलंगाच्या प्रळयाप्रमाणें,—जगाच्या इतिहासांत क्वचित्च घडलेल्या उदाहरणाप्रमाणें, भयंकर प्रळय करून सोडिला! त्या नंतर या चारी मुसलमान सत्ताधाऱ्यांनीं विजयानगरच्या या हिंदू राज्याची आपसांत वांटणी करून घेतली; व ते सर्व रायचुरास एकत्र होऊन आपआपल्या राज्यांत परत गेले.

तथापि विजयानगरचें राज्य नामशेष करण्यापुरतीच ही मुसलमान राज्य कर्त्यांची जूट झालेली असून त्यानंतर पुढें लवकरच पुन्हां त्यांचें आपसांत पूर्वी प्रमाणेंच मतभेद व युद्ध कलह सुरू झाले; विजयानगरचा नाश झाल्या नंतर तीरुमल्ल हा सदाशिवरायासह कांहीं काळ पेनकोंडा येथें जाऊन राहिला; त्या ठिकाणीं त्यानें एक लहानसें राज्य स्थापन केलें; सदाशिवरायाचा खून करून तो स्वतंत्रपणें तेथें राज्य करूं लागला, व गोवळकोंडेकर महंमद कुली कुत्बशहा यानेंही तें राज्य नामशेष करण्याची बरीच खटपट केली; (इ० सन १५७२.) विजयानगरच्या राज्यांतील जे कित्येक सरदार व किल्लेदार आपआपल्या ठाण्यांत स्वतंत्रपणें कारभार चालवीत होते, त्या सर्वांना त्यानें आपल्या नियंत्रणाखालीं आणिलें, व तो सर्व प्रदेश आपल्या अमलाखालीं घेतला; तिरु-

मल्ल यांस अशा रीतीनें मुसलमान लोकांकडून त्रास होऊं लागला, तेव्हां त्यास कंटाळून तो मद्रासच्या नैऋत्य दिशेस असलेल्या चंद्रगिरी या नांवाच्या गांवीं गेला; व तेथें एक लहानसें राज्य स्थापन करून तो कालक्रमणा करूं लागला. (इ. सन १५९४) त्या नंतर त्याचा वंशज श्रीरंग रायलू—यांस श्रीरंगराय, सहावा रंगराय, अथवा श्रीरंगराय नाईक, असें ही म्हणतात;—याच्या पासून इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी तर्फे फ्रान्सिस डे यानें पूर्व किनाऱ्यावरील हल्लींच्या मद्रास शहरची जागा विकत मिळविण्याचा प्रयत्न केला; कारण यावेळीं इंग्रज कंपनीची स्थिति बरीच अडचणीची व कष्टप्रद झालेली होती. पूर्व किनाऱ्यावरील आर्मागांव व मच्छलीपट्टण या दोन्हीही ठिकाणीं डच लोकांचा व्यापार मोठ्या जोरांत चालत असून त्यांच्यापुढें इंग्लिश व्यापाराचा टिकाव लागत नव्हता. शिवाय मच्छलीपट्टण हें बंदर कुत्बशहाच्या अमलाखालीं असून तेथें त्याचा अंमल जोरांत असल्यामुळें इंग्लिशांचा कोणताही इलाज चालेसा नव्हता; त्याप्रमाणेंच इकडे सुरत येथेंही प्रत्यक्षपणें मोंगल बादशहाचा अंमल असून तिकडेही त्यांचें महत्व स्थापन होण्याचा संभव नव्हता; अशा स्थितींत इंग्लिशांनां एक तटबंदीच्या व आश्रयाच्या अशा स्वतःच्या मालकीच्या स्थानाची अतिशय आवश्यकता होती, आणि चंद्रगिरीकर नाईकाच्या ताब्यांतील हल्लींच्या मद्रास शहराची जागा, आपणास मिळाल्यास, ती, आश्रयास व आपल्या व्यापारास सोयस्कर व फायदेशीर असून, मच्छलीपट्टणपेक्षां शेकडा चाळीस टक्के पर्यंत स्वस्त माल त्या ठिकाणीं मिळेल अशी फ्रान्सिस डे याची खात्री झाली होती. म्हणून त्यानें श्रीरंगरायाकडून ही जागा विकत घेण्याची खटपट सुरू केली, व त्यास भेटून ती त्यानें त्याच्याकडून विकत मिळवून तेथें तटबंदी करण्याची ही परवानगी मिळविली. या वेळीं इंग्लिशांची जशी सर्व साधारणतः संकटप्रद स्थिती झालेली होती, त्या प्रमाणेंच श्रीरंगरायाचीही निराश्रित स्थिति झालेली होती. त्यामुळें इंग्रजांना आपल्या मुलखांत तटबंदीचें ठिकाण बांधण्यास जागा व परवानगी दिली असतां त्याचा आपणास उपयोग होत राहील, व वेळेवर त्यांच्याकडून आपला बचाव व संरक्षण ही होईल, अशा हेतूनें त्यानें इंग्रजांच्या व्यापारी कंपनीस— ईस्ट इंडिया कंपनीस-घरात आणिलें, आणि आपला बाप चेनप्पा यांचें स्मारक राहण्या करितां या नवीन वसविल्या जाणाऱ्या शहरास चेनापट्टण—अथवा चेन्न-

पट्टण-हें नांव यावें असें कबूल करून घेऊन त्यानें ती जागा-इंग्रजांस दिली. परंतु कोणत्याही देशाला तेथील अराजक स्थितिचे परिणाम किती खडतरपणानें भोगावें लागतात, याचें हें एक उदाहरण आहे; तसेंच हेंच इंग्रज बळावल्यावर श्रीरंगरायाचा हेतू व इंग्रजांची चंद्रगिरीच्या या राजघराण्यासंबंधाची पुढील कृति यांतील विरोध यांचें ही तें एक ठळक उदाहरण आहे. श्रीरंगराया नंतर दुसऱ्या तिरूमल रायाच्या कारकीर्दींत म्हैसूरकर हैदरअल्ली यानें चंद्रगिरीचा प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला; परंतू तिरूमल रायानें त्याच्याशीं युद्ध करून तो परत मिळविला; तथापि त्यानंतर "म्हैसूरकरांचे आश्रित" म्हणून हें घराणें राज्य करीत होतें. पुढें इ० सन १७९९ मध्यें टिपू सुलताना बरोबर अखेरचें युद्ध होऊन त्यांत तो मारला गेल्यावर त्याच्या कांहीं राज्या बरोबरच तिरूमल याच्या ताब्यांतील चंद्रगिरीचा प्रदेशही इंग्रज व त्यांचे दोस्त निझाम या उभयतांनीं वांटून घेतला, आणि तिरूमल रायास दरमहा पंधराशें रुपयांची नेमणूक करून देण्यांत आली; तथापि या वेळीं निझामानें आपणाकडे आलेल्या प्रदेशा पैकीं अनागोंदी शहर व त्याच्या आसपासचा थोडासा प्रदेश तिरूमल रायाकडेस जहागिरी दाखल ठेविला; वास्तवीक म्हणावयाचें म्हणजे तिरूमल रायाच्या पूर्वजांचे उपकार स्मरून इंग्रजांनीं हीं रायास आपल्या वांटणीत आलेल्या प्रदेशा पैकीं थोडासा प्रदेश-चंद्रगिरीचें छोटेसें संस्थान त्यांना कायम ठेवावयाचें नव्हतें तरी,-जहागिरी दाखल दिला असतां तर त्यांत इंग्रजांचे म्हणजे फार मोठेंसे नुकसान होत होतें, अथवा झालें असतें, अशांतला कांहीं भाग नव्हता; उलट इंग्रजांच्या मनाचा उदारपणा व मोठेपणाच त्यामुळें दिसून आला असता; पण परभारें टिपूसाहेबाच्या प्रदेशाच्या वांटणींत चंद्रगिरीकरांचाही मुलूख वांटून घेऊन इंग्रजांना निझामा इतका मुद्धां आपल्या मनाचा उदारपणा व मोठेपणा दाखविण्याची बुद्धि झाली नाहीं, हें चंद्रगिरीकरांचें दुर्दैव, अथवा इंग्रजांच्या स्वार्थी स्वभावाचें द्योतक होय, असेंच म्हणणें प्राप्त होतें.

तिरूमलरायाचा मुलगा रामराय हा इ० सन १८२९ मध्यें अल्पवयीं असतानाच मृत्यू पावला, तेव्हां त्याची जहागीर व नेमणूक बंद करण्यांत आली. या घराण्यापैकीं श्रीरंगदेवराय ( पंपापतिराय ) आणि कुमारराघव असे दोन तिरूमल रायाचे वंशज अनागोंदी येथें रहात असून त्यांच्या जवळ आपल्या घराण्याचे कागदपत्र व वंशावळी अस्तित्वांत आहेत; आणि ते हल्लीं हैद्राबादकर

निझामाचे आश्रित आहेत; त्या प्रमाणेंच, हल्लीं या घराण्यापैकीं पंपापतीराय व कुमार राघव असे दोन राजपुत्र हयात असल्या बद्दलची हकीकत अनेगुंदी अथवा अनागोंदा येथील राजानें आपणास कळविल्याचें सिवेल यानें आपल्या इतिहासांत नमूद केलें आहे.

विजयानगरच्या अत्यंत संपत्तिमान व वैभवसंपन्न राज्याचा वर लिहिल्या प्रमाणें इतिहास आहे. अनियंत्रित व अव्यवस्थित राज्यकारभार, अप्रतिहत सूत्रचालकत्व, प्रजेच्या सुख समृद्धि विषयीं पूर्ण फेफिकीरी, ऐषाराम व सुखोपभोग यांची बेसुमार लालसा, नालायक राज्यकर्त्यांच्या परंपरेमुळें वाढत गेलेला उन्माद, सोन्याचांदीच्या चिपांनीं, आणि हिरेरत्नांच्या दगडी आयुधांनीं कोणतीही व कशीही आपत्ति, संकटें, व परशत्रू पासूनचे उपसर्ग, सहज नाहींसे करून टाकितां येतील, आणि याच आयुधांनीं कोणतींही अनीतिचीं कृत्यें करून तीं सहज पचवितां येतील ही कोल्हा बुद्धिमुळें उत्पन्न होणारी घमेंड, स्वतःच्या बलाचा फाजील गर्व, खोटा व बेसुमार अहंकार, अयोग्य ताठा, अन्यायी, व उपमर्दकारक वर्तन, आणि परमावधीची अनीति-या सर्व कारणामुळें तें राज्य कमकुवत होत होत अखेरीस नामशेष होऊन गेलें ! मुसलमानी राज्यकर्त्यांनीं आपसांत जूट करून तें राज्य नामशेष केलें, हें वरवर दिसणारें कारण आहे, आणि मुसलमानांनीं अशी जूट केल्यामुळेंच तें नामशेष झालें, अशी समजूत होणें ही वरवर विचार केल्याचेंच द्योतक आहे. परंतु वास्तवीक म्हणावयाचें म्हणजे, हें विजयानगरकर राजमंडळाच्या क्रियेमुळें कारण घडलेलें आहे. हें राज्य नामशेष होण्याचा मुख्य दोष तेथील पुढील सर्व राज्यकर्त्यांवरच आहे. त्यांचाच आचार, विचार, व वागणूक, यांचा हा परिणाम आहे. मुसलमानांचा अंमल पतकरला, पण या अत्यंत अनीतिपूर्ण हिंदू राजाच्या जुलमी अमलाखालीं राहणें नको, असें हिंदू प्रजेसच वाटूं लागावें याचा दोष विजयानगरकर राज्यकर्त्यांवर आहे. सोनाराची मुलगी निहाल ही स्वखुषीनें मुसलमानी गोषांत जाण्याला तयार होते, पण तिला विजयानगरकर हिंदू राजा नकोसा वाटतो, व त्याला टाळण्या करितां ती पळून जाते हा दोष कोणाचा? विजयानगरकरांचाच हा दोष आहे. असें कां व्हावें? हिंदू राजा विषयीं त्याच्याच हिंदू प्रजेत अत्यंत असंतोष व चेदली का उत्पन्न व्हावी ? याचें कारण दुसऱ्यांच्या सुंदर व तरूण मुलीं संबंधी

पापवासना ! आणि पापाचरण !! असे राजकर्ते आपल्या प्रजेस कितपत सुख देणार ! आणि त्यांचे प्रांतिक व स्थानिक अधिकारी तरी रयतेची कितपत काळजी बाळगणार, हें उघड दिसतेंच आहे; मग अशा स्थितींत राज्यकर्ते तरी प्रजेस कितीं प्रीय होणार, व त्यांच्याबद्दल प्रजाजन प्रेम, आदर व अभिमान कितपत बाळगणार हें ही तितकेंच उघड दिसतेंच आहे. आपले जीवित, अब्रू, व संपत्ति, सुरक्षित नाहीं, अशा राज्याला-मग तें हिंदू राज्य असले तरी हिंदू प्रजा कोठपर्यंत कवटाळून धरील? आसपासचीं मुसलमानी राज्यें म्हणजे मूर्तिमत न्यायाचा अवतार होतीं, असें म्हणणें नाहीं; पण तीं या विजयानगरच्या-राज्याहून पुष्कळ पटीनें बरी म्हणविली जाण्या सारखी होतीं, यांत मात्र संदेश नाहीं. कारण मुसलमान राज्यें, धार्मिक बाबतींत आग्रही असलीं आणि त्यामुळें प्रजेस कांहींवेळां अतीशय त्रास ही भोगावा लागला असला-तरी सुद्धां त्यांना राज्यकर्त्यांच्या कर्तव्याची, विजयनगरकरांच्या मानानें, अधिक जाणीव होती, व आपल्या प्रजेच्या सुख समृद्धि करितां ते अधिक काळजी घेत होते; अधिक बंदोबस्त ठेवित होते; आणि हिंदू लोकांमध्यें आपण परके आहोंत, हें त्यांनां माहित असल्यानें थोडया फार प्रमाणानें तरी ते हिंदू प्रजेच्या इच्छेला मान देऊन वागत होते. त्यांनीं राज्यांतील वसुली व बंदोबस्त या संबंधीं व्यवस्थित पद्धती आंखुन काढिली होती, आणि अन्याय व जोरजुलूम यांनाहीं विविक्षित मर्यादेच्या आंतच ते ठेवित होते. विजापूर, गोवळकोंडें व अहंमदनगर येथील राज्यपद्धति, व तेथील राज्यकर्त्यांनीं प्रजेच्या सुखसमृद्धि करितां केलेल्या अनेक गोष्टी, यांची विजयानगरकरच्या इतिहासांतील या बाबतींच्या गोष्टींशीं तुलना केली असतां विजयानगरच्या मानानें तीं राज्यें अधीक सुव्यवस्थित व प्रजादक्ष होतीं, असेंच म्हणणें भाग पडतें.

त्याप्रमाणेंच दुसऱ्याही एका महत्वाच्या गोष्टीचा या ठिकाणीं थोडक्यांत उल्लेख करणें आवश्यक आहे; ती गोष्ट ही कीं, हिंदुस्थानांत, त्या देशाच्या पूर्व कालीन इतिहासांतील आपापसांतील युद्धांत अथवा भांडणांत विन्हाइतांची मदत घेण्याची प्रवृत्ति विशेष दिसून येते; आणि एकजात, एक समाज, अथवा एक राष्ट्र, ही भावना फारशी दृग्गोचर होत नाहीं. व या देशांत पुढील काळांत इंग्रज-व फ्रेंच कंपन्या व्यापारा करितां आल्यानंतर तर या भावनेचा पूर्ण आभाव ठळ

कपणें अनुभवास आल्यावांचून राहिला नाहीं. मुसलमान सत्ताधाऱ्यांकडून आपणास उपद्रव होऊनये, आणि वेळेवर आपला बचाव होऊन आपणास एक आश्रय स्थान व्हावें, म्हणून श्रीरंगरायानें इंग्रज कंपनीस मद्रास शहराची जागा दिली, आणि इतर सत्ताधाऱ्यांपैकीं एका दोघांनीं अशाच प्रकारची फ्रेंच कंपनीस इतर मदत केली; परंतु स्वतःचें महत्व प्रस्थापित करण्याकरितां, अथवा इतर कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगांतून निभावून जाण्याकरितां, श्रीरंगराया प्रमाणेंच इतर परस्पर प्रतिस्पर्धी सत्ताधाऱ्यांपैकीं कोणालाही दूरवरचा विचार करण्याची, आपसांतच चालू भांडणें मिटविण्याची—अथवा आपल्या प्रतिस्पर्ध्यांस चिरडण्यांकरितां इंग्रज अथवा फ्रेंच या परकीय युरोपियन सत्ताधाऱ्यांची मदत घेतल्या पासून भावी अपरिहार्य परिणाम काय होतील याजबद्दल विचार करण्याची, व अशा रितीनें युरोपियन सत्ता बलिष्ट होऊन त्यांमुळें त्यांच्याच आधीन कदाचित आपणासही व्हावे लागेल या राजधोरणाचें निरिक्षण करण्याची-एकालाही बुद्धि झाली नाहीं; कोणाच्याही नुसतें विचार करण्याचें सुद्धां मनांत आलें नाहीं, अथवा तसें कदाचित एखाद्याच्या मनांत आलें असल्यास त्यास विचार करण्यासही फारसा वेळ मिळाला नाहीं; हिंदुस्थानच्या सरहद्दीवर गुरखे लोकांचें नेपाळचें एक स्वतंत्र राज्य आहे. या ठिकाणीं हल्लींही इंग्रजांचा रेसिडेंट राहतो; पण त्यास तेथील अंतर्गत राज्यकारभारांत हात घालितां येत नाहीं; नेपाळ हें स्वतंत्र राज्य म्हणून गणलें गेलेलें आहे. हें राज्य कोणत्याही देशांतील युरोपियन लोकांस आपल्या देशांत व्यापार करण्याची मुळींच परवानगी देत नाहीं, आणि त्या संबंधीं त्यांच्यामध्यें एक म्हण असून तिचा अर्थ असा आहे कीं, " व्यापाराच्या मागून बंदूक व बायबलच्या मागून संगीन येते. "* असाच प्रकार हिंदुस्थानांत इंग्रज—फ्रेंच कंपन्या व्यापाराकरितां आल्यावर घडून आला; पण नेपाळांत ही म्हण इतरांच्या अनुभवावरून बसविली असल्यामुळें, आणि हिंदुस्थानांतील हिंदू—मुसलमान राजेरजवाड्यांना ती अनु-

---

* "With the merchant comes the musket, and with the Bible comes the bayonet."

History of Nepal
By D. Wright-

वानें माहीत होण्यास संधी न मिळाल्यामुळें, पुढें वेळ निघून गेल्यावर माहीत होऊनही त्यापासून त्यांनां कांहींही फायदा करून घेतां आला नाहीं.

वरील एकंदर विवेचना वरून आर्यलोक हिंदुस्थानांत आल्यावर त्यांची कसकशीं स्थित्यंतरें होत गेलीं,—त्यांनीं केवढालीं साम्राज्यें स्थापन केलीं, कशा प्रकारची राज्यपद्धत्ति घडवून काढिली-वगैरे संबंधी आणि निरनिराळे धर्म, प्रसिद्ध व विद्वान मंडळ, व योद्धे, निरनिराळे वाग्मय विषयकग्रंथ, व अशाच प्रकार-च्या इतर अनेक उपयुक्त बाबतीं, या संबधीं हिंदुस्थानच्या पूर्व इतिहासाची बरोच माहिती होण्यासारखी आहे; तथापि हिंदुस्थान देशा संबंधी याहून ही थोडीशी अधिक अशी विविध माहिती त्रोटक रीतीनें या ठिकाणीं ग्रंथित करणें आवश्यक आहे. अलीकडील शोधा वरून असें कळतें कीं, हिंदुस्थान देशाचा अनादिकाला पूर्वीचा आकार हल्लींहून भिन्न होता; त्यावेळीं हिंदुस्थान देश, आफ्रिका खंड, व आस्त्रेलिया बेट यांच्या मध्यें पाणी नसून जमीन होती, व हा सर्व प्रदेश एकमेंकांस चिकटलेला होता. परंतु कालांतरानें मधील जमीन समुद्राखालीं बुडून जाऊन हिंदुस्थान देश ह्या देशांपासून अलग होऊन तें द्विपकल्प बनलें. हें हिंदुस्थानचें द्विपकल्प जगाच्या इतिहासांत अत्यंत महत्वाचें गणलें गेलेलें असून या देशाचा अती प्राचीन काळा पासून इजिप्त, बाबीलोन, चीन, जावा, ग्रीस, इताली, अरबस्थान, वगैरे देशाशीं व्यापारी संबंध चालत

---

सर आलफ्रेड लायल याचेंही असेंच मत असून तो म्हणतो कीं, "आणी बाणीचे प्रसग पुढें येऊन पडल्यामुळें या प्रतिस्पर्ध्यां पैकीं ( म्हणजे आपलें महत्व स्थापन करण्याकरितां, स्वतंत्र होण्याकरितां, अथवा प्रांत काबीज करण्याकरितां, युद्धकलह करणाऱ्या प्रतिस्पर्ध्यां पैकीं ) कोणालाही, दूरवरचा विचार करण्याला, अगर आपापसांत तडजोड करण्याला, व सशस्त्र युरोपियन सैन्य मध्यें मदतीस बोलाविल्या पासून घडून येणाऱ्या अपरिहार्य परिणामाकडे लक्ष पोंचविण्याला सवड मिळाली नाहीं.

"None of these rivels could afford to look for ahead or concern themselves, in the face of emergent needs, with the inevitable consequences of calling in the armed European."

British Dominion in Indai.

Page.90

आलेला आहे. या देशांतील मूळ लोक कोण होते, व ते कोठून आले, या बद्दल अजून निश्चित असा शोध लागलेला नाहीं.तथापि हिंदुस्थानचे मूळचे लोक अनार्य हें असून त्यानंतर द्रवीड लोक पहिल्यानें हिंदुस्थानच्या वायव्य व ईशान्य दिशेनें या देशांत आले, व त्यानंतर चीन देशांतून पिवळट रंगाचे मंगोलियन व त्यानंतर आर्य लोक हिंदुस्थानांत आले,असें उपलब्ध माहिती वरून निदर्शनास येत आहे; या आर्य लोकांचें मूळ वस्तिस्थान आशिया मायनरमध्यें, मध्य आशियांत कास्पियन समुद्राच्या आसपास अथवा काकेशस पर्वतानजीक होतें, असा आज-पर्यंतचा समज होता; व डाक्टर मोल्टन याच्या मताप्रमाणें हें मूळ वस्तिस्थान डान्यूब नदीच्या उत्तर दिशेस होतें; परंतु, उत्तर ध्रुवा जवळील आर्टिक प्रदे-शांत किंवा युरोप खंडाच्या उत्तर भागांत आर्य लोकांचें मूळ वस्तिस्थान होतें, असें ही अलीकडे एक नवीन मत निघालेलें आहे; कारण त्या ठिकाणीं वर्षांतील सहा महिने रात्र व सहा महिने दिवस असतो; म्हणून तैत्तिरीय ब्राह्मणांत (३-९-२२) "एकंवा एतद्देवानामहः। यत्संवत्सरः॥ (म्हणजे संवत्सर हा देवांचा एक दिवस आहे) असा उल्लेख आहे, तो याच गोष्टीस अनुलक्षून केला असावा असें दिसते; त्याप्रमाणेंच संवत्सर म्हणजे देवांचा अहोरात्र एक दिवस असें वेदोत्तर कालीन ज्योतिषांतही दिग्दर्शन केलेलें आहे; त्या वरूनही वरील तर्कास पुष्टी येते; शिवाय आर्य लोक एकत्र असल्या वेळीं हीम, हिंवाळा, वसंत काळ, या अर्थाचे जे शब्द होते, ते पौर्वात्य व पाश्चिमात्य भाषांत एक आहेत; परंतु उन्हाळा व हेमंत यांना तसे एक शब्द नाहींत; या वरूनही आर्यांचें मूळ वस्तिस्थान युरोपखंडाच्या उत्तर भागांत असावें, असें स्पष्ट होतें. त्याप्रमाणेंच व्याघ्र, सिंह, या पशूंना आर्य लोक एकत्र होते, त्या वेळचे शब्द नाहींत, या वरूनही ही गोष्ट सिद्ध होते; शिवाय मूळचे आर्यलोक हे पुष्कळ गुरें, ढोरें बाळगून रहात असल्यामुळें त्यांना चांगल्या व मुबलक चाऱ्यांची कुरणें, व आपल्या सार-ख्याच जोमदार, धिप्पाड, व गौरवर्णाच्या लोकांची उत्तम वाढ होण्यास भरपूर हवा व मोकळी मैदानें यांची अत्यावश्यकता होती; अशी जागा, म्हणजे रशियांतील उरल पर्वताचे दक्षिणेपासून जर्मनीचे उत्तर भागापर्यंतचा प्रदेश ही असून तेंच आर्यांचें मूळ वस्तीस्थान असावें, असें अनुमान आहे; व पूर्वींच्या लोकांच्या सांपडलेल्या डोक्यांच्या कवच्या वरूनही या अनुमानास पुष्टी मिळत आहे;

आर्यांच्या मूळ वस्तिस्थानांतून त्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केल्यानंतर हिंदुधर्म स्थापन झाला, व पुढें निरनिराळे धर्मपंथ निर्माण झाले; त्यापैकीं, हिंदुधर्मा-प्रमाणेंच, बौद्ध व जैन धर्मही हिंदुस्थानांत निर्माण होऊन, त्यांतल्यात्यांत बौद्धधर्माचा लवकर व जोरानें अतीशय प्रसार झाला. त्यामुळें ब्राह्मणांनीं बौद्धधर्मातील पुष्कळ गोष्टी आपल्या धर्मांत घेतल्या, आणि बौद्ध भिक्षु प्रमाणेंच त्यांनीं ही धर्मोपदेश, व विद्यादान या कामीं विशेष श्रम घेण्यास सुरवात केली. त्या मुळें हिंदूधर्माचें नवीन स्वरूप जोरांत येऊन बौद्धधर्माची शक्ति कमी झाली. या पुनरज्जीवनाच्या कामांत पहिला धर्मोपदेशक म्हणने बहार प्रांतांत राहणारा कुमारील भट्ट या नांवाचा एक मनुष्य असून तो सातव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला; हिंदूलोकांचें तत्वशास्त्रही याच काळांत जोरांत आलें. या शास्त्राचे मुख्यतः सहा विभाग असून त्यास "षड्दर्शनें" असें म्हणतात; त्यापैकीं पूर्वमिमांसा व उत्तरमिमांसा हे शेवटचे दोन भाग आहेत; पूर्वमिमांसेमध्यें ब्राह्मण वगैरे ग्रंथांतून सांगितलेल्या यज्ञ-कर्माचा समावेश केला आहे, व उत्तरमिमांसेमध्यें उपनिषदांत वर्णन केलेला वेदांत धर्म प्रतिपादन केलेला आहे. या पैकीं पूर्वमिमांसेवर जैमिनीची व उत्तर-मिमांसेवर बादरायणाची सूत्रें आहेत; बौद्ध धर्माच्या भरभराटीच्या काळांत या दोन्हींही मिमांसांचा लोप झाला होता; परंतु या वेळीं कुमारील भट्टानें पूर्व मिमांसेवर विस्तृत टिका लिहून यज्ञयागादि कृत्यांचें समर्थन केलें. याच कुमारील भट्टाजवळ ब्राह्मणधर्म संस्थापक शंकराचार्य यानें अध्ययन केलें; व उत्तरमिमांसेचें समर्थन करून ब्राह्मणधर्मास पुष्टिकरण दिलें. त्यानंतर शंकराचार्य हा हिंदुस्थान-च्या दक्षिण टोंकापासून तो उत्तरेस हिमालय पर्वतापर्यंत, व पश्चिमेस द्वारकेपासून तो पूर्वेस थेट समुद्रापर्यंत, उपदेश करीत फिरला, अनेक ठिकाणीं हिंदू धर्माचे मठ स्थापन केले; आणि बादरायणानें केलेल्या ब्रह्मसूत्रांत, बौद्ध व जैन या दोन्हीं धर्मांची मतें खोडून काढून त्यानें हिंदू धर्माची जी सोपत्तिक उपपत्ति लाविली होती, त्याच ग्रंथावर शंकराचार्यानें भाष्य लिहून हिंदुस्थानांतील बौद्ध धर्माचें वर्चस्व नष्ट करण्याचें कार्य शेवटास नेलें. तथापि हिंदू धर्माप्रमाणेंच जैन धर्मही बौद्धधर्मास एक अत्यंत जबरदस्त प्रतिस्पर्धी म्हणून उत्पन्न झाला, आणि त्या धर्माचेंही बौद्ध धर्माबरोबर मोठ्या जोराचे व चिकाटीचे झगडे होऊन हिंदु-स्थानांतील बौद्ध धर्माच्या वृद्धीवर त्याचाही अतीशय अनिष्ट परिणाम झाला.

हिंदू कालाच्या शेवटीं शेवटीं संस्कृत भाषा हळू हळू मागें पडत गेली; तथापि ब्राह्मण धर्माच्या पुनरुज्जीवना बरोबर संस्कृत भाषा व संस्कृत ग्रंथोत्पत्ति यांचें ही पुनरुज्जीवन झालें. शंकराचार्य हा आपल्या वयाच्या बत्तीसाव्या वर्षी (इ० सन ७१० ते ७४२) हिमालय पर्वतावर केदारनाथ येथें मृत्यू पावला; तो शिवोपासक असून त्यानें शिवाची व त्याची स्त्री देवी (पार्वती) हिची उपासना करावी, असा उपदेश केला. याच देवीस दुर्गा अथवा काळी देवी असें म्हणतात. शंकराचार्यांचे अनुयायी "स्मार्त" या नांवानें प्रसिद्ध असून त्यांनीं म्हैसूर संस्थानांतील तुंगभद्रा नदीच्या उगमा जवळील श्रृंगेरी येथें एक मठ स्थापन केला. या शिवाय शंकराचार्यानें हिमालय पर्वतांत बद्रिनाथ येथें, पश्चिमेस काठेवाड प्रांतांत द्वारका येथें, व पूर्वेस ओढ्या प्रांतांत जगन्नाथ अथवा पुरी येथें, असे तीन प्रसिद्ध मठ स्थापन केले; बहुजन समाजाची नवीन बौद्ध धर्मावरील प्रवृत्ति पुन्हां हिंदू धर्माकडे वळवून घेण्यकरितां जेव्हां ब्राह्मण धर्म प्रवर्तकांनीं बौद्ध धर्मांतील कित्येक लोकप्रीय तत्वांचा आपल्या पुरातन हिंदू धर्मांत समावेश करून घेतला, तेव्हां ते बुद्धास विष्णूचा नववा अवतार असें मानूं लागलें, व शैव अथवा स्मार्त पंथा प्रमाणेंच वैष्णव पंथ उत्पन्न झाला. शिवाय नवीन बौद्ध धर्मांत दिसून येणाऱ्या गोष्टी–म्हणजे देवांच्या पुंस्त्री, विभूती, मूर्तिपूजा, पवित्र ठिकाणच्या यात्रा वगैरे–अशिक्षित वर्गांनीं आपला धर्म न सोडितां त्यांस चिकटून रहावें म्हणून, ब्राह्मण धर्मप्रवर्तकांनीं आपल्या धर्मांत सामील केल्या; त्यामुळें जनसमूहाचा ओघ बौद्ध धर्माकडून पुन्हां ब्राह्मण धर्माकडे परत फिरला; परंतु त्या बरोबरच मूळच्या धर्मांत क्रांति होऊन पूर्वीचा ब्राह्मणधर्म व नवीन बौद्धधर्म यांचें मिश्रण होऊन हल्लींचा हिंदूधर्म निर्माण झाला; स्मार्त पंथा प्रमाणेंच जो दुसरा वैष्णव पंथ उत्पन्न झाला त्याचा उपदेशक रामानुज हा असून त्याचा जन्म मद्रास नजीक एका खेडयांत इ० सन ११५० च्या सुमारास झाला. त्यानें लहानपणापासूनच चोलराजांच्या राजधानीचें शहर कांचीवरम् येथें अभ्यास करून नंतर तो त्रिचनापल्ली जवळील श्रीरंगपट्टण येथें गेला; त्यावेळेपासून त्यानें वैष्णवधर्म प्रतिपादनास सुरवात केली, व त्याच्या प्रसारार्थ त्यानें संस्कृत भाषेंत अनेक ग्रंथ लिहिले. अशा रीतीनें वैष्णवधर्माचा उपदेश करीत तो सर्व हिंदुस्थानंभर फिरला; परंतु पुढें कांची येथील शिवोपासक चोल राजानें त्यास ठार मारण्याचा प्रयत्न केल्यामुळें

तो म्हैसूरच्या राज्यांत गेला, व तेथील जैनधर्मी राज्यकर्त्याच्या मनावर आपलीं मतें बिंबवून, व त्यास वैष्णव पंथाची दिक्षा देऊन, त्यानें तिकडे आपल्या पंथाचा जारीनें प्रसार करण्यास सुरवात केली. तथापि रामानुज हा गौतमबुद्धा प्रमाणें सर्वांस उपदेश करीत नसून फक्त ब्राह्मणास व उच्च वर्णांतील लोकांसच उपदेश करीत असे. रामानुजाच्या अनुयायास "श्री वैष्णव" असें म्हणत असून या पंथाचें मुख्य पीठ कांचीवरम येथें आहे. रामानुजा नंतर अजमासें शंभर वर्षांनीं रामानंद या नांवाचा त्याचा एक अनुयायी होऊन गेला; त्यानें उत्तर हिंदुस्थाना-मध्यें, "देव हा एकच असून त्यानें नांव "श्री विष्णू" हें आहे, व त्याचीच सर्वांनीं उपासना व आराधना करावी," असा उपदेश केला. त्यानें आपलें राह-ण्याचें मुख्य ठिकाण बनारस उर्फ काशी हें केलें होतें; आणि तेथून तो आसपासच्या प्रदेशांत फिरून आपल्या पंथाचा, लोकांस उपदेश करीत होता. हा रामानुजा प्रमाणें विशेषत: उच्च वर्णांतील लोकांसच फक्त उपदेश करीत नव्हता; तर बहुत करून खालच्या जातींतील लोकांसच तो उपदेश करीत फिरत होता; आणि त्यांच्या शिष्यांपैकीं खालच्या जातींतच त्याचे अधिक शिष्य झाले होते; या शिष्यांपैकीं कबीर (इ. सन १३८० ते इ. सन १४२० हा एक असून त्यानें रामानंदाच्या मताचा बंगाल प्रांतांत उपदेश केला, व त्याकाळीं उत्तरहिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रसार झाला असल्यामुळें त्यानें हिंदू व मुसलमान या दोघांचाही एकाच धर्मांत समा-वेश करण्याचा प्रयत्न केला; तथापि कबीर हा जातिभेदाविरुद्ध असून त्याप्रमाणें तो लोकांस उपदेश करीत असे; व मूर्तिपूजा करणें हें पाप आहे, म्हणून ती करूं नये, असें तो लोकांस सांगत असे. देव एकच आहे, त्यासच हिंदू व मुसलमान या उभयतांनींही पूजीत गेले पाहिजे, तो मनुष्याच्या हातांनीं बांधिलेल्या देवा-लयांत रहात नसून मनुष्याच्या अंतःकरणांत राहतो, मानवी आयुष्य हा एक मायेचा अथवा कल्पनेचा खेळ आहे, व परमेश्वर हा खरा एकच असून त्याचें ज्ञान करून घेऊन त्याच्याठिकाणीं अनन्य भक्ति ठेविली म्हणजे आत्म्यास शांती मिळते, असें त्याचें मत होतें, व तेंच मत तो नेहमीं सरसकट प्रतिपादन करीत होता; व तो हिंदू व मुसलमान या उभयतांनांही सारखाच पूज्य व प्रीय होता; या कबीराच्या मृत्यू नंतरची मोटी मनोरंजक हकीकत उपलब्ध आहे; ती अशी कीं तो ज्यावेळीं मृत्यू पावला, त्यावेळीं तो हिंदू होता या समजुतीनें हिंदू लोकांस त्याचें कलेवर दहन करण्यास हवें होतें; उलट पक्षीं तो मुसलमान होता

अशा समजुतीनें मुसलमान लोकांस त्याचें शव दफन करावयास पाहिजे होतें; परंतु त्याच्या शरिरावरील वस्त्र काढून पाहतां तेथें शव न आढळतां कांहीं सुंदर व सुवासिक फुलें मात्र असलेलीं आढळून आलीं; नंतर त्यांपैकीं अर्धीं हिंदूंनीं काशी येथें मोठ्या समारंभानें पुरिलीं, व दुसऱ्या अर्ध्या फुलांचें मुसलमानांनीं ही अतीशय थाटानें धार्मिक अंत्यविधी प्रमाणें दफन केलें.

कबीरानंतर चैतन्य या नांवाचा एक बंगाली ब्राह्मण, वैष्णव पंथाचा उपदेशक म्हणून (इ० सन १४८६ ते इ० सन १५२६ पर्यंत) होऊन गेला. त्यानें विष्णु पूजे बरोबरच ओढ्या प्रांतांतील पुरी येथील जगन्नाथ देवाच्या पूजेचा ही उपदेश केला. गौतम बुद्धा प्रमाणेंच अहिंसेवर त्याचा कटाक्ष असून परमेश्वरी शक्तीनें सर्व जाती सारख्या शुद्ध होतात, आणि रक्ताच्या एका थेंबाचाही पात करणें, हें पाप असून तें परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध आहे, असें तो प्रतिपादन करीत असे. चैतन्यानंतर इ० सन १५२० च्या सुमारास उत्तर हिंदुस्थानांत वल्लभस्वामी या नांवाचा एक धर्मोपदेशक होऊन गेला; त्यानें श्रीविष्णूची उपासना, श्रीकृष्णाच्या रूपानें करावी, असा उपदेश केला. आणि देव हा एकच असून तो कृष्णाच्या रूपानें श्री विष्णू हाच आहे,-आणि तो प्रार्थना व उपास तापास करण्यानें अथवा रानावनांत किंवा विहारांत राहून देहास कष्ट दिल्यानें संतुष्ट होत नाहीं, तर सुखाचें सेवन केल्यानें अथवा उपभोग्य वस्तूंचा उपभोग घेतल्यानेंच तो संतुष्ट व प्रसन्न होतो—असें त्यानें प्रतिपादन केलें; व अशारीतीनें हिंदूधर्मांत निरनिराळे पंथ व निरनिराळीं मतें प्रचारांत आलीं.

वर लिहिल्या प्रमाणें जसें हिंदूधर्माचें-मत मतांतरांनीं कां होईना-पुनरुज्जीवन झालें, त्या प्रमाणेंच या काळांत संस्कृत भाषा व ग्रंथ यांचेंही पुनरुज्जीवन होऊन अनेक विद्वान मंडळींनीं निरनिराळे अमोलिक ज्ञान भांडार निर्माण केलें. बौद्ध कालांत चरक व सुश्रुत यांनीं वैद्य शास्त्रावर अमोलिक ग्रंथ निर्माण केले, व नागार्जुन या नांवाच्या प्रसिद्ध बौद्ध ग्रंथकारानें सुश्रुताच्या ग्रंथावर एक लोकमान्य टिकात्मक ग्रंथ लिहून काढिला; हिंदू कालांत अठरा पुराणें व धर्मशास्त्रावरील इतर ग्रंथ निर्माण झाले. माळवा प्रांतांतील प्रसिद्ध राज्यकर्ता विक्रमादित्य ( अजमासें इ सन५३३ ते इ० सन ५८३ ) व कनोजचा राजा हर्षवर्धन ( इ० सन ६०६ ते इ. सन६४६ ) अथवा दुसरा शिला-

दित्य हे उभयतांही चक्रवर्ती राजे विद्येचे मोठे भोक्ते व विद्वानांचे पोशिंदे असून त्यांच्या कारकीर्दीत अनेक काव्यग्रंथ व नाटकें निर्माण झालीं; त्यापैकी हर्षवर्धन हा स्वतःच कवी असून त्यानें "रत्नावली" या नांवाचें लिहिलेलें नाटक प्रसिद्ध आहे. विक्रमादित्याच्या पदरीं नऊ अग्रगण्य कवी व तत्ववेत्ते असून त्यांना विक्रमादित्याच्या सभेंतील नऊ रत्नें अशी संज्ञा होती. या पैकीं बृहत्संहिकार वराहमिहिर, प्रख्यात ज्योतिषी ब्रह्मगुप्त, किरात अर्जूनीय ग्रंथाचा कर्ता भारवी, वासवदत्ता नाटिकेचा कर्ता सुबंधू, शाकुंतल, रघुवंश, व मेघदूत, वगैरे अत्युत्कृष्ट ग्रंथाचा कर्ता कविकुलगुरू व काली देवाचा महान भक्त प्रसिद्ध कालीदास हे विक्रमादित्याच्या पदरीं होते; त्या प्रमाणेंच प्रसिद्ध वय्यकरणीं वामन, व काशीचा जयादित्य, कादंबरी नाटकाचा कर्ता बाण, दशकुमार चरित् या ग्रंथाचा कर्ता दंडिन् व भट्टीकाव्य आणि नीति शतक, या ग्रंथाचा कर्ताभर्तृहरी, हें सर्व हर्षवर्धन राजाच्या आश्रयास होते; त्या नंतर इ० सन ७३५ मध्यें उत्तर रामचरित्, व मालती माधव, वगैरे प्रसिद्ध नाटकांचा कर्ता भवभूती, शिशुपालवध या नाटकाचा कर्ता माघ, ( इ० स. ८६० ) व राजशेखर, ( इ. सन ९१० ) वगैरे प्रसिद्ध ग्रंथकार निर्माण झाले; या वरून आर्यांच्या तत्कालीन विद्याविषयक बाबतींतील प्रगतीची कोणास ही सहज कल्पना होईल.

प्राचीन आर्य लोक रानटी नसून अत्यंत सुधारलेले होते, व जुन्या हिंदूकालांत निरनिराळीं शास्त्रें व विद्या यांत ते पारांगत होते, ही गोष्ट, किती तरी माहिती पुराव्यादाखल पुढें मांडून, सिद्ध करून दाखवितां येण्यासारखी आहे; तथापि स्थलाभावामुळें या ठिकाणीं त्यासंबंधीं त्रोटक रित्याच, पण उल्लेख करणेंच आवश्यक आहे. आणि त्यांसही तसेंच महत्वाचें कारण आहे; तें हें कीं आर्य लोकांनीं पूर्व कालांत जशीं मोठमोठीं साम्राज्यें स्थापन केलीं, त्याप्रमाणेंच प्रत्येक शास्त्रांत, विद्येंत व कलांतही त्यांनीं जगाच्या इतिहासांत इतरांच्या मानानें इतक्या पूर्व कालापासूनच आपली अत्यंत प्रगती करून दाखविली आहे, आणि ही गोष्टच त्यांची लायकी, कर्तृत्वशक्ति, करामत व कर्तबगारी यांची द्योतक असून हल्लींच्या काळींही तीच आपणास समाधानाचें व अभिमानाचें एक आश्रयस्थान म्हणून शिलक राहिलेली आहे, हें कोणासही नाकबूल करितां यावयाचें नाही.

जगाच्या इतिहासास प्रारंभ झाल्यापासून आजपर्यंत हिंदुस्थान देश हा कोणत्याना कोणत्या कारणामुळें, जगांत श्रेष्ठ व अत्यंत महत्वाचा म्हणून गणला गेलेला आहे; व या देशाची नैसर्गिक रचना, हवापाणी, त्यांतील सुपीक, समृद्ध व सौंदर्यमय प्रदेश, मोठमोठ्या नद्या, पर्वत, निरनिराळ्या अपूर्व वनस्पती, व पशुपक्षी वगैरे अनेक गोष्टीमुळें या देशास जगांत अत्यंत महत्व प्राप्त झालेलें आहे. प्रसिद्ध मुसलमान इतिहासकार अबदुल्ला वासफ यानें आपल्या चवदाव्या शतकांत लिहिलेल्या "ताझियत्–अल्–अमसर्" या नांवाच्या ऐतिहासिक ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, सर्व लेखकांच्या एकमताप्रमाणें "हिंदुस्थान" हा पृथ्वीवरील सर्व देशांमध्यें राहण्यास उत्तम देश असून तो जगांतील सर्व ठिकाणांहून अधिक आनंददायक आहे; तेथील माती इतर देशांतील हवेहून ही अधिक स्वच्छ आहे, आणि तेथील हवा तर प्रत्यक्ष स्वच्छतेहून ही अधिक स्वच्छ आहे; व त्यांतील आनंददायक प्रदेश नंदन वनाच्या उपमेस योग्य आहे. ( Elliots History of India; Vol. III Page 28 and 29 पहा. ) त्या प्रमाणेंच प्रोफेसर हिरेन याचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थान देशापासून फक्त बाकीच्या आशिया खंडानेंच नव्हें, तर पाश्चिमात्य जगानें सुद्धां आपलें ज्ञान व धर्महीं मिळविलीं आहेत; * आर्य लोकांनीं हिंदुस्थानांत मोठमोठीं साम्राज्यें स्थापन केली, तरी त्यांनीं आपापल्या साम्राज्यांतील ग्राम संस्था कायम ठेविल्या असून राज्यांतील अंतर्गत कारभाराचा पुष्कळ भाग प्रमुखत्वानें प्रजेच्या हातांत होता; आणि पूर्व कालची राजकीय घटना व कायदे यांचें मनन केल्यास त्यांत लोकसत्तात्मकत्वाचा अंश वास करीत होता, असें जेम्स मिल्ल यानें कबूल केलें आहे; शिवाय, सर चार्लस मेटकाफ यानें या बाबतींत असे उद्गार काढिले आहेत कीं, ग्रामपंचायती हीं लहानशीं लोकसत्ताक राज्येंच असून त्यांना ज्या प्रत्येक गोष्टीची आवश्यकता आहे असें वाटेल, त्या सर्व गोष्टी त्यांच्या जवळ आहेत, आणि इतर कोणत्याही परकीय राष्ट्रापासून त्या बहुतेक स्वतंत्र आहेत; ज्या ठिकाणीं इतर कोणतीही गोष्ट चिरकालीन टिकत नाहीं, त्या ठिकाणीं या ग्रामपंचायती टिकल्या आहेत असें दिसतें. वराण्यामागून घराणीं नामशेष झालीं;

---

* India is the scurce from which not only the rest of Asia, but the whole Western World derived their knowledge and their religion. Professor Heeren's Histerical Reserches Vol. II Page 45.

अनेक क्रांत्या झाल्या; आणि पठाण, मोंगल, मराठे, शीख व इंग्रज हे क्रमाक्रमानें हिंदुस्थानचे राज्यकर्ते झाले; परंतु ग्रामपंचायती पूर्वी होत्या तशाच कायम आहेत; गांवांतील जमातींचें अथवा पंचायतींचें, प्रत्येक जण आपापलें लहानसें स्वतंत्र राज्य त्यांत बनवून, असणारें हें ऐक्य, हें हिंदू लोकांच्या सुखांस आणि बहुतांशीं स्वातंत्र्य व मोकळेपणा यांनां कारणीभूत झालेलें आहे. †

ग्राम पंचायती प्रमाणेंच, प्राचीन आर्य लोकांचें शील कसें होतें, म्हणजे त्यांची दानत (Character) किती प्रसंशनीय होंती, या विषयीं ही इतिहासांत अनेक निरनिराळ्या प्रकारचे व प्रसंगाचे दाखले आढळतात; सत्य हा जगाचा ज्ञानदीप आहे; शील ओळखण्याचें मुख्य साधन सत्य हें आहे; सत्य ही जगांतील पवित्र, श्रेष्ट, व अविनाशी वस्तू आहे; आणि मानवी जगांत सत्य हा श्रेष्टतम, प्रधान व अमोल्य असा माननीय सद्‌गुण म्हणून मानिलेला असून मानवी प्राण्याच्या आयुष्यांत त्यास तो तारक म्हणून, व त्याच्या मृत्यू नंतर त्याच्या सद्गतीस मार्ग दर्शक व मदतगार म्हणून, ठरलेला आहे. आणि सत्याच्या नरडीस नख देणारा मनुष्य कुमार्ग गामी होण्यास प्रारंभ होऊन, संवईने अट्टल खोटें बोलणारा म्हणून मानिला जाऊन तो सत्य भाषणीं व सत्याचरणीं समाजांतील महारोग म्हणून गणिला जात आहे; या बाबतींत ऐतिहासिक दाखले देऊन असें निर्विवादपणें सिद्ध करून देतां येईल कीं, अनादि काला पासून हिंदू लोक हे सत्यवादी म्हणून प्रसिद्ध आहेत, आणि तशी त्यांची सर्व देशांतील व सर्व जातींच्या लोकांनीं तारीफ केलेली आहे. या बाबतींत स्ट्राबो म्हणतो

---

† ' The villege communities are little republics having nearly every thing they can want within themselves and almost independent of any foreign nation. They seem to last where nothing else lasts. Dynasty after dynasty tumbles down, revolution succeeds revolution. and Pathan, Moghal, Mahratta, Sike, British, are all masters in turn, but the village communities, remain the same. This union of village communities, each one forming a seperate little state in itself, is in a high degree conducive to their ( Hindu's ) happiness, and to the enjoyment of a great portion of freedom and independence "

( See Report of the Select Committee of the House of Commons; 1832. Vol. III. Appendices Page 33.

कीं, हे (हिंदू) लोक इतके इमानी आहेत कीं, त्यामुळें त्यांनां आपल्या घरांनां कुलुपेंही लावावी लागत नाहींत, आणि त्यांनां दुसऱ्यांस बांधून घेण्याकरितां लेखी कराारही करावे लागत नाहींत. † त्या प्रमाणेंच इपिक्टिटसचा पट्टशिष्या एरियन हा दुसऱ्या शतकांत असें म्हणतो कीं, हिंदुस्थानांतील कोणताहीं मनुष्य कधींही खोटें बोलल्याचें आढळून आलें नाहीं. * एरियनच्या या लिहिण्यांत कदाचित् अतिशयोक्ति आहे असें ग्रहित धरिलें तरी त्यानें हिंदू लोकांबद्दल काढिलेले स्तुतीपर उद्‌गार खरोखरच मननीय आहेत, यांत संदेह नाहीं. प्राचीन चिनी प्रवासी ह्यूएनत्संग हा हिंदुस्थानवासियां विषयीं असें म्हणतो कीं, हे लोक, त्यांची सरळ व इमानी वागणूक यामुळें, प्रसिद्ध असून संपत्ति विषयीं म्हणावयाचें म्हणजे ती अन्यायानें कधींही मिळवीत नाहींत; न्यायासंबंधीं म्हणावयाचें म्हणजे ते विशेषच सढळतेनें वागतात; आणि सरळपणा, हेंच त्यांच्या राज्यकारभाराचें विशिष्ट अंग आहे. त्याप्रमाणेंच सयामच्या दरबारांतील खांग-थाय या नांवाचा चिनी वकील असें म्हणतो कीं, सू-वी या नांवाचा, सयामचा राजा फुचेन याचा एक नातलग इ. सन २३१ च्या सुमारास हिंदुस्थानांत आला होता; आणि तो परत गेल्यावर त्यानें सयामच्या राजास असें सांगितलें कीं, हिंदुस्थानवासी लोक हे सरळ व इमानी आहेत; त्याप्रमाणेंच फै-तू या नांवाचा, यांगती या चिनी बादशहाचा वकील इ० सन ६०५ मध्यें हिंदुस्थानांत आला होता; तो असें म्हणतो कीं, हिंदू लोक हे पवित्र शपथावर श्रद्धा ठेवितात; त्या प्रमाणेंच तेराव्या शतकांत शमसुद्दीन अबू अब्दुल्ला यानें आपल्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं हिंदुस्थानांतील लोक हे वाळूच्या खड्या सारखे असंख्य आहेत; ते फसवेगिरी व जोरजुलूम यांज पासून अलिप्त आहेत, व प्रसंगी ते आपल्या जिवाची अथवा मृत्यूची पर्वा करीत नाहींत. ( Max Muller's India; What can it teach us; Page 24, 25). शिवाय चवथ्या शतकांत फ्रेभर जार्डनस यानें असे उद्‌गार काढिले आहेत

---

† They (Hindus) are so honest as nither to require locks to their doors nor writings to bind their agreements.

Strabo. Lib XV Page 488. ( Editon 1887 ).

* No Indian was ever known to tell an untruth. Indica chap XII See also Mc. Crindle in Indian Antipuary; 1876.

कीं, हिंदुस्थानांतील लोक हे बोलण्यांत सत्यभाषणीं व न्याय देण्यांत निपूण म्हणून प्रसिद्ध आहेत; त्या प्रमाणेंच इद्रीसी यानें अकराव्या शतकांत लिहिलेल्या आपल्या भुगोलाच्या ग्रंथात असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानवासीयांचा कल जन्मतःच न्यायाच्या बाजूचा असून ते आपल्या कोणत्याही कृतींत न्यायाचा त्याग करीत नाहींत; त्यांचा विश्वासू स्वभाव, इमानी आचरण, व आपल्या वचनाला जागण्याची त्यांची तत्परता, हीं जगजाहीर असून या श्रेष्ट गुणाबद्दल ते इतके प्रसिद्ध आहेत कीं,—जगाच्या सर्व भागांतून पुष्कळ जन समाज त्या देशांत सारखा जात असतो; याच शतकांत मार्कोपोलो यानें असे उद्गार काढिले आहेत कीं, सर्व जगांत ब्राह्मण हे उत्तम व्यापारी असून अत्यंत सत्यप्रीय आहेत, ही गोष्ट तुम्ही लक्षांत ठेविली पाहिजे; कारण जगांतील कोणत्याही गोष्टी करितां तें कधींही असत्य भाषण करणार नाहींत; त्या प्रमाणेंच कमालुद्दीन–इब्द–रझाक समर कंदी या नांवाचा एक मनुष्य खोकनचा वकील म्हणून इ० सन १४१३ ते इ० सन १४४० पर्यंत कालीकतच्या राजा जवळ, आणि इ० सन १४४० ते इ० सन १४४५ पर्यंत विजया नगरच्या राजाजवळ वकील म्हणून होता. तो म्हणतोः–या ( हिंदुस्थान ) देशांत व्यापारी लोक पूर्णपणें सुरक्षित आहेत. त्या प्रमाणेंच प्रसिद्ध अबुल फज्ल हा असें म्हणतो कीं, हिंदूलोक हे सत्याची भक्ति करणारे आहेत, आणि त्यांच्या सर्व व्यवहारांत ते इमानानें वागतात; प्रसिद्ध इंग्रज मुत्सद्दी सर जान मालकम हा असें म्हणतो कीं, त्यांचें धैर्य ज्या प्रमाणें अवर्णनीय आहे त्या प्रमाणेंच त्यांची सत्यप्रीयताही अवर्णनीय आहे. तसेंच कर्नल स्लीमन या नांवाचा एक प्रसिद्ध इंग्रज अधिकारी पूर्वी हिंदुस्थानांत होऊन गेला; त्यास इतर युरोपियन अधिकाऱ्यांच्या मानानें हिंदू लोकांच्या शीलाविषयीं अधिक ज्ञान प्राप्त होण्याची पुष्कळच संधी मिळली असून त्यानें हिंदू लोकां विषयीं असें मननीय उद्गार काढिले आहेत कीं, असत्य भाषण, अथवा एकाच खेड्यांतील मंडळींत आपसांत खोटें बोलणें, हें हिंदू लोकांस बहुतेक माहीत नाहीं. निव्वळ असत्य भाषण करण्यावरच एखाद्या मनुष्याची मिळकत, स्वातंत्र्य, आणि प्रत्यक्ष अस्तित्व, हीं, ज्यांत अवलंबून आहेत, असे माझ्यापुढें शेंकडों खटले आले; परंतु त्यांतल्या प्रत्येक मनुष्यानें खोटें बोलणें साफ नाकारून सत्य तेंच सांगितलें. कर्नल स्लीमनचा हिंदू लोकां विषयींचा हा अभिप्राय अस्त

महत्वाचा व मनोवृत्तीस चालन देणारा असाच आहे यांत संशय नाहीं. कारण स्वतःच्या जिवापुढें जगांत कोणती वस्तू अधिक प्रीय आहे ? कशाची अधींक किंमत आहे ? कशाचें अधीक महत्व आहे ? वास्तविक स्वतःच्या जिवाहून अधीक प्रीयतम, मौल्यवान व महत्वाचें असें दुसरें कांहींही नाहीं; पण हिंदू मनुष्याच्या दृष्टीनें स्वतःच्या जीवाहूनही सत्याची थोरवी त्यास अधीक वाटते; हिंदूलोक सात्विक आहेत व सत्य प्रीय आहेत, याचें कारण काय ? याचीं कारणें आमच्या हिंदूंच्या धर्मग्रंथांतच आहेत. ज्या विशिष्ट गोष्टी वर आमचें–आम्हा हिंदूंचें-अमोल्य ग्रंथ म्हणून गणले गेलेलें रामायण रचिलेलें आहे,–आणि जें आजही सर्व हिंदुस्थानांतील हिंदुजनतेचें राष्ट्रीय व सामाजिक शील वनविण्यास पुष्कळच प्रमाणानें कारणीभूत होत आहे-त्या रामायणांतील विशिष्ट व महत्वाची गोष्ट कोणती आहे ? ती गोष्ट ही आहे कीं, जरी जगांतील आपणास अगदीं नजीकची व प्रीय असलेली प्रत्येक वस्तू नष्ट होत असली, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष स्वतःचा प्राणही नष्ट व्हावयाचा असला तरी सत्य सोडावयाचें नाहीं; सत्याचा त्याग करावयाचा नाहीं, व सत्याकरितां प्रत्यक्ष स्वतःच्या प्राणासह कोणत्याही गोष्टीचा त्याग करावयाचा प्रसंग आला तरी माघार घ्यावयाची नाहीं; श्री रामचंद्राच्या राज्याभिषेक समयीं विघ्न उपस्थित होऊन त्यास वनवास भोगावा लागणार, याबद्दल त्याचा धाकटा भाऊ लक्ष्मण यांस वाईट वाटलें, व त्यानें पित्याची वनवासास जाण्याची आज्ञा मान्य न करण्याबद्दल त्यास विनंती केली; तेव्हां राम त्यास म्हणाला:—लक्ष्मणा, आपले वडील केवळ सत्यस्वरूप आहेत; त्यांचा शब्द हेंच सत्य आहे; आणि त्याचें प्रत्येक कृत्य सत्यास धरून आहे; परलोकाची त्यांना भीती वाटते तरी ते त्या संबंधानें निर्भय असोत; संपत्ति गेली म्हणून तूं दुःखी होऊं नकोस; साम्राज्य व अरण्य हीं दोन्हीं मला सारखींच आहेत; आपण अरण्यांतही सुखानें राहूं ” पुढ दशरथाच्या मृत्यूनंतर वृद्ध मंत्री जाबाली ऋषी यानें रामास अयोध्येस परत येऊन राज्यसूत्रें हातीं घेण्याबद्दल विनंती केली, तेव्हां राम त्यास म्हणाला:— जाबाले ! सत्य हें मला सर्वांहून अधिक प्रिय आहे. राज्याची इमारतच सत्याच्या पायावर रचिलेली आहे. सत्य हें सर्व धर्माचें मूळ आहे. म्हणून लोभ, मोह, किंवा क्रोध, यांनां बळी पडून मी सत्य कधींही सोडणार नाहीं. सत्य, व कर्तव्य कर्म,

यांस धरून वागणें, सर्व भूतमात्रांच्या ठायीं दया दाखविणे, द्विज, देव, आणि अतिथी यांची पूजा करणें हाच सन्मार्ग आहे, असे मुनीजन सांगत आले आहेत त्याच मार्गानें आपण गेलें पाहिजे; त्याप्रमाणेंच पुढें वनवासाहून परत आल्यावर राज्यपदाचा स्वीकार करिताना तो म्हणला.–लक्ष्मणा, मी तुला खरोखर सांगतो कीं संपत्ति, वैभव, व राज्यपद, यांचा स्वीकार मी तुमच्यासाठीं करीत आहे. आपणा सर्व बंधूंत ऐक्य असावें, व सर्वांचें कल्याण व्हावें म्हणून मी राज्यपदाचा अंगिकार करितो, हें तुला सत्यास स्मरून सांगतो; कारण सर्व जगाचें राज्य मिळविणें मला असाध्य नाहीं; परंतु अधर्मानें मला इंद्रपद मिळत असले तरी तें सुद्धा मी स्वीकारणार नाहीं. त्याप्रमाणेंच महाभारत या हिंदूलोकांच्या दुसऱ्या, उज्वल, अलौकिक, व सन्मार्गदर्शक ग्रंथांतून हिंदूलोकांच्या राष्ट्रीय शीलाबद्दल कोणत्या विशिष्ट गोष्टीवर विशेष जोर दिलेला आहे? ‡ पितामह भीष्माच्या अलौकिक शीलाच्या चरित्रा-

‡ श्रीष्णानें, सत्यवचन, सत्यप्रीती, व सत्यधर्मानुसार वर्तन, आचरणांत आणल्याचें पदोंपदीं आढळून येते; भारतीय युद्धानंतर श्रीकृष्णाच्या अवतार कृत्याच्या समाप्तीच्या थोडेसें अगोदर अभिमन्यूची गर्भवती स्त्री प्रसत होऊन तिला मुलगा झाला; परंतु तो मृत स्थितींत उपजला; आधीं मुळीं पुत्र हानी दुःखदायक; त्यांतही पांडव वंशाचा भावी अंकूर हा एकटाच व तोही मृत झालेला, त्यामुळें तर अत्यंतच दुःख दायक; अशा स्थितींत त्या मृत पुत्रास घेऊन सर्वजण आक्रोश करीत श्रीकृष्णा जवळ गेले, आणि त्यास जिवंत करण्या विषयीं त्यांनीं त्याची करुणा भाकिली; त्यावेळीं श्रीकृष्णानें त्या बालकास मांडीवर घेऊन त्यास जिवंत करण्याकरितां मोठ्यानें खालील वाक्यांचा उच्चार केला·—“मी आज पर्यंत थट्टेने सुद्धां कधींही असत्य भाषण केलें नाहीं; व युद्ध परांगमुख होऊन समरभूमीवरून कधींही माघारा परतलों नाहीं, या माझ्या पुण्यानें हें मृत बालक पुन्हां जिवंत होवो; ज्या अर्थीं धर्म व धर्मांचे अधिष्ठाते ब्राह्मण हे सदोदित मला प्रीय आहेत त्या अर्थीं अभिमन्यूचा मृत पुत्र पुन्हा जिवंत होवो; मी विजयांत सुद्धां दुसऱ्याचा केव्हांही विरोध केला नाहीं हें जर सत्य असेल तर त्या सत्यानें या मृत बालकाचा प्राण परत येवो; आणि कंस व केशी यांचा मी धर्म न्यायानें वध केला ही गोष्ट जर सत्य असेल तर त्या सत्यानें हें मृत बालक पुन्हा सचेतन होवो.”

वरून कोणती गोष्ट प्रमुखत्वानें आपणास दृग्गोचर होत आहे? तो गोष्ट ही आहे कीं, कांहीं ही झालें तरी मनुष्यानें इमानी आचरण, व सत्य आणि सरळ भाषण, यांचा कधीं ही त्याग करू नये; अशा उदात्त तत्वांचा, हिंदूलोकांच्या मनावर अनादिकाला पासून पिढयानुपिढया सारखा परिणाम होत आलेला आहे; आणि हींच उदात्त तत्वें नेहमीं वाचण्यांत, ऐकण्यात, व मनन करण्यांत, येत असल्यामुळें हिंदू समाजांत शील हें पुष्कळच प्रमाणानें आजही कायम असल्याचें निदर्शनांस येत आहे; शिवाय हा हिंदू समाज, इंग्लंडांत ज्या प्रमाणें सॅक्सन व नार्मन या दोन जातींचा एक दोन शतकांतच एक जीव झाला, त्याप्रमाणें हिंदूंचा, मुसलमान अथवा इतर कोणत्याही जाती बरोबर एक जीव न होतां, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, व सांपत्तिक वगैरे बाबतींतील त्यांच्या आजच्या पडक्या स्थितींतही पुष्कळच सुधारलेला, सुशील, व श्रेष्ठ, असल्याचेंच निदर्शनास येत आहे; आणि "भाषा, धर्म, पुराणें, तत्वज्ञान, तसेंच कायदा, चालीरीती, प्राचीन कला, अथवा प्राचीन शास्त्रें, या पैकीं कोणताही मानवी बुद्धीचा विषय आपल्या अभ्यासा करितां तुम्ही पसंत करा; प्रत्येक बाबतींत, तुम्हाला आवडो अथवा न आवडो, तुम्हांस हिंदुस्थान देशाकडेसच धांव घ्यावी लागेल; कारण मानवी इतिहासांतील अत्यंत अमूल्य व अतीशय उपयुक्त साधन सामुग्री पैकीं बरीच सामुग्री हिंदुस्थानांत—आणि फक्त हिंदुस्थानांतच संग्रहित केलेली आहे." असें प्रोफेसर मॅक्स मुल्लर यानें इ० सन १८८२ मध्यें हिंदी सनदी नोकरीच्या उमेदवारांपुढें भाषण करिताना जे स्तुतीपर उद्‌गार काढिले तेही वस्तुस्थितीस धरूनच आहेत, ही ही गोष्ट उघड आहे.

त्या प्रमाणेंच, प्रसिद्ध इतिहासकार, निरिक्षक, व मुत्सद्दि, अबुल फज्ल हा असें म्हणतो कीं, "एकंदरीनें पाहतां हिंदू लोक हे स्वधर्मनिष्ट, मन मिळाऊ, आनंदी, विद्यार्जनरत, न्याय प्रीय, कृतज्ञ, सत्य प्रीय आणि अत्यंत इमानी असून परकीयाशीं ते प्रेमानें वागतात. आपल्या कामाकाजांत ते दक्ष आणि हुषार असतात, आणि दुसऱ्याच्या भानगडींत ते पडत नाहींत; समरांगणांतून

---

महाभारतांतील पितामह भीष्म वगैरेंचो ही अशाच प्रकारची कित्येक उदाहरणें स्थळाभावामुळें या ठिकाणीं ग्रंथित केलीं नाहींत.

पळून जाणें म्हणजे काय, हें त्यांना माहीत नाहीं; ते आपल्या गुरुवर अत्यंत भक्ति करितात, व ईश्वराप्रीत्यर्थ स्वदेह अर्पण करण्यासही ते मागें पुढें पहात नाहींत;" त्या प्रमाणेंच प्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दि सर टॉमस मनरो यांस एकदां असा प्रश्न विचारण्यांत आला होता कीं, इग्लंड बरोबरील हिंदुस्थानच्या व्यापारावरील प्रतिबंध काढून टाकून तो अप्रतिबंधक केला तर त्यामुळें हिंदू लोकांच्या संस्कृतिची अधिक वाढ होईल काय ? त्यावर मनरो यानें असें उत्तर दिलें कीं, हिंदू लोकांची सुधारणा अथवा संस्कृती, याचा अर्थ काय, हेंच मुळीं मला बरोबर समजत नाहीं. भिन्न भिन्न प्रकारचे उच्च दरजाचें शास्त्रीय ज्ञान, सुव्यवस्थित राज्य शासन पद्धतीचे ज्ञान, आणि आपले दुराग्रह व अंध विश्वास सोडून देऊन सर्व प्रकारचे व सर्व ठिकाणचें संपादन करण शक्य असलेलें सर्व ज्ञान, यांत हिंदू लोक युरोपियन लोकांच्या मानानें कमी प्रतीचे आहेत; परंतु उत्कृष्ट शेतीची पद्धति, शिल्पकामांतील अनुपमेय कौशल्य, ऐषाराम अथवा उपयोग या करितां कोणत्याही वस्तू तयार करण्याची पात्रता, लिहिणें, वाचणें, व गणीत वगैरेंच्या अध्ययना करितां गांवगन्ना उघडण्यांत आलेलीं विद्यालयें, अतिथीसत्कार, दानशीलता, व सर्वाहून श्रेष्ठ म्हणजे स्त्रिया बद्दल असलेला आदर युक्त व्यवहार, हीं जर सुधारणेची लक्षणें असतील तर हिंदू लोक युरोपियन लोकांहून केव्हांही श्रेष्टच आहेत; आणि माझी अशी खात्री आहे कीं, "सुधारणा" ही जर एक व्यापाराची वस्तू म्हणून झाली तर इंग्लंडला ती हिंदुस्थानांतून मागविण्यांत फायदा होईल." त्याप्रमाणेंच मेगास्थनीस हा हिंदुस्थानांत आल्यावर त्याला जो स्थिती आढळून आली त्याबाबतीत त्यानें जें वर्णन केलें आहे, त्यांत, गुलामगिरीचा आभाव, स्त्रियांचे अवर्णनीय पतिव्रत्य, आणि पुरुषांचें अलौकिक धैर्य, या बद्दल त्यानें स्तुतिपर उद्‌गार काढिले आहेत; तो आणखी असें म्हणतो कीं आशिया खंडांतील इतर सर्व लोकांपेक्षां ते अधिक शूर असून शांत, उद्योगी, उत्तम शेतकरी, व निष्णात कारागीर, आहेत. तें क्वचीत्च न्यायालयाची पायरी चढतात, व ते आपल्या एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं शांतपणानें कालक्रमणा करीत असतात. ( Hunters Gazetteer; "India"; Page 266; ) सरजान माल्कम यांनें ही हिंदू लोकां विषयीं असेंच अभिनंदनपर उद्‌गार काढिले असून तो म्हणतो कीं, हिंदू लोक हे शूर, उदार, व दयाळू असून त्यांचें धैर्य हें जितकें अवर्णनीय आहे, तितकीच त्यांची सत्यप्रियता

ही अवर्णनिय आहे; शिवाय तो आणखीं असेंही म्हणतो कीं, इंग्लंडमध्यें ज्या कित्येक गोष्टी इतिहासास नव्हे तर कादंबरीस साजेशा वाटतील तशा प्रकारच्या परमावधीस गेलेल्या पुष्कळ गोष्टींचे दाखले मला माहीत आहेत;व हिंदू लोकांच्या इमानाविषयीं तो असें म्हणतो कीं मला जी कांहीं माहिती आहे, त्यावरून मला असें वाटतें कीं, सर्व साधारणतः हिंदू लोकांइतकी दुसरी कोणतीही जात विश्वास पात्र नाहीं; त्याप्रमाणेंच हिंदुस्थान देश व त्यांतील प्राचीन काळची अत्युत्तम संस्कृती याबद्दल प्रोफेसर मॅक्स मुलर यानें आपल्या ग्रंथांत ( Professor Max Muller's India; and What can it teach us; पान ८ पहा) असें उद्गार काढिले आहेत कीं, सर्व जगांत निःसर्गदत्त संपत्ति, सामर्थ्य, आणि सौंदर्य, यांनीं समृद्ध—आणि कांहीं भागांत तर केवळ नंदन वनच—असा देश जर कोणी मला दाखवा म्हणून सांगितलें तर मी हिंदुस्थान देशाकडे बोट दाखवीन; आणि जर मला कोणी असें विचारिलें कीं भूतलावरील कोणत्या भागांत मानवी बुद्धिमत्तेच्या अत्युत्तम देणग्या विकास पावलेल्या आहेत, आणि तिनें जीवित-गूढांतील प्रश्नांचा उत्कृष्टपणें छडा लाविला आहे—आणि प्लेटो व कँट यांचा अभ्यास करणारांचें लक्ष आकर्षण केलें जाईल अशा रीतीनें त्या प्रश्नां-पैकीं कांहींचा समाधानकारक निकाल तिनें कोठें लाविला आहे-असें जर मला कोणी विचारलें तर मी तो देश म्हणजे हिंदुस्थान हा होय, असें त्यास बोटानें दाखवीन; त्याप्रमाणेंच मुंबई इलाख्याचा माजी गव्हर्नर माऊंट स्टूअर्ट एलफी-न्स्टन यानें आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत (पान २०२—३७५—३८१ पहा.) जी हकीकत लिहिली आहे त्यांत तो म्हणतो कीं, दारूबाजीची परमावधी, या बाबतींत, व इतर दुर्गुणांचा अतिरेक, यांत हिंदूलोक आमच्या इंग्रज लोकांच्या मानानें श्रेष्ठ असून आमच्या मोठमोठ्या शहरांत जशी कित्येक मंडळी नैतिक अधोगतीस पोहोंचलेली असतात, तसे लोक हिंदूमध्यें आढळून येणार नाहीत; शिवाय हिंदू लोकांची स्वच्छता, त्यांची वागण्याची पद्धत, त्यांची स्वामिभक्ति व इमानीपणा या बद्दल ही त्यानें स्तुतीपर उद्गार काढिले आहेत; त्याप्रमाणेंच इ० सन१८३२ मध्यें लंडन येथें हाऊस ऑफ कामन्स, म्हणजे साध्या लोकांच्या सभेपुढें, ठेविलेल्या अनेक रिपोर्टावरून हिंदुस्थानांतील बंगाल प्रांत, व इंग्लंड देश, या मधील गुन्हयांच्या प्रमाणाची तुलना केलेली आहे; त्यांत इंग्लंडच्या मानानें हिंदुस्थानांतील बंगाल प्रांतांतील गुन्हयांचें प्रमाण कमी असल्याचें सिद्ध

झालें आहे; तें असें कीं, सरासरी चार वर्षांचा हिशोब पाहतां इंग्लंड आणि वेल्स मिळून दरवर्षी देहांत शिक्षा दिलेल्यांचें प्रमाण २,०३,२८१ माणसांस एक हें आहे; आणि बंगाल इलाख्याच्या ताब्यांखालील प्रदेशांत हें प्रमाण १,००४,१८२ माणसांस एक हें आहे; इंग्लंड मध्यें काळ्या पाण्याच्या शिक्षेचें प्रमाण ६७१७३ माणसांस एक हें आहे, आणि बंगाल मध्यें ४०२०१० माणसांस एक हें प्रमाण आहे. इंग्लंड मधील देहांत शिक्षेचा वार्षिक आंकडा १२६२ हा असून बंगाल मधील आंकडा ५९ हा आहे; आणि लोकसंख्येचें प्रमाण पाहतां इंग्लंडची लोकसंख्या १३०००००० असून बंगाल प्रांताची लोक संख्या ६०००००० आहे; त्याप्रमाणेंच हिंदूलोकांची साधी राहणी व साधें अन्न, या गोष्टीही त्यांच्या विशेष निरोगी पणास कारणीभूत झालेल्या आहेत; उदाहरणार्थ, इ. सन १८८१ मध्यें बंगाल प्रांताच्या खाने मुमारीच्या इंग्रजी रिपोर्टाच्या पहिल्या भागांतील २०४ पानामध्यें एक तुलनात्मक पत्रकाच्या आकाराचा तक्ता जोडिलेला आहे; त्यावरून असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, हिंदुस्थानांत हिंदूलोकांनीं वस्ती केलेल्या भागांत दर दहा हजार मनुष्यां मागें तीन, हें वेड्यांचें प्रमाण पडलें; पण इंग्लंड आणि वेल्स मिळून हेंच प्रमाण दर दहा हजारीं तीस हें पडलें; वरील तुलनेवरून हिंदुस्थान व इंग्लंड या दोन देशांतील सर्व साधारण सामाजिक स्थितीमधील फरक कोणाच्याही सहज लक्षांत येऊन योग्य अनुमान काढितां येईल, असें म्हण- ण्यास हरकत नाहीं.

हिंदू लोकांचे शील, त्यांची संस्कृति व त्यांचा स्वभाव याबद्दल निरनिराळ्या लेखकांनीं जें वर्णन केलें आहे, त्याचें नमुन्यादाखल थोडेसें विवेचन वर केलेलें असून तें कोणाही हिंदूस अभिमानास्पद असेंच आहे, यांत संशय नाहीं; तथापि त्यांतल्या त्यांतही ही गोष्ट या ठिकाणीं नमूद केली पाहिजे कीं, शिक्षा भोगीत असलेला हिंदू मनुष्यही, तो कैदी असून सुद्धां, इतरांच्या मानानें श्रेष्ठ ठरत असून त्याबद्दल असा पूर्वीचा एक दाखला उपलब्ध झाला आहे कीं, पोर्ट लुई येथें शिक्षा भोगींत असलेले हिंदू कैदी पाहून, प्रसिद्ध डार्वीन यांस नवल वाटलें; आणि हे असे उमद्या चेहऱ्याचे लोक पाहून तो आश्चर्य चकित झाला. तो म्हणतो "हे लोक सर्व साधारणत: शांत

व योग्य रीतीनें वागणारे आहेत; त्यांची बाह्य वागणूक, त्यांचा स्वच्छपणा, आणि ते मोठ्या श्रद्धेनें पाळीत असलेले त्यांचे चमत्कारिक धार्मिक विधी, यामुळें न्यूसाऊथ वेल्स मधील आमच्या भिकार कैद्यांकडे आम्ही ज्या (तिटकाऱ्याच्या) दृष्टीनें पाहतो त्याच दृष्टीनें या हिंदू कैद्यांकडेही पाहणें अशक्य आहे. (A naturalists Voyage round the world पान ४८४पहा. ) या वरून, अत्यंत आपत्तींत असतांनाही आर्य तेज कसें उमटून पडतें, हें लक्षांत येईल.

हिंदुस्थानांतील पूर्वकालीन राजे रजवाड्यांची राज्यव्यवस्था, राज्यपद्धति व राजनीति या बद्दल मागें त्रोटक विवेचन केलेलें आहेच; तथापि शिकंदर बादशहाच्या स्वारीच्या वेळेस उत्तर हिंदुस्थान किती सुधारलेल्या स्थितींत होतें, हें बऱ्याच विस्तारानें दाखविण्या करितां, मौर्य घराण्यांतील साम्राटां संबंधीं मॅगॅस्थेनीस यानें ग्रंथित केलेली व इतर उपब्ध असलेली हकीकत या ठिकाणीं पुन्हां दिग्दर्शित करणें आवश्यक आहे. मॅगॅस्थेनीस हा राजा सेल्यूकस याचा, चंद्र गुप्ताच्या दरबारांत वकील म्हणून असून तो चंद्र गुप्ताच्या राजधानीचें शहर जें पाटली पुत्र त्या ठिकाणीं बरेच दिवस राहिला होता; त्यावेळीं त्यानें त्या साम्राज्याच्या तत्कालीन राजकीय व सामाजिक स्थितिचें चौकसपणानें निरिक्षण करून जें वर्णन केलें आहे त्यावरून तत्कालीन स्थितिचें योग्य ज्ञान होण्यास पुष्कळच मदत होते; तो म्हणतोः-"पाटली पुत्र या नगराची लांबी सुमारें नऊ मैल असून त्याची रुंदी दीड मैल होती; त्या राजधानीच्या सभोंवतीं लांकडांचा मोठा मजबूत तट असून त्यास ७६४ वेशी व ५७० बुरूज होते; व त्याच्या समोंवतीं विस्तीर्ण व खोल खंदक असून तो शोण नदाच्या पाण्यानें नेहमीं तुडुंब भररेला होता. त्याप्रमाणेंच राजवाडा ही मोठा भव्य व प्रशस्त असून त्यांतील खांबास सोन्याचा मुलामा केलेला होता, व त्यावर सोन्याचे द्राक्षवेल, व त्यामध्यें चांदीचे पक्षी कोरिलेले होतें; राजवाड्याच्या समोंवार मोठमोठीं विस्तीर्ण उद्यानें असून त्यांत पुष्कळ कारंजी व हौद तयार केलेले होते, व त्यांत बहूविध प्रकारचे मासे आणून सोडिलेले होते; राजवाड्यांतील सामान सोन्याचांदीचें असून दोन दोन तीन तीन हात रुंदीची—व तीस साजेशाच लांबीची—सोन्याची ताटें होतीं; त्या प्रमाणेंच कलाकसूरीचीं नक्षी केलेलीं मेजें व कुशल नक्षी केलेल्या खुर्च्या त्या ठिकाणीं होत्या; राजाचे वापरावयाचे झगे भरजरी व मोठ मोठे असून त्याच्या स्वारीची पालखी सोन्याची होती; व तिला खऱ्या मोत्याचे घोंस लाविलेले होते.

राजा दूरवरच्या प्रवासास निघतांना नेहमीं हत्तीवर सोन्याच्या हौद्यांत बसून जात असे; राजधानींत नेहमीं हत्ती, गेंडे, पोळ, व एडके, यांच्या टकरांचे खेळ, मल्लांच्या कुस्त्या, व घोड्यांच्या आणि बैलांच्या शर्यती, होत असत; राजाची मुख्य करमणूक म्हणजे शिकार ही असून, शिकारीस जाताना, त्याच्या संरक्षणाकरितां बरोबर सशस्त्र स्त्रिया असत; राजा दररोज–दिवसांतून एकदां तरी खुद्द्या दरबारांत बसत असे, आणि त्यावेळीं लोकांचे अर्ज घेऊन त्यांचा स्वत: निकाल करीत असे; या चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचें वैभव वृद्धिंगत करण्यास कारणीभूत असलेली व होणारी त्याची बलाढ्य सेना, ही, मनुष्यबलानें प्रचंड, अत्यंत सुव्यवस्थित, व जय्यत सामुग्रीनें समृद्ध. अशी असून, त्या काळांत उपलब्ध असलेलीं सर्व शस्त्रें व साधनें यांनीं युक्त अशीं होती. हें सैन्य खडें असून त्यास सरकारांतून वक्तशीर व भरपूर पगार, घोडे, शस्त्रास्त्रें, व इतर युद्धविषयक आवश्यक ती सामुग्री, मिळत असते; मॅगॅस्थनीस च्या वेळेस चंद्रगुप्ताची फौज एकंदर सहा लक्ष नव्वद हजार होती; त्यांत नऊ हजार हत्ती, व आठ हजार रथ, असून दर हत्तीवर एक माहूत, व तीन तिरंदाज, अशीं चार, माणसें असत; रथ दोन व चार घोड्याचे ही असून, दर रथावर सारथ्या शिवाय दोन लढवय्ये शिपायी असत; म्हणजे नऊ हजार हत्ती वरील ३६००० लोक, व आठ हजार रथांवरील २४००० लोक, मिळून ६०००० साठ हजार सैन्य, हत्ती व रथ मिळून असे; एकंदर फौजेंत सहा लक्ष पायदळ, तीस हजार घोडेस्वार, व साठ हजार हत्ती–रथांचें सैन्य, मिळून एकंदर सैन्य सहा लक्ष नव्वद हजार होतें; शिवाय त्यानें स्वतंत्र आरमारही उभारिलें होतें, व या आरमाराचा आणि आपल्या एकंदर सैन्याचा बंदोबस्त ठेवण्याकरितां एक स्वतंत्र युद्धखातें निर्माण केलें होतें; त्यांत तीस मंत्री किंवा अधिकारी असून पांच जणांचें एक अशीं तीस असामींची सहा मंडळें होतीं; त्यांपैकीं पहिलें, आरमारी मंडळ असून त्याचा संबंध आरमाराच्या मुख्य अधिकाऱ्याशीं येत असे; दुसऱ्या मंडळाकडे सैन्य, सैन्यवाहन, व सैन्य पोषण, यांची जबाबदारी असून पायदळ, घोडदळ, युद्धरथ, व हत्ती, या चार अंगांची व्यवस्था बाकीच्या चार स्वतंत्र मंडळांकडे निरनिराळीं सोंपविलेली असे; त्याप्रमाणेंच पाटलीपुत्र नगराकरितां एक शहर-सुधराई खातें–म्युनसिपल डिपार्टमेंट–निर्माण केलेलें असून त्यांतही तीस मंत्री होते; व त्याचेही सहा

विभाग पाडिलेले असून त्यांतील प्रत्येकांत पांच पांच सभासद होते; या पैकीं पहिल्या खात्याकडे उद्योगधंद्याची व्यवस्था लावण्याचें काम असून त्यांच्यावरच कलाकौशल्याची अभिवृद्धि करण्याची जबाबदारी असे; कामकरी लोकांच्या मजूरीचे दर ठरविणें, माल चांगला आहे कीं नाहीं हें पाहणें, आणि व्यापार व उद्योगधंद्यासंबंधीं उत्पन्न होणारे हरएक प्रश्न सोडविणें, हें काम त्यांच्याकडेस सोंपविलेलें होतें, आणि कामकरी लोकांच्या सुरक्षिततेसंबंधीं-म्हणजे व्यापार व उद्योगधंद्याची वाढ होणें बहुतांशीं या वर्गाचें कलाकौशल्य व मेहनत यावरच अवलंबून असल्यामुळें परंपरेनें व प्रत्यक्षही आपल्या राज्यांतील उद्योगधंद्याच्या वृद्धिसंबंधीं–इतकी काळजी घेण्यांत येत असे कीं अशा कामकरी माणसाच्या हातास व डोळयास इजा करण्याच्या गुन्ह्याबद्दल देहांत शिक्षा ठरविण्यांत आलेली होती; यावरून इतक्या प्राचीनकाळीं ही राजसत्तेकडून आपल्या राज्यांतील उद्योग–धंदे विषयक प्रगति संबंधानें किती काळजी घेतली जात असे, ही गोष्ट मनन करण्यासारखी आहे; पहिल्या खात्यानंतर दुसऱ्या खात्याकडे पाहता त्याकडे परदेशीय वकील, प्रवासी, वगैरे लोकांची व्यवस्था सोंपविलेली असून त्यांच्या राहण्याची, तैनातीची, व औषध पाणी व इतर आवश्यक गोष्टींची, व्यवस्था याच खात्याकडून होत असे. त्या प्रमाणेंच असा कोणताही परदेशीय मनुष्य मृत झाल्यास त्याची अखेरची व्यवस्था लावणें, त्याच्या माल मत्तेची नोंध करून, व त्याच्या वारसाचा तपास करून ती त्याच्याकडे पाठविणें, वगैरे सर्व व्यवस्थाही याच खात्याकडे सोंपविलेली असे. या वरून व्हिन्सेंट स्मिथ यानें म्हटल्या प्रमाणें सदर खात्याचें अस्तित्व हें खरोखरच या साम्राज्याचें परकीय राज्याशीं कसें जिवंत दळणवळण होतें, याचा स्पष्ट पुरावा आहे, असें निदर्शनास येतें; तिसरें खातें म्हणजे जन्म–मृत्यू नोंध खातें हें असून त्या खात्याकडे जन्म–मृत्यूची नोंध करण्याचें काम सोंपविलेलें होतें; आणि सरकारास आपल्या प्रजेची माहिती मिळावी, आणि कर बसविण्याच्या अथवा कमीं करण्याच्या प्रसंगीं सगवड व्हावी, म्हणून हें खातें निर्माण केलेलें होतें; ही नोंध झाडाच्या सालीवर किंवा कापडावर करीत असत; कारण त्यावेळीं कागदाचा शोध लागलेला नसून झाडांच्या साली व कापड यांवर लिहिण्याचा प्रघात होता. ही नोंध विशेष दक्षतेनें घेण्यांत येत असे; या संबंधीं

विशेष हें आहे कीं, ब्रिटिश हिंदुस्थानांत सुद्धां या बाबतीकडे राज्यकर्त्यांचें लक्ष- लागल्यास फार दिवस झाले नाहींत, व देशी संस्थाना पैकीं कांहींचें तर अद्यापही या गोष्टीकडे फारसे लक्ष पोहोंचलें नाहीं; ही गोष्ट ध्यानांत घेतली असतां इतक्या प्राचीन काळींही चंद्रगुप्तानें हें खातें निर्माण करण्यांत केवढया विलक्षण कल्पक- तेची योजना केली, या बद्दल आश्चर्य वाटल्या वांचून रहात नाहीं; चंद्रगुप्तानें निर्माण केलेलें चवथें खातें, हें व्यापार विषयक खातें असून, व्यापाराकडे लक्ष पुरविणें हें त्या खात्याचें काम असे; त्या प्रमाणेंच सरकारी शिक्क्याचीं वजनें व मापें तयार करवून त्यांचाच सर्व लोक उपयोग करितात कीं नाहीं, हें पाहणें; आणि व्यापाऱ्यांना परवानें देणें, वगैरे कामें या खात्याकडून होत असत; त्याप्रमाणेंच पांचव्या खात्याचें काम कारखान्यांवर देखरेख ठेवणें, हें असून जुन्या नव्या मालाची निवड करणें, व त्यावर योग्य कर बसविणें, हें काम त्या खात्याकडे सोंपविलेले असे; या गोष्टीवरून इतक्या पूर्व कालांत ही हिंदुस्थानांत कारखाने असून, त्यावर देखरेख ठेवण्यासाटीं एक स्वतंत्र खातें निर्माण करण्या इतका, त्यांचा विस्तार झालेला होता, हें उघड होतें; त्याप्रमा- णेंच सहाव्या खात्याचें काम, सर्व प्रकारच्या मालाच्या विक्रीनंतर त्याच्या किंमतीचा दहावा हिस्सा कर म्हणून वसूल करावयाचा, हें असे; व बाजार, देवळें, मंदिरें वगैरेवर ही शहर सुधराई खात्याचीच देखरेख असे; वरील एकंदर विवेचनावरून चंद्रगुप्ताच्या राज्यांतील शहर सुधराई खात्याची व्यवस्था कितीं नमुनेदार होती, हें स्पष्टपणें निदर्शनास येतें. पाटलीपुत्र उर्फ पाटणा या नगरा प्रमाणेंच, तक्षशीला व उज्जयनी या शहरांतही, व्यवस्था असून मॅगॅस्थेनीस हा पुढें लिहितों कीं, मी चंद्रगुप्ताच्या छावणींत असताना त्यावेळीं तेथें अजमासें चार लक्ष लोक होते; परंतु इतका मोठा जनसमूह एके ठिकाणीं रहात असून सुद्धां कोणत्याही वेळीं त्या ठिकाणीं ८० रुपयापेक्षां जास्त किंमतीची चोरी झाली नाहीं. गुन्हेगारास फार कडक शिक्षा देण्यांत येत असत; आणि खोटी साक्ष देण्याच्या गुन्ह्याबद्दल हातांपायाचीं—बोटें तोडून टाकीत असत; त्या प्रमाणेंच पवित्र मानिलेल्या झाडांचा नाश करणें, अथवा त्यांना, तीं नाश होतील अशी इजा करणें, विक्री झालेल्या मालावरील सरकारी दस्तुरी अथवा जकात चुकविणें, व राजाची स्वारी शिकारीस जात असतां त्यास वाटेंत हरकत करणें, वगैरे

गुन्ह्यांबद्दल देहांत शिक्षा देण्यांत येत असे; त्या प्रमाणेंच साम्राज्यांतील राज्य-व्यवस्थे संबंधानें पाहतां साम्राज्याचे प्रांतवार अनेक सुभे केलेलें असून प्रत्येक प्रांतावर एकएक स्वतंत्र सुभेदाराची नेमणूक केलेली असे; आणि त्यांच्या वरील तपासणी करितां दुसरे ही स्वतंत्र अधिकारी नेमिलेले असत; जमीनीवरील करासबंधी म्हणावयाचें म्हणजे, उत्पन्ना पैकीं चवथा हिस्सा "राजभाग" म्हणून राजास द्यावा लागत असे; युद्ध विषयक कार्य क्षमतेसंबंधीं पाहतां युद्धाची कामगिरी क्षत्रीय वर्गाकडेसच स्वतंत्ररित्या सोंपविलेली असे. त्यामुळें शेतकरी वर्ग व कृषिकर्म करणारा इतर जन समाज, यांनां युद्धावर जावें लागत नसे; इतकेंच नव्हे तर आसपास एखादें मोठें घनघोर युद्ध चालू असतांनाही कृषिकर्म करणारा वर्ग आपापल्या शेतीच्या उद्योगांत गर्क झालेला असे; हें पाहून मॅगॅस्थेनीसला अतीशय आश्चर्य वाटलें; आपल्या राज्यांतील या शेतकीच्या धंद्यांस उत्तेजन देण्याकरितां,व रयतेच्या सुखसगवडी करितां चंद्रगुप्तानें पाट बांधाऱ्याचें एक स्वतंत्र खातें निर्माण केलें होतें; या खात्याकडून लोकांच्या जमीनीची मोजणी होत असे, आणि पाटपाण्याचा सर्वांनां सारखा फायदा मिळावा म्हणून वेळच्यावेळीं पाणी सोडण्याच्या व बंद करण्याच्या कामीं तें खातें अतीशय सावधगिरी बाळगीत असे. याच साम्राटानें काठेवाडांतील गिरनार पर्वताच्या शेजारीं सुदर्शन या नांवाचा एक तलाव बांधिला; त्याप्रमाणेंच चंद्रगुप्ताचा मेहुणा, साम्राज्यांतील पश्चिम प्रांताचा प्रतिनिधी असतां, त्यानेंही गिरनार पहाडाच्या पूर्व बाजूस असलेल्या एका ओढ्याचें पाणी अडवून एक बंधारा बांधिला; चंद्रगुप्तानंतर पुढील काळांत अशोकाच्या कारकीर्दींत तुशास्फ या नांवाच्या त्याच्या प्रतिनिधीनें या बंधाऱ्यांत मुबलक पाणी आणून सोडण्या करितां पाट बांधिले; पुढें चारशें वर्षांनी, इ० सन १५० या वर्षी एक मोठा जलप्रलय होऊन तो मोडून गेला; त्या नंतर चवथा क्षत्रप अथवा महाक्षत्रप रुद्रदामा यानें त्याची दुरस्ती केली; परंतु तो ही पुढें पडून गेला असून या संबंधीं गिरनारच्या पहाडावर लेख उपलब्ध आहे; या वरून, शेतीच्या अभिवृद्धि विषयीं ज्या अर्थी हे राज्यकर्ते इतकी काळजी घेत असत त्या अर्थी शेतकीस अत्यावश्यक असणारे बैल, व त्यांची मुबलक पैदास करणाऱ्या गाई, यांच्या संबंधीही ते तशीच काळजी घेत असले पाहिजेत हें उघड आहे. चंद्रगुप्ताच्या वेळीं तत्ववेत्ते, याज्ञिक, ज्योतिषी वगैरे

लोकांना सरकारांतून आश्रय व नेमणुका मिळत असून त्यांचे सिद्धांत व भाकितें खरी खोटी ठरतील त्याप्रमाणें त्यांनां इनाम अथवा शासन देण्यांत येत असे; त्या प्रमाणेंच प्रसिद्ध व निष्णात कारागीर, आणि आरमारी खात्याकरितां उत्तम प्रकारची जहाजें बांधणारीं तज्ज्ञ माणसें, यांनां सरकारांतून वेतन मिळत असे. हत्ती, घोडे, वगैरे वापरण्यास परवानगी लागत असे. रस्ता दुरस्तीच्या कांमावर अधिकारी नेमलेले असत; व ते दुरस्त ठेवण्याची जबाबदारी त्या अधिकाऱ्यांवर असे; या रस्त्यावर दर अर्ध कोसावर खांब असून पाटलीपुत्र या राजधानीच्या शहरा पासून थेट वायव्य सरहद्दी पावेतों एक मोठा रहदारीचा रस्ता बांधिलेला होता; व तो सुस्थितींत ठेविलेला असून त्यावर ही योग्य अधिकाऱ्यांची पूर्ण देखरेख होती.

चंद्रगुप्ताचा ब्राह्मण प्रधान चाणाक्य यानें "राजनीति"-या ग्रंथास, चाणाक्य राजनीति, आर्य राजनीति, आर्य चाणाक्यानीति अथवा अर्थ शास्त्र अशीं ही निरनिराळीं नांवें आहेत-या नांवाचा एक राजनीतिपर ग्रंथ प्राचीन ग्रंथांचे आधार घेऊन लिहिलेला असून इ. सन ११५० मध्यें अबू शहाबाद या नांवाच्या एका मनुष्यानें त्याचें पार्शियन भाषेंत भाषांतर केलेलें आहे; व त्या नंतर त्याचें इतर निरनिराळया युरोपियन भाषांत व इंग्रजींतही रूपांतर झालेलें आहे; ( प्रोफेसर आर. रामशास्त्री बी. ए. बंगलोर कालेज कृत चाणाक्याच्या अर्थ शास्त्रांचें इंग्रजीं भाषांतर पहा; ) त्यांत ग्रथित केलेल्या-राज नीतीच्या अनेक तत्वांपैकीं कांहीं उदाहरणा दाखल पुढें दिलीं आहेत; तो म्हणतोः—राजास सल्ला मसलत देण्या करितां बारा अथवा सोळा प्रधानांचे एक मंडळ असे; परंतु ब्राह्मणाच्या अभिप्रायास राजा विशेष मान देत असे; राजद्रोहाच्या गुन्ह्याशिवाय ब्राह्मणांना देहांत शिक्षा देण्यांत येत नसे; व इतर भारी स्वरूपाच्या गुन्ह्याबद्दल त्यांच्या तोंडावर डाग देऊन त्यांना हद्दपारीची अथवा जन्मभर खाणीवर काम करीत राहण्याची शिक्षा देण्यांत येत असे;—मनूच्या धर्मशास्त्रांतही अशाच आशयाचा नियम आहे; व तो नियम—म्हणजे ब्राह्मणानें कितीही मोटा गुन्हा केला असला तरी सुद्धां त्यास देहांत शिक्षा न देण्याच्या बाबती पुरता नियम—ब्रिटिश सरकारानें इ० सन १८१७ मध्यें रद्द केला आहे.—चाणाक्य म्हणतोः—आसपासच्या राजे रज-

वाड्याशीं नेहमीं सख्य असणें, किंवा राहणें, अशक्य आहे; म्हणून जो बलवान् असेल त्यानें दुसऱ्यास जिंकावें; कारण आत्मबलाशिवाय सुरक्षितपणा मिळणें शक्य नाहीं; व राजकारणात बलाशिवाय दुसरी नीति ही नाहीं; त्या प्रमाणेंच युक्ति व भेद या दोन्हीं ही गोष्टी राजकारणांत आवश्यक आहेत, म्हणून राजानें हेर ठेवून त्यांची सर्व राजकाजांत नेहमीं अत्यंत मदत घेत राहिलें पाहिजे.

गुप्तहेरः—या काळांत गुप्त हेरांचें काम करण्याकडे कसबिणीचा धंदा करणाऱ्या स्त्रियांचा उपयोग केला जात असे; यासंबंधानें बरेच नियम केलेले आढळतात; त्या प्रमाणेंच गुप्त बातम्या आणणाऱ्यांना विशेष मुभा अथवा सवलती दिल्याचाही उल्लेख आढळतो.

विक्रीवरील करः—तटबंदीच्या शहरांत मालाच्या विक्री प्रमाणें कर घेतला जात असे; धान्य, गुरें, व आणखी कांहीं जिनसा, याशिवाय करूनच्या बाकी सर्व जिनसा, जकातीच्या नाक्यावर विकाव्या लागत असत; परगांवचे आयात मालावर, शेंकडा वीस टक्के, या प्रमाणें कर असे. तथापि पुष्कळ जिनसांवर शेंकडा चार ते सहा टक्के कर असे; व जड जवाहिरांवरील कराचे दर बरेच अधिक प्रमाणांत असत.

खाने सुमारी खातें:—या खात्यावर " नागरक " या नांवाचा एक अधिकारी असे; व त्याच्या हद्दींत जीं नवीं माणसें येतील, अथवा गांवांतील व इतर परगांवीं जातील, त्यांची नोंध करण्याचें काम त्याच्याकडे असे; शिवाय प्रत्येक मनुष्याची जात, नांव, अडनांव, धंदा, उत्पन्न, गुरें, खर्च, स्त्री, अथवा पुरुष, वगैरे माहिती गोळा करण्याचें, व ती संग्रहित करून ठेवण्याचें कामही त्याच्याकडेसच सोंपविण्यांत येत असे.

खोटी माहिती देणें:—खोटी माहिती देण्याबद्दल अथवा दिल्याबद्दल, चोरीच्या गुन्हया प्रमाणेंच, शरिराचा एखादा अवयव तोडणें, ही शिक्षा देण्यात येत असे.

मद्य बिक्रीः—मद्य विक्री साठीं परवाने घ्यावे लागत असत; आणि परदेशातून येणाऱ्या मद्यावर विशेष कर ठेविलेले असत; दारूच्या दुकानांत गिऱ्हाइकास बसण्या करितां पलंग, खुर्च्या वगैरे सोई कराव्या लागत, आणि ऋतूमाना प्रमाणें शेगड्या, पंखे, सुवासिक फुलें, अत्तरें, वगैरे जिन्नस सुद्धां दुकानांत ठेवावे लागत असत.

राजकर्तव्यः—राजानें आपलें कर्तव्य अत्यंत दक्षतेनें केलें पाहिजे; त्याला विसावा फारच थोडा मिळणें शक्य आहे; देव, ब्राह्मण, क्षेत्रें, अज्ञान, वृद्ध, स्त्रिया, दुःखी व निराश्रित, या सर्वांचें काम त्यानें स्वतःच केलें पाहिजे; त्या प्रमाणेंच धर्माविरुद्ध अथवा धर्मबाह्य आचरण करणाऱ्या लोकांवरही त्यानें स्वतःच नजर ठेविली पाहिजे. राजानें, राज्यव्यवस्थेकरितां निरनिराळीं अठरा खातीं निर्माण केली पाहिजेत, व त्या पैकीं प्रत्येकावर त्यानें एक एक वरिष्ट अधिकारी नेमिला पाहिजे.

राज्यनिधीः—राजानें आपल्या राज्याच्या निधीकडे विशेष काळजीनें लक्ष देत राहिलें पाहिजे.

शेतकीः—राजानें राज्याच्या शेतीकडे विशेष लक्ष देत राहिलें पाहिजे. व शेतकी खात्यावर ही स्वतंत्र अधिकारी नेमिले पाहिजेत; या शेतकी खात्याच्या अधिकाऱ्याचें काम हल्लींच्या काळांतील मोजणीच्या व प्रतिबंदीच्या अधिकाऱ्यांच्या कामाप्रमाणेंच असून, बागाईत व जिराईत असे जमीनीचे दोन निरनिराळे प्रकार असत; व त्या त्या वर्गांतील जमीनीच्या मगदुरा प्रमाणें सारा ठरविण्यांत येत असें; शेतसाऱ्या शिवाय दुसरे ही अनेक कर असून शेताच्या उत्पन्ना पैकीं, राजानें चवथा भाग घ्यावा, असें ठरलेलें असे; त्या प्रमाणेंच लोकांच्या हिताकरितां जो मनुष्य राज्याच्या स्वाधीन पुष्कळ संपत्ति करील, त्यास राजानें मानाच्या पदव्या द्याव्या, असा नियम असे.

शासन पद्धतिः—राजाचें काम दुष्टास शासन करणें. हें आहे. या शिक्षा फार कडक असत; उदाहरणार्थ, आठ किंवा दहा पणांची—म्हणजे सहा किंवा साडेसात रुपयांची—चोरी केल्यास, त्यास देहांत शिक्षा देण्यांत येत असे; शिवाय गुन्हेगाराकडून गुन्ह्याची कबूली करून घेण्याकरितां त्यास मारहाण करणें ही सशास्त्र मानण्यांत येत असे.

वेतन पद्धतिः—वरील बाबतीं शिवाय, या ग्रंथांत सर्वांच्या वेतनाचे आंकडे दिलेलें असून युवराजाचें वेतन दरसाल अठ्ठेचाळीस हजार रौप्यपण-एक पण म्हणजे अजमासें बारा आणे या हिशोबानें छत्तीस हजार रुपये-व मजुराचें वेतन दरसाल साठ पण-म्हणजे पंचेचाळीस रुपये-ठरलेलें होतें; आणि सम्राट चंद्रगुप्ताची एकदर राज्यव्यवस्था वरील पद्धतीस अनुसरून घडविलेली होती.

साम्राट चंद्रगुप्त प्रमाणेंच, साम्राट अशोक व समुद्रगुप्त यांच्या ही नमुनेदार राज्य कारभाराबद्दल मागें विवेचन केलेलेंच आहे; तथापि त्याही बाबतींत व्हिन्सेंट स्मिथच्या शब्दांतच थोडासा अधिक खुलासा या ठिकाणीं करणें इष्ट आहे. अशोकाच्या साम्राज्या बद्दल तो म्हणतो:—अशोकाच्या साम्राज्यांत अफगाणिस्थान, हिंदूकुश पर्वताच्या दक्षिणे कडील प्रदेश, सिंध, बलुचिस्थान, काश्मीर व नेपाळ, व हिमालय पर्वताच्या उतरणी वरील प्रदेश, यांचा समावेश होत असून अगदीं दक्षिण टोंका शिवायच्या सर्व प्रदेशाचा त्याच्या साम्राज्यांत समावेश होत होता;...अशोकाच्या वेळीं वास्तु विद्या उच्चावस्थेस पोहोंचली होती; त्याप्रमाणेंच नक्षी वगैरे कला कुसरीचें काम ही पूर्णत्वास गेलेलें होतें; मोठमोठ्या इमारतीवर नाना प्रकारच्या वेलपत्या वगैरे असून नक्षी कामें कोरून त्या शोभिवंत करीत; आणि मनुष्यांचे व पशुपक्ष्यांचे पुतळेही फारच सुबक तयार करीत असत;......साम्राज्याच्या फार दूरच्या प्रदेशांतही जमीनीला पाण्याचा पुरवठा व्हावा, म्हणून अतीशय परिश्रम घेतले जात; यावरून शेतकीच्या जमीनीला पाण्याचा पुरवठा करणें हें आपलें एक विशिष्ट कर्तव्य आहे, असे मौर्य साम्राट समजत असत; व ( मॅगॅस्थनीसच्या म्हणण्याप्रमाणें ) इजिप्त देशाप्रमाणेंच येथेंही सरकारी अधिकारी जमीनीची मोजणी करून प्रत्येकास त्याच्या त्याच्या वाट्याप्रमाणें बरोबर पाणी मिळतें कीं नाहीं हें पहात असत, हें उघड आहे;

महाभारत व रामायणांतील राज्यपद्धति, व राजनीति यांचें वर्णन लक्षांत घेऊन-चाणाक्याची राजनीति, अथवा चंद्रगुप्त, अशोक, समुद्रगुप्त वगैरे साम्राटांची राज्यपद्धति यांचें निरिक्षण करून-आणि इतरही ऐतिहासिक उपलब्ध माहिती आधारभूत धरून, असें सिद्ध करून दाखविता येईल कीं, हिंदुस्थानांत पूर्वकाळीं ज्याप्रमाणें निव्वळ राजसत्ताक पद्धति चालू होती, त्याप्रमाणेंच अल्पजन सत्ताक राज्यपद्धति ही रूढ होती; व हीच गोष्ट मि. व्हीस डेव्हिस, व्हिन्सेंट स्मिथ, डाक्टर सर भांडारकर, मि. मॅक क्रिंडल, वगैरेंच्या लेखावरून ही स्पष्ट होते; उदाहरणार्थ, कपिल वस्तू येथें शाक्य लोक "संथागार" या नांवाच्या एका सार्वजनिक दिवाणखान्यांत आपला कारभार व न्याय करण्याचें काम करीत; त्यावेळीं वृद्ध, तरुण वगैरे सर्व लोक तेथें हजर असत; आधिवेशनाच्या प्रसंगीं, अथवा आधिवेशन नसेल तर राजकाजासाठीं एक मुख्य अधिकारी

निवडला जाई, व तो "राजा" ही पदवी धारण करी. ही पदवी रोमन कौन्सल किंवा ग्रीक अरकान याला समानअर्थी आहे. त्या प्रमाणेंच प्राचीन बुद्ध लेखांवरून असें ही सिद्ध झालें आहे कीं, सामर्थ्यवान एकतंत्री राज्यांच्या बरोबरीचींच कांहीं लोकतंत्री राज्येंही त्या काळीं अस्तित्वांत होतीं; व तीं पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेत होतीं; या बुद्ध लेखांना त्या नंतरच्या जैन लेखांनीं ही पुष्टी दिलेली असल्यानें त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. (ऱ्हीस डेव्हीस.) त्या प्रमाणेंच पंजाब, पूर्व राजपुताना, व माळव्यांतील बहुतेक भाग अशाच प्रकारच्या प्रजासत्ताक राज्यांच्या ताब्यांत होता; शिवाय इ. सन १८९८ मध्यें बंगाल ॲशिएटिक सोसायटीचे अध्यक्ष डाक्टर होर्नूल यानें जैन धर्मावर जें एक व्याख्यान दिलें, त्यांत त्यानें जैन धर्माचा संस्थापक महावीर हा एक अल्पजनसत्ताक राज्यांत जन्मला होता, असें विधान केलें आहे. अल्पजन सत्ता, हा, राजसत्ता, व लोकसत्ता, यांच्या मधील दुवा आहे; वैशाली येथें अल्पजन सत्ताक राज्य पद्धति चालू होती; व तिचें नियंत्रण क्षत्रीय जातींतील पुढारी मंडळांच्या हाती होतें "कांहीं राज्यावर राजे लोक स्वतःच राज्य करीत असत, व कांहीं ठिकाणीं लोक सत्ता राज्य चालवित असे; उदाहरणार्थ, महाभारतांत वृष्णींनीं असेंच अल्पजन सत्ताक राज्य स्थापन केलें होतें, व त्यांचें एक पुढारी मंडळ असून कृष्ण हा ही त्यांतील एक प्रमुख होता; त्याकालीं भारत वर्षांत कोणत्याना कोणत्या रूपानें लोक तंत्री संस्था अस्तित्वांत होत्या, ही गोष्ट निर्विवाद आहे; त्या प्रमाणेंच कुमार गुप्त व बंधुवर्धन यांच्या मंदोसर येथील शिला लेखा वरून, मालव देशांत लोक सत्ताक राज्यपद्धति चालू होती, असें दिसून येत आहे. शिवाय अम्बस्ट लोक हे ज्या नगरांतून रहात होते, तेथें ही लोकतंत्री राज्यकारभार चालत असून करटियसनें ही "सबरकाई" (Sabarcae) या नांवाच्या एका शक्तिसंपन्न जातीचा उल्लेख केलेला आहे; त्या ठिकाणीं हीं लोक सत्ताक राज्यपद्धति; रूढ होती, आणि मल्लोईनी जेव्हां शिकंदर बादशहाचें वर्चस्व मान्य केलें, त्या वेळीं त्यांनीं त्यास असें स्पष्ट बजाविलें होतें कीं, स्वराज्य व स्वातंत्र्य यांजवर आमचें अत्यंत प्रेम असून हिंदुस्थानांत डायोनिदस आल्यापासून तो शिकंदरच्या स्वारीपर्यंत आम्ही आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण केलेलें आहे शिवाय (Pablic Admi-

nistration in Ancient India. By P. Bannerjee हें पुस्तक पहा.) असाही उल्लेख आढळतो कीं, अल्पजन सत्तेचें अत्यंत उत्कृष्ट उदाहरण म्हणजे लिच्छवीस यांचें असून त्यांतील सर्व पुढाऱ्यांस "राजा" ही संज्ञा असे; त्या प्रमाणेंच आर्यांमध्यें त्यांच्या युरोपियन बांधवाप्रमाणेंच स्वतंत्र राजकीय संस्थाबद्दल उपजतच आवड होती; आणि प्रजातंत्री राज्यांच्या अस्तित्वाबद्दल बौद्ध धर्मीय पाली ग्रंथांतूनही बरेच उल्लेख आलेले आहेत.

हिंदुस्थानांतील पूर्वकालीन समुद्रगुप्ताच्या साम्राज्याचा विस्तार केवढा मोठा होता, याबद्दल व्हिन्सेंट स्मिथ यानें असें लिहिलें आहे कीं, "चवथ्या शतका मध्यें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व सुपीक व लोकवस्तीनें गजबजलेला प्रदेश समुद्रगुप्ताच्या राज्यांत होता; त्याच्या साम्राज्याचा विस्तार, पूर्वेस हुगळी नदी-पासून पश्चिमेस चंबळा नदीपर्यंत, आणि उत्तरेस हिमालय पर्वताच्या पायथ्यापासून तो दक्षिणेस नर्मदा नदीपर्यंत, झालेला होता; व सहाव्या शतकापूर्वी अशोकाच्या अमलाखालीं जेवढें साम्राज्य होतें, त्याहून पुष्कळच पटीनें मोठें, असें त्याचें साम्राज्य होतें; म्हणून स्वाभाविकरित्याच त्यास समुद्रगुप्त असें नांव मिळालेलें होतें. गांधार, आणि काबूलचा राजा कुशान, आक्सस्चा राजा, आणि सिलोन व इतर दूरस्थ द्वीपें, यांच्याशीं त्या साम्राज्याचें राजकीय दळण वळण होतें. अशा व्यापक साम्राज्या प्रमाणेंच, हिंदुस्थानांत मोठमोठाली व्यापक, भरभराटींत असलेलीं, व लोक वस्तीनें गजबजलेलीं, शहरें ही होतीं; पाटलीपुत्र उर्फ पाटणा, अवंती उर्फ उज्जयनी, कनोजनगर, उर्फ कनोज हीं शहरें अतीशय मोठीं व लोकवस्तीनें गजबजलेलीं असून मॅगॅस्थनीसच्या म्हणण्या प्रमाणें, कनोज शहराची लांबी साडेतीन मैल असून रुंदी पाऊण मैल होती; त्याच्या सभोंवतीं खंदक व चांगले बुरूज होते; तेथील सरोवरांचें व तला-वांचें पाणी स्फटिका प्रमाणें स्वच्छ व तेजस्वी असून त्यांच्यांत पडलेल्या लता पुष्पांच्या प्रतिबिंबामुळें तर तें फारच मनोहर दिसत होतें. त्या शहरांत निरनिराळ्या अतीशय मौल्यवान पदार्थांची देवघेव चालत असे, त्यामुळें तेथें सर्व ठिका-णचा माल येत असे; तेथील लोक अत्यंत सुखी व संतुष्ट असून त्यांची निवास स्थानें फारच रमणीय असत, व फल पुष्पांची तर तेथें समृद्धीच असे; याच कनोज शहरा बद्दल आणखी असा ही उल्लेख आढळतो कीं, या ठिकाणीं नुसती पान सुपारी विकण्याचीच निदान तीस हजार दुकानें होतीं, व साठ हजार गायन

वादन करणारे लोक त्या शहरांत वास्तव्य करीत होते. ( Historical Reserches Vol. II पान २२० पहा. )

हिंदुस्थानांतील पूर्व कालीन नमुनेदार राज्य व्यवस्थेचा-ज्या राज्यव्यवस्थेचा वर थोडक्याशा खुलाशानें उल्लेख केला आहे त्या राज्यव्यस्थेचा-बाह्य प्रदेशीही विशेष लौकिक पसरलेला होता; आणि इराणचा प्रसिद्ध व न्यायी बादशाहा नौशरवन याचा नामांकित प्रधान बझरचामेहर हा हिंदुस्थानांत राजकीय ज्ञान व शिक्षण मिळविण्या करितां येऊन, व येथेंच त्या विषयांत प्रविण्य संपादन करून, पुढें इराणात तो प्रसिद्ध मुत्सद्दि म्हणून नांवाजला गेला होता, असा उल्लेख आढळतो; त्या प्रमाणेंच या देशांतील पूर्व कालीन वाग्मय, अनेक निरनिराळया विषयांचे मोल्यवान व मननीय ग्रंथ, व त्यांत हिंदू लोकांनीं मिळविलेलें प्रविण्य,या विषयीं मागें वेळों वेळीं थोडक्यांत उल्लेख आलेला आहेच तथापि त्या बाबतींत ही या ठिकाणीं आणखीं थोडेसें अधिक विवेचन करणें आवश्यक आहे; या ठिकाणीं पहिल्यानें ही गोष्ट दिग्दर्शित केली पाहिजे कीं, प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-एन-त्संग हा हिंदुस्थानांत आल्यावर पांच वर्षें नालंद येथें राहून त्यानें, योगशास्त्र, न्यायानुसार शास्त्र, अभिधर्मशास्त्र, हेतुविद्याशास्त्र, व शब्दविद्याशास्त्र, वगैरे शास्त्रांचा आपण अभ्यास केल्याचें नमूद केलें आहे; म्हणजे वांग्मयाच्या अनेक विषयांपैकीं वरील विषयांच्या नैपुण्यांत हिंदुस्थान अग्रगण्य म्हणून गणला गेला होता, हें उघड आहे; वरील शास्त्रांशिवाय इतरांसंबंधीं पाहतां असें निदर्शनास येतें कीं, प्राचीन हिंदू लोकांनीं गणितशास्त्र,—ज्योतिषशास्त्र, व भूमितिशास्त्र, ह्या कलाही पूर्णतेस नेल्या होत्या; त्यांनीं आकाशाचें अवलोकन करून, व चंद्राची गती निरिक्षण करून त्याच्या मार्गावरील अठ्ठावीस तारका पुंजास निरनिराळीं नांवें दिलीं, व अशा रीतीनें ज्योतिष शास्त्र निर्माण केलें. यास त्यांनीं "चंद्रांची गृहें" अशी संज्ञा दिली,व पौर्णिमेच्या दिवशीं ज्या तारका पुंजांत चंद्र असे, त्याच्या नांवा वरून त्यांनीं वर्षांतील बारा महिन्यांनां बारा नांवें दिली; आणि आकाशांतील ग्रहांचे व नक्षत्रांचें वेध घेण्या करितां त्यानंतर जयपूर, मथुरा, काशी, उज्जयनी, तक्षशीला वगैरे ठिकाणीं वेधशाळा स्थापन केल्या. त्या प्रमाणेंच त्यांनीं अंकाचा म्हणजे गणित शास्त्राचा अभ्यास करून "दशक पद्धती" शोधून काढिली, व ही पुढें पाश्चिमात्य राष्ट्रांत पसरली.

त्या प्रमाणेंच यज्ञातील स्थंडिलें, व वेदिका यावरून कल्पना असवून त्यांनीं भूमिति शास्त्र निर्माण केलें; वरील शास्त्रां प्रमाणेंच प्राचीन हिंदूंनीं तत्वज्ञान ही निर्माण करून, त्याची निरनिराळीं सहा अंगें सहा ऋषींनीं ग्रंथित केलीं.

या सहा पद्धति पैकीं पहिली म्हणजे "सांख्य पद्धति" ही असून ती कपिल मुनीनें निर्माण केली; या पद्धतींत, स्वतःस जें प्रत्यक्ष दिसेल, अथवा मानवी दृष्टी, मन, अथवा बुद्धी, यांना जें दृग्गोचर होईल, तेवढेंच मात्र विश्वास ठेवण्यास योग्य आहे, असें त्यानें प्रतिपादन केलें; म्हणजे वेदांत सांगितलेल्या गोष्टी, व ईश्वराचें आस्तित्व, हें या सांख्य पद्धतीस मान्य नव्हतें; तर सर्व काळीं असणाऱ्या, म्हणजे चिरकाल अथवा नित्य, अशा द्रव्या पासून हें दृश्य जग आपोआप उत्पन्न झालें असून सृष्टी व आत्मा या दोन गोष्टीसच खरें अस्तित्व आहे, व याच दोन गोष्टी आतांपर्यंत सदोदित अस्तित्वांत असून पुढेंही अस्तित्वांत रहातील, मनुष्याचा आत्मा हा कांहीं काळ शरिरांत असतो, व नंतर त्याच्या पाप पुण्य वगैरे कर्मानुसार तो उच्च नीच प्राण्याच्या अथवा वनस्पतीच्याही शरिरांत प्रवेश करितो; आणि जर हाच आत्मा पूर्ण ज्ञानी झालेला असला तर तो पुन्हां कोणत्याही शरिरांत प्रवेश न करितां आत्मरूपानें स्वतंत्र असाच राहतो, असें या सांख्य पद्धतीचें मत होतें.

त्यानंतर दुसरी म्हणजे "योग पद्धति" ही असून ती इ. सनापूर्वी २०० च्या सुमारास पातंजली यानें निर्माण केली. महा आदिकरण, अथवा परमात्मा हा एकच असून त्याच्यापासूनच जगांतील सर्व वस्तूंची उत्पत्ति झाली आहे; त्यामुळें इतर कोणत्याही गोष्टीचा विचार करण्याचें सोडून देऊन फक्त परमेश्वरा विषयींच विचार करीत राहिल्यास मानवी आत्मा जड शरिराच्या ससर्गा पासून मुक्त होऊन ईश्वराशीं तादात्म होतो, असें या योगपद्धतीचें मत होतें.

त्यानंतर तिसरी म्हणजे "तर्कशास्त्र–"अथवा "न्यायशास्त्र–पद्धति;" ही गौतमानें निर्माण केली. कोणत्याही वस्तू संबंधीं तर्क कसा करावा, आणि असा तर्क करून वस्तूचें ज्ञान कसें करून घ्यावें, या विषयीं या पद्धतींत विचार केलेला आहे; शिवाय सर्व पदार्थांची उत्पत्ति परमेश्वरा पासून झालेला आहे, परंतु आत्मा हा अनादि असून जेव्हां तो पूर्ण ज्ञानी होईल, तेव्हांच त्याचा शरिराशीं

असलेला संबंध नष्ट होईल, व तो सदोदित आत्म स्वरूपांत वास्तव्य करीत राहील, असें या तर्कशास्त्र पद्धतीचें मत होतें.

त्यानंतर चवथी म्हणजे "वैशेषिक पद्धति;" ही कणाद यानें निर्माण केली; त्याचें मत कपिल मुनी प्रमाणेंच—म्हणजे एकदां आत्मा पूर्ण ज्ञानी झाला, म्हणजे तो पुन्हां कोणत्याही शरिरांत प्रवेश न करितां आत्मरूपानें स्वतंत्र असाच राहतो हें—आत्म्या विषयीं असून जग हें अनेक परिमाणू अथवा सूक्ष्म भाग यांच्या पासून उत्पन्न झालेलें आहे, आणि तें अनादि व विकाररहित असून शृष्टींत मात्र नेहमीं बदल होत असतो, असें या वैशेषिक पद्धतीचें मत होतें.

त्यानंतरच्या बाकीच्या दोन पद्धति, म्हणजे पूर्व मिमांसा व उत्तर मिमांसा या होत; या दोन्हीं ही पद्धति वेदांत सांगितलेल्या गोष्टीस अनुसरून असल्यामुळें त्यांना "वेदांत पद्धति" असें ही सर्व साधारण नांव मिळालेलें आहे; या पैकीं पूर्व मिमांसा—अथवा पांचवी पद्धति-ही जैमिनीनें निर्माण केली; या पद्धतींत परमेश्वरा विषयीं कांहींच उल्लेख केलेला नाहीं; तर वेदांतील आज्ञा प्रमाण मानून त्या प्रमाणें आचरण करणें, पूर्वी प्रमाणें प्रार्थना करणें, व स्तोत्रें म्हणणें, व त्यांत अनुवादिलेल्या आज्ञा प्रमाण मानून त्याप्रमाणें यथाविधी यज्ञयागादि कर्में आचरणें, हें या पद्धतिचें मत आहे; या पैकीं दुसरी—आणि सहावी व शेवटची-पद्धति म्हटली म्हणजे "उत्तर मिमांसा" ही असून ती बादरायण व्यासानें निर्माण केली आहे; त्यांत उपनिषधांतील तत्वें ग्रथित केलेलीं आहेत; आणि सर्व पदार्थ-मग ते सचेतन असोत किंवा अचेतन असोत—परमेश्वरा पासूनच उत्पन्न झालेले असून अखेरीसही ते परमात्मा स्वरूपींच एकजीव होणार आहेत, आणि तसें झाल्यावर सर्वच ब्रह्ममय म्हणजे ईश्वर स्वरूपी होणार आहे; म्हणून मनुष्यमात्रानें त्या परमेश्वराचेंच अनन्य भावानें चिंतन, पूजन, व अर्चन, करीत राहिलें पाहिजे; शिवाय, ज्या प्रमाणें विस्तवाची ठिणगी हा मूळ वस्तुत: अग्नी अथवा अग्नीचाच अंश आहे, त्या प्रमाणेंच मनुष्याचा आत्मा हाही परमेश्वराचाच अंश असून तो एका जीवांतून दुसऱ्यांत संक्रमण करीत असतो, व आत्म्यांत सर्व गुणांचा उद्भव होऊन तो पूर्ण ज्ञानी झाला, म्हणजे परमेश्वर स्वरूपीं तदाकार होतो; असें या पद्धतीचें मत आहे. या पद्धतीत आत्मा व द्रव्य—हीं भिन्न भिन्न मानिलेली नसून वास्तविकरित्या एकाच परमवस्तूची म्हणजे ईश्वराची निर-

निराळीं स्वरूपें आहेत, असें प्रतिपादन केलेलें आहे; त्यामुळें तिला "अद्वैत-पद्धति" असेंही नामाभिधान प्राप्त झालेलें आहे.

हिंदू लोकांच्या वरील प्रकारच्या एकंदर बहुविध तत्वज्ञान शास्त्राची प्रोफेसर मॅक्स मुल्लर यानें अतीशय प्रशंसा केलेली असून "हिंदू लोक हे तत्व-वेत्त्यांचें राष्ट्र होतें," असे उद्गार काढिले आहेत; त्या प्रमाणेंच प्रसिद्ध ग्रीक तत्ववेत्ता पिथेगोरास हा सहाव्या शतकाच्या सुमारास हिंदुस्थानांत तत्वज्ञानाचा अभ्यास करण्याकरितां आला होता; त्यानें इकडे असल्यावेळीं हिंदू लोकांच्या तत्वज्ञानाचें मोठ्या बारीक रीतीनें निरिक्षण केलें; आर्यांचे कांहीं सिद्धांत ग्राह्य आहेत ही गोष्ट त्यानें मान्य केली, व तसें त्यानें आपल्या ग्रंथांतही दिग्दर्शन केलें; इकडे असल्या वेळीं त्यानें पुनर्जन्म, ब्रह्म, अहिंसा, वगैरे विषयांचे व सूत्र ग्रंथाधारानें सिद्धांत शास्त्राचे, उत्तम ज्ञान मिळविलें; त्या प्रमाणेंच सातव्या शतकांतील ग्रीक इतिहासकार हेरोडोटस यानेंही आपल्या ग्रंथांत, हिंदू लोक, व वाग्मय वगैरे संबंधीं बरीच उपयुक्त माहिती ग्रंथित केलेली आहे. या शिवाय हिंदू लोकांच्या या उच्च प्रकारच्या तत्वज्ञानाबद्दल इतरही अनेक विद्वान लोकांनीं अतिशय अभिनंदनपर उद्गार काढिले आहेत.

हिंदू लोकांच्या प्राचीन वैद्य शास्त्रा संबंधानें पाहतां मनूनें हिंदूधर्म शास्त्रांत आरोग्याचे महत्वाचे नियम ग्रंथित केलेले असून, सुश्रत, चरक, नागार्जुन, व इतर अनेक विद्वान मंडळी, यांचे वैद्यकावरील ग्रंथ आजही लोकमान्य आहेत. हिंदुस्थानांत वैद्यकी प्रमाणेंच शस्त्रक्रियाशास्त्रही पूर्णपणें अवगत होतें, व त्यांत पूर्वकालीन हिंदू वैद्य मोठे धीट व निष्णात होते; ही शस्त्रक्रिया ते शरीरांतील रक्त प्रवाह दाबून बंद पाडून करीत असत; या शस्त्रक्रियेंतही एक निराळी महत्वाची शाखा असून त्यांत कांहीं वैद्य अतीशय निष्णात होते; ते विद्रूप झालेल्या अथवा व्यंगत्व आलेल्या कान व नाक या अवयवांवर शस्त्र-क्रिया करीत असत, आणि त्यांतील व्यंग अथवा विद्रूपता काढून टाकून ते अगदीं पहिल्याप्रमाणें करीत असत; ही अत्यंत महत्वाची कला (Rhinoplasty) गेल्या शतकांत इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत अवगत करून घेतली, व नंतर तिचा युरोपभर प्रसार झाला. ( History of Sanskrit Literature; Page 247 पहा ) मनुष्याप्रमाणेंच जनावरांसंबंधींही वैद्यशास्त्रांत त्याकाळीं हिंदू लोक निष्णात असून

सलोतर या नांवाच्या एका मनुष्यानें या बाबतींत एक महत्वाचा ग्रंथ लिहिला आहे, व या ग्रंथाचें "करत-अल्-मुल्क्" या नांवाचे पर्शियन भाषेंत पुष्कळच पूर्वकाळीं भाषांतर झालेलें आहे. सलोतर हा सुश्रुताचा गुरू असून त्याच्या नांवावरूनच त्या ग्रंथास " सलोतर " हें नांव पडलें, असें म्हणतात. या ग्रंथांचे ११ भाग असून तीस प्रकरणें आहेत, व घोड्यांच्या निरनिराळ्या जाती, त्यांचे निरनिराळे आजार, व त्याबद्दल उपचार, या बद्दलही त्यांत माहिती दिलेली आहे. शिवाय बगदादच्या खलीफांच्या आज्ञेनें हिंदू वैद्यकीच्या अनेक पुस्तकांची अरबी भाषेंत इ० सन ७०० च्या सुमारास भाषांतरें करण्यांत आलीं होतीं; आणि हिंदूलोकांचें हें वैद्यशास्त्र पहिल्यानें हिंदुस्थानांतून अरेबियांत जाऊन नंतर त्याचा युरोपखंडात प्रसार झाला, असा उल्लेख आढळतो.

हिंदुस्थानांतील प्राचीन आर्य लोकांत फार प्राचीन काळापासूनच गणीत-शास्त्र अवगत होतें, ही गोष्ट व्यासाच्या भाष्यसूत्रावरूनही सिद्ध होण्यासारखी आहे, असें म्हणता येईल; प्रसिद्ध पंडित भास्कराचार्य याची वैधव्यस्थितींत आलेली नवबाला कन्या लीलावती हिला शिक्षण देण्याकरितां, व या अनाथ व दुर्दैवी कन्येच्या प्रेमातिशयानें तिचें स्मारक ठेवण्याकरितां " लीलावती " हें नांव देऊन त्यानें एक ग्रंथ निर्माण केला; हिंदूचा हा जुना ग्रंथ—लीलावती-हा अतीशय उपयुक्त व महत्वाचा म्हणून गणला गेला असून, हिंदुस्थानांतील गणीतशास्त्रही पहिल्यानें अरबांनींच या देशांतून अरबस्थानांत नेलेलें आहे; व त्यानंतर या शास्त्राचीं निरनिराळ्या भाषेंत भाषांतरें झालीं आहेत; त्याप्रमाणेंच भूमिती शास्त्रासंबधानें पाहतां त्यांचा पूर्वकाळचा " सूर्यसिद्धांत " हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा म्हणून मानिला गेला असून तो इ० सना पूर्वी दोन हजार वर्षां पूर्वी लिहिला गेला असावा, असा अजमास आहे. वेद कालांत पृथ्वी, जल, तेज, वायू, वगैरे देवतांची स्तुती करून त्यांनां संतुष्ट राखण्याबद्दल सुमुहूर्तावर यज्ञ करावे लागत; त्यामुळें आर्यांनां आकाशांतील नक्षत्रें, व सूर्य चंद्रांची गती, यांचें बारीक रीतीनें अव-लोकन करून यज्ञाला योग्य असा काल ठरवावा लागत असे, यामुळें ज्योतिष शास्त्राची उत्पत्ति झाली; त्या प्रमाणेंच यज्ञ यागादि कृत्यांसाठीं वेदी तयार करण्या संबंधानें वेदांत जें विवेचन केलेलें आहे, त्यावरून रेखागणित उर्फ सिद्धांत निर्माण झाले; थोडक्यांत म्हणजे छंदः शास्त्राचा उगम वेदांतील छंदो-

बद्ध प्रार्थनापर सूक्ता वरून झाला असून या सुक्तां मुळेंच पुढें छंदस् शास्त्र, ज्योतिष् शास्त्र, व रेखा गणित, उर्फ सिद्धांत, निर्माण झाले आहेत, व त्यांतीलच वर वर्णन केलेला प्रसिद्ध, महत्वाचा, व पूर्व काळांतील, सूर्य सिद्धांत हा युरोपियन लोकांच्याही माहितींतील ग्रंथ आहे. या बाबतींत प्रोफेसर विल्यम यानें असे उद्गार काढिले आहेत कीं, बिजगणीत व भूमिती हीं शोधून काढण्याचें, व ज्योतिष शास्त्रांत त्यांचा उपयोग करण्याचें, श्रेय हिंदू लोकांनाच आहे; ( Indian Wisdom; Page 185 पहा. ) शिवाय या संबंधीचा भास्कराचार्याचा " सिद्धांत शिरोमणी " हा ग्रंथही विशेष महत्वाचा असल्याचें अनेक लेखकांनीं मान्य केलें आहे; वरील शास्त्रां प्रमाणेंच ज्योतिष् शास्त्रांत ही हिंदूंचे अनेक ग्रंथ असून त्यांतील नऊ सिद्धांत—म्हणजे १ सूर्य सिद्धांत, २ ब्रह्म सिद्धांत, ३ सोम सिद्धांत, ४ ब्रहस्पती सिद्धांत, ५ गार्ग्य सिद्धांत, ६ नारद सिद्धांत, ७ पाराशर सिद्धांत, ८ पुलस्ती सिद्धांत, आणि ९ वशिष्ट सिद्धांत, हे नऊ सिद्धांत—विशेष प्रसिद्ध आहेत; या सर्वांत, सूर्य सिद्धांत हा जुना व युरोपियन लोकांच्या विशेष माहितींतील आहे. आठव्या शतकांत अरब लोक हे हिंदू लोकांचे निरनिराळया शास्त्रांतील विद्या अवगत करण्या करितां शिष्य बनले; त्यामुळें त्यांनीं या सर्व सिद्धांतांचें अरबी भाषेंत भाषांतर केलें; बगदादचा प्रसिद्ध खलीफा हरून्-अल्-रशीद आणि अलममन् यांनीं हिंदू ज्योतिष शास्त्रवेत्त्यांनां उत्तेजन दिलें; त्यांनां बगदाद येथें नेलें; आणि त्यांच्या ग्रंथांची अरबी भाषेंत भाषांतरें करविलीं; पाराशर मुनी हा निष्णात, व प्रसिद्ध ज्योतिषी असून त्या शास्त्राची त्यानें महत्वाची प्रगती घडवून आणिली; पाराशरा नंतर आर्य भट्ट या नांवाचा एक तसाच माननीय ज्योतिषी निर्माण झाला; व त्यानें आर्य भट्टिका, दासगीतिका वगैरे, ज्योतिष शास्त्रा वरील महत्वाचे ग्रंथ निर्माण केले; त्या नंतर वराह मिहीर या नांवाचा एक निष्णात ज्योतिषी निर्माण झाला, व त्यानें ब्रहत् संहिता, ब्रहज जातक, पंच सिद्धांत, वगैरे ज्योतिष शास्त्रा वरील महत्वाचे ग्रंथ निर्माण केले; व त्या नंतर भास्कराचार्य पंडित निर्माण होऊन त्यानें तर हें शास्त्र विशेषच प्रसिद्धीस व पूर्णत्वास नेऊन पोहांचविलें; शिवाय फल ज्योतिषा संबंधीं मुहूर्त मार्तंड, रत्नकोश, मुहूर्त चिंतामणी, मुहूर्त सिंधू, ज्योतिर्विदा भरण, सारा वली, वगैरे व संवत्सर, फल पद्धति, संबंधानें कल्पकता, राजावली, जगन्मोहन, नरेंद्र वली, समय सिद्धांजन, वगैरे ग्रंथ, आर्यांनीं निर्माण केले असून स्वरोदय व सारो-

द्वार हे शकुना संबंधीचे ग्रंथ एका जैन लेखकानें निर्माण करून त्या विद्येच्या प्रगतींत मौल्यवान भर घातली आहे.

पूर्वकाळीं हिंदु लोकांना शास्त्रीय लष्करी ज्ञान अवगत होते, अशा बद्दल महा भारतात अनेक उल्लेख आहेत; हिंदू लोकांचें, शौर्य व धैर्य, याबद्दल इतिहासांत अनेक उदाहरणें आहेत; हिंदू लोकांची दिव्य राजनिष्ठा, आणि इमानी वागणूक, याबद्दल इतिहास अनेक दाखले दाखवीत असून त्यांत पन्ना दाई सारखी स्त्री रत्नें ही असल्याचा निर्देश आहे; हिंदू स्त्रियांचें कडकडीत पातिवृत्त्य, आणि अब्रूच्या संरक्षणार्थ त्यांनीं केलेले अनेक आत्मयज्ञ, या सर्व गोष्टी हिंदुस्थानच्या इतिहासांत इतक्या पुष्कळ आहेत कीं, त्यासंबंधी उदाहरण परंपरा दाखवीत बसणें ही अतीशय पाल्हाळीक व कंटाळवाणे आहे; आणि हिंदू लोकांच्या खड्गयुद्ध निपुणतेबद्दल तर त्यांची इतकी ख्याती आहे कीं, त्यावरूनच पर्शियन भाषेंत “ त्याला हिंदुस्थानच्या भाषेंत उत्तर द्या”—म्हणजे त्याच्याशीं खड्ग युद्ध करा—अशी म्हण पडली आहे; त्याप्रमाणेंच अरबी भाषेंतील अतीशय प्रसिद्ध म्हणून नांवाजलेल्या “ सत्र्-मो-अलक् ” या काव्यांतही, या संबंधीं “ हिंदु खड्गयुद्ध निपुण मनुष्याच्या तरवारीच्या घावा पेक्षांही आपल्या नजीकच्या नावलगाकडून होणारा जुलूम अधिक मारक असतो,” असा उल्लेख केलेला आहे. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील तरवारीही सर्व देशांतील तरवारी पेक्षां अधीक पाणीदार व उत्तम होत्या, असाही उल्लेख आढळून येत आहे.

गायन कलेंतील प्राविण्याबद्दल ही पूर्वीच्या हिंदू लोकांचा असाच लौकीक आहे; आणि हिंदूच्या वेदांतील सामवेद हाच मुळी गाण्याच्या सुरांत बसविलेला असून तेथूनच हिंदूच्या गायन कलेस सुरवात झालेली आहे; याशिवाय गायन-कलेंतील गंधर्व वेद या नांवाचाही एक वेद आर्यांनीं त्याकाळीं शोधून काढिला होता; परंतु तो आतां नष्ट झालेला आहे. हिंदूच्या या गायन शास्त्रांत सहा पुरुष राग—१ हिंदाल, २ श्रीराग, ३ माघ मल्हार, ४, दीपक, ५ भैरव ६ व मालकंस—असून छत्तीस स्त्री राग उर्फ रागिणी आहेत; व या प्रत्येक रागिणीं-तून तीन याप्रमाणें एकशें आठ रागिण्या उत्पन झाल्या आहेत; व या कलेत अनेक निष्णात मंडळी पूर्वकाळीं निर्माण होऊन गेलेली आहेत. या गायन शास्त्रांतील

"संख्या पद्धति" ( Notation System ) ही अतीशय महत्वाची असून ती पहिल्यानें हिंदू लोकांनीं प्रचारांत आणिली; त्या नंतर पर्शिया (इराण) देशानें ती घेऊन आपल्या देशांत सुरू केली; व तेथील राज्यकर्ता प्रसिद्ध बेहराम यानें हिंदू गवई ही आपल्या दरबारांत आणून ठेविले; त्या नंतर अरब लोकांनीं ही पद्धति स्वीकारिली, व नंतर अकराव्या शतकाच्या सुरवातीस गुईदोदी ॲरेझो यानें ती युरोपांत नेऊन नंतर तिचा सर्व युरोपखंडाभर प्रसार झाला.

व्यापार विषयक बाबती संबंधानें पाहतां, हिंदुस्थानवासियांचा, वास्तवीक म्हणावयाचें म्हणजे, हल्लींच्या काळीं जगांतील व्यापारांत फारसा हात नाहीं; तथापि पूर्वकाळीं युरोप, आशिया, आणि आफ्रिका, या खंडांबरोबर खुष्कीच्या व जलमार्गानें चालणाऱ्या व्यापाराचे ते धनी होते. ते स्वत: जहाजें बांधीत असत; समुद्र पर्यटणें करींत असत; आणि जमीन व पाणी यापैकीं कोणत्याही मार्गानें चालणाऱ्या अंतर्राष्ट्रीय व्यापाराच्या सर्व दोऱ्या त्यांच्याच हातीं असत; प्रजेंतील संपत्तीची विपुलता, देशांतील जमीनीची अनुपमेय सुपिकता, आणि निरनिराळ्या प्रकारच्या व्यापारी मालाची, व कला कौशल्याच्या कामाची पैदास, यामुळें या व्यापाराची त्याकाळीं अत्यंत वाढ व भरभराट झाली होती; जहाजें बांधून त्या साधनांनीं ते जल व्यापार करीत होते; व प्रोफेसर मॅक्स डंकर याच्या म्हणण्या प्रमाणें अजमासें इ० सनापूर्वी दोन हजार वर्षांपासूनच प्राचीन हिंदुस्थानांत जहाजें बांधण्याची कला अवगत होती. व्यापाराप्रमाणेंच, जगाच्या निरनिराळ्या भागांत त्यांनीं वसाहतीही स्थापन केल्या होत्या; व या वसाहती विषयक बाबतींत, इजिप्त इथिओपिया, इराण, तुर्कस्थान, व उत्तर आशिया-सैबेरिया प्रांतातील बजरापूर-स्कँडिनेव्हिया, पूर्व आशिया, ब्रह्मदेश, मार्ता-बानचें आखात, कंबोडिया आणि कोचीन चीन, सयाम, जावा, बोर्निओ, सेलबीज, सुमात्रा, आस्ट्रेलिया, चीन, जपान आणि अमेरिका, वगैरे देशाशीं, त्यांचा कोणत्याना कोणत्या रूपानें प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध झालेला होता; या संबंधीं पुष्कळच खुलासेवार, माहितीपूर्ण, व मनोरंजक, हकीकत देतां येण्यासारखी आहें; परंतु स्थलाभावामुळें या ठिकाणीं त्रोटकपणें महत्वाच्या अनेक गोष्टीपैकीं दोनच गोष्टींचा फक्त उल्लेख केला आहे; प्राचीन आर्य लोकांत इतर अनेक देवताप्रमाणेंच वरुण ( Uranas ) या नांवाची एक देवता प्रधान मानिलेली

होती; आणि वेदांत या देवतेची अतीशय स्तुती केलेली असून वेदकालांतही आर्य लोक व्यापार करीत असत असें दिसते; कारण ऋग्वेदाच्या चवथ्या मंडळांतील ५६ व्या सूक्तांत " संपत्ति मिळविण्याची हांव धरणारे व्यापारी उष्ण निश्वास टाकणाऱ्या नौकेवर आरूढ होऊन सफर करण्यासाठीं समुद्र मार्ग मोकळा करितात, असा आणि त्याप्रमाणेंच याच वेदांत इतरत्र ( १–४–३ ) " धन मिळवूं इच्छिणारे वाणी लोक जल पर्यटणाकरितां तयार करून ठेविलेल्या नौकांची आराधना करीत आहेत, " असा उल्लेख आढळतो. त्यावरून, व मॅगेस्थनीस यानें आपल्या प्रवास वृत्तांत त्याकाळीं व्यापारा संबंधानें प्रसिद्ध असलेल्या बंदरांची जी माहिती दिली आहे, तिजवरून हिंदू लोक त्याकाळीं ही समुद्र मार्गानें परदेशाशीं व्यापार करीत असत, हें उघड होतें. सोकात्रा बेटांस पूर्वी डायसकोरडीज हें ग्रीक नांव असें; त्याप्रमाणेंच सिलोन बेटास ताप्रोबेन हें नांव असून येथील लोक आपल्या देशांतील अरण्यांतून हत्ती पकडून तें पूर्व किनाऱ्यावरील कलिंग देशाच्या राजकर्त्यास जलमार्गानें नेऊन विकीत असत, असा उल्लेख आढळतो; म्हणजे हत्तीस वाहून नेण्यासारख्या प्रचंड नौकाही त्या काळांत तयार होत असत असें दिसतें; इ० सनापूर्वी ५० वर्षे या काळांत, सिलोन बेट मगध देशाच्या विजय या नांवाच्या राज्यकर्त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें; व या ठिकाणीं हिंदू लोकांनीं वसाहत केली; राजतरंगिणी या ग्रंथांत जयधीर राजानें सिलोन बेटांत आपला एक वकील पाठविल्याचें जें वर्णन केलेलें आहे, तें हेंच बेट असून या गोष्टीवरूनही, हिंदूलोक अजमासें निदान अडीच हजार वर्षांपूर्वीपासून जलपर्यटणें करीत असत, हें उघड होतें. हिंदुलोकांच्या वसाहतीसंबंधानें पाहतां त्यांनीं इसवी सनाच्या ७८ व्या वर्षी जावा बेटांत वसाहत केली असून त्यापूर्वीच त्यांनीं सुमात्रा बेटांतही वसाहत केली होती. इ. सन ४०० च्या सुमारास चीन देशांतील प्रसिद्ध प्रवासी व भिक्षु फा-एन हा सिलोन बेटांत येऊन तेथून कांहीं बौद्धधर्मीय ग्रंथ गोळा करून स्वदेशीं परत जाण्यासाठीं जहाजांतून निघाला; परंतु रस्त्यांत समुद्रांत वादळ झाल्यामुळें त्यास मध्यंतरी जावा बेटांत उतरणें भाग पडलें; त्यावेळीं तेथें वसाहत करून राहिलेले अनेक ब्राह्मण त्याच्या दृष्टीस पडले; तो त्या बेटांत कांहीं महिने राहिला, त्या नंतर त्यानें पुन्हां चीन देशांत जाण्यासाठीं जलमार्गानें प्रवास करण्यास सुरवात केली तथापि पुन्हां समुद्रांत वादळ होऊन जहाज बुडण्याच्या बेतांत आलें; तेव्हां जहाजावरील

कांहीं ब्राह्मणांनीं या भिक्षू मुळेंच पुन्हां पुन्हां आपणास प्रवासांत विघ्न उत्पन्न होतें असें मानून त्याला मध्येंच कोठें तरी एखाद्या बेटावर टाकून देऊन पुढें जाण्याचा बेत केला, असें फा–एन यानें आपल्या प्रवासवर्णनांत लिहिलें आहे; त्यावरून, त्याकालांत जावा बेटांमध्यें ब्राह्मणांची वसाहत होती, आणि ब्राह्मण लोक दूरदूरच्या प्रदेशांत जलपर्यटणें करीत असून खुद्द त्याच्या बरोबरील लांबच्या प्रवासातही ते त्याच नौकेमध्यें होते, ही गोष्ट सिद्ध होते; त्याप्रमाणेंच सुमात्रा बेटांतही हिंदूलोकांची वसाहत असून त्यासंबंधीं ( थिऑसॉफिस्ट या मासिक पुस्तकांतील मि. नरसिंह याच्या लेखावरून, ) अशी माहिती मिळते कीं हिंदुस्थानच्या द्वीप समूहामध्यें जावा बेटाचें जितकें महत्व आहे तितकेंच सुमात्रा बेटाचेंही आहे. जावा, सुमात्रा, बोर्निओ, सेलिबीज व संबावा, या बेटांची नांवें अनुक्रमें यव, सुमित्र, भरणी, शलभा, आणि संवभ या संस्कृत शब्दां पासून झालेलीं आहेत. हिंदुस्थानांतून तिकडे वसाहत करण्यासाठीं जी मंडळी बाहेर निघाली तिचा सुमित्र या नांवाचा एक नायक होता, व त्याच्याच नांवावरून यापैकीं एका बेटाचें नांव सुमात्रा असें पडलें असावें. या बेटांतील अचीन या नांवाचें शहर व त्याच नांवानें प्रसिद्ध असलेला पश्चिमेकडील प्रांत हे सुमित्र या संज्ञेनेच पूर्वी ओळखले जात असत. प्राचीन काळीं सुमित्र हें शहर या बेटाची राजधानी होती; व त्याचे अवशिष्ट भाग अद्यापि पाहण्यास सांपडतात. या बेटांत चिंचेची झाडें पुष्कळ असून त्यावर वानरांचे कळप नेहमीं वस्ती करून रहात असत; या वरून तेथील लोकांची अशी समजूत झाली आहे कीं रामायणांत किष्किंधा या नांवानें प्रसिद्ध असलेलें स्थळ म्हटलें म्हणजे हेंच बेट होय; आणि या ठिकाणीं वाली व सुग्रीव यांची राहण्याची जागा अमूक असावी, असे ते दाखवितात. सुमात्रा बेटाची जास्तींत जास्त लांबी १०४७ मैल व रुंदी ३३० मैल आहे, व एकंदर क्षेत्रफळ १ लक्ष ६१ हजार ६१२ मैल आहे. या बेटांतील लोकवस्ती अगदीं पातळ आहे; येथील लोक संख्या सुमारें ३५ लक्ष आहे. येथील प्रदेश डोंगराळ असून त्यांत इंद्रजित, हरि, पाणी, शक, वगैरे नांवांच्या नद्या उगम पावतात. शिवाय ज्वालामुखी पर्वत व सरोवरेंही तेथें आहेत. सरोवरांची नांवें मणींद्रि, शंकर, अशी आहेत. या ठिकाणचे मूळचे लोक नरमांस भक्षक असल्यामुळें

आर्यलोक तेथें गेल्यावर त्यांना दस्यू आणि राक्षस या नांवानें संबोधित असत; इ० सनाच्या ७८ व्या वर्षी हिंदू लोक जावा येथें राहण्यास गेले, या बद्दल सर्व इतिहासकारांचें बहुतेक एक मत आहे; व सुमात्रा येथील वसाहत यापेक्षांही जुनी असली पाहिजे, असें वाटतें. सुमित्र या नांवाचा हिंदू तेथें वसाहत करण्यास निघाला, तो कृष्णा नदीच्या मुखांपाशीं श्रीककुलं या नांवाचें शहर होतें तेथून होय. या वसाहतवाल्या लोकांना सुमात्रा येथील मूळच्या रहिवाशांकडून बरीच पीडा सोसावी लागली. चवथ्या शतकांत गुजराथ व सिंध या प्रांतामधील बौध्द धर्माचे कांहीं लोक प्रथम सिलोन येथें जाऊन नंतर ते सुमात्राकडे गेले होते. हिंदू व बौध्द अशा दोन्हीं धर्मांचे लोक या बेटांत स्नेहानें रहात असत; त्यांची एकमेकांशेजारीं असलेलीं अनेक देवालयें तेथें आढळतात. तेथील लोक आपण सूर्यवंशीय, किंवा चंद्रवंशीय आहों, असें अभिमानानें सांगतात. शिवाय, आपण शिकंदराचे वंशज आहों, असे सांगणारे ही त्यांत कांहीं आहेत. सुमात्रा बेटाचा राज्यकारभार जावा बेटांतील राजाच्या हातीं असे. सुमात्रा बेटांत ठिकठिकाणीं राम, शिव, सीता, भवानी, दुर्गा, महादेव, महेश, सुग्रीव, रुद्र, इत्यादि नांवाच्या हिंदू देवालयांचे अवशिष्ट भाग आजही दृगोचर होत आहेत. त्याप्रमाणेंच असा ही उल्लेख आढळतो कीं, इ० सन ६०३ च्या सुमारास गुजराथेंतील एका हिंदू राजानें आपल्या मुला बरोबर शेतकरी, कारागीर, लढाऊ लोक, वैद्य, व कारकून वगैरे मंडळी मिळून पांच हजार लोक देऊन त्यास जावा बेटांत पाठविलें होतें, व त्याप्रमाणें तो तिकडे गेलाही होता. वरील हकीकती वरून हिंदू लोकांना नौका नयनाची कला पूर्णपणें अवगत होती, ते जलमार्गानें दूरदूरच्या प्रदेशांत प्रवास व व्यापार करीत होते, त्यांनीं कित्येक प्रदेशांत वसाहती केल्या होत्या, आणि राज्यकर्तेही समुद्र मार्गानें चालणारा व्यापार व नौका नयन यांना उत्तेजन देत असून, प्रत्यक्ष आपल्या मुलासही अशा प्रवासास पाठवीत असत, वगैरे गोष्टी पूर्णपणें निदर्शनास येतात.

हिंदूधर्म, व हिंदूधर्म रहस्य, या बाबतींत वर अगदीं थोडक्यांतच उल्लेख आलेला असल्यामुळें, त्यासंबंधीही या ठिकाणीं थोडेसे अधिक विवेचन करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांत, व हिंदूधर्मांत अनेक प्रकारचे वाद, मतभेद, व मतमतांतरें, प्रचलित असून शिवाय निरनिराळे पंथ, सांप्रदाय, विधी, व आचार, अस्तित्वांत आहेत. द्वैताद्वैतवाद. पदार्थवाद. मायावाद, मिमांसा अथवा कर्म-

वाद, ईश्वरवाद, अनीश्वरवाद, आत्मानात्मवाद, आद्यनादिवाद, तर्कवाद, शुद्धाद्वैतवाद, विशिष्टाद्वैतवाद, सुगुणनिर्गुणवाद, वगैरे अनेक प्रकारचे वाद, प्रसिध्द असून शैव, वैष्णव, लिंगायत, रामानंदी, कबीरपंथी, श्री सांप्रदायी, गाणपत्य, शाक्त, सौर, वल्लभपंथी, दादूपंथी, उदासी, सत्नामी, रामस्नेही, जोगी, नागपंथी, अवधूत, प्राणामी, बिजमार्गी, जैन, सत्संगी, महानुभावी, वारकरी, गोसावी, साधू. मलुकदासी, रामदासी, अघोरी, वाममार्गी, पाशुपत, प्रवृत्तिमार्गी, निवृत्तिमार्गी, कौलिक, अवधूतमार्गी, अग्निहोत्री, भागवत, हरव्यासी, कंठिवाले, परमहंस, सरभंगी, लाकूलिन, कालामुख, कपाल, वगैरे अनेक वाद, पंथ, व सांप्रदाय, हिंदुस्थानांत चालू असून त्यांतही पुन्हां अनेक उपभेद आहेत; उदाहरणार्थ, गाणपत्य पंथ; या पंथांतही, महागणपती पंथ, हरिद्रा गणपती पंथ, उच्छिष्ट गणपती पंथ, नवनीत गणपती पंथ, स्वर्ण गणपती पंथ, व संतान गणपती पंथ, असे सहा भेद आहेत; त्या प्रमाणेंच कांहीं पंथांत चमत्कारिक आचार, विचार, व रुढी, प्रचलित आहेत; उदाहरणार्थ, शाक्त पंथा संबंधी त्रोटक माहिती, आर्यांच्या सणाच्या इतिहासांत दिली आहे; त्यावरून असें कळते कीं, शाक्त पंथांत दोन पक्ष आहेत; एका पक्षाचे लोक सात्विक पद्धतीनें शक्तीचें अर्चन करीत असून तिचें स्वरूपही शांत व प्रेमळ असल्याचें मानितात. हा पंथ दक्षिण मार्गी, उत्तर कौलिक, समयिन, वगैरे नांवांनीं प्रसिध्द आहे. दुसऱ्या मतास तंत्र मार्ग, आगम, मंत्रशास्त्र, पूर्व कौल, वाम मार्ग, उपासना, वगैरे नांवें असून यांचे शक्त्युपासनेचे विधी अवैदिक व खऱ्या आर्य धर्मास असम्मत आहेत. या पंथाची स्थापना नाथजोगी या नांवाच्या एका इसमाने केली; त्यानें त्या संबंधीं शिवपार्वती संवाद रूप अनेक ग्रंथ लिहिले, त्यास "तंत्र" असें म्हणतात. त्यांत पूजा, न्यास, मुद्रा, बीजाचे मंत्र, वगैरे अनेक विधी लिहिलेले असून त्यांच्या देवतांस दशमहाविद्या असें म्हणतात; या देवांची नांवें पुढील प्रमाणें आहेतः—१ श्याम (काळी) २ तारा ३ त्रिपुरा ४ बगलामुखी, ५ छिन्न मस्तका, ६ मातंगी, ७ धूमावती ८ भैरवी, ९ महाविद्या, व १० भुवनेश्वरी; या शिवाय तिच्या गुणवैशिष्यामुळें व तिनें निरनिराळ्या कारणाकरिता घेत-केल्या अवतारामुळें त्रिपुर सुंदरी, ललिता, शांता, दुर्गा, महिषासुर मर्दिनी, चंडी, चामुंडी, वगैरे अनेक नांवानें ती प्रसिद्ध झाली आहे; त्यांची पूजा,

पटलें, मंत्र, सहस्त्रनाम, पद्धति, नीजें, कवचें, न्यास, मुद्रा, होम, बली, वगैरे अनेक विधी आहेत. हिंदू धर्मांत निंद्य मानिलेल्या मद्यमांसा शिवाय हे विधी पूर्ण होत नाहींत; तांत्रिक मतास अनुसरून कोणी उत्पन्न केलेलें देवी माहात्म्य हा ग्रंथ प्रमाण मानून त्याचें पठण व श्रवण, सप्तशतीचा चंडिपाठ, हीं कृत्यें नवरात्रात करण्यांत येतात. ह्या माहात्म्यांतील रुधिराध्याय हा तर क्रूर प्रवृत्तिची परमावधी दर्शवीत आहे. शाक्तांनीं आपल्या कल्पित देवांमध्यें अनेक भैरव असल्याचें मानिलें असून त्यांच्या अनेक देवी किंवा भैरवीही कल्पिल्या आहेत. शाक्त लोक स्त्रियांस शक्ती व पुरुषांना वीर किंवा भैरव म्हणतात, व प्रत्यक्ष स्त्रीची पूजा अश्लील विधीनें करीत असतात; देवीची कृपा संपादन करण्यासाठीं कित्येक मोठीं उग्र अनुष्ठानें करावयाचीं असतात. प्रेतावर आसन मांडून बसणें हाडां-दातांच्या माळा घालणें, वगैरे विधींचें वर्णन करणेंही अयोग्य आहे. तांत्रिकांची काल गणना, पंचांग, श्राद्ध, अंत्येष्टि वगैरे सर्व विधी वैदिकांच्या पद्धतींहून भिन्न आहेत; त्यांच्यांत यंत्रें पुष्कळ असून त्यांत श्रीचक्र हें श्रेष्ठ आहे; हीं यंत्रें शालिग्राम शिळेवर, भूर्जपत्रावर, किंवा स्फटिकावर तयार केलेली असतात; तीं काशी व काश्मीर येथें मिळतात; त्यांच्या धारणानें आधिव्याधि नाहींशा होऊन सर्व मन कामना सिद्ध होतात, असे मानणारे हिंदू थोडे थोडके नाहींत. जे या मताचे नाहींत त्यास कंटक किंवा पशु ही संज्ञा दिलेली असते; व जे त्यांत नव्यानें प्रवेश करितात त्यांस पूर्णाभिषेक किंवा पट्टाभिषेक करण्यांत येतो. सर्व तांत्रिक लोक आपल्या अंगीं अद्भुत सामर्थ्य असल्याचें सांगतात. जारण मारण, उच्चाटण, शत्रुनाश, वशिकरण, मोहन, सैन्य स्तंभन, मेघ स्तंभन, बुद्धि स्तंभन, सर्प निवारण, रोग निवारण, वगैरे अद्भुत कृत्यें आपण करूं शकतो असे शक्त्युपासक सांगत असल्यामुळें त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून कित्येक भाविक व भोळे लोक आपल्या जन्माचें मातेरें करून घेतात. शक्ति-पूजेप्रीत्यर्थ भैरवीचक्र उत्पन्न करण्याची कृति महाभैरव जो शिव त्यासंबंधीं केल्या जाणाऱ्या लिंगपूजेवरून निघाली, हें निर्विवाद आहे. यासंबंधाचें विशेष स्पष्टि-करण शिष्ट संमत होणार नाहीं म्हणून तें केलेलें नाहीं; एकंदरींत शाक्त मत, वेदास, सामाजिक नीतीस, किंवा सुविचारास, धरून नाहीं, असें विचारी जनांचें मत आहे. शाक्त यावरून आलेला छाकटा हा शद्ब या पंथाचें हीनत्व दर्शवि-

ण्यास पुरेसा आहे, असे ते म्हणतात. वाममार्गाचे अनुयायी जात किंवा वर्णभेद पाळीत नाहींत. भैरवी चक्राची पूजा चालू असतां तर सब गोलंकार होत असतो. वारांगना रजस्वला स्त्री, महारीण, मांगीण, यांचें उच्छिष्ट सेवन करणें, म्हणजे तीर्थाचें दर्शन घेण्याइतकें पवित्र व पुण्यकारक आहे, असें त्यांचें मत आहे. असा हा भयंकर सांप्रदाय बंगाल, नेपाळ, काश्मीर, द्रविड, मलबार, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांत कमी अधिक प्रमाणांत चालू आहे. शाक्तांचे बीभत्स, क्रूर, व किळसवाणे, पूजा विधी सरकारी कायद्याच्या भीतीमुळें गुप्तपणें चाललेले असतात. या उपासकांत ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, व शूद्र, आणि कांहीं म्लेंछांचा भरणा असून ते मंत्र सामर्थ्याच्या योगानें आपण अद्भुत कृत्यें करू, असे सांगतात; व फसवेगिरीच्या धंद्यावर निर्वाह करितात. बंगाल प्रांतांतील ओझे ब्राह्मण भयंकर शाक्त आहेत. " कलौ चंडि विनायकौ; चतुर्वर्गाय चंडिका; " असे ते सांगतात. ( ऋग्वेदीकृत आर्यांच्या सणाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, पान २७० ते २७२ पहा. )

या उपरी निर्दिष्ट शाक्त पंथाच्या अगदीं उलट व हिंदू धर्मास धरून असा वासुदेव पंथ ( अथवा वासुदेव धर्म ) एकेकाळीं हिंदुस्थानात प्रचलीत होता; पंचरात्र सिद्धांत हा सर्व वेदांचा निष्कर्ष असून " चित्रशिखंडी " या अभिधानानें विख्यात असलेल्या सप्तर्षींनीं या उत्तम शास्त्राची रचना केली आहे; हा प्रवृत्ति व निवृत्ति या दोन्हीं मार्गांचा परिपोषक असून तो सिद्धांत नारदानें पृथ्वीवर प्रचलीत केला, असे शांतिपर्वांत सांगितलें आहे. पंचरात्र सिद्धांत हाच परमात्म प्राप्तीचा सोपा उपाय असून त्यालाच " वासुदेव धर्म " असें नांव देतां येईल. ज्या वेळीं ब्रह्मा, विष्णू, व शिव, यांची पूजा रूढ झाली नव्हती, त्यावेळीं वासुदेव हा परमपूज्य मानून त्याचीच भक्ती सर्व लोक करीत असत; महाभारतकालीं यज्ञयाग व हिंसा यांच्याबद्दल अनुकूल मत नव्हतें, अशा वेळीं भक्तिप्रधान एकेश्वरी वासुदेवधर्म वाढत गेला. पातंजली, पाणिनी, वगैरे प्राचीन लेखकांच्या कालीं वासुदेव हें परम श्रेष्ठ दैवत असल्याचें लोक मानीत असत; निवृत्ति व निष्काम भक्ती हीं वासुदेव धर्माची मुख्य अंगें आहेत, तरी प्रवृत्ति मार्गांत राहून निवृत्तिपर वर्तन ठेवणें हेंच योग्य असल्याचें त्यांत सांगितलें आहे. श्रीकृष्णानेंही गीतेंत वासुदेव भक्ति सांप्रदायाची महती वर्णन केलेली आहे, आणि सर्व प्रकारें वासुदेवास शरण जाऊन तनमनधनें करून

त्याचीच एकनिष्टपणें सेवा करणारा एकांतिन श्रेष्ट भक्त होय असें म्हटलेलें आहे; या वासुदेव धर्माचे अनुयायी भागवत धर्मी म्हणून ओळखले जातात; मेगास्थनीसच्या ग्रंथांत त्यानें त्या काळांत वासुदेवाची ( म्हणजे वासुदेव-कृष्णाची ) पूजा लोकांत रूढ असल्याचें दिग्दर्शन केलेलें असून खिस्ती शकाच्या चवथ्या शतकांतील गुप्त वंशाच्या राज्यकर्त्यांच्या नाण्यावर "परम भागवताः" अशी अक्षरें आहेत; या भागवत धर्माचें रहस्य गहन असून श्रीकृष्णानें, अर्जुनाचा मोह दूर करून त्याला कर्तव्य कर्म करण्यास प्रवृत्त करितांना, धर्म, अर्थ, काम, व मोक्ष, हे चतुर्विध पुरुषार्थ साधून देणारा जो उपदेश केला, त्यांत मानवी ध्येय काय असावे, याबद्दल मोठें मार्मिक व मननीय विवेचन केलें आहे; तें असें:-" मनुष्यानें आपल्या खऱ्या स्थितीचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. त्यानें निरिच्छपणें आपलीं कर्तव्य कर्में केलीं पाहिजेत, व कर्माचरणाच्या असंख्य दोषां पासून मुक्त राहण्यास्तव त्यानें आपलें अंतःकरण शुद्ध ठेवून, अनन्य भावानें परमेश्वराला शरणागत झालें पाहिजे. त्यानें आपलें मन ताब्यांत ठेवून निष्काम कर्म करावें, भक्तीनें परमेश्वरास प्राप्त करून घ्यावे, व ज्ञानाच्या योगानें परम श्रेष्ट, परम अक्षर, व कधींही विकार न पावणाऱ्या ब्रह्मांत मिळून जावें, हाच मनुष्याचा तरणोपाय असून परमात्मस्वरूपीं लय पावणें हेंच त्याचें अंतिम ध्येय आहे;" त्या प्रमाणें याच हिंदू धर्मांतील आर्यांच्या प्राचीन ग्रंथांत ब्रह्मचर्य व्रत व एक पत्नी व्रत या विषयीं ही मोठें मननीय वर्णन केलेलें आहे; आणि मानवी प्राण्यांतील पुरुषार्थाचें मूळ, सद्गुण व सामर्थ्य वगैरेंचा उगम, ब्रह्मचर्य व्रत आचरिल्या पासून होतो, असें दिग्दर्शित केलेलें आहे. प्राचीन आर्य लोकांना ब्रह्मचर्याचें महत्व पूर्णपणें माहिती असून या व्रतानें शरीर सामर्थ्याची वृद्धी होते, असें प्राचीन हिंदू लोक समजत असत; म्हणून पूर्वकालीन अनुशासनकारांनीं असा नियम ठरवून दिला कीं, मनुष्यानें आपल्या आयुष्याचे तीन भाग ब्रह्मचर्यावस्थेंत काढावे, व एकच भाग गृहस्थाश्रमांत, आणि तोही संयमन पूर्वक विषयांचा उपभोग घेण्यांत खर्च करावा; म्हणजे मनुष्यानें आपल्या आयुष्याची पहिली पचवीस वर्षें ब्रह्मचर्यांत काढावीं; पुढें पंचवीस वर्षें प्रापंचिक या नात्यानें पत्नीच्या संयमनपूर्वक विषय सेवनांत व प्रपंचांत घालवावी, व त्या पुढील पचवीस वर्षें वानप्रस्थ व सन्यास या अवस्थेंत घालवावी. ब्रह्मचर्याचें महत्व

दर्शविणारीं अनेक उदाहरणें हिंदूंच्या प्राचीन धर्म ग्रंथांत व इतिहासांत आढळतात; मेघनाद म्हणजे रावणाचा मुलगा इंद्रजीत याचा पराभव करणारा योद्धा लक्ष्मण यानें सतत बारा वर्षें कायावाचामनें करून कडकडित ब्रह्मचर्यव्रताचें आचरण केलें; त्या मुळेंच इंद्रजीताचा पराभव करण्याचें सामर्थ्य लक्ष्मणाच्या अंगीं प्राप्त झालें, असें रामायणांत दर्शविलें आहे. भारतीय योद्धा भीष्म पितामह यानें ब्रह्मचर्याच्या जोरावर काळास जिंकिलें, व तो इच्छा मरणीं झाला, असें महाभारतांत वर्णन केलें आहे. त्या प्रमाणेंच मारुतीची कर्तृत्व शक्ती, ही, त्यास या व्रतामुळेंच प्राप्त झाली होती. मारुती हा ब्रह्मचारी असल्यामुळें स्त्रिया त्याची पूजा करीत नाहींत, तरी सुद्धां मारुतीची देवालयें कन्याकुमारी पासून हिमालयापर्यंत पसरलेलीं आहेत. ती शोभायमान अशीं बांधिलेलीं क्वचित्च दृष्टीस पडतात; तथापि दक्षिण हिंदुस्थानांत बहुधा असें एकही खेडें सुद्धां आढळणार नाहीं, कीं जेथें मारुतीचें निदान एक तरी देवालय अस्तित्वांत नाहीं, इतकेंच नव्हे तर कित्येक खेड्यांत मारुतीची एकाहून अधिक देवालयेंही अस्तित्वांत असलेलीं आढळतात. महाराष्ट्रांत श्री समर्थ रामदास स्वामीनें रामभक्तीचा महिमा वाढविल्यावर मारुतीच्या उपासनेस जोराचें चलन मिळालें, व जागोजाग मारुतीची देवालयें स्थापन झालीं. हें दैवत युद्ध प्रीय मराठ्यांनां फार प्रीय व पूज्य वाटूं लागलें, आणि छत्रपती शिवाजी महाराजानें ज्या ज्या ठिकाणीं स्वराज्याच्या बंदोबस्ताकरितां कोट, दुर्ग, व गड, बांधिले, तेथें तेथें त्यांच्या महाद्वाराशीं बलभीम मारुतीराय हातांत गदा घेऊन उभा असलेला दृष्टीस पडूं लागला. आणि सदा विजयी, सदा ब्रह्मचारी, सदा सामर्थ्यवान, सदा स्वामिसेवातत्पर, सदा राजनिष्ट व कर्तव्य निष्ट असा हा श्रीरामदूत लष्करी बाण्याच्या मराठे वीरांनीं अनुकरणीय व वंद्य म्हणून, आपल्या सन्निध त्याची स्थापना करून त्याचा आश्रय केला; उपनिषदकालींही ब्रह्मचर्यव्रतासंबंधानें जनतेंत अत्यंत आदरभाव वसत असे; आणि गुरुगृहीं असतांना व उपनयनाच्या वेळीं महामंत्रोपदेश झाल्यावर गुरू कडून ब्रह्मचाऱ्यास जो उपदेश करण्यांत येत असे तो विशेष महत्वाचा व मननीय असे; या उपदेशाचा मासला म्हणून, तैत्तिरीयोपनिषदांतील खालील वचनें या ठिकाणीं ग्रंथित केली असून त्यांचें विद्यार्थी दशेंतील प्रत्येक स्त्री पुरुषांनीं पूर्णपणें मनन करून त्याप्रमाणें आचरण ठेवणे योग्य आहे;

तो उपदेश असा आहे कीं, "सत्य भाषणकर. धर्मा प्रमाणें वाग. अध्ययना विषयीं प्रमाद करूं नको. आपलें कुशल व्हावें, यासाठीं कर्में करण्या विषयीं प्रमाद करू नको. भूतमात्रा साठीं कर्में करण्या विषयीं प्रमाद करू नको. स्वाध्याय व प्रवचन या विषयीं प्रमाद करू नको. देवकार्य व पितृकार्य या विषयीं प्रमाद करू नको. मातेला देवा प्रमाणें समज. पित्याला देवा प्रमाणें समज. आचार्याला देवा प्रमाणें समज. अतीथीला देवा प्रमाणें समज. जीं कर्में निंद्य नाहींत त्यांचेंच आचरण करावें; इतर कर्मांचें आचरण करूं नये. आमचीं (गुरुंचीं) जी सत्कर्में असतील, त्यांचेंच तूं आचरण करावेंस; इतर कर्मांचें आचरण करू नयेस. जे आमच्याहून श्रेष्ठ ब्राह्मण असतील त्यांनां आसन देऊन त्यांच्या श्रमाचा परिहार करावा. जें कांहीं द्यावयाचें तें श्रद्धेनें द्यावें. अश्रद्धेनें देऊं नये. मर्यादा युक्त द्यावें. भीतियुक्त द्यावें. ओळख करून घेऊन द्यावें. (अध्ययन पुरें झाल्यावर) आचार्याला प्रिय असें धन देऊन गृहस्थाश्रमाचा उपभोग घे, अथवा घ्यावा. ‡ शिवाय ब्रह्मचर्य व्रताप्रमाणेंच प्राचीन आर्यांनीं एकपत्नी व्रताची ही महती वर्णन केलेली आहे, आणि प्राचीनकाळीं बंधुप्रेम, सेव्य सेवक भाव, पतीव्रता धर्म, सत्य वचन, वगैरे उदात्त बाबतीं प्रमाणेंच, एक

---

‡ "सत्य वद । धर्मंचर । स्वाध्यायन्मा प्रमदः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्याय प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् । देव पितृ कार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृ देवो भव । पितृ देवो भव । आचार्य देवो भव । अतिथि देवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि; नो इतराणि । यान्यस्माकꣳ सुचरितानि तानि त्वयोपास्यानि; नो इतराणि येके चास्मिच्छ्रेयाꣳसो ब्राह्मणाः तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धयादेयम् । श्रियादेयम् । ह्रियादेयम् । भियादेयम् । संविदादेयम् । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजा तन्तुं मा व्यवच्छेत्सीः ॥

वरील उपदेशातील वाक्यांत "सत्यंवद" म्हणजे (नेहमीं) सत्यभाषण करीत जा, हेंच पहिलें वाक्य आहे, व या वरून सुद्धा प्राचीन हिंदूलोक सत्याची किती चाड बाळगीत होते, व सत्याचें त्यांनां किती महत्व वाटत होते, ही गोष्ट सहज लक्षांत येण्या सारखी आहे.

पतिनत्वांची व कडकडीत नैतिक आचरणाची योग्यता समाजास पूर्णपणें कळलेली होती, असें रामायण, व महाभारत वगैरे ग्रंथावरून दृष्टोत्पत्तीस येते; सारांश, हल्लींच्या काळीं, प्राचीन स्त्री पुरुषांप्रमाणें, अविवाहित स्त्री पुरुषांनीं, कडकडीत ब्रह्मचर्य व्रत व विवाहित पुरुषांनीं कडकडित व संयमित एकपत्नि व्रत व नैतिक आचरण ठेविल्यास त्यांची शरीर-संपत्ति निर्दोष व सुदृढ राहून जगांत त्यांना सुखानें कालक्रमणा करितां येईल, व भावी पिढी तेजयुक्त निर्माण होऊन ती आपल्या कर्तृत्व शक्तीनें देशसेवा करण्यास व प्राचीन आर्यांची तेजस्विता कायम राखण्यास कारणीभूत होईल, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

प्राचीन रोमन लोकांनीं निरनिराळ्या देशांतून वसाहती करितांना तेथील लोकांच्या देवतांना व सणांना आपल्या देवांच्या पंचायतनांत व पंचांगांत प्रविष्ट करून घेउन लोक संग्रहाच्या तत्वास मान दिला, तसाच प्रकार अनार्य जातीच्या संबंधांत आमच्या आर्य पूर्वजांनीं केलेला आहे; आणि प्राचीन हिंदू लोकांनीं बदलत्या परिस्थितीशीं आपले विचार व वर्तन जुळवून घेतले असल्या मुळेंच हिंदूधर्म जिवंत व सतेज राहिला आहे; अकराव्या शतकांत प्रसिद्ध अल्बुरेनी उर्फ अबूरेहन हा खीव येथील विद्वान् प्रवासी हिंदुस्थानांत आला होता; त्यावेळीं त्यानें हिंदू लोकांच्या आचार विचाराचें, व त्यांच्या सामाजिक व राजकीय स्थितीचें विवेचन केलें आहे, त्यांत ही त्यानें हिंदूधर्म व हिंदू लोक याबद्दल प्रशंसनीय उद्गार काढिले आहेत; हिंदू लोकांतील मूर्ति पूजेचें ही असेंच रहस्य असून त्यामुळेंच हिंदू समाजाची इतर कित्येक बाबतींत ही प्रगती झालेली आहे; कारण शिल्प शास्त्र, गायन कला, वाद्य कला, कवित्व, व दगड आणि धातू यांच्या मूर्ती बनविण्याची कला, वगैरेंची कदाचित उत्पत्ति नसली तरी वृद्धी होण्यास मूर्ति पूजाच कारणी भूत झाली आहे, असें म्हणतां येईल; भुवनेश्वर, केतेश्वर वगैरे देव स्थानांचें बांधकाम पाहून हल्लींच्या काळीं देखील निष्णात शिल्प शास्त्रज्ञ आश्चर्य चकित होतात; त्याच तोडीची सोमनाथ, बेलूर, कांची, मदुरा, श्रीरंगम्, तंजावर, गिरनार, जगन्नाथ पुरी, हंपी, घंटसाल, वगैरे ठिकाणची प्रसिद्ध देवस्थानें अस्तित्वांत आहेत. त्याप्रमाणेंच देवतांच्या मूर्ती लहान, व अतीशय मोठ्या, अशा ही असत; ह्यू-एन-त्संग हा चिनी प्रवासी काशी येथें गेला होता, त्यावेळीं

तेथील देवालयांत सत्तर हात उंचीची महेश्वराची मूर्ती होती, असें त्यानें आपल्या प्रवास वृत्तांत लिहिलेलें आहे. म्हणजे पूर्वकालापासून मूर्तिपूजा ही हिंदूधर्मांत प्रधान म्हणून मानिली गेली असून, तशाच प्रकारचें हिंदुधर्माचें रहस्य म्हणून उदाहरणा दाखल एक गोष्ट या ठिकाणीं दिग्दर्शित करणें आवश्यक आहे; ती ही की, हिंदूसमाजा प्रमाणें पृथ्वीवरील इतर कोणताही समाज, पुत्र हा पित्याच्या उद्धारासाठीं आहे, असें मानीत नाहीं; अती प्राचीनकाळीं—भविष्योत्तर पुराण अस्तित्वात आलें त्यावेळीं—पुत्र संतान असणें आवश्यक आहे, अशी ज्याप्रमाणें समजूत होती, तशीच ती आजच्या मित्तीसही कायम आहे. पुत्र असणें हें प्रापंचिक दृष्टयाच केवळ आवश्यक आहे असें नसून धार्मिक दृष्टयाही आवश्यक आहे, असे कित्येक शतकापासूनच हिंदूलोक मानीत आले आहेत, आणि मनुस्मृतींत "पुं" या नांवाच्या नरकापासून पितरांना पुत्र तारितो, या साठीं त्याला पुत्र म्हणतात" असा उल्लेख आहे. * त्या प्रमाणेंच "कुलक्षय झाला असता प्राचीन काळापासून चालत आलेले कुलधर्म नष्ट होतात; धर्माचा नाश झाला म्हणजे सर्व कुळांमध्यें अधर्माचें प्राबल्य चालू होतें; अधर्माच्या प्राबल्यामुळें कुल स्त्रिया बिघडतात; त्यामुळें वर्ण संकर होतो, आणि वर्ण संकर झाला म्हणजे कुलक्षय करणारांना आणि त्या कुळालाही नरकाची प्राप्ती निश्चित होते. कारण पिंडदान आणि तर्पण या क्रिया लुप्त झाल्या-मुळें त्यांचे पितर पतन पावतात. असें गीतेंतील वचन आहे. ‡ अशा प्रकारचें विशिष्ट रहस्य असलेला हा हिंदूधर्म अनेक वावटळींतून बचावून आज तागायत जिवंत राहिला आहे; अजमासें इ० सन १२९० च्या पूर्वी पासून वैष्णव मताचा अथवा भागवत धर्माचा महाराष्ट्रांत मोठ्या जोरानें प्रसार होण्यास सुरवात झाली आहे; महाराष्ट्रांत आज सुमारें सातशें वर्षे वारकरी संप्रदाय चालू असून,

---

* पुंनाम्नो नरकाद्यस्मा त्रायते पितरं सुतः ।
तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवा ॥

मनुस्मृती ९-१३८

‡ संकरो नरका यैव कुलघ्नानां कुल स्यच ।
पतंति पितरो ह्येषां लुप्त पिंडोदक क्रियाः ॥

गीता १-४२

गेल्या " पांचशें वर्षांत सुमारे पन्नास साधूसंत या देशांत जन्मास आले; त्यांतील कांही स्त्रिया, थोडे बहुत हिंदुत्व पत्करलेले मुसलमान, निम्मे ब्राह्मण, व इतरां पैकीं सोनार, मराठे, कुणबी, शिंपी, माळी, कुंभार, व महार, होते; कांही वेश्या व घटिकी होत्या. या धर्म जाग्रतीचें विशेष महत्व हें आहे कीं, धर्माच्या उन्नत तत्वांचा पगडा एकाद्या विशिष्ट वर्गावरच न बसतां समाजांतील सर्वच वर्गांच्या लोकांच्या अंतःकरणावर बसला होता. व स्त्रिया व पुरुष, उच्च व नीच, सुशिक्षीत व अशिक्षित, हिंदू व मुसलमान हे सर्वच जण या धर्म विचारांच्या छत्रा खालीं आले होते. सार्वजनिक जागृती जेथें आहे अशा ठिकाणा खेरीज करून इतरत्र या प्रकारचा चमत्कारिक धार्मिक परिणाम जगाच्या पाठीवर कोणत्याही देशांत घडून आलेला इतिहासावरून दिसून येत नाहीं. पंजाबांत नानकानें हिंदू व मुसलमान यांच्या मध्यें धार्मिक ऐक्य करण्याचा महत्प्रयत्न केला. पूर्वेस बंगाल्यांत चैतन्यानें लोकांस शनि व काली यांच्या उपासने पासून परावृत्त करून भागवत धर्माकडे ओढण्याचा प्रयत्न केला. रामनंद, व कबीर, तुलसीदास, व सुरदास, जयदेव, व राईदास, या सर्वांनीं आपापल्या परीनें धर्मोन्नतीच्या कार्यास हातभार लाविला. याचा परिणाम इष्ट व टिकाऊ असाच झाला. परंतु महाराष्ट्रांतील संतांनीं त्यांच्या पेक्षा ही विशेष महत्वाची कामगिरी केली. चांगदेव व ज्ञानदेव, निवृत्ती आणि सोपान, मुक्ताबाई आणि जनी, आकाबाई आणि वेणूबाई, नामदेव आणि एकनाथ, रामदास आणि तुकाराम, शेखमहंमद आणि शांति बहामनी, दामाजी आणि उद्धव, भानूदास आणि कूर्मदास, बोदले बुवा आणि संतोबा पवार, केशव स्वामी आणि जयराम स्वामी, नरसिंह स्वामी आणि रंगनाथ स्वामी, चोखा मेळा आणि दोघे कुंभार, नरहरी सोनार आणि सांवता माळी, बहिराम भट आणि गणेशनाथ, जनार्दन पंत आणि मुधोपंत हे व इतर कित्येक यांच्या चरित्रांवरून महाराष्ट्रांत ही धर्म जागृतीची चळवळ किती महत्वास चढली होती, हें दिसून येणार आहे." (न्या० रानडे कृत "The Rise of the Marhatta Power" हें पुस्तक पहा.) हिंदूधर्माप्रमाणेंच, त्यांची संस्कृतीही इतकी महत्वास चढलेली होती, कीं तिजवर मुसलमानांची छाप, ते राज्यकर्ते झाले तरी सुद्धां, बसली नाहीं; ही गोष्ट युरोपियन इतिहासकारांनीं ही कबूल केली असून मिस्तर फ्रेजर यानें आपल्या पुस्तकांत

( Literary History of India हें पुस्तक पहा. ) असें म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानावर मुसलमान लोकांनीं एक सारख्या पांचशें वर्षे निकराच्या स्वाऱ्या करून आर्य सुधारणा मार्गे हटविली, आणि तिजवर आपलें वर्चस्व ही प्रस्थापित केलें; परंतु युरोपांत मुसलमान लोकांनीं जी गोष्ट घडवून आणिली तीच गोष्ट हिंदुस्थानांत त्यांना घडवून आणितां येणें शक्य नव्हतें. कारण मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान देश पादाक्रांत केला, तथापि आर्य संस्कृतिवर त्या विजयाचें वर्चस्व स्थापित झालें नाहीं; इतकेंच नाहीं तर उलट मुसलमान लोकांनांच हिंदू लोकांनीं पुष्कळसें आपणाप्रमाणें बनविलें. उलट पक्षीं युरोपियन संस्कृति मुसलमानापेक्षा कमी दरजाची असल्यामुळें युरोपांत मुसलमानांना आपली छाप बसवितां आली; परंतु तशीच छाप हिंदुस्थानांत बसविणें त्यांना शक्य नव्हतें. शिवाय, हिंदुस्थानांतील लोक निरनिराळ्या राष्ट्रांचे व धर्म पथांचे असल्यामुळें आणि त्या सर्वांना एकाच छत्राखालीं दाबांत ठेवणारी अशी एकच विशिष्ट सत्ता अस्तित्वांत नसल्यामुळें मुसलमानापासून हिंदू धर्माचा बचाव झाला. पूर्वी हिंदुस्थान देशांत बौद्ध धर्म चालू असतां त्या धर्माचा पाडाव होण्यास उशीर लागला नाहीं; याचें कारण असें होतें कीं बौद्ध धर्मीय भिक्षू अविवाहित असत; त्यामुळें त्यांना टार मारून त्यांचे विहार मोडल्याबरोबर बौद्ध धर्म संपुष्टांत आला; परंतु हिंदू लोकांवर बौद्ध धर्मीय लोकांप्रमाणें प्रसंग आला नाहीं; व मुसलमान लोकांनीं त्यांच्या अनेक देवालयांचा विध्वंस केला, मूर्तीचा भंग केला, मथुरा, कनोज, बनारस, सोमनाथ येथें ब्राह्मणांच्या कत्तली केल्या, हिंदुस्थानांतील अपार संपत्ति घोर व गज्नी येथें नेली; तथापि सामाजिक आचारविचार, व संस्कृत वाङ्मय या बाबतींत हिंदूधर्माची पाळें मुळें अत्यंत खोल रुजली गेली असल्यामुळें त्यांनां हिंदूधर्म नामशेष करितां आला नाहीं;

अशा प्रकारच्या ह्या हिंदुधर्माबद्दल निरनिराळ्या प्रसिद्ध लेखकांनी आपापल्या ग्रंथांत व व्याख्यानांत मननीय उद्गार काढिले असून, लंडन येथील " सोसायटी आफ् आर्टस " चे विद्यमानें चालणाऱ्या व्याख्यानमालेंत सर व्हॅलेंटाइन चिरोल यांचें " हिंदूधर्मरहस्य " या विषयावर लार्ड मेस्टन यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतेंच ( माहे जुलई, सन १९२० मध्यें ) एक व्याख्यान झालें. त्यावेळीं चिरोल साहेबांनं हिंदुस्थानाबद्दल, विशेषतः हिंदूधर्माबद्दल बरीच

माहिती मिळवून हिंदुस्थानचें स्थैर्य हिंदूधर्मावर अवलंबून आहे, असें प्रतिपादन केलें; चिरोल साहेबाचे असें म्हणणे आहे कीं " अत्यंत पुरातन कालापासून हिंदुस्थान देश विशिष्ट प्रकारच्या संस्कृति बद्दल विख्यात असून मुद्दां त्या देशाचा तत्कालीन इतिहास दंतकथा व पौराणिक कथांच्या अंधुक प्रकाशांतून नुकता अलीकडे दृग्गोचर होऊं लागावा, हें हिंदुस्थानासंबंधीं ज्या अनेक आश्चर्य उत्पन्न करणाऱ्या गोष्टी आहेत, त्यापैकींच एक होय. पाश्चात्त्य संस्कृतिचा उगम ज्या देशांपासून झाला त्या देशांचा प्राचीन इतिहास जितपत विश्वसनीय आहे, तितपत मुद्दां हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास विश्वसनीय नाहीं. हिंदुस्थानच्या अनेक धार्मिक ग्रंथांतून हिंदुस्थानची धार्मिक व सामाजिक उत्क्रांतीं अनेक शतकें कसकशी होत गेली याबद्दल माहिती आढळते. या ग्रंथांतून प्रतिपादिलेल्या धर्माला सर्व साधारण नांव " हिंदुधर्म " असें आहे. ख्रिस्ती शकापूर्वी ६०० शें वर्षें हिंदुस्थानची अशी स्थिती होती; मध्य आशियांतून आर्य लोक हिंदुस्थानांत आले, व त्यांनीं पंजाब, व गंगेच्या आसमतांतील प्रदेश, व्यापिला. ह्या आर्यांनीं तत्कालिन एकेश्वर व अनेकेश्वरवादी लोकांच्या धर्म समजुतीच्या जाळ्यांतूनच मुद्देसूद व सर्वव्यापी असे कायदे अथवा स्मृती तयार केल्या. धर्मगुरू व राजे यांची द्विदळ शासन पद्धति सुरक्षित राखण्याकडे या स्मृतींचा विशेष कटाक्ष होता; वेद ग्रंथांची भाषा सर्वांना समजण्या सारखी नसल्यामुळें व संस्कृत भाषा केवळ ब्राह्मणा करितांच असल्यामुळें ब्राह्मणांचें इतर जातींवर वर्चस्व राहिलें. जाती भेदाच्या सामाजिक तत्वांचाही हें वर्चस्व कायम राखण्यास पाठिंबा मिळाला. जातिभेदाची जोपासना " दैव यत्तं कुले जन्म " व जिवाच्या चौऱ्यांशीं फेऱ्यांच्या कल्पनेवर झालेली होती. हिंदुधर्म विषयक कल्पनांच्या अभेद्य दुर्गावर बौद्ध धर्मानें पहिला हल्ला चढविला. महंमदी स्वाऱ्या पूर्वीं बौद्ध धर्माचा जिकडे तिकडे बोलबाला झाला, पण लवकरच त्या धर्माला उतरती कळाही लागली. ख्रिस्ती शका पूर्वींच्या तिसऱ्या शतकांत अशोकाच्या कारकीर्दींत बौद्ध धर्माची वाढ शिखरास पोहोंचली, व गुप्त राजांच्या कारकीर्दींत बौद्ध धर्माचा-ह्रास होऊन ब्राह्मणांनां पूर्वींचें वर्चस्व प्राप्त झालें. ख्रिस्ती शकाच्या चवथ्या किंवा पांचव्या शतकांत हिंदी संस्कृतीची वाढ झपाट्यानें होत होती. हिंदुस्थानच्या त्या काळच्या इतिहासाचे दोन विशेष म्हटले म्हणजे, आर्यांना आपल्या राजकीय सत्तेला संघटित व व्यवस्थित स्वरूप देतां आलें नाहीं हा एक,

व त्या काळात आर्य लोकांनीं हिंदु समाजाचा अभेद्य व अत्यंत महत्वाचा गणला जाणारा पाया रचून काढिला हा दुसरा, होय. हिंदु समाजाची रचना त्यांनीं अशा कांहीं विशेष कुशलतेनें केली आहे कीं हिंदुस्थानांतील असंख्य लोक आपल्या पूर्वापार धर्म कल्पना कायम ठेवून आनंदानें त्या समाजात राहूं शकतात; शिवाय त्याच रचनेमुळें आर्यांच्या वर्चस्वासही बाध येत नाहीं. अंतस्थ भांडणा मुळें मौर्यांची आणि गुप्त राजांची ज्या प्रमाणें वाताहत झाली त्याप्रमाणें हिंदु धर्मामुळें बौद्ध धर्माची वाताहत झाली. हिंदु भूमीवर हिरव्या रंगाचें इस्लामी निशाण रोंविलें जाण्या पूर्वी हिंदी राजकारणात होणाऱ्या फेरबदलानुरूप हिंदु धर्माला वारा येईल त्याप्रमाणें पाठ देणें, जबरदस्ताशीं अदबीनें वागणें, वेळ प्रसंगीं त्यांच्याशीं तादात्म्य होणें, वगैरे मार्गाचें अवलंबन करावें लागले, व तेंच मार्ग पुढें सप्त शतकाच्या मुसलमानी अमलाखालीं ही हिंदु धर्माला वागविण्यास कारणीभूत झाले. हिंदी ईश्वरवाद व तत्वज्ञान यावर इस्लामी छटा उमटली; परंतु इस्लामी अमला पेक्षाही ब्रिटिश अमलानें—तत्वतः हिंदी व इतर कोणत्याही लोकांच्या धर्मात ढवळा ढवळ करणार नाहीं अशी ग्वाही दिलेल्या ब्रिटिश अमलानें—हिंदूधर्मात पुष्कळच फेरबदल घडवून आणिला. एका हातात कुराण व दुसऱ्या हातात खंजीर घेऊन लढाई करणाऱ्या मुसलमानांपेक्षा ब्रिटिशांच्या सहानभूतीयुक्त औदासिन्यानेंच अधिक कामगिरी केली. एक शतकापूर्वी तर हिंदु धर्माचा डोलारा कोसळून त्या जागीं ख्रिस्ती धर्माची व पाश्चात्य संस्कृतिची संस्थापना होणार, असें इंग्रज लोकांना वाटूं लागले होते, व या कल्पनेला पोषक अशा गोष्टीही घडून येऊं लागल्या होत्या; परंतु सत्तावन सालच्या बंडानें व त्याच्या बीं मोडामुळें उद्भुत झालेल्या वैमनस्यामुळें वरील आकांक्षा फोल ठरविल्या. हिंदुस्थानातील निरनिराळ्या लोकांच्या विविध भाषा असल्यामुळें विचार विनिमयाला मोठाच अंतराय होता; तो अंतराय इंग्रजी भाषेनें दूर केला, व त्यामुळें सर्व सुशिक्षित हिंदी लोकात एक राष्ट्रीयत्वाची कल्पना बाणली. ह्या एक राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचें बीज हिंदूंच्या धर्मग्रंथरूपीं मंजुषेंत होतें; कारण त्या कल्पनेमुळेंच बौद्ध धर्माविरुद्ध ब्राह्मणांची मोहीम यशस्वी झाली होती. हिंदुस्थान देशांवर शंभर वर्षे राज्य करूनही इंग्रजांना हिंदुधर्माच्या चिवटपणाचें रहस्य अजून समजलें नाहीं. हिंदुस्थानच्या सामाजिक व धार्मिक घटनेंत जरी पुष्कळ दोष असले तरी त्यांची घटना अशी कांहीं मनोज्ञ आहे कीं,

त्यामुळेंच हिंदुधर्माला आज हजारों वर्षें हजारों प्रकारच्या झुंजा खेळूनही स्वत्व राखितां आलें. ब्रिटिश अमलाखालील हिंदुस्थान हल्लीं संक्रमणावस्थेंत आहे. हा संक्रमण काळ हिंदुस्थान देशाच्या पूर्वीच्या संक्रमण काळापेक्षा लहान असला तरी सुद्धा हाच पूर्वीच्याहून फार महत्वाचा आहे; " चिरोल साहेबाच्या वरील भाषणानंतर अध्यक्ष लार्ड मेस्टन यानें समारोप केला; तो असा कीं, "हिंदुधर्मा-मधील चिवटपणा फार आश्चर्यकारक आहे; हा हिंदुधर्म, अनेक भयंकर दिव्यां-मधून तावून सुलाखून सुरक्षितपणें बाहेर निघालेला आहे. या हिंदुधर्मानें बौद्ध व जैन धर्मांतील पुष्कळ तत्वें स्वीकारिलीं आहेत. मुसलमान लोकांच्या स्वधर्म-इस्लामीधर्म---संस्थापनेच्या बलाढ्य महत्वाकांक्षेशीं टक्कर देऊन या हिंदुधर्मानें आपलें सत्व रक्षण केलें आहे; आणि हजारों वर्षें अशा तऱ्हेनें झुंज चालू असतां ज्या हिंदुधर्मानें टिकाव धरिला. एवढेंच नव्हे तर लक्षावधि अनुयायी मिळविले, त्या धर्माची-म्हणजे त्या हिंदुधर्माची-महती अवर्णनीय आहे. यावरून या ( हिंदु ) धर्मांत स्वयंभू व अमर असेंच कांहीं सद्‌गुण असले पाहिजेत, हें उघड आहे. व हिंदी कौटुंबिक पद्धति, मनुष्य प्राण्याच्या पुढील आयुःक्रमा बद्दलचें दूरदर्शित्व, व मोक्षसाधनाचा अट्टाहास, हे उपरी निर्दिष्ट सद्‌गुणांपैकींच कांहीं आहेत; " वरील विवेचनावरून, हिंदुधर्मांतील चिवटपणा, हिंदुधर्माचें रहस्य, त्या धर्मांतील कित्येक स्वयंभू व अमर असे सद्‌गुण, व त्या धर्माची महती, वगैरे गोष्टी, हल्लींच्या काळीं सुध्दां राज्यकर्त्या इंग्रज लोकांतीलच प्रसिध्द लेखक, व विद्वान लोक, मान्य करितात, हें उघड आहे. त्याप्रमाणेंच चिरोल साहेबाच्या वरील व्याख्यानांतील कांहीं बाबतीं संबंधानें पुष्कळच साधक बाधक विवेचन करितां येण्यासारखें आहे; परंतु स्थळाभावामुळें तसें करणें शक्य नाहीं; तथापि चिरोल साहेबानें कबूल केलेलें हिंदुधर्माचें रहस्य, आणि मुख्यतः लार्ड मेस्टनचें समारोप करितांनाचें भाषण, मोठें मननीय, व हिंदुधर्माबद्दल योग्य आदर दर्शक-व हिंदू लोकांनां अभिमानदर्शक-असेंअसून, तें विशेषतः प्रत्येक हिंदू मनुष्यानें लक्षांत ठेवण्यासारखेंच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

" हिंदुस्थान " हा सर्व जगांतील अद्‌भुत देश आहे; सर्व जगाला आपणाकडे ओढून घेण्याची आकर्षण शक्ति या देशांत आहे; हिंदुस्थान ही एक जादू आहे; हिंदुस्थान, हा शब्द जगांतील प्रत्येक देशाला माहिती आहे;

हिंदुस्थान हा जगांतील अती प्राचीन देशांपैकींचा एक देश आहे; आणि हिंदुस्थानची संस्कृति प्राचीन कालापासून जगभर जाहीर झालेली आहे; " बारा, तेरा, व चौदा, या तीन शतकांत युरोपियन राष्ट्राची अंतःस्थिती बरीच हीन होती. रस्ते, इमारती, गाड्या, कपडा, शिल्पकला, इत्यादि बाबतींत हिंदुस्थान देश युरोप खंडाहून श्रेष्ठ होता. विजापूर, जोनपूर, येथील उत्कृष्ठ इमारती अद्याप जर लोकांस थक्क करितात, तर त्यावेळचें काय वर्णन करावें ! भाषेचा, वाङ्मयाचा, किंवा व्याकरणाचा युरोपांत उदय सुध्दां झाला नव्हता, त्यावेळेस हिंदुस्थानांत उत्तमोत्तम कोश, व्याकरणें, नाटकें, काव्यें, व अलंकार, न्याय, तर्क, इत्यादिकांवर सर्व मान्य ग्रंथ होऊन चुकले होते; ही गोष्ट मनांत आणिली म्हणजे परकीय अंमलाखालीं सुध्दां वरील काळांत हिंदुस्थानची स्थिती बरीच समाधानकारक होती असें म्हणावें लागतें. युरोपांत अज्ञानांधकार भरला होता. इंग्लंडच्या उदयास आरंभ नव्हता. इतालीच्या पुनर्जन्माची वार्ता नव्हती. जर्मनी व फ्रान्स येथें बादशाही अंमल नांदत होता; तरी समाज एकंदरींत हीन स्थितींतच होता. पुस्तकें छापण्याच्या कलेस आरंभ होऊन ज्ञान वृद्धि होण्यास युरोपांत अजून अवकाश होता; तत्पूर्वी युरोपचे लोक अज्ञानी असून हिंदुस्थानच्या मानानें फारच मागसलेले होते. अटलांटिक महासागरांत अगर आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत सुद्धां जाण्याची युरोपच्या खलाशास छाती होत नसे; अशा वेळीं; ( हिंदुस्थानांतील ) काठेवाडच्या खलाशांनीं पूर्वेस जावा, सुमात्रा, बोर्निओ, व जपान, आणि पश्चिमेस आफ्रिकेच्या दक्षिण किनाऱ्या पावेतों, समुद्रप्रवास करून आपल्या वसाहती स्थापिल्या होत्या. व्यापाराच्या संबंधानेंही युरोपखंड तसेंच अतीशय मागसलेलें होतें. अर्वाचिन युरोपांत मुत्सद्दी पुरुषाचें नांवही नव्हतें, अशा वेळीं हिंदुस्थानांत महंमद गवान, आसदखान, माधवाचार्य, विद्यारण्य, ह्यांच्या सारखे राजकारण कुशल पुरुष निपजले. युरोपियन राष्ट्रें ह्या वेळेस नूतन ज्ञानाच्या बालर्क प्रकाशानें नुकतींच कोठें जागीं होऊं लागलीं होतीं. पहिला मोंगल बादशहा बाबर हा योग्यतेनें व ज्ञानानें ह्या पुनरुज्जीवनाच्या काळास शोभणारा असा होता. इंग्लंड व स्कॉटलंड ह्या दोन देशामध्यें फ्लाडन फील्ड येथें प्रचंड युद्ध होऊन स्कॉटलंडच्या मध्यकालीन सरदार लोकांचा पाडाव झाला. खिस्ती व मुसलमान यांच्यांत सारखे झगडे चालू होते. खिस्ती धर्माची श्रेष्ठता जागास दाखविण्या साठीं लूथर सारख्या

महात्म्यांनीं जिवापाड मेहनत सुरू केली, तिच्या योगानें सर्व युरोप खंडभर धर्म जागृति झाली. प्रसिद्ध चित्रकार मिकेल अँजेलो ह्यानें रोम शहरीं सेंट पिटर्स या नांवाचें विख्यात मंदिर बांधण्याचें काम सुरू केलें. सन १४५३ मध्यें तुर्क लोकांनीं पूर्व रोमन बादशाहीचा पाडाव करून कान्स्टांटिनोपल उर्फ कुस्तंतुनिया (इस्तंबूल) हें शहर काबीज केलें; तेथें तुर्क बादशहा आज तागाईत राज्य करीत आहे. होकायंत्राच्या शोधानें भूगोल शास्त्रांत प्रगति होऊन कोलंबस सारख्या साहसी पुरुषांनीं अमेरिका खंड पाश्चात्त्यांचे अटोक्यांत आणून दिलें. हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांचा प्रवेश झाला. इंग्लंडांत आठवा हेन्री, फ्रान्सवर पहिला फ्रान्सिस, जर्मनी व स्पेन येथें पहिला चार्लस, असे पराक्रमी राजे युरोपांत राज्य करीत असतां, हिंदुस्थानांत मोंगल बादशाहीची स्थापना झाली. युरोपांत अज्ञानांधकाराचा झपाट्यानें नाश होत चालला असतां पूर्वेकडे हिंदुस्थानांत नवीन ज्ञानवृद्धी तर दूरच, पण असलेली सुधारणा व ज्ञान ह्यांचा तितक्याच झपाट्यानें—र्‍हास होत चालला होता. नाहीं म्हणण्यास मराठी भाषेस मात्र या काळीं नवीन चलन मिळूं लागलें होतें. संस्कृत भाषेचा अभ्यास उत्तरोत्तर नष्ट होत चालल्या मुळें तींतील ज्ञान भांडाराचा लाभ बहुतेकांस दुर्मिळ झाला. तेव्हां ज्ञानेश्वरा सारख्या पंडितांनीं संस्कृतांतील ज्ञानभांडार फोडून, आबाल वृद्ध महाराष्ट्रीयांस तें लुटण्यास खुलें करून दिलें. ज्ञानदेवाचा हा कित्ता असाच वळविण्याचा प्रघात पडल्यामुळें मराठींत अनेक विद्वान पंडित, व संत कवी निपजून, त्यांनीं संस्कृताच्या धर्तीवर मराठींत मोठमोठे ग्रंथ रचिले ''......हिंदुस्थानांत मुसलमान लोक आल्यानंतर आणि त्यांनीं या देशांत आपलीं राज्यें स्थापन केल्यानंतर, ''मुसलमान व हिंदू भावाभावां सारखे वागत. दोघांतले ही श्रीमंत व सरदार वगैरे लोक हरहंमेश एक-मेकांच्या घरीं जात; एकमेकांच्या उपयोगीं पडत, आणि एका कामांत संविभागी होत. समारंभ, उत्सव, किंवा उरूस, वारंवार होत; व त्यांत दोन ही लोक सामील होत. अशा प्रसंगीं सर्व प्रकारचे साधू, बैरागी, फकीर, व्यापारी, व कामकरी लोक, एकत्र जमत; निरनिराळ्या विषयावर वादविवाद करीत; आणि अनेक प्रकारचे व्यवहार एकमेकांशीं करीत. अशा अर्थानें या दोनही समाजांचा अगदीं एक जीव झाला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं; राज्य कारभारांत मुसलमानांनीं कितीही कुशलता दाखविली असली तरी त्यांच्या

कर्तबगारीचा एकंदरीनें विचार केला असतां, जिकलेल्या लोकांची स्थिती खरोखर सुधारून त्यांस उन्नत सुखावस्थेप्रत आणण्याचा प्रयत्न ह्या कालांत बहुधा कोणीही केलेला दिसत नाहीं. हा कष्टमय परिणाम मनांत आला म्हणजे ह्या मुसलमान राज्यकर्त्यांविषयीं मनांत खेद उत्पन्न होतो. रोमन किंवा इतर युरोपियन राष्ट्रांनां अशा कामीं आपल्या कर्तव्याची जबाबदारी जास्त वाटत होती, असें दिसून येतें. रोमन लोकांनीं जिंकिलेल्या लोकांस सन्मार्गास लाविलें. त्यांच्या उलट प्रकार येथें ( हिंदुस्थानांत ) झाला. येथील रणशूर रजपुतांना नाहींसें करून, आणि त्यांच्यांत फाटाफूट पाडून, आपलें राज्य कायम ठेवण्याकडेच मुसलमान राज्यकर्त्यांची दृष्टी होती. ह्या परकीय ( मुसलमानी ) अंमलापासून हिंदुस्थानचा फायदा झालेला दिसत नाहीं. सारांश, पांचशें वर्षांच्या ह्या काळांतील हिंदुस्थानच्या स्थितीचा सामग्रयानें विचार केला असतां, अनेक चमत्कारिक भावना मनांत उत्पन्न होतात, आणि विचार शक्ति अधिकाधिक गुंग होऊन जाते. किंबहुना हिंदुस्थान देशाचा एकंदर इतिहासच अशा प्रकारचा अक्कल गुंग करून टाकणारा आहे, असें म्हणावें लागतें. पृथ्वी वरील सर्व राष्ट्रांस आजपर्यंत हिंदुस्थाननें नाचविलें आहे, आणि पुढें ही नाचवील असा संभव दिसतो. लार्ड कर्झनचे ( हिंदुस्थान देशासंबंधीचे ) खालील उद्गार सर्वथैव खरे आहेत यांत संशय नाहीं. " हिंदुस्थानचा इतिहास, तेथील राज्यांच्या घडामोडी, व तेथचे प्रचंड उत्पात, ह्यांच्या योगानें एकंदर मनुष्य जातीवर जेवढा परिणाम घडला आहे तेवढा बहुधा दुसऱ्या कशानेंही घडला नसेल. " * ( सरदेसाई कृत मुसलमानी रियासत, हें पुस्तक पहा. )

अशा प्रकारचा हा हिंदुस्थानचा अद्भुत इतिहास असून, कांहीं म्हटलें तरी, एकंदरीनें पाहतां हिंदू लोकां प्रमाणेंच मुसलमान लोकांची ही पूर्व कालीन संस्कृति प्रसिद्ध आहे. या बाबतींत मुसलमानी जगाच्या इतिहासांतील,—हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यांच्या इतिहासांतील माहिती मुद्धां—अनेक उदाहरणें

---

* The history, politics, and upheavals of India, have left a greater impress than almost any other, upon the history of mankind.

Lord Curzon's Speech

at Eton-Prize Essay, 1909.

देऊन, पुष्कळ विवेचन करितां येण्यासारखें आहे, तथापि The case for Indian Home Rule या इंग्रजी पुस्तकांतील "हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति" या संबंधींच्या विवेचनांत जो त्रोटक, परंतु मुद्देसूद, व महत्वाची हकीकत दिली आहे, त्यावरूनच मुसलमानांच्या प्राचीन संस्कृतीचा पूर्ण बोध होण्यासारखा असल्यानें अधिक व इतर माहिती न देतां स्थलाभावामुळें तीच या ठिकाणीं ग्रंथित केली आहे. ती अशी:—हिंदु लोकांच्या नंतर, हिंदुस्थानचा महत्वाचा घटक बनलेली दुसरी जात म्हणजे "मुसलमान जात" ही होय. या मुसलमान जातीनें ही, सुधारणेच्या सर्व बाबतींत, हिंदू लोकाप्रमाणेंच उत्तम कामगिरी करून दाखविली आहे. या ठिकाणीं मुसलमानांच्या पूर्वेतिहासांत शिरण्याचें आपणास कारण नाहीं; तथापि सोईसाठीं, आपण सर्व मुसलमान एक समजूं या. आरब संस्कृतीच्या उच्च कल्पनांनीं, युरोपखंडांत प्रवेश करून तेथें आपली छाप पाडिली, व त्या ठिकाणीं त्या दृढमूल झाल्या, ही गोष्ट कोणासही नाकबूल करितां येणार नाहीं. ज्यावेळीं रानटी लोकांनीं रोमन साम्राज्य छिन्नविछिन्न करून टाकिलें, व अनेक परस्परविरोधी व हट्टी ख्रिस्तानुयाच्या कलहानें ख्रिस्तीधर्म हीन स्थितीप्रत जाऊन निःसत्व झाला, त्यावेळीं अरबांनीं आपला धर्म व तरवार यांच्या जोरावर नवजीवन उत्पन्न केलें. मुसलमानांनीं पूर्वेकडे आपल्या विजयी सेना आणण्या पूर्वीच त्यांनीं पश्चिमेकडे विजय संपादन केला होता. आठव्या शतकांत मुसलमानांनीं भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील सर्व प्रदेश काबीज करून जिब्राल्टर पर्यंत धडाडी मारिली, व अवघ्या दहा वर्षांतच सर्व स्पेन देश पादाक्रांत करून फ्रान्समध्यें पॉईटर्सच्या तटापर्यंत ते जाऊन धडकले. गिबन म्हणतो:— "या विजयी सेना जिब्राल्टरपासून लॉयरपर्यंत एक हजार मैल सारख्या पसरलेल्या होत्या, व हीच त्यांची गती कायम राहिली असती तर, आरबी फौजा पोलंड, व स्कॉटलंडमधील हायलँड वरही उतरल्या असत्या; नाईल किंवा युफ्रेटीस पेक्षां ऱ्हाईन नदी दुर्गम नाहीं. तेव्हां कोठेंही अडथळा आल्याशिवाय आरबी आरमार, थेम्स नदीच्या मुखांतही सुखानें उतरलें असतें, व कदाचित् आज ऑक्सफोर्डच्या विद्यालयांत कुराण पढविलें जाऊन, महंमदी धर्माच्या पावित्र्याबद्दल व सत्यतेबद्दल प्रवचनें सुरू झालीं असतीं." आरबांची संस्कृति ही त्यांच्या शौर्याहून कमी नव्हती. स्पेनमध्यें त्यांच्या कलेची व विद्याभिलाषाची स्मृतिचिन्हें अद्यापि दृग्गोचर होत आहेत. त्यांची बरोबरी आजकालचे युरोपियन

जेतेही करूं शकत नाहींत. कारडोव्हा, व बगदाद येथील विश्वविद्यालयांची आठवण आजही विद्याभिलाषी लोकांनां होत आहे. कारडोव्हा येथें ६०० मशीदीं, ९०० स्नानगृहें व दोनलक्ष निवासस्थानें होतीं. स्पेनच्या मुसलमान राजांनीं केलेले कायदे पहिल्या प्रतीच्या ८० नगरांत, व दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रतीच्या ३०० शहरांतून चालत असत. त्याकाळीं लोक अत्यंत संपन्न, व धनवान असून, पुष्कळ लोक शेती करीत असत. स्पेनच्या ज्या लोकांनीं, प्रजा अगर गुलाम या पेशानें मुसलमानी धर्म स्वीकारिला, ते ताबडतोब स्वतंत्र होऊन, राज्यकर्त्या मुसलमानांच्या बरोबरीचे होत असत. बगदादच्या खलिफांचें वर्णन इतिहासकारांनीं अत्यंत सुंदर केलेलें आहे. ‡ बगदाद शहराला "शांतिनगर" असें म्हणत.

---

‡ बगदाद येथील खलिफास आब्बासी खलीफा असें म्हणतात; त्यांचें राज्य बगदाद येथें पांचशें वर्षें मोठ्या भरभराटींत होतें; आणि गिबनच्या म्हणण्या प्रमाणें, मुसलमानांच्या पहिल्या शंभर दोनशें वर्षांत, सत्ता व ऐश्वर्य या दोन्हींही बाबतींत खलिफांची बरोबरी करणारे दुसरे कोणतेही राजे पृथ्वीवर नव्हते; व सिंधू, अमुदार्या व तेगस या तीन्हींही नद्यांच्या कांठीं असलेल्या प्रदेशांत खलिफांचा शद्ब नेहमीं मान्य केला जात होता." अरब विद्वानांनीं या ठिकाणच्या खलिफांच्या पदरीं राहून शास्त्र, तत्वज्ञान, व वांग्मय, वगैरे बाबतींत अलौकिक कीर्ती मिळविली होती. प्रसिद्ध बादशहा हारून-अल्-रशीद ( कारकीर्द इ० सन ७८६ ते ८०९ पर्यंत ) याच्या कारकीर्दींत, व्यापाराची वृद्धी झाली, व त्यानें मशिदी, दवाखानें, विद्यालयें, धर्मशाळा, रस्ते, पूल, कालवे, वगैरे अनेक लोकोपयोगीं कृत्यें केली; हा खलिफा रात्रीं वेष पालटून बगदाद शहरांत फिरत असे; याच्याच संबंधीं (आणि याचा दुसरा मुलगा अब्दुल्ला-अल-मामून याच्या संबंधी) "अरेबियन नाईट्स" अथवा "अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी" या पुस्तकांत उल्लेख आलेला असून-व तेच या गोष्टींचे नायक असून-हें पुस्तक विशेष वाचनीय, मनोरंजक, बोधप्रद, व विविध माहिती पूर्ण, असें आहे; हारून-अल्-रशीद याचा दुसरा मुलगा अब्दुल्ला-अल्-मामून याची कारकीर्द तर विशेषच प्रसिद्ध असून याच्या कारकीर्दींत वांग्मय विषयक बाबतींची अतीशय प्रगति झाली; व गणित, भूगोल, खगोल, वैद्यक, वगैरे शास्त्रीय विषयांत अरबांनीं प्राविण्य मिळविलें; इतकेंच नाहीं तर त्यांचे या बाबतींतील उद्योग आजही सर्व मान्य

बगदाद येथील खलीफाच्या दरबारची जागा सोन्यामोत्यांनीं मढविलेली होती; इमारतींना स्पॅनिश, आफ्रिकन, ग्रीक, वगैरे विविध ठिकाणचे व रंगाचे सुंदर संगमरवरी दगड जडविले होते. खलिफांच्या उद्यानांत हजारों कारंजीं असून त्यांतील एक तर शुद्ध पाऱ्यानेंच भरलेलें असे. विद्यालयांना अत्यंत उदार हस्तानें देणग्या मिळत. सुलतानाच्या एका वजिरानें बगदादमध्यें एक विद्या

---

म्हणून गणले गेलेले आहेत. हा बादशहा मोठा प्रजादक्ष असून, आपल्या लोकांनीं ज्ञान संपादन करावे अशा इच्छेनें त्यानें आपल्या सर्व राज्यभर विद्यालयें स्थापन करून त्यांच्या खर्चाचीही स्वतंत्र व्यवस्था करून दिली होती. शिवाय, विविक्षित जाती करितांच त्यानें ही व्यवस्था केली नसून सर्व जातीच्या लोकांस शिक्षण देण्याकरितां त्यानें ही व्यवस्था केली होती. हा खलिफा विद्वानांचा भोक्ता असून अनेक कवी, तत्ववेत्ते, व पंडित, त्याच्या दरबारीं नेहमीं येत असत; याच्या कारकीर्दीत ज्योतिष शास्त्राची प्रगति होऊन अनेक नवीन शोध लावण्यांत आले; शिवाय त्यानें संस्कृत, ग्रीक, व खाल्डी, वगैरे भाषांतील महत्वाच्या व सर्वमान्य अशी वाङ्मय विषयक ग्रंथाची भाषांतरें करवून तीं प्रसिद्ध केलीं, व अशा रीतीनें आपल्या देशांतील वाङ्मय ज्ञानांत त्यानें विशेष मोल्यवान भर घातिली. या उभयतांचे खलिफांच्या कारकीर्दीत अतीशय विद्यावृद्धि झाली; कारण दर एक मशीदीला विद्यालय जोडलेले होतें, आणि या खलिफांच्या सर्व राज्यांत विद्यालय नाहीं असें एकही शहर नव्हतें; या उभयतांच्या कारकीर्दीत अनेक तत्ववेत्ते, इतिहासकार, गणिती, ज्योतिषी, व विद्वान मंडळी निर्माण झाली; शिवाय याच अरब लोकांनीं स्वतःच्या बुद्धिबलानें मुसलमानी कायदा निर्माण केला. हा कायदा आजच्या कालांत ही सर्व मान्य असून रोमन कायद्याच्या खालोखाल त्यास मान मिळतो; थोडक्यांत म्हणजे अरब लोकांनींच भूगोल, खगोल, भूमिती अंकगणीत, बिजगणीत, वैद्यक, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, वगैरे अनेक विषयांचे ज्ञान आर्य व ग्रीक लोकांपासून मिळवून त्याची अतीशय प्रगति केली; होकायंत्र व बंदुकीची दारू अरब लोकांनीं प्रचारांत आणिली; मोठमोठ्या पाठशाळा व पुस्तकालयें निर्माण केलीं, आणि बगदाद, केरो, कोर्डोव्हा वगैरे ठिकाणीं मोठमोठीं विद्यालयें स्थापन करून आपल्या राज्यभर, व युरोपभरही ज्ञानवृद्धि केली.

मंदिर स्थापण्यासाठीं, दोन लक्ष सुवर्णमुद्रा देऊन शिवाय वार्षिक देणगी पन्नास हजार दिनारांची दिली होती; एखाद्या अमिराच्या मुलापासून तो तहत एखाद्या मजुराच्या मुलापर्यंत सर्वांना सारखें शिक्षण मिळत होतें, व अशा रीतीनें सहा हजार विद्यार्थ्यांना विद्यादान दिलें जात होतें. गरीब विद्यार्थ्यांसाठीं छात्रवृत्ति ठेविल्या असून, शिक्षकांनाही आपले गुण व श्रम यांच्या प्रमाणानें वेतन दिलें जात होतें. इजिप्तच्या बादशाही ग्रंथालयांत उत्कृष्ट लिहिलेले व सुंदर बांधणीचे, असे एक लक्ष ग्रंथ असून कैरो येथील विद्यार्थ्यांना त्याचा फार उपयोग होत होता; परंतु स्पेनमधील उमरावांनीं स्थापन केलेल्या ग्रंथालयापेक्षा, हा संग्रह लहान वाटेल; कारण त्या संग्रहालयांत सहा लक्ष ग्रंथ असून, त्यापैकीं ४४ ग्रंथ, संग्रहालयांतील ग्रंथांच्या सुची अथवा याद्या होत्या. त्यांची राजधानी कारडोवा ( उर्फ कार्डोव्हा ) व आसपासच्या शहरीं ३०० वर ग्रंथकार निर्माण झाले; व एँडालुसिअन राज्यांत सत्तर ठिकाणीं ग्रंथालयें उघडलीं गेलीं; युरोपांत कृष्ण युग सुरू होईपर्यंत म्हणजे सुमारें पांचशें वर्षेपर्यंत सारखा अरबी विद्येचा प्रसार होत होता."

"आतां आपण हिंदुस्थानांतील मुसलमानाकडे वळू या ! महंमद गझनवीनें हिंदुस्थानावर स्वाऱ्यावर स्वाऱ्या करून सोमनाथापर्यंत प्रदेश आक्रमण केला, व अलोट संपत्ति लुटून नेली. अल्लाउद्दीननें हिंदुस्थानांत मोठमोठे विजय संपादन केले, अथवा शिकंदरलोदी याचा राज्यकारभार अत्यंत सुखकर होता, या गोष्टींचें वर्णन दिलें नाहीं तरी त्यांचा उल्लेख हा केलाच पाहिजे. तैमूरच्या मोंगल घराण्या पर्यंत आलों म्हणजे मात्र एकापेक्षा एक विलक्षण राज्यकर्ते दिसतात. मिस्तर सिडने ओवेन हा आपल्या "India on the eve of British Conquest" या पुस्तकांत लिहितो:—" या मोंगल घराण्यांत एकापेक्षां एक वरचढ असे लागोपाठ सहा राज पुरुष होऊन गेले. त्यांतील पहिला मोंगल-साम्राज्य संस्थापक बाबर, ( आणि ) तिसरा अकबर, यानें तर साम्राज्याचा पुनरुद्धार करून त्याचा विस्तार केला; व त्यानें अशीं पुढें केली कीं त्याची तुलना चार्लस धि ग्रेट याच्याशीं करितां येईल. शिवाय त्यानें लष्करी पद्धतींत ही पुनर्रचना केली. सहावा बादशहा आलमगीर, हा आपल्या तरुणपणा पासूनच मोठा लढवय्या असून आपल्या आयुष्याचीं शेवटचीं तेवीस वर्षे एका दीर्घ कालीन युद्धांत घालवून युद्धाचा शेवट न होतांच, जर्जर होऊन आपल्या वयाच्या ८६

त्या वर्षी मृत्यु-मुखीं पडला. " पाश्चात्य लेखकांनीं अकबराची जितकी स्तुती केली आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याही पौर्वात्य राजाची केलेली नाहीं; आणि अकबर या स्तुतीस पात्रही होता. अकबरानें राजकार्यांत जी योग्यता दाखविली आहे, त्याचें विस्तृत वर्णन करण्याची या ठिकाणीं आवश्यकता नाहीं; पण जातां जातां एवढें सांगितलें पाहिजे कीं, त्याची वसूली पद्धत, जमीन मोजण्याची रीती, लोक संरक्षणाची त्याची योजना, लोक मताला तो देत असलेला मान, व त्याची धार्मिक सहिष्णुता या गुणांमुळें त्याचे समकालीन त्याजवर प्रेम करीत, व त्याच्या मागचे लोक त्याची स्तुतीस्तोत्रें गात आहेत. त्याच्या अर्थशास्त्र पारंगते बद्दल "आयने अकबरी" हा ग्रंथ मूर्तिमंत उदाहरण आहे. जहांगीरचा मेहुणा अशफरखान ( आसफखान ) यानें इंग्रज वकील टेरी याला, एक मेजवानी दिली; तिचें विस्तृत वर्णन त्यानें केलें आहे. तें पाहिलें म्हणजे, उच्च दर्जातील मुसलमानांची शिष्टाचार पद्धति किती उच्च कोटींतील होती, याची कल्पना येते. मोगल साम्राट व्यापार वृद्धिकडे विशेष लक्ष देत असत, व त्यामुळेंच एकट्या ( इंग्रज ) ईस्ट इंडिया कंपनीलाच नव्हे, तर दुसऱ्याही कित्येक युरोपियन व्यापाऱ्यांना व्यापाराची परवानगी देण्यांत आली होती. मालावर विशेष जकात नसे; तथापि चांदीच्या माला बद्दल विशेष निर्बंध होते. मोगलांना चिनी मातीच्या भांड्यांचा फार शोक असे, व असें सांगतात. कीं, अकबर मेला त्यावेळीं फक्त आग्रा येथील राजवाड्यातच पंचवीस लक्ष रुपयांहून अधिक किमतीचीं नक्षी केलेलीं भांडीं पूर्वेकडील चीन व पश्चिमेकडील व्हेनीस येथून आलेलीं होतीं. देशांत शांतता व सुबत्ता नांदत असल्या शिवाय, अशा प्रकारचा व्यापार अर्थातच चालत नाहीं. मिस्तर व्हिन्सेंट स्मिथ हा आपल्या "अकबर" या पुस्तकांत लिहितो कीं, अकबराच्या वेळीं वाहतुकीचे रस्ते फारच सुरक्षित असले पाहिजेत. कारण टेरी या वकिलानें सुरत येथून मध्य हिंदुस्थानापर्यंत चारशें मैलांचा प्रवास अवघ्या ४ युरोपियन व २० एतद्देशीय अनुचरा समावेत अगदीं सुखरूप केला. अकबराला लिहितां वाचतां येवो अगर न येवो, परंतु त्यानें जें जें पाहिलें, व ऐकलें, तें तें सर्व त्यानें आपलेसें करून टाकिलें, यांत शंका नाहीं. त्याच्या दरबारांत भोज किंवा विक्रमादित्य यांच्या प्रमाणें उत्कृष्ट विद्वद्रत्नें चमकत होतीं. त्याला विद्याभिरुची इतकी होती कीं, त्यानें उत्कृष्ट ग्रंथ सुंदर अक्षरांत लिहवून, त्यांत

कुशल चित्रकारांच्या हातचीं अप्रतिम चित्रें घालून, तयार केले होते. असे ग्रंथ त्याच्या संग्रहीं सुमारें २४००० असून त्यांची किंमत ६५ लक्ष रुपये होती, असा कांहीं इंग्रज लेखकांचा अंदाज आहे. अकबरानें इमारती बांधण्याची वगळीच शैली काढिली, व तिला एका हिंदू कारागिरा करवीं दृश्य स्वरूप दिलें. त्यांत हिंदू व मुसलमान या दोन्हीं शिल्पशास्त्रांचा मधुर संगम झालेला दिसून येतो......इंग्रजांचे हिंदुस्थानांत आगमन होण्याचे वेळीं हिंदु व मुसलमान संस्कृतीचें संमीलन झाल्यावर हिंदुस्थान देशाची जी स्थिती होती, तिचें संक्षिप्त वर्णन Colonies and Dependencies " या पुस्तकाच्या ग्रन्थकारानें खालीलप्रमाणें दिलें आहे; तें:–प्राचीनकाळीं ग्रीक, आरब, व इतालियन, यात्रेकरू हिंदुस्थानांत येत, ते सर्व हिंदुस्थानांतील परिणित संस्कृति पाहून चकित होऊन जात. गजबजलेलीं शहरें, अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेली शेतीं, कलाकौशल्यपूर्वक तयार केलेल्या नानाविध चिजा, प्रचंड व्यापार, सुंदर इमारती ह्या सर्व गोष्टी हिंदी संस्कृतिच्या निदर्शक होत; गतकालीं इजिप्त किंवा बाबीलोनमध्यें शेकडों वर्षांच्या संस्कारानें ज्याप्रमाणें एक प्रकारचें सामाजिक संघट्टण उत्पन्न झालें होतें, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतही होतें. त्यावेळीं सामाजिक आयुष्यक्रम आजच्यापेक्षां विविध असे. निरनिराळीं राज्यें म्हणजे, लोकांना आपल्या उच्च महत्वाकांक्षा पूर्ण करण्याचीं ठिकाणेंच होतीं. जीवित सुखकर असून कलाकौशल्याची अभिवृध्दि झाली होती. मोटमोठ्या शहरांत कारागीर रहात, व ते आपल्या कौशल्यांत इतके निपुण होते कीं, त्यांच्या कौशल्याबद्दल आज आपणास तोंडांत बोटच घालावें लागतें. व्यापारी व सावकार यांच्याजवळ अगणित संपत्ति असे. देशांत जर अशांती असती तर इतक्या अलोट धनाचा त्यांना संग्रहच करितां आला नसता. अठराव्या शतकांत सुरत ही युरोपियन व्यापाऱ्यांची जंगी पेठ होती. त्या वेळची तेथील लोक संख्येची गणती चार लक्षांपासून आठ लक्षांपर्यंत करितात. बंगालची राजधानी मुर्शिदाबाद येथें इ० सन १७५७ मध्यें क्लाईव्ह शिरला; त्या बाबतींत तो लिहितो कीं, हें नगर लंडन इतकें मोठें, गजबजलेलें, व संपन्न आहे; फरक इतकाच कीं, लंडनपेक्षां येथील लोक कितीतरी पटीनें अधिक संपत्तिमान आहेत. " सतराव्या शतकांत हिंदुस्थानचें वैभव अगदीं कळसास जाऊन पोंचलें होतें. " शिवाय हिंदुस्थान देशाच्या पूर्वकालीन अगणित संपत्तिमुळेंच त्या देशास " सुवर्णभूमि "

असें नांव मिळालें आहे. इराणचा राजकर्ता दरायस ( इ. सनापूर्वी ५२१ ते ४८५ ) याच्या ताब्यांत सिंध व पंजाब प्रांताचा कांहीं भाग असून त्या प्रदेशावर त्यानें एका हिंदु सुभेदाराची नेमणूक केली होती; त्यावेळीं हा सुभेदार दरायस याजकडेस दरवर्षी दीड कोट रुपयांचें सोनें हिंदुस्थानांतून खंडणी दाखल रवाना करीत असे. त्याप्रमाणेंच हिरे, मोतीं, पुष्कराज या नांवाचीं रत्नें, सुंदर पोवळीं, व इतर अनेक प्रकारची मौल्यवान मोतीं, हिरे, माणकें, व रत्नें, याबद्दल हिंदुस्थान देश फार प्रसिद्ध आहे; आणि या सर्व मौल्यवान वस्तूंचा हिंदुस्थान देशांतूनच सर्व जगास पुरवठा झालेला आहे. तथापि या बाबतींत विजयानगरच्या राज्यास प्रमुखत्वानें मान मिळत आहे. कारण पूर्व किनाऱ्यावरील मोत्यांचे कारखाने, पश्चिम किनाऱ्यावरील महत्वाचा व्यापार, आणि राज्यांतील महत्वाच्या हिऱ्यांच्या खाणी, यामुळेंच तें राज्य अत्यंत संपत्तिमान् व वैभवसंपन्न बनलेलें होतें. या काळांत या राज्यांतील खाणी इतक्या संपत्तिमान खाणी सर्व जगांत दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं नव्हत्या; या खाणी पैकीं कित्याच कृष्णानदीच्या काठीं कर्नूळ व अनंतपूर या प्रांतांत असून सर्वांत वज्रकरूर येथील खाणी अत्यंत महत्वाच्या व संपत्तिमान म्हणून प्रसिद्ध होत्या; व या सर्वांना साधारणतः “ गोवळकोंडयाच्या खाणी ” अशी सामान्य संज्ञा होती. अशा प्रकारच्या खाणी विजयानगरच्या राज्यांतच असल्यामुळें तेथील राज्यकर्त्यांजवळ अनेक मौल्यवान हिरे होते; इतकेंच नव्हे तर साधारणतः राज्यांतील पुष्कळ लोकांजवळ लहान मोठे अनेक हिरे संग्रहास होते; या राज्यांत संपत्तीचा धूर निघत होता, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. कारण प्रत्येक मंदिरांत अगणित संपत्ति भरलेली असून सणावाराच्या व समारंभाच्या प्रसंगीं सरदार व इतर अनेक मोठमोठ्या लोकांकडे हजारों वर्षां पासून संचित केलेली अगणित संपत्ति व जड जवाहीर लोकांच्या पाहण्यांत येत असे; त्याप्रमाणेंच विजयानगर शहरांतही हिरे, माणकें, पाचू, मोतीं वगैरे मौल्यवान जिनसांचा मोठ्या जोरानें नित्य व्यापार चालत असे; या राज्यांतील वर लिहिलेल्या हिऱ्यांच्या सर्व खाणी व्यापाऱ्यांना मक्तयानें देण्यांत येत असत; आणि पचवीस कॅरटसपेक्षां अधिक वजनाचा हिरा कोणत्याही खाणींतून निघाला तरी तो मक्तेदारानें राजालाच दिला पाहिजे, असा त्यांच्याशीं ठराव झालेला असे; विजयानगरच्या रामरायाच्या खास

घोड्याच्या मस्तकावर अनेक मौल्यवान हिऱ्या मोत्यांचा एक तुरा असून त्यांत कोंबडीच्या अंड्या एवढा एक मोटा हिरा बसविलेला होता; हा हिरा तालीकोटच्या युद्ध कालापर्यंत विजयानगरकराजवळ होता; परंतु तालीकोटच्या युद्धानंतर विजयानगरचा पाडाव झाल्यावर ( इ० सन १५६५ ) मुसलमान राज मंडळाला तेथून जी अगणित संपत्ति मिळाली, त्यांत "कोंबडीचें अंडें" हा हिरा विजापूरकर अदिलशहा यांस मिळाला. पुढें विजयानगरचें राज्य नष्ट झाल्यावर या राज घराण्याचा वंशावशेष पहिल्यानें पेनकोंड्यास व नंतर चंद्रगिरी येथें गेला; व तेथें त्यानें आपलें एक लहानसें राज्य स्थापन केलें; त्यानंतर इ० सन १६१४ मध्यें तेथील राज्यकर्त्याजवळ तीन मोठ मोठाल्या पेट्या हिऱ्यांनीं भरलेल्या होत्या, असा उल्लेख आढळतो. विजयानगरकराच्या "कोंबडीचें अंडें" या अत्यंत प्रसिद्ध व मोल्यवान हिऱ्या प्रमाणेंच हिंदुस्थानांतील इतर हिरे व त्या प्रमाणेंच मोतीं ही अत्यंत प्रसिद्ध आणि मौल्यवान होतीं. प्रसिद्ध जूलियस सीझर यानें ब्रूटसची आई सर्व्हीलिया हिला जो एक मौल्यवान व प्रसिद्ध मोती नजर केला होता, तो, आणि क्लिओपाट्रा हिची जी विशेष किंमती व पाणीदार मोत्यांची कानांतील कुंडलें ( कर्णफुलें ) होतीं तीं, हिंदुस्थान देशापासूनच त्यांना मिळालेलीं होती. जगांतील अत्यंत प्रसिद्ध दोन हिरे—म्हणजे पिट्ट अथवा रीजंट आणि कोहिनूर अथवा कोह-ई-नूर ( म्हणजे तेजाचा पर्वत ) हे दोन हिरे—हिंदुस्थानांतच पैदा झालेले आहेत. या पैकीं कोहिनूर हिरा हा इ० सन १६५६ मध्यें कृष्णानदीच्या कांठीं कोलूर या नांवाच्या गांवीं असलेल्या प्रसिद्ध हिऱ्याच्या खाणींत, शहाजहान व अवरंगझेब यांचा शूर सरदार मीर जुम्ला यांस सांपडला; त्यावेळीं त्याचें वजन ७५६ कॅरटस् होतें; मीर जुम्ला यानें तो न कापता तसाच शहाजहान बादशहास नजर केला. तो हिरा इराणचें राज घराणें धुळीस मिळविणाऱ्या नादीरशहाच्या दिल्ली वरील स्वारी पर्यंत मोंगल बादशहाच्या संग्रहीं होता; परंतु इ० सन १७३९ मध्यें नादीरशहानें दिल्लीवर स्वारी केली; त्यावेळीं त्यानें त्या शहरांतून तीस कोटी रुपया पर्यंत लूट, प्रसिद्ध मयूरासन, व त्या बरोबरच हा कोहिनूर हिरा, इराणांत नेला; पुढें इ० सन १७४७ मध्यें नादीरशहाचा खून झाला, व त्याच्याच सैन्यांत एका रिसालदावर मुख्य सेनापती असलेला प्रसिद्ध अहंमदशहा अबदली

हा अफगाणिस्थानचा राजा झाला. तेव्हां हा कोहिनूर हिरा त्याच्या जवळ आला; त्यावेळे पासून इ० सन १८०७ पर्यंत तो अफगाणिस्थानच्या अमिराच्या संग्रहीं होता; पुढें इ० सन १८०८ मध्यें अफगाणिस्थानांतील पदभ्रष्ट झालेला जुन्या राजवंशांतील अमीर शहामुजा यानें तो पंजाबचा राज्यकर्ता रणजीतसिंह यांस दिला; तो इ० सन १८४८ पर्यंत लाहोर येथें होता; पुढें इ० सन १८४९ मध्यें गव्हर्नर जनरल लार्ड डलहौसी यानें एक जाहिरनामा काढून त्या अन्वयें पंजाब प्रांत खालसा करून तो ब्रिटिश राज्यास जोडिला; त्यावेळीं रणजीतसिंहाचा मुलगा धुलीपसिंह यानें तो पंजाबचा कारभारी सर जान लारेन्स यांस दिला. व त्यानंतर तो इंग्लंड मध्यें व्हिक्टोरिया राणीस नजर म्हणून पाठविण्यांत आला; पिट्ट व कोहिनूर या दोन हिऱ्यांपैकीं पिट्टचें वजन १३६$\frac{7}{8}$ कॅरट्स् असून तो आकारानें कोहिनूरहून मोठा आहे; आणि कोहिनूरचें वजन १०६$\frac{1}{2}$ कॅरटस् म्हणजे पिट्टहून कमी असूनही तोच पिट्टहून अधिक ऐतिहासिक व पौराणिक महत्वाचा हिरा म्हणून गणला गेलेला आहे; व हिंदुस्थानांतूनच हे दोन्हीही हिरे प्रथम इंग्लंडमध्यें नेण्यांत आले आहेत. कोहिनूर हिऱ्याचें अगदीं प्रथम वजन ७९६ कॅरट्स् होतें; परंतु इतक्या प्रचंड घालमेलींत हा हिरा अनेक वेळां कांपला जाऊन इंग्लंडमध्यें तो पहिल्यानें पोहोंचला त्या वेळीं त्याचें वजन १८६$\frac{1}{2}$ कॅरट्स् होतें; त्या प्रमाणेंच पिट्ट या हिऱ्याचें अगदीं प्रथमचें वजन ४१० कॅरट्स् होतें; परंतु तो इंग्लंडमध्यें गेल्यावर कांपण्यांत आला; त्यामुळें त्याचें वजन १३६$\frac{7}{8}$ कॅरटस् झालें; पुढें इ० सन १७१७ मध्यें फ्रान्सचा रीजंट अथवा प्रतिनिधी ड्यूक ऑफ आर्लेन्स यांस तो विकण्यांत आला; हा हिरा हल्लीं पारीस येथें असून त्याची किंमत ४८०००० पौंड—अथवा दहा रुपये पौंड या हिशोबानें ४८००००० रुपये—आहे; आणि कोहिनूर हा हिरा हल्लीं लंडन येथें असून त्याची किंमत १४०००० पौंड—म्हणजे दहा रुपये पौंड या हिशोबानें १४००००० रुपये आहे; विजयानगरच्या हिंदू राज्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील निरनिराळीं मुसलमानी राज्यें व मोंगल बादशाही हीं अत्यंत वैभव संपन्न असून, उदाहरणार्थ त्या संबंधीची ही थोडीशी हकीकत या ठिकाणीं ग्रंथित केली आहे.

गजनवी महंमूद यानें हिंदुस्थान देशांवर एकंदर अकरा स्वाऱ्या केल्या, आणि त्यांतील कित्येकांत तर त्यास इकडून पुष्कळच संपत्ति मिळवितां आली. त्यानें

आपल्या चौथ्या स्वारींत हिमालयाच्या दक्षिण उतरणीवरील नगरकोट येथील देवस्थान लुटिलें; या ठिकाणीं ज्वालामुखी पर्वत असल्यामुळें तें फार पवित्र मानिलें जात असे; या देवालयास आसपासच्या राजे लोकांकडून नेहमीं मौल्यवान देणग्या मिळत असत; त्यामुळें तेथें विपुल संपत्ति जमलेली होती; या देवालयाच्या ठिकाणीं विशेष बंदोबस्त नाहीं अशी वेळ पाहून महंमुदानें तेथें छापा घातला, आणि त्यानें तेथील सर्व संपत्ति लुटून गज्नीस नेली; या प्रसंगी फेरिस्त्याच्या म्हणण्या प्रमाणें सात लक्ष सुवर्ण दिनार, सातशें मण सोन्या चांदीचे दागिने, दोनशें मण सोन्याच्या लगडी, दोन हजार मण चांदी, वीस मण मोत्यें, हिरे, वगैरे जवाहीर, इतकें विपुल द्रव्य महंमुदास मिळालें; पुढें इ. सन १०१४ मध्यें त्यानें हिंदुस्थानावर आठवी स्वारी केली; त्यावेळीं त्यानें नगरकोट, अथवा कांग्रा उर्फ भीमनगर येथील किल्ला सर करून घेतला, तेव्हां तेथेंही त्यास अशीच विपुल संपत्ति मिळाली; शिवाय व्हिन्सेंट स्मिथच्या म्हणण्याप्रमाणें या ठिकाणीं निव्वळ चांदीचाच बनविलेला असा एक बंगला होता, तो यावेळीं महंमुदास मिळाला. हा बंगला बराच मोठा असून त्याची लांबी ९० फूट व रुंदी ४५ फूट होती, आणि पाहिजे त्या वेळीं त्याची घडी करून तो पुन्हा वाटेल तेथें उभा करितां येत होता; सदरचा बंगला हा हिंदुस्थानांतील विपुल संपत्ति बरोबरच त्या देशांतील अलौकिक कलाकौशल्याचा द्योतक आहे, ही गोष्टही महत्वाची व लक्षांत ठेवण्यासारखी आहे; त्याप्रमाणेंच इ. सन १०२४ मध्यें महंमुदानें आपली अकरावी स्वारी हिंदुस्थान देशावर केली; त्यावेळीं त्यानें काठेवाड मधील सौराष्ट्र सोमनाथाचें अत्यंत प्रसिद्ध मंदीर लुटिलें ‡ या मंदिराच्या सभोंवतीं भक्कम तटे

---

‡ हिंदुस्थानांत बारा ज्योतिर्लिंगें असून त्यांतील सोमनाथ हें एक आहे; हीं बारा ज्योतिर्लिंगें खालील प्रमाणें आहेत:–

| | |
|---|---|
| १ प्रभासपट्टणचा सोमनाथ. | ७ श्री शैल्य मल्लिकार्जुन. |
| २ उज्जयनीचा महांकाल. | ८ नर्मदेंतील ओंकारेश्वर, उर्फ ओंकार मांधाता. |
| ३ हिमालयांतील केदारेश्वर. | ९ डाकिनीवनांतील भिमाशंकर. |
| ४ काशी येथील विश्वेश्वर. | १० त्रिंबक येथील त्रिंबकेश्वर. |
| ५ चिताभूमींतील परळी वैजनाथ. | ११ दारुकावनांतील अवढ्या नागनाग. |
| ६ सेतुबंध रामेश्वर. | १२ वेरळचा घृष्णेश्वर. |

असून त्यावर मजबूत पहारा होता; या देवालया इतकें श्रीमान असें दुसरें देवालय त्यावेळीं हिंदुस्थानांत नव्हतें; व या ठिकाणीं दरसाल असंख्य यात्रा दर्शनाकरितां जमत होती; देवालयाच्या मंडपाच्या खांबावर नानाप्रकारची चित्रें खोदलेली असून देवालयांत सोन्याच्या साखळ्यांनीं बांधिलेल्या अनेक घंटा लोंबत होत्या, व त्यांपैकीं सोमनाथाच्या घंटेस दोनशें मणाची सोन्याची सांखळी बांधिलेली होती; दरवाजास सुवर्णाचा व जागोजाग रुप्याचा पत्रा बसविलेला असून आंतील मूर्ति नऊ फूट उंच होती; बहुमोल असे सोन्याचे व जवाहिराचे दागिने प्रत्यही देवावर चढवीत असत; नित्यशः गंगेच्या पाण्यानें लिंगास स्नान घालून काश्मीर देशाहून आणिलेली सुंदर व सुवासिक फुलें देवास वहात असत; या देवालया संबधीं झकेरिया कझीनी या नांवाच्या एका पर्शियन मनुष्यानें इ० सन १२६३ मध्यें जी हकीकत लिहून ठेविली आहे, त्यांत असा मजकूर आहे कीं, सोमनाथाच्या मंदिरास छप्पन्न सागवानी खांब असून मूर्तीच्या गाभाऱ्यांत गुडुप अंधार होता. तथापि त्या ठिकाणीं रत्नजडित झुंबरें टांगलेली असून त्यांचा लखलखाट प्रकाश पडत होता. या ठिकाणीं, चंद्र ग्रहणाच्या प्रसंगी लाखो यात्रेकरू एकत्र जमत असत; भरतीच्या वेळीं मूर्तीस समुद्र लाटांचें स्नान होत असे. मंदिराच्या खर्चास दहा हजार गांवांचें उत्पन्न लावून दिलेलें होतें; व हजारो भाविक लोक सोमनाथास नेहमीं नानाविध मौल्यवान देणग्या देत होते; त्यामुळें या देवालयांत अपार संपत्तीचा संचय झालेला होता. देवाच्या स्नानास दररोज काशीहून गंगोदकाची कावड येत असून त्याच्या पुजेस एक हजार ब्राह्मणांची नेमणूक केलेली होती; व पांचशें कलावंतिणी सेवेस ठेविलेल्या होत्या. मुख्य मूर्ती शिवाय सभोंवार सोन्या चांदीच्या आणखी अनेक मूर्ती असून देवाच्या पूजेची उपकरणीं ही पुष्कळ व अतीशय मौल्यवान होतीं. व या सर्व संपत्तीची किंमत तीस कोटी रुपये होईल असा अजमास होता. देवाची मूर्ती मनुष्याच्या

---

* या शिवाय स्थानपरत्वें माहात्म्य पावलेलीं कानडा जिल्ह्यांतील पांच लिंगें, कारवार जवळ सेजेश्वर, गोकर्णांत महाबळेश्वर, होनावरा जवळ गुणवंतेश्वर, धारेश्वर व मुर्डेश्वर, व दक्षिण हिंदुस्थानांत कांजिवरम्, त्रिचनापल्ली, श्रीकाल हस्ती, तिरुवण्णामल्लि, व चिदंबरम् येथील अनुक्रमें पृथ्वि, आप, अग्नि, वायू, व आकाश, हीं पंचतत्वात्मक लिंगें प्रसिद्ध आहेत.

सामान्य आकाराची असून त्याच्या हातांच्या मुठी वळून त्या गुडघ्यांवर टेंकिलेल्या होत्या. मूर्तीचा वर्ण रक्त कृष्ण असून तिच्या उभय नेत्रांत मौल्यवान हिरे बसविलेले होते; व हे हिरे नेहमीं चकाकत होते. मूर्तीस खालीं किंवा वर कोणत्याही प्रकारें आधार नसून ती अंतराळीं लटकत उभी होती. हा चमत्कार पाहून महमूद आश्चर्य चकित झाला; आणि मूर्तीला वरील अथवा खालील बाजूनें कांहीं तरी अदृश्य आधार असावा असा संशय येऊन त्यानें भाल्यानें सर्व बाजू तपासून पाहिल्या; पुढें विचार करितां एकानें अशी कल्पना काढिली कीं ही मूर्ती लोखंडाची असून तिच्या डोक्यावरील छत्रास लोहचुंबक बसविलेला असावा; ही कल्पना कांहींना पटली; तेव्हां वरील छत्राचे एक दोन तुकडे काढून मूर्तीचा तोल बिघडतो कीं काय हें पाहण्याची महमुदानें आज्ञा केली; वरचे दगड काढण्यास सुरवात करून थोडेसें काढितांच मूर्ति डळमळू लागली, आणि जास्त काढिल्याबरोबर ती हळुहळु साफ जमीनीवर बसली; महमुदानें आपल्या सोट्यानें हीं मूर्ति फोडिली, त्यावेळीं त्या मूर्तीच्या आंतून, तत्क्षणीं हिरेमाणकांचे ढीग खालीं जमीनीवर पडले; अशा प्रकारच्या संपत्तिविषयक बाबतींतील आणखीं ही अनेक उदाहरणें या ठिकाणीं स्थलाभावामुळें नमूद केली नाहींत; त्याप्रमाणेंच मोंगली बादशाहतीच्या वैभवा विषयींही या ठिकाणीं, उदाहरणा दाखल थोड्याशा हकीकतीहून अधिक हकीकत स्थलाभावामुळेंच देतां येणें शक्य नाहीं. प्रसिद्ध मोंगल बादशहा जहांगीर याच्या वाढदिवसाच्या टोलेजंग समारंभाची हकीकत मोठी मनोवेधक व त्या बादशाहतीचें वैभवदर्शक आहे. या दिवशीं सोन्याच्या एका मोठ्या ताजव्यांत बादशहाची सहा वेळां तुला करण्यांत येई; या तुलेच्या वेळीं एका ताजव्यांत सोनें, चांदी, मोत्यें, रेशमी कापड, धान्य, व लोणी, हे सहा पदार्थ ठेवून त्याचें वजन करण्यांत येई, व बादशहाची तुला केल्यानंतर त्या सर्व वस्तू गोरगरिबास वाटून देण्यांत येत असत; जहांगिरीची तुला करिताना त्याचें वजन एकदा साडेसहा हजार तोळे व दुसऱ्या वेळीं नऊ हजार तोळे भरले, असा उल्लेख आढळतो. हा समारंभ आटोपल्यावर दुपारी सर्व हत्ती शृंगारून मोठ्या समारंभानें बाहेर काढीत; हत्तींचे निरनिराळे कळप असून प्रत्येकावर एक नायक हत्ती प्रमुख असे; या नायक हत्ती बरोबर चार नायिका हत्तिणी व आठ अथवा दहा इतर हत्ती असत; सर्व हत्तींचें सामान सोन्याचांदीने

असून त्यांच्यावरील निशाणें भरगची असत, आणि अशा हत्तींच्या बारा टोळ्या बादशहास सलामी देऊन निघून जात असत; या सर्व हत्तीमधील मुख्य नायक हत्ती फारच सुंदर असून त्याच्या शरिराची ठेवणही विशेष बांधेसूद होती; व त्याच्या अंगावरील नामानावर हिरे माणकें जडविलेली होतीं; बादशहाच्या या वाढ दिवसाबद्दल त्याचे सरदार त्यास मेजवान्या करीत, व त्या वेळींही विशेष खर्च व भपका करण्यांत येत असे; अशापैकीं एका प्रसंगीं ता० ३१ मार्च इ. सन १६१६ रोजीं आसफ्खानानें बादशहास मेजवानी दिली; त्यावेळी, बादशाही ठिकाणापासून आसफखानाचा वाडा एक मैलावर होता तेथपर्यंत सर्व रस्त्यावर रेशमी कपड्याची बिछाईत करण्यांत आली होती; आणि मेजवानी व पोशाख या प्रीत्यर्थ पंधरा लाख रुपये खर्च करण्यात आला होता; आसफ्खान हा जहांगीर बादशहाचा मेहुणा असून त्यानें इंग्रज वकील टेरी यांस एक थाटाची मेजवानी दिली होती, तिचें ही असेंच मनोरंजक वर्णन आहे; प्रसिद्ध इंग्रज वकील सर टॉमस रो हा जहांगीरच्या स्वारी बरोबर असताना त्यानें त्या वैभव संपन्न व थाटाच्या स्वारीचें मोठें वाचनीय वर्णन केलें आहे. इ० सन १६१६ च्या नोव्हेंबर महिन्यामध्यें, जहांगीर बादशहाची स्वारी राजवाडा सोडून, तेथून चार पांच मैलावर छावणींत राहण्याकरितां म्हणून बाहेर पडली; त्यावेळीं, दोन तीन हजार उत्तम व चपळ घोडे, आठ नऊशें हत्ती, शिवाय खेंचरें, व असंख्य मजूर, या स्वारीचें सामान वाहण्या करितां उपयोगांत आणावें लागले; कारण मोठ मोठे तंबू, भोजनाचें व इतर बहुविध सामान, स्नाना करितां गंगेचें पाणी वगैरे सर्व गोष्टींची बादशहास सर्व ठिकाणीं जरूरी लागत असे; सर टॉमस रो म्हणतो:—जहांगीर बादशहाची स्वारी सकाळी निघावयाची होती; त्याच्या आधीं बादशहा राजवाड्यातील झरोक्यांत येऊन बसला; त्यावेळीं पडद्यांत त्याच्या दोन बायका होत्या त्या ओझरत्या रो याच्या दृष्टीस पडल्या; त्यावेळीं त्यास मोठी मौज वाटली. सर्व सरदार दरबारांत बसले, आणि रो हा त्यांच्यामध्यें बसला. इतक्यांत बादशहा तेथें येऊन थोडा वेळ सिंहासनावर बसला; त्यावेळीं इकडे स्वतंत्ररित्या राखून ठेविलेल्या पन्नास हत्तीवर त्याचा जनानखाना चढत होता; या हत्तींच्या पाठींवर मोठमोठे हौदे असून त्यांच्या सभोंवतीं किनखापी पडदे लाविलेले होते; थोड्या वेळानें बादशहा छावणींत जाण्याकरितां निघाला, त्यावेळीं सर्व लोकांनीं कानठळ्या बसतील एवढ्या मोठ्यानें त्याचा जयघोष केला; जिन्याच्या पाय-

ह्याशीं बादशहाची दृष्ट काढण्यांत आली; यावेळीं त्यानें केलेला पोषाख अतीशय मौल्यवान असून त्याच्या अंगांत जरीचा एक भव्य झगा होता, व त्याचें सर्वांग किंमती हिऱ्या मोत्यांनीं भरलेलें होतें; त्याच्या नौकरांनीं पुढें येऊन त्याची ढाल तरवार बांधिली, आणि धनुष्य बाण लटकावून दिलें. त्यानंतर तो चार घोड्याच्या गाडींत बसला. बादशहाची गाडी हांकणारा मनुष्य-कोचमन-इंग्रज असून त्याचा पोषाखही रत्नखचित होता. बादशहाच्या दोन्हीं बाजूस दोन परिचारक उभे असून ते त्याच्यावर चवऱ्या वारीत होते. या बादशाही स्वारींत सर्वांपुढें वाद्यें असून त्याच्यामागें भरगच्ची सामान घातलेले नऊ घोडे रिकामें चालले होते; त्याच्या पाठीमागें कांहीं सुंदर पालख्या होत्या; त्या नंतर एक विलायती बगी असून तींत " सौंदर्याची तारका " नूरजहान ही बसली होती; तिच्या स्वारीच्या मागें बादशहाचे दोघे धाकटे मुलगे, गाडींत बसलेले असून त्यांच्या मागें मौल्यवान अलंकार भूषणांनीं सजविलेले सुंदर वीस हत्ती चालत होते; व त्यांच्या मागें सरदार मंडळी पायीं चालली होती; सर्व रस्त्यावर सहाशें हत्तींचा पहारा असून प्रत्येकावर निशाण, व बंदुका होत्या; स्वारीचा रस्ता पाण्यानें भिजविलेला होता; या स्वारींत कोणासही बादशहाची भेट घ्यावयाची असल्यास त्यास फार लांब पासून पायीं यावें लागत असे; बादशाही स्वारी राजवाड्यांतून निघतांना जहांगिरनें आपला मुलगा खुश्रू याची भेट घेतली, व त्यास आपणा बरोबर घेतलें; बादशहाच्या मुक्कामाच्या ठिकाणीं सर्वांनां राहण्याकरितां तंबू लाविलेले होते; त्यांत खुद्द बादशहाच्या तंबूची शोभा अवर्णनीय होती. त्या तंबूच्या सभोंवतीं अर्धा मैल परिघाच्या कनातीं लाविलेल्या असून नाक्यावरील दिंडी दरवाजा श्रृंगारुन विशेष शोभिवंत केला होता. राजवाड्या प्रमाणेंच दरबारची वगैरे सर्व व्यवस्था तंबूंत ही केली होती; आणि जनानखान्या करितां मागील बाजूनें निराळा स्वतंत्र रस्ता ठेविला होता. दरवाज्यांतून आंत शिरल्यावर रस्त्याच्या दोन्हीं बाजूस सरदार लोक रांगेने उभे होते; त्यामधून जहांगीर बादशहाची स्वारी आपल्या तंबूंत गेली. या छावणींतील बादशाही तंबू मधील एकंदर व्यवस्था थेट राजवाड्यांतील व्यवस्थे प्रमाणेंच होती. बादशहा शिवाय इतर मंडळींचे ही तंबू लाविण्यांत आले असून या स्वारींतील सर्व मंडळीच्या मोठ्या वस्ती मुळें एक नवें शहरच वसलें आहे कीं काय, असा भास होत असे. या बादशाही छावणीचा विस्तार वीस चौरस मैल होता. बादशहा

करितां उभारलेले तंबू लाल रंगाचे असून इतर मंडळींचे तंबू पांढऱ्या, हिरव्या वगैरे निरनिराळ्या रंगाचे होते; स्वारीच्या मुक्कामावर, राजधानींतील व्यवस्थेप्रमाणेंच मोठमोठे रस्ते काढिलेले असून, त्यांच्या दोन्हीं बाजूस दुकानें रांगेने वसविलीं होतीं. छावणी कोणत्या पद्धतीनें व व्यवस्थेने करावयाची याबद्दलचे नकाशे ठरलेले असून मध्येंच कोणाचा कोठें मुक्काम व्हावयाचा हें कळण्याची सोय केली होती; ( ऐने–अकबरींत असे कित्येक नकाशे दिले आहेत; ) स्वारीचा मुक्काम दररोज हलविला जाऊन थोडे थोडे मैल पुढें जात असे; परंतु त्यामुळें ठरीव व्यवस्थे मध्यें कोणत्याही प्रकारचा घोटाळा अथवा अव्यवस्था होत नसे; आणि सर्व सामानाचे तीन तीन चार चार जोड असून मुक्कामाची तयारी चार तासांत होत असे; " यावरून बादशाही वैभवाची व त्यांच्या थाटांच्या स्वाऱ्यांची कल्पना करितां येतें; त्याप्रमाणेंच बादशहाशहाबुद्दीन महमद खुर्रम उर्फ शहाजहान, याचें वैभवही डोळे दिपविणारें असून त्यानें आग्रा येथें बांधिलेली प्रसिद्ध इमारत "ताज-महाल" ही सर्व जगांत अप्रतिम सौंदर्य, व असाधारण कलाकौशल्य यामुळें अत्यंत श्रेष्ठ पद पावलेली आहे; या ताजमहाला संबंधीं थोडक्यांत अशी हकीकत आहे कीं, ताज-महाल " ही इमारत एका स्त्रीचें स्मारक म्हणून बांधण्यांत आली आहे; बादशहा शहाजहान याची प्रीय राणी अर्जुमंद बानू उर्फ मुम्ताज-महल् ही इ० सन १६३१ मध्यें (ता० ७ जून रोजीं) ब्ऱ्हाणपूर येथें, प्रसुती वेदनांनीं मृत्यू पावली; या बाईस एकदर चौदा मुलें झालीं, व शेवटच्या प्रसूतीच्या वेळीं या बाळंतपणांतून आतां आपण जगत नाहीं, अशी तिची खात्री झाल्यावर तिनें बादशहास बोलावून आणून मोठ्या दुःखानें व कळकळीनें त्यास सांगितलें कीं, "गर्भांतील मुलाचें रडणें त्याच्या आईनें ऐकिलें म्हणजे ती जगत नाहीं असें म्हणतात; आणि तसा गर्भांतील बालकाचा रुदन स्वर माझ्या कानीं आला, म्हणून माझा मृत्यू आतां नजदीक आला आहे, असें मला वाटतें. तरी माझ्या हातून आजपर्यंत कोणतीही चुकी अथवा आगळीक झाली असल्यास तिज बद्दल मला क्षमा करा; आजपर्यंतच्या आपल्या सर्व सुखदुःखांत मी आपली वांटेकरीण होते, पण आतां आपला कायमचा सहवास सोडून मला निघून जाणें प्राप्त झालें आहे; म्हणून आपणा जवळून यावेळीं मी शेवटच्या दोन गोष्टी मागून घेतें, त्या आपण, कृपा करून देतों असें म्हणा; बादशहानें

होय, असें म्हटलें; त्या बरोबर मुम्ताज-महल् म्हणाली:—देवानें आपणास पुष्कळ मुलें दिलीं आहेत, आणि आपला नांवलौकिक चालविण्यास तीं पुरेशी आहेत; तेव्हां आपल्या घरांत सावत्र भाव उत्पन्न होऊन तंटा भांडणें वाढूं नयेत म्हणून मी आपणास अशी विनंती करिते कीं, मी कालवश झाल्यावर आपण पुन्हां दुसरें लग्न करूं नये; आणि दुसरी विनंती ही आहे कीं, आपणा उभयतांच्या प्रीतीचें स्मारक यावच्चंद्र दिवाकरौ रहावें, म्हणून अशी एक अलौकिक इमारत बांधा, कीं जगांत तिच्या तोडीची इमारत पूर्वीही कधीं बांधिली गेली नाहीं, व पुढें ही कधीं बांधिली जाणार नाहीं; इतकें बोलल्यावर ती पुढें प्रसूत होऊन लागलीच मृत्यू पावली; * शहाजहान यानें आपल्या प्रिय पत्नीस दिलेल्या अभिवचना प्रमाणें पुन्हां लग्न केलें नाहीं, व मुम्ताज-महल् हिचें स्मारक म्हणून त्यानें जगांतील अत्यंत प्रसिद्ध व श्रेष्ठ अशी "ताजमहाल" ही इमारत आग्रा येथें बांधिली; या इमारतीस इ० सन १६३१ च्या प्रारंभी सुरवात होऊन ती पुरी होण्यास बारा वर्षें लागलीं; ती इ० सन १६४३ च्या ज्यानेवारी

---

* पातशहानाम्यांत वरील हकीकतीहून निराळी हकीकत दिली आहे; आणि वरील हकीकत सांगोसांगीची असून ती पाटणा खुदाबक्ष ग्रंथ संग्रहालयांतील कासीम अली आफ्रीडी याच्या आत्म चरित्रांतील आहे. पातशहानाम्यांत असें लिहिलें आहे कीं, मुम्ताज-महल् हिला जेव्हां असें कळून चुकलें कीं, आतां आपण जगत नाहीं, त्या वेळीं तिनें जहान्-आरा ( जगाला भूषविणारी; ही शहाजहान व मुम्ताजमहल यांची वडील कन्या असून तिच्यावर शहाजहान याचें अतीशय प्रेम होतें. ) हिला बादशहाकडे पाठवून त्यास तावडतोब आपणाकडे बोलावून घेतलें, आणि शहाजहानही लागलीच त्या ठिकाणीं मोठ्या काळजीनें धांवत आला. उभयतांची दृष्टादृष्ट झाल्यावर तिनें मुलांचा सांभाळ करण्याविषयीं बादशहास विनंती केली, आणि आपण परलोकवास पत्करिला. त्यानंतर बऱ्हाणपूर समोर तापी नदीच्या कांठीं एका बागेंत प्रथम तिचें दफन झालें, व त्या नंतर, एका वर्षानें, इ० सन १६३२ मध्यें ता० १ दिजंबर रोजीं तिचें कलेवर आग्रा येथें नेण्यांत आलें. त्यावेळीं बरोबर शहाजादा सुजा हा असून तो आपल्या मातुश्रीच्या शवासह ता० २९ दिजंबर रोजीं, अठ्ठावीस दिवसांनीं आग्रा येथें येऊन पोहोंचला.

महिन्यामध्यें पूर्ण झाली, व आफ्रिडीच्या म्हणण्याप्रमाणें तिच्या पूर्ततेपर्यंत एकंदर खर्च नऊ कोटी सत्रा लक्ष रुपये आला; ( कित्येकांच्या मतें ही रक्कम पन्नास लख रुपये आहे. ) या इमारतीचे काम सतत बारा वर्षें चालू असून ती बांधून पूर्ण करण्याकरितां वीस हजार माणसें दररोज काम करीत होती. ही इमारत आग्रा शहरापासून अजमासें तीन मैलांवर यमुना नदीच्या पश्चिम तीरांवर असून आपल्या अवर्णनीय व अप्रतिम सौंदर्यामुळें जगातील सर्व इमारती मध्यें ती श्रेष्ठ व प्रथम पद पावलेली आहे. ही इमारत पुरी झाल्या नंतर ता० २८ रोजीं, म्हणजे आपल्या प्रीय राणीच्या बाराव्या वर्षाच्या मृत्यु दिवशीं शहाजहान, यानें ताजमहालामध्यें प्रथम प्रवेश केला, आणि एक लाख रुपये उत्पन्नाची तीस गांवें त्यानें ताजमहाल, व त्या सभोंवतालील सराया, दुकानें, बागा, व त्यांत राहणारे साधू फकीर, यांच्या खर्चाकडे स्वतंत्र रीतीनें लावून दिलीं. त्या प्रमाणेंच फत्तेपूर शिक्री, अहंमदनगर, गोवळकोंडें, विजापूर, दिल्ली, गुलबर्गा वगैरे अनेक ठिकाणच्या मशीदी व इमारती, शिकंदरा येथील अकबराची कबर, व आग्रा शहराजवळील इतिमाद्–उद्दौल्याची कबर, वगैरेही स्थळें विशेष प्रेक्षणीय व मुसलमानी राज्यकर्त्यांच्या आणि मोंगली साम्राज्याच्या पूर्व वैभवाची द्योतक आहेत. शिवाय औधच्या नबाबांनीं आपल्या राज्यांत बांधिलेल्या कित्येक इमारती, व विजापूरकरांनीं बांधिलेल्या बालेघुमट, जुम्मामसीद, गगनमहाल, शहाबुरूज, महाबुरूज वगैरे इमारती जगांत अत्यंत प्रेक्षणीय म्हणून गणल्या गेल्या आहेत; त्याप्रमाणेंच हल्लींचें दिल्ली शहर हें यमुना नदीच्या तीरावर शहाजहान बादशहानेंच वसविलें असून तें शहर बांधण्याचें काम सतत दहा वर्षें चाललें होतें; याच शहराला मुसलमान इतिहासकारांच्या ग्रंथांतून शहाजहानाबाद हें नांव दिलेलें आहे; हें शहर आग्रा येथील ताजमहाल प्रमाणेंच यमुना नदीच्या पश्चिम तीरावर असून तेथील चांदणीचौक, जुम्मामशीद, मोतीमशीद, दिवाणीआम, दिवाणीखास, घुसलखाना वगैरे शहाजनानें बांधिलेल्या इमारतीही अतीशय प्रसिद्ध व प्रेक्षणीय आहेत. इतकेंच नव्हे तर शहाजान बादशहाच्या राजवाडया सारखा वाडा सर्व पृथ्वींत दुसरा नाहीं, असें मिस्तर फर्ग्यूसन या शिल्पशास्त्रज्ञाचें मत आहे. या वाडयाच्या भिंतीवर सुंदर रंगित चित्रें काढिलीं असून वाडया सभोंवतीं साठ फूट उंचीचा, व दीड मैल घेराचा कोट होता, व वाडयांतील सर्व भागांत

नळाचें पाणी उत्कृष्ट रीतीनें खेळविलेलें होतें; या बादशहाच्या कारकीर्दीत मोंगली राज्याचे बावीस सुभे असून साम्राज्याचा वसूल पहिल्यानें बावीस व पुढें बत्तीस कोटी पर्यंत वाढला होता, व शहाजहानपाशीं इतकी अपार संपत्ति होती कीं, मडेस्लोच्या म्हणण्याप्रमाणें ती, तीस कोटी पौंड अथवा साडेचार अब्ज रुपयाची होती. यावरून प्राचीन मोंगली व मुसलमानी वैभवासंबंधीं योग्य कल्पना होईल. त्याप्रमाणेंच शहाजहान बादशहाचें " मयूर सिंहासन " ही तसेंच अत्यंत मौल्यवान होतें; अकबर बादशहा पासून बादशाही जवाहिरखान्या मध्यें संचय केलेल्या अनेक मौल्यवान रत्नांमधून अजमासें ८६ लाख रुपये किंमतीची निवडक रत्नें आणि एक लक्ष तोळे सोने मिळून हें सिंहासन बनविलें होतें. हें मयुरासन बेबादल्खान या सरदाराच्या देखरेखीखालीं कसबी सोनारांकडून तयार करविलेलें असून तें संपूर्ण तयार होण्यास सातवर्षे लागलीं; या सिंहासनाची लांबी सव्वा तीन यार्ड, रुंदी अडीच यार्ड, व उंची पांच यार्ड होती. या सिंहासनांत चोहोंकडे रत्नें गुंफिलीं असून त्यास बारा कोन व बाराच खांब दिलेले होते; सिंहासनावर एक लहानसें कृत्रिम झाड तयार केलेले असून प्रत्येक खांबाच्या शिखरावर दोन दोन मोर बसविले होतें; सिंहासनावर चढून जाण्यास तीन रत्नखचित पायऱ्या केलेल्या असून त्याच्या बाकीच्या अकरा बाजू कठडे बसवून बंद केलेल्या होत्या; व त्याच्या आंतील बाजूस एका फारशी कवीची वीस कवनें कोरिलेलीं होतीं. हें प्रसिद्ध मयूरासन, व कोहिनूर हिरा, इतर लुटी बरोबर नादीरशहानें पुढें इराणांत नेला. शहाजहान बादशहास इमारती बांधण्याचा विशेष नाद असून त्यानें अनेक प्रसिद्ध इमारती बांधविल्या आहेत; या बादशहाच्या स्वारीचें व दरबारचें वैभव ही विशेष वर्णनीय असून, बादशहाच्या अंगावर नेहमीं घालण्याच्या जडजवाहीराचीच किंमत दोन कोट रुपये होती; त्याप्रमाणेंच त्याच्या जवळ मंत्र जपण्याच्या दोन माळा होत्या, त्याचीच नुसती किंमत वीस लाख रुपये होती; या बादशहानें आपल्या कारकीर्दीतील पहिल्या वीस वर्षांत निव्वळ दानधर्म म्हणून साडेनऊ कोट रुपयांची खैरात केली, व अडीच कोट रुपये इमारती बांधण्याकडे खर्च केले; साडेनऊ कोटी रुपये दानधर्म करणाऱ्या बादशहाचें केवढें वैभव असेल याची नुकती कल्पनाच करणं सुद्धां कठिण आहे; हिंदुस्थान देशांतील अशा प्रकारचें वैभव व संपत्ति या संबंधी आणिखीही पुष्कळ माहिती देतां येण्या सारखी

आहे, परंतु स्थालाभावा मुळें एवढ्यावरच निर्वाह करून पुढील विषय विवेचना कडे वळणें भाग आहे.

तात्पर्य, अगदीं थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे हिंदुस्थानची वैभवसंपन्नता, हा मुळेंच या देशावर, अरब, तार्तार मोंगल, वगैरे लोकांच्या, तैमूरलंग, नादीरशहा, अहमदशहा वगैरे धाडसी सेनानायकांच्या, व युरोपियनांच्याही स्वाऱ्या झालेल्या आहेत; व युरोपियन लोक व्यापाराकरितां म्हणून आलेले आहेत; मुसलमान व मोंगल लोकांनीं या देशांत सत्ता मिळविली आहे; आपलीं राज्यें स्थापन केलीं आहेत; इतालीं, स्पेन, पोर्तुगाल, आस्त्रिया, हालंड, इंग्लंड, व फ्रान्स, वगैरे देशांतील लोक व्यापारा करितां आलें आहेत; आणि हिंदुस्थानांतील राजकीय रंगभूमीवर इंग्लंडनें विजय संपादन करून ब्रिटिश लोक हे हिंदुस्थानचे सार्वभौम राज्यकर्ते बनलेले आहेत; याच हिंदुस्थानांतील संपत्तिमुळें ब्रिटिश साम्राज्य आज वैभवसंपन्न बनलें आहे; याच हिंदुस्थानांतील संपत्ति मुळें इंग्लंडच्या राष्ट्राला गेल्या शतकांत आपलें व सर्व युरोपचें संरक्षण करितां आलें आहे; याच हिंदुस्थानांतील संपत्तिनें नेपोलियनच्या नशिबाचा अखेरचा निकाल लागलेला आहे; याच हिंदुस्थानांतील तीन इंग्रजी " म " कारांनीं—मेन मनी, आणि म्यूनीशन, यांनीं ( Men, Money and Munition म्हणजे सैन्य, संपत्ति, व दारू गोळा, यांनीं ) इंग्लंडला जर्मनीच्या सुलतानी सत्तेस चिरडून टाकून, इंग्लिश मुत्सद्यांच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे अप्रतिहत व अनियंत्रित अशी अन्यायी सत्तेची जर्मन महत्वाकांक्षा नामशेष करून—आशिया युरोपचेंच फक्त नव्हे तर सर्व जगाचेंही जर्मन केसर पासून संरक्षण करितां आलेलें आहे, आणि याच हिंदुस्थान देशामुळें इंग्लंडच्या राष्ट्राचें वैभव वृद्धिंगत होत जाऊन सर्व जगांत इंग्लंडचें राष्ट्र अत्यंत वैभवसंपन्न व बलाढ्य म्हणून गणलें गेलेलें व प्रसिद्धीस आलेलें आहे; नेपोलियन व केसर यांच्या नशिबाचा अखेरचा निकाल लागून त्यांच्या ऐश्वर्यावर कायमचा पडदा पडलेला आहे, आणि ब्रिटिश राष्ट्रास विजय प्राप्त होऊन सर्व जगभर त्या राष्ट्राचा जयजयकार झालेला आहे.

हिंदुस्थानांत मुसलमान लोकांनीं आपलीं राज्यें स्थापना केलीं, व मोंगलांनीं आपली बादशहात निर्माण केली. ही गोष्ट, आणि जगाच्या इतिहासांत त्यांनीं नमूद करून ठेविलेलीं अनेक पराक्रमाची कृत्यें, हीं

मुसलमान,—मोंगल, तुर्क, तातार, अरब, वगैरे—लोकांच्या ही कर्तृत्वाची द्योतक नाहींत, असें कोण म्हणेल ? हिंदू प्रमाणेंच मुसलमान लोकांतही हिंदुस्थानांत अनेक नामांकित राज्यकर्ते, योद्धे, मुत्सद्दि, ग्रंथकार, कवी, वगैरे निर्माण झाले असून कित्येक राज्यकर्त्यांची राज्यव्यवस्था, व राजनीतिविशारदता ही खरोखरीच अत्यंत अलौकिक अशीच होती; त्यांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत आपलीं राज्यें स्थापन केल्यामुळें त्यांचा हिंदू लोकांशीं अधिक अधिक निकट संबंध येत गेला; त्यामुळें, आणि मुसलमानांपैकीं पुष्कळ तर बाटलेले हिंदूच मूळचे असल्यामुळें, त्यांचा कट्टा धर्माभिमान व त्यामुळें बनलेला कडवा स्वभाव, पुढें पुढें विशेषच शिथिल व सौम्य बनत गेला, आणि ते हिंदू प्रजेस प्रेमानें वागवूं लागले; शिवाय त्यांतील कित्येकांना आपण हिंदू लोकांमध्यें परकीय आहोंत, आणि त्यामुळें त्यांच्याशीं सख्य ठेवण्यांतच आपणास व आपल्या राज्यास स्थैर्य व बळकटी येणारी आहे ही जाणीव होती; त्याप्रमाणेंच मुसलमान राज्यकर्त्यांना व इतर सरदार वगैरे मंडळींनांही हिंदू स्त्रियाशीं लग्न करण्याची आवड असून सेलीम व शहाजहान हे दोन्हीं ही मोंगल बादशहा हिंदू—आईपासून झालेले मुलगे होते; † सेलीम व शहाजहान हे उभयतांही आपल्या प्रजेस विशेष प्रीय असून, अकबराचीच राज्यनीति त्यांनीं कायम ठेविली होती; बादशहा जहांगीर हा विषयीं व व्यसनी होता; सखी आणि शराब—नूर जहान आणि दारू—यांच्या शिवाय त्याला दुसरें काहींही दिसत नव्हतें; पण दारू पिणें कितीं घातक आहे, याची त्यास पूर्णपणें जाणीव असून, आपणास हे दुष्ट व्यसन जडल्याबद्दल दारूच्या धुंदींत नसतांना त्यास वाईट वाटत असे; पश्चात्ताप होत असे, आणि

† उत्तरे प्रमाणेंच दक्षिणेंतही मुसलमान राज्यकर्त्यांना व सरदार वगैरे मंडळींनां हिंदू स्त्रियांशीं लग्न करण्याची आवड होती; उदाहरणार्थ, विजापूरचें अदिलशाही राज्य स्थापन करणारा प्रसिद्ध बादशहा आदिलशहा—उर्फ अबुल् मुज्झर यूसुफ आदिलशहा—यानें मुकुंदराव या नांवाच्या एका शूर मराठे सरदाराच्या बहिणीशीं लग्न केलें होतें; तिचें मुसलमानी नांव बुबुजीखान हें असून तिच्यावर अदिलशहाची अतीशय प्रीती होती; हिच्या पोटीं त्यास इस्माईल या नांवाचा एक मुलगा झाला व तो अदिलशहाच्या मृत्यू नतर इ० सन १५१० मध्यें गादीवर आला.

"मी स्वतः जरी दारू पितो तरी माझ्या साम्राज्यांत कोणीही मद्यपान करू नये" अशी त्याची इच्छा असून तशा आशयाचा त्यानें सक्त हुकूम ही काढिला होता; बादशहा शहाजहान--आपल्या अत्यंत आवडत्या राणीच्या स्मरणार्थ जगांतील अलौकिक म्हणून गणला गेलेला आग्रा येथील " ताजमहाल " बांधणारा प्रेमी व प्रजा प्रीय शहाजहान--याच्यावर त्याच्या प्रजेची इतकी भक्ति होती कीं तो आपल्या चिरंजिवाच्या-बादशहा आलमगीर उर्फ अवरंगझेब याच्या-प्रतिबंधांत पडल्या-वर मुद्धां त्याची हिंदू प्रजा त्याचें दररोज नियमानें सकाळीं दर्शन घेण्या करितां आग्रा येथील किल्ल्या पुढें जाऊन उभी रहात असे; आणि शहाजहान हा ही दररोज नियमानें समोर सज्जांतील खिडकींत येऊन त्यांना दर्शन देत असे; उलट-पक्षीं शहाजहानच्या मनावरही हिंदू धर्मांतील, व हिंदू लोकांतील कित्येक भावना, व कल्पनांचा पुष्कळच खोल परिणाम झालेला होता; शहाजहान-यांस अवरंगझेबानें कैदेंत ठेविल्या नंतर, स्वतःच्या इच्छेस त्यानें आधीन व्हावें म्हणून, अवरंगझेबानें कांहीं काळपर्यंत, तशा स्थितींत, आपल्या रक्षकांकडून त्याचा अनेक वेळां अपमान करविला, आणि पादत्राण व अंगांत घालण्याचे कपडे या सारख्या क्षुल्लक बाबतींत ही त्यानें शहाजहान याचें जीवित कष्टमय करून सोडिलें; पण इतकें करून ही आपला पिता शहाजहान हा आपल्या इच्छेच्या आधीन होत नाहीं, असें पाहून, ज्या विविक्षित टिकाणाहून शहाजहान यांस पिण्याचें पाणी दररोज येत असे, त्या विविक्षित टिकाणचें तें पाणी अवरंगझेबानें बंद केलें; त्यावेळीं शहाजहान यांस अतीशय वाईट वाटलें; हिंदूधर्म, हिंदू लोकांच्या धार्मिक भावना व कल्पना, स्वर्गस्थ वाडवडील, माता, पिता, व पितर, मातर, यांची आठवण ठेवण्याची व त्यांना मान सन्मान देऊन त्यांच्या संबंधी पिढ्यानुपिढ्या आदर बाळगीत राहण्याची हिंदू लोकांची पद्धति, त्या संबंधीचे निरनिराळे धार्मिक विधी, आचार, व सांप्रदाय, वगैरे गोष्टी त्याच्या डोळ्या पुढें उभ्या राहिल्या; आणि त्यानें अवरंगझेयास एक अत्यंत हृदयद्रावक संदेश पाठविला; व त्यांत असा उल्लेख केला कीं, ( See J Sarkar's Aurangzeb Vol. II . हिंदू लोक तर आपल्या वाडवडि-लास,--पितापितरास, मातामातरास, व आपल्या निकटच्या लहानमोठ्या मनुष्यास-त्यांच्या मृत्यूनंतरही वार्षिक व मासिक श्राद्ध पक्ष करून, त्यांचा

आत्मा शांत करण्याच्या भावनेनें त्यांना पाणी देत असतात; पण तूं असला दिवटा पितृभक्त चिरंजीव जन्मास आला आहेस कीं, आपल्या प्रतिबंधांत ठेविलेल्या प्रत्यक्ष पित्यालाही जिवंतपणी सुद्धां पाणी मिळूं नये, असा बंदोबस्त करितोस ! तस्मात् धन्य आहे तुझी !! आणि तुझ्या या पितृभक्तिची !!!

हिंदुस्थानांत मुसलमान लोक आल्यानंतर हिंदू लोकांच्या निकट सहवासामुळें-कित्येक बाटलेले हिंदू अथवा त्यांचे वंशज, कित्येक हिंदू आई पासून जन्मास आलेले व त्यांचे वंशज, कित्येक धर्मांतर न करितां मुसलमानी राज्याशीं स्वामिनिष्ठ राहून त्या राज्याचे आधार स्तंभ असलेले, व त्यांचे वंशज, वगैरे निरनिराळया कारणांनीं घडलेल्या निकट सहवासामुळें-हिंदू लोकांना व हिंदूधर्माला मोगल बादशहा किती आदरयुक्त दृष्टीनें पहात होते, याचें वरील शहाजहान याची गोष्ट, हें एक उदाहरण आहे; आजही हिंदुस्थानांत-विशेषत: कोंकण व महाराष्ट्र या भागांत-कित्येक मुसलमानांत त्यांच्या बायका, हिंदू स्त्रियांसारखीं लुगडीं चोळया वापरीत असून, त्यांच्यांतील पुरुष मंडळी धोतरें, व पागोटीं वापरताना, आणि ओळखताही येणार नाहीं इतक्या शुद्ध, स्पष्ट, व सरळ रीतीनें त्यांच्या सहवासाची झालेली मराठी भाषा बोलताना आढळतात; मुसलमान लोकांत, मद्यपानाची बंदी तर त्यांच्या धर्मानेंच त्यांना केलेली आहे. पण तशी मांसाहारासंबंधीं नसून सुद्धां कित्येक मुसलमान मांस सेवन न करणारे आहेत; पैगंबराच्या वंशापासून झालेल्या मुसलमानास "सय्यद" असें म्हणतात; आणि त्यांच्यातही, हिंदू मधील उच्च जातीं प्रमाणेंच, मुलींच्या पुनर्विवाहास बंदी असून ते पुनर्विवाह करीत नाहींत; वास्तविक म्हणावयाचें म्हणजे "मुसलमान" हा सर्व साधारणत: एक समाज असून, त्यांच्यांत हिंदू सारखे जातिभेदाचें प्रकार नसावेत असें वरवर दिसतें; परंतु त्यांच्यांतही, ते हिंदुस्थानांत आल्यानंतर, हिंदू प्रमाणेंच, नालबंद, महात, दर्जी, कागदी, तांबटी, तांबोळी, नट, कुजडे, सारवान, वगैरे जाती उत्पन्न झाल्यापासून त्यांचा बेटी व्यवहार आपापल्या जाती बाहेर होत नाहीं; हिंदू मुसलमानांच्या निकट सान्निध्याची द्योतक, म्हणून या ठिकाणीं, उदाहरणासह थोडीसी माहिती देतां येण्यासारखी आहे; अहमदनगर व अहमदाबाद हीं दोन्हींही शहरें पूर्वी मुसलमानी अमादानींत राजधानीचीं ठिकाणें होतीं; यापैकीं नगरच्या पोरास

विठोबा व अहंमदाबादेच्या मलिक हसन या साधु पुरुषाच्या कबरेस नरसोबा अशीं नांवें आहेत; त्या प्रमाणेंच कल्याण जवळ मलंगड या नांवाचा एक किल्ला असून त्यांत एक पिराचें स्थान आहे; व त्या स्थानाचे "मुजावर" (झाड लोट करणारे) कल्याण येथील केतकर या उपनांवाचे चित्तपावन ब्राह्मण आहेत; अनेक हिंदू लोकांत ताबूत करण्याची, पीरास नवस करण्याची, व नाडे बांधण्याची, चाल असून उलटपक्षीं—मूळच्या हिंदू मधून बाटलेल्या कित्येक मुसलमानांत हिंदूंची नांवे ठेवण्याची, हिंदू सण पाळण्याची, लग्न वगैरे मंगल प्रसगीं कुंकुम तीलक अथवा कुंकुवाचा चांदला लावण्याची, आणि हिंदूचे देवांचे टांक ही घरांत ठेवण्याची, पद्धत आहे; मुसलमानांतील कित्येक फकीर हिंदू साधूप्रमाणें ब्रह्मचर्य व्रतानें राहतात; कित्येकांत, भगवी वस्त्रें परिधान करून भस्म लावण्याची पद्धत आहे; आजही कित्येक हिंदू, व-ब्राह्मण, मराठे, सरदार जहागिरदारांच्या बागेंत, वाड्यांत, मळ्यांत, अथवा इतर स्थावर मिळकतींत, पीराचें स्थान अस्तित्वांत असल्याचें, त्या ठिकाणीं मुसलमान मुजावर ठेवून त्या स्थानाची स्वतः सन्मान पूर्वक अत्यंत काळजी घेत असल्याचें, त्या स्थानास नेहमीं अतीशय आदर दाखवून विविक्षित वारीं नियमितपणानें त्या स्थानाचें दर्शन घेण्यास जात असल्याचें, त्या ठिकाणीं उरूस भरून मुसलमान फकीरांनां जेऊ घालीत असल्याचें—दृग्गोचर होत आहे; त्या प्रमाणेंच शिंदे, होळकर, व गायकवाड, हे पीरांचे भक्त असून शिंद्यांच्या दौलतीस तर,—मनसूर शहावली या नांवाच्या प्रसिद्ध साधु पुरुषाच्या कृपेनें महादजीस सरदारकी मिळाली म्हणून,-"फकीरी दौलत" असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे; मुसलमानी राज्यांत त्या लोकांनीं कित्येक हिंदूंनां मोठमोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या, तशाच हिंदंनींही त्यांच्या राज्यांत मुसलमानांनां दिलेल्या आहेत; व हिंदू लोक ज्याप्रमाणें मुसलमानाशीं इमानानें वागले, त्याप्रमाणेंच मुसलमान लोक हिंदू लोकांशीं इमानानें वागल्याची उदाहरणें आहेत; शिवाजीच्या वेळीं त्याच्या जवळ स्वतंत्र मुसलमानी सैन्याचें पथक असून त्यावरील अधिकारीही मुसलमान होते; त्याप्रमाणेंच शिवाजीच्या आरमारावरील मुख्य अधिकारीही मुसलमान होता; पण त्यानींच जंजिरेकर व इतर मुसलमानी राज्यां बरोबर युद्ध प्रसंग करून शिवाजीच्या उद्दिष्ट कार्यास महत्वाचा हातभार लाविला आहे;

त्याप्रमाणेंच पुढील काळांत प्रसिद्ध पानिपत येथील अस्मानी सुलतानींत इब्राहीम-खान गारदी हा मराठ्यांच्या तोफखान्याचा मुख्य अधिकारी होता; ऐन आणी-बाणीच्या प्रसंगीं मराठयांच्या गोटांत फितूरी करून, इब्राहीमखानास त्यांच्या पक्षांतून फोडण्याचा मोटया जारीनें प्रयत्न झाला; लालूच व धमकी हे दोन्हींही प्रयोग आळीपाळीनें त्याच्यावर करण्यांत आले; परंतु त्यांनां तो वश झाला नाहीं; आणि कोणत्याही मोहास बळी न पडतां, अखेरपर्यंत एकनिष्ठेनें वागून, शेवटीं शत्रूच्या हातीं जिवंत सांपडून, त्याचा अत्यंत क्रूरपणानें वध होतानाहीं त्यानें आपल्या इमानी वागणुकींत अंतर पडूं दिलें नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

मुसलमानांनीं आपल्या जिंकिलेल्या प्रजेवर जीझिया कर बसविला, ही गोष्ट खरी आहे; पण तो एकट्या हिंदू या विवक्षित जातीवर अथवा फक्त हिंदु-स्थान देशांतच नसून अरबांनीं सीरिया प्रांतांतील खिस्ती लोकांवरही तो बसविला होता; मराठयांनीं चौथाई सरदेशमुखी या कराच्या रूपानें जिंकिलेल्या प्रदेशावर आपला शह बसविण्याची पद्धति सुरू केली होती, आणि इंग्रजांनींही एतद्देशीय राजे रजवाड्यांशी तैनाती तह करून व त्यांच्या दरबारीं आपला एक एक प्रतिनिधी ठेवून हिंदुस्थानांत आपलें सार्वभौमत्व प्रस्थापित केलें आहे; त्या प्रमाणेंच इंग्रजांच्या राज्यांतहीं असा इतर भेदमूलक प्रकार दाखवितां येण्या सारखा आहे; परंतु राजकीय दृष्ट्या त्या त्या काळास व परिस्थितीस अनुसरून योग्य वाटणारी राज्यपद्धति, ज्या विजयीं राज्यकर्त्यास आंखून काढावयाची असते तो, ती, आपल्या सोई प्रमाणेंच आंखून काढीत असतो, हें उघडच आहे:-म्हणजे अशा प्रकारच्या भेदमूलक राज्यपद्धति बद्दल दोषच द्यावयाचा असेल तर तो,—इंग्रजांची राज्यपद्धति अधिक सुधारलेली म्हणून त्यांनां वगळून—मुसलमान व मराठे यांनांच फक्त द्यावयाचा नसून मुसलमान, मराठे, व इंग्रज, या तीघांनांही दिला पाहिजे, अथवा त्या पैकीं कोणासहीं न दिला पाहिजे, हें स्पष्ट होतें; आणि अधिक स्पष्ट म्हणावयाचें म्हणजे हिंदू—मुसलमानांचें पूर्व वैभव नष्ट झालें म्हणूनच त्यांच्या प्रत्येक गोष्टीला व राज्यपद्धतिला नांवें ठेविणें, आणि इंग्रज हिंदुस्थानचे राजे झाले, आज सार्वभौम सत्ताधीश आहेत, म्हणून त्यांच्या प्रत्येक राज्यपद्धतिचें व राजकीय कृत्याचें समर्थन करीत राहणें, केव्हांही न्यायाचें ठरणार नाहीं; तर निःपक्षपातीपणानें, हिंदू, मुसलमान, व इंग्रज, यांच्या राज्यपद्धति संबंधी त्या त्या

प्रसंगा प्रमाणें त्याची स्तुती अथवा निषेध व्यक्त करणें हीच गोष्ट न्यायाची ठरेल, हें उघड आहे.

जगांतील इस्लामी धर्मा संबंधानें म्हणावयाचें, म्हणजे एक काळ असा होता कीं, मुसलमान लोकांचें राजकीय वर्चस्व सर्व जगभर पसरते कीं काय, अशी भीती उत्पन्न झाली होती, आणि युरोप खंडातील युरोपियन राज्यें मुसलमान-मय होणार की काय, अशा बद्दल युरोपियन लोकांनां अत्यंत काळजी वाटूं लागली होती. एके काळीं बास्फरसच्या सामुद्रधुनी पासून उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यानें थेट जिब्रालटर पर्यंतचा प्रदेश त्यांच्या ताब्यांत होता; आणि त्यांनी, सर्व युरोप खंडावर स्वतःच्या कर्तृत्वानें आपला दरारा बसविला होता; परंतु इ० सन ७३२ मधील टूर्सच्या ( हें ठिकाण फ्रान्स मध्यें पॉयंटियर्स या गांवा जवळ आहे. ) युद्धानें मुसलमानी विजयाचा यशस्वी तारा अस्तास गेला, व युरोप खंड या अरिष्टांतून निभावलें; प्रसिद्ध फ्रेंच सेनापती मॅानशियर चार्लस मार्लेट यानें मुसलमानी सैन्या बरोबर मोठ्या निकराचें युद्ध करून त्यांत निर्णयात्मक विजय मिळविला, आणि स्पेन देश जिंकणारा प्रसिद्ध मुसलमान सेनानी अब्दु रेहिमान हा आपल्या सर्व सैन्यासह मारला जाऊन त्यामुळें मुसलमानांच्या तिकडील क्षेत्रांतील भावी दिग्विजयास कायमचा आळा बसला; व त्या काळा-पासून मुसलमान लोक जे मागें परतले ते पिरनीजच्या पलीकडे आजपर्यंत केव्हांही गेले नाहींत; युरोपखंडाप्रमाणेंच आशिया खंडांतही त्यांनीं दिग्विजय मिळवून अनेक राज्यें स्थापन केलीं; हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या केल्या, व या देशांत राज्यें स्थापन करून ते स्थाईकही बनले; मुसलमान लोकांनीं इकडे राज्यें स्थापन केल्यानंतर त्यांच्यांतही अनेक नामांकित मंडळी-सुलतान रेझिया उर्फ रझिया, ग्यासउद्दीन तुघलख, कित्येक ठळक दुर्गुण दृष्टी आड केल्यास उत्तर लेखक, वक्ता, गणितज्ञ, वैद्यक, तर्क, व न्यायशास्त्राचा ज्ञानी, कवी, व जमाबंदीची नवी व्यवस्था सुरू करणारा पहिला राज्यकर्ता महंमद तुघलख, प्रसिद्ध प्रजाजनहितेच्छु फिरोज तुघलख, व त्याचा मुत्सद्दि वजीर मकबुलखान, सय्यद खिजरखान, व मुबारिक, शिकंदरलोदी, बाबर, शेरशहा सूर, हुमायून, जगांतील महान् राज्यकर्त्यांमध्यें गणला गेलेला अकबर, व त्याचा स्नेही, सल्लागार व मुत्सद्दि अबुल फजल, जहांगीर, शहाजहान, दुसरा महंमदशहा बहा-मनी याचा प्रसिद्ध वजीर महंमद गवान, निझामशाहींतील प्रसिद्ध चांदबीबी

व मलिकंबर, अदिलशाहींतील इब्राहीमशहाचा वजीर आसदखान, कुली कुत्बशहा, काश्मीरचा शहामीर, ( शमसुद्दीन, शादीखान उर्फ झैन–उल्–अबीदिन ) माळवा प्रांताचा सुलतान हुशंगशहा, व त्याचा मुलगा गज्नीखान, खानदेशाचा सुलतान मलीक राजी फरूकि, मीरन मुबारिकखान, जोनपूरच्या शर्की घराण्यांतील मुबारिकशहा, बंगालचा अलिवर्दीखान, औध मधील सुजाउद्दवला, वगैरे अनेक नामांकित मंडळी–निर्माण झालेली आहेत; आणि हिंदू लोकां प्रमाणेंच त्यांच्यांतही कांहीं राजकारणी व शूर स्त्रिया निर्माण झालेल्या आहेत; इ. सन १२५० मध्यें, शजारुद्दर या नांवाची एक मोठी शूर व पराक्रमी राणी इजिप्तदेशावर राज्य करीत असून तिनें धर्मयुद्धांतील एकांत फ्रान्सच्या नवव्या लुईचा पराभव केलेला आहे; सुलताना रझिया व चांदबिबी या तर हिंदुस्थानांतील अतीशय प्रसिद्ध अशा राजकारणी स्त्रिया म्हणून नांवाजल्याच गेलेल्या आहेत, आणि थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे मुसलमान लोकही कर्तृत्ववान असल्याचें इतिहासावरून स्पष्टपणें दृग्गोचर होत आहे.

तथापि मराठे व मुसलमान यांच्या राजकीय उत्कर्षामध्यें एक अतीशय महत्वाचें व लक्षांत ठेवण्यासारखें वैशिष्य आहे. तें असें कीं मराठ्यांची सत्ता एक-रंगी होती; उलटपक्षीं मुसलमानांची सत्ता दुरंगी होती. प्रसिद्ध माधवाचार्य उर्फ विद्यारण्य स्वामी हा मोठा मुत्सद्दि व राजकारणी साधु पुरुष होता, व त्यानें राज्य व धर्म या दोहोंचा मिलाफ करून–आणि हरीहर यांस प्रोत्साहन व सांपत्तिक मदत देऊन–त्याच्या कडून विजयानगरच्या भावी बलाढ्य राज्याची उभारणी करविली; म्हणजे धर्म गुरुला राजसत्तेचा आश्रय मिळविण्याकरितां दुसऱ्याची मदत घ्यावी लागली. अर्थात लायक व कर्तृत्ववान राज्यकर्ता असेल, व मुत्सद्दि व राजकारणी धर्मगुरु त्याला लाभेल–म्हणजे राज-सत्ता, व धर्म-सत्ता या दोन दोघांच्या हातीं असलेल्या सत्ता एक मतानें उद्दिष्ट कार्याकरितां पुढें येऊन परस्परावलंबी होतील, तरच राज्य व धर्म या दोहोंचा मिलाफ करिता येईल; तसा मिलाफ झाला म्हणूनच विजयानगरच्या भावी बलाढ्य राज्याची उभारणी झाली, व विजयानगरकरा प्रमाणेंच रामदास स्वामी–जरी स्वामीनें राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं तरी–व छत्रपति शिवाजी यांची ही गोष्ट आहे. परंतु मुसलमानी सत्तेच्या उत्पत्तीची ही गोष्ट नसून राज-सत्ता; व धर्म–

सत्ता या दोन्हीं एकाच व्यक्तिच्या हातीं असून त्या मुळेंच उद्दिष्ट कार्याकरितां त्यांना एकवटलेल्या दुरंगी सत्तेचा मोठा जोरदार आश्रय मिळालेला आहे; व म्हणूनच शंकराचार्य व खलीफा यांच्या सत्तेमध्यें अत्यंत महत्वाचा फरक दृष्टोपत्तीस येत आहे. मुसलमानी खिलाफत म्हणजे एकवटलेली दुरंगी सत्ता होय; या संबंधीं थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे, (मॉडर्न रिव्हयू मधील श्री जोतींद्रनाथ चतर्जींचा लेख पहा.) "महंमद पैगंबराच्या उदया पूर्वीं अरेबिया प्रांतात एकी नव्हती; तेथें निरनिराळीं लहान राज्यें होतीं; व लोक मूर्ति पूजक व रानटी होते. या लोकांना महंमदानें इस्लामचा एकेश्वरी धर्म शिकविला; व देशांत एकी घडवून आणिली. महंमदाचे अनुयायी त्यास राजकीय ( ऐहिक ) व धार्मिक गोष्टींत आपला सर्व श्रेष्ठ गुरु मानूं लागले. या दुरंगी सत्तेचेंच दुसरें नांव " खिलाफत " हें असून या दोन्हीं ही सत्ता ज्या व्यक्तिच्या हातीं एकवटलेल्या असतीस त्यास "खलीफा" असें म्हणत असत. आरंभीं आरंभीं खलीफा लोक-नियुक्त असत; पण पुढें पुढें ही सत्ता निरनिराळया वंशाकडे गेली, व ती नंतर वंशपरंपरागत होऊन बसली.

स्वत: महंमद पैगंबरानें आपल्या जावयाला खलिफा नेमिलें नाहीं. कारण खलीफा हा लोकनियुक्त असावा, असें त्याचें मत होतें. महंमद पैगंबरा नंतर अबूबकर, उमर, उस्मान, व अली, असे चार खलीफा अनुक्रमें गादीवर आले; हे चारीही, लोकनियुक्त खलीफा होते. आटोमन कुळांतील मुआविया यानें अली पासून खिलाफत मिळवून आपल्या मुलाला खलीफा पदावर स्थानापन्न केलें, व लोक नियुक्त पद्धति बंद केली. हें पद या घराण्यांत जवळ जवळ एक शतक पर्यंत टिकलें; ( इ० सन ६६१-७५० ) व पुढें तें आब्बासी वंशाकडे सुमारें पांचशें वर्षे टिकलें. या काळांत अनेक महत्वाच्या राजकीय उलाढाली झाल्या; मुसलमानांनीं आफ्रिका, इजित, हिंदुस्थान, वगैरे ठिकाणीं आपलीं मोठमोठीं राज्यें स्थापन केलीं; त्याबरोबर खलीफांची राजकीय सत्ता नष्ट झाली, व त्यांच्याकडेस एकटें धर्म-गुरुत्व शिल्लक राहिलें. इ० सन १२५७ या वर्षीं हुलूगु या मोंगल राजानें बगदाद शहरावर हल्ला करून अब्बासी वंशांतील शेंवटचा खलीफा अली मुस्तासीम यांस ठार मारिलें, व तेथील खिलाफतीचा शेवट केला; परंतु इजिप्त मध्यें राज्य करीत असलेल्या बेबार राजाला खलीफा पद प्राप्त न झाल्यामुळें त्यानें अब्बासी वंशांतीन अली मस्तानशीर या नांवाच्या

एका मनुष्यास इजिप्तमध्यें खलीफा बनवून इजिप्तच्या सुलतानासाठीं त्याचा आशिर्वाद मिळविला. नंतर इ. सन १५२० पर्यंत खलीफा व खिलाफत हीं इजिप्तमध्यें कायम होती. परंतु त्या वर्षी तुर्कस्थानचा आटोमन वंशांतील सुलतान सेलीम यानें इजिप्तचा सुलतान कुनशुलधरी याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला; तेव्हां खलीफा, सेलीमच्या पक्षास मिळाला. व त्याच्या बरोबर कान्स्टांटिनोपल येथें गेला. नंतर खलीफा अल्मुसा यानें आपले सर्व अधिकार तुर्की सुलतान उस्मान अल्ली याच्या स्वाधीन केले, व आपण इजिप्तमध्यें परत निघून गेला. म्हणजे आटोमन राजघराण्यांतील खलीफांचे अधिकार दुरंगी—म्हणजे राजकीय व धार्मिक गुरुत्वाचे असे दुहेरी—आहेत. शिवाय जरी कांहीं काळ कांहीं खलीफा इजिप्तमध्यें राहिले असले तरीही महंमदी पवित्र भूमीवर त्यांचाच हक्क असून इजिप्तचे सुलतान खलीफांच्या तर्फे त्यांचें रक्षण करीत असत; पुढें या पवित्र भूमी वरील इजिप्तचा ताबा नाहींसा होऊन, खलीफा पदाबरोबरच तोही आटोमन सुलतानाकडे गेला, व त्या वेळेपासून आज तागायत ते त्यांचें सरक्षण करीत आले आहेत." उलटपक्षीं मराठयांच्या इतिहासांत राजकीय व धार्मिक अधिकार निरनिराळयाच व्यक्तिच्या हातांत राहिलेले आहेत; आणि हेंच वैशिष्य अतीशय महत्वाचें व लक्षांत ठेवण्या सारखें आहे.

हिंदुस्थानांत मोंगल साम्राज्य अस्तित्वांत होतें, त्या काळापूर्वी, व त्या काळांतही, अनेक मुसलमानी राज्यें विद्यमान होतीं; आणि विजयानगरकर रामरायाचा तालीकोट जवळील युद्धांत नाश होऊन तें राज्य नामशेष झाल्यावेळेपासून मराठयांचें राज्य निर्माण होईपर्यंत दक्षिणेंत पहिल्यानें बहामनी राज्य, व नंतर त्याच्या शाखा, व उत्तरेस मोगल साम्राज्य, सत्तापूर्ण होतें. या सर्व राज्यांत मोटमोठ्या अधिकाराच्या जागा मुसलमानांनाच मिळत असत; तरी सुद्धां अशा बहुतेक सर्व अधिकाऱ्याजवळ हुषार हिंदू गृहस्थ कामास नेमिलेले असत; दिवाणी, चिटणीशी, हिशोबी, वकीली वगैरे कामावर हिंदूच्या नेमणुका होत असत, व ते विशेष विश्वासांतील असून त्यांचा त्या अधिकाऱ्यांना अतीशय उपयोग होत असे. मुसलमानी अमदानींत अशीं अनेक हिंदू कुटुंबें, दक्षिणेंत व उत्तरेकडे मुसलमान सरदारांजवळ पिढ्यानुपिढ्या कामें करून प्रसिद्धीस पावलेलीं होतीं. अवरंग झेबाच्या मृत्यू नंतरही

हिंदू लोकांचें हें महत्व कायम होतें; ही गोष्ट अनेक उदाहरणें देऊन सिद्ध करितां येण्यासारखी असून नमुन्या दाखल तशीं दोन उदाहरणें या ठिकाणीं ग्रंथित केली आहेत; जहांदरशहा हा मोंगली गादीवर आल्यावर प्रसिद्ध मुसलमान सरदार झुल्फिकारखान हा मुख्य वजीर झाला. त्याच्या जवळ सभाचंद या नांवाचा एक खत्री जातीचा मनुष्य असून त्याच्यावर खानाचा अत्यंत विश्वास होता; झुल्फिकारखान वजीर झाल्यावर त्यानें सभाचंदास राजा हा किताब देऊन, त्यास "दिवाण-ई-खालसा"–म्हणजे वसूली व हिशोबी खात्यावरील मुख्य अधिकारी–नेमिलें होतें; व त्याच्याच मसलतीने व विचारानें खान राज्यकारभार चालवीत होता. परंतु त्यामुळें दरबारांत खान व सभाचंद या उभयतां बद्दल द्वेषभाव उत्पन्न झाला. पुढें जहांदरशहा व फर्रुखसेयर या उभयतांमध्यें आग्रा येथें युद्ध होऊन त्यांत फर्रुखसेयर–आणि त्याचा पक्ष प्रबळ करून त्यास बादशाही पद मिळवून देणारे हसन अली व हुसेन अली हे उभयतां सय्यद बंधू–विजयी झाल्यावर हसन अली उर्फ अबदुल्ला खान कुत्ब्-उल्-मुल्क् यानें सभाचंदास कैदेंत टाकून त्याची सर्व माल मिळकत लुटून घेतली. आणि पुढें झुल्फिकारखान व त्याचा बाप आसदखान यांचा वध झाल्या नंतर, ता. ४ जुलै इ० सन १७१३ रोजीं, सभाचंदानें या दुष्ट कृत्याचा मोठ्या जोरानें निषेध केल्यामुळें, प्रथम त्याची जीभ कापून, नंतर त्याचा शिरच्छेद करण्यांत आला; दुसरें उदाहरण म्हणजे सय्यद बंधूंचेंच होय. अबदुल्ला यानें सभाचंदाचा वध केला, पण तो राजकीय कारणामुळें, आणि आपल्या धन्याच्या वधाबद्दल त्यानें तीव्र निषेध व्यक्त केला, त्यामुळेंच होय; सभाचंद हिंदू, म्हणून नव्हे; कारण या सय्यद बंधूंच्या कारकीर्दींत तर राज्यकारभारांत हिंदूंचेच विशेष महत्व वाढलेलें होतें; आणि मोंगल बादशाहींत मराठे व रजपूत यांचें प्राबल्यही याच सय्यद बंधूंच्या कारकीर्दींत विशेष वृद्धिंगत झाले होतें.–रतनचंद–हा "बनिया" म्हणजे वाणी होता–या नांवाचा एक मोठा हुषार, व वसुलाच्या आणि हिशोबाच्या कामांत पूर्ण निष्णात असा मनुष्य अबदुल्ला सय्यदाच्या जवळ असून तो त्याचा निव्वळ उजवा हात होता. हा रतनचंद मोठा इमानी, विश्वासू, खटपटी, व आपल्या धन्याच्या उत्कर्षा करितां अतीशय झटणारा होता; अबदुल्ला यानें फर्रुखसेयर बादशहास सांगून त्यास कांहीं काळपर्यंत "दिवाण-ई-खालसा" नेमविलें होतें; रतनचंदाच्याच मतानें व मसलतीनें

अबदुल्ला हा आपला कारभार, इतर सर्व राजकीय व्यवहार, व कारस्थानें, करीत होता. आणि रतनचंदाचें त्याच्यावर इतकें वजन होतें कीं त्याच्याच शिफारशीनें अबदुल्ला यानें हिंदू लोकांवरील जिझिया कर बंद केला होता; पुढें सय्यद वंधू व फर्रुखसेयर यांच्यामध्यें अपशांत वैमनस्य आल्यावर हिंदुद्वेष्टा, व अवरंगझेबाच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आलेला अनुभवी सरदार, इनायतउल्ला, याची बादशहानें रतनचंदच्या जागीं नेमणूक केली, व रतनचंदास नोकरींतून काढून टाकण्याचा हुकूम केला; परंतु अबदुल्ला सय्यदानें तो मानिला नाहीं, व उभयतां सय्यद बंधू व बादशहा यांच्या मधील वैमनस्याची परमावधी होऊन सय्यद बंधूंनीं बादशहास पकडण्याचें कारस्थान उभारिलें. त्यांतही रतनचंद यानेंच प्रमुखत्वानें भाग घेतला होता; व तो अबदुल्ला याचा कंठमणी असल्यानें त्याच्याकडेसच बादशहास पकडण्याची कामगिरी सोपविण्यांत आली होती; त्याप्रमाणें रतनचंद हा जनानखान्यांत फौज घेऊन गेला; ता० २८ फेब्रुवारी इ. सन १७१९ रोजीं फर्रुखसेयर बादशहास कैद करून पुढें त्यास ठार मारण्यांत आलें, व सय्यदांनीं महंमदशहाची तख्तावर स्थापना केली; तेव्हां रतनचंद, बादशहा फर्रुखसियर याचा सासरा मारवाडकर अजितसिंग, कोठ्याचा राजा भीमसिंग, यांच्या शिफारशीवरून सय्यदांनीं पुन्हा लागलीच हिंदू लोकांवरील जझिया कर माफ केला; पुढें उभयतां सय्यद बंधूमध्यें वांकडें आलें, तेव्हां ही रतनचंद यानेंच उभयतांची समजूत घालून त्यांचा समेट घडवून आणिला; व राजा गिरिधर बहादूर सारखा प्रबळ व शूर सरदार सय्यदांच्या पक्षांत ओढून घेण्याची महत्वाची कामगिरीही त्यानें यशश्वीपणें बजाविली. पुढें लवकरच महंमदशहाचा मुक्काम जयपूर जवळ असतां हुसेन सय्यदाचा खून झाला; त्याची छावणी लुटण्यांत आली; त्याचे सर्व सरदार आपला जीव घेऊन पळून गेले; आणि सर्व छावणीभर भावी वजीर महंमद अमीनखान यानें मोठ्या जोराची दंगल उडवून दिली. या वेळीं रतनचंद हुसेन बरोबर होता. त्यास ही इतरां प्रमाणेंच पळून जाण्यास सवड होती, संधी होती, व पुष्कळांनीं त्यास पळून जाण्यास ही सांगितलें होतें; परंतु त्यानें कोणाचें ही म्हणणें मान्य केलें नाहीं; हुसेनची छावणी सोडिली नाहीं; आणि स्वतःच्या जिवाची ही क्षिती बाळगिली नाहीं; हुसेनचा खून झाल्या नंतर रतनचंदाने ही बातमी तावडतोब अब्दुल्ला यास कळविली; व तो तेथेंच छावणींत राहिला; राजा गिरिधर बहादूर याचा

बाप दयाराम हा अमीनखाना जवळ असून तो त्याच्या अतीशय भरंवशाचा व प्रेमांतील सरदार होता; त्यास अमीनखानानें हुसेनच्या छावणींत पाठवून रतनचंदास पकडविलें; त्याचे हाल करून त्यास आपणासमोर आणवून नंतर त्यास प्रतिबंधांत ठेविलें; आणि पुढें अबदुल्ला व बादशहा यांच्या मध्यें युद्ध सुरू झाल्यावर महंमदशहानें रतनचंदास आपणासमोर आणवून त्याचा वध करविला; (ता० १३-११-१७२०.) त्या नंतर दुसऱ्याच दिवशीं ता० १४ रोजीं दिल्ली व मथुरा या मार्गावर यमुना तीरीं हसनपूर येथें अब्दुल्ला व बादशहा यांच्या मध्यें युद्ध होऊन अब्दुल्ला पाडाव झाला, व पुढें दोन वर्षानीं (ता० ११ ऑक्टोबर १७२२) त्याचा ही खून होऊन सय्यद बंधूंचा क्रांतिकारक इतिहास समाप्त झाला. वरील विवेचनावरून, मुसलमानी अमदानींत हिंदू लोकांचें कितीं महत्व होतें, याबद्दल कोणासही सहज योग्य कल्पना करितां येईल, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थानांतील निरनिराळया मुसलमानी अमला खालील हिंदू प्रजेची सुस्थिती, त्यांची सैन्य व राज्य व्यवस्था, त्यांची हिंदू लोकां बरोबरील वागण्याची पद्धति, त्यांचा राज्यकारभार, प्रजेच्या सुख समृद्धि करितां त्यांनीं केलेली अनेक कृत्यें, वगैरे बाबतीं संबंधानें पुष्कळच निरनिराळी व उपयुक्त माहिती देता येण्यासारखी आहे. तथापि स्थलाभावामुळें—व पुढील भागांत त्या संबंधीं विवेचन केलेलें असल्यामुळें—ह्या ठिकाणीं त्या संबंधीं अगदीं थोडक्यांतच उल्लेख करणें इष्ट आहे. मेकॉले यानें "लार्ड क्लाईव्ह" या निबंधांत मोंगल साम्राज्या विषयीं मोठें सरस व चटकदार वर्णन केलेलें असून त्याच्याच शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, "सोळाव्या शतकांत बाबर व त्याचे मोंगल अनुयायी, यांनीं जें साम्राज्य स्थापन केलें, तें त्या वेळीं जगांत अत्यंत मोठें, व्यापक, व वैभव संपन्न, होतें. कोणत्याही युरोपियन राज्यांत एकाच राज्यकर्त्याच्या अमलाखालीं एवढ्या मोठ्या लोक वस्तीचा प्रदेश नव्हता; व त्याच्या खजिन्यांतही मोंगल साम्राज्या इतकी संपत्ति जमा होत नव्हती. ज्यांनीं सेंट पिटर पाहिलें आहे, ते प्रवासी लोक सुद्धां हिंदुस्थानांतील या मुसलमान साम्राज्याधिपतींनीं बांधिलेल्या इमारतींचें सौंदर्य व वैभव पाहून थक्क होऊन गेले; दिल्लीच्या तख्ता सभोंवतील असंख्य परिवार व अनुपमेय शोभा पाहून, ज्यांनीं व्हरसेलीसचें वैभव नेहमीं पाहिलें होतें, त्यांचेही नेत्र दिपून गेले. मोंगल बादशहाकडून

मिळालेल्या सनदां अन्वयें नेमिल्या गेलेल्या कित्येक मोठमोठ्या सुभेदारांच्या अमलाखालीं फ्रान्सच्या राज्या इतकी अथवा जर्मनीच्या प्रजे इतकी प्रजा असे; आणि या राज्यकर्त्यां इतके त्यांच्याही अमलाखालील प्रदेशाचें उत्पन्न असे. त्या प्रमाणेंच या सुभेदारांच्या हातांखालीं दुय्यम अथवा नायब सुभेदार या नांवाचे अधिकारी असून त्यांच्या ताब्यांतही टस्कनीचा ड्यूक व साक्सनीचा इलेक्टर यांच्या इतका प्रदेश असे, व त्या प्रदेशाचें उत्पन्न ही त्यांच्या ताब्यांतील प्रदेशा इतकेंच असे;" या एवढयाच त्रोटक वर्णनावरून ही मोंगली राज्याच्या वैभव संपन्न स्थितीची बरीच कल्पना करितां येते; तथापि या काळाच्या तीन शतकें अगोदरच्या काळाची ही उपलब्ध माहिती या ठिकाणीं देतां येण्यासारखी आहे; ती ही कीं, खिलजी घराण्यांतील सुलतान अल्ला उद्दीन (कारकीर्द इ० सन १२९५ ते इ० सन १३१६) यानें इ० सन १३०३ नंतर, आपली फौज नेहमीं जय्यत स्थितींत असावी म्हणून, एक नवीन योजना घडविली; त्यांत स्वारांचा सालीना तनखा २३४ टंक म्हणजे ३६० रुपये ठरविला, व स्वारानें एक अधिक घोडा ठेविल्यास त्यास दरसाल शंभर रुपये अधीक देत जावे, असा नियम केला; त्याप्रमाणेंच शिपाई, स्वार वगैरे सैन्यातील लोकांनां, त्यांना मिळणाऱ्यां पगारांत त्यांची चांगली गुजराण होऊन त्यांनां आपापलीं हत्यारें ही सुस्थितींत ठेवितां यावी, म्हणून त्यानें धान्याच्या विक्री संबंधीं दर ठरविले; ते असे कीं, गहूं, दर अठ्ठावीस शेराच्या मणास तीन आणे, तांदूळ, व डाळ, दर मणास दोन आणे, व मसूर एक आणा; वास्तवीक पाहतां त्या वेळचा बाजारचा दर ही हाच होता; परंतु पुढें महर्गता होऊन कदाचित धान्याचे भाव वाढल्यास अगाऊ खबरदारी व तरतूद म्हणून त्यानें ही योजना केली होती; शिवाय दिल्ली शहरांत केव्हां ही धान्याचा तुटवडा येऊ नये म्हणून त्याच्या ताब्यांतील दुआब वगैरे प्रांतांतील वसूल रोख रकमेंत न घेतां धान्य रूपानें घ्यावा, आणि धान्याची महर्गता झाली तरी सुद्धां ठरीव भावानेंच लोकांनां, व्यापाऱ्यांनीं धान्याचा पुरवठा करीत जावा अशी त्यानें तजवीज केली होती; त्या प्रमाणेंच धान्याची ने आण करण्यास स्वतंत्र भाणसांची योजना केली होती; कोणीही ठरीव भावाहून जास्त किंमत घेतल्यास त्यास त्या बद्दल शिक्षा देण्यांत येत होती, आणि कोणी

वजनांत लबाडी केल्यास लबाडीनें उपयोगांत आणिलेल्या वजनाच्या भारोभार त्यांच्या अंगाचें मांस काढून घेण्यात येत होतें; शिवाय धान्या प्रमाणेंच भाज्या, फळें, साखर, कंगवे, सुया, तेल, टोप्या, जोडे, घोडे, गुलाम, नौकर, मोलकरिणी, व वेश्या, इत्यादिकांची ही त्यानें किंमत ठरवून दिली होती; व त्यांत गुलामास १० ते १५ रुपये, सुरूप नौकरास २० पासून तीस रुपये, मोलकरिणीस ५ पासून १२ रुपये, व वेश्येस २० पासून ४० रुपये, असे भाव ठरविले होते; त्या प्रमाणेंच बहामनी रियासतींतील दुसरा महमंदशहा याचा प्रसिद्ध वजीर महमंद गवान यानें जमीनीची मापणी करून सरकार देण्याचे कायमचे दर, व राज्याच्या लष्करी व्यवस्थेची ही पुनर्घटणा करून सैन्यास ठरीव व वेळेवर पगार देण्याचें नियम ठरविले होते. या बाबतींत आणखी असाही उल्लेख आढळतो कीं, इ० सन १४७० मध्यें बहामनी लष्करास मिळत असलेला पगार इ० सन १८३० मध्यें—म्हणजे १४७० नंतर ३६० वर्षांनीं—इंग्रजी लष्करास मिळत असलेल्या पगारापेक्षां पुष्कळच जास्त होता; शिवाय या उभयतां कालांमधील ३६० वर्षांच्या कालांतील परिस्थितींत पडलेला महत्वाचा फरकही लक्षांत घेणें आवश्यक आहे; कारण पैशाची किंमत त्या काळांत हल्लींच्या मानानें पुष्कळच जास्त होती; म्हणजे अर्थातच आवश्यक अशा संसारोपयोगी जिनसाची किंमत पुष्कळच कमी होती; अशा स्थितींतही ५०० घोडे स्वारांच्या पथकाचा बहामनी राज्यांतील इ. सन १४७० मधील वार्षिक खर्च ३,१५,००० रुपये होता; आणि एवढ्याच इंग्रजी घोडेस्वारांच्या पथकाचा इ. सन १८३० मधील वार्षिक खर्च २,१९,००० होता; त्याप्रमाणेंच इ. सन १४७० मध्यें, स्वतःचा घोडा, व हत्यारें, बाळगणाऱ्या शिलेदारास बहामनी राज्यांत ४० रुपये पगार मिळत होता; व इ. सन १८३० मध्यें, अशा शिलेदारास इंग्रजी सैन्यांत वीस रुपये पगार मिळत होता; एकंदरींत पाहतां बहामनी राज्यातील सर्व खात्याचें काम चांगल्या प्रकारानें चालले होतें असें दिसतें; आणि राज्यव्यवस्थेतील निरनिराळ्या खात्यांचा परस्परांवर इतका व्यवस्थित दाब होता कीं, अन्याय करण्यास फारशी जागा नव्हती, असें म्हणणें प्राप्त होतें. (Meadows Taylors Students History of India हें पुस्तक पहा.)

वरील हकीकती प्रमाणेंच, प्रसिद्ध मोंगल बादशहा अकबर याची, आणि इतर हिंदू मुसलमान राज्यकर्त्यांची, राज्यव्यवस्था, वसूली व्यवस्था, सैन्य-

व्यवस्था, वगैरे अनेक बाबतीं संबंधानेंही, उदाहरणासह, पुष्कळच लिहितां येण्यासारखें आहे, व त्यासंबंधीं तुलनात्मक दृष्टया मोठ्या विशद रीतीनें विवेचनही करितां देण्यासारखें आहे. परंतु स्थलाभावामुळें साधारण कल्पना करितां येईल इतकीच त्रोटक माहिती या ठिकाणीं दिलेली आहे; तथापि, हिंदुस्थानांतील सर्वच हिंदु मुसलमान राज्यकर्ते सद्गुण संपन्न व कर्तृत्ववान होऊन गेले, असें मात्र वरील विवेचनावरून समजावयाचें नाहीं. जगांतील कोणत्याही देशांतील इतिहासांत सद्गुणसंपन्न व कर्तृत्ववान राज्यकर्त्यांची संख्या हातांबोटांवर मोजण्या इतकींच असणार व असते हें उघड आहे; त्याप्रमाणेंच जगांतील कोणत्याही अत्यंत सुधारलेल्या म्हणून लौकिक असलेल्या राज्यकारभारांतही कांहींना कांहीं तरी व्यंग, कमीपणा, अथवा नवीन जरूरीमुळें उत्पन्न होणाऱ्या गोष्टीबद्दल तजवीज करण्याची आवश्यकता, हीं भासणारच हाही सिद्धांत आहे; आणि असे दोष अफगाणिस्थानाच्या बिन सुधारलेल्या अमीराच्या राज्यांत जसे दाखवितां येतील, तसेच सुधारणेच्या उच्च शिखरावर असलेल्या इंग्रजांच्या ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान या देशांतील राज्य व्यवस्थेंत ही दाखवितां येतील; म्हणून आशियांतील राज्यें—आतां जपान लायक असल्याचें ठरलें आहे म्हणून तेवढें एकटें राष्ट्र सोडून—तेवढीं सर्व नालायक, व अपात्र, आणि युरोपियन राज्यें तेवढींच काय तीं लायक व पात्र असें म्हणणें निव्वळ स्वार्थमूलक व खोडसाळपणाचें आहे; इतकेंच नव्हे तर तो एक अधूनिक हेत्वाभास ( Modern fallacy ) ही आहे; आणि जगांतील शहाणपण, ज्ञान, व कर्तृत्व शक्ति, वगैरे बाबतींचा, परमेश्वरानें कोणत्याही एखाद्या एकट्याच मनुष्यास, जातीस, समाजास, देशास अथवा खंडास, विशिष्ट हक्क, मक्ता, अथवा कुलपरवाना ( Monopoly ) दिलेला नसून त्याची सर्व जगभर त्यानें विभागणी केली आहे, ही गोष्ट जगाच्या इतिहासांतील निरनिराळया देशांच्या उदाहरणावरून सिद्ध करून देतां येण्यासारखी आहे. युरोपियन लोक जगभर व्यापारा करितां भटकत फिरले; तराजू मागून तरवार, व्यापारा मागून बंदूक, व बायबला मागून संगीन, या क्रमानें त्यांनीं जगांत निरनिराळया ठिकाणीं वसाहतीं केल्या; कित्येक प्रदेशांत श्रेष्ट सत्ता, अथवा सार्वभौमत्वाचे अधिकार प्रत्यक्ष आपणाकडे न घेतां वर्चस्वाचें क्षेत्र म्हणून त्यांनीं आपली अप्रत्यक्ष हुकमत, प्रस्थापित केली; व कित्येक प्रदेशाचे ते स्वतः प्रतिनिधी, राज्यकर्ते, व सामंत-चक्राधिपति,

बनले; परंतु व्यापार, अधिकार, व संपत्ति, या त्रयीं बरोबर युरोपियन राष्ट्रें सर्व गुणसंपन्न बनलीं, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं; एखाद्या राष्ट्रांत पिढ्यानुपिढ्या असलेले अनेक अमोल्य सद्गुण, तें राष्ट्र जिंकले गेल्या नंतर लोपून जातात, आणि अशा जित राष्ट्रांतील लोकांचें जेत्यावर तेज न पडतां जगाच्या राष्ट्रीय इतिहासांत तें राष्ट्र नामशेष व निस्तेज स्थितींत जिवंत राहते, असा सर्व साधारण नियम आहे; परंतु त्यासही अपवाद आहे; आणि तो अपवाद म्हणून "हिंदुस्थान" या देशाकडे बोट दाखवितां येण्यासारखें आहे. आजपर्यंतच्या अनेक शतकांच्या निरनिराळ्या परिस्थिति व क्रांत्या या मधून, हिंदूधर्म, हिंदू संस्कृति, हिंदू शील, व हिंदू कर्तृत्व शक्ति, आजही सुरक्षितपणें बचावून जगाच्या इतिहासांत प्रमुखत्वानें झळकत आहे. "मोगल राष्ट्राचा ऱ्हास होण्याच्या वेळीं जर युरोपियन लोक हिंदुस्थानच्या रणक्षेत्रांत मध्यें ढवळा ढवळ करण्यास नसते तर सर्व दक्षिण आणि मध्य हिंदुस्थानचे मालक "मराठे" हेच झाले असते," असें लायल साहेबाचे म्हणणें आहे; ( Lyall's British Dominion in India हें पुस्तक पहा. ) मराठ्यांनां एक छत्री साम्राज्य म्हणजे काय हें माहीत होतें; आणि व्हिन्सेंट स्मिथनें आपल्या इतिहासांत (Early History of India) म्हटल्या प्रमाणें हिंदू लोकांनां एकछत्री साम्राज्याची पूर्ण ओळख होती; मुसलमानांच्या पूर्वीं हा देश पूर्णपणें हिंदूच्याच ताब्यांत होता, आणि आज साधारण जेवढ्या भागावर इंग्रजी अंमल चालत आहे, तेवढ्याच भागावर जवळ जवळ पूर्वीं हिंदूंचीच सत्ता चालत होती; त्या प्रमाणेंच इ०सन १९१०या वर्षीं लंडन येथें रॉयल एशियाटिक सोसायटी पुढें सर हरबर्ट रिस्ले यानें,—सर हेनरी सम्नर मेन याचा आधार घेऊन असें भाषण केलें कीं, "राष्ट्रियत्वाची कल्पना," ही मूळ हिंदुस्थानांतच उगम पावलेली आहे, व नंतर ती पश्चिमेकडे गेलेली आहे. राजकीय एकीकरण हें तीन मूलभूत तत्वांचें दृश स्वरूप आहे. आणि ब्रिटिश लोकांना हिंदुस्थानात जें यश मिळालें, त्याहून जर यदाकदाचित कमी यश मिळालें असतें तर मराठ्यांनीं हिंदुस्थानचें राष्ट्रीय एकीकरण केलें नसतें, असें तरी कोणी सांगावें ? सारांश "प्राचीनकाळी हिंदुस्थानांत आलेले सर्व प्रवासी, हिंदुस्थानांतील उच्च दरजास पोहोंचलेली संस्कृति पाहून चकित होऊन गेलेले आहेत. गजबजलेलीं शहरें, अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेली शेती, कलाकौशल्याच्या तयार केलेल्या निरनिराळ्या वस्तू, प्रचंड व्यापार. शोभिवंत शिल्प केलेल्या निदर्शक आहेत." ( Colonies and

Dependencies हें पुस्तक पहा. ) त्याप्रमाणेंच हिंदु, व हिंदवासियां संबंधीं पुष्कळ बाबतींत–म्हणजे त्यांचें शौर्य, साहस, पराक्रम, देशाभिमान, पावित्र्य, स्वामिनिष्ठा, इमानी वागणूक, शोधक बुद्धि, शुद्ध आचरण, नैतिक बंधनांचें पालन, त्यांनीं घडविलेल्या निरनिराळया राजकीय घटना, ग्रामपंचायती, व शहर सुधराई वगैरे सारख्या लोकोपयोगी संस्था, वांग्मय ज्ञान, तत्वज्ञान, वैद्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, न्याय, नीती, गणित व व्याकरण शास्त्र, युद्धशास्त्र, गायनवादनशास्त्र, कलाकौशल्य, व शिल्पशास्त्र, रंगित व विणकामें, व्यापार व वसाहती विषयक प्राविण्य, वगैरे अनेक बाबतींत–अजून पुष्कळच उपयुक्त माहिती देतां येण्यासारखी आहे; परंतु स्थलाभावामुळें, आणि हिंदुस्थान देशाची मुसलमानीं अमलापर्यंतच्या पूर्वकाळाची योग्य माहिती होण्यास वर दिलेली एकंदर हकीकत पुरेशी असल्यामुळें, वर दिग्दर्शित केलेल्या अनेक बाबतींचें या ठिकाणीं अधिक विवेचन केलें नाहीं.

तथापि वर ग्रंथित केलेल्या एकंदर माहितीवरून हिंदूलोकांच्या अंगांतील कर्तृत्वशक्ति, करामत, व कर्तबगारी, या बद्दल कोणासही सहज खात्री पटल्या वांचून राहाणार नाहीं. याच हिंदू लोकांपैकीं " मराठे " हे एक आहेत; याच " मराठा " लोकां मध्यें प्रारंभी शिवाजी या नांवानें–व पुढें छत्रपती शिवाजी महाराज या नामाभिधानानें ओळखली जाणारी, अत्यंत उज्वल, अत्यंत कीर्तिमान, अत्यंत पवित्र, व अत्यंत चिरस्मरणीय, अशी एक अत्यंत अलौकिक विभूती निर्माण झाली; जगांतील अत्यंत प्रतापशाली व महाराष्ट्रांतील अत्यंत देदिप्यमान असा हा भूलोकीचा तारा, माता जिजाबाई हिच्या पोटीं नवमास पूर्ण होऊन सुरक्षितपणें जन्मास आला; गोब्राम्हण प्रतिपालक व महाराष्ट्र धर्म संरक्षक असा हा बालरवी, राजे शहाजी याचा मुलगा शिवबा, शिवनेरीच्या किल्ल्यांत उदयास आला; महाराष्ट्र देश उद्धारक व स्वराज्यस्थापक शिवराय मावळ प्रांतांत, मवाळ दिसणाऱ्या लोकांत व मावळे मंडळींत वाढीस लागला; " मराठा तितुका मेळवावा " या समर्थाच्या सांप्रदायिक सवालाला, आपल्या सभोंवतीं मराठा मंडळ जमवून, कृतीनें तोडीसतोड असें उत्तर देऊन, सर्व महाराष्ट्रियांनां राजकीय व धार्मिक स्वातंत्र्य मिळवून देणारा हा बालवीर शिरोरत्न शिवाजी त्या नंतर मावळ प्रांतांतच राज्य संस्थापनेच्या पूर्व उद्योगास लागला; याच छत्र-

पति शिवाजी महाराजानें, नंतर दख्खन मध्यें " मराठा राज्य " जन्मास आणून तें अर्भक आपण निजधामास जाते समयीं, त्याची काळजीनें प्राणा पलीकडे जोपासना करून तें जोमानें वाढीस लावण्या करितां, मराठा मंडळाच्या ओटींत घातलें; याच अर्भकास, मराठा मंडळानें, त्याची प्राणापलीकडे जोपासना करून व त्यास वाढीस लावून, सतेज असा राष्ट्र पुरुष बनविलें; याच मराठा मंडळानें पुढील काळांत दख्खनच्या घोड्यास सिंधू नदाचें पाणी पाजून अटकेवर मराठयांचा भगवा झेंडा फडकविला; याच मराठा मंडळानें, राजकीय रंगभूमीवर वर्चस्वाचें बक्षीस मिळविण्याकरितां, पुढें आलेल्या प्रत्येक प्रतिस्पर्ध्याला आपली पूर्णपणें ओळख करून दिली आहे; याच मराठा मंडळानें, हैद्राबादकर निझाम, म्हैसूरकर, हैदर अल्ली व टिपु सुलतान, बंगाल व औध, येथील नबाब, गोंविकर पोर्तुगीज, चंद्र-नगरकर फ्रेंच, मुंबई, मद्रास व कलकत्तेकर इंग्रज, वगैरे सत्ताधाऱ्यांनां आपल्या अस्तित्वाची पूर्ण जाणीव करून दिलेली आहे; याच मराठा मंडळानें जाट व रजपूत यांच्याकडून आपले हक्क वसूल करून, रोहिलखंडास शह देऊन तें आपल्या संरक्षक हक्काच्या कक्षेंत आणिलें आहे; याच मराठा मंडाळानें, याच मराठ्यांच्या सैन्यानें, व शस्त्रानें, दिल्ली काबीज करून व ताब्यांत ठेवून तेथील सिंहासनावर-दिल्लीपतीच्या तख्तावर, बादशहा शहाअलम यांस स्थानापन्न केलें आहे; आणि तरवारीस तोफांचें पाठबळ देऊन त्याचा व त्याच्या तख्ताचा कांहीं काळपर्यंत सांभाळ केलेला आहे. याच मराठा मंडळानें "मराठ्यांचा वशिला" ही अजब चीज एके काळीं किती महाग होती हें हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांच्या व सत्ताधीशांच्या अनुभवास आणून दिलेलें आहे; आणि याच मराठा मंडळानें जतन करून वाढीस लावलेल्या महाराष्ट्रांतील मराठी राज्याच्या कोंवळ्या, लहान, व रोडक्या रोपांतूनच " मराठा साम्राज्य " रुपीं, विस्तीर्ण व प्रचंड वृक्ष बनून, त्याचा हिंदुस्थानांत दशदिशा विस्तार झाला आहे. जगांतील कोणत्याही साम्राज्याच्या, राज्याच्या, संस्थानाच्या, अथवा संस्था, किंवा मंडळाच्या, अकल्पनातित भरभराटीचे व उत्कर्षाचे असे योगायोग क्वचितच जुळून येत असल्यामुळें,-आणि शिवाजीची कैद, संभाजीचा मृत्यू, पानिपत येथील पराभव, नारायणरावाचा मृत्यू, अशा एका मागून एक प्राण घातक आपत्तीं मराठ्यांवर सारख्या कोसळत गेल्यानें

त्यांनां जबरदस्त ठोकर बसत गेली असूनही, त्या त्या प्रत्येक आपत्तीच्या प्रसंगांतून, त्यांनीं पुन्हां पुन्हां वर डोकें काढून, आपली कर्तबगारी मोठ्या शर्तीनें, एक दिलानें, व एक जुटीनें, त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या, व जगाच्या पूर्णपणें निदर्शनास आणून देऊन आपलें नांव हिंदुस्थानच्याच फक्त नव्हें, तर जगाच्याही इतिहासांत अजरामर करून ठेविलें असल्यामुळें—या दृष्टीनें "मराठ्यांचा इतिहास" अत्यंत महत्वाचा व चिरस्मरणीय म्हणून गणला गेलेला आहे; मराठा साम्राज्य अपसांतील फाटाफूट, मतभेद, वैमनस्यें, अव्यवस्थित व बेशिस्त राज्य व युद्ध कारभार, नालायक राज्यकर्त्यांची परंपरा, वगैरे अनेक कारणांमुळें पुढील काळांत दुर्बळ झालें; त्यामुळें इंग्रजासारख्या व्यवस्थित, शिस्तीच्या सुधारलेल्या, व सामुदायिक कार्य एकोप्यानें सिद्धीस नेण्याची हतोटी साधलेल्या प्रतिस्पर्ध्यापुढें त्याचा टिकाव लागला नाहीं, ही गोष्ट अगदीं खरी आहे; तरी सुद्धां—इ० सन १८१८ मध्यें पुण्याची पेशवाई नष्ट झाली, आणि इ० सन १८४८ मध्यें साताराच्या छत्रपतींचें राज्य खालसा झालें तरी सुद्धां—त्यामुळें "मराठ्यांचा इतिहास" या शब्दांनां, अथवा त्यांच्या इतिहासाला असलेलें महत्त्व कोणत्याही प्रकारें तिळमात्रही कमी न होतां तें कायम आहे, व कायमचेंच राहणारे ही आहे; आणि या ठिकाणीं थोडक्यांत, अगदीं थोड्या वाक्यांत, म्हणावयाचें म्हणजे, महाराष्ट्रांतील मराठ्यांचें चिमुकलें राज्य पुढील काळांत "हिंदुस्थानांतील मराठा साम्राज्य" बनून—आणि स्वतःवर आलेल्या निर्मूलन होण्याच्या अनेक भयंकर प्रसंगांतून फिनिक्स पक्षाप्रमाणें पुन्हां पुन्हां जिवंत व पूर्ववत् सामर्थ्यवान आणि अधिक बलाढ्य होत जाऊन, व आपल्या प्रत्येक कट्ट्या व सामर्थ्यवान प्रतिस्पर्ध्यास आपल्या सामर्थ्याची व कर्तृत्वाची हरएक आवश्यक प्रसंगीं सतत जिवंत ओळख देत राहून—याच मराठा साम्राज्याचा, आणि मराठा मंडळाचा, सर्व हिंदुस्थानभर कांहीं काळपर्यंत सारखा जयजयकार होत राहिलेला आहे.

# सुचीपत्र.

## ( व्यक्तिविषयक )


अ

अकबर २३८,२५९,२६८.
अग्निमित्र ३२.
अजयपाल ७५.
अजातशत्रू १७.
अर्जुन ५५.
अत्री १४.
अनाकराज ७७.
अनंगपाल ८५.
अफ्रा १०१.
अब्दुर्रहिमान २५९.
अबदुल्ला-अल-मामून २३६
अबदुल्ला वासफ १८७.
अबुलफज्ल १९३,२५९.
अमित्रघात ३०.
अमोघ वर्ष ११२.
अरुंधती ७.
अलममन २१३.
अल्तमश १०१.
अल्लाउद्दीन खिलजी ८७,१२९,
१३९,१४१,१४४,२६६
अल्लाउद्दीनशहा १५१.
अलेक्झॅंडर दी ग्रेट १५.
अलिवर्दीखान २६०.
अवंतिवर्मा ८८.
अशोक ९,२१,२२,३०,८७.
अश्वघोष ३५.
असदखान २६०.
अहंमदशहा १६०,१६१.
अहंमदशहा अबदली २४२.
अॅंक्टिलटयुपेरॉ १४.
अंगीरस १४.
अंशुवर्मा ८९.

आ

आकाबाई २२७.
आगस्टस सीझर ४१.
आदित्यसेन ९,४४,५४.
आलमगीर उर्फ अवरंगझेब २३८,
२४२,२५५,२६२.
आनदखान २३२.
आसफखान २३९,२४७.
आर्सासिसथियास ३४.

इ

इच्छिनीकुमारी. ७६.
इद्रिशी १९१

इनायतउल्ला २६४
इब्राहीमखान गारदी २५८
इस्मायलखान २५१.
इंग्रज १७६,२७१-७२.

उ

उद्धव २२७.
उस्मानअल्ली २६०

ए

एकनाथ १३६,२२७.
एलफीन्स्टन माउंट स्टुअर्ट १९५.

क

कडफीसेस (पहिला व दुसरा) ३४.
कर्ण ६५,८१.
कर्णवाघेला ७८.
कणाद २३,२१०.
कण्व १४.
कनिष्क ३५,९९.
कपिल २३,२०९.
कबीर १८४,२२७,
कमलादेवी ७९.
कृष्ण १०,३८.
कृष्णदेव १३२.
कृष्णदेवराय १६३.
कृष्णराज ८७.
कृष्णराय १११.
कालीदास ६८,७०.
क्लाईव्ह लार्ड २६५;
किनलॉकर्क० ९२.
क्लिओपाट्रा २४२.
कीर्तिवर्मा १०३.
कीर्तिवर्य १०९.
कुत्बउद्दीन १०१.
कुमारगुप्त ८९.
कुमारपाळ ७५.
कुमारिलभट्ट १८१.
कुलचंद्र ६२.
कूर्मदास २२७.
केशवस्वामी २२७.
केझरविल्यम ३५३.
कुंज ५९,६०.

ख

खरवेल ३२.
खिजरखान २५९.
खुश्रू (खोश्रोझ) १०७.

ग

गज्नीखान २६०.
गणेशनाथ २२७.
गिबन २३५.
गिलेस्पी (जनरल) ९४.
गोपाळ ८२.
गोविंदराज १११.
गौतम २०९.
गौतमबुद्ध २३,२४,२९.
ग्यासुद्दीनतुघ्लख ८०,२५९.

गृत्समद १४.
गंडरादित्य १४५.

च

चनबसवाप्पा १२४.
चरक १८५.
चस्थान ३७.
चाणाक्य २०,२०२.
चार्वाक २३.
चिरोल सर व्हेलंटाइन २२८.
चैतन्य १८५,२२७.
चैत्रपाळ १३०.
चोखामेळा २२७.
चंद्रगुप्त १८,१९,२०,३०,४५,-
१००,१९८.
चंद्रगुप्त ( दुसरा ) ४६.
चंद्रदेव ८५.
चांगदेव ( वटेश्वर ) १३७,२२७.
चांदबिबी २५९,२६०.

ज

जटावर्म सुंदर ३८.
जनक १०.
जनार्दनपंत २२७.
जनीबाई २२७.
जयकेशी ७२.
जयगुप्त ८१.
जयचंद ८६,८७.
जयदामा ३७.
जयदेव २२७.
जयरामस्वामी २२७.
जयसिंह ( जगदेकमल्ल ) ११४.
जयसिंह ( विक्रमादित्य ) १०२.
जरासंध १०.
जलालुद्दीन फिरोज १३९,१४१.
जहान्-आरा २५०.
जहांगीर २३९,२४६-४८,२५१.
जहांदरशहा. २६३.
जिजाबाई २७०.
जीवितगुप्त ८१.
जूलियससीझर २४२.
जैमिनी २३,२१०.

झ

झुलिफकारखान २६३.

ट

टिपूसुलतान १७६.
टेरी ( इंग्रज वकील ) २३९.
ट्रेजन ( रोमचा बादशहा ) ३५.

ड

डायोडोरस सिक्यूलस १६.
डेमोट्रियस ३२.

त

तिम्मराय १६३.
तिरूमल्ल १७४.
त्रिशलाराणी २४.
तुकाराम २२७.
तुळसीदास २२७.

तैलप ५८,११३.
तोरणमल्ल ४९.

द

दमयंती ११.
दशरथ १०,३१.
दामाजी २२७.
दारायस १७,२४१.
दाराशेखो १४.
दाहीर १००.
दुर्लभ ५७.
दुर्लभवर्धन ८८.
देड्डादेवी ८२.
देवपाल ८२.
देवभूती ३३.
देवराय १५४,१६०.
देवराय ( दुसरा ) १६०,१६१.
देवराय ( तिसरा ) १६१.
देवल देवी ८०,८१.
दंतीदुर्ग १०९.

ध

धर्मपाल ८२.
धारसेन ५६.

न

नरसिंहराय १६२.
नरसिंह स्वामी २२७.
नरहरी सोनार २२७.
नळ ११.
नादीरशहा २४२.
नानक २२७.
नामदेव २२७.
नारायणराव पेशवा २७१.
नासिरुद्दीन कुबा १०१,१०२.
नाहपान २६.
निवृत्तिनाथ १३५,२२७.
निझाम १७६,२७१.
निहाल १५७.
नूरजहान २५४.
नेपोलियन बोनापार्ट २५३.
नंदवंश १७,१८.
निंबार्क १२८.

प

परांतक ३९.
प्रभाकरवर्धन ५०.
प्रभुतपूर्ण १११.
पृथ्वीनारायण ९२.
पृथ्वीराज चव्हाण ७६,८५.
पाणिनी २९.
पातंजली २३,२०९.
पिथेगोरास २११.
पुलिकेशी १०३
पुलिकेशी दुसरा १०४,१०५.
पुरगुप्त ४९.
पुष्यमित्र ९,३१,३२,३३.
पौरवघराणें १७.

पोरस १७,१८.
पुंडलीक १३२.
पोर्तुगीज २७१.

फ

फर्रुखसेयर २६३.
फॉ–एन ४६–४८.
फ्रान्सिसडे १७५.
फिलिप २८.
फिरोज तुघ्लख २५९.
फिरोजशहा १५४–१६०
फ्रेंच २७१.

ब

बखत्याराखिलजी ८३.
बसवाप्पा १२४.
बहिरामभट २२७.
बृहद्रथ ३१.
बादरायणव्यास २१०.
बाबर २३२,२३८,२५९.
बिर्त्तिग १२८.
बुक्क १४६,२६०
बुद्धिसागर ६१,६३
बोदलेबुवा २२७.
ब्रूटस २४२.
बिंदुसार २१,३०.
बिंबसार १६.

भ

भानुदास २२७.
भारद्वाज १४.
भारतवंश ८.
भास्कर वर्मा ९६.
भास्कराचार्य १३२,२१२.
भीम ११.
भीमदेव ५७,६६,७१.
भिल्लम १२९.
भ्रुकुटी ( हरिततारा ) ९७.
भूलोकमल्ल १३१.
भोज ५७,६४-७०,११४.

म

मकबुलखान २५९.
मदनवर्मा ७५.
मध्व १२८.
मनरो सर टॉमस १९४.
मनसूरशहावली २५७.
मलिककाफूर ४०,७९,१२९,१४३,
१४६.
मलिकराजी फरुकी २६०.
मलिकंबर २६०.
मल्लिकार्जुन ७५.
महंमद कासीम १००.
महंमद गवान १६२,२३२,२५९,
२६७.
महंमदगिज्नी ५७,७१,२४३-४६.
महंमद घोरी ८३,१०१.
महंमद तुघ्लख २५९.
महंमद पैगंबर २६०.

महमदशहा बहामनी ( दुसरा ) २५१,२६६.
महादेव १३३.
महावीर २३.
महीपाल ८२.
मॅक्समुल्लर १४,१८९,१९३,१९५, २११.
मॅक्सिमीलियन ४.
मॅरिनोसानीटा ४१.
मार्कोपोलो ४१.
माधव प्रधान ७८.
माधवाचार्य १४७,२३२,२६०.
मायादेवी २४.
माल्कम सर जान १९०,१९४.
मार्लेट मॉ० चार्लस २५९.
मित्रगुप्त २१.
मिनँडर २२,३३.
मिहिरगुल ४९.
मीरन मुबारिकखान २६०.
मुआविया २६०.
मुकुंदराज १३०.
मुक्ताबाई १३५,२२७.
मुम्ताज-महल् २४९-५०.
मुधोपंत २२७.
मुबारिक २५९.
मुबारिकशहा २६०.
मूळराज. ५६,५७,१०९,११३, ११४.
मेकाले लार्ड २६५.
मेगास्थनीस १९,१९९.
मेटकाफ सरचार्लस १८७.
मेन सर हेनरी सम्नर २६९.
मेस्टन लॉर्ड २२८.
मैलनदेवी ७२.
मौर्यवंश ३०.
मुंजराज ६०.

य

यशोधरा २४,२८.
यशोवर्धन ४९,५४.
यशोवर्मा ७४.
युक्रेटिडेस ३२.
युडेमास १८.
युधिष्ठिर ९.

र

रणजीतसिंह २४३.
रझियासुलताना २५९,२६०
रतनचंद २६३-६४
राईदास २२७.
राजराजदेव ३९.
राजश्री ५०.
राजसिंह १०३.
राज्यवर्धन ५०,५४.
राजादित्य ३९.
राजाधिराज देव ३९.
राजेंद्र चोलदेव ३९.

रामचंद्र ९,१०,१८.
रामचंद्र ( रामदेव ) यादव १३४–१४०–४१.
रामदास २२७,२६०.
रामराय १६५.
रामानुज १२८,१८२.
रामानंद १८४,२२७.
रामेसीस १६.
रावण १०.
रिस्ले सर हरबर्ट २६९.
रुद्रदामा ३७.
रेडक्लिफ १०
रो सरटॉमस २४७.
रंगनाथ स्वामी २२७.

ल

ललितादित्य ८८.
लवणदेव ७८,
लायल सर आलेक्झंड९०,१८०,२६९
लीलावती २१२.

व

वत्सराज ६४.
वर्धमान स्वामी २३.
वल्लभस्वामी १८५.
वशिष्ट १४.
वशिष्क ३६.
वसुदेव ३३.
वसुमित्र ३२,३३,३५.
वामदेव १४.
वास्कोदिगामा ३३.
व्यास २३.
विक्रमादित्य ४९.
विजयसेन ८३.
विजयादित्य १०९,११४,
विष्णुस्वामी १२८.
विदेहदत्ता २४.
विनयादित्य १०९.
विसलदेव ७१.
विश्वामित्र १४.
व्हिन्सेंट स्मिथ ९,२०,२०५,२०७,२६९.
वीरधवल ७७.
वीरबल्लाळ १२९.
वीरविजय १६०.
वेणूबाई २२७.
वेनशांग ( धवलतारा ) ९७.
वैदेही २४.

श

शजारुद्दर २६०.
शमसुद्दीन ८९.
शहाअलम २७१.
शहाजहान १४,२४२,२४९–५२,२५९.
शहाजी २७०
शहामीर ८९,२६०

शहासुजा २४३.
शाक्यवंश २४.
शार्लेमेन ३.
शालीवाहन ३८.
शिकंदर १६,१७,१८,९९.
शिकंदर लोदी २५९
शिलादित्य ५४,८१.
शिवाजी २६०,२७०,२७१,२७२.
शिशुक ३४.
शिशुनागवंश १७.
शुद्धोदन २४,२८.
शेखमहंमद २२७.
शेरशहा सूर २५९
शोपेनहेर १५.
शंकराचार्य १२८,१८२.
शांती बहामनी २२७.

स

सगर ९.
सभाचंद २६३.
समुद्रगुप्त ४५,४६,९६.
सर्व्हीलिया २४२.
सामंतदेव ८३.
सायणाचार्य १५४.
सांवतामाळी २२७.
स्ट्राबोनेट्रस १६.
सिद्धराज ७३.
सिद्धार्थ २३.
सीता १०,६४.
स्लीमन कर्नल १९०
सुजा २५०.
सुजाउद्दवला. २६०.
सुश्रुत १८५.
सूरदास २२७.
सेमिरामीस १६.
सेलीमआटोमन २६०
सेल्युकिडी ३२.
सेल्यूकसनिकेटर १८,३०,९९.
सोपानदेव १३५,२२७.
सोमेश्वर ८५,११५–११६.
सोवीदेव १२५.
संतोबापवार २२७.
संभाजी २७१.
स्कंधगुप्त ४९.
संयोगिता ८६.
सिंघण ७८,१३०,१४५.
सिंहसराई १००.

ह

हरीहर १४६,२६०.
हरून-अल-रशीद २१३,२३६.
हविष्क ३६.
हसनअली उर्फ अबदुल्लाखान २६३.

हर्ष ५०-५४,९६.

हर्षवर्धन ८१.

हर्षवर्धन शिलादित्य १०४,१०५.

हिराम १६.

हिरेन प्रोफेसर १८७.

हुमायून २५९.

हुलगू २६०.

हुशंगशहा २६०.

हुसेनअल्ली २६०.

हेमाद्रि ( हेमाडपंत ) १३४.

हैदरअल्ली १७६,२७१.

ह्यूएनत्संग ५१,९६,१८९,२२५.

हंटर सरविल्यम १६.

ज्ञ

ज्ञानेश्वर ( ज्ञानदेव ) १३४,२२७, २३३.

# सुचीपत्र.

( भूगोलविषयक. )


अ

अबर्मार ७१,८५.

अजिंठा १०७.

अटक १७.

अण्णेगिरी १२३.

अथ्वनी १५३.

अनहिलपट्टण ६५,१०९,११३.

अनंतपूर २४१.

अफगाणिस्थान २३,३२,३३

अयोध्या १०,१६.

अलाहाबाद ४६,९६.

असीरिया १३.

औध २७१.

अहंमदनगर २५१,२५६.

अहंमदाबाद ७२,२५७.

अंगदेश २४.

आ

आग्रा १०,२५१.

आनागोंदी १४६.

आर्मागांव १७५.

आर्यावर्त ९.

आराचेशिया ३०.

आरिया ३०.

आशिया मायनर ५,१८,१८१.

आसाम ८७,९६.

आळंदी १३४.

आंध्रदेश २२.

इ

इजिप्त १३,२६०.

इराण ४,५,६,१३,१७.

इराणी आखात. २९.

इंग्लंड ३.

उ

उज्जयनी ६०,८४,८७,२०७,२०८

उदंडपूर ८२.

उरयूर ( त्रिचनापल्ली ) ३९.

उरल पर्वत. १८१.

ए

एदलाबाद १३७.

एरंडपल्ल ( एरंडोल )४६.

ओ

ओहींद १७.

क

कतोरियानदी ९६.

कनिष्कपूर ३५.

कर्नूळ २४१.
कनोज १०,८४,८५,९६,२०७.
कपिलवस्तु २४.
करार ३४.
कलकत्ता २७१.
कालिंग २१.
कल्याण २५७.
कल्याणी १६५.
कृष्णानदी २२.
काटमांडू ९२.
कान्स्टांटिनोपल २३३,२६०.
कान्हेरी ४४.
काबूल३०,३२.
कारबाल्हा २३६.
काराकोराम ३३.
काशघर ८९.
काशी १४,२४,२८,२२५.
काश्मीर १४,१६,१७,२३,८७.
कांची २२५.
कुरा १३९.
केरळपुत्र २२,४०.
केरो २३७.
कोकाई ३८.
कोलूर २४२.
कोसल १०,१६,१७,२४.
कोशांबी १०
कंदाहार ३०.
कांजीवरम् ४४.
कुंडणपूर २३.

ख

खंबायत. ७९.
खंबायतचें आखात. २९.

ग

गया २८.
गिरनार २०१,२२५.
गुजराथ २३,४५,७९.
गुलबर्गा १५२.
गोदावरी २२,३२.
गोपकपट्टण ( गोंवें ) ११७,१६२, २७१.
गोरख ९०.
गोवळकोंडें २४१,२५१.
गोहत्ती ९७.
गंगानदी ८,१६.

घ

घंटसाल २२५.

च

चाळिसगांव १३२.
चांगदेव १३७.
चांदा ७२.
चितोड ३१,९१.
चित्रळ ८.
चिनाब १७.
चीन ४.

चेदी १०,६५.
चोल २२.
चंद्रागिरी १७५.
चंद्रनगर २७१.
चंद्रादित्यपुर १२६.

ज

जगन्नाथपुरी २२५.
जपान २३२.
जबलपूर ११.
जर्मनी ५,१८१,२६६.
जम्मू १६.
जयपूर २०८.
जळगांव १०७.
जालंदर ८२.
जावा २१६,२३२.
जिब्राल्टर २३५.
जुन्नर १४४.
जोनपूर २३३,२५९.
जंबुद्वीप ९.

झ

झेलमनदी १७.

ट

टक्कनी २६६.
टायर १६.
टूर्स २५९.

ठ

ठाणेश्वर ५१.

त

तक्षशीला २०८.
तालीकोट १७०,२६२.
तिबेट ८७,९७.
तिरहुत ५५,८३.
त्रिपूर ( तेवूर ) १०३.
तुर्कस्थान ५.
तंजावर ३९,२२५.
त्रिंबकेश्वर १३६.
तुंगभद्रा ११२,१६४.

थ

थेम्सनदी २३५

द

दार्जिलिंग ९६.
दारहट ४४.
दिल्ली १४,८२,२४२.
देवगिरी ( दौलताबाद ) १२९.
देवलबंदर १००.

ध

धरणीकोट ३८.
धार ३१.
धारूर १४४.
धोर ९१,११४.

न

नगरकोट २४४.
नदिया ८३.

नर्मदानदी ८,९,११,१८,११२.
नाईलनदी २३५.
नागापट्टम् ३९.
नाशीक १०८.
निनेवी १६.
निषध ११.
नेपाळ २३,३०,८७,९६,१७९.

प

पनावती ९२.
पन्हाळा १३१,१४४.
प्रतिष्ठान ( पैठण ) ३८.
पाटणा ( पाटलीपुत्र ) १७,२३,४५,
१९७,२०७,२५०.
पाटणें १३२.
पार्थिया ३२.
पानीपत ८६,२५८,२७१.
पारोपसीनदी ३०.
पालीठाणा ७१.
पिरनीजपर्वत २५९.
पुणें २७१.
पुरुषपूर ( पेशावर ) ३६.
पेनकोंडा १७३.
पैठण १३५.
पोर्तुगाल ३.
पोलांड ३.
पंजाब ८,१७,१९,३२.
पंढरपूर १०८,१३२.
पांडय २२.

फ

फत्तेपुर शिक्री २५१.
फ्रान्स २६०,२६६.
फिरोजाबाद १५४.

ब

बगदाद १००,२३६.
बदामी १५०.
बहार १०.
बॅक्ट्रिया ३२.
ब्रह्मपुत्रानद १६,१७.
बाबीलोन १८.
बाबिलोनिया २९.
बास्फरसची सामुद्रधुनी २५९.
बिलासपूर ११.
बेलमकोंडा १५३.
बेसर २३.
बेसाली १७.
बैलूर २२५.
बोर्निओ २१७,२३२.
बंगाल २७१.
बांकीपूर १७.

भ

भडोच २९.
भारतवर्ष ९.
भिलसा ३१,१३९.
भीतरी ४९.
भीरकोट ९१.

म

मकवानपूर ९२.
मगध १०,१६,१७,१८,२४.
मच्छलीपट्टण १७५.
मथुरा १०,२०८.
मद्रास २१,२२,१७५,२७१.
मदुरा ३८,२२५.
मयूरखंडी १११.
मलंगड २५७.
महोबा ७५,८७.
मालखेड ( मान्यखेट ) ८७,११०.
मासिडोनिया १५.
माळवा ११,३२,५७,७१.
मिसर ८.
मुद्गल १५३,१५७.
मुर्शिदाबाद ९२,२४०.
म्हैसूर २७१.
मंगळवेढें १२९.
मंदोसर ४९.
मुंबई २७१.

य

यमुनानदी ६,८.
युफ्रेतीसनदी २१,२३५.
युरोप २४,२३२.

र

रशिया ५, १८१.
राजगृह १७.
रायचूर १६४.
रोम २३३.
रोहिलखंड २७१.

ल

लालकोट ८५.
लाहोर २४३.
लॉयर २३५.
ल्हासा ९७.
लंका १०.
लंडन २४३.

व

वल्लभी ५६.
वातापिपूर ( बदामी ) १०३.
विजयानगर ४०,१४६.
विजापूर २३२,२५१.
विदर्भ ११.
विदीशा ३१.
विदेह १०,२४.
वैसाली २३.
विंध्याद्रि ८.

श

शिकंदरा २५१.
शियालकोट १७.
शिवनेरी २७०.
श्रीरंगम् २२५.

स.

सत्पुत्र २२,४०.

साकसनी २६६.
सांची ४४.
सातारा १०८,२७२.
सांवतवाडी १०८.
सारुवड १३७.
सिलोन २३.
सीरिया ३०.
सुमात्रा २१७,२३२.
सुरत १७५,२३९,२४०.
सुसास १८.
सेलिबीज २१७.
सोमनाथ २२५,२४४-४५.
सोलापूर १६५.
स्थानेश्वर ८६.
स्पेन ३,२३५.
स्वात ८.
स्वीडन ३.
संबावा २१७
सिंघणपूर १३१.
सिंधप्रांत १७.
सिंधूनद ६,१६,१७,१९,३३.

ह

हसनपूर २६४.
हळेबीड १२८.
हिमालयपर्वत ५.
हिरात ३०.
हुष्कपूर ( हुष्कर ) ३६.
हैदराबाद २७१.
हिंदुकुशपर्वत ५,८,१७,१८,२२.

क्ष

क्षिप्रानदी ६९,८७.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १२ | हतिहास | इतिहास |
| ७ | २८ | ग | व |
| १७ | २४ | सोडाचा | सोडावा |
| १७ | २८ | महिन्याच्य | महिन्याच्या |
| २९ | ४ | बतत | बसत |
| ३६ | १४ | फेला | केला |
| ३६ | २९ | ·ब | व |
| ६० | २८ | सिंधुतल | सिंहल |
| ६६ | २७ | तरवाग्वाराच्या | तरवारीच्या |
| १०३ | २४ | मंगलीशहा | मंगलीश |
| १३१ | २५ | सघण | सिंघण |
| १५९ | २० | परंतृ | परंतु |
| १७३ | २९ | Forgatter Empere | Forgotten Empire |
| १९७ | २० | भररेला | भरलेला. |